# हिंदुधर्म आणि सुधारणा.

पुणें जगद्धितेच्छु छापखान्यांत छापिला.

# हिंदुधर्म आणि सुधारणा.

हा ग्रंथ

श्री विद्याधर पंडित

यांनीं लिहिला

तो

महादेव शिवराम गोळे, एम्. ए.

प्रिन्सिपाल, फार्ग्युसन कॉलेज, पुणें,

यांनीं

प्रसिद्ध केला.

---

१८९८.

( ग्रंथ प्रकाशकानें सर्व हक्क आण

# अनुक्रमणिका.


पृष्ठ.

प्रस्तावना .................................... (१)

पूर्वार्ध.

भाग १ ला. मी एक वडा सुधारक होतों .................... १
२ रा. सुधारणेसंबंधी माझ्या अचाट कल्पना ......... ५
३ रा. मला वाटलें, हिंदुधर्मांत बिलकुल त्राण उरलें नाहीं. १४
४ था. माझे विचारांत कोठें चूक तर नाहींना? ...... १९
५ वा. माझ्या सुधारक बंधूंचीं भिन्न मतें .............. २३
६ वा. मी एका जुन्या चालीच्या गृहस्थाशीं संभाषणाचा योग जुळवून आणिला.................... २७
७ वा. हिंदु लोकांनीं खिस्ती व्हावें, हाच सुधारणेचा सोपा व फायद्याचा मार्ग, असें मला भासूं लागलें. ३३
८ वा. माझा सुधारकपणा हळूहळू गळूं लागला ...... ४०
९ वा. शुद्ध इंग्रजी शिक्षणाचे सामाजिक दुष्परिणाम.. ४९
१० वा. एका सुधारक बहादराची हकीकत ऐकून मी चकित झालों........................... ५४
११ वा. सुधारक बहादरांनीं स्वतः सांगितलेला वृत्तांत ६०
१२ वा. एका नेटिव्ह खिस्ती गृहस्थाचा मला उपदेश... ७१
१३ वा. एका बंगाली साधूचे खिस्तीधर्माविषयीं विचार. ७८
१४ वा. पाश्चात्य सुधारणेचीं तत्त्वें..................... ८५
१५ वा. हिंदुधर्माचीं पंच महातत्वें........ ............ ९२
१६ वा. मी मूर्ख, मला धर्मज्ञान संपादिलें पाहिजे, अशी उत्कंठा वाटूं लागली.....................१०१
१७ वा. माझ्या प्रवासास आरंभ झाला............. ..१०९
१८ वा. बालविवाहाचें रहस्य..............................११५
१९ वा. बालविवाहानें सात्विक प्रेम उत्पन्न होतें.........१२३
२० वा. ब्राह्मणज्ञातीच्या ऱ्हासाचें कारण बालविवाह नसेल, असें मला वाटूं लागलें...........१२८
२१ वा जातिभेदाची उत्पत्ति..............................१३४
२२ वा. प्राचीन हिंदुधर्माचें रूपांतर............ ........१४५
२३ वा. भक्तिमार्गांत सात्विकवृत्ति श्रेष्ठतम होय........१५४

पृ
२४ वा. सद्धर्म, धर्म आणि आपद्धर्म ........................१
२५ वा. या भरतभूमींत विषयोपभोगांच्या द्वारें फारशी सुखप्राप्ति होत नाहीं........................ ..१
२६ वा. जुन्या चालीच्या माणसांचे अर्थशास्त्रविषयक विचार........................................१६
२७ वा. सर्व महापुरुषांचें एक विशिष्ट लक्षण...... .. ..१८९
२८ वा. जातिभेदाच्या शाश्वतीचीं चिन्हें............. ..१९५

## उत्तरार्ध.

२९ वा. मी आधुनिक सुधारणेच्या अग्रस्थानीं जाऊन पडलों.............. ..........................२११
३० वा. केवळ पैशानेंच साध्य अशा सुधारणा इष्ट आहेत काय ?........................................२२३
३१ वा. स्त्रियांचीं अगणित दुःखें ........................२२९
३२ वा. स्त्रीधर्म आणि त्याच्या भावी विजयाचीं सुचिन्हें.२४०
३३ वा. विवाहपद्धतीसंबंधानें एका नवीन प्रयोगाची कल्पना........................... ........२५६
३४ वा. मातापितरांशीं विद्वानांचें वर्तन कसें असावें?...२७६
३५ वा. समाजाचें साहजिक स्थित्यंतर. बालविवाहाचें उदाहरण.......................................२८६
३६ वा. विधवाविवाह....................................३००
३७ वा. विधवांची थोरवी व त्यांचीं श्रेष्ठतम कर्तव्यें......३१३
३८ वा. स्त्रियांचें सौजन्य. ईश्वराच्या अस्तित्वाचें नवें प्रमाण........................................३३२
३९ वा. अल्प काळांत केलेल्या अतिरिक्त विद्याभ्यासंगाचे दुष्परिणाम.....................................३४४
४० वा. शहरवासी होण्याचे ऱ्हासकारक परिणाम......३५९
४१ वा. सुधारणा सुचविण्यांत केवढी सावधगिरी राखणें जरूर असतें?....................................३७२
४२ वा. कनिष्ठ हिंदुजातींचीं कर्तव्यें........................३८१
४३ वा. उपसंहार.........................................३९८

# प्रस्तावना.

माझा मित्र **विद्याधर** हा महाराष्ट्रदेश सोडून दूर रहात आहे. [त्या]चा हा ग्रंथ मित्रकार्य ह्मणून प्रसिद्ध करण्याचें मला भाग पडलें [आ]हे. विद्याधरास एक प्रकारच्या वैराग्यानें गांठिलें आहे, तेव्हां तो [स्व]तः होऊन आपला ग्रंथ प्रसिद्ध करील असें न वाटून व ग्रंथ फार [म]हत्त्वाचा आहे असें जाणून त्याच्या प्रकाशनापुरती जबाबदारी मी आपणाकडे घेत आहें.

हा विद्याधरनिर्मित ग्रंथ प्रथम वाचणारास एकाद्या कल्पित कादंबरीप्रमाणें केवळ मनोरंजनार्थ लिहिला आहे कीं काय असा भास होतो. त्यापासून मनोरंजन होतें हें खरें; परंतु त्यांतील विषयांचा विचार करूं लागलें, ह्मणजे तो तत्त्वविवेकाच्या दृष्टीनें लिहिलेला आहे असें पूर्णपणें दिसून येतें. एवढेंच नव्हे, तर वाचक अनुभवी आणि शोधक असेल, तर ग्रंथांतील मजकूर विद्याधरानें प्रत्यक्ष अनुभवानें लिहिला आहे असें त्याच्या लक्षांत येईल; विद्याधरानें वर्णिलेल्या व्यक्ति, एक ना दोन, अनेक त्याच्या नजरेस पडूं लागतील; व या ग्रंथांत कल्पित असें कांहींच नाहीं अशी त्याची खात्री होत जाईल.

२. उत्कृष्ट विद्वान् सुधारक आपलीं मतें कशीं मंडन करितात, तें अनेक पुस्तकांच्या आणि वर्तमानपत्रांच्या द्वारें सर्वांस नित्य कळत आहेच. परंतु जुन्या चालीच्या धर्मसंरक्षक मंडळींस काय वाटतें, ते धर्माभिमान कां बाळगतात, त्यांची श्रद्धा या इंग्रजी विद्येच्या काळांत देखील कोणत्या कारणांनीं कायम रहाते, त्यांमध्यें कोणत्या उत्कृष्ट प्रेरणा व मनोवृत्ति आहेत, त्यांस सुधारणेची भीति कां वाटते, व सुधारणेपासून कोणतें नुकसान, कोणते दुष्परिणाम घडतील असें वाटतें—या सर्व गोष्टींचा शांतपणें विचार केलेला फार थोड्या ठिकाणीं दृष्टीस पडतो. या गोष्टींचें सर्व लोकांस योग्य ज्ञान होण्याजोगा आतांपर्यंत चांगला ग्रंथ झालेला नाहीं. ही उणीव विद्याधराच्या ग्रंथानें दूर होण्यासारखी आहे. जुन्या चालीच्या अनेक

सुज्ञ गृहस्थांशीं त्याचे वादविवाद झाले, त्यांनीं आपलें हृद्गत र
सांगितलें, आपलें थोर अंतःकरण त्यापुढें उघडें करून त्यांत
ल्बिष नाहीं, तर उदार मनोवृत्ति भरलेल्या आहेत अशी त्य
खात्री केली, व विद्याधराचें मन आपल्याकडे ओढून घेतलें.
हकीकत या ग्रंथांत आहे. स्वधर्माच्या संरक्षणाची महत्त्वाकां
ज्यांमध्यें आहे, त्यांस हा ग्रंथ मनोरंजकच नव्हे तर उत्कृष्ट उपदे
पर होईल, असें प्रकाशकास वाटत आहे.

जुन्या चालीचे किंवा धर्मसंरक्षक लोक सुधारकांविषयीं बोलतां क्वचित् प्रसंगीं तिरस्कारयुक्त व मर्माघात करणाऱ्या शब्दांचा उपयोग करितात हें सर्वत्र प्रसिद्ध आहे. स्वमताचें आवेशपूर्वक मंडन करीत असतां असे दोष वक्त्याकडून होणें साहजिक आहे. व धर्मसंरक्षकांमध्येंच हा दोष दिसतो, सुधारकांत दिसत नाहीं, असें थोडेंच आहे? तेव्हां या ग्रंथांत सुधारकांस राग येण्याजोगे जे क्वचित् उद्गार असतील त्यांमुळें क्षुब्ध होऊन, त्यांनीं त्यांतील रहस्य लक्षांत आणण्याचा प्रयत्न सोडून देऊं नये, अशी प्रकाशकाची त्यांस विनंति आहे. विद्याधरानें वादांमध्यें जो जसें बोलला तें तसेंच उठवून देण्याचा प्रयत्न केलेला आहे. सुधारकांच्या कित्येक कृत्यांबद्दल धर्मसंरक्षकांचें पित्त खवळून गेलेलें असतें, व त्यामुळें त्या कृत्यांचा उल्लेख करितांना त्यांस आत्मसंयमन करितां येत नाहीं, एवढी एक गोष्ट विद्याधरानें दिलेल्या यथावत् वृत्तांतावरून वाचकांच्या लक्षांत येईल; व ते वादाचे प्रसंग ध्यानांत आणिल्यास ती क्षम्य आहे असें ते सुज्ञपणें गृहीत करतील, अशी प्रकाशकाची आशा आहे.

३. पूर्वीं धर्मांत सुधारणा पाहिजे असें ह्मणणारे सुधारक व ती नको असें ह्मणणारे धर्मसंरक्षक, असे दोनच वर्ग हिंदुसमाजांत होते असें ह्मणण्यास हरकत नाहीं. परंतु विद्या आणि विचार यांच्या प्रसारानें तशी स्थिति आतां उरलेली नाहीं. सुधारकांत पुष्कळ प्रकार उत्पन्न झाले आहेत, व एका प्रकारच्या सुधारकांस दुसऱ्या प्रकारच्या सुधारकांचीं कृत्यें किंवा विचारसरणी पसंत पडतेच असें ह्मणतां येत नाहीं. सुधारणेचें प्रमाण, उपाय, दिशा, व कोणती आधीं आणि कोणती मागून, या सर्व बाबतींत विचारी पुरुषांत मतभेद उत्पन्न हो-

ऊन सुधारकांचे भिन्न पंथ उत्पन्न होत आहेत, अशी वस्तुस्थिति दृष्टीस पडते. त्याप्रमाणेंच जुन्या धर्माचें व रूढींचें संरक्षण करणारांतही हल्लीं प्रकार किंवा पंथ उत्पन्न झालेले आहेत. विद्याधरानें अनेक धर्माभिमानी लोकांशीं संभाषणें केलीं; त्यांत स्वधर्माचें संरक्षण केलें पाहिजे या गोष्टीविषयीं मात्र सर्वांचें एकमत त्याच्या अनुभवास आलें. परंतु कोणत्या कारणांसाठीं, किंवा कोणत्या प्रकारें, किंवा कोठपर्यंत स्वधर्माचें संरक्षण करायाचें याविषयीं भिन्न मतें त्याच्या कानीं पडलीं. ही स्थिति पाहून विचारी वाचकानें चकित होण्याचें कारण नाहीं. धर्मसंरक्षणास भिन्न व्यक्ति भिन्न हेतूंनीं प्रवृत्त होतात हें खरें; तथापि धर्मसंरक्षणाचे अनेक हेतु आहेत, अनेक दिशांनीं धर्मसंस्थेपासून समाजास फायदा होतो, व्यक्तिपरत्वें अनेक भिन्न उदात्त मनोवृत्ति जागृत होण्यास ही एकच संस्था कारण होते, व सर्व धर्मसंरक्षकांस परस्परांचे भिन्न हेतु समजतांच ते त्यांस ग्राह्य होण्यास उशीर लागणार नाहीं—या गोष्टी ध्यानांत आणिल्यास विद्याधराच्या ग्रंथाचें महत्त्व लक्षांत येऊन वाचकास फार समाधान वाटेल.

४. कांहीं वर्षांपूर्वीं सुधारक आणि धर्मसंरक्षक असे जेव्हां दोन पक्ष समाजांत होते, तेव्हां सुधारकांनीं आपल्या वाग्बाणांनीं दुसऱ्या पक्षास जर्जर करून सोडावें, व सुधारल्या स्थितीचें मोहक चित्र त्याच्या दृष्टीस पाडावें; परंतु धर्मसंरक्षक पक्षानें संथपणें त्यांचे सर्व वाग्बाण गिळून टाकावे व त्यांच्या त्या चित्राकडे बिलकुल पाहूं नये; आपणांस जें करायाचें तें बिनदिक्कत करीत रहावें. परंतु तो एकपक्षीय संग्रामाचा काळ आतां गेला. जुन्या धर्माचें व रूढींचें मंडन करणारांमध्यें विचार व दूरदृष्टि वाढली आहे; इंग्रजी विद्या शिकलेले अनेक लोक त्यांच्या पक्षास मिळत आहेत. एतद्देशीय व परदेशीय धर्मग्रंथांचें सूक्ष्म परीक्षण सुरू झालें आहे; व आपलें स्वतःचें अंतःकरण तपासून त्यांत वास्तविक कशी स्थिति आहे, हेंही ठरविण्यांत येत आहे. वाक्चातुर्यानें सुधारकांहून धर्मसंरक्षकांचा पंथ कमी योग्यतेचा नाहीं; व बुद्धिविषयक आणि इतर प्रमाणें देऊन आपण दुसऱ्या पक्षास जिंकूं अशी प्रत्येक पक्षास सारखीच उमेद

आहे. सुधारणाविषयक वादविवादांचें पूर्वींचें कोतें स्वरूप गेलें आहे. सुधारकांचा व धर्मसंरक्षकांचा संग्राम इत:पर विशाळ रणभूमीवर व्हावयाचा आहे. पोकळ पांडित्यानें, बालिश विनोदानें, उद्दामवृत्तीनें किंवा काल्पनिक प्रमाणांनीं या संग्रामांत सुधारकांस जय मिळण्याची आतां आशा नाहीं; प्रतिपक्षाच्या अनुभवास अनुभव, शास्त्राधारास शास्त्राधार, प्रमाणास प्रमाण भिडवून जेव्हां त्यास निरुत्तर करावें, तेव्हां तो पराजय पावेल. सुधारकांच्या अग्रणींचें काम यामुळें आतां किती अवघड झालें आहे, व सुधारणा किती दु:साध्य होत आहे, या गोष्टी या ग्रंथावरून वाचकाच्या लक्षांत येतील. आतां जुन्या चालीच्या लोकांचें व त्यांच्या आधुनिक विद्वान् अनुयायांचें बळ कशांत आहे, त्यांच्या मनांवर कोणत्या गोष्टींचा विशेष परिणाम घडत आहे, व त्यांनीं सुधारणा मागें पाडण्याच्या कोणत्या युक्त्या काढल्या आहेत, या सर्व गोष्टी या ग्रंथांत नमूद केलेल्या आहेत. तेव्हां सुधारकांस शत्रूचें बळ व मर्म दाखवून, आणि वेळींच इशारा देऊन विद्याधरानें त्यांची सेवाच केली आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. या दृष्टीनें सुधारकांनीं या ग्रंथाचा विचार करावा अशी त्यांस प्रकाशकाची प्रार्थना आहे.

५. विद्वान् तेवढे सुधारणेचे कैवारी, अशी एकवेळ स्थिति होती; पुढें विद्वानांत सुधारणेविषयीं उदासीन परंतु सुधारणेचे विरोधक नव्हेत, असे बरेच लोक दिसूं लागले; हल्लीं सुधारणेस विरोध करणारे व स्वधर्माचें यथाशक्ति यथामति रक्षण करूं इच्छिणारे विद्वान् लोक बरेच आढळतात. हें असें वर्तन पूर्वीं एका काळीं विद्वानांस लाजिरवाणें वाटलें असतें, तेंच आतां भूषणावह वाटत आहे, असा विद्या आणि विवेक यांच्या वृद्धीचा परिणाम होत आहे. हें पाहून जुन्या जुन्या सुधारक गृहस्थांस आश्चर्य व खेद वाटतो यांत नवल नाहीं. परंतु हें घडतें कसें याविषयीं त्यांस या विद्याधरविरचित ग्रंथावरून बोध होण्यासारखा आहे. ख्रिस्ती राष्ट्रांत अलीकडे पुष्कळ वर्षें असाच प्रकार सुरू झाला आहे. प्रथम प्राटेस्टंट असून मोठे वयीं क्याथालिक होणारे बरेच लोक तिकडे आहेत, व त्यांमध्यें कित्येक विचारानें, दूरदृष्टीनें व परोपकारानें श्रेष्ठ असे पुरुष आहेत.

शास्त्रज्ञानानें प्रथम धर्म झुगारून देऊन नास्तिक बनलेले, परंतु पुढें धर्म आणि नीति यांच्या विचारांकडे वळल्यावर पुनः श्रद्धापूर्वक धर्माचा अंगीकार करणारे व चालू धर्माचे सर्व सिद्धांत मान्य करणारे असेही कित्येक प्रसिद्ध लोक तिकडे आहेत. तेव्हां, विद्याधर हा प्रथम कट्टा नास्तिक सुधारक असून, त्यास सुसंगतीनें प्रथम ईश्वराच्या अस्तित्वाविषयीं श्रद्धा आपणास यावी असें वाटणें, त्या श्रद्धेकरितां त्याच्या जिवाची तळमळ होणें, उत्कृष्ट पुरुषांच्या आणि स्त्रियांच्या अंतःकरणांतील उत्तम प्रेरणा व मनोवृत्ति पाहून त्यानें श्रद्धावान् होणें, व स्वधर्माच्या आचरणानें समाधान होतें हें प्रत्यक्ष अनुभवणें,–इत्यादि गोष्टी सुसंभाव्य तर खऱ्याच, परंतु त्या जशा विद्याधराच्या वृत्तांतांत घडलेल्या दिसतात, तशाच अनेक दुसऱ्या विद्वानांच्या आयुष्यांत घडून येत असाव्या व त्यामुळेंच विद्वान् लोक धर्मसंरक्षक बनत असावे, असें सहज ध्यानांत येतें. जर विद्वान् सुधारकांस धर्मसंरक्षक पंथाकडे ओढावयाचें असलें तर त्यास उपाय कोणता, हें जुन्या चालीच्या लोकांस या ग्रंथावरून कळून येईल. तसेंच सुधारकांनीं धर्मसंरक्षकांच्या तावडींत सांपडूं नये, असें जर त्यांच्या अग्रणींस इष्ट दिसलें, तर सुधारणापंथ कोणकोणत्या बाबतींत समाधानकारक करणें अवश्य आहे, हें त्यांस या ग्रंथावरून जाणतां येईल. याप्रमाणें उभय पक्षांसही या ग्रंथाचा फारच उपयोग होण्यासारखा आहे–एवढेंच कीं त्यांतील रहस्य ओळखण्याचा प्रयत्न केला पाहिजे, त्यापासून मनोरंजन तेवढें करून घेऊन कोणींही स्वस्थ रहातां कामां नये.

६. सुज्ञ सुधारकांस ज्या थोड्या सूचना करायाच्या होत्या त्या येथवर केल्या. आतां धर्मसंरक्षक मंडळींस ज्या एक दोन सूचना करणें इष्ट दिसतें त्या करितों. हिंदुधर्मांत व रूढींत कांहीं क्षुल्लक फेरफार दरपिढीस अनिवार्यपणें होत जाणार व ते होणें इष्ट आहे. या फेरफारांपैकीं कांहींस सुधारक मंडळी ‘ सुधारणा ’ असें ह्मणणार व ती आपल्या प्रयत्नानें झाली असें ह्मणून ते धर्मसंरक्षकांस कमीपणा आणूं पहाणार. या त्यांच्या ह्मणण्याकडे लक्ष न देतां किंवा त्याविषयीं राग न मानितां, हिंदुधर्माच्या मूळतत्त्वांस अनुसरूनच ते

फेरफार आहेत, त्यांत धर्मसंशोधन आहे, धर्महानि नाहीं, ही गोष्ट सिद्ध करण्याचा व ती सर्व लोकांस समजावून देण्याचा प्रयत्न धर्मसंरक्षकांनीं नित्य करीत राहिलें पाहिजे. तसेंच, पुढच्या पिढींत कोणकोणते फेरफार अवश्य होणारे आहेत, त्यांयोगें कोणकोणतीं समाजकार्यें व्हावयाचीं आहेत, व कोणकोणतीं धर्मतत्त्वें अधिक महत्त्वास चढणारीं आहेत, हें सर्व आधींच दूरदृष्टीनें ओळखून, त्या नव्या फेरफारांस धर्म आणि रूढि यांचें पाठबळ देण्याचा प्रयत्न धर्मसंरक्षक मंडळीनें आरंभिल्यास, त्यांच्या पक्षाचें बळ एकदम द्विगुणित होईल. या कामीं आधुनिक विद्वान् धर्माभिमान्यांनीं आपणांकडून जेवढी मदत करवेल तेवढी करण्याचें श्रेय घेतलें पाहिजे; त्यांनीं उदासीन रहातां कामां नये.

७. दुसरें असें कीं सुधारकांचा वर्ग लहान व त्यांचीं कर्तव्यें थोडीं आहेत; तीं स्वीकारण्यांत ते स्वतःकडे फारच थोडी जबाबदारी घेतात, व तीही त्यांच्यानें चांगलीशी बजावली जात नाहीं. या कारणानें हल्लीं सुधारकांचें मुख्य काम एवढेंच दिसतें कीं, सामाजिक दुःखें व अन्याय निवारणीय असतील तर त्यांचें निवारण करा, असा उपदेश करावा व तटस्थ रहावें. दुःख व अन्याय यांचीं मुळें कोठें आहेत, हें खोल जाऊन पाहण्याचें काम त्यांकडून होत नाहीं, व ह्मणून त्यांचे प्रयत्न बहुधा सिद्धीस जात नाहींत. वरकरणी विचारानें ते जेव्हां धर्मघातक कल्पना काढूं लागतात, तेव्हां त्यांचीं प्रमाणें निर्जीव असतात, त्यांनीं चिंतिलेले लाभ संशयात्मक दिसतात, त्यांचा उतावीळपणा व दुराग्रह पाहून सामान्य जन चकित होतात, व विचारी धर्मसंरक्षकांस स्पष्ट दिसतें कीं ते शुद्धबुद्धीच्या प्रमादानें अस्थिर भूमीवर संचार करीत आहेत. हें असें जें सुधारकांचें काम त्याहून धर्मसंरक्षकांचें काम हजारपट मोठें व जबाबदारीचें आहे. त्यांस सामाजिक दुःखें व अन्याय दिसतच असतात. परंतु समाज विस्खळित केल्यावांचून, त्याच्या धार्मिक श्रद्धेस दुखावल्यावांचून, व त्याच्या श्रेष्ठ मनोवृत्तींस धक्का दिल्यावांचून, त्या दुःखांचें व अन्यायांचें कसें निवारण करावें, कोणते सौम्य उपाय योजावे, वगैरे अनेक फार महत्त्वाच्या गोष्टी त्यांस ठरवाव्या लागतात. धा-

र्मिक आचरणाची, कांहीं एका दृष्टीनें, श्रेष्ठतमावस्था डोळ्यांपुढें धरल्यानेंच कित्येक दुःखदायक व अन्यायाच्या रूढि उत्पन्न झालेल्या असतात. त्यांचा एकाएकीं त्याग केल्यास धार्मिक मनोवृत्तींस धक्का बसतो; व कित्येक उत्कृष्ट मूळ हेतु सुसाध्य असूनही दुःसाध्य होतात. अशा प्रसंगीं ज्या व्यक्तींवर सामाजिक दुःखांचा व अन्यायांचा भार पडतो, त्यांच्या अंगीं प्रथम धर्मबळ आणण्याचा यत्न करावा, ह्मणजे, त्यांच्या मनोवृत्ति उत्तरोत्तर श्रेष्ठ कराव्या, वासनांस उत्कृष्टतर वळण द्यावें, वरिष्ठ कर्तव्यांची पात्रता व हौस उत्पन्न करावी, व त्यांच्या आत्म्याची थोरवी त्यांस जाणवावी. असें केलें ह्मणजे जें पूर्वीं दुःखसें भासत होतें, तेंच सुख भासूं लागतें, जो अन्याय ह्मणून वाटण्याचा संभव होता तोच न्यायसा भासूं लागतो, त्याची फलप्राप्ति बुद्धिप्रणीत न्यायाहूनही अधिक महत्त्वाची व स्पृहणीय वाटते. विद्याधराच्या या ग्रंथांत सामाजिक दुःख व अन्याय यांसंबंधानें अशा प्रकारच्या योजना रूढ होत असल्याचीं जागोजाग उदाहरणें सांपडतात; तीं ओळखण्यास वाचक मात्र मार्मिक पाहिजे. बरें, दुःख व अन्याय यांच्या निवारणाचा हा जो श्रेष्ठ सात्त्विक मार्ग, तो ज्या थोड्या व्यक्तींस लागू पडणार नाहीं त्यांच्या समाधानासाठीं धर्मसंरक्षकांनीं रूढींचें योग्य तेवढें रूपांतर होऊं दिलें पाहिजे. याप्रमाणें त्यांनीं तजवीज ठेविल्यास कर्तव्याची श्रेष्ठतमावस्था सामाजिकांच्या मनांत कायम राहील व आपद्धर्माची मर्यादा योग्य प्रमाणानें वाढेल. अशा तजविजीनें नवीन परिस्थितींत समाजास उन्नतावस्थेस नेण्याचें सुलभ होतें. या मार्गानें जाण्याचा धर्मसंरक्षकांनीं परिपाठ ठेविल्यास आणखी एक जो फायदा होईल तो हा कीं कित्येक सुधारक धर्मसंरक्षक वर्गांत परत येतील व एकंदरीनें समाजाचें ऐक्य वाढेल.

८. जुन्या धर्मास व रूढींस जेवढें उदात्त व उत्कृष्ट स्वरूप देण्याचा प्रयत्न करवेल, तेवढा या ग्रंथांत विद्याधरानें केलेला आहे. धर्माभिमानी लोकांचें बळ त्यांच्या श्रेष्ठ मनोवृत्तींत आहे; त्यांच्या आचरणांतील न्यूनें किंवा दोष देखील सद्-हेतुमूलक आहेत; धर्मश्रद्धेचें महत्त्व शुद्धबुद्धीहून अधिक आहे; शुद्धबुद्धीचें श्रद्धेशीं ऐ-

क्य करण्याचा सर्व सत्पुरुषांचा संतत प्रयत्न आहे; हिंदूंनीं धर्माभिमान बाळगिला तरच इत:पर त्यांच्या समाजाची सुस्थिति व शाश्वती राहण्याचा संभव आहे; इत्यादि अनेक गोष्टी सिद्ध करण्याकरितां त्यानें पुष्कळ पुरावा आणिला आहे. त्याचा उद्देश स्तुत्य आहे, परंतु त्यास यश येण्यास धर्मसंरक्षकांनीं काय केलें पाहिजे? हेंच कीं जे सद्गुण, जे सुविचार, ज्या उदार वृत्ति, जें सात्त्विक आचरण कांहीं थोड्या जुन्या चालीच्या सुज्ञ पुरुषांत त्यानें पाहिलें, तें इत:पर हिंदुसमाजांत केवळ बीजरूपानें व अदृश्यपणें राहून उपयोग नाहीं. त्यास सर्वत्र अंकुर फुटले पाहिजेत; व तें वृद्धिंगत होत गेलें पाहिजे. हिंदुधर्मसंस्थांचा अशा प्रकारें सर्वत्र उत्कर्ष होण्यास व त्यांचें महत्त्व परधर्मीयांच्याही लक्षांत आणून देण्यास भगीरथ प्रयत्न केले पाहिजेत. ही जबाबदारी धर्मसंरक्षक पक्षाची आहे, व ती ओळखून त्यांनीं त्वरित उद्योगास लागावें, तटस्थवृत्ति सोडून द्यावी. हिंदुत्वाचा व हिंदुधर्माचा थोडा तरी अभिमान ज्याच्या हृदयांत वागत असेल, त्यानें तो विस्तृत व खोल करावा, आवेश आणि उत्साह अंगीं धरावा, व सर्व प्रकारच्या परोपकारक कृत्यांचा यथाशक्ति भार उचलून, आपलें जन्मसाफल्य करावें—आपल्या पूर्वजांचें आणि बांधवांचें आणि सर्व समाजाचें अनृणी व्हावें.

९. विद्याधराच्या या ग्रंथांत '**हिंदुधर्म** आणि **सुधारणा**' या विषयाचें पूर्ण प्रतिपादन झालें असें कदापि ह्मणतां येणार नाहीं; वास्तविक पहातां या विषयावर आणखी शेंकडों मार्गांनीं प्रकाश पडण्याचा संभव आहे; व या दिशेनें हा पहिलाच प्रयत्न आहे असें मला वाटतें. विद्याधराच्या मूळ ग्रंथांतील कित्येक भाग त्यानें अद्यापि मागें ठेविले आहेत; त्यांत ईश्वराचें अस्तित्व, कर्मविपाक, धर्माचा इतिहास, वगैरे कांहीं गहन विषयांचें विवेचन आहे; व ते भाग तूर्त प्रसिद्ध करण्याची त्याची इच्छा नाहीं. प्रस्तुतच्या ग्रंथास '**चित्तशोधनाचा खरा वृत्तांत**,' असें त्यानें नांव दिलें होतें. तें जरी अन्वर्थक होतें, तथापि सामान्य जनांस ग्रंथांतील विषयांचा तत्काळ बोध होण्यासारखें नाहीं, असें वाटून प्रकाशकानें तें बदललें आहे.

विद्याधरानें या ग्रंथास स्वत: जो उपोद्घात लिहिला आहे त्यांत पुढील चमत्कारिक मजकूर आहे. " पुढील 'चित्तशोधनाचा वृत्तांत' लिहून झाल्यावर तो मी जेव्हां पुन: वाचूं लागलों तेव्हां कांहींसा चकित झालों. मी प्रथम सुधारक होतों; पुढें धार्मिक जनांच्या सुसंगतीनें धार्मिक झालों; नंतर धर्माच्या रूपांतराकडे माझें लक्ष गेलें; व पूर्वविद्यासंस्कारांस योग्य अशा उत्क्रांति*-तत्त्वां-

---

* **उत्क्रांति**—उत्क्रांति हा पारिभाषिक शास्त्रीय शब्द या ग्रंथांत वरचेवर येणारा आहे; व त्याचा अर्थ बऱ्याच वाचकांस समजण्यासारखा नसल्यामुळें, त्याचें थोडें स्पष्टीकरण करणें.अवश्य दिसतें. **उत्क्रांति** ( Evolution, development ) या विषयावर हल्लीं एक स्वतंत्र शास्त्रच झालेलें आहे, व त्या शास्त्राचे नियम सर्व जीवकोटीस लागू होतील, इतके व्यापक आहेत. तितक्या व्यापक अर्थानें, उत्क्रांति विषयाचें येथें विवरण करितां येणें शक्य नाहीं; ह्मणून कामापुरता बोध व्हावा एवढ्याच हेतूनें ही टीप लिहिलेली आहे.

जगाचें नित्य थोडें रूपांतर होत आहे. आज जशी वस्तुस्थिति आहे, तशीच ती उद्यां राहणार नाहीं; तींत थोडा तरी फेर पडेल. जेवढा अधिक काळ जाईल तेवढा हा फेर अधिकच होत जाणार हें उघड आहे. हा वस्तुस्थितींत जो अवश्य फेर पडतो तो कांहीं थोडा निर्जीव पदार्थांच्या चलनवलनानें व बाकी सजीव प्राण्यांच्या चलनवलनानें उत्पन्न होतो. हवा, पाणी, पाऊस वगैरे सृष्टीचीं नित्यचीं कार्यें व तुफानें, भूकंप, दुष्काळ, वगैरे आकस्मिक कार्यें, यांच्या योगानें वस्तुस्थिति बदलते; तशीच ती प्राणी आणि मनुष्य यांच्या नित्याच्या व आकस्मिक कृत्यांनीं बदलत जाते. उदाहरणार्थ, एखादे दुर्भिक्षाचे प्रसंगीं कांहीं धाडशी मनुष्यांची टोळी एखादे अरण्याचे नजीक जाऊन वसाहत करून राहील. त्या अरण्यांत पूर्वी जे पुष्कळ वाघ असतील ते हळू हळू मारले जातील, किंवा अरण्याचा तो भाग सोडून दूरच्या एखाद्या भागांत ते पळ काढतील. त्यामुळें हरणें, मेंढरें, वगैरे सौम्य प्राणी तेथें अधिक सुरक्षित होऊन, त्यांची संख्या वाढूं लागेल. गवत व लहान झाडेंझुडपें यांचा ते फन्ना उडवितील; व मोठमोठीं झाडें लोक स्वत: तोडून टाकतील. नंतर त्या अरण्याचे भाग पडून त्यांत शेतें उत्पन्न होतील व त्या भूभागाचें मोठें रूपांतर होऊन जाईल. मनुष्यांच्या समाजांतही अशीच अनेक प्रकारची घडामोड सुरू असते; आज एका वर्गाचें प्राबल्य होतें, उद्यां दुसऱ्याचें होतें. केव्हां सुखसंपत्ति विपुल असते, व लोक सुरक्षितपणें रहात असतात; केव्हां आपआपसांत लढाया सुरू होऊन संपत्तीचा नाश होतो. या अशा अनेक प्रकारें वस्तुस्थितींत निरंतर थोडाफार फरक पडत असतो, व कालगतीनें तो मोठा होतो. कोणत्याही एका वेळीं

च्या नव्या पायावर धार्मिकतेची मीं स्थापना आरंभिली, या प्रयत्नांत मी पुनः सुधारक बनलों; कारण, आधुनिक सुधारकांस नवीन **आत्मशुद्धीचा व मनोवृत्तींच्या सर्व श्रेष्ठतेचा मार्ग** दाखवावा, अशी प्रबळ महत्त्वाकांक्षा मनांत उत्पन्न झाली. सुधारकांचीही सुधारणा झाली पाहिजे असें मला वाटूं लागलें, व या कामीं

---

मनुष्याच्या ( किंवा इतर प्राण्यांच्या ) भोंवतीं जी वस्तुस्थिति असते तीस **परिस्थिति** ह्मणतात.

मनुष्य कोणत्याही परिस्थितींत असतां त्यास तीन गोष्टी अवश्य करितां आल्या पाहिजेत, असा सामान्य सिद्धांत निघतो. ( १ ) आपलें व कुटुंबाचें त्यानें **संरक्षण** केलें पाहिजे. अन्नवस्त्रादि आवश्यकता मिळवून, रोग, उपद्रवी प्राणी व मानवी शत्रु यांचें निवारण करून, व आपली सुरक्षित स्थिति कायमची व्हावी ह्मणून ज्ञान, अनुभव व कौशल्य यांची नित्य वृद्धि करून आणि ती नित्य आपल्या कामीं लावीत जाऊन, मनुष्यास आपलें संरक्षण करावें लागतें. ( २ ) आपलीं सुखें वाढविल्यानें व दुःखें निवारल्यानें, मनुष्याची आयुष्यमर्यादा वाढते; याकरितां **सुखवृद्धि** किंवा आयुष्यवृद्धि करणें हें मनुष्याचें दुसरें कर्तव्य आहे. ( ३ ) कुटुंबाची व जातीची **शाश्वती** राखणें याकरितां संतानवृद्धि करणें हें तिसरें कर्तव्य होय. संरक्षण, सुखवृद्धि आणि शाश्वती, या तीन गोष्टी उत्तमपणें साध्य व्हाव्या, ह्मणूनच मनुष्यास जमाव करून राहण्याची इच्छा उत्पन्न होते; तो सामाजिक स्थितींत येतो; व व्यक्तिस्वातंत्र्य कमी करून घेऊन, सामाजिक निर्बंध कबूल करितो. जी गोष्ट व्यक्तीस लागू तीच समाजासही लागू पडते, ह्मणजे संरक्षण, सुखवृद्धि व शाश्वती हीं तीन कर्तव्यें समाजासही अवश्यपणें करावी लागतात.

आतां एका परिस्थितींत असतां व्यक्तीस किंवा समाजास ज्या वर्तनानें वरील तीन गोष्टी उत्तम प्रकारें साध्य करून घेतां येतील, त्याच तशाच वर्तनानें दुसऱ्या परिस्थितींत त्या साध्य होणार नाहींत. याकरितां जसजशी परिस्थिति बदलत जाते तसतसा वरील तीन गोष्टी सुसाध्य करण्याकरितां नवा प्रयत्न आरंभावा लागतो. प्रत्येक परिस्थितींत आपलें वर्तन, आपल्या संवयी व आपल्या कल्पना बदलत जाण्याची जी प्राण्यांची, मनुष्यांची किंवा समाजाची **अनिवार्य** प्रवृत्ति, ती **उत्क्रांति** होय. जगांत उत्क्रांति अवश्य व्हावयाचीच; तिचा वेग वाढविणें किंवा कमी करणें हें कांहीं थोड्या अंशीं मात्र मनुष्यास साध्य असतें. संरक्षण, सुखवृद्धि व शाश्वती हीं साधण्याचा स्वाभाविक प्रयत्न करीत असतां, मनुष्याच्या अंगीं अनेक नवीन गुण येतात, श्रमविभाग होतो, दूरदृष्टि वाढते, अनुभवांमुळें कांहीं कायमचे व कांहीं विशेष प्रसंगास उचित, असे वर्तनाचे नियम ठरतात, समाजांत

आपण सुधारक होऊन यत्न आरंभिल्यास तो फुकट जाणार नाहीं असें मला भासूं लागलें. सारांश हा कीं ज्यास सामाजिक बाबतींत हालचाल करायाची, त्यास सुधारक बनल्यावांचून गत्यंतरच नाहीं; सुधारणा कोणाची व तिची दिशा कोणती, एवढाच कायतो प्रश्न उरतो; व त्या प्रश्नास जें उत्तर मिळतें त्यावरून सुधारकांचे भिन्न वर्ग होतात. ”

१०. विद्याधराच्या या ह्मणण्यांत कांहीं थोडें तथ्य आहे. तथापि आपल्या लोकांचा अंतःस्थ गूढ भाव पाहिला तर सुधारक आणि धर्मसंरक्षक या दोन वर्गांत वास्तविकपणें एक मोठा भेद दिसतो. तो असा कीं हिंदुधर्माच्या मूळ ग्रंथांचा अभ्यास करून, रूढींचे मूळ हेतु ओळखून, व आपल्या लोकांच्या स्वाभाविक मनोवृत्ति जाणून, त्यांस सद्धर्माच्या मार्गास लावण्याकरितां जे आंतून सुधारणेचा प्र-

---

अनेक संस्था उत्पन्न होतात, व असेच दुसरे अनेक परिणाम घडतात. परिस्थितीस अनुसरून आपल्या वर्तनांत व संस्थांत त्वरित फेरबदल करून, वरील तीन गोष्टी साध्य करण्याची जेवढी व्यक्तीची किंवा समाजाची तयारी व योग्यता असेल, तेवढी त्याची अधिक उच्च उत्क्रांत स्थिति आहे,असें ह्मणतां येईल. सर्वांत कठीण कर्तव्य ह्मटलें ह्मणजे स्वसंरक्षण होय. मनुष्य आणि इतर प्राणी यांमध्यें, मनुष्यांमनुष्यांमध्यें, जातींजातींमध्यें, समाजासमाजांमध्यें, त्यायोगें चढाओढ, कलह किंवा लढाई सुरू होते. व जो गुणांनीं व कर्तृत्वानें वरिष्ठ त्याचा अशा ‘ जीवनार्थ कलहांत ’ विजय होतो, जो कनिष्ठ त्याचा पराजय होतो किंवा नाश होतो.

धर्म ही जी संस्था समाजांत उत्पन्न होते, ती उत्क्रांतिमूलक होय. तिचा परिणाम असा दिसतो कीं, जीवनार्थ कलहांत क्रूर पशूंमध्यें जी **हिंसावृत्ति** दिसते व सौम्य पशूंत जी **अनाथवृत्ति** दिसते, त्या दोन्ही वृत्तींचा मनुष्यांच्या परस्पर व्यवहारांतही स्वाभाविकपणें जो उदय व्हावयाचा त्याचें कारण राहूं नये. पशूंमध्यें मानसिक उत्क्रांति फारच थोडी होण्याचा संभव आहे; मनुष्यांत मात्र ती हवी इतकी होऊं शकेल. मानसिक उत्क्रांति होत असतां श्रेष्ठतर मनोवृत्ति धारण करण्याची मनुष्यास योग्यता येते. इकडेच सामाजिक उत्क्रांतीचा ओघ आहे. त्यामुळें मानवी समाजांत जीवनार्थ कलह कमी होत आहे व त्याच्या जागीं ‘ वरिष्ठ गुणी माणसांचें प्राबल्य ’ उत्पन्न होत आहे. ही जी उत्क्रांतीस लागलेली दिशा, ती मनुष्यांच्या स्वभावांत पूर्वींच्या अनेक परिस्थितींच्या अनुभवानें खोल रुजलेल्या धार्मिक मनोवृत्तींचें कार्य होय. याप्रमाणें अलीकडे बऱ्याच विद्वानांचें मत आहे.

यत्न करितात ते **धर्मसंरक्षकांच्या** एका नाहीं तर दुसऱ्या पंथांत गणिले जातात. परंतु जे हल्लींच्या वस्तुस्थितीचा केवळ शुद्धबुद्धीनें विचार करितात, युरोपीय तत्त्ववेत्त्यांचीं मतें सामाजिक संस्थांस लावून त्यांचे गुणदोष ठरवितात, हिंदु धर्माच्या अंतरंगांत शिरून त्यांतून सुधारणेचीं तत्त्वें काढीत नाहींत, तीं बाहेरून आणून सुधारणेचे प्रयत्न आरंभितात, ते बहुजनांच्या दृष्टीनें **सुधारक** होत; व त्यांमध्येंही हल्लीं अनेक पंथ उत्पन्न झाले आहेत, हें पूर्वीं एकदा सांगितलेंच. धर्मसंरक्षक आणि सुधारक यांमध्यें हा जो भेद आहे तो त्या उभयतांच्या विचारसरणींत व वर्तनांत नेहमीं दृष्टीस पडतो. आपण हिंदुस्थानचे रहिवासी ह्मणून मात्र हिंदु, असें सुधारकांस वाटतें. पूर्वज, कुल, देश, इत्यादींच्या संबंधानें जो त्यांस अभिमान वाटतो, तो **धर्मदृष्ट्या नव्हे**, तर राजकीय किंवा ऐतिहासिक दृष्ट्या होय; व तेवढाच बाळगणें इष्ट आहे असें सरासरीनें त्यांचें मत आहे. ही गोष्ट त्यांनीं इतक्या स्पष्टपणें कोठें सांगितलेली आढळली नाहीं, तथापि त्यांच्या कृतींत ती निरंतर प्रकट होते; व हिंदुधर्माची चेष्टा किंवा निंदा जी ते इतक्या निरनुकंपपणें करितात, तिचें मूळ हेंच होय. समाजास ते द्वेष्य होण्याचें किंवा निदान आपलेसे न वाटण्याचेंही हेंच अंतःस्थ कारण होय. स्वधर्माच्या तत्त्वांचें पुष्कळसें **अज्ञान**, व परदेशीय तत्त्ववेत्त्यांच्या विचारांचें पुष्कळसें **ज्ञान**, अशी ही स्थिति या आमच्या देशांत राजकीय कारणांमुळें उत्पन्न झाली आहे; ह्मणूनच सुधारक आणि धर्मसंरक्षक यांमध्यें वर सांगितल्याप्रकारचा जो विशेष भेद या देशांत उत्पन्न झाला आहे, तो इतर स्वतंत्र देशांत नाहीं.

युरोपांत धर्माची सुधारणा करणारे आहेत; व ख्रिस्ती धर्माचें रूपांतर, केव्हां मंदपणें, केव्हां तीव्रपणें, गेल्या तीन शतकें सारखें चाललेलें आहे; व अद्यापिही तें होत आहे. परंतु ख्रिस्ती धर्माचें रूपांतर करणारांनीं कोणता मार्ग धरिलेला आहे तें पाहिल्यास, असें लक्षांत येतें कीं त्यांनीं स्वकीय धर्मग्रंथांच्या आधारेंच सर्व सुधारणा योजिल्या; धर्मग्रंथांतील वाक्यांचे अधिकाधिक खोल अर्थ काढण्याचा प्रयत्न केला; कांहीं धर्माज्ञा गौण समजून त्यांकडे दुर्लक्ष

केलें; कांहीं पूर्वीं गौण होत्या त्या श्रेष्ठ करून त्यांकडे अधिक लक्ष पुरविलें. बाहेरून कांहीं तत्त्वें आणून त्यांच्या जोरानें चालू धर्मास दूषित ठरविण्याचा त्यांनीं कधींही प्रयत्न केला नाहीं; व ते पुढेंही कदापि करणार नाहींत. यामुळें जे ख्रिस्ती गृहस्थ धर्माविषयीं उदासीन, किंवा अश्रद्ध, किंवा पुरे नास्तिक आहेत, त्यांसही सबंद धर्म त्याज्य किंवा तिरस्करणीय असें ह्मणतां येत नाहीं; त्यांस मान्य होण्याजोगीं कांहीं तत्त्वें त्यांच्या धर्मग्रंथांत मिळतातच व तींच प्रमुख करून ते स्वतःस ख्रिस्ती असें ह्मणवून घेण्यास लाजत नाहींत. हाच मार्ग जर सुधारक आरंभतील, तर तेही धर्मसंरक्षकवर्गांत गणिले जातील. व त्यांनीं असें करावें हें इष्ट दिसतें. हिंदूच्या पूर्वजांनीं फार मोठें धर्मभांडार भरून ठेविलें आहे; तें कल्पवृक्षाप्रमाणें आहे. त्यांतून जीं जीं उत्कृष्ट तत्त्वें पाहिजे असतील तीं तीं शोधून काढतां येतील; त्यांस श्रेष्ठता आणण्याच्या प्रयत्नास कोणीही विघ्न करणार नाहीं; मग जीं तत्त्वें गौण ठरवायाचीं तीं त्या श्रेष्ठ तत्त्वांशीं जुळण्यासारखीं नसल्यास आपोआपच त्यांकडे सामाजिकांचें दुर्लक्ष होईल व तीं विसरून जातील. कोणीही ख्रिस्ती गृहस्थ किंवा मुसलमान गृहस्थ, धर्माचे दोष तेवढे डोळ्यांपुढें धरून धर्मनिंदक होत नाहीं; स्वधर्मांत फार थोडा गुण आहे असें त्यास कदाचित् वाटलें, तर त्या तेवढ्या गुणाचेंच महत्त्व वाढवून तो धर्माभिमानी राहतो. जगांतील सर्व प्रबळ धर्माच्या लोकांचा या बाबतींत आपण कित्ता घेण्याची आतां वेळ आली आहे. धर्मगुण पहायाचे, धर्मदोष विसरायाचे, धर्मशोधनानें सुधारणा आरंभायाची, धर्मनिंदा करायाची नाहीं, धर्मदृष्ट्या हिंदु रहायाचें, असें वर्तन आरंभिल्याखेरीज स्वतःचेंच समाधान व्हावयाचें नाहीं, मग इतर बांधवांचें कसें होईल ? तात्पर्य, इतःपर **ज्यांस धर्मदृष्ट्या हिंदु राहण्याची लाज वाटेल, किंवा पसंत पडणार नाहीं,** त्यांस ओळखण्याकरितां **विधर्मी सुधारक** किंवा अशीच एक विशेष संज्ञा योजणें इष्ट दिसतें. ज्या सुधारकांचा बहुजनसमाज द्वेष करितो ते हे विधर्मी सुधारक होत.

११. असो. आपला ग्रंथ सर्वत्र वाचला जावा, सामाजिक प्रगतीच्या

कामीं समजस माणसांस तो सूचक व्हावा, व अप्रबुद्ध जनांस तसाच बोधपर व मनोरंजक व्हावा, असा तो लिहिण्यांत विद्याधराचा हेतु दिसतो. हा हेतु कितपत सिद्धीस जाईल तो जावो; मर्मज्ञ वाचकांनीं तरी तो लक्षांत धरून या ग्रंथाविषयीं आपला अभिप्राय ठरवावा. " जो ग्रंथ वाचला जात नाहीं तो लिहिण्याचा कशास प्रयास करावा ? ज्यामध्यें भिन्न मतांच्या विचारी पुरुषांची महत्त्वाकांक्षा व धोरणें स्पष्ट होत नाहींत, तो प्रसिद्ध झाल्यानें समाजावर कोणता इष्ट परिणाम घडणार ? " असें विद्याधरानें ह्मटलें आहे; व या दृष्टीनें त्यानें करमणूक, उपदेश व ऊहापोह या तिहींचा एकत्र संग्रह केला आहे. त्यामुळें ग्रंथास मिश्र स्वरूप आलें आहे, व तें कदाचित् शुद्धविवेकी पुरुषांस पसंत पडणार नाहीं. तथापि अशा मिश्र स्वरूपापासूनही जो एक विशेष फायदा होतो तो लक्षांत आणिल्यास हा दोष क्षम्य आहे असें त्यांस बहुधा दिसून येईल. तो फायदा असा. प्रस्तुत ग्रंथ सामाजिक विषयावर आहे; तेव्हां त्यापासून हल्लींच्या सामाजिक स्थितीचें व वाचकवर्गांच्या अभिरुचींचें भावी इतिहासकारांस थोडें तरी दिग्दर्शन होईल. शिवाय पुढील पिढ्यांतील शोधक पुरुषांस आह्मां पूर्वजांच्या मनाची व आमच्या काळच्या लोकस्थितीची कांहीं कल्पना येईल; व तसेंच, भावी संततीच्या हिताची आह्मीं किती कळकळ बाळगली व त्या कळकळीनें, आपल्या मतवैचित्र्यानुसार, आह्मी कोणत्या कर्तव्यदिशेकडे वळलों, हें त्यांच्या ध्यानांत येईल. या ग्रंथावर ज्या मार्मिक व मनःपूर्वक टीका होतील त्याही पुढें याच दृष्टीनें महत्त्वाच्या समजल्या जातील.

१२. या ग्रंथाच्या महत्त्वाविषयीं जेवढें कांहीं सांगणें इष्ट दिसलें तेवढें येथवर सांगितलें. वाचकांच्या हातांत ग्रंथ पडल्यावर त्याचे गुणदोष त्यांस दिसतीलच; तेव्हां त्यांनीं गुणग्राहक व्हावें, दोषकदृष्टि होऊं नये, आपल्या स्वतःच्या बुद्धीनें त्यांतील तत्त्वांची सत्यासत्यता पहावी, इतरांच्या अभिप्रायांवरून आपले अभिप्राय ठरवूं नयेत; व जीं तत्त्वें यथार्थ दिसतील तीं अनुसरण्याचा निश्चय करावा, तटस्थ राहूं नये, अशी त्यांस विद्याधराच्या तर्फे प्रकाशकाची प्रार्थना आहे. सुज्ञ वाचकांकडून स्वतंत्रपणें जे अभिप्राय प्रकाशकाकडे लि-

हून येतील, ते विद्याधराकडे जरूर पाठविले जातील. आपल अभिप्राय लिहून पाठविण्याची वाचकांनीं मेहरबानीनें अवश्य तसदी घ्यावी.

हा ग्रंथ अनेक मित्रमंडळींनीं मूळ हस्तलिखित प्रतीवरून वाचून पाहून त्याच्या प्रकाशनाबद्दल उत्तेजन दिलें; याबद्दल विद्याधर त्यांचा आभारी आहे.

ग्रंथ एवढा मोठा असून तो सुमारें चाळीस दिवसांत छापून तयार झाला, याबद्दल जगद्धितेच्छु छापखान्याचे म्यानेजर, रा. रा. गंगाधर गोविंद गोंधळेकर, यांचा प्रकाशक फार आभारी आहे.

पुणें, शनिवार पेठ,<br>ता० १० नवंबर, १८९८.

म. शि. गोळे<br>प्रकाशक.

# हिंदुधर्म आणि सुधारणा.

पूर्वार्ध.

सत्त्वं सुखे संजयति रजः कर्मणि भारत ।
ज्ञानमावृत्य तु तमः प्रमादे संजयत्युत ॥
ऊर्ध्वं गच्छन्ति सत्त्वस्था मध्ये तिष्ठन्ति राजसाः ।
जघन्यगुणवृत्तिस्था अधो गच्छन्ति तामसाः ॥
सत्त्वानुरूपा सर्वस्य श्रद्धा भवति भारत ।
श्रद्धामयोऽयं पुरुषो यो यच्छ्रद्धः स एव सः ॥

---

अभयं सत्त्वसंशुद्धिर्ज्ञानयोगव्यवस्थितिः ।
दानं दमश्च यज्ञश्च स्वाध्यायस्तप आर्जवम् ॥
अहिंसा सत्यमक्रोधस्त्यागः शांतिरपैशुनम् ।
दया भूतेष्वलोलुत्वं मार्दवं ह्रीरचापलम् ॥
तेजः क्षमा धृतिः शौचमद्रोहो नातिमानिता ।
भवंति संपदं दैवीमभिजातस्य भारत ॥
दैवी संपद्विमोक्षाय निबंधायासुरी मता ।
मा शुचः संपदं दैवीमभिजातोऽसि पांडव ॥

भगवद्गीता ।

# हिंदुधर्म आणि सुधारणा.

## भाग १ ला.

### मी एक बडा सुधारक होतों.

१. कालेजांतून बाहेर पडल्या दिवसापासून मी पहिल्या प्रतीचा सुधारक बनलों होतों. माझ्या बरोबरीचे दुसरे बरेच मित्र मजप्रमाणेंच मोठे सुधारक होते. सुधारक ह्मणवून घेण्यांत त्यावेळीं आह्मांस मोठा अभिमान वाटे; कारण कमी विद्येच्या लोकांहून आपण अधिक विचारी व अधिक दूरदर्शी आहों, व ह्मणून समाजाच्या कल्याणाची आपणांकडेच सर्व जबाबदारी आहे व आपणांसच कायती त्या कल्याणाची कळकळ वाटत आहे, असा भावार्थ **सुधारक** हा शब्द उच्चारितांच आमचे मनांत चटकन् उभा राही. त्यामुळें अज्ञान लोकांमध्यें आह्मांबद्दल जितका अधिक तिरस्कार दिसे तितका आमचा स्वाभिमान बलवत्तर होई.

तरुण जनांच्या मनावर लोकनिंदेचा परिणाम याप्रमाणें उलटा होतो. त्यांचा आवेश वाढत जातो, त्यांचे विचार एकदेशीय होतात, त्यांच्या बुद्धीवर दुराग्रहाचें पटल चढतें, त्यांस अंधत्व येतें असें ह्मटल्यास हरकत नाहीं. तरुणांच्या मनांत सुधारणारूपी प्रखर अग्नीच्या ज्वाळा भडाक्यानें पेटल्यावर लोकनिंदेच्या यथेष्ट वर्षावानें त्यांचें शमन होत नाहीं; केवळ त्या ज्वाळांपासून धुराचे लोट मात्र उत्पन्न होतात, व ते उभयपक्षांच्या दृष्टीस मांद्य आणितात. लोकनिंदेची संवय झाल्यावर ती ऐकल्या वाचल्या वांचून चैन पडत नाहीं, तिनें मनास करमणूक होऊं लागते व अंगांत चेव भरतो. या कारणानें लोकनिंदेस खळ पडूं नये ह्मणून नवें नवें छिद्र पाहून तेथें स-

माजास टोंचावें व समाजाचा निष्फळ क्रोधाविर्भाव पाहून गंमत मानावी, हें एक आह्मां सुधारकांचें त्यावेळीं कामच होऊन गेलें होतें. सुधारणेच्या कळसास जाऊन पोहोंचलेली आमची कल्पनाशक्ति जेव्हां परत वळून व्यवहारांत शिरे, तेव्हां या छिद्रान्वेषणाच्या कामीं तिचें सर्व चातुर्य खर्च होई. असो.

२. सुधारणेची प्रगति व्हावी म्हणून आह्मीं सुधारकांनीं एक मंडळी स्थापिली होती. तेथें हरतऱ्हेच्या सुधारणांचा आम्हीं यथास्थित वाद करावा. इतर देशांतील सुधारणेच्या इतिहासाचीं मंडळीपुढें व्याख्यानें होत असत. स्वदेशांत कोणत्या प्रांतांत कोण सुधारक आहेत, ते कोणत्या विशिष्ट सुधारणेंत गुंतले आहेत, वगैरे गोष्टींची माहिती मिळविण्याचे कामावर कांहीं सभासदांची नेमणूक केलेली होती. परमुलुखांतील सुधारकांचें वेळोवेळीं अभिनंदन करण्याकरितां, कांहीं सभासदांनीं वर्तमानपत्रांत लेख लिहिण्याचें अंगीकारलें होतें. सुधारणेसंबंधानें आमचे शहरांत नित्य नवा विषय उत्पन्न होत असे. ग्रामस्थ लोकांच्या सभा भरवून जेव्हां आमचे अग्रणी अशा विषयांचा कडाक्यानें ऊहापोह चालवीत, तेव्हां त्यांस मदत करण्यास, त्यांस पाठवळ देण्यास व त्यांची बाजू सावरून धरण्यास आमची सर्व मंडळी बहुधा सभेंत हजरच असे.

३. याप्रमाणें आमच्या मंडळीचें काम आज पुष्कळ वर्षें चालू आहे. कांहीं जुने सभासद जात आहेत, नवीन येऊन भरत आहेत, व एकंदरीनें मंडळी जोरांत आहे. या आमच्या मंडळीच्या प्रयत्नानें कोणत्या सुधारणेची किती प्रगति झाली हें मला सांगतां येत नाहीं. एवढें खरें कीं, आमचे लोक सुधारणेस जात्याच प्रतिकूळ, ते स्तब्ध राहतील, परंतु स्वतः होऊन पाऊलभर देखील पुढें चालावयाचे नाहींत अशी आमची सर्वांची खात्री होऊन गेली. अशा या हट्टवादी लोकांमध्यें सुधारणेचें पाऊल मंद—अतिमंद—पडणार ! सुधारकांच्या पिढ्यांमागें पिढ्या—क्वचित् आशा, क्वचित् निराशा—जन्मभर अनुभवून मरणपंथास जाणार ! या विचारानें आमचीं अंतःकरणें वारंवार कोमेजून जात, तथापि आह्मी आपल्या निग्रहापासून ढळलों नाहीं. आपल्या कर्तव्यास आपण जागावयाचें अ-

सा, मंडळी जमली म्हणजे, प्रत्येकजण आपल्या जिवाचा निर्धार प्रकट करीत असे.

४. दुसऱ्या प्रांतांतून किंवा परदेशांतून कोणी विद्वान् मनुष्य आमचे शहरीं आला असतां त्याचें आगतस्वागत करावयाचें; त्याकडून व्याख्यानाच्या व संभाषणाच्या द्वारें जेवढी माहिती मिळेल तेवढी मिळवायाची; विशेषतः, सुधारणानिमित्त परदेशांतील किंवा परमुलुखांतील लोक कोणकोणत्या खटपटी कसकशा करीत आहेत हें समजून घ्यावयाचें;—असा आमचा परिपाठ असे. त्यामुळें क्वचित् प्रसंगीं मनास आलेली उदासीनता किंवा उद्विग्नता सहजपणें दूर होई आणि सुधारणेचा आवेश पुनः प्रज्वलित होऊन अंगांत कर्तृत्व स्फुरण पावूं लागे.

थोड्या दिवसांपूर्वी आमचे एक परमबुद्धिमान् सन्माननीय मित्र विलायतेहून परत आले. त्यांस आपली पूज्यबुद्धि दाखविण्याकरितां आमच्या मंडळीनें मोठ्या थाटाची मेजवानी केली. त्यांशीं संभाषणाचा लाभ प्रत्येकासच हवा होता, त्यामुळें ज्यानें त्यानें प्रश्न विचारून त्या बिचाऱ्या सद्गृहस्थास कंटाळा आणिला असावा. संध्याकाळीं त्यांचें व्याख्यान झालें; त्याचा विषय ‘ इंग्लिश लोकांची सांप्रतची स्थिति व त्यांच्या आणि आपल्यामधील जमीनअस्मानीचें अंतर, ’ हा होता. या व्याख्यानाचा बराच भाग राजकीय संबंधाचा होता. त्यापासून इंग्रजांबद्दल आमची जी पूर्वीपासून पूज्यबुद्धि होती तींत फारशी भर पडली नाहीं, परंतु स्वकीय लोकांविषयीं मात्र अतोनात तिरस्कार आमचे मनांत भरला. अखेरीस भाषणाचा ओघ जेव्हां सामाजिक स्थितीकडे वळला तेव्हां मात्र आमचें चित्त एकाग्र होऊन हृदय दणदणूं लागलें. वक्तयांच्या अप्रतिम वाक्चातुर्यानें इंग्रजांच्या सामाजिक सुस्थितीचें हुबेहुब चित्र आमच्या डोळ्यांपुढें स्पष्ट उभें राहिलें. मग आपण किती कमकुवत, किती आळशी, किती हीन, किती मूर्ख, किती पशुतुल्य, असें वाटून आमच्या तोंडचें पाणी पळालें. सुधारणेचा महापर्वत चढायाचा, तो डोळ्यांपुढें दिसूं लागला. आपली गोगलगाईची मंदगति जाणून निराशेनें आमच्या नाड्या ढिल्या पडल्या. डोळ्यांपुढें अंधारी यावी त्यासारखें होऊन,

' पुढें काय ! ' हें कोणासच कांहीं सुचेनासें झालें. हिंदुस्थानांत जन्म घेण्याचें दुःसह दुःख त्या वेळपर्यंत कोणाच्या अनुभवास आलेलें नव्हतें; परंतु या प्रसंगीं तें इतक्या तीक्ष्णतेनें ह्रदयांत भिनलें कीं, ' दुर्दैव, दुर्दैव ! ' असे उद्गार कोणाचेही मनांत आल्यावांचून राहिले नसावे.

५. याप्रमाणें हें व्याख्यान आटोपल्यावर इतरांप्रमाणें मीही घरीं आलों. घरांत पाऊल ठेवण्याचा मात्र अवकाश तोंच व्याख्यानांतील प्रत्येक शब्दाची आठवण होऊन मन खिन्न झालें. स्वतः इंग्लंडांत जाऊन आल्याप्रमाणें माझी चित्तवृत्ति झाली. जणुकाय नवीन तीव्र प्रकाश घरांत भरल्यामुळें, अथवा डोळ्यांत जादूचें अंजन पडल्यामुळें, घरांतील सर्व वस्तूंचें रूपांतर झाल्यासारखें भासूं लागलें. कोठेंच कांहीं समाधानकारक दिसेना. आपआपले स्थूल दोष प्रकट करून घरांतील सर्व वस्तु सामोऱ्या आल्या आहेत असें वाटूं लागलें. आपल्या गृहस्थितीच्या निकृष्टतेची खरोखर सीमा झाली असें या ज्ञानांजनानें वाटून, तिचा अगदीं वीट येऊन गेला. अज्ञान, आळस, अमंगळपणा, अव्यवस्था, इत्यादि अगणित दोषांचें आपणांभोंवतीं पूर्ण वेष्टन पडलें आहे, यांतून जन्मभरांत आपली सुटका होणार नाहीं, अशी माझी खात्री होत चालली. त्या रात्रीं जेवणावर वासना नव्हतीच, त्यामुळें केव्हां एकदां हंतरुणावर जाऊन पडेन असें मला झालें.

मजप्रमाणेंच माझ्या इतर सुधारक बंधूंची त्या रात्रीं स्थिति झाली कीं नाहीं हें मला सांगतां येत नाहीं. माझें मन इतरांपेक्षां कदाचित् अधिक अधीर असेल व त्यामुळें त्यांत हा एवढा विषाद भरला असेल. त्या एका रात्रीं जे अनेक विचारतरंग माझे डोक्यांत उचंबळून राहिले होते, त्यांनीं माझ्या आयुष्याचा पुढील क्रम सर्वथैव बदलून टाकिला. ती भयंकर रात्र मी कधींही विसरणार नाहीं.

---

## भाग २ रा.

## सुधारणेसंबंधी माझ्या अचाट कल्पना.

६. ती रात्र भयंकर तर खरीच. आषाढाचा कृष्णपक्ष चालू होता. आकाश सर्वत्र ढगांनीं भरून गेलेलें होतें. सभोंवार दाट अंधकार पडला होता. व सर्व वस्तूंवर काळी छाया पसरली होती. सृष्टीमध्यें कोठेंही हालचाल दिसत नव्हती. जिकडे तिकडे सामसुम झालें होतें. अशा स्थितींत दु:खीकष्टी मनुष्याचे विचार बाह्यसृष्टि सोडून अंतरंगांत घुसतात. बाहेर जेवढी शांतता, तेवढा अंतरंगांत कल्होळ उसळतो. माझ्या मनाची याप्रमाणें अवस्था झाली. मग निद्रा कशाची !

बाह्यसृष्टीविषयीं अपरंपार प्रेम माझे मनांत निरंतर वसत होतें. नदीतीरीं बसलें असतां माशांचा पाण्यांतील खेळ पाहण्यांत, तळच्या वाळूंत चमकणारे खडे अवलोकन करण्यांत, लहानमोठ्या लाटा एकमेकींस कशा शांतपणें ओलांडून जातात तो चमत्कार पाहण्यांत, किंवा पांखरांचा स्नानपानविधि अवलोकन करण्यांत माझे मनास करमणूक होत असे. डोंगरावर हिंडत असतां सहजगत्या माझें लक्ष एखादे रंगीत खड्याकडे जावें, व तो तेथें कोठून आला असावा या तर्कांत मन गर्क होऊन रहावें. याप्रमाणें हरएक सृष्ट देखाव्यांत माझें मन रममाण व्हावें. क्षुल्लक गोष्टींनीं देखील विचारांचा ओघ दूर दूर गहन विषयांत नेऊन सोडावा.

परंतु या रात्रीं सृष्टिसुंदरीची मुद्रा अगदीं दुर्मुखलेली व उदास झाली होती. जर त्यावेळीं एकतरी तारा आकाशाच्या एखाद्या कोपऱ्यांत ढगांच्या फटींतून लुकलुकतांना माझे नजरेस पडला असता, तर त्यानेंही माझे मनास कांहींसें हलकें वाटलें असतें. कारण, आमच्या सूर्यानें क्षितिजाखालीं बुडी देऊन जगतास अंधकारांत लोटलें असतां दूरदूरच्या तारारूपी सूर्यांस या जगाची कींव यावी व त्यांनीं अगणित अंतरावरून अल्पस्वल्प प्रकाश आह्मांकडे पाठवावा, हें आश्चर्य नव्हे काय ? अशा दूरस्थ सूर्यांपैकीं जरी एकच

दृष्टिगोचर झाला, तथापि त्याच्या लुकलुकण्यावरून जग मृतप्राय नाहीं, त्यांत तेज आहे, गति आहे, चैतन्य आहे असा बोध होतो. मग असेच दुसरे कल्पनातरंग उठून त्यांमध्यें मन निमग्न होतें, अंतःस्थ विवेचनांचा विसर पडतो, व कदाचित् हा विश्वाचा भाग सोडून देऊन कल्पनेच्या संगतीनें मन दुसऱ्याच विश्वाच्या भागांत भ्रमण करूं लागतें.

७. परंतु त्या रात्रीं कल्पनेस बाहेर पडण्यास मार्गच मिळेना. मनांतल्या मनांतच जी विचारांची चळवळ सुरू होती तींतच मी गुंग राहिलों. सर्व प्रकारच्या सुधारणांचें वारें डोक्यांत भणभणत होतें, त्यास कांहीं शिस्त लाविली पाहिजे असा मीं निश्चय केला व अशा शिस्तीनें गेल्यास आपलें पुढील कर्तव्य विशेष स्पष्ट होईल अशी मला आशा आली. नंतर माझ्या विचारांस जी सरणी लागली, जे अनेक सिद्धांत पटापट ठरत चालले, ते येथें सविस्तर देणें शक्य नाहीं; ह्मणून त्यांचें तात्पर्य मात्र पुढें देतों.

८. आपल्या विचारांत, नित्यकृत्यांत, रितीभातींत, व्यवहारांत, सर्वत्रच सुधारणा झाली पाहिजे. ही सुधारणा आपणांतील प्रमुख लोकांस पसंत पडेल किंवा पुरीशी वाटेल इतकीच करून चालायाचें नाहीं. पृथ्वीवरील कोणत्याही सुधारलेल्या देशांतील सुशील सुज्ञ मनुष्यानें आपलें इत्थंभूत सर्व आचरण पाहिल्यास त्यास आपणांस नांवें ठेवण्यास काडीमात्र जागा सांपडतां कामां नये. व आपणांसही कोणतेंही आचरण परकीयांपुढें करीत असतां मनास यत्किंचित् लज्जा किंवा संकोच वाटतां कामां नये. सत्य, सौख्य आणि सौंदर्य—अथवा सुविचार, सोय आणि सदभिरुचि—या तीन तत्त्वांस अनुसरून आपलें सर्व वर्तन अक्षयीं चाललें पाहिजे. जोंवर असें घडलें नाहीं, तोंवर आपली सामाजिक सुधारणा कच्ची राहणार, व परकीयांपुढें मान खालीं घालण्याचा आपणांस वारंवार प्रसंग येणार. तेव्हां वरील तीन तत्त्वांच्या आधारें कोणत्या सुधारणा करणें अवश्य आहे तें ठरवायाचें.

९. विधवाविवाहाची आवश्यकता हल्लीं जशी नव्या लोकांस त-

शीच ती जुन्या लोकांसही भासूं लागली आहे. तेव्हां या सुधारणेचा अधिक विचार करण्याचें कारण उरलें नाहीं. परंतु कन्यांचा किंवा विधवांचा विवाह कोणत्या प्रकारें व्हावा असा प्रश्न मनांत येतांच हल्लींची विवाहपद्धति अत्यंत अप्रयोजक दिसते. विवाहसंबंधाच्या चालीरीती किंवा धार्मिक संस्कार कोणा परदेशीय मनुष्यास समजावून देणें झाल्यास त्यास आह्मी काय सांगणार? कोणत्या रीतीनें आपल्या चालींचें मंडन करणार? श्रुतिस्मृतिपुराणोक्त मंत्रतंत्रांची सयुक्तिकता किंवा समयोचितता आह्मी कशी दाखविणार? हें सर्व थोतांड मोडून टाकिलें पाहिजे. वधूवरांच्या प्रतिज्ञा परस्परांस समजतील अशा भाषेंत झाल्या पाहिजेत. त्या प्रतिज्ञा होतांना अक्षता उडविणाऱ्या भटाभिक्षुकांची गर्दी काय कामाची? जे आप्तइष्टमित्र वधूवरांच्या वर्तनावर सतत नजर ठेवून त्यांस सन्मार्गापासून ढळूं देणार नाहींत—उभयतांच्या प्रतिज्ञांची त्यांस आठवण देत राहतील—त्यांची प्रतिज्ञास्थानीं गर्दी पाहिजे. वधूच्या वयाची इयत्ताही पुष्कळच वाढली पाहिजे. ती कुमारिका असो किंवा विधवा असो, मातृत्वास योग्य अशा वयास येऊन पोहोंचलेली पाहिजे; ती सुजाण झाली पाहिजे; स्वतंत्रपणें संसार चालविण्याइतकी प्रौढता तिजमध्यें आली पाहिजे; व कुटुंब मध्यम स्थितींतील असेल तर ती एकटी आपल्या श्रमानें कुटुंब चालवील इतकी उद्योगधंद्यासंबंधानें तिजमध्यें योग्यता आली पाहिजे. म्हणजे मग कुटुंबाचे हाल होण्याचा संभवच गेला. पुरुष अकस्मात् मृत्यु पावल्यास स्त्री सर्वस्वी पराधीन होण्याचा संभव उरला नाहीं. गळ्यांत कुटुंबाचा धोंडा बांधल्यासारखें पुरुषास केव्हांही भासणार नाहीं. याप्रमाणें एका केवळ विवाहाच्या कामांत अनेक सुधारणा आवश्यक आहेत.

१०. परंतु विवाहाच्या आधींचा व मागचा असे जे दोन संस्कार वरिष्ठ जातींतील लोक करितात, ते पूर्णपणें अनावश्यक आहेत. हे संस्कार ह्मणजे मुंज व गर्भाधान होत. या संस्कारांची अनावश्यकता एकीकडे ठेविली, तथापि त्यांमध्यें दुसरे जे भयंकर दोष आहेत त्यांकरितां तरी ते संस्कार अजीबात बंद केले पाहिजेत. मुंज, लग्न आणि गर्भाधान या तिन्ही संस्कारांचें याज्ञिक पाहिलें असतां आपल्या अवि-

चाराची कमाल दृष्टीस पडते. हिंदुस्थानांत जेव्हां पुराणें लिहिण्याची गर्दी उडाली, त्यावेळीं सृष्टशक्तींच्या आराधनाची चाल व्यवहारांतून गेल्यासारखीच होती; व शिव आणि विष्णु, आणि त्यांच्या कुटुंबांतील व्यक्ति व त्यांचे भक्त, यांची पूजा रूढ होत चालली. पर्जन्य, जल, वायु, अग्नि, इत्यादिकांचीं दैवतें तेव्हांपासून मागें पडलीं; यज्ञयाग बंद होऊन भजनपूजन सुरू झालें; यज्ञमंडप आणि होमशाळा जाऊन देवालयें व देवघरें त्यांच्या जागीं आलीं; वेदांचा मंत्रपाठ मागें पडून नामोच्चारानें हिंदुस्थान गजबजूं लागलें.

परंतु चमत्कार हा कीं, हीं इंद्रादि दैवतें, एवढ्या मोठ्या कालांतरानें, समाजाच्या एवढ्या मोठ्या रूपांतरानें, अजीबात नष्ट झालीं नाहींत. आमच्या सर्वसंग्रही धर्मकंथेंत त्यांचींही चार ठिगळें आहेत, त्यांसही थोडी धुगधुगी राहील अशी योजना केलेली आहे. प्राचीन समजुती पूर्णत्वानें सोडण्याचें धाडस आमच्या सर्व इतिहासांत आम्हीं कधीं दाखविलेलें नाहीं. ब्रह्मयज्ञांत, वैश्वदेवांत, वगैरे इंद्रादि देवांचें पळीभर पाण्यानें व घासभर आहुतीनें अद्याप संतर्पण चालू आहे; व व्रतबंधादि संस्कारांत होमहवनांनीं त्यांचें आराधन केलें जात आहे. हें आराधन पुढें चालू ठेवणें ह्मणजे अर्थ काय? हाच कीं दोन हजार वर्षांपूर्वीं एतद्देशीयांनीं इंद्रादि देवतांचें उच्चाटन करण्याचा जो प्रयत्न आरंभिला तो अद्यापि सिद्धीस गेला नाहीं. राज्यक्रांत्या झाल्या, धर्मक्रांत्या झाल्या, परंतु आमचें ‘ येरे माझ्या मागल्या ’ हें व्रत सुटत नाहीं ! आधुनिक विद्वानांस तरी हें व्रत सोडण्याचें धैर्य आलें पाहिजे. व्रतबंध आणि ऋतुशांति या संस्कारांस अजीबात फाटा देऊन, नवी विवाहपद्धति अमलांत आणिली पाहिजे. हें सुधारकांचें आदिकर्तव्य आहे. तें केल्यावांचून रानटीपणाचा यथार्थ आक्षेप आह्मांवरचा कधींही जाणार नाहीं.

११. आतां विधवाविवाह, मुंज, गर्भाधान, इत्यादींचा जो येथवर विचार केला त्यावरून सर्व सुधारणा वरिष्ठ जातींकरितां आहेत, अशी शंका कोणाचे मनांत येईल, व सुधारकांचा बेत जातिभेद कायम ठेवण्याचा आहे असें कदाचित् कोणास भासेल. परंतु तसें मुळींच नाहीं. जातिभेदापासून या देशाचें आतांपर्यंत अत्यंत अकल्या-

ण झालें आहे ही गोष्ट सर्व सुधारकांस मान्य झाली आहे; व कोणीही बाणेदार सुधारक जातिभेद मोडण्याच्या कामांत उदासीन राहील असें संभवत नाहीं. सर्व सुधारणांच्या मूळाशीं जातिभेदाचें विघ्न आहे. हा एक मोडण्याचा प्रयत्न निकरानें आरंभिल्यास इतर सुधारणा सुकर होतील. जातिभेद मोडण्याचा प्रयत्न केवळ हिंदु लोकांपुरता किंवा हिंदुस्थान देशापुरता करायाचा नाहीं; सर्व जग एकजातीय होईपर्यंत त्या प्रयत्नास खळ पडूं देतां कामा नये. कारण सर्व हिंदूंची एक जात बनावी, व त्यांनीं ख्रिस्ती, मुसलमान, यहुदी वगैरेपासून पुढें विभक्त रहावें, एवढ्यानेंच कितीशी सुधारणा होणार? पृथ्वीवरील जाति दहाच्या पांच करण्यांत मोठासा पुरुषार्थ नाहीं, व जर सुधारकांनीं तेवढा करूनच समाधान मानिलें, तर त्यांच्या पूर्ण स्वातंत्र्य अनुभवणाऱ्या विचारशक्तीस बट्टा येईल. ज्या कारणांकरितां भिन्न भिन्न हिंदुजातींमध्यें रोटीव्यवहार, बेटीव्यवहार व इतर सर्व व्यवहार सुरू होणें हें आह्मी सुधारक अत्यंत हितावह गणितों, त्याच कारणांनीं हिंदु, मुसलमान, ख्रिस्ती व इतर अनेक जातींमध्यें हे सर्व व्यवहार सुरू होणें हितावह आहे. मनुष्यमात्रांची सारखी योग्यता, सारखें स्वातंत्र्य व सारखे हक्क आहेत हें मोठें तत्त्व शुद्ध बुद्धिवादाच्या पायावर उभारलेलें आहे; तें जेव्हां आह्मी पूर्णपणें अंगीकारूं, तेव्हांमात्र जातिभेद व धर्मभेद व इतर सर्व कृत्रिम भेद अप्रशस्त ठरतात. व ज्यांनीं जातिभेद मोडण्याकरितां कंबर बांधली त्यांनीं धर्मभेदाचा किंवा राष्ट्रभेदाचा विध्वंस केल्यावांचून आपणांस कृतकृत्य मानूं नये.

१२. जातिभेद आणि मूर्तिपूजा या दोन दुष्ट संस्थांनीं हिंदुस्थानच्या लोकांचे मेंदू मंद व संकुचित करून टाकिले आहेत. आपण जात्याच श्रेष्ठ किंवा कनिष्ठ आहों ही अनिष्ट समजूत जातिभेदामुळें व्यक्तिमात्रांच्या मनावर जन्मापासून बिंबून जाते. तीमुळें त्यांचें मन दुराग्रहाच्या पाशांत अडकून राहून उदात्त विचारांस नालायख होतें. मूर्तिपूजेमुळें त्या मनास मानवी जन्माची थोरवी कळेनाशी होते. आपणांहून गुणविशेषांनीं श्रेष्ठ अशा दृश्य किंवा अदृश्य व्यक्तीविषयीं आपली परमपूज्य बुद्धि दाखविण्याकरितां, कोणाही मनुष्यास

साकार चिन्हें अवश्य वाटावीं हें त्याच्या कोत्या बुद्धीचें व अविवेकाचें निदर्शक आहे. ख्रिस्ती व मुसलमान लोकांत अगदीं मूर्ख व रानटी असे पुष्कळ लोक आहेत; परंतु त्यांस देखील ईश्वराची आराधना करण्यास किंवा साधुसंतांविषयीं आपला बहुमान प्रदर्शित करण्यास दृश्य चिन्हांची गरज लागत नाहीं. मग ती एतद्देशीयांसच कां लागावी ? आमचे हिंदुलोक त्यांहून मूर्ख व रानटी आहेत काय ? छे: छे: ! ही मूर्तिपूजा या देशांतून पार हांकून लाविली पाहिजे.

सुधारकांच्या परम श्रेष्ठ अग्रणींनीं सुधारणेच्या आवश्यकतेचें जें पहिलें प्रमेय सांगितलें आहे तें हें कीं, सर्व सुधारणांच्या द्वारें जी एक महत्त्वाची गोष्ट साध्य करायाची ती अशी कीं, मानवी प्राण्यास स्वत:ची खरी योग्यता, खरी थोरवी, जाणवायाची, व त्या थोरवीस अनुरूप अशा उदात्त विचारांची व उदार वर्तनाची त्यास हौस व संवय लावायाची. ही गोष्ट साध्य होण्यास सर्व असमंजस दुराग्रहांचा लोप झाला पाहिजे, सर्व अनुचित आचरणांपासून पराङ्मुख झालें पाहिजे. अशा उन्नत स्थितीस पोंचण्यास जातिभेद आणि मूर्तिपूजा व तदनुषंगिक अनेक आचार—हीं मोठीं विघ्नें आहेत. तीं अवश्य दूर केलीं पाहिजेत.

१३. या सर्व थोरल्या सुधारणा झाल्यानंतर आणखी एक बडी सुधारणा शिल्लक उरतेच. ती ही कीं, ज्या गोष्टी मानवी बुद्धीस अज्ञेय आहेत, असा सर्व सरळ सुविचारी पुरुषांचा सिद्धांत झाला आहे, त्यांविषयीं दुराग्रह किंवा दंभ मनांत उरतां कामां नये. अज्ञेयाच्या शोधांत मानवी बुद्धीनें आणखी हवे तितके प्रयत्न करण्यास हरकत नाहीं; परंतु ते नि:पक्षपाताचे, निर्भयपणाचे व बुद्धिविकारहीन असे असले पाहिजेत. त्यांपासून अज्ञेयाचा कांहीं भाग सुज्ञेय होण्याचा संभव आहे. परंतु जोंवर अज्ञेयास सुज्ञेयाचें स्वरूप निश्चितपणें आलें नाहीं, तोंवर व्यावहारिक आचरणांत अज्ञेयास महत्त्व देतां कामां नये; अथवा, संदेहात्मक कल्पनांस सत्याचे तोडीस नेऊन बसवितां कामां नये.

अज्ञेय तें अज्ञेय, तें सुज्ञेय करण्याकरितां शुद्धबुद्धीनें युक्तिवाद

करण्याचें सोडून देऊन कल्पनेच्या किंवा श्रद्धेच्या किल्लयांत शिरणें, हें भेकडपणाचें लक्षण होय. त्यापासून सर्व सुधारकांनीं अलिप्त राहिलें पाहिजे. या प्रकारची मानसिक व व्यावहारिक सुधारणा ईश्वराच्या अस्तित्वासंबंधानें जे ग्रह रूढ झाले आहेत त्यांमध्यें पाहिजे आहे. ईश्वराचें अस्तित्व बुद्धिवादानें सिद्ध करून दाखवितां येत नाहीं. व तें ग्राह्य केलें तथापि प्रत्येक विशिष्ट कालांशांत ईश्वराची इच्छा काय आहे, हें समजण्यास मार्ग नाहीं; शिवाय, ईश्वराच्या वर्तनाचे नियम किंवा हेतु कोणते व कसे आहेत, हें ठरविणें अशक्य आहे. याकरितां व्यावहारिक आचरणावर कोणींही सुधारकानें आपल्या ईश्वरसंबंधी निराधार कल्पनांचा परिणाम होऊं देऊं नये. सुविचाराच्या किंवा सत्याच्या दृष्टीनें या कर्तव्यास मातबरी येते.

सर्व सुधारणा आस्तिक्याच्या मर्यादेंत करायाच्या हें भित्रेपणाचें तत्त्व कांहीं काळापूर्वीं सुधारकांच्या अग्रणींनीं अंगीकारलें होतें. परंतु तो काळ आतां गेला तें तत्त्व व त्याचे अनुयायी जुनेपुराणे झाले आहेत. नवीनांस तें पसंत नाहीं. या कामीं नव्या सुधारकांचा जुन्या अर्धवट सुधारकांवर जय झाला पाहिजे. पूर्वीचीं आस्तिक्यबोधक मठमंदिरें आतां पुढें ओसाड पडणार. त्यांचें ऐतिहासिक दृष्ट्या मात्र थोडेंसें महत्त्व राहणार. कारण, सुधारणेच्या चढत्या रस्त्याची दिशा दाखविणारे निशाणीचे खुंट असावे तशीं हीं मठमंदिरें इतःपर समजलीं पाहिजेत.

१४. सत्यमेव जयते. सत्याच्या किंवा सुविचाराच्या दृष्टीनें या इतक्या सुधारणा अत्यावश्यक होत. या प्रमुख सुधारणांच्या पोटांत दुसऱ्या पुष्कळ सुधारणांचा अंतर्भाव होतो. उदाहरणार्थ, जातिभेद नाहींसा होतांच सोवळेंओवळें, विटाळ, भक्ष्याभक्ष्यविचार, पेयापेयविचार वगैरे पुष्कळ गोष्टींचा निकाल लागेल. मूर्तिपूजेचें बंड मोडतांच शनिमंगळादि ग्रहांचें माहात्म्य नाहींसें होईल; राहुकेतूंचा उपद्रव बंद होईल; मंत्रतंत्र, जपजाप्य, संध्यासंतर्पण, श्राद्धपक्ष इत्यादि सर्व जुनाट धर्मकृत्यें विलयास जातील. ईश्वराचेंच अस्तित्व संदेहात्मक झाल्यावर, भूतपिशाचें, हडळीडाखणी व इतर सर्व काल्पनिक अस्तित्वें सहजच अश्रद्धेय होतील; व अनुचित आशा किंवा भय

उत्पन्न करणाऱ्या मिथ्या कल्पना, म्हणजे स्वर्ग, नरक वगैरे, याही अनायासें विलुप्त होतील.

१५. येथपर्यंत ज्या सुधारणांचा विचार केला त्या सत्यास अनुसरून होत. मानवी आचरणांत यांचेंच महत्त्व अधिक आहे. सोय आणि सदभिरुचि यांस उद्देशून ज्या सुधारणा करायाच्या त्यांचें महत्त्व कमी आहे. तथापि त्यांची आवश्यकता कमी नाहीं. सत्यपालनानें मनुष्याच्या अंगीं तेज, धैर्य व कर्तव्यतेचें पूर्ण ज्ञान येतें. सोय आणि सदभिरुचि राखल्यानें आयुष्यभर सुखसंतोषाची वृद्धि होते. सत्यपालनार्थ ज्या सुधारणा करावयाच्या त्याच महाप्रयासाच्या आहेत. इतर सुधारणा सुलभ व सोप्या आहेत. उदाहरणार्थ, स्त्रीशिक्षण ही सोयीची व सदभिरुचिमूलक सुधारणा आहे. आपआपल्या ऐपतीप्रमाणें ती सर्वांनीं केली पाहिजे. देशांतून हरएक प्रकारचें अज्ञान काढून टाकणें व हरएक प्रकारचें ज्ञान देशांत आणून रूढ करणें, हें देशास ऊर्जित दशेस आणण्याचें प्रमुख साधन आहे. ज्या कोणामध्यें अणुमात्र सदभिरुचि उत्पन्न झाली असेल तो विधवावपनादि क्रूर प्रघात बंद करण्याच्या कामीं पाहिजे ते प्रयत्न करण्यास मागें पुढें पहाणार नाहीं.

आरोग्यसंरक्षणार्थ ज्या सुधारणा करावयाच्या त्या सुखसंवर्धनासाठीं आहेत. सर्वांनींच त्या आरंभिल्या पाहिजेत. हिंदु गृहस्थिति सुधारण्याकरितां स्त्रियांचे व्यायाम, त्यांचें बाळंतपण, त्यांचे पोषाख वगैरे संबंधानें इंग्रज लोकांपासून असंख्य गोष्टी शिकण्यासारख्या आहेत, व त्या इकडे रूढ करण्याची सुधारणा झाली पाहिजे. मुलांच्या संगोपनासंबंधानें, तरुणांच्या उद्योगांसंबंधानें, कुटुंबांतील व्यवस्थेसंबंधानें, अशाच प्रकारच्या सुधारणेच्या ज्या अनेक कल्पना त्या शांत रात्रीं मनांत येत गेल्या, त्या कोठवर लिहाव्या !

राजकीय सुस्थिति येण्यास हिंदुस्थानभर एकच भाषा झाली पाहिजे, हें सर्व सुधारकांचें मत आहे. परंतु ती भाषा कोणती असावी या महत्त्वाच्या प्रश्नासंबंधानें अद्यापि एकमत होत नाहीं. इंग्रजी भाषाच जर सर्वत्र पसरली तर अत्यंत फायदा आहे, असें हल्लीं दिसूं

लागलें आहे. या भाषेचा सर्वत्र अभ्यास सुरू झाल्यामुळें देशी भाषांस मांद्य येत आहे हें खरें. परंतु तें आज जरी अहितकारक भासलें तरी अखेरीस फायद्याचेंच होणार आहे. या बाबतींत मनास आकुंचितपणा येऊं देतां कामां नये. जशी जगभर एक जात व्हावी हें बुद्धीस इष्ट दिसतें, तसेंच जगभर एक भाषा होणें हेंही तितकेंच इष्ट आहे. मग जी भाषा इंग्रजांच्या पराक्रमानें जगाच्या मोठ्या भागावर आधींच पसरली आहे, तीसच कां आपण उत्तेजन देऊं नये ? जे आपणांजवळ सुविचारांचें किंवा नवीन कल्पनांचें भांडार असेल तें इंग्रजी भाषेच्या द्वारेंच कां शाश्वत करूं नये ? देशी भाषांचें उत्तेजन करणें हें अल्पदृष्टीचें कार्य दिसतें.

१६. या अनंत सुधारणा करणारा किंवा करण्याची ईर्षा मनांत बाळगणारा जो पुरुष तोच **सुधारक** होय. त्यास कसें ओळखावें ? त्याच्या मनाच्या कलावरून. शुद्ध बुद्धीच्या ताजव्यांत जो सर्व कर्तव्यांस तोलून पाहतो, शुद्ध बुद्धीच्या शिळेवर जो सर्व कर्तव्यें कसास लावून पाहतो, तो सुधारक होय. जें कर्तव्य बुद्धीच्या कसास उतरत नाहीं—जें बुद्धीच्या ताजव्यांत रत्तीभरही कमी भरतें—तें त्यानें एकदम रद्द करून टाकिलें पाहिजे. बुद्धीचें तेज दयेच्या किंवा श्रद्धेच्या किंवा इतर मनोवृत्तींच्या पडद्यानें जो मंद करितो, तो भेकड सुधारक होय, किंवा तो सुधारणेचा शत्रूच समजावा. मनोवृत्तींस फितुर होऊन बुद्धीचें राज्य मर्यादित करणारा मनुष्य सुधारणेस परम श्रेष्ठ पदास नेऊन पोंचविण्याच्या कामाचा नाहीं. सत्यास एवढा मान कां ? मनोवृत्तींस कां कमी ? कारण मनोवृत्तींस धरबंध नाहीं; त्यांच्या तडाक्यांत सांपडला ह्मणजे कोणत्या रानटी स्थितीस मनुष्य जाऊन पोहोंचेल तें सांगतां येत नाहीं. बुद्धीचा उदय करणें हीच सुधारणा. सत्याची पारख करण्याचें एकच यंत्र मनुष्याच्या स्वाधीन आहे. तें यंत्र ह्मणजे बुद्धि. तें जर मानवी आचरणांत गौण केलें, तर मनुष्यानें आपली थोरवी जाणली असें ह्मणतां येईल काय ? बुद्धीचें प्राबल्य कमी केलें ह्मणजे सुधारणेचें प्रथम प्रमेयच विसरल्यासारखें होईल.

---

## भाग ३ रा.

### मला वाटलें हिंदुधर्मांत बिलकुल त्राण उरलें नाहीं.

१७. याप्रमाणें या रात्रीं सुधारणाविषयक विचारांची जी मालिका लागत चालली तिची अखेरी कोठें होणार हें माझें मलाच शेवटीं कळेनासें झालें. सुधारणारूपी वृक्षाची कल्पनेच्या सुपीक जमिनींत सत्वर वाढ होऊन त्याचें शिखर तेव्हांच अंतराळास जाऊन पोहोंचलें. त्याच्या शाखा दूर दूर पसरल्या. त्या शाखांस प्रतिशाखा फुटून एवढा विस्तार झाला कीं, कल्पनेसही त्यांचें एकदम आकलन करितां येईना. अशी जेव्हां मनाची स्थिति झाली तेव्हां तेंही शिणल्यासारखें झालें, चकित झाल्यासारखें झालें, कांहीं वेळ स्तब्ध राहिलें व नंतर कल्पनेच्या जगांतून हळूहळू प्रत्यक्ष जगांत उतरलें.

१८. ज्या सुधारणारूपी वृक्षाचा कल्पनेमध्यें अकस्मात् एवढा फैलाव होतो, त्याचीं बीजें विद्वान् विचारी पुरुषांच्या मनांत चांगलीं रुजलीं आहेत काय या प्रश्नाचा मी विचार करूं लागलों. महाराष्ट्रांत माझ्या ओळखीचे किंवा माहितीचे जेवढे विद्वान् लोक होते तेवढ्यांचें नित्यचें आचरण मीं लक्षांत आणिलें. ‘ मी सुधारक आहें ’ असें जेवढे लोक स्पष्ट सांगतात, तेवढेच सुधारक समजावयाचे, असा माझ्या मनांतील आशय नव्हता. मुंबई, पुणें, वगैरे शहरांत आपआपल्या कामधंद्यामुळें सुधारणेविषयींचे आपले विचार प्रकट करण्यास पुष्कळांस संधी मिळत नाहीं. परंतु त्यांच्या आचरणावरून, गृहस्थितीवरून व मित्रांच्या माहितीवरून ते कितपत सुधारक आहेत हें सहज ताडतां येतें. अशा बिनबोभाट सुधारकांची हल्लीं बरीच मोठी संख्या मोठमोठ्या शहरांत आढळते. कर्त्या पुरुषांच्या विद्येच्या, धंद्याच्या व ऐपतीच्या प्रमाणावर घरोघरचें सुधारणेच्या शिरकावाचें प्रमाण अवलंबून असतें. आमचा धर्म वांकवावा तितका वांकतो, व त्यास वांकविणारीं विद्या, धंदा आणि ऐपत हीं तीन कारणें होत. या तिहींच्याही द्वारें सुधारणेचें बीजारोपण बऱ्याच मोठ्या प्रदेशावर झालेलें आहे असें माझ्या लक्षांत आलें.

१९. ईश्वराच्या अस्तित्वाबद्दल शंका घेणारे, किंवा तें नाहींच असें मानणारे, किंवा त्याचा आपल्या आयुष्याशीं कांहीं संबंध नाहीं अशा समजुतीचे विद्वान् आणि ( त्यांच्या साहचर्यानें ) अविद्वान् हल्लीं जिकडे तिकडे दिसूं लागले आहेत. सरासरीनें पहातां दैवावर भरंवसा ठेवणारे जितके विद्वान् आढळतील तितके देवावर भरंवसा ठेवणारे आढळणार नाहींत. ही स्थिति उत्पन्न होण्याचें कारण मूर्तिपूजेसंबंधानें वाढत चाललेला तिटकारा होय. मूर्ति व ईश्वर यांची श्रद्धास्थानांतून बरोबरच रवानगी होते. आपल्या सुखस्थितीबद्दल ईश्वराचे आभार मानणें, आपल्या दुःखस्थितीचें गाऱ्हाणें ईश्वरास सांगणें, किंवा आपल्या अपराधांची क्षमा ईश्वरापाशीं मागणें, या गोष्टी नवीन विद्वानांच्या मनांतही येईनाशा झाल्या आहेत. 'मी ईश्वराची प्रार्थना करितों' असें कोणीं मनोभावानें सांगितल्यास, विद्वान् मंडळी त्यास दांभिक किंवा खोटा समजतील, यांत बिलकुल शंका नाहीं. तो तसा नाहीं असें सिद्ध झाल्यास, तो भोळा, आचरट किंवा मूर्ख असावा असें मंडळी अनुमान करील. प्रार्थनासमाजांत प्रार्थनेस जाणाऱ्या पुष्कळ विद्वानांवर याप्रकारचे अनेक आक्षेप आहेत. प्रार्थनासमाजापासून किंवा तशाच दुसऱ्या नवीन धार्मिक संस्थांपासून दूर राहणारे विद्वान् हिंदुधर्माचे अनुयायी आहेत किंवा मूर्तिपूजक आहेत, असें कोणी समजल्यास तें वस्तुस्थितीच्या अगदीं विरुद्ध होईल. नास्तिक्यानें सर्व धर्मांस फांटा दिला आहे. ईश्वराप्रीत्यर्थ धर्मकृत्यें करायास हवीं असा ग्रह आतां शुद्ध बुद्धीनें राहूं दिलेला नाहीं. आंग्लविद्येनें मनें सुसंस्कृत झाल्यापासून जे अनेक परिणाम घडले आहेत, त्यांपैकीं हा एक अतिशय महत्त्वाचा परिणाम गणिला पाहिजे.

मातापितरांच्या किंवा जुन्या आप्तांच्या किंवा जनसमुदायाच्या समजुतीकरितां, कोणी संध्येचीं चार आचमनें टाकतो, बरेच लोक श्राद्धपक्ष करितात, पुष्कळ लोक सोवळेंओवळें पाळतात; यावरून हिंदुधर्मास अद्यापि मान्यता आहे, जोर आहे, असें कोणी अनुमान करील तर तें मिथ्या ठरेल. हिंदुधर्मांत कांहीं त्राण राहिलेलें नाहीं. वरिष्ठ जातींमध्यें हिंदुधर्माचीं मुळें सुकून निर्जीव झालीं आहेत. स्व-

तंत्रपणें राहणाऱ्या विद्वान् लोकांच्या नवीन कुटुंबांतून मूर्तींनीं पळ काढिला आहे. ईश्वराची आठवण वर्षेंचींवर्षे होत नाहीं; व झालीच तर प्रसंगविशेषीं दैवानें दगा दिल्यास अडाणी बायकांस होते किंवा विपत्तिमूढ पुरुषांस होते. मानसिक धैर्याच्या अभावाचा पुरुषांवर हा दुष्परिणाम होय. याप्रमाणें हें जें नास्तिक्य आमच्या मनांत व आचरणांत रूढ होत आहे, तें स्पष्ट सांगण्यास कोणींही भिऊं नये. नास्तिक्य ही फार जोरदार सुधारणा आहे, गहन विद्याभ्यासंगाचें हें फळ आहे. नास्तिक्याच्या द्वारें अनेक सामाजिक सुधारणांचा पाया रचिला जात आहे; त्याचें महत्त्व जाणून व फायदा घेऊन सुधारणेच्या प्रगतीचीं पुढचीं धोरणें बांधिलीं पाहिजेत.

२०. वर्णसंकरासंबंधानें पहातां अशीच अभिनंदनीय स्थिति वरिष्ठ जातींत दिसूं लागली आहे. न्यायाचीं कोडतें, आगगाड्या, दारिद्र्य वगैरे अनेक बाह्य कारणांनीं जातिभेदाचे नियम शिथिल होत आहेत हें सांगावयास नकोच. परंतु विद्यावृद्धि, विचारस्वातंत्र्य व नास्तिक्य या अंतर्गत कारणांनींही जातिभेद हळूहळू क्षीण होत चालला आहे. इतिहासदृष्ट्या त्याविषयीं थोडा विचार केल्यास एक चमत्कारिक तत्त्व निष्पन्न होतें. वरिष्ठ जातीच्या पुरुषाशीं कनिष्ठ जातीच्या स्त्रीचा जो विवाह त्यास अनुलोम विवाह अशी संज्ञा आहे. प्राचीन इतिहासावरून असें दिसतें कीं, त्या काळीं अनुलोम विवाह शास्त्रसंमत होते; ह्मणजे विवाह करणारा पुरुष स्वजातींतून भ्रष्ट होत नसे; व त्याची संतति निखालस शूद्रांपेक्षां अधिक वरिष्ठ मानिली जात असे. अशा प्रकारचे नियम हल्लीं वेश्यागमनास मात्र लागू आहेत. अनुलोम विवाह करण्याची ज्याकाळीं परवानगी होती, त्याकाळीं दुसरी एक गोष्ट रूढ होती. ती ही कीं, शूद्रांच्या हातून अन्नोदक घेण्यास वरिष्ठ जातींस हरकत नव्हती; मांसाहार बंद नव्हता. प्रत्यक्ष पशुहत्येचें काम आतांप्रमाणें शूद्रांकडे होतें. त्यामुळें शूद्रांनीं कापिलें काय किंवा शिजविलें काय, मांसाहारी ब्राह्मणादिकांस त्या दोन कृत्यांत विशेषसा भेद वाटण्याचें कारण नव्हतें. परंतु जेव्हां ‘अहिंसा परमो धर्मः’ हें तत्त्व वरिष्ठ वर्गांनीं स्वीकारिलें व ते धान्यफलाहारी झाले, त्यावेळीं त्यांस अन्नोदकाच्या कामीं शूद्रांची

प्रत्यक्षपणें गरज पडेनाशी झाली. किंबहुना एका वर्गाची दुसऱ्यास पडेनाशी झाली. सर्व वर्ग अगदीं विभक्त होत गेले.

यावरून असें सिद्ध होतें कीं, जोंवर मांसाहाराची प्रवृत्ति वरिष्ठ वर्गांत होती तोंवर जातिभेदास अलीकडच्याप्रमाणें कडकडीत स्वरूप आलें नव्हतें; जातिभेद सौम्य प्रकारचा होता. सर्व जातींमध्यें रोटीव्यवहार चालू होता; अनुलोमरीत्या बेटीव्यवहारही होत असे, व त्यामुळें मध्यंतरीं मिश्रजाति उत्पन्न होऊन सर्व जातींची एकांत एक कडी जडली जात असे. याप्रमाणें जातिजातींमध्यें त्यावेळीं अधिक दळणवळण व अधिक अनुकंपा उत्पन्न होण्यास साधनें होतीं. त्यांपैकीं प्रमुख मांसाहार हें होतें. जातिभेद आणि मांसाहाराचा-निषेध यांमध्यें कांहींसा कार्य-कारणरूप संबंध आहे. जगांत मांसाहारी लोकांमध्यें जातिभेद आढळत नाहीं, व आढळलाच तर त्यास या देशांतल्याप्रमाणें पूर्णता येण्याचा संभव नसतो. वरिष्ठ वर्णांनीं मांसाहाराचा निषेध सुरू केला तेव्हां त्यांच्या आपसांत भिन्न भिन्न जाति बनत चालल्या. त्यांच्या अनुकरणानें कनिष्ठ जातिही पृथक् पृथक् झाल्या. हिंदुसमाज फाटून त्याच्या चिंधड्या झाल्या.

२१. मांसाहाराचा सुरापानाशीं निकट संबंध आहे. हा संबंध प्राचीन व अर्वाचीन इतिहासांवरून सिद्ध होतो. हल्लीं ज्या जातींमध्यें मांसाहार चालू आहे त्यांनीं सुरापानाचा आपला हक्क दवडला नाहीं. शाक्तपंथीय वरिष्ठ जातींतही हीच गोष्ट नजरेस येते. इंग्रजी राज्यापासून सुरापानास उत्तेजन आलें आहे असें पुष्कळांचें मत आहे. वरिष्ठ जातीचे लोक सुरापानास तयार झाले कीं मांसाहारासही सुरवात करितात; मांसाहाराची सुरुवात होतांच जातिभेदाचा विचार गळून जातो; यानंतर एकामागून एक अनेक सुधारणांकडे मनुष्याचें मन वळतें व त्या अमलांत आणण्यास धैर्य येतें. हल्लीं या अशा पायावर सुधारणेचे डोले उभारत आहेत. विद्वान् व अविद्वान् यांमध्यें नास्तिक्य, सुरापान आणि मांसाशन या पराक्रमजनक त्रैगुण्याचा प्रवेश झाल्यापासून सर्व सुधारणांस फारच जोर आला आहे हें दाखविणें सोपें आहे. परंतु विस्तारभयानें तें येथें दाखवितां येत नाहीं. तथापि सर्वांची खात्री होण्याकरितां एकच प्रत्यंतर येथें

दिलें तर वस्स होईल. हल्लीं आह्मीं सुधारकांनीं हिंदुसमाजास सुस्थितीस आणण्याकरितां ज्या अनेक संस्था स्थापिल्या आहेत—उदाहरणार्थ विधवाविवाहोत्तेजक, स्त्रीशिक्षणोत्तेजक, बालविवाहप्रतिषेधक, मांसाहारप्रतिबंधनिवारक, वगैरे, वगैरे—त्या संस्थांच्या चालकांची, उत्तेजकांची व अनुकंपकांची याद घेतल्यास काय दिसून येईल? हेंच कीं नास्तिक्यादि सुधारणात्रयीपैकीं एकीचाही स्वीकार न केलेले गृहस्थ यादींत शोधूं लागलें तर शेंकडा पांचही सांपडत नाहींत. या सिद्धांताविषयीं कोणाही शोधकास बारीक चौकशी करून आपली खात्री करून घेतां येईल. तात्पर्य हें कीं, बहुतेकांच्या मानसिक धैर्याचा झरा वरील त्रैगुण्यापासून उत्पन्न होतो; अथवा असेंही म्हणतां येईल कीं, ज्या विचारशैलीनें दुसऱ्या अनेक सुधारणा करण्यांत पाप वाटेनासें होतें, त्याच विचारशैलीनें नास्तिक्य, सुरापान आणि मांसाहार यांतही पाप वाटत नाहीं. सर्व सुधारणा परस्परोपकारी आहेत, त्यांतही या त्रयीचे गुण विशेष आहेत.

हिंदुसमाजाची ही अशी स्थिति पाहिली असतां, तत्काळ ध्यानांत येतें कीं, सुधारणावृक्षाचीं मुळें अदृश्यपणें बरींच खोल गेलेलीं आहेत. त्याच्या वृद्धीकरितां सुधारकांचे दृश्यपणेंही अनेक प्रयत्न चालू आहेत. हा वृक्ष दिवसेंदिवस जोरावत जाणार अशीं जिकडे तिकडे सुचिन्हें दिसूं लागलीं आहेत. यावरून असें स्पष्ट होतें कीं, सुधारणेचें असाध्य स्वरूप आतां उरलें नाहीं; तिची अंतिम सीमा व्यवहारदृष्ट्या अद्यापि दूर आहे; तथापि त्या सीमेवर पोंचण्याचें अशक्य नाहीं; व तेथें पोंचल्यावर जे मनोहर परिणाम घडून येतील त्यांचें सांप्रतकाळीं कल्पनासुख अनुभविण्यास कोणतीही हरकत नाहीं.

हल्लींच्या वस्तुस्थितीच्या अवलोकनानें असे समाधानकारक सिद्धांत जेव्हां उपलब्ध झाले तेव्हां माझ्या मनास शांतता आली. ज्या कल्पनातरंगांनीं आधीं मन क्षुब्ध होऊन गेलें होतें, ते तरंग आतां आल्हादकारक भासूं लागले. मनाची खात्री होत चालली कीं, हिंदुधर्म हा केवळ भ्रमाचा भोपळा आहे. नास्तिक्यादि कारणांनीं तो आंतून अदृश्यपणें पोखरला जात आहे. बाहेरून त्यावर सुधा-

रकांचे व सर्व परधर्मीयांचे जबरदस्त टोले बसत आहेत. अल्प कालांत तो अकस्मात् फुटून जाईल, व त्याचीं अनंत छकलें होतील. हा सुदिन आला म्हणजे पुढें काय ? पुढें हेंच कीं, सुधारणेचा रस्ता खुला झाला, तीस कळसास नेऊन पोहोंचवायाचें. सुधारकांचा विजयध्वज सर्वत्र उंच उभारून फडफडावयास लावायाचा !

---

## भाग ४ था.

### माझे विचारांत कोठें चूक तर नाहींना ?

२२. त्या रात्रीं येथवर जो विचारांचा ओघ वाहत गेला त्यानें चित्तास शांति व समाधान प्राप्त झालें. परंतु मनांतील उतावीळपणा जाईना. आमच्या विलायतेहून आलेल्या मित्रांचा अनुभव पाहून असें वाटे कीं, विद्वान् विचारी पुरुषास सुधारणेच्या कळसास जाऊन पोंचणें फारसें अवघड नाहीं. मग सर्व विद्वानांचें याप्रमाणें तावडतोब कां रूपांतर होत नाहीं ? या प्रश्नाचें उत्तर मला कांहीं केल्या देतां येईना. आमच्या मित्रांनीं व्याख्यानांत आपला अनुभव येणेंप्रमाणें सांगितला होता.—

" विलायतेस जाण्याचा माझा कायमचा बेत ठरतांच माझी पहिली तयारी कोणती असेल तिची कल्पना करा. पोषाख वगैरे संबंधाच्या बाहेरच्या अवश्य गोष्टी कोणत्या त्या मला पाहण्याचें कारण नव्हतें. माझ्या अनुभविक मित्रांकडे तें काम मीं सोंपविलें होतें. मग काय उरलें ? हेंच कीं, आपल्या मनाच्या स्थितीसंबंधानें आपल्या आवश्यकता कोणत्या, आपली तयारी कशी पाहिजे, हा विचार मुख्यत्वें माझ्या मनांत भरला. आपल्या स्वभावांत व विचारांत कोणतीं न्यूनें आहेत हें मी निःपक्षपातानें शोधूं लागलों व तीं भरून काढण्यांत सर्व मानसिक धैर्य खर्च केलें. मी जातिभेद विसरून गेलों. माझ्या हिंदुत्वामुळें मजमध्यें जेवढा मनाचा कोतेपणा होता तेवढा पार नाहींसा केला. विश्वधर्माचीं पूर्णपणें निश्चित व

सर्वत्र उपयोगीं अशीं जेवढीं तत्त्वें मला पसंत पडलीं तेवढ्यांतच आपला सर्व धर्म आणिला. आचरणाच्या नियमनांत सत्य आणि सदभिरुचि यांस पूर्ण प्राधान्य दिलें. त्यामुळें जसा बाहेरून तसाच अंतरंगांतून मी निराळाच पुरुष दिसूं लागलों. ह्याप्रमाणें तयारी झाल्यावर मी निघालों. जहाजावरील इंग्रज नौकरांची टापटीप, तत्परता व काम करण्याची शैली पाहून मला फार हर्ष झाला; व इंग्लंडांत असतां इंग्रज नौकरांविषयीं माझा ग्रह अधिकच अनुकूल झाला. कारण कर्तव्य ह्मणून सेवा करणें, तथापि स्वातंत्र्याचा बाणा राखणें, हें इंग्रज नौकरांस पूर्णपणें साधलें आहे. जहाजावरील युरोपियन लोकांशीं मीं निःस्पृहपणें वाद करावा. हें धैर्य मला आपोआप आलें. परंतु प्रसंग पाहून सर्व गोष्टी केल्या तरच त्या शोभतात हें तत्त्व सर्वदा मनांत बाळगावें लागे. हंसण्याखेळण्याचा प्रसंग निराळा, बुद्धिवादाचा निराळा, आपलें खरें मत देऊन नम्रपणें दुसऱ्याचीं मतें ऐकण्याचा प्रसंग निराळा. इंग्लंडांत असतां प्रसंगानुरूप वर्तन करण्याचें हें पहिलें शिक्षण मला चांगलें मिळालें. या शिक्षणानें आपला व लोकांचा मान राहतो आणि संतोष वाढतो. स्त्रियांशीं स्मितपूर्व मधुर भाषण करावें, मित्रांशींही मर्यादेनें वागावें, गमतीच्या वेळीं वादग्रस्त विषय काढूं नये; लोकांच्या अंगीं सुज्ञता आहे असें गृहीत करून आपलीं मतें सरळपणें त्यांपुढें मांडावीं, हेका दाखवूं नये; प्रसंगोचित तेवढेंच बोलावें, पाल्हाळ लावूं नये; इत्यादि अनेक सद्वर्तनाचे नियम मी जे पाळूं लागलों, तें इंग्रजांच्या सुसंगतीचें फळ होय. इंग्लिश गृहस्थांच्या घरांत जसा कुटुंबांतीलच एक मनुष्य असावा, तसा माझा मान राहण्याचें कारण माझा सरळपणा व असंकोचवृत्ति हें होय. इंग्रज लोकांच्या चालीप्रमाणें स्त्रियांस योग्य मान देणें, त्यांशीं उचित विषयांवर संभाषण करणें, त्यांस हस्ताधारादि देऊन सभ्यपणें शुश्रूषापर राहणें, इत्यादि गोष्टी मी इतक्या बिनचुकपणें करीत होतों कीं मला नांवें ठेवण्यास तर जागा नव्हतीच, परंतु माझ्या मार्मिकतेबद्दल मित्रांनीं माझें अभिनंदन करावें. ख्रिस्ती देवालयांतही माझें वर्तन इतरांप्रमाणें व्यवस्थित होतें. धर्मापासूनही करमणूक होते, व ती करून घेण्याचें ति-

कडे चांगलें साधलें आहे. माझें सर्वत्र उत्तम स्वागत झालें; मला तेथें जें जें दृष्टीस पडलें तें तें सर्वच विचारशुद्ध व वर्णनीय वाटलें. पुष्कळांमध्यें मजविषयीं बहुमान, किंवा त्याहून विशेष, ह्मणजे, प्रेम वागूं लागलें; व हल्लीं माझे परम मित्र कोठें आहेत असें मला विचारल्यास ते विलायतेंत आहेत, येथें फार थोडे, असें मला सांगणें भाग पडेल. कारण तेथील मित्रांनीं मला जसें न्यायानें व सौजन्यानें वागविलें तसें वागविण्याची एतद्देशीयांस संवयच नाहीं. या देशांत परम मित्रांमध्येंही छिद्रान्वेषण व मत्सराची थोडी तरी छाया दृष्टीस पडते."

* * * * * *

२३. "आतां आपणांमध्यें जी सुधारणा पाहिजे आहे ती थोडक्यांत सांगणें झाल्यास एवढीच पाहिजे आहे कीं, मनाचा मोठेपणा व दृढनिश्चयीपणा हे दोन गुण आपणांमध्यें पूर्णत्वानें वागले पाहिजेत. ज्यांच्या सहवासानें आपणांस रहावयाचें त्यांहून आपण आपलें मन मोठें व उदार केलें पाहिजे. जर सर्व जगाशीं आपला सहवास घडणें इष्ट असेल तर मनही तसेंच अत्युदार केलें पाहिजे. हिंदुधर्माचा किंवा हिंदु रीतिभातींचा जो मुख्य दुष्परिणाम दिसतो तो हाच कीं मनाच्या मोठेपणास त्या बाधक होतात. कांहीं सयुक्तिक कारण नसतां, असेंच बसावें, असें जेवावें, अमुक खावें, अमुक प्यावें, एवढी शेंडी असावी, अशी पूजा करावी, असें पागोटें घालावें इत्यादि, इत्यादि, इत्यादि,–हें काय तें हिंदुधर्माचें आणि हिंदु रूढींचें तात्पर्य आहे; व त्यास अनुसरून 'मी असेंच करीन,असाच चालेन' असा कोणीं हेका धरला ह्मणजे तो हिंदुधर्माभिमानी झाला खरा, परंतु त्याच्या मनाचा सर्व मोठेपणा गेला. हा हेका सोडून देऊन बुद्धिशुद्ध आचरण करायाचें, एवढा आपला निश्चय झाला कीं काम झालें.

"दृढनिश्चयाचे संबंधानें फारसें सांगायास नको. उत्कृष्ट मार्ग दाखविला असतांही 'आहे तें काय वाईट आहे? चालेल,' असें ह्मणण्याचें आमच्या अंगवळणीं पडून गेलें आहे. एवढा केर आमचे घरांत चालेल, एवढा मळकेपणा आमचे कपड्यांत चालेल, एवढें दुःख आमचे घरांत चालेल,एवढा अन्याय आमचे कुटुंबांत चालेल,एवढें दुर्वर्त-

न आमचे लोकांत चालेल; असें होतां होतां आह्मांस काय चालणार नाहीं हें कळेनासें होतें. याहून युरोपीय लोकांची वृत्ति निराळी आहे. ‘ आह्मांस उत्कृष्ट तेंच पाहिजे, कमी दर्जाचें चालणार नाहीं ’ असा त्यांचा दृढनिश्चय दिसतो. तसाच दृढनिश्चय आह्मीं कां करूं नये ? सारांश, मनाचा मोठेपणा व निश्चयाचें बळ अंगीं धरणें एवढीच सुधारणा आमच्यांत पाहिजे आहे. मग आह्मी विलायतेस गेलों किंवा अमेरिकेस गेलों किंवा जपानांत गेलों तरी आमचा मान राहील; व स्वदेशांतही राज्यकर्त्यांस तुच्छ व हेकट असे आह्मी दिसणार नाहीं.”

याप्रमाणें हा सुधारणेचा मार्ग तर अगदीं सोपा दिसतो, इंग्लंडांत जाऊन राहिलेल्या सर्व गृहस्थांनीं कमीअधिक पूर्णतेनें त्याचें अवलंबनही केलेलें दिसतें. व त्यांस तसें करण्यास बिकट प्रयास पडले असेंही ऐकिवांत नाहीं. शिवाय, या मार्गाची दिशा त्वरित लागेल अशा ज्या सुधारणा बिनबोभाट आमचे वर्तनांत शिरत आहेत, त्यांची आह्मांस पूर्ण मदत आहे. या सन्मार्गास लागणें हें केवळ स्वत:वर अवलंबून व सुसाध्य आहे; कारण ‘ मी मनाचा मोठेपणा धरीन व निश्चयाची दृढता ढळूं देणार नाहीं, ’ अशी प्रतिज्ञा करून ती पाळण्यास कोणासही दुसऱ्याची मदत नको. मग सुज्ञ लोकांसही सुधारणेचा कां बाऊ वाटतो ? ती त्यांस स्वत:पुरती तरी कां करितां येत नाहीं ? सुधारणेच्या उंबऱ्यावर उभें असतांच त्यांचें मन कां डळमळतें ? त्यांचे हातपाय कां लटपटतात ? सुधारणामंदिरांत त्यांच्यानें कां प्रवेश करवत नाहीं ? सर्व हिंदुसमाजाची सुधारणा दुर्घट असेल, परंतु त्यांतील सुज्ञ लोकांमध्येंही ती कां दुर्घट असावी ? या प्रश्नांचें उत्तर न सुचून माझें मन पुन: घोंटाळ्यांत पडलें. एक वेळ सुधारणेस अनुकूल अशी समाजाची स्थिति डोळ्यांपुढें यावी; ती पूर्वीं वर्णन केलीच. परंतु पुढें क्षणमात्रांत क्षुल्लक विघ्नें दिसूं लागून मन संशयित व्हावें व सुधारणा दूर कालांतरावर गेल्यासारखी होऊन तिचें स्वरूप अस्पष्ट व्हावें. याप्रमाणें माझें मन पुष्कळ वेळपर्यंत झोके खात राहिलें व कांहींच निश्चय होईना. मनास पुन: ग्लानि येऊं लागली.

२४. अखेरीस माझी अशी खात्री झाली कीं आपले विचारांत

कोठें तरी मोठी ढोबळ चूक असली पाहिजे. ती माझी मला दिसत नाहीं, व ह्मणून मी गोंधळांत पडलों आहे. आमच्या सुधारणा ज्यांस मनःपूर्वक नको आहेत, अशा कोणाशीं होईल तितक्या सयुक्तिकपणें वाद केल्यावांचून आपल्या विचारसरणींतील चूक बाहेर पडणार नाहीं. आपण आपल्याशीं पुष्कळ तडफडून काय उपयोग? उद्यां जुन्या चालीचा कोणी सुज्ञ मनुष्य पाहून त्यास आपले विचार सांगितले पाहिजेत व तो काय ह्मणतो त्याचा विचार केला पाहिजे. याप्रमाणें करण्याचा माझा अखेरीस निश्चय ठरला. मग मीं मनाचा उतावीळपणा कसा तरी आवरून धरिला व रात्र अल्पशेष होती तेव्हां निद्रावश झालों.

---

## भाग ५ वा.

### माझ्या सुधारक बंधूंचीं भिन्न मतें.

२५. दुसरे दिवशीं आमची सुधारक मंडळी जेव्हां जमली तेव्हां मीं आपली रात्रीची स्थिति त्यांस सांगितली, व प्रत्येकास त्यानें कशी काय रात्र घालविली तें विचारलें. तेव्हां मला असें दिसून आलें कीं, अघले दिवशींच्या व्याख्यानाचा प्रत्येकाच्या मनावर निरनिराळा परिणाम झालेला होता, व तोही कित्येक व्यक्तींत तात्कालिक मात्र होता. मजप्रमाणें सुधारणेचा उतावीळ भक्त कोणीच दिसून आला नाहीं; व ' व्यक्ति तितक्या प्रकृति ' या ह्मणीचा मला पूर्ण अनुभव आला. कोणी ह्मणाले " विलायतेहून परत आलेल्यांचीं अशीं पुष्कळ व्याख्यानें आह्मीं ऐकिलीं आहेत; सर्व व्याख्यानांचें तात्पर्य एकच. त्यांवरून एक गोष्ट मात्र सिद्ध होते, ती ही कीं, तिकडे जाणारांचे बहुधा डोळे दिपून जातात व ते युरोपीयांचें बाह्यस्वरूप तेवढें बघून परत येतात. युरोपीयांचेंही बाह्यस्वरूप वर्षेंचीं वर्षे बदलत नाहीं असें सर्व वृत्तांतांतील सारखी हकीकत ऐकून व वाचून लक्षांत येतें. बाह्यव्यवहारांत युरोपीयांस सुधारणा नको आहे, किंवा ती होऊं शकत नाहीं, किंवा ती करण्यास जागाच

नाहीं — काय असेल तें सांगतां येत नाहीं ! त्यांच्या राजकीय उद्योगांची हकीकत ऐकल्यास असें वाटतें कीं त्यांच्या अंतरंगांत सुधारणा होण्याचें बंद झालें असावें, कारण त्यांच्या राजकीय उद्देशांत गेल्या पंचवीस वर्षांत तरी ह्मणण्यासारखा फरक पडलेला नाहीं. युरोपांत जी मोठी घडामोड चालली आहे ती उद्योग, व्यापार आणि शास्त्रीय शोध यांसंबंधाची आहे; परंतु विलायतेहून परत आलेल्यांस त्यांविषयीं प्रश्न केल्यास उपयुक्त माहिती मुळींच मिळत नाहीं. 'इंग्लंडांत भांडवलाचें काय करावें हें कळेनासें झालें आहे; श्रीमंतावर कर बसवून गरीबांस सुखी करण्याचे सारखे प्रयत्न सुरू आहेत; एक एक अचाट कारखाने पाहून मन चकित होतें,' इत्यादि प्रकारची वरकरणी माहिती पाहिजे तेवढी ऐकून घ्या ! "

२६. दुसऱ्या कित्येकांस विलायतच्या हवेविषयीं जें वक्त्यांनीं वर्णन दिलें तें विशेष महत्वाचें वाटलें. आमचे विलायती मित्र ह्मणाले होते कीं " इंग्लंडांत वसंतऋतूचे चार महिने मी होतों. तेवढ्या काळांतील माझा अनुभव असा कीं तिकडील हवेंत माणसास आळस ह्मणून येत नाहीं; आळशी राहण्यांत तेथें सुखच नाहीं असें समजा; आळशी राहून श्रीमंतांचेंही चालायाचें नाहीं. जो तो आपापल्या कामांत गर्क असायाचा; सर्व कामांच्या वेळा बांधलेल्या; करमणूक, व्यायाम, गप्पागोष्टी, यांचेही तास ठरलेले. त्यामुळें वेळच्यावेळीं सर्व कामें होतात; व तशीं सर्व लोक करूं लागल्यास एकंदर किती काम होत असावें याची कल्पना करा. " आमच्या सुधारक मित्रांस या वर्णनांतच इंग्लंडच्या वैभवाचें खरें कारण दिसून आलें. "हिंदुस्थानच्या लोकांस त्यांचा आळस बाधतो; हा आळस हवेचा गुण असला पाहिजे. आह्मांस आपली सुधारणा करणें ती हवेच्या, ह्मणजे सृष्टीच्या, प्रतिकूळ परिणामांस न जुमानतां करायाची आहे व तें आह्मांस अवघड जातें यांत नवल काय ? सृष्टीच्या आनुकूल्यामुळें उतारावर धांवावें त्याप्रमाणें इंग्लिशलोकांच्या कर्तृत्वास व प्रगतीस वेग येतो; उलट, सृष्टीच्या प्रातिकूल्यामुळें चढावावर धांवावें त्याप्रमाणें आमच्या कर्तृत्वाचा व प्रगतीचा वेग कमी होत जातो; आह्मी धापा टाकतों, ठेंचा लागून पडतों, थकून भागून अल्पांतरावर विश्रांति घेतों, यांत

आमचा काय दोष आहे ? हवेच्या दुष्ट परिणामांमुळें जर आह्मांमध्यें आळस भरत असेल, आमचे स्नायु कमकुवत होत असतील, आमचें कर्तृत्व शिथिल होत असेल, एवंच, जर सृष्टि आह्मांस निरंतर मागें ओढीत असेल तर आमची प्रगति मंद झाल्यास आश्चर्य तें काय? युरोपीयांमध्येंही इकडे आल्यावर आळसाचें प्राबल्य होतें; व्यसनांमध्यें त्यांचा पुष्कळ वेळ फुकट जातो, त्यांचे हातून काम थोडें होतें व त्यांच्याही मानसिक शक्ति क्षीण होतात, असा अनुभव आहे. इकडे आलेल्या हजारों युरोपीयांमध्यें बुद्धिप्रभावानें किंवा सौजन्यानें किंवा अशाच दुसऱ्या असाधारण गुणांनीं प्रसिद्धीस आलेले किती थोडे, किती विरळ आहेत, हें पाहिलें ह्मणजे हवेच्या दुष्परिणामांविषयीं खात्री होते. युरोपीयांतही पुष्कळ आळस भरतो त्यामुळें, कोण बुद्धि खर्च करितो, कोण परोपकाराचा विचार करितो, कोण लौकिकाची फिकीर करितो, असे महत्त्वाकांक्षेस मारून टाकणारे विचार त्यांच्या डोक्यांत भरतात; ह्मणूनच अधिकाराच्या व शस्त्रांच्या जोरावर नेटिव्हांत चमकावें व स्वदेशांत जाऊन विझून जावें हेंच बहुतेक सर्व आंग्लोइंडियनांस जन्मसाफल्य वाटूं लागलें आहे! तेव्हां सृष्टीचे विरुद्ध त्यांसही जाववत नाहीं; आपणच केवळ पराक्रमशून्य आहों असें समजण्यास कोणतेंही कारण नाहीं."

२७. दुसऱ्या कित्येकांच्या मतें युरोपीयांची सुधारणा त्यांच्या धर्मांत कांहीं विशेष गुण आहेत त्यांमुळें झालेली आहे. "ख्रिस्तीधर्माचें नवें व जुनें, सुधारलेलें व न सुधारलेलें दोन्ही स्वरूपें आपणांस हल्लीं दिसतात. आधुनिक ख्रिस्ती धर्मांत व आमचे धर्मांत भेद काय ? हाच कीं ख्रिस्ती लोकांस व्यावहारिक धर्मबंधनें फार थोडीं, मुळींच नाहींत ह्मटल्यास चालेल. पाहिजे तें खा, पाहिजे तें प्या, पाहिजे तेथें जा, पाहिजे तो धंदा करा, पाहिजे तिशीं लग्न लावा व पाहिजे त्या मार्गानें आयुष्यक्रमण करा—धर्माची त्यांस हरकत येत नाहीं. कांहीं थोड्या विशिष्ट धर्मतत्त्वांवर आपली श्रद्धा आहे असें मनुष्यानें भासविलें ह्मणजे तो ख्रिस्ती झाला. त्याच्या श्रद्धेचा व्यवहाराशीं मुळींच संबंध नाहीं. ह्मणूनच आरंभापासून विलक्षण व्यक्तिस्वातंत्र्य ख्रिस्ती राष्ट्रांस प्राप्त झालें, व त्यामुळें त्यांस हवें तें करून आपली

ऐहिक सुधारणा करण्यास अडचण आली नाहीं. ख्रिस्ती धर्म असा इतका आकुंचित झाला आहे तरी त्यास आणखी संपुष्टांत आणून आपलें स्वातंत्र्य वाढविण्याची तदनुयायांची खटपट आहेच. असलीच खटपट आह्मांस करावी लागणार आहे. ज्या प्रमाणानें व्यवहारमार्गांत आमच्या धर्माचीं अधिक बंधनें आहेत, त्याच प्रमाणानें तीं तोडण्यास काळ व प्रयत्न लागणार आहे. आमच्या मंद सुधारणेचें हें मुख्य कारण होय."

२८. याप्रमाणें अनेकांचे अनेक विचार दृष्टीस पडले; माझ्याप्रमाणें कोणीं एकानेंही विचार केला नव्हता, हें पाहून मला बरेंच असमाधान वाटलें. रात्रीचे आपले विचार, आपल्या शंका व आपला अखेरचा निश्चय पुनः पुनः माझे मनांत येऊं लागला, परंतु कोणा एकाकडूनही त्यास उत्तेजन मिळेना. मी मंडळींत बसलों होतों, तथापि आतां मला एकांताचा भास झाला, व मन कंटाळून गेलें. माझे शेजारीं आमचे सुधारक कंपूस नवीनच येऊन मिळालेला एक तरुण गृहस्थ होता, त्याचे मुद्रेवरून तोही तीं अनेक मतें ऐकून व्यग्र झाला असावा असें मला वाटलें. तेव्हां त्यास अघले रात्रीचा त्याचा अनुभव मीं विचारला. तो ह्मणाला "मला व्याख्यान फारच आवडलें, परंतु मीं घरीं गेल्यावर अधिक विचार केला नाहीं, व्याख्यानाचें तात्पर्य मात्र कुटुंबांतील मनुष्यांस सांगितलें. माझे वडील अगदीं पूर्वींच्या चालीचे आहेत; त्यांस माझें वर्तन पसंत पडत नाहीं म्हणून मी घरांत फारसा ठरत नाहीं; तथापि कालचें व्याख्यान त्यांच्या कानीं पाडावें असा बुद्ध्या निश्चय करून मीं तसें केलें. सर्व हकीकत ऐकिल्यावर त्यांनीं एवढाच जबाब दिला कीं, 'व्याख्यान देणारा एक मूर्ख व तुह्मी तें ऐकणारे शतमूर्ख आहां! तुमचे डोळे केव्हां उघडतील कोण जाणे!' असें ह्मणून ते निघून गेले. सर्व कुटुंबापुढें माझा तो अपमान झालेला पाहून मीही मोठ्या विषादानें व तिरस्कारानें आपल्या खोलींत जाऊन पडलों. मनांत विचार येई कीं, 'आमचे डोळे उघडतील तेव्हां उघडोत, परंतु या अविचारी ह्मातार्‍याचे लवकर मिटल्यास माझ्या कुटुंबांत थोडा सुधारणेचा प्रवेश होईल.' ही त्याची हकीकत ऐकिल्यावर सुधार-

णानिमित्त कुटुंबांतले कुटुंबांत वैरें उत्पन्न होऊन परस्परांचा स्वाभाविक प्रेमभाव नाहींसा होत आहे हें चांगलें काय, अशी मला शंका आली. या गृहस्थाचे वडील जुन्या चालींचे तर खरेच, परंतु चतुर बुद्धिमान् व सौजन्यशील आहेत असा त्यांचा लौकिक होता. तेव्हां त्यांस आपण जाऊन भेटावें व त्यांशीं वाद करून आह्मी **सुधारक** कोठें चुकतों तें निघाल्यास काढावें असा मीं बेत केला. ही माझी इच्छा पूर्ण करण्याविषयीं त्या गृहस्थास मीं विनंति केली. ‘ त्यांत कांहीं फायदा व्हायचा नाहीं, ’ वगैरे गोष्टी सांगून हा नाद सोडून देण्याविषयीं त्यानें माझें मन वळविण्याचा प्रयत्न केला, पुष्कळ आढेवेढे घेतले व अडचणी दाखविल्या. तथापि माझा आग्रह कमी होत नाहींसें पाहून अखेरीस त्यानें आपल्या वडलांची व माझी गांठ घालून देण्याचें मला अभिवचन दिलें. हा योग दुसरे दिवशीं संध्याकाळीं पांच वाजतां जुळून आला.

---

## भाग ६ वा.

## मीं एका जुन्या चालीच्या गृहस्थाशीं संभाषणाचा योग जुळवून आणिला.

२९. माझ्या तरुण मित्राच्या वडलांचें नांव रामचंद्रपंत असें होतें. मी मित्राचे घरीं ठरल्या वेळीं गेलों तेव्हां त्यानें मला प्रथम दरवाज्यावरील दिवाणखान्यांत नेऊन बसविलें. येथें त्याच्या स्वतःच्या **रूम्स्** ( खोल्या ) होत्या. मग मी आल्याचें वर्तमान वडलांस कळविण्यास तो निघाला. परंतु जाण्याच्या पूर्वीं बूट-विजार काढून ठेविली, इंग्रजी फ्याशन्चे कपडेही अंगांतून उतरले व एक धोतर नेसून, उपरणें पांघरून, आपल्या लांब शेंडीस गांठ देऊन मग तो खालीं गेला. हें त्याचें कृत्य पाहून मला आश्चर्य वाटलें. रामचंद्रपंत हा फारच चमत्कारिक गृहस्थ असावा असा मीं तेव्हांच तर्क केला; कारण त्यास इंग्रजी फ्याशन् नुसती डोळ्यापुढें देखील नको, असें त्याच्या मुलाच्या वर्तनावरून दिसून आलें. असल्या दुराग्रही

मनुष्याशीं वाद करून काय फायदा होणार ? ही शंका मनांत येऊन मी पस्तावल्यासारखा झालों. मित्रानें आधींच इतकें बजावून सांगितलें असतां मीं आपला हेका कां चालविला असें मनांत येऊन वाईट वाटलें, व दिवाणखान्यांत इकडे तिकडे बघून मी वेळ काढूं लागलों.

माझ्या मित्राच्या **रूम्स्** शुद्ध इंग्रजी थाटावर शृंगारलेल्या होत्या. भिंतींस निळा रंग दिलेला होता. खिडक्यांस वेलबुट्यांचे चिकाचे पडदे लाविलेले होते. दोन मोठे भपकेदार पडदे लावून एका दिवाणखान्याच्या तीन **रूम्स्** केलेल्या होत्या. मधली रूम् मोठी होती. तींत वाटोळें टेबल, सुंदर खुर्च्या, दोन कोचें, कपाटें, वगैरे मांडिलीं होतीं. भिंतीच्या वरच्या बाजूस पुष्कळ तसबिरा टांगल्या होत्या. त्यांवरून इंग्रजांचे खेळ, शिकार, शौर्य व नित्याचे उद्योग यांची कल्पना येण्यासारखी होती. बाजूच्या एका रूम्मध्यें निजण्याची व पोषाख करण्याची जागा होती. तेथें मच्छरदानीचे पलंग, तोंड धुण्याचें टेबल, दोन मोठे आरसे, वगैरे बरेंच सामान होतें व ज्या तसबिरा टांगल्या होत्या त्या इंग्रजांच्या शृंगारिक क्रीडेच्या मात्र होत्या. तिसऱ्या रूम्मध्यें अभ्यासाची जागा होती. तेथें पुस्तकांचें एक कपाट होतें व दुसरें जें होतें त्यांत स्त्रीकौशल्याचीं लोकरीचीं वगैरे कामें होतीं. तशींच तेथें दोन टेबलें, दोन खुर्च्या, दोन पेट्या वगैरे सर्व सामान दुहेरी होतें. एका टेबलावर इंग्रजांच्या खेळांचें पुस्तक पडलें होतें, दुसऱ्यावर इंग्रजी दुसरें पुस्तक व त्याचें मीनिंग-बुक होतें. ही सर्व व्यवस्था पाहून आमचे मित्र व त्यांची पत्नी या उभयतांची ही अभ्यासाची व उद्योगाची जागा असावी असें मीं ताडलें. या खोलींतही तसबिरा होत्या, परंतु त्या युरोपांतील प्रसिद्ध पुरुषांच्या व स्त्रियांच्या होत्या. ही सर्व व्यवस्था पाहून माझ्या मित्राविषयीं माझे मनांत पुष्कळ बहुमान उत्पन्न झाला. सुधारणेचें काम त्यानें सुविचारानें व सदभिरुचीनें आरंभिलें आहे असें मला वाटलें. आपल्या रूम्स्ची उत्तम व्यवस्था लावण्यांत त्याचा आतांपर्यंतचा सर्व पगार खर्च होऊन गेला असावा असें मीं अनुमान केलें. कारण, माझा मित्र कालेजांतून बाहेर पडल्यावर थोड्या दिवसांत त्याच्या वड-

लांनीं, अनेक वशिले लावून, त्यास शंभर रुपये पगाराची नौकरी लावून दिली होती.

माझे मित्राबद्दल मला जों जों अधिक बहुमान वाटूं लागला, तों तों त्याचे वडलांबद्दल तो कमी होत चालला. त्या ज्ञात्यापुढें आपण काय बोलावें, व तो आपणास काय बोलेल हें मला समजेनासें झालें. कोठून हा स्वतःवर प्रसंग आणून घेतला असें मला झालें व मी शून्य दृष्टीनें एका तसबिरीकडे पाहत असतां माझ्या मित्रानें येऊन 'हां चला' ह्मणून मला वडलांकडे नेलें.

३०. रामचंद्रपंतांची बैठकीची जागा घरांत ओटीवर होती, व समोरच देवघर होतें. देवघरचा रस्ता खुला ठेवून बाकीच्या भागांत जाजम हंतरलेलें होतें व जागोजाग तक्क्ये ठेविलेले होते. मध्यंतरीं गादी लोढ होता. गादी, लोढ, तक्क्ये या सर्वांस पांढरे शुभ्र अभ्रे घातलेले होते. खुंटीवर रामचंद्रपंतांचा तसाच शुभ्र पोषाख होता, ह्मणजे अंगरखा, बाराबंदी व पांढरें स्वच्छ पागोटें ठेविलेलें होतें. कोनाड्यांत कांहीं दप्तरें वगैरे होतीं. देवघरच्या दाराशीं दोन पाट होते त्यांपैकीं एकावर एक उघडी पोथी होती व तिचीं पानें उडूं नयेत ह्मणून चष्मा व चष्म्याचें लांकडी घर त्यावर दडपण ठेविलें होतें. देवघरांत समई लाविलेली होती, परंतु फारसा उजेड नव्हता, त्यामुळें आंत काय आहे तें बाहेरून चांगलेंसें दिसत नव्हतें, तथापि देव्हाऱ्यांत रामलक्ष्मणसीतेच्या लहान लहान मूर्ति होत्या त्या मात्र दुरून दिसत होत्या. ओटीचे भिंतीवर स्वदेशी चिताऱ्यांनीं काढलेलीं पौराणिक चित्रें होतीं, व पटईस कांहीं हंड्या टांगलेल्या होत्या. याशिवाय दुसरा कृत्रिम गृहालंकार कांहीं एक नव्हता.

मी ओटीवर येण्यापूर्वींच रामचंद्रपंत पाटावरून उठून माझें स्वागत करण्याकरितां पायऱ्यांपर्यंत पुढें आले होते. त्यांस नम्रपणें नमस्कार केल्यावर त्यांनीं मला सत्कारपूर्वक लोढाशीं बसविलें व आपण खालीं जाजमावर बसले. रामचंद्रपंतांस पाहतांच क्षणांत माझी पूर्वींची वृत्ति बदलली. त्यांचा बांधा उंच, शरीर तेजःपुंज व चेहरा भव्य होता. कपाळ मोठें असून त्यावर लांब अडवें गंध शो-

भत होतें. त्यांचें वय साठीच्या सुमारास आलेलें होतें, केंस पिकलेले होते, तथापि आवाज खणखणीत होता व अंगाची काठी बिलकुल लवलेली नव्हती. तोंडावर आनंदवृत्ति दिसत होती खरी, परंतु मनांत कांहीं काळजी लागल्यानें डोळ्यांची चमक कमी पडलेली दिसत होती. रामचंद्रपंतांनीं नुकतेंच पेन्शन घेतलेलें होतें, परंतु ते नौकरीवर असतां त्यांनीं बराच पैसा मिळविला होता, एवढेंच नव्हे, तर अधिकारही चांगला गाजविला होता. ही गोष्ट त्यांच्या बोलण्यावरून व मुद्रेवरून स्पष्ट दिसून येत होती. त्यांचा तल्लख स्वभाव व त्यांच्या अंगचें पाणी त्यांच्या फ्याशनेबल मुलांत नव्हतें हें सांगावयास नकोच. त्यांचे समोर मी बसलों असतां त्यांविषयीं मजमध्यें एकदम पूज्यबुद्धि उत्पन्न झाली; गुरूपुढें शिष्य बसावा तशी माझी स्थिति झाली; व आतां यांशीं प्रथम काय बोलावें याचा मी विचार करीत आहें तोंच त्यांनीं स्वतः भाषणास सुरवात केली. त्यामुळें आपल्यावरील मोठें संकट गेलें असें मला वाटलें. ते ह्मणाले–

" विद्याधरपंत, तुमची आमची ही पहिलीच भेट आहे. तुह्मी **सुधारक** मंडळींपैकीं एक आहां असें मीं ऐकलेलें होतें, परंतु मला जी तुह्मांविषयीं थोडीबहुत माहिती मिळाली आहे ती सकाळीं गर्दीगर्दींत आमच्या विद्वान् चिरंजिवांनीं दिली तेवढीच आहे. आपण स्वदेशी पोषाखानें येथें आलां म्हणून मीं आपले बैठकीच जागीं तुह्मांस बोलाविलें. जर बूट, स्टाकिंग व टोपी घालून आलां असतां तर दरवाज्यांत किंवा चिरंज़िवांच्या दिवाणखान्यांत संभाषणाचा योग आणावा लागता. "

हे त्यांचे शब्द ऐकून आतां ते पुढें काय ह्मणतात याची मला भीति पडली; आपल्या मुद्रेवरील फेरफारांवरून आपल्या मनोवृत्ति व्यक्त होऊं नयेत म्हणून मी मान खालीं घालूनच त्यांचें बोलणें ऐकून घेत होतों. स्वतःस बोलण्याची पाळी येईपर्यंत वर मान करायाची नाहीं असा माझा निश्चय होता. वरील प्रस्तावनेचा मजवर काय परिणाम होतो हें पाहून क्षणभरानें ते पुढें म्हणाले–

" आपण सुधारणेविषयीं माझ्याशीं वाद करावा ह्मणून हा भेटीचा योग आणिला आहे, असें चिरंजिवांनीं सांगितलें. परंतु सुधा-

रणाविषयावर सुधारकांशीं तरी वाद करूं नये अशी माझी समजूत आहे. याचें कारण असें कीं, या विषयाचा जुन्या व नव्या लोकांनीं निरनिराळ्या दिशांनीं विचार केलेला असतो. या कारणानें एकाचें बोलणें दुसऱ्यास कळतच नाहीं; एकाचे अनुभव दुसऱ्याच्या प्रचितीसच येत नाहींत. त्यामुळें परस्परांस अंध, मंद, मूर्ख असें ह्मणण्याची पाळी येते व परस्परांच्या सौजन्यास त्यायोगें बाध येतो. तेव्हां वादविवाद न करावा हेंच बरें. दुसरें असें कीं, **सुधारक** लोक धर्माच्या किंवा रूढीच्या सुधारणेचा विचार करूं लागले म्हणजे गैरमाहीत परधर्मीयांप्रमाणें दोष तेवढे शोधून काढण्याकडे त्यांचा कल असतो. कोणतीही रूढ गोष्ट कितीही वाईट असली तथापि तिजमध्यें थोडा तरी गुण असतोच. त्या गुणाचा शोधही करायाचा नाहीं, तो नाहींच असें गृहीत धरून चालायाचें, अशी सुधारकांची स्वाभाविक प्रवृत्ति असते. तेव्हां अशा एककल्ली लोकांशीं कसा वाद करावा ? ह्मणून तुह्मी हा वादाचा नाद सोडून द्या; तुमच्या भेटीनें मला फार आनंद झाला, व आमच्या चिरंजिवांस तुह्मी थोडी नम्रता शिकवाल तर मी तुमचा फार आभारी होईन. ”

३१. हें त्यांचें बोलणें झाल्यावर मी कांहीं वेळ स्तब्ध राहिलों. आपल्या चालू धर्मांत व रूढींत कांहीं सु-गुण असतील ही कल्पना मला खरोखरच कधींही सुचली नव्हती. व ती सुचणार तरी कशी? जुन्या धर्मभोळ्या लोकांनीं आपल्या चालींचे गुण दाखवून कधींही मंडन केलेलें कोणाचे ऐकण्यांत नाहीं. जें पूर्वापार चालत आलें तेंच करायाचें, युक्तिवाद सोडून द्यायाचा, ही त्यांची मंडनाची नेहमींची तऱ्हा. मग **सुधारकांस** दुसरी बाजू दिसावी तरी कशी ? हाच प्रश्न पुढें ठेवून रामचंद्रपंतांस अडवावें असें मला वाटलें व मी मोठ्या नम्रतेनें ह्मणालों—

“ बाबासाहेब, आपण ह्मणतां तें खरें, परंतु मी जो तुह्मांकडे आलों आहे त्याचा हेतु शुद्ध वादविवादाचा नाहीं. आम्हीं सुधारकांनीं सुधारणेसंबंधानें अनेक कल्पना काढिल्या आहेत व अनेक प्रयत्न आरंभिले आहेत. सर्व सुधारणा सयुक्तिक व अगदीं निर्दोष आहेत, असें आह्मी प्रथमतः सिद्ध करून दाखवितों. त्या त्या सुधा-

रणा करणें पूर्ण आवश्यक आहे–असें आरशाप्रमाणें आमचे स्वतःच बुद्धीस स्पष्ट दिसूं लागलें ह्मणजेच आह्मी त्या घडवून आणण्याच्या प्रयत्नास लागतों. आपण जीं प्रमाणें देतों तीं सर्वांस ग्राह्य झालींच पाहिजेत इतकीं तीं स्पष्ट, सरळ, निःसंदेह आहेत, अशी आमची खात्री असते. परंतु परिणाम तसा दिसत नाहीं; आमचें ह्मणणें कोणासही मान्य होत नाहीं. हा काय चमत्कार आहे? लोकांस मठ्ठ, मूर्ख, हेकट असें आह्मी ह्मणतों व स्वस्थ बसतों. परंतु मठ्ठ, मूर्ख, हेकट लोकांसही आमच्या ह्मणण्याची सयुक्तिकता दिसावी इतकें तें सप्रमाण असतें. तरी देखील कांहीं परिणाम नाहीं असें पाहून मन निराश होतें. आमचें ह्मणणें लोकांस मान्य न होण्यास त्यांचा मूर्खपणा किंवा हेकटपणा कारण नसावा अशी हल्लीं मला शंका येऊं लागली आहे. आमचे विचारांत कोठें तरी मोठी चूक असावी असें वाटूं लागलें आहे. आपणांसारख्या समंजस माणसांशीं वादविवाद केला असतां ही चूक बाहेर पडेल असें वाटून मीं भेटीची इच्छा केली. आपणांपासून नम्रपणें आमच्या चुका समजून घेण्याचा माझा हेतु आहे; व आपण मला योग्य कारणें दाखवून मूर्ख ठरविलें व माझे डोळे उघडविले तर त्यांत मी आनंद मानीन, कृतार्थ होईन, असें आपणांस अभिवचन देतों. याउपर आपणांस वादविवाद नको असल्यास आपणांस उपद्रव देण्याची माझी बिलकुल इच्छा नाहीं."

हें माझें बोलणें ऐकून रामचंद्रपंत चकित झाले. सुधारकांत इतका नम्रपणा असेल असें त्यांच्या ध्यानींमनींही नव्हतें. तेव्हां थोडावेळ विचार करून ते ह्मणाले "सुधारणेच्या प्रत्येक विषयावर अभिप्राय देण्याइतकी माझी योग्यता नाहीं; तेव्हां सुधारणेसंबंधानें आपण सामान्य विचार करूं. व तुह्मीं कोणकोणत्या सुधारणा योजिल्या आहेत तें मला सांगा." याप्रमाणें त्यांची तयारी पाहिल्यावर मीं उपक्रम केला. त्यांचे चिरंजीवही एवढ्या अवकाशांत हळूच येऊन एका खांबाशीं उभे राहिले होते; कारण त्यांस आशा होती कीं माझ्याशीं वाद करण्याच्या कचाट्यांत वडील एकदा सांपडले ह्मणजे मी त्यांची चांगली फटफजिती करून देईन. आपले चिरंजीव एका

बाजूस उभे आहेत हें रामचंद्रपंतांनीं पाहिलें होतें, परंतु तिकडे आपलें बिलकुल लक्ष नाहीं असें दाखवून ते माझें ह्मणणें ऐकून घेऊं लागले.

---

## भाग ७ वा.

### हिंदु लोकांनीं ख्रिस्ती व्हावें, हाच सुधारणेचा सोपा व फायद्याचा मार्ग, असें मला भासूं लागलें.

३२. मी जेव्हां बोलूं लागलों तेव्हां त्या पहिल्या रात्रीचे विचार क्रमानें माझ्या तोंडांतून निघूं लागले. हे विचार मागें सांगितलेच आहेत, तेव्हां त्यांची द्विरुक्ति करीत नाहीं. माझें बोलणें रामचंद्रपंत धिमेपणानें ऐकून घेत होते; त्यांचे चिरंजीव तर टाळ्या वाजविण्याचे बेतांत आले होते. अखेरीस मीं रामचंद्रपंतांस ह्मटलें—

" बाबासाहेब, माझे तुह्मांस आतां दोन प्रश्न आहेत. आपला हिंदुधर्म हल्लीं इतका जर्जर झाला आहे कीं तो अखेरपर्यंत जीव धरून राहण्याची तुह्मांस आशा वाटते काय ? जर आशा वाटत नसेल तर सुधारणेस हरकत करून त्याचें आयुष्य थोडेंसें लांबविण्यांत तुह्मांस काय फायदा वाटतो ? कुटुंबाच्या गाड्याचीं स्त्रीपुरुष हीं दोन चाकें आहेत; त्यांवर कुटुंबभार समसमान वांटला जाईल तेव्हांच हा गाडा सुरळीतपणें चालेल; ह्मणून स्त्रियांची उन्नति केलीच पाहिजे. या सिद्धांतास अनुसरून स्त्रियांस उद्देशून विधवाविवाह, स्त्रीशिक्षण, वगैरे सुधारणा आह्मीं आरंभिल्या आहेत. इंग्रज लोकांनीं सर्व जातींस निःपक्षपातानें सारखे हक्क दिल्यापासून जातिभेदाचें महत्व मोडत चाललें आहे, व तो नष्ट होण्याचीं चिन्हें स्पष्ट दिसत आहेत. इंद्रादि जुनाट देवांवरची व शिवविष्णु वगैरे चालू देवांवरची श्रद्धा उडत चालली आहे. यज्ञादिकांचा लोप झालाच, स्नानसंध्या विसरत चालली, पूजार्चन बंद होत आहे, सोवळें ओवळें गेलें, श्राद्धपक्ष वगैरे हे नांवाचे राहिले आहेत; वेदांचा

अर्थ होऊन व त्यांतील रहस्य बाहेर पडून, त्यांचे अपौरुषत्व आणि पूज्यत्व, दोहोंचाही लोप होत आहे. अशा स्थितींत मूर्तिपूजा, श्रुतिस्मृतिपुराणें, इत्यादींची महती कशी कायम राहणार ? नास्तिक्यामुळें ईश्वराचेंही अस्तित्व व्यवहारबाह्य झालें आहे. मांस व मदिरा यांच्या गुप्त सेवनानें वरिष्ठ जाति कनिष्ठ जातींशीं समान होत आहेत. तेव्हां हिंदुधर्माच्या शाश्वतीची आशा कां धरितां ? व जर सर्वत्र सुधारणा अनिवार्य झाली आहे असें सिद्ध होत असलें तर तीस विलंब कां ? या विलंबानें तुमचा धर्म जरी तुह्मांस फार प्रिय असला तरी तो नष्ट झाल्यावांचून राहत नाहीं; ह्मणजे तुह्मांस कांहीं फायदा नाहीं; परंतु सुधारणा दूर टाकल्यानें या आमच्या व तसेंच पुढच्या पिढ्यांचें नुकसान मात्र होत राहणार. हें नुकसान राजकीय, सामाजिक, औद्योगिक,—सर्व प्रकारचें आहे. हें नुकसान आह्मांस सोसावें लागणारच व त्याशिवाय परदेशीयांनीं मूर्ख, असमंजस, क्रूर, हट्टी इत्यादि उपपदें लावून आह्मां विद्वानांस निंद्य, उपहासार्ह व अनुकंपनीय समजावें, हा त्या दुःखावर डाग होय. म्हणून आह्मां सुधारकांचें म्हणणें कीं, तुह्मांसारखे जेवढे ज्ञाते आहेत, जेवढ्यांस दूरदृष्टि आहे, तेवढ्यांनीं आपलें तनमनधन खर्चून सुधारणेच्या प्रगतीस तीव्र वेग दिला पाहिजे. ”

“ विद्याधरपंत, तुह्मी सांगतां कीं तुमचें म्हणणें ( तुमच्या बुद्धीप्रमाणें ) अगदीं सयुक्तिक आहे; तें जरी तसें असलें तरी त्यानें माझे चित्तास धक्का बसतो, माझ्याच्यानें तें ऐकवत नाहीं; व मला तें सयुक्तिकही दिसत नाहीं.

२३. “ मी **ब्राह्मण** आहें, व अर्थात् हिंदुही पण आहें. आतां तुमचें ह्मणणें हें कीं, मीं स्नानसंध्या करूं नये, जानवें घालूं नये, शेंडी ठेवूं नये, मुंज करूं नये, चालू पद्धतीनें विवाह करूं नये, हा असला अंगरखा बाराबंदीचा पोषाख घालूं नये—तात्पर्य हें कीं मी **ब्राह्मण** ह्मणून जीं जीं कर्में करितों तीं सर्व बंद करावीं. अशी सुधारणा तुह्मांस पाहिजे. इतकेंच नव्हे, तर मीं जातिभेद मानूं नये, मूर्तिपूजा करूं नये, श्रुतिस्मृतिपुराणें झुगारून द्यावीं, ह्मणजे तात्पर्यानें मीं आपलें हिंदुत्वच सोडून द्यावें. कारण, हिंदुस्थानवासी

जनांमध्यें मी हिंदु कां? पारशी, मुसलमान, ख्रिस्ती किंवा यहुदी कां नव्हे? कारण एवढेंच कीं मी हिंदुधर्म पाळतों व दुसरे लोक इतर धर्म पाळतात. हा हिंदुधर्म मीं सर्वस्वीं सोडून द्यावा ही सुधारणा तुह्मांस पाहिजे. तेवढीनेंही तुमचें समाधान होत नाहीं; माझी सुधारणा ख्रिस्त्यांच्याही पलीकडे गेली पाहिजे; मी नास्तिक बनलें पाहिजे, म्हणजे मग मी पूर्ण सुधारलों. यांपैकीं एकही गोष्ट मला पसंत नाहीं. मी हिंदूचा ख्रिस्ती होण्यास एक वेळ तयार होईन परंतु मला तुमचा नास्तिकपणा नको; तसेंच ब्राह्मणाचा शूद्र होईन, परंतु तो ख्रिस्तीपणा मला नको. कोणतींही दुःखें भोगावीं लागलीं तथापि आपण ब्राह्मण रहावें ही माझी मनापासून इच्छा आहे, मला शूद्रत्व नको आहे.

" तुह्मी सभांतून व वर्तमानपत्रांतून जेव्हां हिंदुधर्माच्या सुधारणेच्या गोष्टी सांगतां, तेव्हां तुमच्या सुधारणेचें पर्यवसान हिंदुधर्माचा पूर्ण नाश व्हावा हें असतें, अथवा सर्वच धर्मांचा उच्छेद व्हावा असें असतें. व ही गोष्ट सर्व हिंदुधर्माभिमान्यांस स्पष्ट कळून येते. तसेंच तुमचें व तुमच्या अग्रणींचें वर्तन या गोष्टीची साक्ष देत असतें. तेव्हां जर तुह्मी वास्तविकपणें एकंदर धर्माच्या, किंवा विशेषतः हिंदुधर्माच्या, नाशास प्रवृत्त झालां असलां, तर तुमचे विचार कितीही सयुक्तिक असोत ते आमच्या मनोदेवतेस पसंत पडायाचे नाहींत हें उघड आहे. आह्मांस ते विचार ऐकण्याचेंच मोठें दुःख वाटतें, मग त्याप्रमाणें आचरणें दूरच राहिलें. तुह्मी एक एक सुधारणा एकेका वेळीं पुढें आणिली,—म्हणजे वस्तुतः हिंदुधर्माचा एक एक अवयव एकेका वेळीं तोडला,—तथापि सर्वांच्याच नाशास तुह्मी प्रवृत्त झालां आहां, आमचें व तुमचें हिंदुत्व समूळ नाहींसें होईल तेव्हां तुह्मां सुधारकांचें समाधान होईल, हें ढळढळीत दिसत असून आमच्या सारखा धार्मिक माणूस कोण तुमच्या नादीं लागेल?

२४. " हिंदुत्व नाहींसें करण्याचा तुमचा उद्देश असून, हिंदुधर्माची सुधारणा, हिंदुलोकांची उन्नति, असें जेव्हां तुह्मी प्रतिपादन करितां, तेव्हां तुह्मी दांभिक तरी आहां किंवा भेकड तरी आहां असा सर्वांचा समज होतो. यापेक्षां हिंदुलोकांनीं प्रथम ख्रिस्ती व्हावें

असें तुह्मी कां प्रतिपादीत नाहीं ? कारण, तुह्मीच सांगतां कीं, ख्रिस्तीधर्मानें किरिस्तावांस जेवढें व्यवहारस्वातंत्र्य दिलें आहे तेवढें आज मित्तीस दुसऱ्या कोणत्याही धर्मानें प्राप्त होत नाहीं. ख्रिस्तीधर्मांत कायतीं दोन तीन बंधनें आहेत व तींही शिथिल झालेलीं आहेत. एक विवाहासंबंधाचें, परंतु काडी मोडण्याचा प्रघात हल्लीं ख्रिस्ती लोकांत इतका जारीनें सुरू आहे कीं या बाबतींत ख्रिस्ताच्या खऱ्या आज्ञा काय आहेत हें बाहेरच्यांस समजत नाहीं. व्यभिचाराचा दोष ख्रिस्ती मुलखांत कितपत मोठा समजला जातो त्याचीही तुह्मांस कल्पना असेलच. ख्रिस्तावर ईशपुत्र म्हणून भरंवसा ठेवणें हें हल्लींच्या तिकडील तत्त्वज्ञांच्या मतें फारसें आवश्यक नाहीं, व चर्चमध्यें जाणारे विद्वान् लोक फार थोडे असेंही आढळून येतें. ख्रिस्ती असतां नास्तिक होण्याची परवानगी सर्वांस आहेच, कदाचित् खुद ख्रिस्ती धर्मोपदेशकांस ती नसेल. असा हा ख्रिस्तीधर्म तुह्मी जी सुधारणा सुचवितां तिच्या अगदीं जवळजवळ जाऊन पोहोंचला आहे. तेव्हां हिंदुधर्माचें एक एक शकल तोडण्यापेक्षां, एतद्देशीयांनीं प्रथम ख्रिस्ती व्हावें व अखेरीस पूर्ण नास्तिक बनून जावें, अशा दोन टप्प्यांनीं सुधारणेची सिद्धि तुह्मी कां करून घेत नाहीं ? तुह्मी स्वतःच ( मनांतून ख्रिस्त वगळून ) ख्रिस्ती कां होत नाहीं ?

" ख्रिस्ती होतांच हिंदुधर्माच्या सर्व गैरसोयी नाहींशा होतात. कारण, पाहिजे तें खा, पाहिजे तें प्या, हवा तो धंदा करा, हव्या त्या देशांत जाऊन रहा, सर्व प्रकारची तुह्मांस मुभा मिळते. ख्रिस्ती लोकांचीं ठाणीं सर्व जगभर आहेत, व तुह्मी ख्रिस्ती होऊन जेथें जाल तेथें तुमचा आदरसत्कार होईल, निदान तुमची सोय लागेल व संरक्षण होईल. शिवाय, या देशांत राज्यकर्त्यांचा भरंवसा ख्रिस्त्यांवर अधिक आहे. त्यामुळें जेवढे तुमच्यासारखे सुधारतील, ह्मणजे ख्रिस्ती होतील, त्यांस अधिक हक्क, अधिक भरंवशाच्या जागा, व्हालंटीयर होऊन शस्त्रें बाळगण्याची परवानगी, ख्रिस्ती व्यापाऱ्यांच्या कारखान्यांत शिरकाव, वगैरे अनेक फायदे होतील. हिंदु लोकांपासून तुह्मांस उपद्रव न व्हावा ही खबरदारी ठेवण्याचें काम तुह्मी न सांगतां सरकार आपणाकडे घेईल व करडा अमल चालवील. याप्रमाणें

ख्रिस्ती होण्यांत हल्लीं इतके फायदे आहेत कीं क्षणांत रंकाचा राजा बनतो. तत्काळ तुह्मांस जेवढी सुधारणा पाहिजे तेवढी करण्याचें स्वातंत्र्य प्राप्त होतें. स्वतः ख्रिस्ती होऊन दुसऱ्यांस ख्रिस्ती होण्याचा उपदेश तुह्मी करूं लागलां ह्मणजे पाश्चिमात्य धनाढ्य राष्ट्रांकडून या परोपकारक कृत्याच्या उत्तेजनार्थ द्रव्यादिद्वारा तुह्मांस पाहिजे तितकी मदत मिळेल. या करितां तुह्मी सुधारकमंडळी सुज्ञ व व्यवहारज्ञ असाल तर आपण ख्रिस्ती होऊन दुसऱ्यांस तोच उपदेश करूं लागणें हें तुह्मांस उचित आहे.

३९. " अहो, तुह्मी ज्या ज्या सुधारणा सुचवितां त्या त्या सर्वांची प्रेरणा ख्रिस्ती लोकांच्या शिक्षणानें तुह्मांस प्राप्त झालेली आहे. स्वतःच्या सुस्थितीचे व हिंदूंच्या दुःस्थितीचे ते लोक पोवाडे गात आहेत; व ते ऐकून तुह्मी त्यांचे त्वरित चेले बनतां. त्यांच्या शिक्षणाचा परिणाम तुह्मांवर अप्रत्यक्षपणें, तुह्मांस न कळतच होतो, ह्मणून मूळच्या त्यांकडून आलेल्या प्रेरणा तुह्मी स्वतःच्याच ह्मणून नाचूं लागतां व स्वतःच्या बुद्धीचा इतका पराक्रम असें समजून गर्वयुक्त होतां ! अशी वास्तविक स्थिति नसती तर हिंदुधर्माच्या प्रशंसनीय भागांचें, ख्रिस्ती मिशनऱ्यां इतकेंच, तुह्मांमध्यें अज्ञान कां असतें ? हिंदुधर्मांत ग्राह्य भाग नाहीं असें तुह्मी आरंभापासून कां घेऊन चालतां ? या गोष्टींचें कारण हेंच कीं, धर्मसुधारणेच्या नांवाखालीं ख्रिस्ती लोकांच्या चालींचें अनुकरण करून त्यांसारखें व्हावें एवढेंच तुह्मी जाणतां. बुद्धिस्वातंत्र्याची टिमकी वाजवून आपली परप्रत्ययनेय बुद्धि मात्र तुह्मी व्यक्त करितां. आपल्या मनाचा अत्यंत विकास झाला आहे असें तुह्मी खुशाल समजा; परंतु तुमचीं मनें अद्यापि कोतीं व दुर्बळ आहेत. ख्रिस्ती लोकांच्या कल्पनांखेरीज दुसरा सुधारणेचा मार्ग तुह्मांस मुळींच दिसत नाहीं ! हिंदुधर्माची सुधारणा तुह्मांस पाहिजे आहे खरी, परंतु परधर्मीयांप्रमाणें तुह्मी हिंदुधर्माच्या नाशास मात्र प्रवृत्त झालां आहां. तुमची पुस्तकी विद्या विचाराच्या कामांत तुह्मांस उपयोगी पडत नाहीं; कारण तुमच्या डोक्यांत खऱ्या राष्ट्रीय उन्नतीच्या किंवा उत्क्रांतीच्या कल्पनाच नाहींत. राष्ट्रीय उत्क्रांतींत जुनें व नवें यांचा सांधा बेमालुमपणें जुळून

जातो. तुह्मी जुनें व नवें यांमध्यें बडा खोल खड्डा तयार करीत आहां. या तुमच्या खड्ड्यांत कोण समंजस माणूस उडी घालील? इंग्रजी कपडे फार सुंदर व सोयीचे असें ठरवून जुन्या चालीचे कपडे तुह्मी आधींच जाळून टाकीत आहां, परंतु त्यामुळें तुह्मी नंगे फकीर बनत आहां हें तुमच्या ध्यानांत येत नाहीं! तुमचें नास्तिक्य ही तुमच्या अंतरात्म्याची रानटी नग्नावस्था आहे असें मी समजतों.

"ख्रिस्तीधर्म स्वीकारल्यास सुधारणा, स्वातंत्र्य, व सुधारल्या राष्ट्रांची अनुकंपा, हीं सर्व एकदम प्राप्त होतात हें धडधडीत दिसत असून तुह्मी सुधारक ख्रिस्ती होत नाहीं, याचें मर्म तुह्मांस स्वतः ओळखतां येत नाहीं. विचार करा; केवळ येशूच्या नांवाकरितां हा सुधारणेचा सुलभ मार्ग तुह्मी सोडून देतां काय? मुळींच नाहीं. कारण येशूच्या सर्व आज्ञा तुह्मांस मान्य आहेत, व त्या नीतीपर आहेत. येशूच्या चरित्रावरून तो उत्तम साधु होता हें तुह्मांस स्पष्ट दिसत आहे. तो ईशपुत्र, त्याच्याद्वारें मुक्ति—हें एवढें तत्त्व कायतें तुह्मांस मान्य नसेल; परंतु त्या तत्त्वाचा लाक्षणिक अर्थ घेतल्यास तें तुह्मांस ग्राह्य होण्यास हरकत दिसत नाहीं. मग अशा एका क्षुल्लक तत्त्वाची हरकत आणून ख्रिस्तीधर्मासारखा प्रबळ धर्म सोडून या लाजिरवाण्या हिंदुधर्मांत राहण्यास मोठमोठे विद्वान्ही कां राजी असतात? कां हजारों अडचणी व दुःखें सोसतात? याचें मर्म हेंच कीं हिंदुत्व सोडण्याचें दुःख इतर सर्व दुःखांहून मोठें आहे. इतर दुःखें व्यावहारिक आहेत, परंतु हिंदुत्व सोडण्याचें दुःख काळजास झोंबणारें आहे, तें जन्मभर मनोदेवतेस चैन पडूं देणार नाहीं. असें जाणूनच कोणी विद्वान् सुधारणेकरितां ख्रिस्ती होत नाहीं.

"हिंदूंस इतकी विद्या दिली, सुविचार शिकविले, इतक्या व्यावहारिक फायद्यांनीं मोह पाडिला, व जेवढें हिंदु चालीचें तेवढें निंद्य त्याज्य, नीच, अशी प्रमाणांनीं, अनुभवांनीं व इतर सर्व प्रकारांनीं स्फूर्ति करून दिली, तथापि त्यांस तें हिंदुत्व हवेंच असतें, ख्रिस्तीत्व नकोच असतें—हें पाहून मिशनरींस व इतर युरोपीयांस फारच आश्चर्य वाटतें. त्यांस यांतील गूढ समजत नाहीं व तें तुह्मीं सुधारकांनींही

ओळखलें नाहीं. तुमच्या तें कोठून लक्षांत येणार? तुह्मांस युरोपीयांकडून मूळ प्रेरणा आली पाहिजे!"

३६. इतकें बोलून रामचंद्रपंत थांबले, व मी कांहीं जबाब देईन असें वाटून ते मजकडे क्षणभर पहात राहिले. सुधारक व ख्रिस्ती मिशनरी यांमध्यें काय भेद आहे; या गोष्टीचा मीं पूर्वीं कधींच विचार केलेला नव्हता. त्यामुळें आह्मी **सुधारक** ख्रिस्ती लोकांचे पढीतमूर्ख शिष्य आहों, हा आक्षेप कसा दूर करावा हें मला सुचेना. शिवाय, मी आपल्या बुद्धीच्या कसोटीचा जेव्हां उपयोग करून पाहूं लागलों, तेव्हां मला खरोखरच भासलें कीं हिंदु लोक ख्रिस्ती झाले तर **सुधारकां**चा बराच कार्यभाग आटपल्यासारखें होईल. मग कोणत्या सुधारणा तरी शिल्लक उरणार? ऐहिक उन्नतीस आवश्यक अशा कोणत्याच शिल्लक राहणार नाहींत हें निर्विवाद आहे. युरोपीय लोक सुधारणेच्या कळसास गेले आहेत असें आह्मी ह्मणतों, पण त्यांची सुधारणा ख्रिस्तीधर्मापलीकडे कोठें गेली आहे? मग सुधारकांनीं ख्रिस्ती मिशनऱ्यांशीं कां मिळून जाऊं नये? ख्रिस्ती झालेल्या गृहस्थास 'बाटला' असें कां ह्मणावें? 'सुधारला' असें कां ह्मणूं नये? कोणी 'बाटला' तर त्याबद्दल आह्मां **सुधारकांस** असमाधान वाटतें, व कोणी गर्भाधान केल्यावांचून प्रजोत्पत्ति केली तर त्या सुधारणेबद्दल आह्मी हर्षभरित होतों! हा आमचा खुळेपणा तर नव्हेना? कां आह्मीं हिंदु रहावें? जर आमच्या पूर्वजांनीं आह्मांस दिलेल्या देणग्या—ह्मणजे, ज्ञान, धर्म, कर्म, रूढि, पोषाख वगैरे—सर्व मूर्खत्वाचे प्रकार आहेत असें आह्मींच पूर्ण विचारानें सिद्ध करितों, तर त्या पूर्वजांचे आह्मी वंशज असें ह्मणविण्यांत कोणता मोठा पुरुषार्थ आहे? त्यापेक्षां ख्रिस्ती होऊन आपण पूर्वीं हिंदु होतों याबद्दल मागमूसही नाहींसा करणें हें ठीक नव्हे काय? जर हिंदुत्वद्योतक सर्व कांहीं लांछनास्पद आहे—त्यांतील कांहींएक राहण्याचा संभव दिसत नाहीं—तर त्याचा अभिमान राखणें शुद्धबुद्धीस उचित नव्हे. या गोष्टीचा मी पूर्वीं कसा विचार केला नाहीं?

या प्रकारचे विचार व शंका माझ्या मनांत एकदम उभ्या राहिल्या; मन घोटाळून गेलें व रामचंद्रपंतांस काय उत्तर देऊं तें मला

सुचेना. ही माझी स्थिति पाहून रामचंद्रपंतांस मजबद्दल काय वाटलें असेल तें असो. मी सुधारकांचा कच्चा शिष्य आहें असें त्यांनीं अनुमान केलें असावें. कारण ते जेव्हां पुढें बोलूं लागले तेव्हां त्यांचा आवेश वाढलेला दिसला. आपलें पूर्वींचें बोलणें माझ्या मनावर बरेंच चांगलें बिंबलें, असें वाटूनच त्यांस आवेश चढला असावा. ही कल्पना मनांत येऊन मी बराच खजील झालों.

---

## भाग ८ वा.

### माझा सुधारकपणा हळूहळू गळूं लागला.

३७. " मनुष्यास जशी ईश्वरानें बुद्धि दिली आहे, तशाच अनेक मनोवृत्ति दिल्या आहेत. या मनोवृत्तींपैकीं कांहीं फार उत्कृष्ट व श्रेष्ठ आहेत व त्या जितक्या प्रबळपणें उत्पन्न होतील तितक्या चांगल्या, असें जाणून सर्व सदाचारप्रवर्तकांनीं त्यांस उत्तेजन देण्याचा प्रयत्न केला आहे. जीं राष्ट्रें फार प्राचीन काळापासून ऊर्जित दशेस येऊन सन्मार्गास लागलीं आहेत, त्यांमध्यें या श्रेष्ठ मनोवृत्तींस उपजतबुद्धीप्रमाणें मोठें बळ आलेलें आहे. व व्यक्तींच्या व कुटुंबांच्या वर्तनावर बुद्धीपेक्षांही त्यांचें वर्चस्व अधिक झालें आहे. असें तें वर्चस्व असणें समाजास हितकारक आहे, हें सर्व दूरदर्शी थोर पुरुषांनीं जाणून तें कायमचें करण्याकरितां, धर्म, रूढि, उपदेश, इत्यादिकांच्या द्वारें त्यास महत्त्व आणिलें आहे. हिंदुधर्म काय किंवा खिस्तीधर्म काय, त्याचा पाया बुद्धीवर रचलेला नाहीं, श्रेष्ठ मनोवृत्तींवर किंवा सद्-वासनांवर रचलेला आहे. प्रेम, बहुमान, श्रद्धा, औदार्य, नम्रता, उपकार, कृतज्ञता, वगैरे या त्या श्रेष्ठ मनोवृत्ति होत. या मनोवृत्ति आचरणांत प्रकट केल्यानें मनुष्य थोरवीस चढतो; केवळ बुद्धिवैभवानें चढत नाहीं. या मनोवृत्ति ह्मणजे जिवाच्या राण्या होत, त्यांचा अंमल उत्तम प्रकारें चालावा, त्या बलाढ्य व्हाव्या, त्यांच्या समाधानाचे व विजयाचे प्रसंग वरचेवर यावे,

इत्यादि कार्यांकरितां बुद्धि आहे. कारभाऱ्याचें काम तिजकडे आहे. मनोवृत्तींस पदच्युत करून, बुद्धि जर त्यांचें राज्य बळकावील, तर मनुष्याच्या सर्व थोरवीचा नाश झाला—तो केवळ यंत्र बनला—असें समजावें.

३८. "ख्रिस्ती गृहस्थास ख्रिस्ती राहण्याचें व हिंदूस हिंदु राहण्याचें जें इष्ट वाटतें, त्याचें कारण हें कीं आयुष्याच्या एकंदर अवधींत श्रेष्ठ मनोवृत्तींच्या समाधानाचे व विजयाचे प्रसंग स्वधर्माच्या अव्याहत पालनानें जितके येतात, तितके धर्मांतरानें किंवा धर्माविषयीं उदासीन राहिल्यानें येत नाहींत. जे लोक धर्मांतर करितात त्यांमध्यें या श्रेष्ठ मनोवृत्तींची दुर्बळता किंवा न्यूनता असते असें बहुधा समजावें. मनुष्याच्या शाश्वत सुखास द्रव्यादि बाह्य साधनें प्रत्यक्षपणें उपयोगीं पडत नाहींत; द्रव्यादि साधनांनीं मनोवृत्तींचें समाधान करायाचें; त्यापासून खरें सुख होतें. मनोवृत्तींच्या असमाधानापासून खरें दुःख होतें. याकरितां श्रेष्ठ मनोवृत्तींचें साम्राज्य स्थापन करण्यांत बुद्धीचे सर्व प्रयत्न असणें हें सदाचाराचें तत्त्व आहे. वर्तनाच्या नियमनांत केवळ बुद्धीचा उपयोग करूं लागलें तर फार दुष्ट परिणाम होतील यांत संशय नाहीं.

३९. "तुह्मी सुधारक मंडळी बुद्धीस फार मान देतां. तुह्मांस वाटतें बुद्धीचे पलीकडे कांहीं नाहीं, परंतु तुमच्याही आचरणांत बुद्धि गौण आहे हें तुमच्या लक्षांत येत नाहीं; तुह्मीं बुद्धीस पूर्ण महत्त्व दिलें तर तुह्मी बाकीच्या अज्ञ समाजाची फिकीर करणार नाहीं. तुह्मांस जे लोक उत्कृष्ट दिसतील त्यांसारखे तुह्मी एकदम होऊन जाल. समजा कीं ख्रिस्ती तत्त्ववेत्ते, **मिल**, **स्पेन्सर** वगैरे, तुह्मांस सर्वमान्य दिसतात, तर त्यांसारखे तुह्मी व्हाल. तुह्मांस आईबापांनीं हिंदुस्थानांत जन्म दिला; परंतु तेवढ्या त्या जन्मकालाच्या उपाधीकरितां तुह्मी आपणांस जन्मभर हिंदु ह्मणविणार नाहीं. **स्पेन्सर** जसा सर्व जगाच्या उदयाची मीमांसा करीत आहे, तशी तुह्मी करूं लागाल; तुह्मांस हिंदुस्थान, चीन, जपान, अमेरिका व इंग्लंड, सर्व देश सारखेच भासतील. परंतु तुह्मां सुधारकांवरही मनोवृत्तींचा अंमल आहे, व तुमची बुद्धि त्या मनोवृत्तींची अंकित झाली आहे, ह्मणून तुह्मी हिंदुसमाजाची सुधारणा पाहिजे असें घोकीत बसलां

आहां. हिंदुसमाजाविषयीं तुह्मांत विशेष प्रेम आहे, त्यावर उपकार करावा हें तुह्मांस अवश्य दिसत आहे, हिंदूंचा उदय पाहण्यांत तुह्मांस अभिमान वाटत आहे, व त्यांच्या हिताकरितां तुह्मी नुकसान सोसण्यास व निराशा अनुभवण्यास तयार दिसतां. तेव्हां तुमच्या आचरणावर देखील मनोवृत्तींचा पगडा बसलेला आहे. परंतु प्रेम, परोपकार, अभिमान वगैरे मनोवृत्ति जशा तुह्मी सामान्य समाजाच्या हिताच्या दृष्टीनें प्रबळ होऊं देतां, तशाच त्या स्वकुटुंबाच्या दृष्टीनें तुह्मीं प्रबळ होऊं दिल्या ह्मणजे तुह्मी आह्मां जुनाट मंडळींत येऊन पडलांच असें समजा. तुमच्या मनोवृत्ति फार विस्तृत झाल्यामुळें त्यांमध्यें जोर उरलेला नाहीं. तोच त्यांचा विस्तार आकुंचित होतांच त्यांना जोर येईल. सर्व राष्ट्राचें ज्यांत हित आहे असे प्रसंग थोडे यावयाचे, व त्यावेळीं मात्र तुमच्या मनोवृत्ति थोड्याशा उच्छ्वसित व्हावयाच्या; बाकीं, कुटुंबास आनंद आहे, जातीचें हित आहे, ग्रामस्थांचा समाज उत्सवयुक्त आहे, असें पाहत असतां तुह्मी परकीयांप्रमाणें उदासीन राहतां किंवा देशाच्या नुकसानाची कांहीं भलतीच कल्पना मनांत आणून दुःखी कष्टी होतां. दसरा, दिवाळी, पाडवा वगैरे सण व इतर उत्सवाचे दिवस आले ह्मणजे इतरांची आनंदवृत्ति पाहूनच कीं काय, तुह्मी मंद, निरुत्साह आणि दुर्मुखलेले दिसतां. हे सण कशाचे, यांत काय आहे ! असें तुह्मांस वाटतें. तुमच्या मनोवृत्तींचें कांहीं केल्या उत्थापन होत नाहीं. परंतु सिमल्याच्या कायदेकौन्सिलांत सर्व हिंदूंस दुःख होईल असें एखादें तुमच्या दृष्टीनें देशहिताचें बिल निघालें कीं तो तुमचा महोत्सवाचा दिवस होतो, तुमचा आनंद गगनांत मावत नाहीं ! याप्रमाणें आधुनिक शिक्षणानें तुमच्या मनोवृत्तींचा जो पूर्ण विपर्यास झाला आहे त्याचें नांव सुधारणा असें मी समजतों. मोठ्या थोरल्या तळ्यांत दोन थेंब तेल टाकावें, मग त्याचा जितका पातळ थर पाण्यावर पसरेल, तेवढा परोपकाराचा पातळ थर तुह्मीं हिंदूसमाजावर पसरून दिला आहे, व त्यानें हिंदुसमाजाचें अगणित हित कां होत नाहीं ह्मणून तुह्मी चकित होत आहां, निराश होत आहां, संतापून जात आहां ! तुमच्या या अविचाराचें आह्मांस आश्चर्य

वाटतें. हा लोकसुधारणेचा मार्ग नव्हे. उत्कृष्ट मनोवृत्तींस प्रथम कुटुंबांत परिपक्व दशेस आणिलें पाहिजे, व ज्याप्रमाणें अंगीं कर्तृत्व असेल त्याप्रमाणेंच त्यांचा फैलाव केला पाहिजे. घरांत अंधेर असतांही विलायती कागदी कंदिलांत आपल्या ज्ञानाची पंती ठेवून सर्व देशभर प्रकाश पाडण्याकरितां ती आकाशदिव्याप्रमाणें उंच उभारणारे लोक ह्मटले ह्मणजे सुधारक, अशी माझी समजूत आहे. आह्मां जुनाट कुटुंब-वत्सल माणसांचें वर्तन व विचार याहून फार निराळ्या प्रकारचे आहेत. ते घरोघर दृष्टीस पडतील; परंतु त्यांचा आह्मी बोभाटा करीत नाहीं; त्यांकरितां मानपत्रें मागत नाहीं; कर्तव्य तें कर्तव्य, त्याची पूर्णता आचरणांत आहे, असें जाणून स्तब्ध राहतों, ह्मणून तुह्मांस वाटतें आह्मी निद्रित आहों. परंतु आमचीं अंतःकरणें तुह्मांहून फारच सोज्वळ आहेत, असें तुह्मी जाणा. हिंदुधर्माचें सर्व बळ त्या अंतःकरणांत सांठविलेलें आहे. तुमच्या व आमच्या आच-रणांतील भेद एक प्रत्यक्ष उदाहरण घेतल्यानें स्पष्ट होईल. असें उदाहरण पुऱ्या अनुभवानें घ्यावयाचें ह्मटलें ह्मणजे स्वतःचेंच घेतलें पाहिजे; ह्मणून मी आपला स्वतःचा थोडासा वृत्तांत सांगतों.

४०. "मी जेव्हां वयांत आलों तेव्हां आपल्या मातापितरांची बुद्धि, मतें, योग्यता वगैरे विचाराच्या कांट्यांत तोलून पाहिलीं नाहींत. त्यांस मान द्यावा किंवा त्यांचा अपमान करावा हें अशा-प्रकारें मीं ठरविलें नाहीं. मला जन्म दिल्यापासून स्वर्गवासी होई-पर्यंत माझ्या मातापितरांनींही अशा रीतीनें माझी योग्यता केव्हांही ठरविली नाहीं. परस्परांची योग्यता मनांत न आणितां, मातापित-रांनीं मला पूर्ण प्रेमानें वागविलें; मींही प्रेमानें, पूज्यबुद्धीनें, नम्रतापूर्वक, कृतज्ञता नित्य मनांत बाळगून, त्यांशीं योग्य वर्तन केलें. त्यांची आज्ञा मी सर्वदा पाळीत होतों. ते सांगत तें करण्यांत कधीं माझें नुकसान होत असे, कधीं मला आपलीं मतें व आपले अनुभव गुंडाळून ठेवावे लागत, कधीं कधीं फार दुःख व खेद होत असे. तथापि त्यांची आज्ञा मीं मोडली नाहीं. कारण, केव्हां केव्हां ते सांगत त्यांत आपलें अखेरीस हितच आहे अशी माझी श्रद्धा असे; व केव्हां केव्हां त्यांस असंतुष्ट ठेवून दुःख देण्यापेक्षां आपणच

असंतुष्ट होऊन दुःख, नुकसान वगैरे सोसावें हें मला उचित दिसे. याप्रमाणें पितृसुखार्थ स्वहितास पराङ्मुख होण्यांत मनास विनय व थोरवी येते. हें एक प्रकारचें औदार्य आहे. आपलें प्रेम व आपली भक्ति प्रकट करण्याचे हेच प्रसंग आहेत. आपलें निश्चयाचें बळ कसाटीस लावण्यास या अशा उत्कृष्ट संधीच साधल्या पाहिजेत.

" याप्रमाणें मी आपल्या श्रेष्ठ मनोवृत्तींच्या स्वाधीन होत होतों, व तात्कालिक दुःख विसरल्यावर मागाहून माझे मनास व मनोदेवतेस हर्ष व समाधान होत होतें. व ते ते प्रसंग आठविले असतां अद्यापिही हर्ष होतो; अद्यापि कृतार्थता वाटते; व मनोदेवतेचें समाधान आमरणांत कायम राहील असा निश्चय होतो.

" माझ्या वडलांनीं मला ज्या प्रेमपाशांत गोंविलें, तशाच प्रेमपाशांत त्यांच्या वडलांनीं त्यांस गोंविलें होतें. कुटुंबांतील इतर माणसांनींही असेंच प्रेमबंधन मला घातलें आहे, व त्याचीही परंपरा पूर्वींच्या अनेक पिढ्यांपासून चालत आलेली आहे. ज्या श्रेष्ठ मनोवृत्ति कुटुंबांतील जिवंत माणसांशीं अमुक एक प्रकारें वागल्यानें समाधान पावतात, त्याच पूर्वजांच्या संबंधानें आपण जें वर्तन ठेवूं त्यानेंही समाधान पावतात. माझ्या एका कुटुंबास जी गोष्ट लागू आहे तीच ज्ञातींतील किंवा देशांतील सर्व कुटुंबांस लागू आहे. कोणाशीं कांहीं संबंध नसून मी आकाशांतून एकदम पृथ्वीवर उतरलों असतों, तर मीं कसें वर्तन केलें असतें तें सांगतां येत नाहीं; परंतु मी तसा जगांत आलेलों नाहीं. माझें शरीर, माझी प्रकृति, माझा स्वभाव, माझ्या अंगची कर्तबगारी—हीं सर्व मला पूर्वजांकडून आलेलीं आहेत. ते जोंवर स्मरणांत आहेत, त्यांचीं कृत्यें जोंवर या त्यांच्या देशांत दिसत आहेत, त्यांची भाषा व त्यांचे विचार जोंवर मला पिढी-परंपरेनें प्राप्त होत आहेत, तोंवर त्यांशीं संबंध तोडण्यांत मला परम दुःख आहे. ज्या माझ्या आचरणानें त्यांचा अपमान होईल, त्यांच्या कीर्तीस कलंक लागेल, त्यांचीं थोर कृत्यें विसरलीं जातील, त्यांच्या व माझ्यामध्यें साम्य नाहीसें होईल, तें आचरण मी निंद्य समजतों. त्या आचरणानें माझ्या बुद्धीस कितीही समाधान

झालें, तथापि माझ्या श्रेष्ठ मनोवृत्ति दुखावतील, व म्हणूनच मी पतित होईन. याकरितां मी हिंदूच नव्हे, तर ब्राह्मण राहण्यास इच्छितों. माझ्या वडलांपासून तों अगदीं पहिल्या पूर्वजापर्यंत जे पुरुप होऊन गेले त्यांच्या बहुमानार्थ नम्रपणें व उदारपणें मी स्वहितत्यागास तयार झालेलों आहें, असेंच तुह्मी समाजांना ? हिंदु राहण्यांत हिंदुलोक कायतीं दुःखें सोसतात, कांहीं विलक्षण अनीति तर करीत नाहींत ना ? या दुःखांचें पारडें हलकें करणारें त्यांमध्यें समाधान आहे व तें समाधान श्रेष्ठ मनोवृत्तींचें किंवा मनोदेवतेचें होय. प्रत्येक हिंदूस आपल्या आचरणाची याप्रमाणें मीमांसा करितां येणार नाहीं हें खरें; तथापि त्याच्या अंतःकरणाची स्थिति या प्रकारची असते यांत संदेह नाहीं. हीच गोष्ट ख्रिस्ती, मुसलमान वगैरे सर्वांस लागू आहे. केवळ दुःखनिवारणार्थ धर्मांतर करणारे फार थोडे, व ते समाजाच्या वरिष्ठ वर्गांत बहुधा सांपडत नाहींत. धर्मसंरक्षणार्थ दुःखें सोसणें, किंबहुना प्राणहानि करून घेणें, यांतच पुष्कळांस सार्थक्य वाटतें; व त्याचें कारण त्यांच्या बुद्धीची दुर्बलता नव्हे, तर त्यांच्या श्रेष्ठ मनोवृत्तींचें प्राबल्य होय. मीं जर हिंदुत्व किंवा ब्राह्मण्य सोडलें तर मला जगांत कोणी उरलें नाहीं असें मला वाटेल. माझी स्थिति मला एकांत कोठडींत कोंडलेल्या कैद्याप्रमाणें दुःसह होईल. मजविषयीं परधर्मीयांस जरी अनुकंपा वाटली तरी ती हक्काची नव्हे, तर दारच्या भिकाऱ्यास भिक्षा घालावी त्या प्रकारची असणार. थोर मनाच्या माणसास ती विषतुल्य होय; सामान्य जनांसही ती लाजिरवाणी होय. याकरितांच आधुनिक विद्वान् कितीही पाखंडी झाले, कितीही धर्माज्ञा मोडण्यास तयार झाले, तथापि जातिबाह्य होण्यास किंवा हिंदुत्व गमावण्यास तयार नसतात. कारण, तें एक गमाविल्यास आपल्या बांधवांकडून साहजिकपणें व हक्कानें मिळणारें प्रेम, अनुकंपा, बहुमान, वगैरे हीं गमाविलीं पाहिजेत, व भिक्षेनें आणि आर्जवानें आपलें महत्त्व राखिलें पाहिजे. तुम्हां सुधारकांचें हिंदु राहून हिंदुधर्माचें गुप्तपणें उल्लंघन करण्याचें कारण हेंच होय.

"आपल्या मनोवृत्तींच्या समाधानासाठीं आपलें व्यावहारिक नु-

कसान करून घ्यावें काय ? या प्रश्नाचा तुह्मी पाहिजे तेवढा ऊहापोह करा; व्यक्तिमात्र तें करून घेण्यास तयार आहेत ही गोष्ट निर्विवाद आहे. वडलांच्या पश्चात् त्यांच्या आज्ञेचा भंग न व्हावा म्हणून, कोणी एखादा थोर गृहस्थ आपल्या गैरइमानी निरुद्योगी दूरच्या अप्तास घरांत बाळगतो; कोणी आपल्या दुराचारी बंधूच्या वर्तनाकडे दुर्लक्ष करून त्यास संभाळून घेतो; कोणी अश्रद्धापूर्वक ब्राह्मणभोजनादि वार्षिक धर्मकृत्यें करितो, किंवा जातिभ्रष्ट झाल्यानें कुटुंबाची थोरवी जाईल म्हणून एखाद्या सुसाध्य सुधारणेपासून निवृत्त होतो; अशीं हीं उदाहरणें तुमच्या पाहण्यांत पुष्कळ आलीं असतील. त्यांचें इंगित काय तें पाहूं लागल्यास, असें दिसून येतें कीं मातापितरांचा किंवा पूर्वजांचा संबंध ते मेल्यानें तुटत नाहीं, अशी मनोदेवतेची साक्ष असते; व त्यांच्या बहुमानार्थ आपले विचार एकीकडे ठेवून व होईल तें दुःख आणि नुकसान सोसून, त्यांच्या आज्ञेप्रमाणें वर्तन करावें त्यावेळीं मात्र मनोदेवतेचें समाधान होतें. असें वर्तन करणारास तुम्ही मूर्ख म्हणा, त्याची निंदा करा, पाहिजे तें करा; तुम्ही जें दुःख द्याल तें आधींच हिशेबांत धरून पूर्वजांच्या आज्ञा पाळण्याचा त्याचा निश्चय झालेला असतो. त्याप्रमाणेंच समाजाच्या सामान्य पूर्वजांच्या आज्ञा रूढीच्या नांवानें प्रसिद्ध असतात; व त्यांचें पालन करण्याकरितां प्रसंग पडल्यास समजांतील व्यक्ति दुःख आणि नुकसान सोसण्यास तयार असतात. यास तुम्ही मूर्खपणा म्हणतां, खुशाल म्हणा. तुमच्या म्हणण्यामुळें ज्यांस पूर्वजांचा बहुमान राखणें आहे ते स्वकर्तव्य सोडीत नाहींत.

४१. "या सर्व कारणांमुळें हिंदुधर्माचा नाश होईल असें मला वाटत नाहीं. त्याचें सावकाशपणें रूपांतर होत जाईल हें खरें. परंतु त्या रूपांतरांत एक गोष्ट अवश्य दिसून येईल, ती ही कीं जुनें व नवें यांतील संबंध तुटणार नाहीं. जुन्यांतूनच नवें निघेल; तें असें कीं त्यामुळें पूर्वजांबद्दलचा बहुमान कमी होणार नाहीं; त्यांचे अनुभव फुकट जाणार नाहींत; त्यांबरोबर आपलेंही महत्त्व वाढेल व आपल्या श्रेष्ठ मनोवृत्तींचें प्राबल्य कायम राहील. अशा प्रकारची

सुधारणा करणारे तुह्मी सुधारक लोक नव्हेत व तुमच्या हातून आमची सुधारणा अद्यापि झालीही नाहीं. हिंदुधर्माचें जें थोडें रूपांतर चाललें आहे तें समाजांतील हिंदुधर्माभिमानी लोकांनीं जुन्याच पद्धतीनें विचार केल्यामुळें झालेलें आहे. तात्पर्य हें कीं मनुष्याच्या स्वभावांतील श्रेष्ठ मनोवृत्तींचा तुह्मी विचार करीत नाहीं, त्या मनोवृत्तींच्या समाधानाकरितां मनुष्य किती दुःखें व किती नुकसान सोशील हें तुमच्या लक्षांत येत नाहीं, व त्यामुळें तुह्मांस धर्मपालन करणारे लोक, मठ्ठ, मूर्ख, हेकट, आळशी, असे दिसतात. धर्माचरणाच्या संबंधानें मनुष्यमात्रांचा स्वभाव आमच्या पूर्वजांनीं तुह्मांपेक्षां फार चांगला ओळखला होता—

**स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः।**

हें तत्त्व त्यांनीं जेव्हां ठरविलें त्यावेळेपासून आतांपर्यंत कोणींही सुशील सुविचारी हिंदूनें त्याचें उल्लंघन केलेलें नाहीं; व अडाणी लोकही नकळत त्याचें पालन करीत आहेत, व पुढेंही करितील अशी मला खात्री आहे. ख्रिस्ती, मुसलमान व इतर परधर्मीय लोकही या तत्वाचें पूर्णपणें पालन करीत आहेत. तुह्मी त्याचें पालन करीत नाहीं याचें कारण परकीय राज्यकर्त्यांनीं तुह्मांस जें शिक्षण दिलें आहे तें अर्धवट व एककल्ली दिलें आहे, व आह्मां स्वदेशीयांकडून जें योग्य शिक्षण तुह्मांस मिळायाचें त्याची तुह्मांस पर्वा नाहीं. तुमची स्थिति त्रिशंकूप्रमाणें झाली आहे व तुमच्या अल्पदृष्टीनें तीच तुह्मांस स्पृहणीय वाटत आहे. याचें आह्मांस आश्चर्य वाटतें.

४२. " असें समजा कीं हिंदुस्थानच्या एका मोठ्या प्रांतांत **वेदांती** या जातीचे लोक राहत आहेत. त्यांचा धर्म किंवा नीति आधुनिक पाश्चात्य शास्त्रांस अनुसरून सर्वतोपरि पूर्णत्वास आलेली आहे. त्यांचीं धर्माचीं, नीतीचीं व वेदांताचीं मतें तुमच्या **हक्सले**, **टिंडाल**, **स्पेन्सर**, **मिल** वगैरे इंग्लिश तत्त्ववेत्त्यांस पूर्णपणें मान्य आहेत; व त्याप्रमाणें त्यांचे अभिप्रायही प्रसिद्ध झालेले आहेत. ख्रिस्तीधर्माहून वेदांती धर्म श्रेष्ठ, असें कोणीही समंजस माणूस कबूल करील अशी त्या वेदांती जातीच्या लोकांची योग्य समजूत आहे; व त्या समजुतीनें त्यांचे मिशनरी अथवा धर्मप्रसारक लोक इंग्लंडांत जाऊन

व्याख्यानें वगैरे देत आहेत. ख्रिस्तीधर्मांतील अनेक दोषांमुळें ख्रिस्ताच्या मृत्यूपासून आतांपर्यंत किती प्राणहानि झाली, शास्त्रप्रगतीस किती विघ्नें आलीं, लोकांची अज्ञानावस्था जाण्यास केवढा काळ लागला, व हल्लींही ख्रिस्तीधर्मांत किती न्यूनता आहेत, या सर्व गोष्टी हे वेदांती धर्मप्रसारक इंग्लिश लोकांच्या सभांतून मोठ्या आवेशानें सांगत आहेत. या अशा धर्मप्रसारकांच्या प्रयत्नांमुळें किती इंग्लिश लोक ' आह्मी ख्रिस्तीधर्म सोडून वेदांती होणार, ' असा निश्चय करितील तें तुह्मी सांगा बरें ? मला वाटतें मनांतल्या मनांत कांहीं थोडे लोक वेदांती होतील, पण आपला ख्रिस्तीपणा प्रसिद्धपणें सोडण्यास कोणी विरळाच तयार होईल. इंग्रजलोकांचेंही हेंच ह्मणणें पडेल कीं ' स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः । ' केवळ बुद्धीच्या समाधानासाठीं आपल्या पूर्वजांशीं संबंध तोडून टाकण्यास ते लोक तर आह्मांहूनही अधिक बेराजी आहेत असें दिसून येईल. कारण त्यांमध्यें केवळ श्रेष्ठ वासनांचेंच प्राबल्य आहे असें नाहीं, तर राजकीय स्वातंत्र्यामुळें व अत्यंत वैभवामुळें कांहीं तामसी वासनांचेंही प्राबल्य उत्पन्न झालेलें आहे. ”

४३. याप्रमाणें रामचंद्रपंतांचें बोलणें संपल्यावर मी बराच वेळ विचार करीत स्तब्ध राहिलों. आह्मां सुधारकांच्या विचारांतील त्यांनीं खरी चूक दाखविली असें मला वाटूं लागलें. त्यांचें ह्मणणें मला बहुतांशीं ग्राह्य झालें व आपली सुधारकवृत्ति सोडून दिली पाहिजे असा माझा निश्चय होत चालला. आपण इतके दिवस सुधारणेचा बाणा बाळगून आतां ती सोडावी तरी कशी, आपणांस मित्र काय ह्मणतील, वगैरे गोष्टी मनांत येऊन मन व्यग्र झालें; व आपण हरलों असें रामचंद्रपंतांजवळ कबूल करण्याचीही लाज वाटूं लागली. तेव्हां मीं त्यांस एवढेंच ह्मटलें कीं, “ बाबासाहेब, आपण ह्मणतां त्यांत बरेंच तथ्य आहे व त्याचा विचार करणें अवश्य आहे. सुधारकांनीं हिंदुधर्माचे गुणांचा स्वतंत्रपणें विचार केला पाहिजे व हिंदूंच्या विशिष्ट मनोवृत्तिही निश्चित केल्या पाहिजेत. आपण हा विषय मला इतक्या उत्तम रीतीनें समजावून दिला याबद्दल मीं आपले आभार मानावे तितके थोडे होत. ”

यावर रामचंद्रपंतांनीं उत्तर केलें, " सुधारकांच्या विचारांतील जे दोष मला दिसले ते मीं स्पष्टपणें सांगितले. परंतु सुधारकांच्या मतांचें आधुनिक तरुण विद्वानांनीं अविचारानें ग्रहण केल्यामुळें जे दुष्परिणाम झाले आहेत ते अद्यापि सांगायाचे राहिले आहेत. घरोघर एकच स्थिति आहे; व माझे स्वतःचे घरांतील स्थिति उदाहरणार्थ घेतली तरी चालण्यासारखें आहे. मला दुसरें कोणतेंही दुःख नाहीं; माझ्या मतें मी सुधारलों नसूनही पुष्कळ सुखी आहें, परंतु आमच्या चिरंजिवांची सुधारकी माझ्या व सर्व कुटुंबाच्या सुखास कमीपणा आणीत आहे. अथवा मनुष्यास दुःखरहित शुद्ध सुख इहलोकीं कोठून मिळणार? देशाच्या व समाजाच्या सुखाकरितां खटपट करणारांनीं आपण होऊन तरी आपल्या बांधवांच्या दुःखांत भर पाडूं नये. परंतु उद्दाम सुधारकांच्या ही गोष्ट कोठें ध्यानांत येत आहे? मीं सांगितलेल्या इतर गोष्टींचा तुह्मी विचार कराल त्याबरोबर या आणखी एका गोष्टीचाही विचार तुह्मीं करावा, ह्मणून मी चिरंजिवांच्या वर्तनाची तुह्मांस थोडीशी कल्पना देतों "

---

# भाग ९ वा.

## शुद्ध इंग्रजी शिक्षणाचे सामाजिक दुष्परिणाम.

४४. रामचंद्रपंत ह्मणाले:—" इंग्लिश लोक पूर्वीं आह्मांस जें शिक्षण देत होते, तें आमच्याच संस्कृतादि ग्रंथांवरून देत होते. परंतु त्यांच्यांतील कोणी मुत्सद्दी माणसानें पाहिलें कीं जोंवर संस्कृतादिकांवरून एतद्देशीयांस शिक्षण दिलें जात आहे, तोंपर्यंत आमचीं मनें फांकणार नाहींत*,—ह्मणजे, काय तर परधर्मीयांबद्दल, मुख्यत्वें ख्रि-

---

* On the 7th March 1835 Lord William Bentinck decided that "The great object of the British Government ought to be the promotion of European Literature and Science among the Natives of India ;" two of the orientalists retired from the Committee of Public Instruction ; several new members, both English and Native, were appointed ; and Macaulay entered upon the functions of Pre-

RANADE, Pune
B
514
PERSONAL LIBRARY



स्तीधर्माचे लोकांबद्दल, आमच्या मनांत पूज्यबुद्धि उत्पन्न होणार नाहीं; आह्मी त्यांस तुच्छ गणूं व त्यायोगें त्यांच्या राज्याची बळकटी अलबत कमी होणार. जोंवर स्वधर्माचा आवेश लोकांत आहे, तोंवर राजकीय स्वातंत्र्याची त्यांमध्यें हौस उरणारच, व तिजमुळें देशांत क्षुल्लक कारणांवरून बंडाळी उत्पन्न व्हावयाची. तेव्हां हें स्वदेशी शिक्षण बंद करीत गेलें पाहिजे, व त्याचे जागीं इंग्रजी घालीत गेलें पाहिजे. हा क्रम तेव्हांपासून जो सुरू झाला तो अद्यापपावेतों चालू आहे. सर्व शिक्षण हळूहळू इंग्रजीच्या द्वारें देण्याचें अमलांत आलें आहे. देशी भाषा शिकणें तीही इंग्रजीच्या द्वारें शिकावी अशी वरिष्ठ प्रतीच्या शाळांतून सुरवात झाली आहे. संस्कृताचा अभ्यास संपुष्टांत आणिला आहे. व सर्व मदार इंग्रजीवर आहे. इंग्रजींत लिहावें, इंग्रजींत वाचावें, इंग्रजींत बोलावें, इंग्रजींत विचार क-

---

sident with an energy and assiduity which in his case was an infallible proof that his work was to his mind.

ता. १२ आक्टोबर १८३६ या दिवशीं मेकालेनें आपल्या वडलांस पत्र लिहिलें त्यांत पुढील मजकूर आहे:-

"Our English Schools are flourishing wonderfully. We find it difficult,—indeed in some places impossible—to provide instruction for all who want it. At the town of Hooghly fourteen hundred boys are learning English. The effect of this education on the Hindoos is prodigious. No Hindoo who has received an English education ever remains sincerely attached to his religion. Some continue to profess it as a matter of policy ; but many profess themselves pure Deists, and some embrace Christianity. It is my firm belief that, if our plans of education are followed up, there will not be a single idolator among the respectable classes of Bengal thirty years hence. And this will be effected without any efforts to proselytise ; without the smallest interference with religious liberty ; merely by the natural operation of knowledge and reflection. I heartily rejoice in the prospect."

Macaulay's *Life and Letters.*

मुत्सद्यांचे अंतस्थ विचार कोठें शोधावे हें मार्मिक वाचकांच्या लक्षांत येईलच.-

**विद्याधर.**

रावा, इंग्रजींत सर्वच मनाचे व्यापार होऊं लागावे, असा जो राज्यकर्त्यांचा हेतु होता तो त्यांनीं सिद्धीस नेला आहे. अशा भाषाविषयक पारतंत्र्याच्या स्थितींतून आह्मी थोडे तरी सुटायास पाहूं लागलों, तर त्यास ते विघ्न करितात, हरएक प्रकारच्या अडचणी आणितात व आमचें कांहीं चालत नाहीं. हा क्रम जेव्हां त्यांनीं प्रथम सुरू केला तेव्हांपासूनच ते गोड गोड बोलून, आपल्या भाषेची उत्कृष्ट स्थिति दाखवून, आपल्या ज्ञानाची महती गाऊन, आम्हांस भुरळ पाडीत आले आहेत; व जें अन्य हेतूंनीं केलें त्यास परम परोपकाराचें स्वरूप देण्यांत त्यांनीं आतांपर्यंत कधींही चूक केलेली नाहीं. इकडे आमच्यापैकीं ज्यांस इंग्रजींत वाचा फुटली, तेच आमच्या तर्फेनें मुखत्यार बनले व राज्यकर्त्यांस संतोष होईल अशा तऱ्हेनें त्यांच्या कृत्यांचें मंडन करूं लागले. इंग्लिश लोकांच्या उपकारांची याद सांगण्याचा सभांमध्यें वारंवार प्रसंग येतो, तेव्हां पहिला उपकार इंग्रजी विद्यादानाचा, असें म्हणण्याचा अद्यापिही प्रघात सुरू आहे. या प्रघातानें राज्यकर्ते खुष होत असतील यांत शंका नाहीं, व आरंभिलेलें कारस्थान पुष्कळ अंशीं सिद्धीस गेलें हें पाहून त्यांस समाधानही वाटत असेल. परंतु या सर्वस्वी इंग्रजी शिक्षणाचे कांहीं परिणाम राजकीय दृष्ट्या प्रतिकूळ होत आहेत, असें राज्यकर्त्यांसच अलीकडे वाटूं लागलें आहे, व तेवढे सुधारून घेण्याचा त्यांचा प्रयत्न चालू आहे. तथापि सामाजिक दृष्ट्या जे परिणाम घडत आहेत ते परकीयांस इतके अनुकूळ वाटत आहेत, कीं सर्व शिक्षण इंग्रजींत देण्याची त्यांची इच्छा कदापि कमी होणार नाहीं. कारण, हिंदुलोकांचें बळ त्यांच्या धर्मांत आहे, हें राज्यकर्ते ओळखतात; व शुद्ध इंग्रजी विद्येसारखें धर्मच्छेदास उपयोगी दुसरें शस्त्र नाहीं हें ते जाणतात. आमचे विद्वान् लोक विद्येच्याबराबर जें विष पितात तें जाणत नाहींत. या विद्येनेंच आपण बळकट होऊं हा त्यांचा ग्रह त्यांस सोडीत नाहीं; ते सुधारक बनतात व सुधारणा झाल्यावर मग राजकीय उत्कर्षाची मोहक आशा बाळगतात. ‘ धर्म जाऊं द्या हो, त्यावांचूनच सारे हक्क मिळवूं, ’ या भ्रमांत

ते पडले आहेत, व तेल नाहीं तूप नाहीं, हातीं धुपाटणें घेऊन बसणार आहेत !

४५. "हा सर्व परिणाम कशाचा, तर सर्वस्वी इंग्रजी शिक्षणाचा असें मी ह्मणतों, व त्याचें कारण असें. इंग्रजींतून पृथ्वीवरील सर्व गोष्टींचें ज्ञान मिळतें हें मला मान्य आहे. जगाचा आतांपर्यंतचा खरा, खोटा व काल्पनिक इतिहास आह्मांस वाचायास मिळतो, सर्व शास्त्रांत पारंगत होण्याचीं आह्मांस साधनें मिळतात, सर्व देशांतील धर्म, नीति, उद्योग, लोकाचार यांविषयीं तांत्रिक माहिती मिळते, व पाश्चात्य कवींच्या, कादंबरीकारांच्या आणि वक्तयांच्या उक्ति आह्मांस वाचायास सांपडतात. या सर्व गोष्टी मला कबूल आहेत; व या फायद्यांकरितां इंग्रजी भाषा अवश्य शिकावी असें मीही ह्मणतों. परंतु जेव्हां एकच एक इंग्रजी शिक्षण एतद्देशीयांस दिलें जातें तेव्हां त्यांत एक दोष अनिवार्यपणें शिरतो. तो हा कीं सर्व वस्तुस्थिति ख्रिस्ती डोळ्यांनीं पाहिल्यासारखें होतें; व ख्रिस्त्यांप्रमाणेंच आह्मी न कळत विचार करूं लागतों. जगांतील इतर धर्मांविषयीं ख्रिस्ती ग्रंथकारांचीं मतें विद्वान् लोक ग्रहण करितात यांत नवल तें काय ? स्वतःच्या धर्माविषयींही त्यांचींच मतें विद्वानांच्या मनांवर बिंबतात. आतां परधर्मीय लोक कितीही समंजस असले तरी त्यांस दुसऱ्यांच्या धर्माबद्दल बहुमान असणें अशक्य आहे; उलट, जितका स्वधर्माचा अभिमान असेल तितका अन्य धर्माबद्दल तिरस्कार त्यांमध्यें वागणें स्वाभाविक आहे. हीच गोष्ट चाली, रीति, पेहराव, भाषा, इतिहास, या सर्वांसंबंधानें खरी आहे. ज्याविषयीं आपणांस आपलेपणा वाटतो, त्याचा विचार करितांना आपल्या विचारांशीं अनुकूल मनोवृत्तींचा मिलाफ होऊन दोष अस्पष्ट होऊं लागतात व गुण स्पष्टतर होतात. परंतु ज्याविषयीं आपणांस आपलेपणा वाटत नाहीं त्याचा विचार करतांना मनाची उलट स्थिति होते.

" ख्रिस्ती लोकांचीं पुस्तकें लहानाचा मोठा होईपर्यंत व पुढें आयुष्यभर वाचल्यामुळें ख्रिस्तीलोकांचे गुण विद्वानांच्या मनांत भरतात, त्यांचे दोष अस्पष्ट होत जातात, त्यांविषयीं बहुमान उत्पन्न होतो; त्यांच्या रितीभातींचें ज्ञान झाल्यानें त्यांच्या कवींचें

रहस्य कळून आनंद होतो. या सर्व गोष्टी उत्तम आहेत; त्या लोकांबद्दल आमचें चांगलें मत असणें हें योग्य आहे. परंतु हिंदूंच्यासंबंधानें बरें मत व्हावें असें ख्रिस्तीलोकांस कांहींच सांपडलेलें नाहीं, ही एक ध्यानांत ठेवण्यासारखी, काहीं अंशीं आश्चर्याची, गोष्ट आहे. त्यामुळें दयेनें त्यांनीं आह्मांबद्दल कोठें कांहीं चांगलें ह्मटलेलें आढळेल, परंतु सत्य सांगण्याचा जेथें त्यांचा बाणा असतो तेथें त्यांनीं हिंदूंविषयीं चांगले उद्गार काढले आहेत असें आढळणार नाहीं. त्यांचें आह्मी जेवढें अनुकरण करतों तेवढें मात्र बरें असें त्यांस म्हणावें लागतें. तुह्मांआह्मांस व्यवहारांत जो क्षुल्लक दोष दिसतो तो त्यांच्या डोळ्यांस पर्वताएवढा दिसतो. त्याच्या स्थूलत्वापुढें कांहीं गुण असल्यास तो लोपून जातो. उलट, तुह्मांआह्मांस ख्रिस्ती गृहस्थांच्या वर्तनांत जो विलक्षण दोष किंवा अन्याय वाटतो, तो त्यांच्या दृष्टीस अगदीं क्षुद्र वाटतो, व त्याचा आह्मीं बभ्रा केल्यास आह्मीच असमंजस ठरतों. सारांश हा कीं ख्रिस्ती लोकांचें वाङ्मय सदोदित डोळ्यांपुढें असल्यानें,—जेवढें हिंदु तेवढें निंद्य, तिरस्कार्य, त्याज्य असें पुनः पुनः वाचीत गेल्यानें,—दोष तेवढे नित्य नित्य विशेष स्पष्ट झाल्यानें,—गुण तेवढे सर्वदा मागें पडल्यानें,—स्वतःच्या श्रेष्ठ वासना निरंतर निद्रित राहिल्यानें—आमचे सुशिक्षित लोकही ख्रिस्त्यांप्रमाणेंच विचार करूं लागतात, त्यांची नजर ख्रिस्त्यांसारखीच बनते; त्यांस आपला धर्म, रितीभाती, पोषाख, भाषा, कुटुंब, पूर्वज— सर्व तिरस्कार्य व त्याज्य वाटतात. त्यामुळें सुशिक्षित लोक जेवढें ख्रिस्त्यांचें अनुकरण करितात तेवढेंच कायतें त्यांस स्वतःची प्रौढी मिरविण्यास कारण राहतें. ही स्थिति मीं सामान्यत्वानें वर्णन केली; तिचा तुम्हांस सर्वत्र प्रत्यय येईल. एकच एक इंग्रजी शिक्षणाचा हा परिणाम होय. यामुळें विद्वानांच्या श्रेष्ठ वासना मृतप्राय झाल्या आहेत. ख्रिस्ती होण्याचें धैर्य नाहीं, व स्वधर्माभिमानी राहण्याचें रुचत नाहीं. त्यामुळें सर्व लौकिक व्यवहारांत विद्वान् लोक दुबळे, आळशी, आवेशहीन, असाध्याच्या साध्यतेकरितां खटपट करणारे, व अखेरीस अपयशानें निराश होऊन शुद्ध स्वहितास लागणारे, असे दिसतात.

जर विद्वान् लोक आपलें ख्रिस्ती शिक्षण विसरून आपल्याच बुद्धीनें निःपक्षपातानें हिंदु संस्थांचा विचार करितील तर त्यांस दुसरें एक नवें जगच सांपडेल असें मला वाटतें. "

---

# भाग १० वा.

## एका सुधारकबहादराची हकीकत ऐकून मी चकित झालों.

४६. " असो. मी तुह्मांस जें सांगणार होतों तें एकीकडेच राहिलें, व त्याची ही प्रस्तावना लांवत लांवत फारच लांबली. परंतु या प्रस्तावनेमुळें मी सांगणार तें चांगलें स्पष्ट होईल. इतर लोकांप्रमाणें मीं आमचे चिरंजिवांस सांप्रतच्या पद्धतीनें इंग्रजी विद्या प्राप्त करून दिली. मला पूर्वीचा अनुभव असता तर मीं ही पद्धति सोडून निराळ्या पद्धतीनें शिक्षण दिलें असतें. मला तितकी पैशाची अनुकूलता होती. परंतु मी अंधपरंपरेस लागलों व पुष्कळ पैसा खर्च करून अखेरीस अत्यंत दोषयुक्त असें शिक्षण मुलास देऊन बसलों. शारीरिक शिक्षणाकरितां क्रिकेटचें सामान, बूट, पोषाख वगैरेमध्यें माझा बराच पैसा खर्च झाला, त्याचें फळ चिरंजिवांची मुद्रा पाहूनच लक्षांत येतें. विद्याभ्यासाकरितां अनेक पुस्तकें घेतलीं, त्यांचें फळ चिरंजिवांचें वर्तन व विचार पाहून ध्यानांत येतें. मला ही जी ठेंच लागली तशी अनेकांस लागत आहे, परंतु पारतंत्र्यामुळें, दारिद्र्यामुळें व पोटाच्या उद्योगांत गुंतून राहिल्यामुळें, कोणास कांहीं उपाय सुचेनासा झाला आहे व दिवसेंदिवस इंग्रजी विद्येचे दुष्परिणाम वाढतच चालले आहेत. तथापि लोकांच्या मनास लवकरच भला भक्कम धक्का बसून ते सावध होऊन सुमार्गास लागतील अशीं चिन्हें हल्लीं बरींच दिसूं लागलीं आहेत.

" आमचे चिरंजीव बी.ए.ची परीक्षा पास होऊन घरीं आले तों त्यांस आम्ही कुटुंबांतील सर्व माणसें तुच्छ दिसूं लागलों.

जानेवारीचा महिना होता व थंडी कडक पडत होती, तेव्हां चिरंजिवांनीं आम्हांस सांगितलें कीं तुमच्या भोळसटांच्या क्षुद्र समाधानासाठीं मी सोंवळें नेसून कुडकुडत जेवायास बसणार नाहीं. हा त्यांचा निग्रह पाहून त्यांचें पान आम्ही निराळें मांडूं लागलों. एवढ्या खर्चाच्या शारीरिक शिक्षणानें एवढीशी थंडी सोसण्याचें सामर्थ्य तरण्याताठ्या पोरांस येत नसेल तर तें शिक्षण व्यर्थ होय असें मी मनांत समजलों. प्रथम पान निराळें होतें, पुढें तें निराळ्या खोलींत असावें अशी चिरंजिवांनीं सूचना केली. याचें कारण शोधाअंतीं असें समजलें कीं लिंबाचे रसापेक्षां शिरका अधिक अंबट, तो कांदेलसणावर घातल्यावांचून चिरंजिवांस घास गिळत नाहीं. तसेंच इंग्रजी तऱ्हेचीं लोणचीं, मुरांबे वगैरे, हीं त्यांस विशेष प्रिय झालीं होतीं. तेव्हां हे पदार्थ आमच्या देखत कशास खावे, ह्मणून आमच्या कोत्या समजुतीस मान देऊन निराळ्या खोलींत जेवणाचा प्रघात सुरू झाला. हळूहळू त्या खोलींत एक टेबल, खुर्ची व कपाट आलें, व काचेच्या बाटल्या, ग्लास, चिनीमातीचे पेले, बशा वगैरे पदार्थ जमत चालले. सुनबाईवांचून यजमानास कोणी वाढावयास जायचें नाहीं व एका मोलकरणीशिवाय कोणी झाडसारवणास जायचें नाहीं, असा चिरंजिवांचा हुकूम झाला.

"मुलाकरितां मातेनें जीं दुःखें भोगिलीं असतात व मुलावर भिस्त ठेवून ज्या अनेक आशा व मनोरथ बाळगिले असतात त्यांची कल्पना तुह्मांस नसेलच. मुलगा आपले समोर पोटभर जेवला असतां मातेस जें समाधान होतें, त्याची तुह्मांस कोठून कल्पना असणार ? मुलाचा जेवणाचा बेत हा असा एकांतांत होऊं लागल्यापासून आमच्या कुटुंबास जें दुःख होऊं लागलें तें सांगतां पुरवणार नाहीं. तिच्या मनांत नाना तऱ्हेच्या शंका येऊं लागल्या. ती चिरंजिवांशीं बोलावयास गेली असतां त्यांनीं तीस हिडीसफिडीस करावें. फारच सौम्य भाषण ह्मटलें म्हणजे " आई, तुह्मी पहिल्या काळचीं माणसें, तुह्मांस काय कळतें आहे. तुह्मी आतां चूप बसा आणि जें जें होईल तें तें पहा. तुमचे दिवस आतां गेले—हा सुधारणेचा काळ आहे—यांत मूर्ख भोळसट बायकांचें काम नाहीं. तुह्मी काशीयात्रे-

ला कधीं निघतां ? " चिरंजिवांचे याप्रकारचे उद्गार नित्य ऐकून, नोकरांच्या व आप्तांच्या समोर आपला उपमर्द न व्हावा ह्मणून त्या माउलीनें त्यांशीं बोलणेंच सोडून दिलें. याप्रमाणें एका घरांत राहून मुलाशीं विभक्त झालेल्या आईच्या डोळ्यांस दिवसांतून किती वेळां टिपें येतात, तिचें अंतःकरण कसें फाटल्यासारखें होतें, हें तुह्मी हिंदु असाल तर तुम्हांस सहज समजेल.

" चिरंजिवांस कालेजांतून आल्यापासून काम ना धंदा, तेव्हां ते तुमच्या सुधारक मंडळीस मिळाले, कोठें नाटकवाले मंडळींत जाऊन बसूं लागले, क्रिकेट, टेनिस, वगैरे क्लबांचे वर्गणीदार होतेच. त्यांचें पाऊल घरांत थोडेंच ठरे, परंतु तेवढ्या अवकाशांत कोणास नांवें ठेव, कोणास रागें भर, कोणास भलतेंच बोल, अशी त्यांची बेफाम वृत्ति दिसूं लागली, व उधळेपणासही आरंभ झाला. आमचे हातून एमेचा किंवा एलेल्बीचा अभ्यास होत नाहीं, असें त्यांनीं स्पष्ट सांगितलें. ' मला विलायतेस पाठवा, मी बारिष्टरची परीक्षा हटकून पास होऊन येतों, माझी सर्व तयारी आहे, ' असें कित्येक दिवसपर्यंत त्यांनीं बोलणें लावलें होतें. परंतु मीं त्यांची योग्यता ओळखली होती, व माझी इतकी ऐपत नाहीं असें पक्केपणीं त्यांस मीं सांगितलें. त्यामुळें त्यांची तबीयत अधिकच नाराजी झाली; व स्वभाव अधिकच बिथरत चालला. तेव्हां, प्रपंच कळूं लागला ह्मणजे त्याच्या आंचीनें यांचे डोळे उघडतील असें वाटून त्यांस मीं नौकरी लावून दिली, व त्यांनीं स्वतंत्रपणें निराळें रहावें, असा माझा हेतु होता. परंतु ती गोष्ट आमचे कुटुंबास रुचेना. ती ह्मणे, ' हा तुमच्या नजरेखालीं आहे तोंपर्यंत कांहीं बेतानें वागेल; दूर राहूं लागल्यास कोणीकडे किती बहकेल त्याचा नेम नाहीं. ' हें तिचें बोलणें मलाही सयुक्तिक वाटलें, व चिरंजिवांस विचारतां त्यांचीही दूर राहण्याची इच्छा दिसेना. परंतु त्याचें कारण निराळें होतें. ' आपला पगार आपल्या खर्चास पुरणार नाहीं व आपण दूर गेल्यास वडील स्वतःचे मालमत्तेचा धर्मादायांत वगैरे खर्च करून टाकतील, तेव्हां हें आपलें लोढणें यांच्या गळ्याशीं अक्षयीं लागलेलें पाहिजे.' असा त्यांच्या मनांतील हेतु होता. त्यामुळें चाकरी लागल्यापासून

पोषाख व सामानसुमान यांतच सर्व पगार गडप होऊन चिरंजिवांस उलटें कर्ज होत चाललें आहे. आपण दिवाणखान्यांत बसलां होतां, तेव्हां पगार कोणीकडे जातो आहे, हें तुमच्या लक्षांत आलेंच असेल.

" चिरंजीव कालेजांतून बाहेर पडले तेव्हां आपलें घर सुधारून तें उलथेच्या पालथें करण्याची प्रतिज्ञा करूनच बाहेर पडले होते कीं काय कोण जाणे! हिंदु स्त्रियांची श्रेष्ठता जर कोणा एका सद्गुणांत असेल तर ती त्यांच्या अप्रतिम विनयांत आहे. हे राजश्री पहिले दिवशीं घरीं आले तेव्हां घरांत जाऊन, ' प्रिये सरस्वति, सुखरूप आहेसना ?' ह्मणून मातुःश्रीचे देखत आपले पत्नीचा नामोच्चारपूर्वक समाचार घेऊन आले. ती बिचारी लाजून कोपऱ्यांत खालीं मान घालून उभी राहिली, कांहीं उत्तर देईना. दुसरे दिवशीं पुनः तशीच त्यांनीं तीस हाक मारिली व तिचें उत्तर नाहींसें पाहून पाय आपटून ' अग बायको, मी तुला हाक मारतों आहें, ऐकूं येत आहे काय ? ' ह्मणून घरांतील माणसांदेखत प्रश्न केला. गरीब बिचारी कांहीं बोलली नाहीं, खालीं मान घालून डोळ्यांतून आंसवें ढाळूं लागली. तीस असें झालें कीं आतां मला सासूबाई काय ह्मणतील ! लोक माझी काय चेष्टा करतील ! सैंपाकीणबाई व नौकरचाकर बाहेर जाऊन काय काय सांगतील व आपला फजितवाडा कोठपर्यंत जाऊन पोहोंचेल ! बिचारीचा काय अपराध ? परंतु इकडे या राजश्रींचें पित्त खवळलें–' हें स्त्रियांच्या अज्ञानाचें फळ ! ही हिंदुलोकांची पोकळ मर्यादा राखण्याची तऱ्हा ! छेः छेः ! हें सर्व सुधारलें पाहिजे. ' त्या दिवसापासून सुनबाईस सकाळीं दोन तास इंग्रजीचा अभ्यास व संध्याकाळीं एक तास गाण्याबजावण्याचा अभ्यास, अशी व्यवस्था सुरू झाली आहे. प्रथमतः चिरंजिवांनीं स्वतः शिक्षण देण्याचें मनावर घेतलें, परंतु थोडक्याच दिवसांत कंटाळा येऊन त्यांस फावेनासें झालें व हल्लीं एक तरुण मुलगा इंग्रजी शिकविण्यास येतो, व एक तरुण गृहस्थ ( कोण जातीचा आहे तें सांगवत नाहीं ) संध्याकाळीं गाणें व हार्मोनियम् ( पेटी ) शिकविण्यास येतो.

" या गाण्यावजावण्याच्या कामीं मुलीनें प्रथम पुष्कळ हट्ट केला, परंतु यजमानांनीं मारहाण सुरू करून आपला हेका तडीस नेला. इंग्रजी शब्द घोकण्याचें सुख तुह्मांस माहीत असेलच. ' मी काय करूं, माझें कांहीं चालतें आहे काय? ' असें ह्मणून मुलगी नित्य वडील माणसांची क्षमा मागते. आह्मीही चिरंजिवांच्या आड येत नाहीं. कारण मुलीस त्यांचेबरावर जन्म काढायाचा आहे. संभावित गृहस्थितीचें शिक्षण मुलीस चांगलें मिळालेलें आहे, त्यामुळें तीच प्रौढपणीं पाहिजे तेवढे कष्ट सोसून यजमानांस संभाळून घेईल, किं-बहुना, सुमार्गावर आणील अशी आह्मांस आशा वाटते. यजमानांचा कित्ता तिनें उचलला नाहीं; वडलांचा व आप्तांचा मान ठेवण्यांत तिची काडीमात्र चूक होत नाहीं. पातिव्रत्याची पहिली आज्ञा पति-संतोष, त्याकरितां ती दुःख सोसण्यास तयार आहे. सर्व सद्‌गुणांच्या पालनांत जी स्वहितनिरपेक्षता लागते तिचें शिक्षण तीस सुरू आहे असें मी समजतों. माझ्या घरांत हें एक रत्न आहे; घरोघर अशीं रत्नें आहेत ह्मणून हिंदुसमाज सुरक्षित आहे.

" परंतु अलीकडे सुनबाईचे चित्तासही समाधान नाहीं; ती आ-म्हांस सांगत नाहीं तथापि तिला हृद्रोग लागला आहे असें तिच्या मुद्रेवरून दिसतें. तिच्या तोंडावर प्रफुल्लितपणा हल्लीं कित्येक दिवस नाहीं. या गोष्टीचीं कारणें आह्मांस नित्य दिसतच आहेत, तेव्हां तीं तिला विचारून आह्मी तिचें मन दुखवीत नाहीं. चिरंजिवांस नौकरी लागल्यापासून आफिसांतील ' मोरियार ' नांवाचे ख्रिस्ती गृहस्थाशीं त्यांचा स्नेह जडला आहे. त्याचे येथें बिलियर्ड खेळायास जावें लागतें, ह्मणून आरंभीं राजश्री रात्रीं उशीरां घरीं येऊं लागले. पुढें रात्रीं घरीं आल्यावर ' भूक नाहीं, मी फराळ केलों, ' ह्मणून सांगूं लागले; कित्येक वेळां अपरात्रीं घरीं आल्यावर एकादे गड्याचे सा-हाय्यानें सुनबाई यजमानांस दिवाणखान्यांत घेऊन जातात. या सर्व गोष्टींचें तात्पर्य तुह्मी समजा. तुमच्या मतें या सर्व सुधारणाच होत! ही तुमची उत्क्रांति होय! परंतु रोजचे रोज यजमानांची वाट पहात बसावें, आज कोणच्या स्थितींत ते घरीं येतील या विवंचनेनें रात्रीं झोंपेवांचून तळमळत पडावें; सर्व लोकांत उपहास सुरू झाल्यामुळें

कोण काय थट्टा करील या भीतीनें मैत्रिणींशींही संभाषणाचे प्रसंग टाळावे; आपल्या मनांतील गूढ गोष्टी मुद्रेवरून कोणी ओळखील कीं काय या शंकेनें घरांतील वडील माणसांस देखील तोंड दाखविण्याची धास्ती वाटावी, यजमानांचीं दुर्व्यसनें कोणत्या थरास जाऊन पोंचतील, आपल्यावर तरी किती दिवस मर्जी राहील, पुढें कोणता भयंकर प्रसंग येऊन गुदरणार आहे—इत्यादि, विचार एकांतांत बसलें असतां मनांत येऊन जीव कासावीस व्हावा—याप्रमाणें ही मुलीच्या मनाची स्थिति पाहिल्यावर आमच्या डोळ्यांस पाणी येतें, मग एवढ्या दुःखभारानें तिचें अंतःकरण अत्यंत व्याकुळ होत असेल यांत नवल काय? हीं एवढीं विषतुल्य दुःखें पतिव्रताधर्मानें गिळून स्वकर्तव्यास सारखें दक्ष राहणें—हें धर्मबळ होय. विद्या मिळाली असतांही सर्व श्रेष्ठ मनोवृत्ति विसरून जाऊन क्रमाक्रमानें अनीतीच्या मार्गास लागणें हें अधर्मबळ होय. यांपैकीं तुह्मांस कोणतें पसंत पडतें तें कोण जाणे !

४७. "तुह्मां सुधारकांपैकीं कित्येक लोक मुलांस शाळेंत नैतिक शिक्षण मिळत नाहीं म्हणून ओरड करीत आहेत; राजकर्तेही तसेंच म्हणत आहेत, कारण तुमची नीति फारच कमी असा त्यांचा ग्रह आहे. परंतु धर्मबंधनांवांचून व कुटुंबांतील प्रीतिपाशांवांचून नीतिशिक्षण अशक्य आहे, हें तुम्हांस कळत नाहीं. हिंदुधर्माची किंवा हिंदुकुटुंबव्यवस्थेची लहानाचा थोर होईपर्यंत ओळख नाहीं, 'जें कानीं पडेल तें निंदात्मक, अशा रीतीनें मुलांस विद्यादान देऊन अखेरीस 'हीं इतकीं उच्छृंखळ कशीं होतात हो!' म्हणून अचंबा वाटणारे जगाचे पाठीवर तुह्मी कायते सुधारक आहां, असें मला वाटतें. नाहींतर आम्हां भोळसटांचे विद्वान् मुलगे व सुधारकाग्रणींचे सुशिक्षित मुलगे, बंधु व अनुयायी,—हे सर्व सारखेच अविचारी व दुर्व्यसनी कां निघावे, याचें कारण सांगतां येत नाहीं. सद्वर्तनाचीं मुळें म्हणजे श्रेष्ठ मनोवृत्ति, त्यांचा शुद्ध इंग्रजी शिक्षणानें नाश होतो—हा दुष्परिणाम सुधारकांच्या व इतरांच्या, उभयतांच्याही तरुण मुलांवर हल्लीं सारखाच घडत आहे, असा माझा सिद्धांत आहे. याचा तुह्मी विचार करा. ही तुह्मांस अखेरची विनंति आहे."

# भाग ११ वा.

## सुधारक बहादरांनीं स्वतः सांगितलेला वृत्तांत.

४८. रामचंद्रपंतांचें व्याख्यान संपत येत असतां मी मनांतले मनांत अगदीं गर्भगळित होत चाललों होतों. ते जें बोलत होते तें कांहींसें मलाही लागू पडत होतें; व मी आपले मनांत एकामागून एक नवे नवे निश्चय करीत राहिलों होतों. माझी प्राप्ति बेताची, त्यामुळें मी मद्यप्राशनाच्या फारसा नादीं लागलों नव्हतों. रामचंद्रपंतांच्या चिरंजिवांइतकी संपत्ति मला असती तर मी त्यांप्रमाणेंच या व्यसनाच्या आधीन झालों असतों कीं काय कोण जाणे! या व्यसनांत माफकपणा राखण्याच्या कामीं पुष्कळ विद्वान् लोकांस त्यांचें दारिद्र्य साहाय्यकारी होतें. त्यामुळेंच, औषध ह्मणून जरूर पडल्यास किंवा मित्रांनीं आग्रह केल्यामुळें निरुपाय झाल्यास मद्यप्राशन करायाचें, नाहींतर करायाचें नाहीं असा माझा पूर्वींचा निश्चय होता; परंतु तेवढेंही माझ्या कुटुंबास आवडत नसे. याकरितां घरीं गेल्याबरोबर असल्या आपल्या आचरणानें पत्नीस कांहीं त्रास झाला कीं काय हें विचारण्याचा व हें मद्यप्राशन पुढें मुळींच सोडून देण्याचा माझा बेत ठरला. कुटुंबाकरितां एवढा स्वसुखत्याग केलाच पाहिजे असें मला वाटूं लागलें. माझ्या अंगची सुधारकी हळूहळू गळतच चालली होती व सुधारक मंडळींतून आपला पाय काढून घ्यावा असेंही मनांत येऊं लागलें होतें. हिंदुधर्माच्या गुणांचा स्वतंत्रपणें शोध करणें अवश्य आहे असेंही वाटूं लागलें होतें, परंतु त्याचे खरे ज्ञाते कोठें आहेत त्यांचा आधीं पत्ता लावला पाहिजे, ही मोठी अडचण भासली. असो. 'तुमच्या उपदेशानें माझे मनावर कांहीं नवाच प्रकाश पडला आहे व त्यास अनुसरून मी पुढें वर्तन ठेवीन,' असें रामचंद्रपंतांस आश्वासन देऊन व मनःपूर्वक आभार मानून मीं त्यांचा निरोप घेतला.

मी ओटीवरून खालीं उतरलों मात्र, तोंच त्यांच्या चिरंजिवांनीं माझ्या पाठीवर हात मारून, 'भले शाबास!' असें ह्मणून, गळ्यांत

हात घालून मला ते आपले दिवाणखान्यांत घेऊन गेले. तेथें जाऊन बसल्यावर, ' कांहो, तुह्मांस ह्मातान्यानें अगदीं घाबरें करून सोडलें ! ' हे त्यांचे पहिले उद्गार माझ्या कानीं पडले. ' हो, असें झालें खरें ' असें मीं उत्तर दिलें; तेव्हां, ' ह्मातारा तसा वस्ताद आहे, परंतु त्याचें बोलणें मनावर घेतां कामां नये, ' असा त्यांनीं मला उपदेश केला; व आपल्या पत्नीबद्दल बोलण्यास आरंभ केला.

" हें एक रत्न आमचे गळ्यांत बांधलें आहे असें एकूण ह्मातान्यास वाटतें आं ! तुह्मांस सांगूं ? माझे बायकोस बुद्धि ह्मणून बिलकुल नाहीं, व ती या धर्मवेड्यांच्या नादीं लागलेली आहे. नाहीं-तर, आज आठदहा महिन्यांत इंग्रजी दुसरे पुस्तकापर्यंतही तिचें शिकणें होऊं नये ? गळा चांगला असून अद्यापि एकही गाणें तालसुरावर ह्मणतां येऊं नये ? तालसुराचेंच ज्ञान नाहीं तर हार्मोनियम् काय वाजविणार ? बरें, आपल्यांत गुण नाहीं, बुद्धि नाहीं, तर गपचूप तर बसावें ? परंतु तेंही नाहीं. तुम्ही हें करितां हें वाईट, तें करतां तें वाईट, ह्मणून नित्य माझें डोकें उठवीत आहे. माझी खात्री आहे कीं हीच आमच्या दारूबाजीचा बाहेर बभ्रा करीत असावी. मला अलीकडे अलीकडे तिच्या कांधावाचा वीट येऊन गेला आहे. ती डोळ्यापुढें नसली तर बरी असें वाटतें. आतां निराळा बंगला घेऊन राहण्याचा माझा बेत ठरलाच आहे. एक दोन महिन्यांत बढतीची जागा मिळाली कीं मीं घर सोडलेंच समजा. मी या असल्या बायकोस त्या बंगल्यांत नेऊन काय करूं ? मी या घरांतून निघालों कीं त्याच दिवशीं तिची आमची काडीमोड झाली ह्मणून समजा. मग स्त्रीशिक्षणासंबंधी सुधारणांच्या खटपटींत सर्व आयुष्य घालवायाचें असा माझा निश्चय आहे. या सुधारणा आधीं झाल्या पाहिजेत, मग दुसऱ्या होवोत वा न होवोत. मला चांगली सुशिक्षित बायको असती तर अत्यानंदाच्या भरांत नित्य आह्मी नाचलों असतों; परंतु दुर्दैव म्हणून हिंदुस्थानांत जन्मून, त्यांत या असल्या वेडगळ कुटुंबांत येऊन पडलों. "

हें त्याचें बोलणें ऐकतांच मी अगदीं संतापून गेलों, व कांहीं खरमरीत उत्तर देणार इतक्यांत माझे मित्र आपल्या शयनगृहांत

जाऊन बाटली, दोन ग्लास, चिरूट, वगैरे सामान घेऊन आले. मींही त्या अवधींत आपला राग आवरून धरिला व या फटकळ माणसाशीं वादविवाद करण्यांत अर्थ नाहीं असें समजून लवकर घरांतून बाहेर पडण्याची संधी पाहूं लागलों. आमचे मित्रांनीं, माझा मद्य न पिण्याविषयींचा निश्चय पाहून, आश्चर्यपूर्वक आपणच दोन्ही ग्लास उडविले व पुन: संभाषणास सुरवात केली.

"आज तुम्ही आलां त्यामुळें मोरीयर साहेबाच्या येथें जाणें झालें नाहीं, नाहींतर हा विधि तेथें व्हावयाचा, असा नित्यचा क्रम आहे. मोरियरच्या बायकोच्या दोन बहिणी तेथें आहेत, त्या पाहण्यासारख्या आहेत. माझी बायको सुंदर आहे खरी, परंतु ती आपल्या शरीराची, मनाची किंवा पोषाखाची, कशाचीच काळजी घेत नाहीं, त्यामुळें तिच्या तोंडावर तेज नाहीं. मोरियरच्या मेव्हण्या अशा देखण्या नाहींत, परंतु त्यांचें बोलणें, चालणें, गाणें-बजावणें, पोषाख, डामडौल, उल्हासवृत्ति, वगैरे पाहिलीं म्हणजे मन गार होतें. हें सौख्य हिंदु कुटुंबांत आणिलें पाहिजे. मी नुकताच मुंबईस गेलों होतों तेव्हां तेथें प्रभूंच्या कांहीं मोठाल्या मुली इंग्रजी पोषाख केलेल्या पाहिल्या. छान दिसत होत्या! त्यावरून परत येतांच आपल्या बायकोसही एक असला इंग्रजी पोषाख करवावा म्हणून विचार करून मोरियरचे धाकटे मेव्हणीचे अंगावर तो बेतून तयार करविला. ती दिसण्यांत आमचे बायकोचे एवढीच आहे; व तिनें आपण होऊन कबूल केलें कीं तो पोषाख कसा पेहेरावा तें शिकविण्यास मी स्वत: येईन. त्याप्रमाणें एके दिवशीं दुपारीं मी तीस घेऊन आलों व बायकोस वर बोलावून सर्व हकीकत सांगितली. परंतु असला पोषाख मी प्राण गेला तरी घालणार नाहीं, ह्मणून जबाब देऊन ती बेधडक येथून निघून गेली. त्या पोषाखाचे पैसे मीं कर्ज काढून दिले होते, तेव्हां मला किती संताप आला असेल याची तुम्हीच कल्पना करा. मोरियरचे मेव्हणीनें मला उपदेश करून शांत केलें, व आठ दिवस वाट पहा, नीट समजूत घाला, वगैरे गोष्टी सांगून ती निघून गेली. त्या दिवशीं रात्रीं पुन: बायकोची गांठ पडली तेव्हां तीस मीं पुष्कळ उपदेश केला, परंतु

कांहीं केल्यानें ऐकेना तेव्हां अखेरीस कसें तोंड सोडलें व कसा हात चालविला, हें तुम्हांस कशास सांगूं ? एक दोन दिवस ती पुनः वर आली नाहीं. कारण, मीं सांगितलें होतें कीं मी जर तुला पाहीन तर याच पोषाखांत पाहीन, नाहींतर तुझें मला मुखावलोकन नको. पुढें तिसरें दिवशीं माडींत पाय टाकतांच मीं विचारिलें, 'मीं काय सांगितलें त्याची आठवण आहेना ?' तेव्हां ती म्हणाली 'रात्रीच्या वेळीं घटकाभर तुह्मी स्वतः तो पोषाख माझे अंगावर चढवा, त्या मडमीचा मला विटाळ नको.' 'विटाळ' हा शब्द उच्चारितांच माझ्या पायाची आग मस्तकास गेली, व मीं तीस तसेंच माघारें जिन्यांत लोटलें; व 'आणखी विचार कर' ह्मणून ओरडून सांगितलें. विटाळचंडाळाच्या निमित्तानें माझी आज्ञा मोडील इतकी ती वेडी नाहीं. परंतु तिचे मनांत कांहीं भलतीच कल्पना आली असावी असें मीं तेव्हांच ताडलें. त्या दिवसापासून वडलांनीं तीस माहेरीं पाठविलें आहे व तिचे शिक्षक येथें हेलपाटे घेऊन परत जात आहेत. अशीं हीं माझ्या प्रपंचांतील विघ्नें आहेत. मोरियरच्या मेव्हणीचें सौजन्य पाहून व आमच्या बायकोचा हट्ट व कुशंका पाहून ख्रिस्ती व हिंदु यांमधील आकाशपाताळा एवढें अंतर ध्यानांत येतें. मीं एकवेळ बायकोची चोळीपैठणी नेऊन मोरियरचे धाकटे मेव्हणीस नेसायास दिली; तिनें ती तावडतोब नेसून त्या सर्व दिवसभर फार गंमत केली. तिच्या सौजन्यासाठीं तिला तो तयार केलेला पोषाख नजर करायाचा असा आतां मीं बेत केला आहे.

"अहो, तुह्मी आमच्या मोरियरसाहेबाकडे एकदा चला हो. फार हुषार माणूस आहे. त्याशीं तुमचें घटकाभर बोलणें झाल्यास या ह्मातार्‍यापेक्षां शंभरपट तो तुह्मांस ज्ञान करून देईल."

या त्याच्या भाषणावरून हा मोरियर कोण आहे ह्मणून मीं विचारलें, तेव्हां मला कळलें कीं तो मोरु या नांवाचा पूर्वीं एक महाराचा मुलगा होता. लहानपणींच आईबाप वारल्यानें तो अनाथ झाला व त्याच्या आप्तांनीं कांहीं पैसे घेऊन त्यास पाद्र्यांचे स्वाधीन केलें. त्यांनीं त्यास ख्रिस्ती करून चांगलें शिक्षण दिलें व नौकरी लावून दिली. त्याचा पगार वाढत वाढत तीनशें रुपयेपर्यंत आला;

परंतु तेवढा त्यास पुरत नसल्यानें त्यास बढती मिळण्याचा संभव होता, व त्याबराबरच आमच्या मित्राचीही आफिसांत एक पायरी चढून पगार वाढणार होता. अशा माणसाची गांठ पडल्यास ख्रिस्ती होण्याचे फायदे त्याकडून समजावून घेतां येतील असें मला वाटलें व त्याची भेट झाल्यास आपणास आनंदच होईल असें मी ह्मणालों. माझे मित्रास या माझ्या अनुकूलतेनें पुष्कळ समाधान वाटलें; कारण त्याची खात्री होती कीं वडलांनीं जेवढ्या गोष्टी सांगितल्या तेवढ्या मोरियरशीं संभाषण झाल्यानें मी विसरून जाईन, व सुधारणेच्या संबंधानें माझे पूर्वींचे विचार कायम राहतील एवढेंच नव्हे, तर ते विशेष प्रज्वलित होतील.

४९. हें इतकें बोलणें झाल्यावर मी घरीं आलों. रामचंद्रपंतांच्या बोलण्याची मला आठवण होऊं लागली. घरीं जाण्यास बराच उशीर झाला होता, तथापि बायको उपाशींच माझी वाट पहात बसली होती. माझी सक्त ताकीद असे कीं माझी वाट पाहूं नये, व त्याप्रमाणेंच घडत असेल असें समजून मीं विशेषशी कधीं चौकशी केली नाहीं. आज रामचंद्रपंतांचे प्रेरणेमुळें मी चौकशी करूं लागलों, तों आमच्या बायकोनें आमचे आधीं कधींच अन्नग्रहण केलें नाहीं हें मला समजून आलें. जेवण झाल्यावर एकांतांत संभाषण करीत असतां रामचंद्रपंतांच्या सुनेप्रमाणेंच आमच्या बायकोसही आमच्या दुर्वर्तनापासून दुःख होत आलें आहे, हें प्रथम समजलें. बायकोस हृद्रोगांत ठेवावें कीं आपण सुधारणेचा पंथ सोडून द्यावा, हा विचार आतां प्रबळ झाला. माझे आईबाप जिवंत असते, तर बायकोशिवाय त्यांच्याही दुःखांचा विचार करणें भाग होतें. बरें, मुलेंही मोठीं होत चाललीं होतीं, त्यांस पुढें कोणत्या प्रकारें शिक्षण द्यायाचें हा विचार आतां जागृत झाला. माझें मलाच आश्चर्य वाटूं लागलें. कारण मी जोंवर विद्येच्या व सुधारणेच्या संबंधानें इतर सुधारकांचें अनुकरण करीत होतों, तोंपर्यंत आपल्या स्वतःचे कुटुंबासंबंधानें विचारच करण्याचें कारण नाहीं असें मला वाटत असे. मुलें इंग्रजी शाळेंत पाठवायाचीं; घरांतील खर्चाकरितां बायकोच्या अंगावर इतके पैसे टाकून द्यायाचे, व आपण आप-

ला धंदा व मंडळीं यांत गर्क असायाचें, अशी माझी स्थिति होती. बायकोचे अंगीं सैंपाकाचा व मुलें संभाळण्याचा, यांशिवाय तिसरा गुण नाहीं व नवीन येणार नाहीं असें जाणून मी तिशीं फारसें बोलतही नसे. ही एक वरिष्ठ प्रतीची दाई किंवा नौकर आहे, इला अन्नवस्त्र देऊन संभाळलें ह्मणजे झालें, असें मी समजत होतों. इच्या मनांत कांहीं श्रेष्ठ विचार आहेत व त्यांमुळें ( केवळ अन्नवस्त्राकरितां नव्हे ) इचें अंत:करण मजकरितां तळमळतें, माझ्या वर्तनावर इची दृष्टि सदोदित असते व तें बरें किंवा वाईट हें ठरवून ईस हर्ष किंवा खेद होतो, इत्यादि गोष्टी माझे ध्यानींमनींही नव्हत्या. इंग्रज लोक ज्या गोष्टीस **प्रेम** ह्मणतात, तें आपल्या हिंदूंच्या वैवाहिक स्थितींत शक्य नाहीं, तें **सुधारणे**नें शक्य करायाचें, असा माझा ग्रह होता. परंतु तो या रात्रीं डोक्यांतून निघून गेला. प्रेमाचा पुरावा प्रेमकृत्यें होत, व तीं हिंदु स्त्रिया हरएक प्रकारें करीत आहेत हें माझ्या लक्षांत येत चाललें. रामचंद्रपंतांचें तें बोलणें व बायकोच्या अंत:करणाची ती साक्ष यांचा मेळ पडत चालला; व माझे विचार बदलत चालले. त्या दिवशीं खऱ्या प्रेमानें मीं तीस प्रथम आलिंगन दिलें व तीस पसंत पडेल असें पुढें वर्तन ठेवण्याविषयीं मन:पूर्वक अभिवचन दिलें. त्यामुळें तिला परम हर्ष झाला; मनावरील दडपण एकदम दूर झाल्यासारखें वाटलें; गालांवर लाली चढली; डोळ्यांत आनंदाश्रु येऊन ते तेजस्वी दिसूं लागले. या सर्व प्रकारांवरून माझी खात्री झाली कीं, जन्मापासून कष्ट सोसतां सोसतां, जन्मभर गुप्तपणें काळजी वाहतां वाहतां त्या रात्रीं पतिभक्तीचें सार्थक्य झालें असें तीस वाटलें. ' अविचारी तरुण मंडळींनो! तुह्मी निवळ दुर्लक्षामुळें किती कोमल हृदयें वायाळ करीत आहां ! ' असा उद्गार सहजगत्या त्या प्रसंगीं माझ्या तोंडांतून निघाला.

कारण, आपलीं अंत:करणें एकजीव करून आह्मी उभयतां त्या रात्रीं पुष्कळ वेळ बोलत राहिलों. आपलें दु:ख गिळून कर्तव्य तें करीत राहण्याचें केवढें सामर्थ्य स्त्रीहृदयांत आहे त्याची मला पूर्वी कल्पना नव्हती. मला वाटत होतें कीं स्त्रीच्या हृदयास व्रण पाडण्यासारखें माझ्या हातून तरी जन्मांत कांहींएक घडलें नसावें. तिशीं

हितगुजाच्या गोष्टी बोलत वसणें मला आवडत नसे हें खरें. परंतु तिशीं काय बोलायाचें ? ती विद्वान् असती तर गोष्ट निराळी होती. मला वाटे आपला विचाराचा धंदा, बुद्धि हें आपलें हत्यार; तें जर स्त्रीस चालवितां येत असेल तर तिशीं बोलण्यांत फायदा; नाहींतर वायफळ बोलावें काय आणि ऐकावें काय? परंतु स्त्रीहृदयाशीं एकीकरण होण्याचा मात्र अवकाश, तों पवींची समजूत नाहींशी झाली, व अवलोकनास, विचारास आणि वर्तनाच्या नियमनास स्त्रियांकडूनही मदत होते असें स्पष्ट दिसूं लागलें. त्या तशा यथाजात निर्विद्य स्त्रीहृदयापासूनच मानवी अंतःकरणांत मनोवृत्तींचा कसा खेळ चालत असतो हें शिकलें पाहिजे. कुटुंबांतील किंवा समाजांतील सुखदुःखांची अटकळ मोठ्या बुद्धिमान् पुरुषासही हा खेळ पाहिल्यावांचून यावयाची नाहीं.

५०. प्रेमाच्या पूर्ण भरांत देखील आपलें हृद्गत पुरुषांस सांगण्याचें संभावित हिंदु स्त्रियांच्या किती जिवावर येतें ! त्यांस वाटतें आपल्या मनांतील भय, आशा, शंका, विवंचना पुरुषांस समजल्या तर त्यांस दुःख होईल; न जाणो त्यांस आपला तिटकारा येईल; तेव्हां आपले विचार जागच्या जागीं दाबून टाकावे; आपल्या मनांत कांहीं विचार आहेत हें पुरुषांस कळूनच देऊं नये. तारुण्याच्या सबंध काळांत याप्रमाणें त्यांचा प्रयत्न असतो; प्रौढपणीं मात्र तो कमी होऊं लागतो. ओठापर्यंत आलेले विचार त्या पुनः पुनः गिळून जातात; ते त्यांच्या तोंडून बाहेर पाडण्यास पुरुषास किती यत्न, किती हट्ट, किती विनवणी करावी लागते ! स्त्रीच्या अगाध हृदयाचा अशा महाप्रयासानें मीं जेव्हां ठाव काढला तेव्हां मला एक अकल्पित दुःखाची कहाणी कळली व मी चकित झालों.

" पुरुषापेक्षां वायकोचें रूप चांगलें असावें; निदान रूपानें दोघांचा जोडा सारखा असावा, ह्मणजे तो शोभतो. परंतु पुरुष तुमच्यासारखा देखणा व चतुर आणि बायको माझ्यासारखी साधी भोळी, हें शोभत नाहीं. मी लहान होतें तेव्हां मैत्रिणींनीं ह्मणावें, ' मनीचा नवरा कसा चांगला सुस्वरूप आहे हो ! ' ते त्यांचे शब्द ऐकून अल्लडपणामुळें मला केवढा तरी हर्ष वाटावा ! दुसऱ्या मुलींचे

नवरे असे सुस्वरूप नाहींत ह्मणून मनांतल्या मनांत मला त्यांची दया देखील यावी; पण ती कोणाशीं बोलायची गोष्ट नव्हे........परंतु मी वयांत येऊं लागण्यास व सासूबाई आटपण्यास एकच गांठ पडली. तुमचा तो कॉलेजचा अभ्यास चालला होता. एखादी गाय गोठ्यांतून सोडून दूर रानांत नेऊन सोडून द्यावी, त्याप्रमाणें तुह्मीं माझी दूरदेशीं माहेरीं रवानगी करून दिलीत. पुढें दोन वर्षे खुशालीचें पत्र नाहीं, पत्राचें उत्तर देखील नाहीं. मग कोणी दक्षिणेंतून आल्यागेल्याबराबर समाचार कळायाचा. बाबांस पाहिजे त्यानें वाटेल तें येऊन सांगावें. कॉलेजांतील लोक असें करितात, तसें करितात; त्यांस देव ना धर्म, मूर्ख बेटे उन्मत्त झाले आहेत, असें त्यांनीं ह्मणावें; व तें बाबांस खरें वाटून त्यांनीं त्याची चिकित्सा करीत बसावें. ती ऐकून माझें काळीज चरारे. माझा जीव सगळा इकडे तुह्मांकडे लागलेला, मला चैन पडेनासें झालें. आईस देखील काळजी लागून तिनें भलतेच प्रश्न मला विचारावे. एके दिवशीं या अशा स्थितींत जिवास डाग द्यावा त्याप्रमाणें माझ्या डोक्यांत एक कल्पना शिरली. ‘ नाहीं आपल्याला उत्तम स्वरूप, नाहीं चांगलें शहाणपण. कशाला ते आपली पर्वा करतील ! त्यांस वाटत असेल ही गांवढळांची पोर आपल्याला शोभत नाहीं; कशाला आईबापांनीं गळ्यांत हें लोढणें बांधलें ! ह्मणूनच आपली कोणी चौकशी करीत नाहीं; सगळी हेळसांड चालली आहे. आपलें नशीबच फुटकें. आतां त्यांचें लक्ष कोणाकडे लागलें असेल, त्यांच्या मनांत काय विचार असतील, देवास माहीत ! ’ या अशा कुशंका फिरफिरून मनांत येऊन जीव पोळल्यासारखा होई. रात्रंदिवस जिवाची तळमळ. एकटें बसलें असलें म्हणजे दुसरा विचारच नाहीं; व मग डोळ्यांतून पाणी गळूं लागे. आईनें एखादे वेळीं रागावून म्हणावें ‘ दूरदेशीं पोरीला दिल्याचें हें फळ बरें, ’ तेव्हां बाबांनीं तीस तसेंच कांहीं उत्तर द्यावें. त्यांनीं म्हणावें, ‘ जिचें नशीब तिच्याबराबर; आह्मीं आपल्याकडून जातकुळी, सासूसासरा, पैसा, विद्या, सर्व कांहीं पाहिलें; परंतु पुढें जांवई कसा निघतो याचें कोणास आधीं स्वप्न पडत असतें काय ! ही इंग्रजी विद्या दक्षिणेंत जिकडे तिकडे माजली आहेना ! तिचा

हा परिणाम. कोणी कोणास विचारीत नाहीं; प्रत्यक्ष आईबापांची कोणी मुरवत बाळगीत नाहीं. यास काय करावयाचें ?' त्यांचें हें अशा प्रकारचें बोलणें जेव्हां माझ्या कानीं पडे तेव्हां आपली पुढें धडगत नाहीं, अशी माझी खात्री होई व जीव नकोसा होई. ........ परंतु ते दिवस गेले; त्या पूर्वींच्या शंका मनांतल्या मनांत जिरून गेल्या. मुलेंबाळें झालीं. आतां जिवावरचा भार उतरला असें वाटत आहे. आज हा असा बोलण्याचा प्रसंग कशानें आला कोण जाणे !

"हे जे सुखाचे दिवस बायकांस मोठेपणीं येतात, त्यांकरितां तरुणपणीं एक अवघड तपश्चर्याच त्यांस करावी लागते. नवरा रूपवान्, चतुर, बोलका, हौशी असा असावा, ह्मणजे त्यास स्वाधीन ठेवायाचें बायकोस फारच कठिण होतें व तिला पुरतेपणीं समाधान कधींही नसायाचें. तीस उत्तम स्वरूप असलें तर एकवेळ गोष्ट निराळी; पुरुष आपण होऊनच तीस जपूं लागतो. पण तें किती दिवस ? वयानें, रोगराईनें, हजार वाटेनें, रूप हळूहळू नाहींसें होत जातें. तें फिक्कें पडलें ह्मणजे पुढें काय ?........जीस रूप नाहीं तिची तर फारच फजिती. लहानपणीं कांहीं कळत नसतें तेव्हां नवऱ्याचें स्वरूप, बळ, डौल, छानछुकी पाहून मनांत किती तरी कौतुक वाटत असतें ! तरुणपणीं त्याचें दुःख कळतें. पुरुषांस मोह पाडण्यास किती उशीर? व मोह पाडणाऱ्या दुष्ट बायका काय कमी असतात? ह्मणून नवरा घरांतून बाहेर गेला कीं बायकोच्या चिंतेस सुरवात होते. तो दूर कोठें जाऊन राहिला तर घरांत तिला हृद्रोग लागतो. घरांत राहून पुरुषावर बायकोनें नजर तरी कशी ठेवावी? पुरुष बाहेर गेल्यावर काय करितात हें तीस कसें कळावें? तेव्हां तो काय बोलतो, काय करितो, कोणीकडे पहातो, कोणाच्या संगतींत आहे, उगीचच रागावतो कीं काय,—या सर्व गोष्टींकडे तिचें सारखें लक्ष असतें. एक एका शब्दावरून ती तर्क बांधते; अनेक शंका घेऊन त्यांचा पडताळा पहात असते. परंतु सारे तर्क व साऱ्या शंका मनांतल्या मनांत त्या प्रत्यक्ष आईस देखील कळायाच्या नाहींत; पुरुषास त्या कोणी तरी सांगेल काय !.........

"मनांत या अशा शंका, (पाहिजे तर कुशंका ह्मणा, पण त्या वा-

रंवार खऱ्या होतातनां?) दुसरी तशीच भीति, तिसरी काळजी, आपली रूपाची किंवा गुणांची उणीव भरून काढायाची. या सर्वांनीं मिळून जिवास समाधान ह्मणून नसायाचें. पण बाहेरून सर्व निराळें. जिवापाड मेहनत करून, प्रकृतीचे कितीही हाल झाले तरी चुप्प राहून, कांहीं झालें तरी नवऱ्याचें मन मोडायाचें नाहीं असा निग्रह करून, अक्षयीं कसला प्रयत्न करायाचा ? हाच कीं त्याची सर्व मर्जी आपणांकडे ओढून घ्यायाची. परंतु कांहीं केलें तरी जिवाची खात्री म्हणून नसायाची. केव्हां काय घडेल, कोठें काय चुकेल, कशानें राग येईल, या विवंचनेखालीं नित्य मरावें! नवऱ्याची मर्जी आहे तोंवर एकदोन मुलें झालीं ह्मणजे सुटली बापडी. मग तीस समाधान वाटूं लागतें. मुलांकडे चित्त लागल्यावर, त्यांच्या काळजीखालीं त्या पहिल्या शंका, विवंचना, भय, मत्सर, वगैरे सर्वांचा विसर पडत जातो; व पुरुषाची मर्जी राखण्याची पहिल्यासारखी आंच राहत नाहीं. मुलगा झाल्यावर, प्रेमाची गांठ मुळींच सुटून जाईल असें फार करून घडत नाहीं. मुलगी झाली तर मात्र गोष्ट निराळी. कशाला कार्टी जन्मास आली असें बायकांस देखील वाटतें. मुलगी व्हावी ही हौस असते खरी, परंतु आरंभीं ती मनांतून पार घालवून द्यावी लागते. तरुणपणची अत्यंत दुःखाची तपश्चर्या आपल्याप्रमाणें पोरीच्या मागें लागायाची, हें बायकांस माहीत असतेंच. दुसरें असें कीं मुली झाल्यानें पुरुषाच्या मागची काळजी वाढते; त्यास पहिल्या दिवसापासून राग येतो, व त्याची मर्जी जाईल कीं काय अशी भिती असते. तेव्हां नको ती मुलगी असें बायकांस वाटतें. नवऱ्याच्या प्रेमाबद्दल सर्व शंका नाहींशी झाली, ह्मणजे मग जिवास जीव देणारी मुलगी हवी ह्मणून आह्मांस वाटूं लागते; पण ती शंका जोंवर आहे तोंवर मुलगे व्हावे ह्मणून आमचें मन तळमळतें. ”

याप्रमाणें सारांशानें तिनें आपलें हृद्गत मला सांगितलें. त्यावरून जें तत्त्व माझ्या लक्षांत आलें तें असें—**विवाहाचा संबंधच** असा आहे कीं त्यांत पुरुषाकडून, कळून किंवा न कळून, आळसानें, उपेक्षेनें किंवा उन्मादानें, वारंवार स्त्रीचे अपराध व्हावयाचेच. या अपराधांबद्दल स्त्रीस सूड उगवतां येत नाहीं, प्रतिकार करितां येत

नाहीं, शासन देतां येत नाहीं. तेव्हां आपलें दुःख गिळून जावें; होतांहोईल तों पुरुषाची मर्जी धरून त्याकडून अपराध होऊं नयेत अशीच तजवीज राखावी, याशिवाय दुसरा स्त्रीस सुखी होण्याचा मार्ग नाहीं. जे कांहीं असतील त्यांचा कोणी सुशील संभावित सुवासिनी स्त्री विचार देखील करायाची नाहीं. सद्गुणी स्त्रियांचें दुःख व पारतंत्र्य या अशा विवाहसंबंधामुळें उत्पन्न होतें. त्या दुःखाचें सुख करण्यास, त्या पारतंत्र्यांतून स्वातंत्र्य कमावण्यास पुरुषाची मनधरणी करणें हाच उत्तमांत उत्तम उपाय आहे. विवाहसंबंधच सोडून देणें किंवा हा उत्तम उपाय न योजणें, ह्मणजे कांहीं उत्कृष्ट मनोवृत्तींचें सुख गमावणें होय; ह्मणजे, स्वतःची अधिकच हानि करून घेणें होय. तेव्हां वरील उत्तम उपायच स्त्रिया योजीत असतात. हें जाणून समंजस पुरुषांनीं त्यांस साह्यकारी व्हावें, त्यांस त्वरित वश व्हावें, कदापि त्यांस निराश करूं नये. तात्पर्य हें कीं, स्त्री वयानें व मनानें समजूतदार झाल्यावर तिची हेळसांड करणें, तिशीं तुटसपणें वागणें, तिशीं सुख-दुःखाच्या गोष्टी न सांगणें, तिचा आपणांवर कांहीं अधिकार आहे असें न दाखविणें, व तीस आपल्या अचळ प्रेमाची खात्री करून न देणें, हे सर्व पुरुषानें अपराधच समजले पाहिजेत. ज्याचें वर्तन स्वतःच्या बायकोस समाधानकारक वाटेल, तो पुरुष प्रापंचिक नीतीपासून कदापि ढळणार नाहीं, असा सिद्धांत काढण्यास हरकत नाहीं.

सौंदर्याचें महत्त्व पूर्वीं माझ्या कधींच ध्यानांत आलेलें नव्हतें. मीं त्याचा विचारच केलेला नव्हता. मी शुद्ध बुद्धीचा भक्त होतों. सृष्टीचें सौंदर्य पाहून माझ्या मनाचा ओघ तत्त्वज्ञानाकडे वाहूं लागे, व मग मला आनंद होई. गायन, वादन, चित्रकला वगैरे ललित कलांमध्यें मला फारसें गम्य नव्हतें; कवितेंतही अर्थाशीं तात्पर्य, सहृदयता नव्हती. हा माझ्या शिक्षणांत मोठा ढोवळ दोष राहिला असें आतां मला वाटूं लागलें. मनोवृत्ति जागृत होऊन आनंद होण्यास काव्य आणि कला यांची अभिरुचि अवश्य आहे. ती नसल्यामुळें, मीं स्वतःच्या कपड्या लत्त्यांचा फारसा विचार केला नाहीं; दुसऱ्यांच्या पोषाखांकडे लक्ष दिलें नाहीं; घरांत व्यवस्था आहे कीं

अव्यवस्था आहे, हा विचार मनांत बहुधा येत नसे; व घर सुंदर शोभिवंत करण्याचें माझ्या डोक्यांत मुळींच येण्यासारखें नव्हतें. आपणांस कोणी सुंदर समजून भुलून जाईल ही शंका माझ्या मनांत कधींच आली नव्हती; व आपल्या पत्नीचें रूप दुसऱ्या स्त्रियांशीं ताडून पाहण्याचें माझ्या स्वप्नींही नव्हतें. सौंदर्यांत काय आहे? बुद्धि पाहिजे, विचार पाहिजेत, अशी माझी समजूत होती. तीमुळें मला अंधत्व आलें, व त्यानें केवढा हा अनर्थ झाला ? पत्नीस किती तरी व्यर्थ दुःख सोसावें लागलें ? विद्यादानांत असल्या मोठ्या उणीवी राहिल्यानें विचार एकपक्षीय होतात यांत बिलकुल शंका नाहीं. दुःखाच्या मोठमोठ्या राशि समोर असून त्या मुळींच दिसत नाहींत; तशाच पण सुखाच्याही राशि समजण्यांत येत नाहींत. व आपण शुद्ध बुद्धीचे उत्कृष्ट भक्त असतां लोकांस कां तसे दिसत नाहीं, असें मनांत येऊन आश्चर्य मात्र वाटतें. बुद्धिशिक्षण हें एकपक्षीय शिक्षण होय, ही गोष्ट आतां माझ्या मनांत पक्की भरली, व सर्व बाजूंनीं मनास पूर्णता कशी आणावी या विचारांत मी पडलों. तशांतच मला झोंपेनें घेरलें.

---

## भाग १२ वा.

### एका नेटिव्ह ख्रिस्ती गृहस्थाचा मला उपदेश.

५१. यानंतर जो पहिला आदितवार आला त्या दिवशीं आमचा व आमच्या मित्राचा मोरियरसाहेबांस भेटायास जाण्याचा संकेत ठरला. मोरियरसाहेबांस माझ्याविषयीं त्यानें आधीं सर्व हकीकत सांगितली होती, असें मला प्रथम भेट होतांच दिसून आलें. आमचें संभाषण बराच वेळ चाललें होतें, तें सर्व इत्थंभूत सांगण्यांत अर्थ नाहीं. मला ज्या मुद्यांचा विशेष खुलासा करून घ्यावयाचा होता त्यांसंबंधानें मोरियरचे अभिप्राय तात्पर्यानें येथें सांगतों. मोरियर मनुष्य फार हुषार दिसला व बाह्यात्कारी तरी तो फार सभ्य व सज्जन असावा असें त्याच्या संभाषणाच्या पद्धतीवरून दिसलें.

संभाषण इंग्रजींत झालें, त्याचा सर्व थाट मराठींत उठविण्याचें कठीण आहे.

" विद्याधरपंत, तुमच्या भेटीनें मला फारच आनंद झाला आहे, व मी निःसंशय सांगतों कीं माझ्या प्रियतमेस व माझ्या मेव्हण्यांसही तसाच आनंद झालेला आहे. तुह्मां नेटिव्हांची व आमची स्नेहभावानें फारच थोडे वेळां गांठ पडते, त्यामुळें तुमचे विचार आह्मांस व आमचे तुह्मांस कळत नाहींत. तुह्मीं आह्मांकडे वरचेवर यावें अशी आमची पुष्कळ इच्छा असते, परंतु तशी तुह्मां लोकांत कां उत्पन्न होत नाहीं हें मला कळत नाहीं. "

" मि. मोरियर, खरें पाहिलें असतां या लेडीज्च्या व तुमच्या दर्शनानें मला विशेष आनंद वाटत आहे. माझा उद्देश आपणांकडून माहिती मिळविण्याचा आहे, तेव्हां मला भीति वाटते कीं या थोर लेडीज् कंटाळून जातील. त्यांची परवानगी असेल तर मी आपले प्रश्न विचारतों, नाहीं तर दुसरे एखादे प्रसंगीं मी तुमची गांठ घेईन. "

" छेः छेः, तुमचे प्रश्नांत या लेडींसही गंमत वाटेल अशी माझी खात्री आहे; व माझें मठ्ठ डोकें वेळेस अडलें, तर या सुशिक्षित स्त्रिया माझ्या मदतीस येऊन तुमच्या शंकांचें निवारण करितील. त्यांच्या देखतच संभाषण झालें पाहिजे. "

" मी हल्लीं जो विचार करितों आहें तो हा कीं आह्मीं सुधारकांनीं स्वतः ख्रिस्ती होऊन आपले बांधवांसही ख्रिस्ती होण्याचा उपदेश करावा कीं नाहीं. "

" विद्याधरपंत, छेः छेः या भानगडींत तुह्मी पडूं नका. मी ख्रिश्चन् या नात्यानें तुह्मांस असें सांगणें ठीक नाहीं; तथापि शुद्ध गृहस्थ या नात्यानें मला खरें तें सांगितलें पाहिजे. मी इतका धर्मवेडा नाहीं.

या वेळीं मोरियरची धाकटी मेव्हणी ह्मणाली, " काडीमात्र नाहीं, आह्मीं याचें नांव पेगन ( pagan ) ठेविलें आहे. लग्न झा-

त्यापासून यानें चर्चमध्यें पाऊल ठेविलें नाहीं. आह्मां सर्व बहिणींस दुसऱ्या कोणाच्या तरी संगतीनें चर्चला जावें लागतें. "

" माझ्या ह्मणण्याचें तुह्मी कारण विचाराल. हीं कारणें अनेक आहेत. मी ख्रिश्चन् झाल्यास आतां पुष्कळ वर्षे झालीं, त्यामुळें मी नौकरीमध्यें एवढ्या मोठ्या जागेस येऊन पोहोंचलों आहे. परंतु अलीकडे ख्रिश्चन् झालें तरी एतद्देशीयांस चांगल्या पगाराच्या जागा मिळणें कठीण पडूं लागलें आहे; व त्यामुळें त्यांची दुर्दशा होत आहे. या ख्रिश्चन् लोकसंख्येस तुह्मी आणखी भर पाडूं लागाल तर आमच्या ज्ञातीचें केवढें नुकसान होईल त्याची तुह्मीच कल्पना करा. आह्मांस आधींच तीन गोष्टी प्रतिकूळ आहेत—ह्मणजे अस्सल युरोपियन्चा रंग नाहीं, आमचे कैवारी इंग्लंडांत नाहींत व आमच्या ज्ञातींत धनाढ्य लोक नाहींत. यामुळें युरोपियन् अधिकारी आह्मांस मान देत नाहींत, आमच्याबरोबर रोटी किंवा बेटी व्यवहार करीत नाहींत, व आह्मांस हलक्या जातीचे समजतात. खानेसुमारीच्या रिपोर्टांत एकाच पंथाच्या ख्रिस्त्यांच्या रंगवारीनें जाती दाखविलेल्या असतात हें तुह्मीं पाहिलेंच असेल. या अन्यायाबद्दल आह्मी नित्य मनांत चरफडत आहों. परंतु उपयोग काय ! तुह्मांपेक्षां आह्मी युरोपियनांस थोडे जवळ, कारण आमची संख्या थोडी; जर ती वाढली तर आह्मांसही कोणी विचारणार नाहीं. ख्रिश्चन् असूनही ख्रिश्चन् राज्यकर्त्यांची मर्जी राखण्याकरितां आह्मांस आपल्या वर्तनांत व मतांत त्यांचें निवळ अनुकरण करावें लागतें, व तें आह्मी सहजगत्या कसें बिनचुक करितों याचें मलाच आश्चर्य वाटतें. मला वाटतें मनुष्याच्या मतांवर पोषाखाचा पुष्कळ परिणाम आहे. पार्शी लोक अलीकडे युरोपियन् पोषाख करूं लागले आहेत, त्यांस रंगाचीही बरीच अनुकूलता आहे, त्यामुळें ते युरोपियनाप्रमाणें वागण्यांत व बोलण्यांत आह्मांसही मागें टाकतात. तुह्मी नेटिव्हही हल्लीं केंस वगैरे ठेवून आमच्या सारखे पोषाख करूं लागलां आहां. या पोषाखांत तुह्मी असतां तेव्हां तुह्मांतही नवा स्पिरिट (आवेश) येतो. तुह्मी धोतर नेसून जोडा घालून ज्या दुसऱ्या नेटिव्हास शिवीगाळी करणार नाहीं, त्यास

बूट पाटलोण घातल्यावर तुह्मी बुटाच्या लाथा मारण्यास तयार व्हाल! असा हा युरोपियन् पोषाखाचा गुण आहे!

"नेटिव्हांचा व पारशांचा मला जो फार राग येतो—त्यांचा जो मी द्वेष करितों—त्याचें मुख्य कारण तुह्मी पोषाखांत आमचें अनुकरण करितां हें होय. अलीकडे अमुक माणूस पार्शी कीं युरोपियन् हें पुष्कळांस ओळखूं येत नाहीं. नेटिव्ह हिंदु कीं युरेजन् हें देखील पुष्कळांस ओळखूं येत नाहीं. कारण, तुह्मीं आह्मांसारखे केंस ठेवले व टोपी घातली कीं लोक फसण्यास आरंभ झालाच. यामुळें रेलवे-मधून प्रवास करितांना आमचे विशेष हक्क तुह्मी वारंवार उपटतां. मग आह्मांस कां राग येणार नाहीं? युरेजन् नसून युरेजन् दिसणें इतकें सोपें आहे कीं हिंदुस्थानांतल्या कोणाही मनुष्यास तें साधेल. त्या-मुळें व्यवहारांत आमच्या विशेष हक्कांस धक्का येतो. मला वाटतें सर-कारनें या पोषाखाच्या कामीं कांहीं कायदा केला पाहिजे.

"ख्रिश्चन् असून युरोपियन् इतका आह्मांस मान नाहीं, हा एक अन्याय झाला; परंतु युरोपियन् सारख्या मोठ्या प्राप्तीच्या जागा मिळत नाहींत हा मी त्याहून मोठा अन्याय समजतों. कारण, ख्रिश्चन्च्या योग्यतेनें राहण्यास आह्मांस व आमच्या स्त्रियांस अल-बत युरोपियन् सारखे पोषाख केले पाहिजेत; राहण्यास बंगले पा-हिजेत; नौकर, गाडीघोडे, दाया, सामानसुमान वगैरे सर्व गोष्टी पाहिजेत. या अशा थाटास पैसा किती लागतो त्याची तुह्मांस कल्पना आहे काय? या खर्चामुळें आमच्यांतील मोठमोठे हुद्देदार कर्जबाजारी झाले आहेत; तुमच्या शेतकऱ्यांप्रमाणें आम-च्याहीमागें मारवाडी लागला आहे; माझ्या मतें मारवाड्याचे कागद-पत्र दर तीन वर्षांस जाळून टाकण्याचा किंवा रद्द करण्याचा कायदा असला तर बरा!

या आमच्या आवश्यक खर्चामुळें आह्मांस आपलीं मुलें विलाय-तेस पाठवितां येत नाहींत, तीं अज्ञान राहतात, व कोठें तरी सा-मान्य नौकरीवर जातात. त्यांस पुनः ही खर्चाची अडचण येते, त्यामुळें तींही कर्जबाजारी होतात; व कोणाचेही कुटुंबांस वर मान काढण्यास, विलायतेंत जाऊन राहण्यास, व युरोपियन् होण्यास

संधीच मिळत नाहीं. मला वाटतें आमच्या वर्गाकडे सरकारचें जेवढें दुर्लक्ष आहे, आह्मांस जितक्या अन्यायानें सरकार वागवीत आहे, तितका अन्याय तुह्मां नेटिव्हासंबंधानें सरकार करीत नाहीं. तुमच्या खर्चाच्या मानानें तुह्मांस फाजील पगार मिळतो असें मला वाटतें. कारण युरोपियन्च्या बरोबरीचे होण्याची तुह्मांस शक्यताच नाहीं; व आह्मांस ती असून केवळ कमी प्राप्तीमुळें आह्मी खालीं दडपले जात आहों.

" जो मनुष्य ख्रिश्चन् असून नेटिव्हांसारखा पोषाख करितो, त्यास मी ख्रिश्चन् समजतच नाहीं. मी ख्रिश्चन् झालों तेव्हांचे मिशनरी अधिक समंजस होते; त्यांनीं मला जितकी विद्या दिली, माझ्या पोषाखाची व नौकरीची जितकी काळजी घेतली तितकी अलीकडील मिशनरी आपल्या कळपाची घेत नाहींत. ख्रिश्चन् व्हा आणि धोतरें लुगडीं नेसा! वाहवारे न्याय! आमच्या ज्ञातींत ज्यांचे पगार बेताचे आहेत, ते स्वतः युरोपियन् पोषाख करितात, परंतु घरीं बायकांस साड्या नेसाव्या लागतात, व त्यांचें नांव न्याशनल ड्रेस! ज्याचे अंगीं ख्रिश्चन्पणा आहे त्यास ही स्थिति पाहून असमाधान वाटणार नाहीं काय? अलीकडील मिशनरींनीं आमची योग्यता कमी करण्याचा, ह्मणजे नेटिव्ह ख्रिश्चनांची संख्या वाढविण्याचा हल्लीं जो मार्ग काढिला आहे, त्यानें तर आमचें भविष्य आह्मांस फारच खडतर दिसूं लागलें आहे. ख्रिस्ती आर्फनेजमध्यें मुलें कोठून येतात त्याची तुह्मांस माहिती असेलच. या आर्फनेजांतून आमच्या वर्गास पुष्कळशी भर पडत आहे. आह्मी जे शुद्ध जातीचे सदुपदेशानें ख्रिश्चन् झालेले, त्यांस ही भरती कशी काय वाटते तें कशास सांगावें?

" बरें, पुढें असल्या गरीब ख्रिश्चन् गृहस्थांस धंदे तरी कोणते उरले आहेत? शिंप्याचा, सुताराचा, फिटरचा, सैंपाक्याचा, हाटेलवाल्याचा, क्षुद्र क्लार्कीचा—ह्मणजे सर्व हलकट धंदे; लोकांपुढें उभे राहण्याचे; रेलवेच्या स्टेशनावर असल्याच कामांवर पुष्कळ लोक पोट भरीत आहेत. भिकारी नेटिव्हांनीं ' साहेब, साहेब ' ह्मणावें एवढा हक्क आला, ह्मणून आमची योग्यता हिंदुस्था-

नांत वाढली काय ? आमच्या बायका जेव्हां लेडीज्‌मध्यें गणिल्या जातील, तेव्हां आमची योग्यता वाढली खरी. साड्या नेसून ही गोष्ट शक्य नाहीं; बराकींत राहून युरोपियन् लहंगा घातला तरी ही गोष्ट शक्य नाहीं. सर्व थाट सारखा जमून येईल तेव्हां ती शक्य आहे, तोंपर्यंत आमचें असमाधान कमी होणार नाहीं.

" तुह्मी असें समजतां काय कीं ख्रिश्चन् झाल्यानें दंडांत अधिक जोर येतो ? हिंदूंस दाखविण्यास एक प्रकारचा स्पिरिट येतो, परंतु श्रम करण्यास नवे स्नायु येत नाहींत, किंवा विचार करण्यास नवा मेंदू मिळत नाहीं. यामुळें आह्मांस कारखान्यांत अधिक योग्यतेच्या जागा असाव्याशा वाटतात, कारण काम थोडें व प्राप्ति अधिक. नेटिव्ह कारागिरांप्रमाणें आह्मी काम करूं लागल्यास फार झालें तर त्यांच्या इतकें काम करूं, व तितकीच प्राप्ति मिळवूं. मग ख्रिश्चन् होण्याचा फायदा काय ?

" पैसे मिळविण्याकरितां आह्मी कोणकोणत्या युक्त्या काढतों तें आमचें आह्मांसच माहीत. कित्येकांच्या घरांमध्यें स्त्रियांस पायमोचे विण, कपडे शीव, वगैरे हलकीं कामें करावीं लागतात. पैशाच्या प्राप्तीकरितां अन्याय, अनाचार व अप्रमाणिकपणा केव्हां केव्हां आह्मांस करावा लागतो. याबद्दल आह्मांस शरम वाटते, परंतु उपाय काय ? आमच्या ज्ञातींत आह्मांस आपली योग्यता तर राखिली पाहिजेनां ?

" तुह्मी धर्मभोळे ह्मणून आह्मी तुमचा उपहास करितों, परंतु ही वरकरणी गंमत आहे; आह्मी युरोपियनांस अधिक जवळ, हें स्वतःच्या मनास स्पष्ट करण्याचा आमचा तो मार्ग आहे. परंतु तुह्मीं धर्मभोळे रहावें अशी आमची मनापासून इच्छा आहे. तुह्मी ख्रिस्ती होऊं नका. ख्रिस्त्यांची संख्या वाढवूं नका. तसें केल्यानें राज्यकर्ते तुह्मांबद्दल अधिक कळकळ बाळगतील ही आशा सोडा. अति तेथें माती. सर्वच ख्रिस्ती झाले तर दारूची किंमत वाढेल, मांसाची वाढेल व आह्मां लोकांस पोटभर खायासही मिळायाचें नाहीं. कारण, ख्रिश्चन् झाल्यावर कांदाभाकरीनें पोट भरेल काय ? दारूवांचून अं-

गांत स्पिरिट व एनर्जी ( आवेश व सामर्थ्य ) राहील काय? ख्रिश्चन् झाल्यावर कोणास चिलीम ओढतांना मीं पाहिलें तर त्यास आत्मा आहे कीं नाहीं याची मला शंका येईल. हिंदूंनीं किंवा मुसलमानांनीं चिलीम प्यावी. आह्मीं चिरूट ओढावे, अशी आमच्या धर्मशास्त्राचीच आज्ञा आहे असें मला वाटतें. अहो, श्रेष्ठ होण्याकरितां ख्रिश्चन् व्हावयाचेंना? शरीराच्या स्वास्थ्यावांचून मनास श्रेष्ठता येईल कशी? जें जें ह्मणून श्रेष्ठ गणिलें जातें तें तें खायला, प्यायला, नेसायला, पांघरायला, रहायला व बसायला असल्यावांचून कोणास श्रेष्ठत्व येणार आहे? छः छः, आमच्या श्रेष्ठ ख्रिश्चन् हक्कांकरितां राज्यकर्त्यांशीं तंटा करण्याची आह्मांस कधीं तरी पाळी येणार!"

मि. मोरियर यांनीं हे अखेरचे शब्द अस्तन्या मागें सारून मोठ्या आवेशानें उच्चारिले, व मुठीनें टेबलावर जोराचा आघात केला. तेव्हां लेडीज् टकमका त्यांकडे बघूं लागल्या, व "शाबास, शाबास, थोर नाईट, शाबास" असे उद्गार काढून त्यांनीं टाळ्या वाजविल्या. हें इतकें भाषण झाल्यावर लेडींना कंटाळा आल्यासारखें दिसून आलें, तेव्हां हा विषय आह्मी बंद केला. मग चहा वगैरे झाल्यावर लेडीज् उठून गेल्या व आंतून पियानोचे व गाण्याचे मधुर स्वर ऐकूं येऊं लागले. आह्मीं बाहेर चिरूट पेटविले. गाणें चाललें असतां आमच्या मित्राची चित्तवृत्ति अगदीं खुलून गेली. मग तो तेथेंच बिलियर्ड खेळायास राहणार असें जाणून मीं मोरियर साहेबांची रजा घेतली व आपला हर्ष आणि आभार प्रदर्शित करून तेथून परत आलों.

वाटेंत विचार करीत असतां मला शंका आली कीं, मोरियर जें सर्व बोलला तें थट्टेनें बोलला किंवा त्याचे खरोखरीच तसे विचार आहेत. त्याच्या आवेशावरून, मुद्रेवरून व डोळ्यांचे तजेल्यावरून मला वाटलें कीं त्याचे विचार खरोखरीच तसे असावे. पैशाचे अडचणीमुळें, सावकारांच्या तगाद्यामुळें आणि वरिष्ठ युरोपियनांच्या जांचामुळें त्याचे विचार तसे होणें स्वाभाविक होतें.

## भाग १३ वा.

## एका बंगाली साधूचे ख्रिस्ती धर्माविषयीं विचार.

५२. मी घरीं आल्यावर निवांतपणीं वसलों असतां रामचंद्रपंत व मोरियर या दोघांच्या मूर्ति माझे डोळ्यांपुढें उभ्या राहिल्या, व त्यांतून कोण श्रेष्ठ, कोण अनुकार्य या विचारांत मीं बराच वेळ घालविला. कारण, या दोन व्यक्ति ह्मणजे दोन मोठ्या वर्गांच्या निदर्शक होत्या. हिंदुधर्मांत काय आहे व ख्रिस्तीधर्मानें येथें काय आणिलें, पौरस्त्यांचा कल कोणीकडे व पाश्चात्य लोक त्यांस कोणीकडे नेत आहेत, या गोष्टीविषयीं कल्पना या दोन गृहस्थांशीं माझीं जीं संभाषणें झालीं त्यांवरून मला आली. आमचे मित्र ह्मणजे रामचंद्रपंतांचे चिरंजीव, हेही एका वर्गाचे निदर्शक होत—तो वर्ग इंग्रजी शिकून तयार झालेल्या कांहीं आधुनिक विद्वानांचा होय. या विद्वानांस पैसा मात्र पाहिजे ह्मणजे ते पूर्वेकडून पश्चिमेकडे सरळ जातील, ह्मणजे हिंदुत्वाकडून ख्रिस्तित्वाकडे सहज वळतील, अशी माझी खात्री झाली. हिंदु सद्गुणांचें सामान्य स्वरूप रामचंद्रपंतांच्या सुनेचें आचरण पाहून लक्षांत येतें; तसेंच ख्रिस्ती सद्गुणांचें व्यावहारिक स्वरूप मोरियरचे मेव्हणीच्या वर्तनांत दिसतें.

या दोन चित्रांपैकीं कोणतें पसंत करावें हा मोठा बिकट प्रश्न आहे. कारण प्रत्येकांतील एक एक भाग पाहूं लागल्यास कोणांत एक चांगला, तर दुसऱ्यांत दुसरा चांगला, असें आढळतें. चांगल्या भागांचें आधिक्य कोणच्यांत आहे त्याचा निर्णय रुचिवैचित्र्यामुळें होणें कठीण. एतद्देशीयांस सुसाध्य कोणतें, जवळ कोणतें, हें एक वेळ ठरवितां येईल, परंतु त्याची जगांत किंमत किती व तें आमच्या भावी ऊर्जित दशेस कितीसें साहाय्यकारी होईल हा प्रश्न उरतोच. सारांश, त्या दिवसापासून पुढें पुष्कळ दिवसपर्यंत हाच विषय माझे मनांत घोळत होता; व त्याचा निकाल लागेना.

माझें मन एकदा इकडे व एकदा तिकडे असें झोंके खात असतां आकस्मिकपणें माझी व एका विद्वान् बंगाली साधूंची गांठ प-

डली. यांचें नांव बाबू सदानंद असें होतें. हे गृहस्थ पूर्वी चांगले श्रीमान् होते, त्यांनीं विद्यासंपादनानंतर बराच प्रवास केला होता, व जिकडे तिकडे त्यांच्या ओळखी होत्या. वेदांताचें व व्यवहारज्ञानाचें त्यांच्या विचारांत विलक्षण मिश्रण होतें. व त्यामुळें त्यांचें वैराग्य मला चमत्कारिक भासलें. इतर लोक जे त्यांच्या भेटीस गेले होते त्यांचें समाधान करण्याची स्वामींची शैली पाहून आपल्याही मनांतील शंका त्यांस विचाराव्या असें मला वाटलें, व मीं त्या त्यांच्यापुढें मांडिल्या. त्यांनीं मला जें उत्तर दिलें तें आतां सारांशानें सांगतों. ( मूळ संभाषण हिंदुस्थानींत झालें, त्याचा सर्व रस स्वभाषेंत उठवून देण्याचा मीं येथें प्रयत्न केला आहे. ) ते ह्मणाले:—

५३. " **सुधारणा** आणि **धर्म** हे दोन अगदीं भिन्न पंथ आहेत; व जो एकाच्या पूर्ण नादीं लागेल त्यानें दुसऱ्यास विसरून गेलें पाहिजे. सुधारणा ही ऐहिक सुखाकरितां आहे; धर्म हा पारमार्थिक सुखाकरितां आहे. पाश्चात्य लोक अत्यंत सुधारलेले आहेत असें आपण ह्मणतों, याचें कारण त्यांनीं ऐहिक सुखाची परमावधि कशी होईल, इकडेच कायतें लक्ष दिलेलें आहे व ते आपला स्वधर्म पूर्णपणें विसरून गेले आहेत. त्यांचें बळ, त्यांचा उद्योग आणि त्यांचीं सुखें आह्मी पाहतों, व विस्मित होतों. आपणांस वाटतें त्यांच्या धर्मांतच कांहीं विशेष गुण असेल. परंतु त्यांनीं स्वीकारलेल्या धर्माचा आचरणावर अंमल होऊं नये, याविषयीं ते जितके सावध आहेत तितके पृथ्वीवर दुसरे कोणीही लोक नाहींत. ख्रिस्ती लोकांपैकीं ज्यांमध्यें थोडा धर्मावेश आहे ते लोक ही धर्माची हानि प्रांजळपणें कबूल करितात व तीबद्दल फार दुःख दाखवितात. परंतु सुधारणेच्या तुफान ओघांत अशा क्षुद्र बुडबुड्यांची कशाची दाद लागते ! युरोपीय राष्ट्रांचा इतिहास पाहिला ह्मणजे ख्रिस्ती धर्माची दुर्बळता दिसून येते; व त्या दुर्बळतेची हल्लीं तर कमाल झाली आहे. तुह्मी सांगतां तो गृहस्थ, मोरियर, सामान्य ख्रिस्ती गृहस्थांचा नमुना आहे असें समजा; एवढेंच कीं असले गृहस्थ प्रसंग पाहून कमी अधिक स्पष्टवक्ते किंवा प्रियवक्ते असतात. सामान्य ख्रिस्ती गृहस्थ जेव्हां आपले अंतस्थ व्यावहारिक विचार अगदीं स्पष्टपणें बोलतात

तेव्हां त्यांच्या सामर्थ्याच्या आविर्भावानें आह्मी धार्मिक हिंदु लोक चकित होऊन जातों खरे, परंतु त्यांच्या नीच मनोवृत्तींचा आह्मांस वीट येतो. जर येशू ख्रिस्त पुन: पृथ्वीवर अवतरला तर त्याच्या राज्यांत तुमचा आमचा जितक्या सुलभपणें प्रवेश होईल, तितका फार थोड्या ख्रिस्ती गृहस्थांचा होईल. येशू ख्रिस्तानें ज्या तत्त्वांचा उपदेश मात्र केला, तीं तत्त्वें खुद्द येशू ख्रिस्तापेक्षां आपल्या तुकाराम साधूनें चांगलीं पाळलीं असें कोणीही कबूल करील.

५४. युरोपांत सुधारणेस जो आरंभ झाला त्या काळास पुनरुज्जीवनाचा काळ असें कोणी ह्मणतात. धर्मपालनानें राष्ट्रांस मृतकळा आली होती तींतून हें पुनरुज्जीवन झालें असें ह्मणण्यास हरकत नाहीं. युरोपीय सुधारणेस आतां सुमारें तीन शतकें होत आलीं. या सुधारणेची व्याख्या काय असें कोणी विचारल्यास ती येणेंप्रमाणें देतां येईल: ज्ञान आणि ऐश्वर्य यांची निःसीम हौस व तज्जन्य ऐहिक सुखांकडे पराकाष्ठेची ओढ, या मनाच्या स्थितीचें व तदनुरूप वर्तनाचें नांव **सुधारणा**. आपले लोक व युरोपीय लोक यांमध्यें एक मोठें अंतर आहे. आपले लोकांचा रानटीपणा जाऊन फार शतकें झालीं, युरोपीय लोकांचा जाऊन थोडीं शतकें झालीं; आपल्या लोकांच्या नैसर्गिक मनोवृत्तींतून क्रूर, साहसी व चंचळ मनोवृत्ति नाहींशा होऊन बराच काळ झाला; युरोपियनांच्या असल्या मनोवृत्ति अद्यापि बऱ्याच अंशानें कायम आहेत. सदसद्विचारशक्तीचा आयुष्यक्रमावर कित्येक शतकें परिणाम झाल्यामुळें तिनें आमच्या स्नायूंतील बळ हिरावून नेलें आहे, व युद्धप्रेम नाहींसें केलें आहे. युरोपीय लोक आतांशीं कोठें या स्थितीस येण्यास सुरवात करीत आहेत. ह्मणूनच आह्मी धार्मिक व समाधानी झालों आहों; युरोपास ही स्थिति पुढें कदाचित् येईल.

५५. येशू ख्रिस्त तुमच्या आमच्या वर्गांतील होता; गरीब, दुबळे व दु:खीकष्टी, यांच्या जिवास आश्वासन देऊन त्यांस धैर्यबळ व पारमार्थिक सुखाची आवड उत्पन्न करण्याचा त्याचा प्रयत्न होता. परंतु त्यानें प्रणीत केलेला धर्म अस्थानीं जाऊन पडला. देशाभिमान, राज्यसत्ता, युद्धप्रेम, व सामान्यत: रानटी समजुती,

अशी ज्या लोकांची स्थिति होती, त्यांमध्यें या दुबळयांकरितां निर्मिलेल्या धर्माची कां पूर्ण दुर्दशा होऊं नये? आपोआप झाली. ज्या थोड्यांमध्यें पूर्वींपासून धर्मप्रेम होतें, ते ख्रिस्ताच्या पंथानें जाऊं लागतांच त्यांस इकडच्या साधूंप्रमाणें वैराग्य प्राप्त झालें. परंतु बाकीचे अज्ञानामुळें ऐश्वर्यलोभी धर्माधिकाऱ्यांच्या कचाट्यांत सांपडून मूर्ख होऊन गेले. या धर्माधिकाऱ्यांनीं सर्व प्रकारचे अनाचार आरंभिले; धर्मतत्त्वांची लोकांस ओळख होऊं दिली नाहीं व धर्माचे नांवावर त्यांस लुटण्यास मात्र आरंभ केला. त्या धर्माधिकाऱ्यांच्या क्रूर व निंद्य कृत्यांचें वर्णन करणेंही संतापकारी आहे. धर्माधिकाऱ्यांनीं ईश्वराकडून जे महत्त्वाचे हक्क जबरीनें घेतले होते ते, पैसा व साहाय्य घेऊन, त्यांनीं राज्यसत्तेकरितां तळमळणारांस अंशतः देऊं केले. राजे, सरदार, जहागीरदार यांस आपल्या मनकामना पाहिजे त्या प्रकारें पूर्ण करण्यास त्यामुळें मोकळीक झाली. अशा प्रकारें युरोपांत पहिल्यापासून धर्माच्या दुर्दशेनें किती अनाचार सुरू झाले व अज्ञान लोकांचे किती हाल झाले त्यांची कल्पना देखील करवत नाहीं.

ख्रिस्ती राष्ट्रांचा प्राचीन व अर्वाचीन, ह्मणजे गेल्या एकोणीस शतकांचा इतिहास वाचला ह्मणजे तो येशू ख्रिस्ताच्या अनुयायांचा असेल असें मनांत देखील येत नाहीं. ख्रिस्ती इतिहासांत एकही पान असें सांपडायाचें नाहीं कीं, तें ख्रिस्तानें वाचलें असतां तो आपल्या अनुयायांची तारीफ करील. उलट, जें पान चाळावें त्यांत ऐहिक महत्त्वाकांक्षेमुळें आपल्या अनुयायांनीं धर्माच्या दाही आज्ञा मोडल्या आहेत व आपलें गिरीवरचें व्याख्यान कोंपऱ्यांत गुंडाळून ठेवलेलें आहे असें त्याच्या ध्यानांत येईल.

५६. ख्रिस्ती धर्माची अत्यंत दुर्दशा झाल्यावर सुधारणेच्या दिशेनें त्याच्या उद्धारास आरंभ झाला. या उद्धाराच्या प्रयत्नांत त्यास क्रमाक्रमानें दुबळेपणा येत गेला. धर्मतत्त्वें अगदींच खोल बुडी मारून बसलीं. हल्लीं मोठ्या डामडौलानें ख्रिस्तीधर्माचा पोकळ सांगाडा

---

१ '**सुधारणा**' या शब्दाची कलम ५४ मध्यें दिलेली व्याख्या ध्यानांत ठेवून हा व पुढील दोन भाग वाचावे.

वाचामात्रत्वानें पूज्य होऊन उभा आहे. पाश्चात्य सुधारणेनें कांहीं शर्तींवर त्यास थोडीशी जागा दिली आहे, तींत तो धर्म आपलें अंग अगदीं आकुंचित करून राहिलेला दृष्टीस पडतो.* रोमन लोक परराष्ट्रांस जिंकून जेव्हां परत येत तेव्हां रोममध्यें शिरतांना मोठी मिरव-

---

There is a growing feeling among the rich and prosperous that the invisible world has no interest for men in a refined state of civilization. The opinion, which Comte has formulised, is stated popularly in English books which have obtained the widest circulation and reputation. All ideas of moral government and spiritual influence, they say, belong to an older time ; we have left them far behind us. A doctrine, which naturally commends itself to those who find the visible world comfortable and satisfactory, has descended upon those who find it uncomfortable and unsatisfactory. Under the name of *Secularism* it is spreading rapidly among some of the most intelligent of the class which comprises the bulk of our population. The world is not specially their friend, nor the world's law ; but they look upon all tidings respecting the unseen as only fictions that are invented to keep them on their present level. Many of their teachers have been religious teachers in their day. They proclaim that the terrors and hopes of the future, which they once entertained, have become nothing to them ; that only the present can be understood, or is worthy to be thought of. To tell such men that, as philosophers, you perfectly agree with them ; that you, as much as they, scorn those in former days who tried to look beyond the bounds of the finite ; but that for the good order of Society, and for the sake of avoiding possible perils hereafter, certain forms of expression must be kept up which seem to imply that the infinite can be brought within the range of our cognizance, nay, that it should be the main object of our study and pursuit ; to do this is simply to provoke their righteous scorn and indignation. We draw upon ourselves the charge that we attach no meaning to the words which we count most sacred. We urge on a revolution more terrible than any we have witnessed yet. " *Maurice*: Moral and Metaphysical Philosophy, Vol. II, Chap. 10.

And the Scriptures of the primitive Christians, from the early ages of Christianity, have been made a principal cause of the division, the controversy, the war, and the persecution and cruelty, that have

णूक काढीत; त्या मिरवणुकींत जिंकून आणलेले राजे, राजपुत्र, द्रव्य, दास वगैरे यांस बांधून पुढें चालवीत. सुधारणेनें आपल्या विजयाच्या मिरवणुकींत ख्रिस्तीधर्मास तसेंच पुढें चालण्याचें काम दिलेलें आहे. या धर्मानें ज्ञानाच्या, उद्योगाच्या, लढाईच्या आणि राजकीय कारस्थानांच्या आड येऊं नये असा त्याकडून करार करून घेतला आहे. स्नेहसंबंध व करमणूक वाढविण्याकडे धर्माचा उपयोग करितां येईल असें जाणून धर्मोपासनेस पाहिजे तशीं भव्य व सुंदर देवळें बांधून दिलीं आहेत. तेथें जाणारांस धर्मोपदेशकानें हळूच टोंचावें, हळूच गुदगुल्या कराव्या, परंतु तेंही सुधारणेचा व श्रोत्यांचा कल पाहून करावें! सरासरीनें पाहतां सुधारणेच्या स्तुतिपाठकाचें काम करून रहावें नाहींतर विलयास जावें, या कैचींत ख्रिस्तीधर्म सुधारल्या राष्ट्रांत सांपडला आहे. आपल्या अपराधाबद्दल व अन्यायाबद्दल क्षमा करणारा कोणी असेल तर त्यास संतुष्ट ठेवण्यास ही एक संस्था असूं द्या, अशी युरोपियांची समजूत असेल. परंतु शेक्स्पीयरनें सुचविलेला प्रश्न येथें उद्भवतो. अन्यायानें व अपराधानें जें मोठें फळ मिळविलें, तें कायम ठेवून क्षमेची आशा बाळगणें रास्त होतें काय? नित्य पुनः अपराध करायाचा व नित्य पुनः क्षमा मागायाची हें परम दयाळू ईश्वरास तरी पसंत पडेल काय ?

जेथें जेथें युरोपीय लोकांनीं जाऊन वसाहती केल्या आहेत, तेथें तेथें मूळचे लोक त्यांनीं नामशेष केले आहेत. जे थोडे राहिले आहेत तेही नाहींसे होण्याच्या संकटांत आहेत. ते नाहींसे होण्याचें मूळ कारण हें कीं आरंभीं युरोपियनांनीं त्यांचा पाठलाग करून गोळ्या

---

convulsed and drenched Christendom in blood ever since it has been called Christendom. And does it not impeach the wisdom and goodness of our great Benefactor to suppose he ever intended those writings as a rule, when the best of men cannot understand them alike?

Passage quoted in "*Thoughts and Aspirations of the Ages.*
Society of Friends, IV.

See also *Warfare of Science with theology* in Christendom by
Andrew D. White, in two Vols.

घालून त्यांस मारिलें, किंवा शुद्ध पशुप्रमाणें कापून काढलें. मग त्यांचा पुरा मोड झाल्यावर मागून ख्रिस्ती धर्मोपदेशक तेथें गेले; व मूळच्या रहिवाशांस हलक्या योग्यतेचे ख्रिस्ती बनविण्याचा प्रयत्न सुरू झाला. ज्या लोकांस युरोपियनांनीं परतंत्र केलें आहे त्यांशीं राजकीय वर्तन अन्यायाचें व क्रौर्याचें असायाचें, परंतु त्यांच्या आत्म्याच्या तारणार्थ ख्रिस्ती उपदेशकांची कमतरता नसायाची व खर्चास पैशाची उणीव नसायाची! आपणांतून जो धर्म गेला त्याचा दुसऱ्यांस तरी उपयोग होवो, असें पुष्कळ ख्रिस्ती लोकांस वाटत असेल!

५७. राज्यकारणानें परधर्मीयांशींच ख्रिस्ती लोकांचें असें वर्तन आहे असें नाहीं. ख्रिस्ती राष्ट्रांत पूर्वीं जातिभेद किंवा वर्गभेद फार प्रबळ होता, व त्याचें त्या वेळच्या धर्मानें मंडन केलें जात होतें. त्या काळीं कनिष्ठ वर्गाची स्थिति अत्यंत दुःखाची व जवळ जवळ दास्याची होती. ती स्थिति जाऊन आतां कनिष्ठ वर्गास तशीच नवी मजुरदारीची स्थिति आली आहे; व सुधारणेचें चढाओढीचें तत्त्व अमलांत येऊन त्यांचे पूर्ववत् हाल होत आहेत.

नुसत्या विचाराच्या कामांतही ख्रिस्ती लोकांच्या मनास त्यांचा विलक्षण अहंकार सोडीत नाहीं. आपण स्वतःच्या धर्माचें व रितीभातींचें विवेचन करीत असतां, अंगचें सर्व सौजन्य खर्चून गुणदोषांचें परीक्षण करितों, तशाच सौजन्यानें इतरांच्याही धर्मादिकांचें परीक्षण करणें योग्य आहे, ही कल्पनाही ख्रिस्ती ग्रंथकारांस नाहीं. ज्यांच्या रितीभातींचें विवेचन करायाचें त्यांशीं आपली पूर्ण अनुकंपा असल्यास आपलीं मतें व्हावीं तशीं योग्य होतात, नाहींतर न कळतही पक्षपात होतो. सुधारलेल्या निःपक्षपाती सरळ मनाच्या ख्रिस्ती गृहस्थांस देखील अशी अनुकंपा अंगीं आणितां येत नाहीं; व ख्रिस्ताच्या आज्ञांपैकीं हीच आज्ञा अतिश्रेष्ठ गणिली जात आहे. कोणी खरा ख्रिस्ती आहे कीं नाहीं याची पारख ही आज्ञा पाळण्यास तो किती योग्य आहे हें पाहून होते. आपलें तें चांगलें, दुसऱ्याचें तें वाईट, आपलें हीन दिसेल त्यांतील गूढार्थ घ्यावयाचा, दुसऱ्याचें हीन दिसेल त्याचा स्पष्टार्थ घ्यावयाचा,

इत्यादि प्रकारांनीं स्वतःची श्रेष्ठता गाजविणारे, अहंकारास वश झालेले, व गर्वोक्तींनीं नित्य परधर्मीयांस दुखविणारे दुसरे लोक पृथ्वीवर नाहींत.

सारांश हा कीं ख्रिस्ती धर्मांतील आचार युरोपीयांच्या कुटुंब-व्यवस्थेंत मात्र पाळले जातात, व तेही पूर्व परंपरेमुळें. बाकी, व्यवहारांतून, व विशेषतः राजनीतींतून, ख्रिस्ती धर्मास पुरतेपणीं हाकून लाविलेलें आहे. हल्लीं सुधारणेचा पगडा जिकडे तिकडे बसलेला आहे. पाश्चात्य लोक शौर्य, वीर्य, धाडस, ज्ञान, शोध, बुद्धिमत्ता, कल्पना, इत्यादि अनेक गुणांनीं इतर राष्ट्रांहून वरिष्ठ झाले आहेत, त्यामुळें त्यांचें जिकडे तिकडे वर्चस्व झालेलें आहे. सुधारणेच्या कामीं हे सर्व गुण लाविल्यामुळें त्यांची उन्नति झालेली आहे. त्यांच्या त्या वर्चस्वाशीं किंवा उन्नतीशीं ख्रिस्ती धर्माचा बिलकुल संबंध नाहीं. कोणताच धर्म अशा उन्नतीच्या कामीं येणारा नाहीं, उलट तो ऐहिक उन्नतीस बाधक झाला पाहिजे. आमच्या देशांत धर्माचा हा असा परिणाम स्पष्ट दिसून येतो. हल्लीं मनुष्यापुढें जो प्रश्न आहे तो असा कीं, पूर्वीं व्याख्या दिलेली सुधारणा हवी कीं धर्म हवा? कोणत्या प्रमाणानें सुधारणा हवी व कोणत्या प्रमाणानें धर्म हवा? धर्मही नाहीं व सुधारणाही नाहीं, अशा स्थितीस मात्र रानटी स्थिति ह्मणतां येईल. धर्म आणि सुधारणा यांमधील विरोध आणखी स्पष्ट होण्याकरितां सुधारणेचीं व ख्रिस्ती धर्माचीं मूळतत्त्वें ताडून पाहूं."

---

## भाग १४ वा.

### पाश्चात्य सुधारणेचीं तत्त्वें.

५८. " ख्रिस्ती लोकांस सामान्यतः मूळ बायबल कळूं लागून आतां दोन तीनशें वर्षे झालीं. परंतु या काळांत बुद्धिमान् पुरुषांचें लक्ष मुख्यत्वें सुधारणेकडे लागल्यामुळें धर्मविचारास त्यांस फारशी फुरसत मिळाली नाहीं. तथापि क्रमानें बुद्धीचा ओघ मनुष्याच्या नीतीच्या विचाराकडे जेव्हां वळला तेव्हां नीतीची प्रेरणा मनुष्या-

मध्यें सुखदु:खविवेकानें होते, धर्मानें होत नाहीं, असें एक तत्त्व निघून तें पुष्कळांस मान्य होऊं लागलें. व्यक्तीनें खासगी आचरणांत नीतिमान् होण्यास स्वसुखाचा उत्कृष्ट मार्ग स्वीकारावा व सामाजिक आचरणांत तसाच समाजसुखाचा मार्ग अंगीकारावा असा बुद्धिप्रणीत सिद्धांत ठरला. कायदेकानूंमध्यें या सिद्धांताचा तेव्हांच शिरकाव झाला. समाजाची उत्कृष्ट व्यवस्था राहून त्यास अत्यंत सुख कशानें होईल, या विचारांनीं कायदे ठरूं लागले. कायद्याखालीं न येणाऱ्या लौकिक आचरणासही हाच सिद्धांत लागू होऊन जुन्या रुढी बदलत चालल्या. एकंदरीनें सामाजिक व लौकिक आचरणांत धर्म मागें पडून हा सिद्धांत ( Utilitarianism ) पुढें सरसावत गेला.

१९. युरोपांत गेल्या शतकांत विद्या शिकून तिजवर निर्वाह करणारे लोक ह्मटले ह्मणजे मध्यम स्थितींतले होते. सर्व विषयांत बुद्धि चालविण्याचें काम त्यांकडे होतें. त्या लोकांस कनिष्ठ वर्गाचीं दु:खें दिसत होतीं इतकेंच नव्हे, तर बहुधा स्वत: तीं सोसावीं लागत होतीं; त्यामुळें वरिष्ठ वर्गाचें ऐश्वर्य व उन्माद त्यांस पाहवेनासे झाले. समाजाचें तें तसें वर्गीकरण त्यांस अत्यंत अन्यायाचें दिसूं लागलें. जन्मत: सर्व माणसें सारखीं आहेत, असें वाटून तोच उपदेश ते कनिष्ठ वर्गांस करूं लागले. हे वर्ग गांजलेले होते, त्यांस तो उपदेश तेव्हांच पटला. जर सर्व माणसें सारखीं आहेत तर त्यांस सारखें स्वातंत्र्य पाहिजे. एका वर्गाचा दुसऱ्यावर अंमल चालणें, राजाचा प्रजेवर चालणें, हें त्यांस अन्यायाचें वाटूं लागलें. समाजांत बंदोबस्त राहण्यास जर राज्यव्यवस्था हवी असेल तर ती प्रजेच्या सल्लयानें व पसंतीनें उत्पन्न झाली पाहिजे. समाज सर्वांचा मिळून होतो, त्याच्या उत्कर्षाकरितां सर्वांनीं सारखें झटलें पाहिजे, ह्मणजे कुटुंबांत जो बंधुबंधूंचा संबंध तोच समाजांतील समान हक्काच्या लोकांचा असला पाहिजे. याप्रमाणें बुद्धिप्रकाशानें कनिष्ठ वर्गांस जीं नवीं तत्त्वें कळलीं तीं हीं कीं सर्व प्रजाजनांचे सारखे हक्क आहेत; त्यांस सारखें स्वातंत्र्य असलें पाहिजे; त्यांनीं परस्परांशीं बंधुतेचा संबंध राखिला पाहिजे; राज्यव्यवस्था प्रजासत्तात्मक झाली पाहिजे;

व याकरितां राजे, सरदार वगैरे विशिष्ट हक्काचे लोक नाहींसे तरी केले पाहिजेत किंवा त्यांचे हक्क कमी केले पाहिजेत. या तत्त्वांमुळें फ्रान्समध्यें ती प्रसिद्ध राज्यक्रांति झाली, व प्रजेचें माहात्म्य स्थापित झालें. इतर देशांत जरी राज्यक्रांति झाली नाहीं, तरी प्रजेच्या असमाधानाचें भय वाटून तीस अधिक हक्क देण्यास सुरवात झाली. " स्वातंत्र्य, समता व बंधुता " हे शब्द मध्यम व कनिष्ठ वर्गांमध्यें प्रिय होऊन गेले. सर्वांस सारखे हक्क देण्यापूर्वीं सारखी पात्रता येऊं द्या, अशा सूचनेमुळें सर्वांस विद्यादान देण्यास आरंभ झाला; व एकंदरीनें कनिष्ठ जातीस उद्योगाच्या कामांत मात्र सारखे हक्क मिळाले, परंतु पूर्वींच्या संचित संपत्तीचा त्यांस वाटा मिळाला नाहीं. चढाओढीनें पाहिजे तें करावें, या उद्योग-स्वातंत्र्याच्या तत्त्वामुळें भांडवलवाले व मजूर, असे नवे वर्ग झाले. व्यापारामुळें या वर्गांतील अंतर वाढत चाललें. शास्त्रें, यंत्रें, कला, वगैरे सर्वांमध्यें श्रम एकाचे, फायदा दुसऱ्याचा असा परिणाम घडूं लागला; व यंत्रांच्या प्रसारानें श्रम करणारेही यंत्रेंच बनून गेले; त्यांस चढाओढींत आपली माणुसकी सुधारण्यास वेळ मिळेना. ' स्वातंत्र्य, समता व बंधुता ' यांचा तोंडानें मात्र वृथा जयघोष जिकडे तिकडे चालत राहिला ! हीच स्थिति योग्य असें अर्थशास्त्रवेत्तेही प्रतिपादन करूं लागले ! उद्योग व व्यापार यांनीं संपत्ति सारखी वाढत चालली, तेव्हां सुधारणेच्या दृष्टीनें ही नवी स्थितीच उत्तम असें ठरलें.

६०. इकडे शास्त्रप्रकर्षानें उत्क्रांतीचें एक नवें तत्त्व प्रकट झालें. तें असें कीं सर्वत्र जीवनार्थकलह चालला आहे, व जे जगण्यास योग्यतम तेच जगायाचे, बाकीच्यांचा आपोआप संहार व्हावयाचा. हें तत्त्व राष्ट्रांराष्ट्रांमध्यें, समाजांतील वर्गांवर्गांमध्यें, व वर्गांतील कुटुंबांकुटुंबांमध्यें व व्यक्तिमात्रांमध्यें लागू पडलें पाहिजे, असा सिद्धांत झाला. ' बळी तो कान पिळी ' हा न्याय पूर्वापार नीतीनें, धर्मानें व कांहीं अंशीं सुराज्यव्यवस्थेनें मागें पडला होता, परंतु या उत्क्रांतितत्त्वानें त्यास नवेंच महत्त्व आणिलें. 'स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ' यांशीं या उत्क्रांतितत्त्वाचा चांगलासा मेळ पडेना. आत्मसंरक्षणाच्या निमित्तानें स्वार्थास आतां अधिकच जोर आला, पर-

मार्थ व परोपकार मागें पडला, व समाजांतील चढाओढीचें घातक स्वरूप स्पष्ट होऊं लागलें. जीवनार्थ कलहांत टिकाव धरून स्वसंरक्षण करण्यास व्यक्ति व राष्ट्रें कशीं योग्यतम करावीं इकडे आतां सुधारणेचे डोळे लागले. ते लागण्यास दुसरें एक कारण झालें.

६१. प्रत्येक देशांत लोकसंख्या वाढत आहे, व ती कांहीं सुधारलेल्या राष्ट्रांत फारच जोरानें वाढत आहे. या वाढत्या लोकसंख्येमुळें लोकांस देशांतर करणें भाग पडत आहे. अशा देशांतरामुळें पृथ्वीचे राहण्यास योग्य असे बहुतेक भाग व्यापिले गेले आहेत; तरीही लोकसंख्या वाढतच आहे, जुन्या सर्व राष्ट्रांत रहिवाशांची गर्दी होऊन अन्न दुर्मिळ होण्याचा प्रसंग आला आहे. भिन्न भिन्न राष्ट्रांमध्यें अन्नार्थ चढाओढ चालू आहे, व प्रत्येक राष्ट्रांतील प्रत्येक व्यक्तीस ही चढाओढ जाऊन पोहोंचली आहे. उद्योग हा एकच अन्नसंपादनाचा मार्ग आहे. या उद्योगानें तरी अन्न मिळविण्याकरितां व आपआपल्या व्यापारास धक्का न बसावा अशाकरितां सर्व राष्ट्रांच्या सैन्यबळाची उत्तम तयारी पाहिजे. फाजील झालेल्या लोकांस वसाहतीकरितां नवी जागा काबीज करण्यासही सैन्यबळच अवश्य आहे. यामुळें सर्व युरोपीय राष्ट्रें अधिकाधिक सैन्यबळ ठेवून नित्य लढाईच्या तयारींत आहेत. दुसऱ्यांचा व्यापार व दुसऱ्यांकडे गेलेला मुलूख प्रत्येक राष्ट्राचे डोळ्यांत सलत आहे. सैन्यबळ राखण्याकरितां जो भयंकर खर्च होतो त्याचा भार उद्योग करणारांवर येऊन त्यांची अधिकच दुर्दशा होत आहे, परंतु उपाय काय ? वाढती लोकसंख्या, जीवनार्थ कलह व ऐश्वर्याचा लोभ, याकरितां युरोपीय सुधारलेलीं राष्ट्रें इतःपर कोणते अन्याय करण्यास उद्युक्त होतील हें सांगतां येत नाहीं ! धर्म आणि मनोदेवता, यांनीं या राष्ट्रांतून लवकरच पळ काढला पाहिजे !

६२. मनोदेवतेचें रूपांतर करून टाकण्याची उत्क्रांतिपंथवाल्यांनीं खटपट चालविलीच आहे. त्यांचें ह्मणणें कीं मनामध्यें सदाचारानें वागण्याची जी उपजतबुद्धि आहे, जीमुळें हें करणें योग्य, हें अयोग्य, अशी हरप्रसंगीं मन साक्ष देत असतें, व योग्य तें केल्यानें आनंद व अयोग्य तें केल्यानें असमाधान वाटत अस-

तें,—ती उपजतबुद्धि अथवा मनोदेवता उत्पन्न होण्याचीं विशिष्ट कारणें आहेत; व उत्क्रांति नियमांअन्वयें परिस्थितीस अनुसरून मनोदेवतेचें रूपांतर होत गेलें पाहिजे. जर एका वेळीं एकएकच मनुष्य जगांत वास्तव्य करीत असता, तर त्याची मनोदेवता फार आकुंचित असती; पूर्वींच्या अनुभवावरून जें वर्तन मनुष्याच्या सुखास व संरक्षणास युक्त तें त्यास सुचवावें व जें अयुक्त त्यापासून त्यास परावृत्त करावें, एवढेंच तिचें कार्य राहिलें असतें. परंतु मनुष्यांचे जेव्हां संघ बनले व त्यांचें परस्परांशीं नित्य संघट्टन होऊं लागलें, तेव्हां अनुभवानें व्यक्तीच्या व समुदायाच्या सुखास व संरक्षणास कोणतें वर्तन योग्य याचें त्यांस ज्ञान झालें. अनेक पिढ्यांच्या सारख्या अनुभवानें हें ज्ञान उपजतबुद्धीप्रमाणें जन्मतःच मनुष्यास प्राप्त होऊं लागलें; जों जों समुदाय मोठा व जीवनार्थ कलह भिन्न भिन्न प्रकारचा, तों तों मनोदेवतेचीं कार्यंही वाढत गेलीं. परिस्थिति व अनुभव यांनीं तिचें रूपांतर होत गेलें; व तें अद्यापिही सुरू आहे. समाजसंरक्षण हें तिचें मुख्य कार्य आहे व समाजाचें इतःपर रूपांतर होत गेल्यास मनोदेवतेचेंही तसेंच झालें पाहिजे. तेव्हां मनोदेवतेच्या आज्ञा ह्मणजे पूर्वींचा सांचलेला अनुभव एवढाच अर्थ घ्यावयाचा; त्या आज्ञा व्यक्तीनें मानिल्याच पाहिजेत असें नाहीं; नवीन परिस्थितींत त्या कितपत योग्य आहेत हें विचारानें ठरविलें पाहिजे. हीच गोष्ट धर्मासही लागू आहे. ज्यामुळें व्यक्तीचें व समाजाचें सुखवर्धन आणि संरक्षण होणार नाहीं तो धर्मही त्याज्य व ती मनोदेवताही त्याज्य, असा यावरून सिद्धांत होतो. हें तत्त्व सांप्रतच्या युरोपीय सुधारणेंत फार प्रबळ परिणाम करीत आहे.

६३. जुन्या भाषा व इतिहास यांच्या अभ्यासानें ख्रिस्तीधर्माचा परम पूज्य ग्रंथ, ह्मणजे बायबल, त्याचीही पूज्यता नाहींशी होत आहे. जगाच्या आणि मनुष्याच्या उत्पत्तीचा बायबलांतील इतिहास खोटा आहे, ही गोष्ट सर्वांस ग्राह्य झाली आहे. जुन्या करारांतील ईश्वराविषयीं कल्पना व त्यांत वर्णिलेली लोकस्थिति अगदीं रानटी प्रकारची आहे हेंही बहुतेक सर्वांस मान्य झालें आहे. बायबलांत वर्णिलेले ख्रिस्तानें व तदनुयायांनीं केलेले ईश्वरी चमत्कार

असंभवनीय आहेत, ह्या गोष्टीसही पुष्कळांची संमति आहे. जन्मानें किंवा कृतीनें ख्रिस्त अमानुष होता किंवा ईश्वरपुत्र होता, हें अनेकांस असंमत झालें आहे. राहतां राहतां ख्रिस्ताचे उपदेश राहिले. त्यांची स्तुति करण्याचा परिपाठ आहे; तो एवढ्याच करितां कीं त्या उपदेशाच्या चिंतनानें क्षणभर मन उदात्त होतें व एक प्रकारची नीतिविषयक अत्युत्कृष्ट पुरातन कल्पना मनांत येऊन आल्हाद होतो. बायबलांतील धर्मतत्त्वें विचाराच्या चाळणींत पुनः पुनः घोळलीं गेल्यानें, त्यांस पुनः पुनः ताव मिळून पुनः पुनः विचाराच्या कसास तीं लाविलीं गेल्यानें, जीं तत्त्वें आतां शुद्ध बावनकशी ठरलीं आहेत तीं अगदीं थोडीं आहेत, बायबलांत त्यांचा प्रपंच व पसारा मात्र फार मोठा राहिला आहे. तीं तत्त्वें सारांशानें सांगतों:—'खऱ्या जीवित्वाकरितां मेलें पाहिजे; ह्मणजे प्रथमतः इहलोकींचीं सर्व सुखें व सर्व पाश सोडून दिले पाहिजेत व आत्मा ईश्वराधीन केला पाहिजे. नंतर ईश्वरी प्रेरणेनें सर्व व्यक्तिमात्रांशीं आत्मा सारखा सानुकंप झाला, ह्मणजे खरें जीवित्व पुनः आलें. अशा जीवित्वामुळें पृथ्वीवर ईश्वरी राज्याचा अवतार होतो. कारण, आजन्म जें कांहीं करायाचें तें पूर्ण नम्रतेनें व निःस्पृहपणें ईश्वराज्ञेनें व ईश्वराप्रीत्यर्थ मात्र करायाचें, अशी मनुष्याची प्रवृत्ति होते. हें पाहिलें तत्त्व झालें. दुसरें तत्त्व असें कीं ईश्वर आणि मनुष्य यांमध्यें जो संबंध आहे त्यास अगदीं जवळची उपमा म्हटली तर पितापुत्रांची होय, परंतु हीही अपूर्ण आहे. या संबंधामुळें मनुष्यानें निरंतर कृतज्ञतेनें वागावें, आज्ञाधारक, बहुमानपर व प्रेमपर रहावें; मग ईश्वरही संतुष्ट होऊन कृपा, ममता व क्षमा यांचा मनुष्यास लाभ करून देतो; व असा ईश्वरी प्रसाद इतर सर्व लाभांहून अतिश्रेष्ठ गणिला पाहिजे. तिसरें तत्त्व हें कीं स्वतः इतकी प्रीति सर्व मनुष्यांबद्दल मनांत वागवावी; लोकांनीं आपणांशीं ज्याप्रकारें वागावें ह्मणून आपल्या अंतःकरणास वाटत असतें, त्याचप्रकारें आपण लोकांशीं वागावें; आत्महित व परहित यांत भेद करूं नये.' जुन्या करारांतील दहा आज्ञांची वरील तत्त्वांस अनुसरून ख्रिस्तानें स्पष्टता केली आहे; व तेंच त्याचें गिरीवरील व्याख्यान एका दृष्टीनें अत्यु-

दात्त असें ठरलें आहे. हीं तत्त्वें व ख्रिस्ताचे उपदेश व वर्तन यांचा विचार केला असतां ख्रिस्ताची थोरवी ध्यानांत येते व धार्मिक स्वभावाचें एक अत्युत्कृष्ट उदाहरण डोळ्यांपुढें येतें. अशा त्या ख्रिस्तास कोणत्या आधुनिक ख्रिस्त्याचें चालू वर्तन पसंत पडेल ? वास्तविक पहातां धार्मिक किंवा पारमार्थिक आचरण पूर्णपणें साधावें व त्याच्या साधनार्थ मात्र ऐहिक कर्म करावीं, अशा उद्देशानें ख्रिस्तानें वरील तत्त्वें सांगितलीं आहेत; त्यांपासून सुधारणा किंवा ऐहिक ऐश्वर्य प्राप्त होणें अशक्यच आहे. ख्रिस्ताचें शिक्षण व्यवहारांत आचरणें अगदीं अशक्य आहे; व ह्मणूनच तें एकीकडे राहून त्याच्या अगदीं विरुद्ध असे परिणाम ख्रिस्ती इतिहासांत घडून आले आहेत.

६४. ख्रिस्तप्रणीत धर्म कोणीकडे व उत्क्रांतिपंथीय सुधारलेल्या ख्रिस्ती लोकांचें सांप्रतचें आचरण कोणीकडे! जीवनार्थ कलह आहे व त्याचा निकाल योग्यतेच्या प्रमाणानें लागायाचा ! ही योग्यता स्थापन करण्यास दंडांत जोर पाहिजे, मोठें सैन्य पाहिजे, व उत्कृष्ट प्राणघातक हत्यारें पाहिजेत. रानटी लोकांच्या वसाहतींत ख्रिस्ती लोक जाऊन उतरतात व त्यांनीं विरोध केला ह्मणजे ' जीवनार्थ कलह होऊं द्या ' ह्मणून लागलींच शस्त्रास्त्रें बाहेर काढतात. दुसऱ्या राष्ट्रांवर अशा तऱ्हेनें सत्ता बसविल्यावर त्यांशीं वर्तनांत हेंच तत्त्व— 'तुह्मी हक्क मागतां ? योग्यता दाखवा. तुह्मी न्याय मागतां ? योग्यता दाखवा. तुह्मांस जुलूम नको आहे ? योग्यता दाखवा. ' योग्यतेच्या प्रश्नाचा सामोपचारानें कधींही निकाल लागत नाहीं. जीवनार्थ कलहांत एकानें त्वरित किंवा सावकाशपणें मृत्युपंथास लागलें पाहिजे. हें योग्यतेचें तत्त्व जोंवर ख्रिस्ती लोक निकरानें जिकडे तिकडे लावीत राहतील, व या तत्त्वाखेरीज पाउलभरही हालणार नाहींत, तोंवर ते ख्रिस्ताचे अनुयायी आहेत असें कदापि ह्मणतां येणार नाहीं.

हा असा धर्मनाश पाहून कांहीं थोडे थोर मनाचे ख्रिस्तीलोक अत्यंत विषाद प्रकट करितात. **कौंट टोल्स्टोइ** या रशियन् गृहस्थाचा **' तर मग काय करावें** (' What to Do Then ? ') ' या नांवाचा ग्रंथ आहे, तो वाचिला असतां धार्मिक ख्रिस्ती गृहस्थाच्या

मनाची स्थिति लक्षांत येते. परंतु इकडे सुधारणापंथाचे लोक विचार करीत आहेत कीं ' कायहो, हा धर्म केव्हां नाहींसा होईल ? हा नाहींसा होईल कीं कांहीं रूपांतर होऊन राहील ? समाजांत यापासून कांहीं फायदा होण्यासारखा आहे काय ? असलाच तर राहूं द्या एका कोपऱ्यांत पडून ! '

खिस्ती धर्माचीं वर जीं थोडीं उदात्त तत्त्वें सांगितलीं तीं हिंदुधर्माच्या तत्त्वांप्रमाणेंच आहेत. सर्व धर्मांचीं मूळतत्त्वें सारखींच असायाचीं. परंतु हिंदुधर्माचीं तत्त्वें अधिक व्यवहारोपयोगी आहेत, केवळ चिंतनोपयोगी नाहींत, असें पुढें तुमच्या लक्षांत येईल. तीं व्यवहारोपयोगी आहेत ही एक गोष्ट व हिंदूंचा स्वभावच धार्मिक ही दुसरी गोष्ट, यांमुळें धर्मतत्त्वांचा आह्मांवर अधिक परिणाम झालेला आहे, व तीं आमच्या मनोवृत्तींशीं बऱ्याच अंशीं एकरूप होऊन गेलीं आहेत. तीं तत्त्वें ऐकतांच या गोष्टीचा तुह्मांस प्रत्यय येईल. "

---

# भाग १५ वा.

## हिंदु धर्माचीं पंच महातत्त्वें.

६५. "हिंदुधर्माचीं आतांपर्यंत अनेक रूपांतरें झालीं आहेत. प्रत्येक रूपांतराचे वेळीं स्थिर विवेकानें कांहीं नवीन तत्त्वें प्रबळपणें लोकांच्या मनांवर अंमल करूं लागत व पूर्वींच्या कांहीं तत्त्वांस तसेंच क्षीणत्व येई. याप्रमाणें प्रत्येक रूपांतराचे वेळीं कांहीं तत्त्वें मागें पडत, कांहीं कायम राहत व कांहीं नवीनच धर्मांत अंतर्भूत होत. या तत्त्वांच्या धोरणानें हिंदुधर्माचा इतिहास लिहूं लागल्यास आमच्या पूर्वजांचीं मनें पारमार्थिक विवेकांत कशीं सुसंस्कृत होत गेलीं हें फार उत्तम रीतीनें दाखवितां येईल. परंतु तूर्त त्या विषयाचा विचार करण्याचें कारण नाहीं. हिंदु लोकांचा सुधारणेचा काळ जाऊन बरींच शतकें झालीं आहेत. ज्या कारणांनीं त्यांमध्यें सुधारणेस लवकर आरंभ झाला, त्याच कारणानें तो काळ लवकर संपून

गेला. परंतु इतर जुन्या राष्ट्रांप्रमाणें, आमची सुधारणा जेव्हां विलयास गेली तेव्हां तिच्याबरोबर आह्मी स्वतःही विलयास गेलों नाहीं. याचें कारण असें कीं उत्कृष्ट धर्मव्यवस्थेमुळें वर्गावर्गांचीं कर्तव्यें उत्तम प्रकारें नियमित केलीं गेलीं व कोणासही जीवनार्थ विलक्षण प्रकारचा कलह करण्याची आवश्यकता राहिली नाहीं. ज्याचीं कर्तव्यें त्यानें करायाचीं असा निश्चय राखिल्यामुळें केव्हांही सर्व राष्ट्र युद्धसंग्रामांत गुंतून गेलें नाहीं. ज्यांचें युद्धाचें काम नव्हे, ते समोर युद्ध चाललें असतां तटस्थ रहात. यामुळें जरी अनेक राज्यक्रांत्या झाल्या, तथापि नवीन राज्यकर्त्यांस देशांतील सर्व लोक शत्रूंप्रमाणें वाटले नाहींत व ते तसे नव्हतेही. बहुतेक प्रजाजनांची उद्योगशीलता, व धर्मपरायणता पाहून नवीन राज्यकर्त्यांचें प्रेम त्यांवर बसे; प्रजेचें हित चिंतणें यांतच राज्याच्या समृद्धतेचें बीज आहे असें त्यांस कळून येई.

नवीन राज्यकर्त्यांस योग्य करभार देऊन आपआपलीं कर्तव्यें पूर्ववत् करीत राहण्याची व पूर्ण समाधानानें आयुष्य घालविण्याची ही जी आमची तऱ्हा, ती दुसऱ्या विलयास गेलेल्या राष्ट्रांमध्यें सांपडत नाहीं. हा आमचा विशिष्ट गुण पूर्वापार चालत आलेल्या जातिभेदामुळें आह्मांत आलेला आहे. अनेक राज्यक्रांत्यांतून या जातिभेदानेंच आह्मांस पार पाडलें आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. जातिभेदाचें व निश्चितकर्तव्यशीलतेचें ह्या प्रकारचें महत्त्व इंग्रज राज्यकर्त्यांच्या ध्यानांत आलेलें नाहीं व ते जातिभेद मोडण्याचा प्रयत्न करीत आहेत. परंतु तसें करणें त्यांच्या राज्यसत्तेच्या स्थैर्यास बाधक होणारें आहे. हिंदुस्थानांत जीवनार्थ कलह फारच थोडा दिसतो हें पाहूनही राज्यकर्त्यांस आश्चर्य वाटतें; परंतु तोही धर्माचा व जातिभेदाचा परिणाम गणिला पाहिजे. आमचा धर्म व जातिभेद असाच कायम राहिल्यास पूर्वींप्रमाणें आणखी कितीही राज्यक्रांत्या पुढें झाल्या तरी त्यांतून आह्मी सुरक्षितपणें पार पडूं. कोणाही राज्यकर्त्यास हिंदूंवर राज्य करणें जितकें सुलभ व सुखाचें होईल तितकें दुसऱ्या कोणत्याही धर्माच्या लोकांवर होणार नाहीं.

६६. सुधारणेच्या काळानंतर राष्ट्राची ऐश्वर्याबद्दलची महत्त्वा-

कांक्षा वहुधा कमी होते व मग तें राष्ट्र धर्माकडे वळतें. धार्मिक किंवा पारमार्थिक सुखाची आह्मांस जी फार लवकर गोडी लागली तिचें कारण या देशाचें हवामान अथवा सृष्टस्थिति हें असावें. अतिशय शारीरिक कष्ट करणें या उष्ण कटिबंधांत शक्य नाहीं व हितकारकही नाहीं. वरें, शारीरिक आवश्यकताही थोड्या व थोड्या श्रमानें प्राप्त होणाऱ्या आहेत. या आवश्यकता वाढविणें ( ह्मणजे खाण्यापिण्याची चैन करणें, लत्तेकपडे फाजील वापरणें, इ०) हें आरोग्यास हितावह होत नाहीं, असा पाश्चात्यांचाही अनुभव आहे. तेव्हां अल्प श्रम करून, विश्रांति घेणें व त्या विश्रांतीचे वेळीं पारमार्थिक विचार करणें, हेंच साहजिक आहे; व हाच मार्ग आमचे धर्मांत श्रेयस्कर गणिला आहे.

हिंदुधर्माचीं तत्त्वें हिंदूंच्या मनांत मुरलेलीं आहेत व त्यांचा परिणाम हिंदूंच्या नित्याचरणांतही दृष्टोत्पत्तीस येतो. पुष्कळांस तीं स्पष्टपणें सांगतां येणार नाहींत हें खरें, परंतु याचें कारण तत्त्वशोधनाच्या दृष्टीनें हिंदुधर्माचा आतांपर्यंत कोणीं फारसा विचार केलेला नाहीं. हीं मूळ तत्त्वें कोणतीं तीं आतां सांगतों:—

६७. ईश्वराची व्यापकता हें हिंदुधर्माचें पहिलें तत्त्व आहे. कोणा अडाणी हिंदूसही ईश्वर कोठें आहे असें विचारलें असतां, तो जळीं, स्थळीं, काष्ठीं, पाषाणीं, सर्वांच्या अंतर्यामीं भरून उरला आहे असें तो उत्तर देईल. ईश्वराचा अंश जेथें नाहीं असें कांहींच नाहीं. या तत्त्वाच्या अंगीकारानें जेथें श्रद्धा बसेल, जेथें उपकारित्व दिसेल, जेथें ईश्वराच्या गुणांचा बोध होण्यास, स्मरण होण्यास, कारण असेल—तेथें हिंदूंमध्यें पूज्यभाव उत्पन्न होतो. अश्वत्थवटादि महान् वृक्ष छायादानानें आपलें उपकारित्व व्यक्त करितात; गंगायमुनादि नद्या जलदानानें तें प्रकट करितात; तृणधान्यादि-दानानें पृथ्वी तें स्पष्ट करितें. साधुसंत वरिष्ठ ज्ञानानें, सदुपदेशानें, परोपकारानें व इतर श्रेष्ठ गुणांनीं आपणांमधील विशिष्ट ईश्वरी अंश अनुभवास आणून देतात. श्रद्धा किंवा भाव यांमुळें मूर्तीमध्येंही ईश्वरी अंश दिसूं लागतो. केवळ नामस्मरणानेंही मनास ईश्वराची प्रतीति होते. याप्रमाणें ईश्वराच्या व्यापकतेचें तत्त्व सर्व हिंदूंच्या मनावर परिणाम क-

रीत आहे, व ईश्वरासंबंधानें जी पूज्यता पूर्णत्वानें उत्पन्न व्हावी असें वाटतें तिचा अनेक मार्गांनीं आह्मांमध्यें प्रादुर्भाव होतो. आमचें वास्तव्य ईश्वरांतच आहे असें आह्मांस भासतें.* ईश्वराची व्यापकता ख्रिस्ती तत्त्ववेत्त्यांस मान्य असून त्यांनीं तिचा धर्मतत्त्वांत संग्रह केलेला नाहीं हें आश्चर्य आहे.

६८. ईश्वर आणि मनुष्य, परमात्मा आणि आत्मा यांमध्यें राजा आणि प्रजा यांच्यासारखा मूळ संबंध आहे. हें हिंदुधर्माचें दुसरें तत्त्व होय. या तत्त्वाअन्वयें ईश्वराकडून जें जें आपणांस प्राप्त होतें, त्याचा अंशमात्र तरी ईश्वरप्रीत्यर्थ आपण अर्पण केला पाहिजे. † ईश्वरापुढें आपणांस नम्र करून घेण्याची व त्याचे उपकार प्रत्यक्षपणें मानण्याची ही योजना आहे; ईश्वरास कोणतीही गोष्ट कमी आहे ती पुरविण्याचा यांत उद्देश नाहीं. परंतु या योजनेचा, भक्ति, त्याग आणि परोपकार यांशीं पुढें संबंध जडतो व त्यांपासून अनेक उत्कृष्ट धार्मिक रूढि उत्पन्न होतात.

फार प्राचीन काळापासून हिंदुस्थानांत राजा आणि जा यांचा संबंध अतिशय निकट समजला गेला आहे. देशास राजा नाहीं, यासारखें दुसरें कोणतेंच अरिष्ट नाहीं असें पूर्वींपासून प्रजेस वाटत

* त्वमादिदेवः पुरुषः पुराणस्त्वमस्य विश्वस्य परं निधानम् ।
वेत्ताऽसि वेद्यं च परं च धाम त्वया ततं विश्वमनंतरूप ॥
वायुर्यमोऽग्निर्वरुणः शशांकः प्रजापतिस्त्वं प्रपितामहश्च ।
नमो नमस्तेऽस्तु सहस्रकृत्वः पुनश्च भूयोऽपि नमो नमस्ते ॥
नमः पुरस्तादथ पृष्ठतस्ते नमोऽस्तु ते सर्वत एव सर्व ।
अनंतवीर्यामितविक्रमस्त्वं सर्वं समाप्नोषि ततोऽसि सर्वः ॥

भ० गीता. अ० ११. ३८–४०

† पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति ।
तदहं भक्त्युपहृतमश्नामि प्रयतात्मनः ॥
यत्करोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासि यत्
यत्तपस्यासि कौंतेय तत्कुरुष्व मदर्पणम् ॥

भ० गी० अ० ९; २६, २७.

आहे. राजा ह्मणजे प्रजाजनांचा मायबाप, बंधुसोयरा होय. हाच संबंध भक्तिभावामुळें ईश्वराशींही लागू झाला. त्यामुळें साधुसंतांनीं ईश्वराची प्रार्थना करीत असतां भक्तिरसानें सद्गदित होऊन, देवराया, बाप्पा पांडुरंगा, विठाई माउली, इत्यादि प्रकारांनीं ईश्वरास आळविलें आहे. मातापुत्रांचा जो संबंध तो ईश्वराशीं दुसऱ्या कोणत्याही धर्मांत जोडलेला नाहीं. पितापुत्रांच्या संबंधापेक्षां मातापुत्रांचा संबंध अधिक निकट आहे. त्यामुळें मनुष्याची अनाथता व ईश्वराची वत्सलता उत्कृष्टपणें व्यक्त होते. जों जों मन भक्तिमार्गास लागतें तों तों ईश्वरावरील भरंवसा वाढत जातो; त्याकडे आपला ओढा अधिक होतो; मग 'त्वमेव माता, पिता त्वमेव त्वमेव बंधुः स्वजनस्त्वमेव' अशी अंतःकरणाची ईश्वरपरायण वृत्ति होते.‡

संसारांत अन्नपानादि कांहीं नित्यकर्मे खेरीज करून बाकी मनुष्याचीं सर्व कृत्यें मातापिता, कन्यापुत्र, इष्टमित्र यांस आपण प्रिय व्हावें ह्मणून योजिलेलीं असतात. ज्ञानार्जनाचे व द्रव्यार्जनाचे प्रयास, व ऐहिक दुःख, कष्ट, चिंता, विपत्ति हीं सर्व सोसण्यास मनुष्य जो तयार होतो तो मुख्यत्वें कुटुंबाच्या व बांधवांच्या हिताकरितां होय. भक्तिभावानें ईश्वर हा परम श्रेष्ठ बंधु झाल्यावर त्यास प्रिय व्हावें ह्मणून—त्याचा संतोष व्हावा ह्मणून—कोणतें कृत्य करण्यास, कोणतें दुःख सोसण्यास, मनुष्य तयार होणार नाहीं ? ईश्वरास प्रिय होण्याचा मार्ग ह्मटला ह्मणजे त्याच्या गुणांचें अनुकरण करणें, त्याच्या आज्ञा पाळणें, त्यानें दिलेल्या उत्कृष्ट प्रेरणांस ह्मणजे मनोदेवतेस अनुसरणें, हा होय. ईश्वराचा संतोष होण्यास काय करावें ? हेंच कीं सृष्टीमध्यें ईश्वरी अंशानें प्रेरित अशा जेवढ्या व्यक्ति आहेत, ज्यांस सुखसंतोष होण्याची शक्यता आपणांस दिसत आहे, त्या सर्व व्यक्तींस आपल्या आचरणानें संतोष द्यावा. आपलें शरीर, आपलें बळ, आपली बुद्धि व आपली संपत्ति हीं सर्व आपणांभोंवतीं सर्वत्र संतोष दिसावा याकरितां खर्च केलीं ह्मणजे अर्थात् ईश्व-

‡ अनन्याश्चिंतयंतो मां ये जनाः पर्युपासते ।
तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ॥

भ० गी० अ० ९, २२.

राचा संतोष झाला. अशा प्रकारें आपलें जीवितच संतोषमय होतें. या कार्याकरितां जो स्वसुखत्याग अथवा द्रव्यत्याग त्यासच कित्येक वेळां धर्म ही संज्ञा लावण्यांत येते. या गोष्टीचीं व्यवहारांत प्रत्यक्ष उदाहरणें अनेक आहेत. दीनदुबळ्यांस साहाय्य करणें, परोपकारार्थ तळीं, धर्मशाळा वगैरे बांधणें, ईश्वराच्या ध्यानस्मरणपूजनोत्सवाकरितां मंदिरें बांधणें, ईश्वराचें मोठें कुटुंब ह्मणजे भूतमात्र त्याविषयीं अनुकंपा बाळगणें, या सर्व कृत्यांकडे यथाशक्ति व्यय करणें, किंबहुना सर्वस्व अर्पण करणें व एकंदरीनें जगाच्या संतोषांतच ईश्वराचा संतोष मानणें—हाच धर्म अथवा हाच श्रेष्ठतम धर्म असें अनेक महात्म्यांनीं मानिलें आहे. हिंदुधर्मांत भक्तिमार्ग व तदनुसार धर्माचार आणि त्यागमाहात्म्य हीं कशीं परंपरेनें उत्पन्न होत गेलीं, तें या दुसऱ्या धर्मतत्त्वावरून ध्यानांत येतें.

६९. हिंदुधर्माचें तिसरें मूळतत्त्व अनृणत्व* हें आहे. कोणाचेंही ऋणी राहूं नये, सर्व प्रकारच्या ऋणांची प्रथम फेड झाली पाहिजे. जो मनुष्य समाजांत राहतो, त्याचा अनेकांशीं संबंध येतो व त्यांकडून अनेक प्रकारें त्यास फायदा होत असतो. हा फायदा प्रत्यक्ष असेल किंवा परोक्ष असेल, परंतु ज्यांकडून तो मिळाला त्यांचें आपण अनृणी झालें पाहिजे. मातापितरांनीं जन्म देऊन व ममतेनें संवर्धन करून आपणांवर उपकार केलेले असतात; बंधुवर्गांनीं प्रेम दाखवून, उपदेश करून, प्रसंगीं साहाय्य देऊन उपकार केलेले असतात; त्याप्रमाणेंच ज्ञान देऊन व विनय शिकवून गुरु आपणांवर उपकार करितात. परोपकारी पुरुषांचे व वस्तुत: सर्व लोकांचे आपण प्रत्यक्ष किंवा परोक्ष रीतीनें ऋणी होतों, व याच न्यायानें पूर्वजांचेही उपकार स्मरणें आपणांस भाग पडतें. किंबहुना भूतमात्राचे आपण ऋणी आहोंत; व ऋण जे-

* ऋणैश्चतुर्भिः संयुक्ता जायंते मानवा भुवि । पितृदेवर्षिमनुजैर्देयं तेभ्यश्च धर्मतः ॥ यज्ञैस्तु देवान् प्रीणाति स्वाध्यायतपसा मुनीन् । पुत्रैः श्राद्धैः पितॄंश्चापि–आनृशंस्येन मानवान् ॥ म. भा० आ० अ० १२०. पूर्वीच्या धर्मकारांनीं हीं ऋणें तीन किंवा चार सांगितलीं आहेत, परंतु तीं तेवढीं प्रमुख आहेत असा भावार्थ समजला पाहिजे. वास्तविक पाहतां तीं अनेक आहेत.

वढें असेल तेवढ्याची तरी आपणांकडून फेड झाली पाहिजे व ती ग्राह्य रीतीनें झाली पाहिजे. या अनृणत्वाच्या तत्त्वानें अनेक धर्माचार उत्पन्न होतात. ईश्वराचे अनृणी होण्यास सर्व आयुष्यच त्यास अर्पण केलें पाहिजे हें दुसऱ्या तत्त्वानेंच सिद्ध होतें; परंतु दुसरीं मनुष्याचीं कर्तव्यें जीं त्या तत्त्वानें स्पष्टपणें निश्चित होत नाहींत तीं या तिसऱ्या तत्त्वाखालीं येतात. मातापितरांचे उपकार फेडण्याचा त्यांस ग्राह्य असा मार्ग ह्मटला ह्मणजे, त्यांची आज्ञा पाळणें, त्यांस बहुमान देणें, त्यांचें वृद्धापकाळीं पालनपोषण करणें, इत्यादि हा होय. कन्यापुत्रांच्या संबंधानें पालनपोषण, शिक्षण, विवाह व सुखानें त्यांचें आयुष्य जाईल अशी तजवीज करणें हीं अनृणी होण्याचीं साधनें आहेत. दंपत्यांनीं परस्परांचें अनृणी होण्याकरितां अव्यभिचारानें व परस्परहितांत सुखसर्वस्व मानून राहिलें पाहिजे. याप्रमाणेंच गुरु, बांधव, समाज, पूर्वज यांसंबंधानें आपलीं कर्तव्यें उत्पन्न होतात; व तीं योग्य रीतीनें बजाविल्याखेरीज धर्मसाधन होत नाहीं. स्नानसंध्या, श्राद्धपक्ष, होमहवन, अहिंसा इत्यादि जीं जुनीं धर्मकृत्यें अद्यापि प्रचारांत राहिलीं आहेत, त्यांचें बीज या अनृणत्वाच्या तत्त्वामध्यें सांपडतें. केवळ ईश्वरपरायण कां होऊं नये, प्रपंचांत कां शिरावें, ऐहिक कर्ममार्ग कसा उत्पन्न होतो, या सर्व प्रश्नांचें उत्तर या एका तत्त्वावरून देतां येतें. सर्वांचा अनृणी झाल्यावर मग संन्यासाश्रम व शुद्ध आत्मपरता किंवा ईश्वरपरायणता हीं इष्ट व श्रेष्ठ मानिलीं आहेत.

७०. हिंदुधर्माचें चवथें मूलतत्त्व हें कीं, जें अक्षय्य, अविनाशी किंवा शाश्वत तें ग्राह्य व जें क्षयवृद्धि पावणारें, नश्वर किंवा अशाश्वत तें त्याज्य. या तत्त्वावर हिंदुधर्मकारांनीं नीतीचा पाया रचिला आहे. कोणतें सुख ग्राह्य व कोणतें त्याज्य हा विचार करितांना या तत्त्वाचा उपयोग होतो. असत्य, अतिलोभ, व्यभिचार, मद्यप्राशन इत्यादि दुर्वर्तनें या तत्त्वानें दोषी ठरतात. केवळ प्रापंचिक सुखांत निमग्न होऊन परमार्थास विसरणें हें युक्त नव्हे असें याच तत्त्वावरून दिसतें. हिंदुलोकांत जी विशेष समाधानवृत्ति दिसते तिचें मूळ या तत्त्वांत आहे; व ती बारीकसारीक कामांत व तशीच मोठ्या राष्ट्रीय कामांत सारखीच दिसून येते. कपडालत्ता करायाचा तेव्हां त्याच्या बाह्यस्वरूपाकडे

विशेषसें लक्ष द्यावयाचें नाहीं, तर त्याचा टिकाऊपणा पहायाचा; भांडींकुंडीं तांब्याचीं पाहिजेत, कांचेचीं नकोत; द्रव्याचा ठेवा सोनें-चांदीच्या रूपानें पाहिजे, कागदी नोटांच्या रूपानें नको; मालमत्ता स्थावर असावी, जंगम नको; नित्याची भाजीभाकर बरी, क्षणिक राज्यसत्ता नको. याप्रमाणें ही जी हिंदूंची समाधानवृत्ति आहे तीमुळें डामडौल, भपका, खाण्यापिण्याची चैन, यथेष्ट सुखोपभोगाची हौस, द्रव्यसंपादनार्थ अतिरिक्त उद्योग करण्याची इच्छा, किंवा राज्यांत प्रबळ होण्याची, लोकांवर सत्ता चालविण्याची, व त्याद्वारें प्रतिष्ठा मिळविण्याची महत्त्वाकांक्षा, या सर्व गोष्टी त्यांस फारशा महत्त्वाच्या वाटत नाहींत. या गोष्टींविषयीं वयाच्या किंवा प्रकृतीच्या मानानें जरी आह्मांस एका वेळीं ईर्षा उत्पन्न झाली तरी ती फार दिवस टिकत नाहीं; आमचा आवेश क्रमानें गळत जातो. 'हीं सर्व घेऊन काय करितां, आज आहेत व उद्यां नाहींत, कां व्यर्थ आयास करावे ?' असा वैराग्यरूपी विचार क्रमानें आमच्या अंतःकरणांत उत्पन्न होतो ? व आमचा उद्योग शिथिल पडत जातो. "अशाश्वत संग्रह कोण करी!" हें कवींचें वचन आमच्या समाधानी स्वभावास व या चवथ्या धर्मतत्त्वास अनुलक्षून आहे व तें खरें आहे.

७९. हिंदुधर्माचें पांचवें तत्त्व हें कीं ईश्वरानें ज्या स्थितींत आपणांस उत्पन्न केलें त्याच स्थितींत आपल्या आयुष्याचें पूर्ण चीज करून दाखवावें. 'स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः'। या वचनानें या तत्त्वाचा बोध होतो.

"स्वातंत्र्य, समता व बंधुता" हीं राज्यक्रांतिकारक व व्यवहारांत अप्रयोज्य अशीं तत्त्वें हिंदुधर्मानें स्वीकारिलेलीं नाहींत, उत्क्रांतिपंथीयांनीं तीं अयोग्य ठरविलींच आहेत, व कोणी कसाही ख्रिस्ती धर्मोपदेशक परधर्मीयांस उपदेश करावयास गेल्यास हीं तत्त्वें तो त्यांस कळूं देत नाहीं. ख्रिस्तीधर्माची उत्पत्ति मत्स्याहारी कनिष्ठ वर्गांतील श्रेष्ठ पुरुषाकडून झाली, त्यामुळें नैसर्गिक गुणभेदानें मनुष्यांचें व्यवहारांत वर्गीकरण झालेंच पाहिजे हें त्यानें ओळखलें नाहीं. शिवाय त्याची धांव मनुष्यांच्या परस्पर बंधुत्वापर्यंत गेली, पशुहिंसानिवारणापर्यंत

RANADE, Pune
B
35514
PERSONAL LIBRARY



गेलें नाहीं. हिंदुलोकांशीं युरोपीयांचा संबंध जडल्यापासून त्यांस सर्वभूतानुकंपेचें तत्त्व मान्य होत चाललें आहे. मनुष्येतर प्राण्यांशीं क्रौर्यानें वागूं नये ह्मणून क्रौर्यनिवारक मंडळ्या स्थापन होत आहेत. सजीव प्राण्यांवर शास्त्रीय प्रयोग करून त्यांस छळूं नये, असा त्यांनीं निर्बंध केला आहे. मांसाहारित्व सोडून कित्येक धान्याहारी बनले आहेत. हीं व अशींच दुसरीं अनेक उदाहरणें पाहिलीं असतां हिंदुधर्माचा ख्रिस्ती धर्मावर झालेला परीणाम लक्षांत येतो. परंतु उत्क्रांतिपंथाचें जीवनार्थ कलहाचें तत्त्व युरोपीयांनीं अंगीकारल्यामुळें हा परिणाम वळावत नाहीं.

असो. हिंदुधर्मानें सर्व मनुष्यांशीं सौजन्य व सर्वभूतांशीं अनुकंपा सांगितली, परंतु सर्व भूतांची किंवा सर्व मनुष्यांची सारखी योग्यता सांगितली नाहीं, कारण ती यथार्थ नाहीं. गुणकर्मांनीं मनुष्यांत भेद राहणार व या भेदामुळें त्यांच्या मनोवृत्तींस निरनिराळें वळण लागणार, ही खरी स्थिति जाणून धर्मानें वर्णभेदाची स्थापना केली. या वर्णभेदानें ईश्वराशीं सर्वांचा संबंध सारखाच राहिला; परंतु समाजाचें योग्य वर्गीकरण होऊन त्यास स्थैर्य आलें. प्रत्येक वर्गाचीं सामान्य कर्तव्यें निश्चित झालीं, त्यामुळें समाजांत अंतस्थ कारणांनीं क्रांति, घोरकृत्यें व रक्तपात होण्याचें भय राहिलें नाहीं. गुणांचा पूर्ण प्रकाश पाडण्यास, स्वकर्मांत पूर्णता मिळविण्यास, व सामाजिक आणि पारमार्थिक कृत्यांनीं उपकारक होण्यास वर्णभेद मुळींच आड येत नाहीं. अलीकडील पांच सांतशें वर्षांतील साधुसंत, हिंदु राज्यकर्ते, व्यावहारिक कार्यांत गुंतलेले पुरुष, वगैरे या सर्वांचें आचरण पाहिल्यास, किंबहुना हल्लींची हरएक जातीची स्थिति सूक्ष्म दृष्टीनें अवलोकिल्यास या गोष्टीचा प्रत्यय येईल. मूर्ख व दुराग्रही लोक सर्वत्र असावयाचेच, त्यांचीं कृत्यें मात्र अशा विवेचनांत मनांत आणितां कामां नये.

७२. याप्रमाणें हल्लींचें हिंदुधर्माचें स्वरूप या पंचतत्त्वांवर अवलंबून आहे. यांत स्वर्गनरक, पुनर्जन्म, कर्मदशा, वगैरेंचा अंतर्भाव केलेला नाहीं, कारण जीं तत्त्वें कर्तव्यनियामक असतात तींच मूळ समजलीं पाहिजेत; इतर आनुषंगिक होत. एकदा कर्तव्य नियमित झाल्यावर,

ह्मणजे पाप कोणतें व पुण्य कोणतें हें ठरल्यावर, पापी व पुण्यवान् पुरुषांस शिक्षा आणि प्राप्ति कोणती असावी, ती कशी प्राप्त होते, इत्यादि प्रश्न उत्पन्न होतात. परंतु ते गौण होत असें विचाराअंतीं दिसून येईल. हिंदुधर्माचीं सांप्रतचीं हीं पंचमहातत्त्वें सर्व धर्मांच्या उच्च स्थितींत त्यांस लागू पडण्यासारखीं आहेत. पारमार्थिक कर्ममार्गाचें हें अत्युत्कृष्ट स्वरूप आहे. या तत्त्वांच्या साहाय्यानें कालपरत्वें हिंदुधर्माचें संशोधन होत गेल्यास त्यास सर्व हिंदुजन संमति देतील; व हा प्रयत्न सर्व विद्वान् सुज्ञ पुरुषांनीं आरंभिला पाहिजे. पाश्चात्य सुधारणेसारखी सुधारणा आमच्या समाजांत करण्याचे दिवस गेले. पाश्चात्य उत्क्रांतिपंथीयांस जीवनार्थ कलहाचें तत्त्व जें अनिवार्य वाटत आहे, जें त्यांमधील अविचारी लोक आपल्या नीच कृत्यांच्या मंडनार्थ गृहीत करितात, व जें त्यांतील धार्मिक व श्रेष्ठ मनोवृत्तींच्या पुरुषांस पूर्णपणें द्वेष्य व त्याज्य वाटतें—तें तत्त्व अनिवार्य नाहीं, त्यावांचून मनुष्य थोरवीनें आपलें व समाजाचें जीवित्व राखूं शकतो, असें हिंदुधर्माच्या या पंचमहातत्त्वांचा विचार केला असतां दिसून येतें. हिंदुसमाजाचें इतक्या शतकांचें आयुष्य या सिद्धांताची साक्ष देतें."

---

# भाग १६ वा.

## मी मूर्ख, मला धर्मज्ञान संपादिलें पाहिजे, अशी उत्कंठा वाटूं लागली.

७२. सदानंदस्वामींचें व्याख्यान ऐकून घेऊन मी घरीं आलों, व निवांतपणीं बसलों असतां माझ्या मनांत अनेक विचार घोळूं लागले. ख्रिस्ती लोकांचा धर्म दुर्बळ होत चालला आहे, हें मला पूर्वींच माहीत होतें; परंतु त्यांमध्यें नीतीचीं सामान्य तत्त्वें अधिक प्रबळपणें नांदत असल्यानें धर्माची आवश्यकताच कमी राहते असें माझें मत होतें. आतां सामाजिक नीति आणि राजकीय नीति यांमध्यें युरोपीय राष्ट्रें फार मोठा भेद करितात, व तो केवळ स्वार्थसा-

धनासाठीं, हें सर्वत्र प्रसिद्धच आहे, व तें कोणीं सांगायास नको होतें. राजनीतींत युरोपियन् लोकांची वर्तणूक फार अन्यायाची असते व तेथें जीवनार्थ कलहाचें तत्त्व ते मोठ्या क्रौर्यानें अमलांत आणितात यांत शंका नाहीं. परंतु समाजांतील परस्पर व्यवहारांत हेंच तत्त्व शिरून युरोपियन् राष्ट्रांत मोठी धामधूम सुरू आहे; कनिष्ठ वर्गांत अत्यंत असमाधान आहे; व सापेक्षपणें दारिद्र्याचा विचार केला असतां तेंही वाढत आहे, इत्यादि गोष्टींकडे सदानंदस्वामींनीं माझें लक्ष वळविलें.

युरोपीय लोकांचे सामान्य मनुष्यजातीच्या उत्कर्षाकरितां ह्मणून जे उद्योग चालू आहेत तिकडे माझ्या विचारांचा ओघ वळला व त्यांत स्वार्थ किती व परमार्थ किती हें मी पाहूं लागलें. तेव्हां मला त्या दोहोंचें सर्वत्र विलक्षण मिश्रण दिसून आलें. ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या मागें ख्रिस्ती व्यापारी व ख्रिस्ती शिपाई अवश्य असायाचे. मिशनऱ्यांस मोठ्या खर्चानें परदेशांत पाठविणारे लोक खरे परोपकारी व धर्मभक्त असावे असें दिसतें, परंतु त्यांच्या परोपकाराचें चीज होऊं नये ह्मणून व्यापारी लोक आपलीं दारूच्या पिपांनीं भरलेलीं गलबतें त्यांच्या मागोमाग घेऊन जातात; मग ख्रिस्ती शिपायांचें लवकरच काम पडतें; व धर्म आणि नीति एकीकडे राहून जीवनार्थ कलह सुरू होतो. याप्रमाणें व्यापारी व राजकारस्थानी लोकांच्या उपद्व्यापामुळें धार्मिक लोकांचे परोपकाराचे सर्व प्रयत्न व्यर्थ जातात. ख्रिस्ती लोकांनीं अमेरिकेंतील गुलामगिरी बंद केली याविषयीं ते स्वतःची फार प्रशंसा करितात; परंतु अमेरिकेंतील सिध्ध्यांची दास्यांतून सुटका झाल्यापासून तों आतांपर्यंतची स्थिति पाहिल्यास ती फारशी स्पृहणीय दिसत नाहीं. ते नीच व आपण श्रेष्ठ असें गोरे अमेरिकन लोक काळ्या सिध्ध्यांस नित्य नित्य जाणवीत आहेत; व या द्वारें ते लक्षावधि लोकांस एकंदर किती दुःख देत आहेत हें मोजिल्यास त्यांच्या पूर्वींच्या परोपकाराची किंमत फार कमी होते. याप्रमाणें अनेक उदाहरणें घेऊन मीं पुष्कळ विचार केला. मला असें दिसून आलें कीं मानवी जातीच्या हितासंबंधाच्या युरोपीयांच्या सर्व खटपटी स्वार्थानें व गर्वानें दूषित झालेल्या आहेत. आप-

त्या खटपटी किती उत्तम व किती थोरवीच्या आहेत याविषयीं न्याय करणारे व लिहिणारे ते स्वतःच असल्यानें, लोकांचे दोष तेवढे दाखवून व आपलें शुद्ध गौरव वाढवून आह्मांसारख्यांस ते भुरळ पाडतात. वास्तविक पहातां, तूर्तची त्यांची वृत्ति जीवनार्थ निकरानें कलह करण्याची आहे, युरोपांतील प्रबळ ख्रिस्ती राज्यें एकीकडे व बाकीचें जुनें जग दुसरीकडे; या उभयतांमध्यें हा कलह आहे. या कलहांत या बाकी जगाचा कसा टिकाव लागेल हा विचार आह्मां हिंदूंस अत्यंत चिंताव्याकुळ करणारा आहे.

७४. पाश्चात्यांचें बळ कशांत आहे हें पहातां तें मुख्यत्वें तीन गोष्टींत आहे असें दिसतें व या तीन गोष्टींमुळें त्यांच्या सुधारणेस बळ आलेलें आहे. त्यांचे स्नायु सुदृढ व मेंदू मोठा, ह्मणजे शारीरिक व मानसिक वरिष्ठता, ही एक गोष्ट त्यांस अनुकूळ आहे. पूर्वेकडील राष्ट्रें ही उणीव कशी तरी भरून काढतील. पाश्चात्यांच्या अंगीं निश्चय व कर्तृत्वशीलता अधिक आहे, ही दुसरी त्यांस अनुकूळ गोष्ट होय. हा गुण इकडील राष्ट्रांत येणें कठीण आहे. धोक्याच्या व धाडसाच्या कामांत इकडील लोक प्रथम पडण्यासच कचावतील, पडले तर दम धरून फार वेळ राहणें कठीण, व राहिल्यावर यश आलें तथापि आपल्या कर्तृत्वानें त्याचा पूर्ण फायदा घेणें हें आमच्यानें होईल कीं नाहीं याची शंका वाटते. धोका व भय समोर असतां त्यास तोंड देऊन एकानें किंवा दोघांनींच नव्हे, तर सर्वांनीं उभें राहणें, पिढीमागें पिढीनें हें व्रत चालविणें, व ज्या यशाची किंवा उत्कर्षाची जोड करायाची तो मिळाल्यावर त्याचें जतन करण्यांतही तसाच पराक्रम व निग्रह दाखविणें, हें इकडील लोकांच्या हातून होणें नाहीं, असें दृष्टि दूर पोंचविली ह्मणजे दिसतें. वस्तुतः इतका पराक्रम व निग्रह धारण करण्यासारखें कार्य कोणतें हाच प्रश्न इकडील समाधानी लोक विचारतील. प्रामाणिकपणा हा असाच मनोनिग्रहाचा गुण आहे; तोही फार दिवस चालविण्याचें आमच्याकडून घडणें कठीण; आमच्या मनास निग्रहाचा ताण फार दिवस सोसत नाहीं; तें आस्ते आस्ते दुर्बळ होत जातें, मग एकाद्या क्षुल्लक कारणानें त्याचा भंग होतो व आमचा पूर्वींचा

सर्व प्रयत्न फुकट जातो. धाडस व प्रामाणिकपणा एकीकडे ठेविला, केवळ उद्योगाची गोष्ट घेतली, तथापि हीच तऱ्हा दिसून येते. संतत श्रम करून सामर्थ्याची पराकाष्ठा करणें, हें आह्मांस साधत नाहीं. सारांश, जीवनार्थ कलहांत प्राणघातक हत्यारांचा उपयोग करायाचा नाहीं, सर्वप्रकारें न्यायानें वागायाचें असा युरोपीयांनीं करार केला, तथापि ते केवळ उद्योग आणि श्रम यांनींच इकडील लोकांस मागें पाडतील. तेव्हां त्यांशीं चढाओढींत आमचा निभाव लागणें नाहीं. शिवाय असा करार करण्यास बुभुक्षित युरोपीय लोक कसे तयार होतील ?

७५. मोठ्या राष्ट्रीय प्रयत्नांनीं वरील सर्व गोष्टी आह्मीं अनुकूल करून घेतल्या तथापि तिसरी जी गोष्ट युरोपीयांस अनुकूल आहे, ती हल्लीं तरी आह्मांस साध्य होण्यासारखी नाहीं. ज्ञान आणि कलाकौशल्य, ( विशेषत: जीवनार्थ कलहांत जें उपयोगीं पडायाचें तें, ) त्यांस आज प्राप्त झालेलें आहे. आह्मांस तें प्राप्त करून घेणें आहे. या कामीं त्यांच्याशीं आमची बरोबरी होण्यास एक शतक तरी पुरेल कीं नाहीं हें सांगतां येत नाहीं; व जरीं इतक्या काळांत आमची तयारी खास होईल असें गृहीत केलें तरी एवढा काळपर्यंत पाश्चात्य राष्ट्रें स्वस्थ बसण्यास कबूल होतील काय ? त्यांच्या कारस्थानांत मुख्य जी अडचण आहे ती वाढत्या लोकसंख्येची. तिच्या जोरानें जीवनार्थ कलहास अनिवार्य वेग येतो व मनुष्यतेच्या हिताचे सर्व प्रश्न मागें पडतात.

७६. हीं पाश्चात्यांच्या बळाचीं कारणें पाहतां पूर्वेकडील राष्ट्रांवर मोठा दुर्धर प्रसंग लवकरच येऊन गुदरण्याचा संभव आहे. अशा प्रसंगीं अजीबात लुप्त होण्यापेक्षां युरोपीयांच्या आश्रयानें राहणें सर्वस्वीं हितावह दिसतें. या स्थितींत आह्मी आहों हें सुदैवच नव्हे काय ? मग आमच्यांतील कांहीं उत्कट स्वदेशाभिमानी लोकांस ही अनिवार्य परंतु हितावह स्थिति कां दुःसह वाटते ? या स्थितींत एकच दोष आहे, तो हा कीं ऐहिक सुखसंपत्तीचा मोठा वांटा परकीयांस द्यावा लागतो; परंतु दुसरा तींत मोठा गुण आहे तो हा कीं पारमार्थिक सुखाच्या साधनास बिलकूल विघ्न येत नाहीं. पार-

मार्थिक रीत्या आयुष्याचें व अंगच्या सर्व गुणांचें आह्मीं चीज करावें हीच आमची नियति असें समजणें भाग आहे !

७७. याप्रमाणें विचारांची परंपरा लागत जाऊन अखेरीस सदानंदस्वामींच्या एका सिद्धांताची मला सयुक्तिकता दिसूं लागली. 'आमचा सुधारणेचा काळ गेला, व धार्मिकतेचा काळ चालू आहे.'

परंतु एकाच राष्ट्रास पुनः सुधारणेचा काळ येणें सृष्टिनियमांप्रमाणें अशक्य आहे काय ? या प्रश्नाचा उलगडा कसा करावा ? एक तर इतिहासावरून किंवा प्रत्यक्ष अनुभवावरून. इतिहासांत धार्मिकतेच्या पंथास लागलेल्या लोकांनीं पुनः डोकें वर काढल्याचीं उदाहरणें नाहींत; प्राचीन राष्ट्रें बहुतेक मुळींच विलयास गेलीं आहेत; जीं आहेत तीं मोडकळीस आलीं आहेत किंवा परतंत्र झालीं आहेत. कोणीं धर्मांतर केलें आहे; कोणामध्यें अन्य राष्ट्रीयांची फारच भेसळ झाली आहे; आपलें रक्त व आपला धर्म शुद्ध राखून नव्या जोमानें पुनः सुधारणापंथास लागलेलें असें हल्लीं राष्ट्रच नाहीं. तेव्हां या प्रश्नाच्या निर्णयास इतिहास कामीं येत नाहीं.

उलट, आह्मी हिंदुलोक व आमचा धर्म हे जे इतके दिवस टिकाव धरून राहिलों त्याचें कारण जातिभेद व निश्चित कर्तव्यता हेंच तर नसेलना, अशी साहजिक शंका मनांत येते. सदानंदस्वामींचें तर हें ठाम मत झालेलें दिसतें. अमुक करायाचें अशाविषयीं निर्धार करणें कठीण आहे, अमुक करायाचें नाहीं असानिर्धार करणें सोपें आहे. जातिभेदानें क्षत्रियांवांचून इतरांनीं लढाई करूं नये हें ठरविलें. क्षत्रिय जात बहुतेक लढून लढून नाहींशी झाली; कोठें थोडी अवशेष असल्यास असेल. बाकीच्या लोकांस भूतदयेचें तत्त्व ग्राह्य झालें आहे. हिंस्रपशूंसही ते धक्का लावणार नाहींत, तेव्हां मनुष्याच्या जिवाचा घात करण्यास कसे तयार होतील ? आपआपली दिनचर्या आटोपावी व स्वस्थ रहावें, या पलीकडे स्वाभाविक महत्वाकांक्षा कोणास किती आहे ? या गोष्टींचें अनुमान केलें ह्मणजे आह्मी सांप्रतच्या धार्मिक स्थितींतून बाहेर पडणें कठीण आहे असेंच ह्मणावें लागतें.

७८. जे हिंदुलोक धर्मांतर करून ख्रिस्ती झाले आहेत, त्यांची उद्योगशीलता व कर्तृत्वशक्ति, हीं पाहिलीं असतां तीं वाढलेलीं दिसत नाहींत. ख्रिस्ती धर्माची स्वतंत्रता त्यांस येते, हिंदुधर्माचीं बंधनें सर्व तुटतात, परंतु उपयोग काय? स्नायूंमध्यें अधिक जोर येत नाहीं, किंवा मेंदूमध्यें अधिक भर पडत नाहीं. उलट, दारूचें व्यसन वाढतें, युरोपीयांच्या अनुकरणानें प्रपंचाचा खर्च वाढतो, मानसिक सुधारणेकडे जे प्रयत्न करायाचे ते मागें पडतात, व सामाजिक श्रेष्ठता हिंदूंस जेवढी सुसाध्य असते तेवढीही संपादण्यास ख्रिस्ती झालेल्यांस अशक्य होतें. ह्मणूनच या वर्गांत प्रसिद्ध विद्वान् मनुष्य, डाक्तर, एंजिनीयर, ग्रंथकर्ता, शोधक, शास्त्रज्ञ वगैरे दुर्मिळ आहे व युरोपीयांचा निकट संबंध त्यांस केवळ मानसिक अवनतीस नेत आहेसें दिसतें.

ख्रिस्ती न होतां ख्रिस्त्यांचें सर्व स्वातंत्र्य अनुभवणारे मध्यम व वरिष्ठ स्थितींतील लोक आह्मांत कांहीं आहेत. त्यांमध्यें विलायतेस जाऊन आलेले, तेथें शिक्षण मिळविलेले, व तिकडे त्यांसारखें राहण्यास शिकलेले असे बरेच लोक आहेत. परंतु त्यांस देखील हिंदुस्थानची हवा पुनः लागतांच ते पूर्व वृत्तीवर येतात. त्यांच्या अंगीं उद्योग व कर्तृत्व हीं रहात नाहींत. यूरोप व हिंदुस्थान यांमधील जमीनअस्मानीचें अंतर त्यांस विशेष ढळढळीतपणें दिसूं लागतें; त्यांची छाती दडपून जाते; आह्मी क्षुद्र, आह्मी मंद, आह्मी पतित, आह्मी अपराक्रमी, आह्मी अप्रामाणिक, असें त्यांस वाटून त्यांच्या हृदयांत निःसीम खेद भरतो आणि स्वतःचे लोकांविषयीं विलक्षण तिरस्कार उत्पन्न होतो. युरोपीयांशीं युरोपीय तऱ्हेनें वागावें, हिंदूंशीं हिंदु तऱ्हेनें वागावें, पाटलोण व धोतर यांचा उचित प्रसंगीं उपयोग करावा, अर्धा वेळ वर्तमानपत्रें वाचण्यांत व अर्धा वेदांताचा विचार करण्यांत घालवावा, केव्हां देशाच्या निश्चित अवनतीच्या विचारानें पूर्ण हताश व्हावें व केव्हां देशहिताच्या असाध्य कल्पनांनीं वाहवून जाऊन अत्याशेनें स्फुरण पावावें—हा एवढा परिणाम अशा लोकांवर घडलेला दिसतो. उद्योग किती वाढला, कर्तृत्व किती बळावलें, हें पाहिल्यास समाधानकारक स्थिति मुळींच दिसत नाहीं.

तेव्हां युरोपीय सुधारणेस आह्मी धर्मांतरानें, शिक्षणानें किंवा कोणत्याही दुसऱ्या मार्गानें पात्र होऊं कीं नाहीं, ही शंका कायमच राहते.

७९. याप्रमाणें जिकडून तिकडून परावृत्त झालेलें मन पुनः पुनः धर्माकडे वळतें. परंतु इंग्रजी विद्येनें विचारवंत झालेल्या लोकांस **सुधारणेइतकाच धर्मही दुःसाध्य झालेला आहे!** हिंदुधर्म हा शुद्ध फापटपसारा नाहीं, कांहीं मूळ तत्त्वांवर तो अवलंबून आहे, त्या तत्त्वांपासून अनेक आचार व रूढि उत्पन्न होतात, हें जेव्हां सदानंद स्वामींच्या संभाषणावरून मला समजून आलें, तेव्हां मला आश्चर्य वाटलें. हा एक आपणांस नवीन शोध कळला असें मनांत येऊन रामचंद्रपंतांच्या ह्मणण्याचा प्रत्यय येऊं लागला. या पंच महातत्त्वांच्या द्वारें जुन्या रूढींचें व आचारांचें संशोधन करितां येईल अशी आशा वाटूं लागली. सर्व तत्त्वांत अनृणत्वाचें तत्त्व मला अत्यंत महत्त्वाचें वाटलें. या तत्त्वाखालीं अनेक प्रकारच्या सामाजिक व राजकीय सुधारणा घालतां येतील. पाश्चात्यांनीं दिलेल्या ज्ञानाचा उपयोग या अनृणत्वाच्या तत्त्वाच्या द्वारें केला पाहिजे. हल्लींच्या राज्यकर्त्यांचें अनृणी होण्यास त्यांस योग्य करभार व बहुमान दिला पाहिजे हें खरें, परंतु हा करभार देण्यामुळें आपले देशबांधव जर उपाशीं मरण्याची पाळी आली तर त्यांच्या संरक्षणार्थ पूर्वींपेक्षां अधिक श्रम व अधिक उद्योग करून देशाची संपत्ति वाढविणें हें एक अवश्य कर्तव्य होतें. तेव्हां या रीतीनें हा उपदेश लोकांचे मनावर बिंबविणें अवश्य आहे. पूर्वजांचे ऋणांतून मुक्त होण्याचा पूर्वींचा मार्ग पुत्रोत्पत्ति आणि श्राद्धकर्म करणें हा होता. परंतु पूर्वीं परराष्ट्रांशीं जीवनार्थ कलह नव्हता; आतां तो उत्पन्न झाला आहे; तेव्हां केवळ संतानसमृद्धीनें आर्यलोकांची शाश्वती या देशांत राहील असें दिसत नाहीं. याकरितां आपल्या पुत्रपौत्रांस स्वसंरक्षणार्थ शरीरबळ व उद्योगशीलता ज्यायोगें येईल ते मार्ग एकदम अंगीकारले पाहिजेत. ज्या योगें संततीचा नाश होत आहे, ती दुबळी, रोगी व निर्बुद्ध होत आहे, त्या गोष्टींचा सर्वस्वीं त्याग केला पाहिजे. बालविवाहादि रूढि अशा प्रकारच्या उपदेशानें मागें पाडल्या पा-

हिजेत. अनृणत्वाच्या तत्त्वाखालीं कोणतीही सामाजिक सुधारणा आणितां येईल, व दुसरीं तत्त्वेंही तशींच लागू करितां येतील. परंतु तीं तशीं अमलांत आणण्यास सुधारकांत खरी **धर्मश्रद्धा** पाहिजे. नाहींतर त्यांवर दांभिकतेचा आरोप येऊन त्यांचा उपदेश कोणी ऐकणार नाहीं. तेव्हां धर्मश्रद्धा आपणांमध्यें कशी उत्पन्न करावी हा प्रश्न पुढें येतो.

८०. यावेळीं माझ्या पूर्वीच्या शिक्षणाचे सर्व दुष्परिणाम माझ्या मनांत येऊन मी खिन्न झालों. ईश्वराच्या अस्तित्वावरील भरंवसा प्रथम कोणीं उडविला हें मला सांगतां येईना, परंतु ज्यानें तो उडविला त्यानें माझें अपरिमित नुकसान केलें असें मला वाटूं लागलें. 'ईश्वरा, तुजविषयीं मला श्रद्धा दे, माझ्या मनांतील अंधकार दूर कर,' असे प्रार्थनेचे उद्गार त्यावेळीं सहजगत्या माझ्या तोंडांतून निघाले. धर्मानें सांगितलेली मनाची उदात्तस्थिति मला साध्य होती; परोपकाराकडे माझा स्वभावतः ओढा होता; श्रेष्ठ लोकांस मान देण्याची मला संवय होती; मजमध्यें सर्व भूतांची दया वागत होती; देशबांधवांच्या हिताकरितां स्वार्थत्याग करण्यास मी तयार होतों; परंतु या सर्वांस बळ कायतें मनोदेवतेचें होतें व माझ्या विद्येच्या दुष्परिणामांमुळें ती डळमळीत होऊन गेली होती. सारांश, सामान्य नीतीच्या आचरणांत मजकडून चूक होत नव्हती, परंतु मनोदेवतेनें प्रेरित होऊन कांहीं असामान्य नीतिकृत्य हातीं धरून तडीस न्यावें, हें धैर्य मजमध्यें येईना. तें येण्यास ईश्वरी प्रेरणेचें बळ पाहिजे असें आतां मला वाटूं लागलें. 'ही ईश्वराची आज्ञा, हीच कर्तव्याची दिशा, या दिशेनें गेल्यावांचून गत्यंतर नाहीं,'—अशी माझ्या मनाची पूर्णश्रद्धा होण्याचा मार्ग मला सांपडेल तर क्षणभरांत माझ्या अंगीं अमित वीर्याचा अवतार होईल, असें मला वाटूं लागलें. परंतु अशी श्रद्धा उत्पन्न व्हावी कशी ! इतिहासांतील सर्व प्रसिद्ध पुरुषांमध्यें अशी श्रद्धा जागृत झालेली असावी व तिनें त्यांचें धैर्य क्षणोक्षणीं राखिलें असावें. जर माझे हातून कांहीं परोपकाराचें कृत्य होणें असेल तर ईश्वर मला आपलें अस्तित्व प्रकट करील, मला श्रद्धा देईल, ज्ञान देईल, वीर्य देईल,

मला उपेक्षणार नाहीं, अशी विलक्षण आशा माझ्या अंत:करणांत आतां संचरूं लागली. मीं प्रार्थनेचा क्रम आरंभिला; व केव्हां ईश्वरी प्रेरणा होईल अशाविषयीं उतावीळ होऊन गेलों.

हिंदुधर्माचीं तत्त्वें ऐकिल्यापासून मनास निरनिराळ्या कारणांनीं व्यग्रता यावी. केव्हां वाटे कीं धर्मज्ञानाचा हा केवळ आरंभ आहे; आणखी कितीक महत्त्वाच्या गोष्टी कळतील हें सांगतां येत नाहीं. त्या कळून घेण्याविषयीं प्रयत्न केला पाहिजे. परंतु तो कसा करावा? कोणास भेटावें ? जोंवर मी आधुनिक सामाजिक सुधारक होतों, तोंवर ज्ञानाचा अहंकार इतका प्रबळ होता कीं, अमुक अमुक सुधारणा करा, ह्मणजे राष्ट्रीय उन्नति झालीच समजा, असा अभिप्राय ठोकून देण्यास मी भीत नसे. हा अहंकार आतां सर्व गळाला, सुधारणेची व्याख्याही बदलून गेली व आणखी किती गोष्टी समजायाच्या राहिल्या आहेत हें न जाणून ‘ तदा मूर्खोऽस्मीति ज्वर इव मदो मे व्यपगत: । ’

---

## भाग १७ वा.

### माझ्या प्रवासास आरंभ झाला.

८९. मागील लेखांतील हकीकत लिहिल्यापासून पुढें कित्येक दिवसपर्यंत सांगण्यासारखें कांहीं घडलें नाहीं. हिंदुधर्माचे दोष दाखविणारे सुधारक पुष्कळ होतेच, परंतु त्यांत कोणीं कांहीं गुण पाहिला आहे काय अशी चौकशी करण्यांत, व जुन्या चालीच्या लोकांचें काय ह्मणणें आहे तें ऐकून घेण्यांत माझा बहुतेक वेळ गेला. ह्मणण्यासारखी कांहींच निष्पत्ति झाली नाहीं. पुढें मार्गशीर्ष महिना आला तेव्हां जिकडे तिकडे लग्नकार्यांची गडबड सुरू झाली. आमच्या सासुरवाडचेंही मला सहकुटुंब सहपरिवार येऊन कार्यसिद्धि करण्याचें पत्र आलें. घरांत विचारतां या कार्यास सर्वांनीं गेलेंच पाहिजे, असा आग्रह दिसल्यावरून आह्मीं निघण्याची तयारी के-

ली. नर्मदातीरीं एका क्षेत्रस्थानीं माझें सासुरवाड होतें. तेथें हिंदु राजाचा अंमल होता व लोकवस्ती थोडी परंतु फार जुन्या काळची होती. इंग्रजी राज्यांतून देशी राज्यांत जाणें, ह्मणजे सुधारणेंतून रानटी स्थितींत जाणें, किंवा उजेडांतून अंधारांत जाणें, असें मला पूर्वीं वाटत असे; परंतु या खेपेस तसें मुळींच वाटलें नाहीं; उलट एक प्रकारचा चित्तास उल्हास वाटूं लागला. कारण, इंग्रजी विद्येचे जे दुष्परिणाम ह्मणून वाटूं लागले होते ते आतां आपण जाणार त्या ठिकाणीं मुळींच दृष्टीस पडणार नाहींत. हिंदुधर्माचा अबाधित अंमल चालू असलेला दिसेल. जुन्या तऱ्हेची कुटुंबव्यवस्था, जुन्या पद्धतीनें ज्ञानार्जन, क्षेत्राचे संबंधानें साधुसंतांचा जमाव व धार्मिक लोकांची गर्दी, या सर्व गोष्टी नजरेस पडतील, व त्यांमुळें धार्मिक स्थितीचे फायदे शिकण्यास उत्तम संधी मिळेल, असें मनांत येऊन मी या प्रवासाविषयीं उतावीळ होऊन गेलों. फार दिवसांनीं माहेरीं जाण्याची संधी आली असतां बायकांच्या चित्तवृत्ति कशा खुलून जातात तें सांगायास नकोच. लहान मुलांस गांवीं जायाचें, आजोळीं जायाचें, वगैरे गोष्टी ऐकूनच जो हर्ष झाला तो त्यांच्या छोट्या अंतःकरणांत मावेना. याप्रमाणें आह्मी सर्वजण मोठ्या औत्सुक्यानें या प्रवासास निघालों.

८२. अलीकडे घरांत किंवा मंडळींत बसून विचारांत किंवा वादविवादांत सर्व वेळ घालविण्याची संवय मला लागली होती. तीमुळें सृष्टिवैभव पाहण्याची माझी हौस मागें पडत चालली. पुष्कळ दिवसांत भोंवतालच्या सृष्ट पदार्थांत ऋतुमानानें होत गेलेले फेरफार पाहून त्या द्वारें जिवास करमणूक करून घेण्याची संधी मला मिळाली नव्हती. परंतु या प्रवासाच्या वेळीं पावसाळ्याची अखेर होऊन गेली होती, व आगगाडींतून जातांना दोन्ही बाजूंनीं शेतें उंच वाढून येऊन भरदार दिसूं लागलीं होतीं. धरणीमातेनें आपल्या वार्षिक क्रमाप्रमाणें श्रम करणाऱ्या शेतकऱ्यांच्या पोटाची तर्तूद लावून देऊन त्यांस निश्चिंत केलें होतें.

शेतकरी हा खरा सृष्टीचा बाळक होय; सृष्टिव्यापारांशीं त्याच्या इतका दुसऱ्या कोणाचा प्रत्यक्ष संबंध येत नाहीं. थोडा पाऊस लां-

वला, वेळेवर जमीन भिजली नाहीं, कीं त्याचा जीव तळमळतो; पाऊस पडतांच त्याचे जिवांत जीव येतो. त्याचे डोळे खालीं जमीनीकडे व वर आकाशाकडे लागलेले असतात. सृष्टीनें मातेप्रमाणें आपली काळजी घेतली पाहिजे असें त्यास स्वाभाविकपणें वाटतें. सृष्टीचा कोप झाल्यास त्याच्यासारखी दीनवाणी मुद्रा कोणाचीही दिसत नाहीं. ज्याप्रमाणें बाळकास आईवांचून क्षणभर चैन पडत नाहीं, तथापि आईविषयीं त्यामध्यें वसणारें प्रेम तें कधीं बोलून दाखवीत नाहीं, त्याप्रमाणें सृष्टीविषयींचें प्रेम शेतकऱ्यास सांगतां येत नाहीं, परंतु उघड्या सृष्टीचे मांडीवर पडून राहिल्याखेरीज त्यास चैन पडत नाहीं—त्यास दुसरा सुखाचा मार्गच दिसत नाहीं. गुरांमागें गुरांप्रमाणें धांवावें, उभें रहावें, बसावें, उठावें, खेळावें, ओरडावें, याहून दुसरें कोणतेंही स्वातंत्र्य त्यास नको असतें. शेताचें वारें लागतांच, बाळकास आईनें मायेनें कवटाळावें त्याप्रमाणें, सावकाराचा व सरकारचा सर्व जुलूम तो विसरून जातो. नित्य नित्य आणि वर्षांच्या वर्षें एवढ्याशा खेड्यांतील थोडक्याशा जागेंत राहून या शेतकऱ्यांच्या जिवास सुख व समाधान कसें वाटत असेल याची आह्मां शहरवासी लोकांस कल्पना येत नाहीं. सृष्टीविषयीं प्रेम किंवा तिच्या व्यापारांचें ज्ञान त्यांमध्यें असलेलें आमच्या नजरेस येत नाहीं. त्यामुळें त्यांची स्थिति असह्य असेल असें आह्मी मानितों; त्यांचें दारिद्र्य पाहून आमचें हृदय द्रवतें. त्यांस शहरांत घेऊन जावें, उद्योग धंद्यास लावावें, पैशाची महती दाखवावी, वगैरे अनेक त्यांच्या सुधारणेचे उपाय आह्मी योजीत असतों. परंतु जोंवर जमिनीचा थोडा तुकडा हातीं आहे, एक दोन गुरें गोठ्यांत आहेत, भाजीभाकर कशी तरी मिळत आहे, तोंवर आमचे सुधारणेचे उपाय शेतकऱ्याच्या कुटुंबास पसंत पडत नाहींत; व हें एवढेंही मिळत नाहीं अशी स्थिति झाली ह्मणजे, डोळ्यांस पाणी आणून, जीव कासावीस होऊन, सृष्टिमाउलीची संगति सोडून खेडवळ माणूस शहराकडे वळतो. तेथें त्याचें लवकरच रूपांतर होतें, व सुधारणा होऊन तो त्या माउलीस विसरून जातो. मग विषयवासना, दुर्व्यसनें, डामडौल, द्रव्याची हाव, इत्यादि मनोवृत्तींस वश होऊन नागरिक स-

माजाच्या खालच्या पायरीवर येऊन तो उभा राहतो; व केव्हां वरच्या पायरीस जाऊन पोहोंचेन असें त्यास होतें! त्याची पूर्वीची ती स्थिति बरी किंवा ही नवीन स्थिति बरी, हें सांगणें कठीण आहे.

८३. आगगाडींतून प्रवास करीत असतां नद्यानाले, शेतें, गांवें, जंगलें, खिंडी, डोंगर वगैरे, हीं इतक्या झपाट्यानें एकामागून एक दृष्टीसमोर येतात व दृष्टीआड होतात, कीं त्यांची शोभा पाहण्यास वेळ मिळत नाहीं; मनुष्याची स्थिति स्वप्नांतला देखावा पाहिल्यासारखी होते. सृष्टीशीं संघट्टन होत नाहीं; मनास समाधान वाटत नाहीं. परंतु आगगाडी सुटून आह्मीं जेव्हां बैलगाडीचा प्रवास आरंभिला तेव्हां हें सर्व बदलून गेलें. अलीकडे पुष्कळ वर्षांत दोन तीन दिवसांचा बैलगाडीचा प्रवास मीं केलेला नव्हता; या गाडींत बसून थोडा वेळ झाल्यावर मनास कांहीं चमत्कारिक आनंद झाला. एवढ्याशा जागेंत आमचें हें कुटुंब एकवटलेलें मीं कधीं पाहिलें नव्हतें. एकमेकांच्या अतिनिकट संबंधामुळें आमचे जेवढ्यांचे जीव प्रेमपाशानें एकत्र बांधले गेले होते, तेवढे आह्मी सर्व एकास एक खेटून या गाडींत बसलों होतों. बैल व गाडीवाला यांखेरीज दुसऱ्या कोणाचा आतां आह्मांस सहवास नव्हता. आह्मीं उभयतां नवराबायकोनीं परस्परांकडे प्रेमार्द्र दृष्टीनें पहावें, मुलांकडे पहावें व डोळ्यांचें सार्थक्य करून घ्यावें, किंवा मुलांचे बोबडे शब्द ऐकावे, त्यांस संभाळून धरून संसाराच्या गोष्टी एकांतांतल्याप्रमाणें बोलाव्या व कानांचें साफल्य मानावें—याखेरीज आह्मांस दुसरा व्यासंगच उरला नव्हता. आमचें जग पहिल्या मानवी कुटुंबाइतकें संकुचित झालें होतें, परंतु विश्वांत मावून उरेल इतका त्यांत हर्षानंद होता. दिवसां मुक्कामाच्या जागीं मुलांस पांखरें दाखवावीं, पांखरांस वेडावण दाखविण्यास शिकवावें, किंवा उडते पतंग धरण्यास लावावें व त्यांची गंमत पहात बसावें, एवढाच करमणुकीचा मार्ग होता. संध्याकाळचे प्रहरीं गाडींत अंग खिळखिळें करून घेण्यापेक्षां गाडीमागें चालण्याचा मीं प्रघात ठेविला होता; त्यामुळें दूरवर दृष्टि पोहोंचे; अरण्याची शोभा नजरेस येई व पशुपक्ष्यांच्या क्रीडा दृष्टीस पडत.

नर्मदेचा सर्व प्रवाह दोन पर्वतांच्या मधून वहात आहे. कांठ-

च्या जमिनी खडकाळ आहेत, शेतकीच्या उपयोगाच्या नाहींत असें ह्मटल्यास चालेल. यामुळें नर्मदेच्या दोन्ही बाजूंस पुष्कळ जंगल वाढलेलें आहे. पात्र विशाळ, कांठीं रेतीचीं विस्तृत वाळवंटें व त्यांत जलप्रवाहानें घासून गुळगुळीत झालेले लहान मोठे, हत्ती एवढालेही, गोटे अशी इची जागोजाग मांडणी आहे. मनुष्यांस विपुल संपत्ति देणारी ही नदी नव्हे, व त्यामुळें तिच्या कांठीं मनुष्यवसती फारशी दाट नाहीं. जी थोडी आहे ती धर्माच्या ओढीनें येऊन राहिली आहे. नर्मदेच्या कांठानें प्रवास करणारास जलव्यापारांचें प्राबल्य व कांहीं चमत्कारिक शोभा सहजगत्या दृष्टीस पडते. स्थळीं स्थळीं नदीचें स्वरूप बदलतें. नर्मदेचा ओघ अनेक प्रकारच्या खडकांतून गेलेला आहे. नर्मदेंतून मूठभर वाळू बाहेर काढल्यास जितक्या रंगाचे खडे हातीं येतील तितक्या रंगाचे दुसऱ्या कोणत्याही नदींत येणार नाहींत. या नदीच्या कांठानें सृष्टीचें जें विशाळ व भयंकर स्वरूप दृष्टीस पडतें, त्यामुळेंच तीस विलक्षण माहात्म्य आलें असावें असें मला वाटूं लागलें. नर्मदेच्या कांठानें प्रवास करून तीस पूर्ण प्रदक्षिणा करण्याचें कित्येक वैराग्यशील हिंदूंनीं जन्माचें व्रत पत्करलें आहे; व तशाच दातृत्वशील पुरुषांनीं व स्त्रियांनीं तिच्या कांठीं इतकीं अन्नछत्रें, सदावर्तें वगैरे ठेविलीं आहेत कीं कोणी प्रवासी उपाशी मरणार नाहीं. हिंदुधर्माचें खरें प्राबल्य या नदीचे कांठीं दिसतें, कारण इचा पुष्कळ किनारा देशी संस्थानांच्या हद्दींत आहे; व तोही बराच अरण्यमय आहे. अहिंसेचा नियम पुष्कळ पाळला जातो, त्यामुळें जलचर व स्थलचर पशु मनुष्यास फारसे भीत नाहींत. मोरांचा नाच जागोजाग दृष्टीस पडतो; हरणांचे कळप धांवतांना दिसतात. जंगलांतून चाललें असतां वाटाडे हरएक प्रकारच्या सौम्य व हिंस्र पशूंचीं पावलें जमिनीवर उमटलेलीं व लेंड्या पडलेल्या दाखवितात; कित्येक ठिकाणीं गवत उंच वाढून माजलेलें असतें, त्यांत रानडुकरांच्या टोळ्या बसलेल्या असायाच्या; त्यामुळें आंतून चालण्याचें भय वाटतें. अशा गवतांतून मनुष्याची चाहूल दुरून लागतांच सांबरें उंच शिंगें करून भरधांव पळतांना दिसतात. त्यांचीं तीं शिंगें झाडांस कशीं अडकत नाहींत याचा पाहणारास चमत्कार वा-

टतो, व असल्या जड शिंगांचा या प्राण्यांस काय उपयोग असेल ही शंका मनांत येते. नर्मदा कांठच्या अरण्यांचीं वर्षांत दोन रूपें होतात. उन्हाळ्यांतील रूप निराळें व पावसाळ्यांतील निराळें. उन्हाळ्यांत प्रखर सूर्याच्या तापानें वृक्षवेलींचीं पानें सुकून खालीं पडतात, जमिनीवर गवत वाळून जातें व वणवा लागून या सर्वांची अग्नीस आहुति होते. जिकडे तिकडे जमीन काळसर व रुक्ष दिसते, वृक्षांच्या दाट काव्या जवळ जवळ उभ्या आहेत असें दुरून दिसतें व डोंगरांच्या माथ्यांवर दाट झिंज्या उभ्या राहिल्यासारखा भास होतो. जेथें झाडी नाहीं अशा पर्वतांच्या ओळींवर कोठें कोठें भिन्न रंगांच्या खडकांचें चूर्णीभवन होत चाललेलेंही नजरेस येतें. परंतु पावसाळ्याच्या आधींच कित्येक झाडांस नवी पालवी फुटूं लागते, कित्येकांस पावसाळ्यांत फुटते व मग जिकडे तिकडे हिरवागार सृष्टीचा पेहराव होतो. या सुंदर पेहरावाचें पूर्ण स्वरूप पावसाळ्याचे अखेरीस दृष्टीस पडतें.

८४. याप्रमाणें मी या प्रदेशांत गेलों त्यावेळीं सर्व गोष्टी मनावेधक होत्या. सामुरवाडीं पोहोंचल्यावर आमचें आगतस्वागत उत्तम रीतीनें झालें. थोडक्या दिवसांत तेथें माझ्या बऱ्याच ओळखी झाल्या. श्वशुरगृहीं पाव्हण्यांची गर्दी व लग्नाच्या तयारीची धामधूम नित्य सुरू असल्यामुळें, मी बहुतेक वेळ बाहेरच काढीत असें. या क्षेत्रस्थानीं एक कोंकणस्थांचें फार जुनें श्रीमंत घराणें होतें. पुष्कळ पिढ्यांची अखंडित सुस्थिति, संभावितपणा, आदरातिथ्य आणि गुणिजनांचा संग्रह, या गोष्टींविषयीं त्या घराण्याचा लौकिक होता. त्यांतील मुख्य पुरुषाचें वय सुमारें सत्तर वर्षांचें होतें. परंतु अंगाची काठी सरळ आणि उंच व मुखचर्या भव्य आणि उदार अशी दिसत होती. त्याचा नित्य कृत्यांचा नेम कधींही चुकलेला मीं पाहिला नाहीं. सकाळीं नर्मदेवर स्नान, नंतर शिवपूजा, व कांहीं थोडें व्यवहाराचें काम त्यानें पहावें. संध्याकाळचे वेळीं शास्त्री व पुराणिक यांशीं वेदांताचा वाद करावा; रात्रीं भोजनोत्तर पुराण व भजन व्हावें.

या गृहस्थाचे दोन मुलगे होते; त्यांतील वडील चिरंजीव मध्यम वयास येऊन पोहोंचले होते व घरचें कामकाज ते पहात असत.

धाकटे चिरंजीव माझे वयाचे होते; त्यांकडे प्रपंचाचें काम थोडें असल्यामुळें घरीं आश्रित वर्गांत असलेल्या विद्वान् शास्त्र्यांपासून संस्कृत काव्यालंकारांचें त्यांनीं बरेंच ज्ञान संपादन केलेलें होतें. त्यांस इंग्रजीचें ज्ञान नव्हतें तथापि मराठी पुस्तकें, वर्तमानपत्रें वगैरे वाचण्याचा छंद होता. बाहेर मुलखांतील सर्व घडामोडींची वडलांस माहिती देण्याचें काम त्यांकडे होतें. त्यांशीं समानशीलत्वानें माझा अत्यंत स्नेह जडला. इंग्रजी सुधारणेचीं मतें मीं त्यांस सांगावीं; त्यांच्या टीका ऐकून घ्याव्या व केव्हां केव्हां त्यांशीं किंवा शास्त्री मंडळींशीं वाद करावा. हा नित्याचा परिपाठ पडून गेल्यानें मला तेथें कंटाळा ह्मणून आला नाहीं; व माझा एक महिना राहण्याचा बेत होता तो मी दोन अडीच महिन्यांपर्यंत लांबविला. स्नान संध्या, अर्चन वंदन, हिंडणें फिरणें वगैरे सर्व बाबतींत मी त्या मित्राचें अनुकरण करीत गेलों. आपले इंग्रजी आचार प्रकट केले नाहींत; कारण तसें केलें असतें तर मजविषयींचा बहुमान कमी झाला असता एवढेंच नव्हे, तर मी थोडाही धर्मभ्रष्ट आहें असें त्यांच्या ध्यानांत येतांच खुल्या मनानें त्यांनीं मजशीं संभाषण करण्याचेंच बंद केलें असतें.

---

## भाग १८ वा.

### बालविवाहाचें रहस्य.

८९. लग्नाचा मुहूर्त जवळ येऊन ठेपला. गांवांत अक्षत फिरूं लागली व एका खेपेस मलाही अक्षतीबरोबर जाणें भाग पडलें. आमच्या श्वशुरगृहींचा मुलगा होता, त्याचें वय तेरा वर्षांचें होतें. जी वधू नेमस्त केली होती तिचें वय आठनऊ वर्षांचें होतें. या अशा बालविवाहाशीं आपला संबंध असावा हें मला वाईट वाटूं लागलें. आमचे लोकांस मुलांच्या विवाहाची कां इतकी घाई होते, त्याचें मला आश्चर्य वाटूं लागलें. हाच विचार वारंवार मनांत येत असल्यानें, एके दिवशीं मीं आमचे मित्र विश्वनाथराव ऊर्फ बापूसाहेब यांपाशीं हा बालविवाहाचा प्रश्न काढिला. ही विवाहाची पद्धत वा-

ईट असा माझ्या ह्मणण्याचा आशय पाहून त्यांस आश्चर्य वाटलें; कारण त्यांचें मत असें होतें कीं बालविवाहाची पद्धतच फार उत्कृष्ट. मीं त्यांस या विषयासंबंधानें विद्वान् सुधारकांचें सर्व ह्मणणें सांगितलें. ' अहो, या बालविवाहापासून इंग्रजी मुलखांतील विद्वानांस अगणित तोटे दिसूं लागले आहेत. उदाहरणार्थ, बालविवाहांत तिऱ्हाइतांनीं वधूवरांचीं लग्नें लावून दिलेलीं असतात, तेव्हां त्या परस्परांमध्यें प्रेम कसें उत्पन्न होईल ? वधूवरांचीं जितक्या लवकर लग्नें होतील तितका दोहोंपैकीं एक कदाचित् मृत्यु पावण्याचा संभव अधिक असतो; स्त्री मृत्यु पावल्यास पुरुष दुसरा विवाह करील, परंतु पुरुष मृत्यु पावल्यास स्त्री बालविधवा होऊन त्या अतिदुःखदायक वैधव्यांत तीस जन्मभर रहावें लागेल. वधूवरांचीं लग्नें अल्प वयीं झाल्यानें त्यांचा संयोगही अल्प वयांत होतो; त्यांची पुरी वाढ होण्यास संधी मिळत नाहीं व या कारणानें संतति अशक्त व रोगी होते; तीमध्यें हवा तसा जोम रहात नाहीं. पुरुषास आपलें पोट भरायाची योग्यता येण्यापूर्वीं त्याचें लग्न करून दिल्यास त्याच्या पायांत जड बेडी घातल्यासारखें होतें, व त्याच्या कुटुंबाचे पुढें कोणते हाल होतील हें सांगतां येत नाहीं. शिवाय, बायकोचें लोढणें पुरुषाचे गळ्यांत पडल्यावर त्यास मोठीशी महत्त्वाकांक्षा अंगीं धरवत नाहीं. त्याच्या शरीराचीच नव्हे, तर मनाचीही वाढ खुंटते; मग कसाही बुद्धिमान् व कर्तृत्वशील पुरुष असला तथापि तो देशाच्या उत्कर्षास उपयोगीं पडत नाहीं, व समाजांतही सामान्य प्रतीचा माणूस होऊन बसतो. याप्रमाणें या बालविवाहाचे तोटे अनेक आहेत, व इंग्रजांसारख्या प्रबळ राष्ट्रांशीं ज्यांना चढाओढ करायाची आहे त्यांस तर ते उन्नतीचे कामीं पदोपदीं विघ्न करितात. '

याप्रमाणें मी बालविवाहाचे तोटे सांगत असतां बापूसाहेब गंभीर मुद्रेनें माझ्या तोंडाकडे टक लावून पहात होते. त्यांच्या मनास माझ्या बोलण्यापासून कांहींच प्रत्यय येत नव्हता हें मी तेव्हांच समजलों, तथापि देशी राज्यांत ज्यांस विद्वान् अशी संज्ञा देतां येईल त्यांचें या महत्त्वाच्या प्रश्नावर काय ह्मणणें आहे हें मला समजावून घ्यावयाचें होतें, ह्मणून जेवढ्या आवेशानें व बलवत्तर कारणांनीं

आपलें मत प्रतिपादितां येईल तेवढ्या सर्वांचा मीं उपयोग केला. माझें बोलणें आटोपल्यावर बापूसाहेबांनीं मला एकच प्रश्न केला; तो हा कीं तुमचें लग्न केव्हां झालें व तुह्मां स्त्रीपुरुषांत प्रीति आहे कीं नाहीं. या प्रश्नाचें उत्तर मीं त्यांस येणेंप्रमाणें दिलें.

८६. " मी सुमारें पंधरा वर्षांचा होतों तेव्हां माझ्या आईची प्रकृति बरीच बिघडली व ती आतां फार दिवस जगत नाहीं असें माझे वडलांस वाटूं लागलें. त्यांचें तिजवर फार प्रेम होतें व तिच्या ह्मणण्याचे बाहेर ते कधीं पाऊलभर गेले नाहींत. तिची इच्छा ही कीं, आपण डोळे मिटण्यापूर्वीं सून घरांत येऊन नांदूं लागावी. 'नाहींतर पुरुष उद्योगास गेले ह्मणजे घर कोण संभाळील ? घरांत कोणी बायको माणूस नसलें ह्मणजे आप्तवर्गाशीं संबंध तुटत जातो; वेळेस अन्न मिळण्याची मुष्कील होते; घरच्या पूर्वींच्या चालीरीति पाळल्या जात नाहींत; घर बसत जातें; घरीं बायका आल्यास कुंकूं लावण्यासही कोणी रहात नाहीं.' या व अशाच आणखी पुष्कळ गोष्टी सांगून तिनें माझ्या वडलांचें मन वळविलें व माझे लग्नाची उचल केली. त्याप्रमाणें तें एकदाचें झालें व आईस समाधान वाटलें. पुढें दोन वर्षांनीं ती मरण पावली. तिच्या मागें वडीलही फार वर्षें जगले नाहींत. व पुढें मी सर्व विद्याभ्यास पुरा करून घरीं येईपर्यंत आमचें कुटुंब दोन तीन वर्षें येथें माहेरींच होतें. आह्मीं प्रपंच मांडल्यापासून ही चांगली उपयोगी स्त्री आहे, इच्यावांचून आपली घरची व्यवस्था सुरळीत चालणार नाहीं, असें जाणून मी तिजवर सामान्य प्रीति करीत होतों. अन्नवस्त्रापलीकडे मी तिची फारशी काळजी करीत नसें; परंतु थोड्या महिन्यांपूर्वीं कांहींएक विशेष गोष्ट घडून आली; तेव्हांपासून मात्र माझ्या मनांत खऱ्या प्रेमाचा प्रादुर्भाव झाला व आमचीं उभयतांचीं अंतःकरणें एक होऊन गेलीं. याप्रमाणें माझ्या वैवाहिक स्थितीचा इतिहास आहे. "

८७. हा इतिहास ऐकिल्यावर बापूसाहेब ह्मणाले. "विद्याधरपंत, स्त्रियांच्या अंतःकरणाची परीक्षा तुह्मांस फार उशीरानें झाली असें मला वाटतें. अहो, स्त्रियांचें हृदय फार कोमळ आहे व तें कोमळ

मनोवृत्तींची परिपूर्णता करण्याकरितांच ईश्वरानें घडलें आहे. मुलगी लहान दोनतीन वर्षांची असते, तेव्हांपासून तिच्या मनाची प्रवृत्ति मुलांहून निराळी. तिच्या संसारास तेव्हांपासूनच आरंभ होतो. तिच्या बाहुल्या, तिचे खेळ, तिची तान्ह्या मुलांविषयींची प्रीति, तिची जीवजंतूंविषयींची दया, या सर्व गोष्टी पाहिल्या ह्मणजे ही कोमळ कलिका फुलल्यावर कशी होईल हें तेव्हांच ध्यानांत येतें. काय त्या बाहुल्यांचे सोहाळे चाललेले असतात; सर्व खेळ ह्मणजे पुढच्या संसाराचें लहानसें चित्रच समजायाचें. आईच्या मागें मागें जाणें, आईस अगदीं लकटून बसणें, आईशीं सर्व हितगुज सांगणें—या सर्व प्रकारांवरून स्त्रीहृदयास जो जन्मभर प्रेमाधार लागतो तो स्पष्ट होतो. प्रेमाचा आधार मागें पाहिजे, मग व्यवहारांत पाहिजे तेवढें धैर्य व पाहिजे तसा पराक्रम त्यांच्या अंगीं येतो. तान्ह्या मुलांस लहान मुली केवळ आईप्रमाणें संभाळतील, मुलगे तेव्हांच कंटाळून पळून जातील. मुलांनीं कोणतेंही क्रौर्याचें कृत्य आरंभिल्यास ' नको रे, दादा, नको बिचाऱ्या जिवास त्रास देऊं ' ह्मणून मुलींची किंकाळी ऐकूं येईल.

"जन्मापासून स्त्रीहृदयांत असा जो प्रेमाचा अंकुर फुटत असतो, त्यास त्वरित सुदिशा लावणें हें मातापितरांचें काम आहे. आठवे नववे वर्षीं मुलीचें लग्न झाल्यापासून तिच्या मनाची वाढ पाहिल्यास, तोच प्रेमांकुर, लज्जा व विनय यांच्या सौम्य छायेंत वाढत आहे, असें दिसतें. तुह्मी इंग्रजी लोक विद्येच्या मागें लागून घराच्या बाहेर सर्व वेळ काढतां, घरांत तुमचें लक्ष नसतें, ह्मणून या प्रेमांकुराची वाढ तुमच्या लक्षांत येत नाहीं, व तुह्मी स्त्रियांच्या संबंधानें उदासीन राहतां. तुह्मांस वाटतें, इंग्रजी तऱ्हेनें स्त्रीपुरुषांनीं वयांत आल्यावर अनेक वेळां परस्परांस भेटून, स्त्रियांनीं पुरुषांची व पुरुषांनीं स्त्रियांची पारख करून मग प्रीतीचा ठराव केला, तर त्यांत मात्र प्रेम राहतें. परंतु हा तुमचा केवळ भ्रम आहे. प्रीतीचा उत्कर्ष या रीतीनें झाला तथापि तो सामान्यतः कमी प्रमाणाचा होतो; त्यास पूर्णरूप येत नाहीं. हिंदु वरिष्ठ जातींत हा उत्कर्ष अधिक प्रमाणानें व अधिक चिरस्थायी होतो व तो द्रव्यादि बाह्य उपाधींवर अवलं-

बून राहत नाहीं असें आह्मांस वाटतें. याविषयीं तुह्मीं पुरती चौकशी केली पाहिजे.

८८. " या संबंधाच्या स्वानुभवाच्या गोष्टी सांगणें थोडें अवघड आहे. ह्मणून मी अन्योक्तीनें प्रेमांकुराच्या वाढीचा एक इतिहास सांगतों. असें समजा कीं रामचंद्र आणि सीता यांचा बाळपणीं विवाह झाला. सीतेच्या बापानें आपल्या स्थितीचे मानानें जितकें उत्तम स्थळ मिळेल तितकें पाहिलें होतें व आपल्या ऐपतीच्या पलीकडेच खर्च केला, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. मनांतील हेतु हा कीं मुलीस जन्मभर सुख व्हावें, आपले थोडे हाल झाले तरी चिंता नाहीं, तसेच चार दिवस कष्टानें काढूं. सीतेच्या लग्नाचा दिवस जसजसा जवळ येत चालला, तसतसा तिच्या अंतःकरणांत नवीन प्रकाश पडूं लागला. आतां आपणांस सासरीं जायाचें, मग असें वागायाचें, असें उभें राहायाचें, एवढेंच बोलायाचें, इत्यादि विनयाचे बेत मनांत ठरत चालले, व आईनें व मैत्रिणींनीं उपदेशानें ते बळकट करून दिले. लग्न लागलें त्या दिवशीं मान खालीं घालूनच ती बसली होती, परंतु मध्येंच तिनें चटकन् वर नवऱ्याकडे पहावें व पुनः लाजून मान खालीं घालावी. लग्नांत चार दिवस जें संघट्टन झालें, त्यानें प्रेमाचीं मुळें नवीन भूमीमध्यें पक्कीं रुजलीं. हा प्रेमाचा गुप्त ठेवा, हा लज्जेच्या दडपणाखालीं चांगला दाबून ठेविला पाहिजे, नाहींतर तो कमी होईल, उडून जाईल, त्याची थोरवी राहणार नाहीं—असें सीतेस सर्वदा वाटे. स्त्रीपुरुषांच्या प्रेमाची महती गुप्तपणानें वाढते व प्रसिद्धीनें किंवा वाचाळतेनें कमी होते, असा, मला वाटतें, सर्व जगाचा अनुभव आहे.

" इकडे रामचंद्रास स्त्रीविषयक प्रीति ह्मणजे काय हें आरंभीं माहीतदेखील नव्हतें; परंतु तें हळूहळू आपोआप कळूं लागलें. सासरीं असतां सीतेनें रामचंद्र येतांच क्षणभर त्याकडे पाहून चटकन् दृष्टि फिरवावी व बाजूस सरून उभें राहावें, आपणांकडे कोणाची दृष्टि नाहीं असें पाहून तिनें रामचंद्राकडे सारखें बघत रहावें, तितक्यांत रामचंद्राचें लक्ष तिजकडे गेलें कीं मान मुरकून तिनें दुसरीकडे नजर लावावी. रामचंद्राची अल्पस्वल्प सेवा, हें आपलें पहिलें

काम असें तिनें दाखवावें. त्याचीं भांडीं स्वच्छ घासून ठेवणें, त्याच्या धोतरांच्या निऱ्या करणें, वगैरे सर्व काम तिजकडे आलें. पंक्तींत वाढतांनाही घावरल्यासारखें होऊन रामचंद्राचे पानाशीं तिचा हात सढळ व्हावा. हीं सर्व लक्षणें कशाचीं हें रामचंद्रास कोणीं सांगायास नको होतें. त्याचेंही अंतःकरण कोंवळेंच होतें, व तें तेव्हांच वेधलें गेलें. मग वरच्यासारखे प्रसंग वरचेवर यावे ह्मणून त्याचा प्रयत्न सुरू झाला. त्यानें एकादे वेळीं दारांत उभें राहून सीतेस वाट नाहीं ह्मणून तिष्ठत उभें रहायास लावावें; प्रसंगीं सीतेनेंही झटकन् शेजारून निघून जावें. कांहीं तरी निमित्त करून रामचंद्रानें घरांत जावें व सीतेची गडबडीनें उठण्याची एकच तारांवळ करून द्यावी. त्यानें कोणास दिसणार नाहीं अशा ठिकाणाहून सीतेचे खेळ, बोलणें, चालणें पहात उभें रहावें; मग अकस्मात् सीतेचें लक्ष त्याकडे गेलें असतां तिनें एकदम खालीं मान घालून चुप्प व्हावें. नंतर मैत्रिणींच्या लक्षांत ही गोष्ट येतांच त्यांनीं सीतेची थट्टा आरंभावी. मनांतून जें हवें तेंच मैत्रिणी बोलत असतां, रागावल्यासारखें करून ‘ इश्श बाई ’ ‘ भलतंच कांहीं तरी ’ ‘ पुरे आतां चावटपणा ’ वगैरे उद्गारांनीं सीतेनें त्यांचीं तोंडें बंद करण्याचा वृथा प्रयत्न करावा; मध्येंच खुद्‌कन् हंसावें. त्यांनीं नांव घेण्यास सांगितलें असतां, तिनें अनर्थ आढेवेढे घ्यावे व ओठापर्यंत शब्द आले असतां, पुनः मुरका मारून ‘ छेः बाई ’ ह्मणून गप्प रहावें. परंतु मनांत रामचंद्राचें नांव कोणत्या उखाण्यांत चांगलें शोभतें, कोणत्या उखाण्यानें आपलें प्रेम चांगलें व्यक्त होतें, ह्मणून सारखा विचार चालला असायाचा. फावल्या वेळीं रामचंद्राचें नांव गोवून तिनें किती उखाणे तयार केले असतील तें सांगतां येत नाहीं.

“ याप्रमाणें उभयतांच्या प्रेमाची प्रतिदिवशीं वृद्धि होत चालली. क्रमानें उभयतांचीं वयेंही वाढत गेलीं, व वयाचे मानानें लज्जेचाही अधिकाधिक प्रादुर्भाव होऊं लागला. प्रारंभींची प्रीति अल्लडपणाची होती, क्रमानें तीस कर्तव्याचें रूप येऊं लागलें. या प्रीतीचें पुढें संसारांत मोठें कार्य आहे, या प्रीतिपाशानें पुढें पुरुषास आजन्म आपल्या ताब्यांत ठेवायाचा आहे; तें साधलें तर बरें, नाहींतर

आपला जन्म व्यर्थ, असे थोडे थोडे विचार तिचे मनांत प्रकट होऊं लागले. नवऱ्याचें लक्ष आपणाकडे पुनः पुनः ओढावें, आपलें मन त्यास कळावें, आपणावाचून दुसरीकडे त्याचें चित्त भटकूं नये, ह्मणून प्रेमप्रसरास अनुकूल अशा अन्य वृत्तीही तिजमध्यें क्रमानें दिसूं लागल्या; व लज्जेच्या आणि विनयाच्या द्वारेंच तिजमध्यें अनेक हावभाव प्रकट होऊं लागले. वेणीफणी उत्तम करून डागडागिने घालून झळकावें असें तीस वाटूं लागलें; तिच्या डोळ्यांत नवेंच तेज चमकूं लागलें; व शरीरासही भरदारपणा येऊं लागला.

" या सर्व फेरफारांकडे रामचंद्राचें लक्ष होतेंच; त्याच्या डोळ्यांपुढें तिचें चित्र पुनः पुनः उभें राही. आपली बायको सुस्वरूप झोंकदार आहे असें त्यासही वाटूं लागलें. विशेष अवयवांकडे त्याचें लक्ष पूर्वीं जात नसे तें आतां जाऊं लागलें. मग त्यास वाटूं लागलें कीं इच्यासारखे सुंदर डोळे क्वचितच दृष्टीस पडतील. वास्तविक पहातां प्रत्येकजण आपल्या बायकोच्या कांहीं एका विशिष्ट अवयवाच्या लावण्याबद्दल असाच अभिमान बाळगीत असतो. इतकी त्यांची प्रीति, परंतु ती दुसऱ्यांचे ध्यानांत येण्यासारखी नव्हती, कारण तिजवर लज्जेचें पांघरूण होतें. उभयतांही बरींच मोठीं होईपर्यंत त्यांमध्यें कामवासनाही नव्हती; शुद्ध प्रेम होतें. रामचंद्रानें एकादे वेळीं सीतेस एकांतांत गांठलें, तर घाबरून केव्हां आपली सुटका होईल असें तीस व्हावें. रजोदर्शनापूर्वीं कामवासना उत्पन्न होत नाहींत, व त्यानंतरही बरेच दिवस त्या उत्पन्न होण्याचें कारण नसतें; परंतु असें घडण्यास घरांतील वडील माणसांनीं मुलांवर नजर ठेविली पाहिजे. सुशील घराण्यांत हें सर्वदा साध्य असतें.

" पुढें योग्य वयीं गर्भाधानाचा धार्मिक विधि झाल्यानंतर जेव्हां सीता व रामचंद्र यांची नित्य गांठ पडत चालली, तेव्हांही लज्जा आणि विनय यांचें प्रेमावरील दडपण फारसें दूर झालें नाहीं. वडलांच्या देखत त्यांनीं दूर दूर रहावें; आपल्या मनोवृत्ति बिलकुल प्रकट करूं नयेत. एकांतांतही प्रणय-विरोधावांचून सीतेनें स्पर्शमात्रासही राजी असूं नये.

" याप्रमाणें त्यांच्या प्रेमाची वृद्धि होऊन आतां त्या उभयतां-

च्या सुखास अंत नाहीं असें त्यांस वाटत आहे. आप-आपल्या कर्तव्यास त्यांपैकीं कोणी एकही चुकत नाहीं; त्यांस एक पुत्ररत्न होऊन त्यांचीं अंतःकरणें अधिकच दृढबंधनानें बांधलीं गेलीं आहेत. सर्व सुशील घराण्यांत हा प्रेमांकुर अशाच रीतीनें वाढत जातो. जर कोणा पुरुषाचें त्याकडे कमी लक्ष असेल तर तो उत्कृष्ट प्रेमास पात्र नव्हे असें ह्मटलें पाहिजे. हिंदूंची गृहस्थिति सुखी व समाधानी होण्यास याप्रमाणें ही प्रेमाची सार्वत्रिक व अनिवार वाढ कारण आहे; व ती बालविवाहामुळें होते. जे लोक मोठेपणीं लग्नें करितात ते या प्रकारच्या प्रेमास मुकतात; निदान उत्कृष्ट शुद्ध प्रेमाचा अनुभव त्यांस या आरंभींच्या काळांत मिळावा तो मिळत नाहीं. ज्यांस गृहस्थाश्रम पत्करणें असेल त्यांनीं तो जितका सुखाचा होईल तितका आरंभापासूनच कां करून घेऊं नये ?

८९. " मी असें ऐकतों कीं, युरोपीय लोक लग्नाचे दोन प्रकार समजतात, एक प्रीतीचा व दुसरा व्यावहारिक फायद्याचा. या दोहोंपैकीं प्रीतीचे विवाह बहुधा अखेरीस सुखासमाधानाचे होत नाहींत, उलट पश्चात्तापास कारण होतात, असें युरोपीयांचें मत आहे, व तें खरें असावें. कारण मोठेपणीं लग्नें केलीं असतां पुरुष स्त्रीच्या सौंदर्यानें व यौवनाच्या हावभावांनीं तीस भुलून लग्नास तयार होतो. हे गुण चिरस्थायी नव्हेत व ते उडून गेले ह्मणजे प्रेमाचें मूळ नाहींसें झालें. बालविवाहाच्या योजनेंत सामान्यतः प्रीति व व्यावहारिक फायदा या दोहोंचीही जोड होते व पश्चात्तापाचें नेहमींचें जें एक कारण तें दूर होतें. वराची व त्याच्या कुटुंबाची सुस्थिति पाहण्याचें काम अधिक अनुभविक मातापितरांकडे गेल्यानें व्यावहारिक फायदा होतो. प्रेमाचा अंकुर फार दिवस पोसल्यानें तोही बळावतो. नवराबायकोंचा परिचय फार दिवसांचा असल्यानें परस्परांचे स्वभाव, प्रपंच मांडण्याचे आधीं पुष्कळ दिवस, त्यांस समजून येतात. त्यामुळें पुढें पश्चात्तापास कारण उत्पन्न होत नाहीं. आणखी असें कीं स्त्रिया तरुण होईपर्यंत बापाचे येथें राहिल्यास त्यांचे अवश्य लाड होतात; निदान विनय शिकविण्याचें काम करणारें तेथें कोणी नसतें; त्यामुळें जर मुलीचा मूळचा, कोणत्याही प्रकारचा, कुस्वभाव असला तर तो सुधा-

रत नाहीं. परंतु तीच लहानपणापासून सासरीं राहूं लागली ह्मणजे पारतंत्र्यामुळें स्वभावांतील मूळचे दोष तेव्हांच सुधारले जातात. सासू, सासरा, नणंदा, जावा वगैरे सर्वांचीं मनें संभाळून राहणें फार कठीण आहे. या शिक्षणांतून जी मुलगी गेली, ती आपोआप फार सुशील व विचारी होते, व नवऱ्याचें मन दुखविण्याइतका तिच्या स्वभावांत कदापि दोष राहूं शकत नाहीं. या शिवाय नवीन कुटुंबांत गेल्यावर तेथील रितीभातींचें वगैरे जें ज्ञान तीस येतें तें सांगण्याची गरज नाहींच. ह्मणून माझें ह्मणणें हें कीं प्रेम व. कुटुंबसुख यांच्या दृष्टीनें बालविवाहास दोष देतां येत नाहीं, उलट तो सर्वतोपरी गुणावह होतो. प्रत्येक पुरुषास व स्त्रीस प्रेमोद्रेकाच्या अद्भुत रसाचा अनुभव घेण्याची जी आयुष्यांत एकवेळ संधी येते, ती बाळपणापासून यौवनाची पूर्णावस्था होईपर्यंत होय; व त्या संधीचा अधिकाहून अधिक लाभ करून घेण्यास बाळपणापासून स्त्रीपुरुषांचीं अंतःकरणें जुगलीं पाहिजेत. ”

---

## भाग १९ वा.

### बालविवाहानें सात्त्विक प्रेम उत्पन्न होतें.

९०. यानंतर संस्कृत काव्यालंकारांचा मीं कितपत अभ्यास केला आहे, त्यांत मला कितपत गोडी वाटते, वगैरेविषयीं बापूसाहेबांनीं मला प्रश्न केले. मीं सांगितलें, ‘ कालेजांत असतां कांहीं थोडीं संस्कृत नाटकें व रघूचे थोडे सर्ग मीं वाचले; परंतु भाषाविषय ह्मणून त्यांचा मीं अभ्यास केला, त्यांतील रसाकडे माझें चित्त गेलें नाहीं. कालेजांतून बाहेर पडल्यावर संस्कृत वाचनाचें कामच पडलें नाहीं, व करमणुकीकरितां बहुधा इंग्रजी कादंबऱ्या केव्हां केव्हां मी वाचीत असतों. परंतु असल्या कल्पित गोष्टींत मला गोडी वाटत नाहीं. माझा कवितेकडे अगदींच ओढा नाहीं असें तुह्मी समजा. सरासरीनें तात्त्विक विचारांकडे माझें लक्ष अधिक आहे. ’

हें माझें बोलणें ऐकून बापूसाहेबांनीं निराशेनें मोठा उच्छ्वास टा-

किला. माझी इतकी विद्या झाली, तेव्हां संस्कृत काव्यामृताचा मीं पूर्ण आस्वाद घेतला असावा व त्यामध्यें मला चांगली अभिरुचि आली असावी असें त्यांचें अनुमान होतें. तें माझ्या भाषणानें समूळ अयथार्थ ठरलें. त्यांस बहुधा वाटलें कीं आपण जें पुढें बोलणार तें समजण्याची माझे अंगीं पात्रता नाहीं. परंतु तसें त्यांनीं दाखविलें नाहीं व पुन: भाषणास सुरवात केली. ते ह्मणाले:—

" तुह्मी इंग्रजी कादंबऱ्या पुष्कळ वाचल्या आहेत तेव्हां युरोपीय लोकांचा ( स्त्रीपुरुषांच्या ) प्रेमाचा जो प्रकार तो तुह्मांस कळून आलाच असेल. हा प्रकार आपल्या ब्राह्मण लोकांत जो उत्पन्न होतो त्याहून फार भिन्न आहे. आपलें प्रेम **सात्त्विक** असतें, त्यांचें **राजस** असतें. आपलें प्रेम आपल्या ब्राह्मणस्वभावास व मनोवृत्तींस उचित आहे. त्यांचें प्रेम तसेंच त्यांच्या क्षात्रस्वभावास व मनोवृत्तींस उचित आहे. युरोपीयांमध्यें माझ्या मतें क्षात्र गुणांचें प्राबल्य अधिक आहे; यामुळेंच युरोपीय स्त्रियांच्या चित्तास शौर्यसाहसादि गुणांनीं लवकर भुरळ पडत असावी. **राजस** प्रीतीचा मुख्य गुण हा कीं तीवर लज्जाविनयादि सौम्य गुणांचा अंमल फारसा चालत नाहीं. त्या प्रीतींत स्पष्टता व तीव्रता अधिक. **सात्त्विक** प्रीति तशी स्पष्ट किंवा तीव्र नसते. त्यामुळें तिचा प्रत्यय येण्यास मनुष्यास सूक्ष्म व कोमल मनोवृत्तींची पूर्ण ओळख असावी लागते.

"जेव्हां काव्यकर्ते शृंगारिक कथानकें लिहूं लागतात तेव्हां त्यांस सौम्य सात्त्विक प्रीति वर्णन करण्याचें फारच कठीण जातें; त्यामुळें ते बहुधा राजस प्रीतीचेंच वर्णन आरंभितात. आमच्या नाटकांमध्यें नायक व नायिका बहुधा क्षत्रियजातीच्या असण्याचें कारण हेंच होय; जर त्या ब्राह्मण जातीच्या केल्या तर यथार्थ वर्णन होण्यास कविही तसाच मार्मिक पाहिजे. अलीकडील मराठी कादंबरीकारांनींही राजस प्रीतीचेंच वर्णन केलें आहे; व तेंच करण्यास इंग्रजी ग्रंथांतून त्यांस पुष्कळ साहाय्य मिळतें. आमचे जुने कवि बहुतेक ब्राह्मण होते, त्यामुळें त्यांस राजस प्रीतीची चांगली ओळख नव्हती, व सात्त्विक प्रीतीचा प्रसंग आणितां येईना, ह्मणून त्यांचीं वर्णनें कांहींशीं असंभाव्य झालेलीं आहेत. विरहवर्णन करणें त्यांस जेवढें सा-

धे तेवढें समागमाचें वर्णन त्यांस साधत नव्हतें. यामुळें प्रीतीची उत्पत्ति राजस व पर्यवसान सात्विक असें आमच्या काव्यांत दृष्टीस पडतें. याचें कारण यौवनास येऊन पोंचलेल्या नायिका होत; त्यांमध्यें राजसरीत्याच प्रीतीचा प्रादुर्भाव झाला पाहिजे. ' **पुरश्चक्षूरागस्तदनु मनसोऽनन्यपरता ।** '—या एकाच प्रकारें प्रीतीची उत्पत्ति झालेली शाकुंतल, मालतीमाधव वगैरे अनेक काव्यांत दिसून येते. ही उत्पत्ति झाल्यावर मग प्रीतीच्या सात्विक स्थितीस आरंभ होतो. तेथून पुढें आपणां ब्राह्मणांस त्या प्रीतीचे परिणाम स्वानुभवानें प्रत्ययास येऊं लागतात. शकुंतला व मालती या आपल्या प्रियांसमवेत एकत्र असतां लज्जेनें इतक्या पराधीन होतात कीं त्यांच्या तोंडांतून शब्द बाहेर पडत नाहीं. नववधूसमागमाचे वेळीं या स्थितीचा अनुभव येतो. नागानंदांत ह्मटल्याप्रमाणें

**दृष्टा दृष्टिमधो ददाति, कुरुते नालापमाभाषिता । इ०**

* * * * *

**जाता वामतयैव मेऽद्य सुतरां प्रीत्यै नवोढा प्रिया ॥**

" हा सात्विक प्रीतीचा प्रकार ज्यांच्या लक्षांत येत नाहीं त्यांस कोमळ सहृदयता आलेली नाहीं असें ह्मटलें पाहिजे; व त्यांस बालविवाह निष्प्रेम व इंग्रजी स्वयंवर सुप्रेम वाटल्यास नवल तें काय ? अशा लोकांस ब्राह्मण स्त्रियांचें हृद्गतच कळत नाहीं; पुनर्विवाहापेक्षां वैधव्य स्थितीच ब्राह्मण स्त्रियांस कां पत्करते हें लक्षांत येण्यास देखील मनुष्य सात्विक व सहृदय असला पाहिजे.

" भागवत, भारत व रामायण, हे ग्रंथ पूर्वीं महर्षींनीं लिहिले त्यावेळीं क्षत्रिय लुप्त झाले नव्हते. राजस प्रीतीनें त्यावेळीं पुष्कळ विवाह होत होते; व त्या विवाहांच्या गोष्टी वाचल्या ह्मणजे पाश्चात्य कादंबऱ्यांसारखीं त्यांत कथानकें दिसतात. द्रौपदीचें चरित्र खऱ्या क्षत्रियेचें होय; सीता, सावित्री, सुभद्रा, दमयंती, रुक्मिणी, वगैरेंचें जें वर्णन आहे त्यांतही क्षत्रिय स्त्रियांचें वर्तन, विचार, धाडस वगैरे हीं उत्तम रीतीनें दृष्टीस पडतात. तामसी किंवा राक्षसी विवाहांचीं व प्रीतीचीं तशींच अनेक उदाहरणें शोधून काढितां येतील.

" सात्विक प्रीतीचे हेतु व कार्यें पारमार्थिक असतात. स्त्री जें जें करिते तें सर्व पुरुषाच्या सुखसंतोपासाठीं; पुरुष जें जें करितो तें स्त्रीच्या सुखसंतोषासाठीं; उभयतांही जें जें करितात तें संततीच्या व आप्तइष्टमित्रांच्या हितासाठीं. राजस प्रीतीचीं कार्यें क्वचित् सात्विक प्रीतीच्या कार्यांसारखींच बाह्यात्कारी दिसतील, परंतु त्यांतही हा हेतुभेद फार महत्त्वाचा आहे. विलायतचे **ग्लाडस्टन्साहेब** व त्यांची पत्नी यांमध्यें सात्विक प्रीति असावी असें त्या उभयतांच्या वर्तनावरून दिसून येतें; असे दुसरेही कित्येक महात्मे तिकडे असतील.

९१. " राजस प्रीतीमध्यें स्वार्थाकडे विशेष लक्ष असतें. उत्तम आहार, अनेक विहार, मौल्यवान् वस्त्राभरणें, सुशोभित विलासमंदिरें इत्यादींवांचून राजसप्रीति समाधान पावत नाहीं. आतां कुटुंबाच्या स्थितीप्रमाणें हीं सर्व सुखसाधनें कमी अधिक प्रमाणानें प्राप्त होतील ही गोष्ट निराळी; परंतु स्त्रीचा व पुरुषाचा त्यांविषयींचा पराकाष्ठेचा हव्यास असायाचा. अशा कुटुंबांत संततीकडे साधारणपणें कमी लक्ष पोहोंचतें व कन्यापुत्रांसही मोठेपणीं मातापितरांविषयीं कमी जबाबदारी वाटते. युरोपियन् स्त्रीपुरुषें लहान मुलें दायांच्या स्वाधीन करून आपण आपल्या आहारविहारांत गर्क असतात ही गोष्ट तुह्मी नित्य पहातच असाल. मी असें ऐकतों कीं, केवळ श्रीमंत लोकांतच ही चाल नाहीं, तर अनेक गरीब कुटुंबांतही आहे. नवरा एका कारखान्यांत काम करीत असतो, स्त्रीस मुलें संभाळीत बसण्याचा कंटाळा असतो; तेव्हां तीही दुसऱ्या कारखान्यांत काम करावयास जाते; उभयतां मिळून आपल्या प्राप्तींतून खर्च करून एखादे बाईस घर व मुलें संभाळण्यास ठेवितात.* राजस प्रीतीची ही जी स्वार्थ-

---

Town life in England for the working classes is the problem for philanthropists and legislators. *The conditions which go to make a home worth working for are generally absent.* And this being so it is but natural that the women's lives should approximate more and more closely to the men's, that they should prefer even the long hours of the factory, with the excitement of numbers, and the feeling that they are earning money, however hardly, to the dreary

परता तीमुळें ती फार दिवस टिकत नाहीं; मन चंचल व असमाधानी होतें, वैवाहिक पाश जड वाटूं लागतात; मग ते कोणी प्रत्यक्ष तोडून टाकितात; कोणी त्यांचा गुप्तपणें भंग करितात; कोणी प्रीतिसंबंध विसरून व्यापारांतील भागीदारांप्रमाणें कुटुंब चालवितात. एकंदरीनें पहातां या प्रीतीचे परिणाम वैवाहिक सुखास फारसे अनुकूल नाहींत. ब्राह्मणेतर ज्ञातींत सात्विक, राजस व तामस, तिन्ही प्रकारच्या प्रीतीचीं उदाहरणें सांपडतात; परंतु विवाहाच्या वयासंबंधानें त्यांमध्यें निश्चित प्रतिबंध नसल्यामुळें आजच्या वादांत त्यांविषयीं विचार करण्याचें कारण नाहीं. "

याप्रमाणें बापूसाहेबांचें बोलणें झाल्यावर मी त्यांची रजा घेऊन घरीं आलों. बाकीच्या विषयाचा विचार दुसरे दिवशीं करण्याचें ठरलें. मी घरीं आल्यावर माझे मनावर नवीन प्रकाश पडल्यासारखें मला वाटूं लागलें. लगीनघरीं लहानमोठीं अनेक जोडपीं गोळा झालीं होतीं; त्यांतील स्त्रीपुरुषांच्या वर्तनाकडे माझें सारखें लक्ष लागलें; मला पुढें बरेच दिवस हाच नाद लागला, व बापूसाहेबांचे बोलण्याचा पुष्कळ प्रत्यय येत चालला. चिरस्थायी आणि पारमार्थिक प्रेमाचा लाभ करून घेण्याचा व प्रेमांकुरास लहानपणापासून पोसून वृद्धिंगत करण्याचा परिणाम बालविवाहापासून होतो, अशी माझी हळूहळू खात्री होत चालली.

---

drudgery of life in a fourth-floor tenement and the loneliness of labour which brings them no pecuniary reward.

From the evidence of the recent Labour Commission, it appears that it is not at all uncommon for married women to pay almost as much as they earn, or in some cases, actually more than their wages, to a care-taker to look after the house and children while thay go to the factory. No doubt the large majority of factory hands work for actual subsistence, and not for an exchange, but tnat there should be numbers who choose the outside work shows that *the domestic hearth has not the same attractions for women as formerly.* GEORGIANA HILL : *Women in English Life, Vol. II pp. 203-4.*

# भाग २० वा.

## ब्राह्मणज्ञातीच्या ऱ्हासाचें कारण बालविवाह नसेल असें मला वाटूं लागलें.

९२. बालविवाहापासून जे इतर तोटे होतात त्यांविषयीं बापूसाहेबांचें ह्मणणें काय हें ऐकण्याविषयीं मी उतावीळ होतोंच, तेव्हां दुसरे दिवशीं संधी सांपडतांच मीं या प्रश्नांकडे बापूसाहेबांचें लक्ष वळविलें. ते ह्मणाले:—

"विद्याधरपंत, तुह्मी बालविवाहाचे जे दुसरे अनेक तोटे सांगतां त्यांचें प्रत्यंतर मला आमचे इतिहासांत किंवा सांप्रतच्या स्थितींत कोठेंच दिसत नाहीं. प्राचीनकाळीं ब्राह्मणकन्यकांचा विवाह प्रौढपणीं झाल्याचें मला कोठें आढळलेलें नाहीं. मनूच्या काळापासून ब्राह्मणांत तरी बालविवाह सुरू आहे. त्या काळापासून आतांपर्यंत किती हजार वर्षें गेलीं याचा तुह्मीच विचार करा. प्रत्येक पिढींत किंचित् शारीरिक व किंचित् मानसिक ऱ्हास होत गेला असें कल्पिलें तर दोनचारशें पिढ्यांत हा एकंदर ऱ्हास किती होईल याचें तुह्मी गणित करा; व तो जर तुमच्या ह्मणण्याप्रमाणें अवश्यपणें झाला असता, तर आज आपण ब्राह्मण लोक जगांत अवशिष्ट राहिलों नसतों असें मला वाटतें. कारण पूर्वींचे आपले पूर्वज मोठे धिप्पाड चार हात उंचीचे होते असें समजूं. दर पिढीस बालविवाहामुळें एक पंचमांश अंगुलीनें त्यांची उंची कमी होत गेली असें मानिलें तर पांच पिढ्यांत, ह्मणजे सुमारें सव्वाशें वर्षांत, एक अंगुलीनें प्रजेची उंची कमी होईल व ती कोणाच्या लक्षांतही येणार नाहीं. या हिशेबानें पांच हजार वर्षांत चाळीस अंगुळें उंची कमी होईल, ह्मणजे प्रजा दोनअडीच हात उंचीची होईल, परंतु तसा परिणाम हल्लीं मुळींच दिसत नाहीं. शिवाय याचप्रमाणानें उंची कमी होत गेली तर कोणत्याही एका काळीं जगांत असणाऱ्या ब्राह्मणांस ती कळूनही आली नसती. आतां तुह्मांस तर ती एकदोन पिढ्यांतच स्पष्टपणें कळून येत आहे असें दिसतें; तेव्हां पंचमांश अंगुलीपेक्षां अधिक जोरानें ऱ्हास सु-

रू असला पाहिजे; तसा प्राचीनकाळापासून असता तर आज आपलें अस्तित्वच शक्य नव्हतें. ब्राह्मणज्ञातींत बालविवाह नव्हता असा काळ आमच्या इतिहासांत नाहीं, व त्याचे जेवढे अवश्य परिणाम घडायाचे ते आतांपर्यंत क्रमानें घडत असून आपण शरीरानें व मनानें इतर प्रौढविवाह करणाऱ्या जातींच्या बरोबरीचे आहों, यावरून बालविवाहापासून दुष्परिणाम घडत असतील हें ह्मणणें मला योग्य दिसत नाहीं. जर ब्राह्मणांच्या ज्ञातींत अगदीं अलीकडे तुह्मांस ऱ्हास दिसूं लागला असेल, तर त्याचीं अन्य कारणें असलीं पाहिजेत.

९३. ब्राह्मणांचें अनुकरण फार प्राचीनकाळापासून इतर सर्व हिंदु जाती करीत आल्या आहेत. प्रभू दाशरथी रामाचा बालविवाह झाला व रामचंद्राच्या काळापासून पेशव्यांच्या काळापर्यंत जेवढे योद्धे, कवि, तत्त्वज्ञानी, मुत्सद्दी, साधुसंत व व्यवहारज्ञ पुरुष होऊन गेले तेवढे बालविवाहाचींच संतानें होत. आपआपल्या काळांत त्यांची योग्यता केवढी होती, त्यांचें कर्तृत्व किती होतें याचा विचार केल्यास त्यांमध्यें ऱ्हासाचीं चिन्हें दिसत नाहींत. ब्राह्मण लोकांनीं इतर हिंदु जातींवर आपलें वर्चस्व गेल्या दहा हजार वर्षें राखिलें आहे, असें तुह्मीच कबूल करितां. या दहा हजार वर्षांपैकीं गेल्या अडीच हजार वर्षांत ब्राह्मण ह्मणजे हिंदुधर्मसंरक्षक, या समजुतीनें ब्राह्मणांवर केवढाले दुर्धर प्रसंग आले असतील याचा विचार करा. गोब्राह्मणांचा नाश करणें हें तर प्राचीन राक्षसांप्रमाणें म्लेंच्छ जातींचें व्रत आहे. अशा अनेक प्रसंगांतून ब्राह्मणांनीं हिंदुसमाजाचें तारण करून आतांपर्यंत त्याचें धार्मिकत्व राखिलें आहे. हें सर्व ज्यांनीं केलें त्यांनीं बालविवाहाची चाल कधींही सोडिली नाहीं; असें असतां त्यांचें वीर्य, पराक्रम व वर्चस्व कायम राहिलें आहे. तेव्हां बालविवाहावर तुह्मांकडून वृथा दोषारोपण होत आहे असें सिद्ध होतें.

९४. तुमची आमची पिढी ही बालविवाहाचीच संतति आहे ना? आमच्या घराण्यांतील निदान दहा पिढ्यांची मला माहिती आहे. प्रत्येक मनुष्यास आपल्या मागील तीन चार पिढ्यांची तरी माहिती मिळविणें अशक्य नाहीं. दर पिढींतील पुरुषांची तुलना करून ऱ्हास झाला आहे कीं काय हें ठरविणें सोपें आहे; व तो आमच्या

घराण्यांत आमच्या पिढीपर्यंत झालेला मला तरी दिसून येत नाहीं. जर तुह्मांस इंग्रजी राज्यांत तो अलीकडे दिसूं लागला असेल, तर त्याचें नवीन वस्तुस्थितींत कोणतें कारण असावें हें तुह्मी कां शोधून काढीत नाहीं ?

प्रत्येक पिढींत कोणी मोठा बुद्धिमान्, कोणी साधारण, कोणी मंद असे पुरुष निपजतात; कोणी मोठा कर्ता निघतो, कोणी साधारण उद्योग धंदा करून पोट भरतो, कोणी बंधुवर्गाचे आश्रयानें राहतो. एका घराण्यांत एका पिढींत सर्व सारखे बुद्धिमान् व कर्ते पुरुष निघणें ह्मणजे अपवादस्थिति होय, ती ईश्वरी कृपाच ह्मटली पाहिजे. पांची बोटें सारखीं नसतात, हें तत्त्व सर्वत्र लागू पडतें. तेव्हां अशी स्थिति आहे तोंपर्यंत कांहीं कर्तृत्वहीन मंद पुरुषांकडे पाहून र्‍हास झाला, उतरती कळा लागली, असें ह्मणणें उचित नाहीं. परंतु जर घरोघर एका पिढींतील बहुतक सर्व व्यक्तींत मंदपणा व अशक्तता दिसेल तर तें र्‍हासाचें चिन्ह खरें. व त्याचीं कारणें कांहीं नवीन उत्पन्न झालीं असलीं पाहिजेत. त्या कारणांचा शोध करणें व प्रतिकार करणें सर्वथैव इष्ट आहे.

९५. 'अल्पवयांत मुलामुलींचीं लग्नें करून दिलीं ह्मणजे पुढें पुरुषाचे गळ्यांत तें एक लोढणें होतें, त्याच्या पायांत ती एक बेडी होते, असें तुह्मी ह्मणतां. परंतु या तुमच्या ह्मणण्यांत मला एक गोष्ट सिद्ध होते असें वाटतें. ती ही कीं या बालविवाहामुळें स्त्री व पुरुष प्रेमपाशानें इतकीं पक्कीं बांधलीं जातात कीं पुरुषास स्त्रीची उपेक्षा करणें अशक्य होतें. आतां बालविवाह कितीकांच्या कर्तृत्वास आड येतो, व कितीकांस प्रपंचांत तो फायदेशीर होतो, हें अनेक तरुण पुरुषांस विचारून ठरविलें पाहिजे. मला वाटतें, बहुतेक तरुण पुरुष कबूल करितील कीं त्यांमध्यें जेवढें कर्तृत्व आहे तेवढें प्रकट करण्यास त्यांच्या स्त्रियांकडून, किंवा त्यांच्या विवाहित स्थितीमुळें, कोणत्याही प्रकारचा अडथळा आलेला नाहीं. याचें कारण असें कीं पुरुष कांहीं असामान्य उद्योगास लागल्यास त्यांच्या स्त्रियांचा संभाळ करण्यास घरीं मातापितर तयार असतात, किंवा स्त्रियांच्या माहेरची मंडळी ती जबाबदारी घेण्यास तयार असतात. जर युरो-

पीय लोकांप्रमाणें हिंदु वराण्यांत विवाह आणि विभक्तता बराबरच होती, तर पुरुषाचे गळ्यांत स्त्रीचें लोढणें पडतें असें ह्मणण्यास जागा होती. परंतु हिंदूंमध्यें आप्तसंबंध फार दूरपर्यंत परिणाम करीत असतो; व दुर्धर प्रसंगांतही कोणी अगदीं अनाथ झाला असें सहसा घडत नाहीं.

"पुरुषाच्या कर्तृत्वास स्त्रिया कां आड येतील ? आपलें घराणें ऊर्जित दशेस यावें ही इच्छा स्त्रियांमध्यें जेवढी प्रबळ असते, तेवढी पुरुषांतही नसते. पुरुषाचा पराक्रम किती याचा अंदाज स्त्रियांस असतो; व त्या अंदाजानें त्या पुरुषाचें उत्तेजन किंवा निराकरण करीत असतात. आपल्या कर्तृत्वहीनतेचा दोष स्त्रियांवर लोटणारे कांहीं अधम पुरुष असतील. परंतु त्यांच्या बोलण्यावर, किंवा स्वतः-च्याच शुद्ध कल्पनांवर, तुह्मी भरंवसा ठेवूं नका.

"ज्यावेळीं ब्राह्मणांत व मराठ्यांत एकवेळ वीर्यातिरेक होऊन थोडे स्वराज्याचे दिवस आह्मीं पाहिले, त्यावेळीं मुली विधवा होतील ह्मणून त्या शूरवीर पुरुषांस देऊं नये असा कोणीं विचार केला काय ? शिपाई किंवा मुत्सद्दी होऊन पुरुष दूर कोठें जाऊन पडायाचे ह्मणून त्यांचीं लग्नें थांबलीं काय ? शूराची विधवा होणें बरें, मुत्सद्याच्या घरांत विरहदुःख सोसणें बरें, असा स्त्रियांतही त्यावेळीं आवेश उत्पन्न होत होता. पुरुषांत कर्तृत्व दिसलें कीं त्याच्या उत्कर्षाकरितां कोणतीं दुःखें स्त्रिया आपण होऊन सोसण्यास तयार होणार नाहींत ? बालविवाहांत कामवासनांपेक्षां धर्माचें व प्रेमाचें प्राबल्य अधिक असतें. पुरुषानें कामवश न होतां पराक्रमाची आकांक्षा धरल्यास त्यास हिंदुसमाजांत गृहस्थितीच्या संबंधानें कांहींएक विघ्न नाहीं असें समजा.

९६. "परंतु कर्तृत्ववान् पुरुष थोडे; बाकीच्यांस सुखासमाधानानें शांतपणें आयुष्य काढणें बरें वाटतें. पोटाची सोय लागतांच स्त्री प्रौढ दशेस आलेली असल्यानें स्वतंत्रपणें राहण्यास त्यांस सर्व गोष्टी एकदम अनुकूळ होतात. गरीबाच्या घरांत स्त्रीची योग्यता वर्णावी तितकी थोडी आहे. एकच नोकर परंतु हरएक काम क-

रणारी, एकच मालकीण परंतु प्रेमानें सर्वकाळ संभाळ करणारी, एकच पत्नी परंतु सर्व दुर्वर्तनांपासून आवरून धरणारी—स्त्रीसारखें गरिबाच्या घरांत दुसरें दैवतच नाहीं. विशेष गरीबीमुळें ज्यांचीं लग्नें झालीं नाहींत, ज्यांस परदेशांत हातानें सैंपाक करून पोट भरावें लागतें, ज्यांच्या वर्तनावर कोणाची नजर नाहीं, ज्यांस घरीं कांहीं करमणूक नाहीं,—त्यांची स्थिति तुह्मी मनांत आणा; ते प्रौढ झाले खरे, परंतु वैवाहिक सदाचरणास योग्य राहिले काय याचा विचार करा; ह्मणजे मग तरुणांवर मातापितरांनीं लवकर विवाह करून व प्रेमवती स्त्रीस कुटुंबशिक्षण देऊन तयार करून ठेविल्याचें महत्त्व तुमच्या लक्षांत येईल.

९७. "अखेरीस माझें ह्मणणें असें आहे कीं, स्त्रियांनीं व पुरुषांनीं ब्रह्मचर्यव्रत जितकें पाळवेल तितकें पाळावें, हें सर्वांस कबूल आहेच. परंतु या देशांत, येथील हवामानांत, हें ब्रह्मचर्य पालन करणें आमच्या मुलांमुलींस किती शक्य आहे, या बाबतींत या देशाचा धर्माचार ज्यांनीं हजारों वर्षांच्या अनुभवानें ठरविला, त्यांचें मत खरें असण्याचा संभव आहे कीं आधुनिक अनुकरणशील इंग्रजी विद्वानांचें मत खरें असण्याचा संभव आहे? आमच्या स्त्रियांत व पुरुषांत ज्या समजुती उपजतबुद्धीसारख्या झाल्या आहेत, त्या आमच्या समाजस्थैर्यास अनुकूल ह्मणूनच तशा झाल्या असाव्या, असें तुह्मी उत्क्रांतिपंथीय लोक कां अनुमान करीत नाहीं? आमच्या स्त्रिया व पुरुष आपणां स्वतःस आपल्या मुलींच्या व मुलांच्या जागीं कल्पून अविवाहित तारुण्याचा काय परिणाम होईल हें आत्मपरीक्षणानें ठरवितात असें तुह्मी कां मानीत नाहीं? आमचे शास्त्रांत व्यभिचार म्हणजे महत्पातक असें मानलेलें आहे. तसेंच ब्रह्मचर्य हें अत्यावश्यक मानलेलें आहे. परंतु तें स्वतंत्र व्यक्तींस फार अवघड आहे. तेव्हां व्यभिचाराचा संभव दूर करण्याकरितां व ब्रह्मचर्यास पाठबळ देण्याकरितां शास्त्रकारांनीं जी योजना केली व व्यवहारज्ञांनीं जी अंगीकारिली ती ही कीं स्त्रीनें बाळपणापासून पतिगृहीं वास करावा व पुरुषानें गुरुगृहीं वास करावा. ऋषिकाळाप्रमाणें हा नियम हल्लीं पाळला जात नाहीं हें खरें; परंतु व्यवहारांत अवश्य तेवढ्या

प्रमाणानें सुशील कुटुंबांत तो पाळला जातो. धर्माचें व वडलांचें सांगणें हें कीं ब्रह्मचर्य पालन करा; कामोत्पत्तीस जागा ठेवूं नका; सात्विक प्रेमाची वृद्धि करा. कामरूपी मनोवृत्तीची जेवढी दुर्निवारता, तेवढा तीविषयीं तिरस्कार वाढविण्याचा धर्मप्रवर्तकांचा, साधुसंतांचा व कवींचा प्रयत्न आहे.

९८. "जेव्हां आमच्या महाकवि भवभूतीनें आपल्या कुळाची धार्मिक श्रेष्ठता वर्णन करण्याच्या हेतूनें पुढील चरण लिहून ठेविला—' **दारानपत्याय तपोर्थमायुः**—तेव्हां स्त्रीपुरुषांमध्यें परस्परांबद्दल प्रेमावेश असावा लागतो व असतो, ही गोष्ट तो विसरला नव्हता. मालतीमाधव व उत्तररामचरित यांचा कर्ता तरी ही गोष्ट विसरण्याचा संभव नाहीं. परंतु त्याच्या त्या उक्तीचा भावार्थ हा कीं, स्त्रीपुरुषांचें प्रेम परम बलिष्ठ असावें, व तसेंच तें श्रेष्ठ, शुद्ध व सात्विक असावें; त्यांच्या प्रेमौघांचा संगम होऊन तो अपत्यरूपानें व्यवहारांत दिसावा; नाहींतर उभयतांच्या अंतःकरणांत तो गूढपणें भरून राहावा.

**अंतःकरणतत्त्वस्य दंपत्योरेकसंश्रयात् ।**
**आनंदग्रंथिरेकोऽयमपत्यमिति बध्यते ॥**

"कुटुंबाचा लौलिक पाळण करणारी उत्तम सद्‌गुणी संतति अशाच प्रेमापासून उत्पन्न होते, असें सर्व धार्मिक हिंदूंचें मत आहे. आमचा धर्म अनेक रूपांतरें झालीं तरी तत्त्वतः कायम राहिला, याचें कारण आमची उत्तम संतति असें आह्मी समजतों.

"सद्धर्म, ब्रह्मचर्य, पातिव्रत्य, शुद्ध संतति, इत्यादींच्या प्रकर्षापकर्षासंबंधानें फ्रान्स, स्पेन, इंग्लंड वगैरे युरोपीय राष्ट्रांची माहिती तुह्मांस उपलब्ध होण्यासारखी आहे. तेव्हां ती मिळवून त्यांच्या व आपणांमधील अंतर तुह्मीं ताडून पाहिल्यास येथवर सांगितलेल्या कांहीं गोष्टींविषयींचा तुह्मांस चांगला निर्णय करितां येईल."

याप्रमाणें बापूसाहेबांचें बोलणें झाल्यावर मी घरीं आलों. बालविवाहासंबंधानें माझा दुराग्रह कमी झाला; परंतु बालविवाह योग्य अशी माझी खात्री होईना; निदान, अलीकडील पिढींत तरी त्यापा-

सून दुष्परिणाम घडत आहेत ही माझी समजूत कायम राहिली. आमच्या लोकांत जो ऱ्हास दृष्टीस पडतो, त्याचीं कारणें बालविवाहाखेरीज दुसरीं कांहीं असतील ही शंकाच माझे मनांत पूर्वीं कधीं आलेली नव्हती. ती बापूसाहेबांनीं माझे मनांत भरवून देऊन मला निरुत्तर केलें. तेव्हां मींही निश्चय केला कीं, आमच्या ऱ्हासाचीं अन्य कारणें असल्यास त्यांचा पुनः एकवार शुद्ध अंतःकरणानें स्वतंत्रपणें विचार करायाचा; व मग बालविवाहाच्या युक्तायुक्ततेबद्दल कोणतेंही एक मत ठरवायाचें.

---

## भाग २१ वा.

## जातिभेदाची उत्पत्ति.

९९. माझ्या मनांत धर्मसंबंधी अनेक शंका उत्पन्न झालेल्या आहेत व त्यांमुळें माझी धर्मश्रद्धा क्षीण झाली आहे, असें बापूसाहेबांनीं आतांपर्यंतच्या सहवासावरून ताडलें, व माझ्या अनेक प्रश्नांस उत्तर देणें आपणांस अशक्य आहे असें जाणून त्यांनीं माझी व एका विद्वान् साधूची गांठ घालून देण्याचा संकेत केला. या साधूचें पूर्व चरित्र कोणांस फारसें माहीत नव्हतें. त्यांचें शास्त्रज्ञान पाहून हे पूर्वीं कोणी मोटे शास्त्री असावे असा लोक तर्क करीत. त्यांनीं नर्मदातीरीं आपला मठ स्थापिल्यापासून केवळ परोपकारांत सदासर्वकाळ ते निमग्न असत. कोणी कोणत्याही जातीचा, गरीब किंवा श्रीमंत मनुष्य येवो, त्याचीं शारीरिक, मानसिक किंवा प्रापंचिक दुःखें त्यांनीं ऐकून घ्यावीं व औषधोपचार, सदुपदेश किंवा सन्मार्ग दाखवून त्यास समाधानानें परत पाठवून द्यावें. त्यांच्या औषधांचा व उपदेशाचा हटकून गुण यावयाचा अशी सर्वांची समजूत होती, त्यामुळें त्यांविषयीं अत्यंत पूज्यबुद्धि व भरंवसा लोकांमध्यें वागत होता. परोपकारकृत्यांत त्यांचा पैसाही पुष्कळ खर्च होत असे, परंतु तो कोठून येतो हें कोणास कळत नव्हतें. त्यांची स्वतःची वृत्ति पाहिली तर कोणापाशीं कांहीं मागायाचें नाहीं अशी होती. त्यांकडे शास्त्रग्रंथ शिक-

ण्यास जे मुलगे येत, तेच त्यांचे शिष्य व सेवक असत; व त्यांनीं दिगंबरमहाराजांचें सर्व काम करावें. फावल्या वेळीं महाराजांनीं मठाचे आवारांत लाविलेल्या फुलझाडांस व फळझाडांस पाणी घालावें, त्यांखालचा केरकचरा आपल्या हातानें काढावा व तें आवार स्वच्छ राखून त्यांत विचार करीत फिरावें. या त्यांच्या असाधारण वर्तनावरून त्यांस योगविद्या साध्य असावी, मांत्रिकविद्या येत असावी, इत्यादि अनेक प्रकारचे लोकांचे तर्क होते. महाराजांनीं आपलें पूर्व वृत्त कोणास सांगायाचें नाहीं असा निश्चय केला असल्यामुळें व स्वतःसंबंधानें कोणाशीं कांहीं बोलायाचें नाहीं असें त्यांचें व्रत असल्यामुळें, त्यांविषयीं लोकांमध्यें खऱ्याखोट्या अनेक कल्पना होत्या. राज्याच्या घडामोडीचीं अनेक कारस्थानें करून, व दैव प्रतिकूळ आहे असें पाहून हे आतां परमार्थाकडे वळले आहेत, असें हळूच कानांत सांगणारे कित्येक गृहस्थ होते. महाराजांस निरनिराळ्या प्रांतांतील लोकांची जी माहिती होती व इंग्रजांच्या राजकीय चातुर्याबद्दल त्यांचे जे क्वचित् उद्गार निघत त्यांवरून लोकांनीं हा तर्क बांधला असावा. वर्षांतून एकवेळ महाराजांची स्वारी कांहीं दिवस क्षेत्रपर्यटनास जात असे. त्यावेळीं अनेक नास्तिकांशीं व परधर्मीयांशीं त्यांचा वादविवाद होतो व ज्याची जशी योग्यता तशी वादाची पद्धति अंगीकारून प्रतिपक्षास ते निरुत्तर करितात, असेंही पुष्कळ भाविक लोकांकडून मला कळलें. हिंदुधर्मशास्त्राचें मला स्वतःला मुळींच ज्ञान नव्हतें, तेव्हां आपण महाराजांशीं शुद्ध युक्तिवाद करायाचा असें मीं मनांत ठरविलें. असो.

१००. महाराजांकडे आम्ही जेव्हां प्रथम गेलों, तेव्हां त्यांचें सौम्य स्वरूप व प्रसन्न मुद्रा पाहून मला फार आल्हाद वाटला. बापूसाहेबांनीं मी कोणकाय वगैरे सांगितल्यावर, माझी धर्मज्ञानाविषयींची आस्था वर्णन केली, व मला महाराजांस कांहीं प्रश्न विचारायाचे आहेत असें सुचविलें.

" बापूसाहेब, मी सर्वज्ञ नाहीं. मला स्वतःसही कांहीं शंका आहेत व त्यांचा बुद्धिवादानें निर्णय होणें कदाचित् अशक्य असेल असें मला वाटूं लागलें आहे. तथापि ' वादे वादे जायते तत्त्वबोधः '

या न्यायानें जोंवर बुद्धीस सूक्ष्महो मार्ग मिळण्याचा संभव आहे, तोंपर्यंत वाद व विवेक यांपासून परावृत्त होतां कामां नये. ह्मणून या गृहस्थांचे प्रश्न ऐकून घेण्याची माझी इच्छा आहे. जर त्या प्रश्नांचा विचार मीं पूर्वीं केलेला असेल, तर त्यांचें मला आतांच उत्तर देतां येईल. जर ते प्रश्न नवीन असले तर मला विचार करण्यास नवीन जागा होईल. ”

यापमाणें दिगंबरमहाराजांचें उत्तर ऐकिल्यावर मीं त्यांच्यापुढें जातिभेदाचा प्रश्न काढिला. जातिभेद उत्पन्न झाला कसा, त्याचीं रूपांतरें कशीं झालीं, त्याचें बळ किंवा उपयुक्तता कशांत आहे, व तो कायम राहण्याचा संभव किंवा आवश्यकता आहे काय, इत्यादि प्रकारांनीं मीं आपल्या प्रश्नाचा विस्तर करून तो स्पष्ट केला. युक्तिवादानें या विषयाचें विवेचन होईल तितकें बरें, असेंही मीं सुचविलें. या प्रश्नावर महाराजांचें व आमचें कित्येक दिवस बोलणें चाललें होतें. तें सर्व यथावत् निरूपण करणें अशक्य आहे. याकारितां त्याचा सारांश पुढें देतों. या संभाषणाच्या वेळीं महाराजांनीं आपला छोटा शिष्यवर्ग आपणांशेजारीं बसवून ठेवावा; व त्याचें लक्ष इकडे तिकडे जाऊं देऊं नये. आपल्या शिष्यांच्या कोमळ बुद्धीवर आपण जें बोलणार त्याचा अवश्य अनुकूल परिणाम होईल असा त्यांचा ग्रह असावा. ते ह्मणाले—

१०१. “तुम्हां आधुनिक लोकांस सर्वत्र युक्तिवाद हवा, परंतु या युक्तिवादांत आह्मांसारख्या जुनाट मनुष्यांस फारसें प्राविण्य नसतें, हें मला प्रथम स्पष्ट कबूल केलें पाहिजे. ह्मणून मला माझ्या बुद्धीनें जें यथार्थ दिसतें, तें मी तुह्मांस सांगतों: माझ्या बुद्धीस त्यामुळें समाधान वाटलें ह्मणून तुमच्या बुद्धीस तें वाटेल, अशी मला फारशी आशा नाहीं. बुद्धिविषयक अहंकारांतून मुक्त व्हावें हा माझा नित्य प्रयत्न आहे. या अहंकारानें फारच थोड्यांस सोडिलें आहे. माझे एक मित्र दक्षिण देशांत आहेत. त्यांनीं वादविवादांत दुसऱ्यांस ‘ तुह्मी खुळे आहां ’ असें वरचेवर ह्मणावें; त्यावरून एके दिवशीं त्यांस कोणीं प्रश्न केला ‘ यतिमहाराज, **खुळा** या शब्दाचा अर्थ काय ? ’ तेव्हां त्यांनीं त्यास उत्तर दिलें. कीं ज्याचें मत आपणाशीं जुळत ना-

हीं, तो खुळा होय. या त्यांच्या उत्तराचा अर्थ हा कीं, ज्यानें बुद्धिवादाचा मार्ग स्वीकारला त्यास साहजिकपणें, अनिवार्यपणें, अहंकार उत्पन्न होतो. आपणां स्वतःस जें सत्य, शक्य, साधु दिसलें तें इतरांस तसें दिसलें नाहीं, म्हणजे आपणांस आश्चर्य वाटतें, इतरांच्या बुद्धीचा आपण तो दोष किंवा कमीपणा मानितों, व मनांत तरी त्यांस खुळे समजतों. बुद्धिवादाहून निराळ्या अशा दुसऱ्या कित्येक प्रबळ कारणांनीं परस्परांविषयीं आपणांमध्यें बहुमान उत्पन्न होतो; असें नसतें तर जगांत प्रत्येकास दुसरा खुळा दिसला असता. जे बुद्धिमार्गास लागले, बुद्धिवादानें व उपदेशानें सर्वांचें एकमत होईल अशी ज्यांस आशा उत्पन्न झाली, ते अनिवार्यपणें अहंकारांत सांपडले असें समजावें. हा अहंकार फार दुस्तर आहे.

१०२. एकाच जमिनींत एकाच काळीं एकाच जातीचीं शंभर बीजें लाविल्यास त्यांपासून जीं झाडें होतील त्यांमध्यें सरासरी सादृश्य दिसून येईल, परंतु पूर्ण सादृश्य असणें अशक्य आहे. ऊन, वारा, पाऊस, पशु, पक्षी, कीटक इत्यादि अनेक भूतांच्या क्रिया त्या झाडांवर आरंभापासून थोडथोड्या भिन्न होऊं लागतात व त्यामुळें एक झाड सर्वथैव दुसऱ्यासारखें कदापि होत नाहीं. पानांची व फांद्यांची ठेवण, फुलांचा व फळांचा कमीजास्त बहार, वगैरे भेद उत्पन्न होऊन त्या झाडांमध्यें पुष्कळ वैचित्र्य उत्पन्न होतें. ही जर झाडांची स्थिति, तर मनुष्याच्या मनास याहून किती अधिक वैचित्र्य प्राप्त व्हावें याचा तुह्मीच विचार करा.

जन्मास आल्यापासून अनंत बाह्य उपाधींचे मनुष्याच्या मनावर संस्कार होऊं लागतात. सुख, दुःख, क्रोध, मोह, इत्यादि अनेक मनाच्या वृत्ति आहेत, व त्यांनीं बाह्यसंस्कारांचें आधींचें वैचित्र्य बहुगुणित होतें. यामुळें दोन व्यक्तींचीं मनें सर्वथैव सारखीं असण्याचा मुळींच संभव नाहींसा होतो. पूर्व संस्कारांनीं जें एकाच्या बुद्धीस ग्राह्य किंवा स्पष्ट झालें असतें तें दुसऱ्यास केव्हां केव्हां अकल्पनीयही होतें. बुद्धीची सर्व ग्राहकता पूर्वींच्या संस्कारांवर अवलंबून राहते. मनोवृत्तिभेदानें एकाच प्रकारचे अनुभव भिन्न मनांवर कमीजास्त दृढ संस्कार करितात व या रीतीनें बुद्धीस अवर्णनीय वैचि-

त्र्य येतें. बरें, या एका आयुष्यांतील संस्कारांचा विचार करून भागत नाहीं; पितृपरंपरेनेंही मनुष्यांत जन्मतः बीजरूपानें कांहीं संस्कार अवतरतात. मुलांच्या आकृतींत, बोलण्याचालण्यांत, वगैरे जसें मातापितरांचें बरेंच सादृश्य उत्पन्न होतें, तसें तें मनाच्या प्रवृत्तींतही निर्माण होतें. पूर्व जन्मींच्या कर्मांचाही असाच परिणाम होतो असें मानण्यास जागा आहे. तेव्हां या तिन्ही प्रकारच्या पूर्वसंस्कारांचा मनांवर परिणाम पाहिल्यास 'व्यक्ति तितक्या प्रकृति' हें तत्त्व पूर्णपणें स्थापित होतें; व त्याचा व्यावहारिक परिणाम रुचिवैचित्र्य व बुद्धिविषयक अहंकार, हा होय. ह्मणून केवळ बुद्धिवादानें दोन मनुष्यांचें एक मत होणें असंभाव्य आहे; अनेक व्यक्तींचें होणें, त्याहून अधिक असंभाव्य आहे; व यदाकदाचित् तें झालें, तथापि त्या मताचें **बळ** व **स्थैर्य** यांसंबंधानें जितक्या व्यक्ति तितके प्रकार दृष्टीस पडतील.

या प्रकारचें शुद्ध बुद्धिवादाचें फळ आहे. तें व्यवहारात्मक समाजस्थितीस अत्यंत अहितकारी आहे. याकरितां कुटुंब आणि समाज हे बुद्धिवादाची सीमा जितकी कमी करवेल तितकी करण्याचा प्रयत्न करीत असतात. धर्म, रूढि, वडलांच्या व गुरूंच्या आज्ञा, साधूंचा स्वानुभवाचा उपदेश, इत्यादि सर्वांची मनाच्या कोंवळेपणींच यथावत् **प्रेरणा** करण्याचा प्रयत्न समाजांत सर्वत्र सुरू आहे. बुद्धीस जोर येण्यापूर्वींच किंवा ती उदासीन असतां या **प्रेरणांचा** दृढ संस्कार एकवार होऊन गेला, ह्मणजे बुद्धीसही निश्चित वळण लागतें. समाजांत अनेक बाबतींत जें एकमत दिसतें तें प्रेरणामूलक होय. बुद्धीस प्रतिबंधांत ठेवल्याचें तें फळ होय. त्यावर समाजाचें स्थैर्य अवलंबून आहे. बुद्धीस साम्य आणि वैचित्र्य कोणत्या कारणांनीं येतें व समाजस्थितीशीं त्यांचा कोणता संबंध आहे, हा विषय प्रस्तावनारूप झाला. पुढील विवेचनांत त्याचा कदाचित् थोडा उपयोग होईल.

१०३. केवळ युक्तिवादानें पाहिलें असतां जगांत सर्वत्र दोन जाती तरी उत्पन्न झाल्या पाहिजेत; या देशांत त्या वेदकाळाच्याही पूर्वीं निर्माण झाल्या असाव्या; आपण व दुसरे या त्या दोन जाती

होत. स्वकीय आणि परकीय, सजातीय आणि विजातीय, मित्र आणि शत्रु, देव आणि दस्यु, आर्य आणि म्लेंछ, हे भेद जसजसा समाज वाढत गेला तसतसे क्रमानें एका मागून एक उत्पन्न होत गेले, हें निर्विवाद आहे. परंतु सुव्यवस्थित समाजांत या दोनच जाती राहणें शक्य नाहीं. मोठ्या समाजांत गुण व कर्म यांनीं व्यक्तिमात्रांत भेद पडलाच पाहिजे. कोणी एक वरिष्ठ बनला ह्मणजे दुसऱ्या कोणास कनिष्ठ बनलेंच पाहिजे. जे कोणत्याही प्रकारें पराक्रमी ठरले त्यांची जे अपराक्रमी त्यांनीं सेवा आरंभिली पाहिजे. ज्यांनीं पराक्रमानें संपत्ति मिळविली, त्यांचे हस्तक इतरांस होणें भाग आहे. या प्रकारें सेवक वर्गांत सर्व शूद्र येतात, व सेव्य वर्गांत पराक्रमी व संपत्तिमान् यांचा समावेश होतो. ज्यांचा पराक्रम व संपत्ति मानसिक असते ते ब्राह्मण होत; ज्यांचा पराक्रम बाहुबळापासून व संपत्ति त्याच्या द्वारें मिळविलेली ते क्षत्रिय होत; व ज्यांची संपत्ति भौतिक व उद्योगानें आणि ब्रह्मक्षत्रियांच्या आनुकूल्यानें मिळविलेली ते वैश्य होत. याप्रमाणें हे चार वर्ण फार प्राचीन काळीं उत्पन्न झाले. सर्व सुव्यवस्थित समाजांत ते उत्पन्न झालेच पाहिजेत.

१०४. प्रत्येक वर्णांत कित्येक गुण असे उत्तम आहेत कीं त्यांमुळें आपआपल्या गुणकर्मांची परिपूर्तता करणारास आनंद होतो व जीवितसाफल्य वाटतें. ह्मणूनच आपलें कर्म व आपली जात मुलांनीं चालवावी असें मातापितरांस साहजिकपणें वाटतें व जातीस स्थैर्य येतें. या प्रकारचें वर्गीकरण होण्यास **ब्राह्मणांचें प्राबल्य** किंवा **राजांचा अधिकार** आवश्यक नाहीं. कुटुंबाच्या व्यवस्थेनेंच तें उत्पन्न होतें. ब्राह्मणांच्या मुलींनीं घरीं वेदविद्येची व बुद्धिपरिश्रमाची आजन्म थोरवी पाहिलेली असायाची. तेव्हां त्यांस बाहुबलानें घोर कृत्यें करणाऱ्या क्षत्रियांशीं विवाह करणें रुचणार नाहीं. त्यांच्या मातापितरांसही तें इष्ट भासणार नाहीं. प्राचीन काळीं मुलांमुलींच्या विवाहाच्या निश्चयाचे प्रसंगीं प्रत्येक कुटुंबांत जे वादविवाद होत असतील, त्या वादांत आप्तइष्टमित्र जो सल्ला देत असतील, त्यामुळेंच जातिभेदास प्राबल्य व स्थैर्य आलें. आपली योग्यता कमी होईल, आपली संतति कुळाचार चालविणार नाहीं, आपल्या संपत्तीचें

वर्धन व संरक्षण होणार नाहीं, आपल्या धंद्यांतील गुप्त गोष्टी बाहेर फुटतील, किंवा आपल्या जातीचें बळ कमी होईल, इत्यादि विचारांनीं जातीजातींतील विवाह बंद झाले, व जात्यभिमान वाढत चालला. ब्राह्मणांनीं बुद्धिवैभव पत्करलें व त्यांतच संतोष मानून इतर वैभवाचा तिरस्कार केला. क्षत्रियांनीं पराक्रम, ऐश्वर्य व विषयोपभोग यांचा स्वीकार केला, व बुद्धीच्या आणि उद्योगाच्या मंद फलप्राप्तीस ते उदासीन झाले. जमीनजुमला, धनधान्यसमृद्धि, व्यापार वगैरे हीं वैश्यांनीं अंगीकारिलीं व आपलें सर्व बुद्धिकौशल्य त्यांतच ते खर्च करूं लागले. या सर्व गोष्टी समाजाच्या उत्कर्षास कारण झाल्या.

१०५. प्रत्यक्षपणें धनधान्य उत्पन्न करणारे जे वर्ग असतात, त्यांस देशांत शांतता असावी असें वाटतें. याप्रमाणें वैश्य व शूद्र यांची नेहमीं इच्छा असे. दुसऱ्यांनीं उत्पन्न केलेल्या धनधान्यावर ज्यांचा निर्वाह त्यांस **वरिष्ठ प्रतीची सेवा** करून, ह्मणजे तत्त्वतः दुसऱ्यांवर अंमल चालवून, आपलें प्राबल्य राखिलें पाहिजे. असे दोन वर्ग ब्राह्मण आणि क्षत्रिय हे होते. ब्राह्मणांस बुद्धीचा व क्षत्रियांस बाहुबलाचा विशेष अभिमान उत्पन्न होऊन त्यांनीं आपापलें वर्चस्व स्थापित करण्याचा प्रयत्न आरंभिला. या प्रयत्नांत ब्राह्मणांस यश आलें व ते सर्व वर्णांचे गुरु ठरले हें सांगायास नकोच.

मुख्यत्वें जी गोष्ट ध्यानांत ठेवायाची ती ही कीं, ब्राह्मणांची श्रेष्ठता सर्वमान्य झाली, तथापि ते स्वतः दरिद्री, तपस्वी व निरपेक्ष राहिले. त्यांनीं क्षत्रियांच्या हातूनच राज्यकारभार चालविला; आपण केवळ गुरु किंवा मंत्री झाले. जातिभेदाचें किंवा कर्मभेदाचें प्राबल्य आरंभापासून असावें ही गोष्ट एका विशेष प्रमाणानें सिद्ध होते. तें असें कीं ब्राह्मणांनीं स्वतः राज्याधिकाराची कधींच इच्छा केली नाहीं. जेव्हां उपदेशानें क्षत्रिय ताळ्यावर येईनात तेव्हां त्यांनीं शस्त्रधारणही केलें; इतर विद्यांप्रमाणें शस्त्रास्त्र विद्येंतही त्यांचें उत्तम प्रावीण्य असे. परंतु त्या प्रावीण्याचा उपयोग उन्मत्त क्षत्रियांच्या शासनापुरताच; राज्योपभोगाकडे ब्राह्मणांच्या वासना वळल्या नाहींत.

ब्राह्मणांच्या सर्वमान्य श्रेष्ठतेमुळें इतर वर्णांकडून त्यांस विशेष

हक्क मिळाले किंवा ते त्यांनीं मिळविले हें उचितच होय. ब्राह्मणांनीं धर्म, न्याय, सदाचार, परोपकार, भूतदया व इतर अनेक उदात्त वृत्ति आर्यसमाजांत आणिल्या. त्यांनीं शस्त्रास्त्रांवांचून, रक्तपातावांचून, वैमनस्यावांचून आपलें संरक्षण करण्याची सर्वदा इच्छा धरली. तसेंच अधिकारमदानें व बाहुबलानें उन्मत्त झालेल्या क्षत्रियांस नीतीनें व धर्मानें चालायास लावण्यास ब्रह्मभयाखेरीज त्या काळीं दुसरें साधनच नव्हतें; शिवाय क्षत्रियांच्या शासनाचा अधिकार ब्राह्मणांकडे होता. जात्या दरिद्री, शस्त्रग्रहणास पराङ्मुख, व अधिकार तर हा एवढा मोठा, अशी ज्यांची स्थिति, त्यांनीं आपली पूज्यता हरतऱ्हेनें स्थापित केली, आपणांविषयीं धार्मिक भय उत्पन्न केलें व या उपायांनीं प्रजेच्या कैवाराचें काम अव्याहत चालविलें,—यांत त्यांचें अपूर्व ज्ञान व दूरदृष्टि दिसून येते.

१०६. गुणकर्मविभागानें चातुर्वर्ण्य उत्पन्न झालें असें आतां दाखविलें, परंतु प्राचीनकाळीं केव्हांही चारच जाती होत्या असा त्यावरून सिद्धांत काढतां कामां नये. आरंभापासून कर्मविभागानें अनेक जाति नव्या नव्या उत्पन्न होत चालल्या. जेव्हां राजर्षि आणि ब्रह्मर्षि यांनीं राजनीति व धर्मकृत्यें ठरविण्याचा प्रयत्न केला, तेव्हां त्यांनीं धर्मशास्त्राच्या दृष्टीनें समाजाचे चार भाग कल्पिले. सेव्य वर्गाचे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य हे तीन वर्ण केले, सेवकवर्गाचा एकच वर्ण केला, तो शूद्रांचा होय. परंतु हें शास्त्रविषयक स्थूल वर्गीकरण आहे; त्यावरून प्राचीनकाळीं कोणत्या उद्योगास किती मान मिळे हें दिसून येतें. ज्ञान व पराक्रम हे सर्व श्रेष्ठ गणिले गेले. वैश्य वर्णांत कृषि, गोरक्ष्य आणि वाणिज्य हे तिन्ही धंदे करणारांचा समावेश केला; त्यावरून पशु, धान्य, स्थावर जिनगी व व्यापार यांवर ज्यांचें प्रत्यक्ष स्वामित्व व यांशीं ज्यांचा निकट संबंध असे हे धंदे अधिक योग्यतेचे व उत्तेजनार्ह ठरविले गेले. बाकी सर्वच उद्योग कमी योग्यतेचे ठरवून चवथ्या व कनिष्ठ वर्णांत त्यांचा संग्रह केला.

१०७. हा शास्त्रीय वर्णविभाग केवळ धर्मशास्त्राच्या उपयोगी होता. व्यवहारांत जाति अनेक होत्या, व त्यांनीं आपआपलीं कर्तव्यें स्वतंत्रपणें किंवा ब्राह्मणांच्या व राजांच्या मदतीनें ठरविलीं अ-

सावीं; व तीं रूढीनें कायम ठेविलीं असावीं. चतुर्वर्णव्यवस्थेंत निरनिराळ्या धंद्यांचें महत्त्व समाजाच्या प्राथमिक आवश्यकतांच्या दृष्टीनें ठरविलें गेलें. परंतु जेव्हां समाज मोठा व संपत्तिमान् होतो, तेव्हां प्राथमिक आवश्यकतांपेक्षां इतर अनेक आवश्यकता श्रेष्ठतर ठरतात; व व्यवहारांत त्या आवश्यकता पुरविणारांच्या जातींस अधिक महत्त्व येतें. उदाहरणार्थ, ज्यांचें ब्राह्मणांशीं साहचर्य व जे ब्राह्मणांस विशेष उपयोगी, त्यांचें याप्रकारें अधिक महत्त्व झालें. जे राजांच्या उपयोगी व साहचर्यानें राहणारे, त्यांचें तसेंच महत्त्व वाढलें. लेखक, सारथि, स्तुतिपाठक, गायक, शिल्पकार, चित्रकार वगैरे अनेक धंदेवाल्यांच्या जाति अशा कारणानें कृषिगोरक्ष्य करणारांहून वरिष्ठ झाल्या. ज्यांचे धंदे स्वच्छ तेही अधिक योग्यतेस चढले; व अमंगळ धंदे मात्र हीन योग्यतेचे झाले. याप्रमाणें चातुर्वर्ण्याहून निराळा व्यावहारिक जातिक्रम ब्राह्मणापासून चांडाळापर्यंत उतरत्या योग्यतेचा फार दिवस चालत आलेला आहे; व त्या क्रमाचें नियमन गुण आणि कर्म यांची श्रेष्ठता, शुद्धता व सामाजिक उपयुक्तता हीं जाणून झालेलें आहे.

१०८. जातिभेद वर्णभेदाहून निराळा आहे, व त्याचा अनुक्रमही निराळा आहे, हें आतां सिद्ध झालें. तो उत्पन्न होणें साहजिक आहे, असेंही दिसून येतें. परंतु आदिकालापासून त्यास या देशांत शाश्वती कशी आली, हा प्रश्न पुष्कळांस येतो व त्याचें त्यांस समाधानकारक उत्तर सांपडत नाहीं. असें होण्याचें कारण स्वधर्माचें ज्ञान नाहीं व म्लेंच्छविद्येनें मनें आधींपासून दूषित झालेलीं असतात हें होय. जातिभेद शाश्वत होण्याचीं कारणें अनेक आहेत. त्यांपैकीं प्रमुख म्हटलें म्हणजे ब्राह्मणांचें आचरण हें होय. जो सर्वांत श्रेष्ठ वर्ण, ज्यास सर्वांनीं भिऊन नम्र असावें व ज्याकडे धर्मप्रवर्तकांचा अधिकार,—त्यांनीं दारिद्र्य, ज्ञान आणि परमार्थ स्वीकारिला; ऐहिक संपत्तीचा व उपभोगांचा त्याग व तिरस्कार केला. त्यामुळें 'यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः' या न्यायानें ज्ञान आणि परमार्थ यांत श्रेष्ठता आहे, ऐहिक संपत्तींत नाहीं, हा बोध सर्व इतर जातींस होत गेला. परद्रव्यापहारानें श्रीमंत व्हावें किंवा परमुलखां-

वर हल्ला करून राज्यपद मिळवावें, ही इच्छा क्षत्रिय जातीस मात्र उत्पन्न होत असे, इतर जातींस ती उत्पन्न होईनाशी झाली. मोठ्या कष्टानें पुष्कळ संपत्ति मिळविली तथापि अखेरीस तिचा उपयोग परमार्थाकडे करण्याची प्रेरणा अत्यंत द्रव्यलोभी वैश्यांसही होत होती. ज्यांचें हत्यारें वगैरे करण्याचें काम, किंवा ज्यांस राजांचा नित्य सहवास, किंवा जे क्षत्रियांपासून कनिष्ठ जातींत उत्पन्न झालेले, ते शूद्र कधीं कधीं राजकीय महत्त्वाकांक्षेच्या नादीं लागत, परंतु त्यांस क्वचितच यश येई. या प्रकारें परमार्थाकडे बहुतेक सर्वांची ओढ लागल्यामुळें व ब्राह्मणांचें उदाहरण त्यांच्या डोळ्यांपुढें असल्यानें ऐहिक उच्चनीचस्थितीचा विचार प्रबळ झाला नाहीं; जी अगदीं वरिष्ठ जात तिजबद्दल मत्सर उत्पन्न झाला नाहीं, व ह्मणून जातिभेद मोडण्याची कोणास इच्छा उरली नाहीं.

१०९. प्रजापालनाचें तत्त्व ब्राह्मणांनीं इतक्या पूर्णपणें क्षत्रियांच्या मनावर बिंबविलें होतें कीं त्यासारखें दुसरें महत्त्वाचें कार्यच त्यांस उरलें नाहीं. प्रजेस राजा ह्मणजे परम श्रेष्ठ बंधु वाटावा, राजास प्रजा ह्मणजे आपल्या मुलांप्रमाणें वाटावी, हा सदा सर्वकाळ ब्राह्मणांचा उपदेश होता. हेंच त्यांनीं धर्माच्या व नीतीच्या रूपानें स्थापित केलें. त्यामुळें क्षत्रियांमध्यें आपसांत जरी लढाया झाल्या व जरी क्षत्रियांनीं वारंवार अत्यंत विषयोपभोगांत आयुष्य घालविलें, तथापि प्रजेस त्यांकडून उपद्रव झाला नाहीं. क्षत्रियांखेरीज इतरांनीं शस्त्रास्त्रांचा व्यासंगच सोडून दिला. अधर्म व परचक्र यांपासून प्रजेचें संरक्षण करणें केवळ क्षत्रियांचें काम झालें. त्यांच्या साहाय्यावांचून प्रजा अनाथ असे. धर्मबुद्धि नित्य जागृत ठेवण्याचा ब्राह्मणांचा प्रयत्न होता त्यामुळें जातिमत्सरानें, असमाधानानें किंवा संपत्तिलोभानें क्षत्रियेतर प्रजेंत बंडाळी होण्याचा संभव राहिला नव्हता. प्रत्येक जातींतील व वर्णांतील लोक आपल्या धर्माप्रमाणें चालत आहेत व आपलीं विशिष्ट कर्तव्यें करीत आहेत, हें पाहणेंही राजाकडे आलें, व धार्मिक, राजकीय आणि लौकिक,—सर्व प्रकारच्या दुर्वर्तनांचें शासन राजाकडून होत असे. त्यांतच सर्व जातींचें समाधान राहिल्यानें जातिभेदास अधिकच बळकटी आली.

११०. जातिभेदापासून प्रजेमध्यें समाधान राहण्याचें आणखी कारण असें होतें कीं जातीजातींमध्यें धंद्याचे संबंधानें चढाओढ नव्हती. देशांत लोकसंख्या दाट नव्हती; पुत्रसंतान जेवढें वाढेल तितकें वाढविण्याची धर्मानेंच आवश्यकता ठरविली होती. लोकांच्या आवश्यकता थोड्या व देश सुपीक आणि संपत्तिमान् होता. त्यामुळें कोणत्याही जातीस अत्यंत कष्ट करूनही पोटास पुरतें मिळायाचें नाहीं, अशी स्थिति आर्यावर्तांत कोठेंही नव्हती. उलट थोड्या श्रमानें सर्वांस सुखासमाधानानें रहातां येत असे. मग जीव धोक्यांत घालून व राजाज्ञा आणि धर्माज्ञा मोडून केवळ उच्चजातीय होण्याचा प्रयत्न करण्यास कोण प्रवृत्त होईल ? जातीचे निर्बंध तोडण्यांत फारसा स्वार्थ नव्हता; परमार्थाकरितां ते तोडण्याचें कारण नव्हतें. कोणीही असमाधानावांचून स्ववृत्ति सोडण्यास तयार होत नाहीं. राजांच्या किंवा क्षत्रियांच्या अपराधांवाचून असमाधान होण्याची शक्यताच नव्हती. क्षत्रियांचें शासन करणें हें ब्राह्मणांचें काम होतें; व तें उपदेशानें, शापानें व प्रसंगीं शस्त्रग्रहणानेंही त्यांनीं केलें. याप्रमाणें प्रजाहिताविषयीं व धर्मपालनाविषयीं ब्राह्मण जोंवर दक्ष होते व ब्रह्मतेजाची सर्वत्र भीति असे, तोंपर्यंत जातिभेद मोडण्याची शक्यताच नव्हती.

१११. जर केव्हांही ब्राह्मणांनीं आपल्या वर्चस्वाचा उपयोग दुसऱ्या जातींस लुटण्याकडे केला असता व परमार्थाकडे त्यांचें स्वतःचें कमी लक्ष राहिलें असतें, तर जातिभेदास शाश्वती आली नसती. जर ब्राह्मण क्षत्रियांस सामील किंवा वश झाले असते व संपत्ति आणि विषयोपभोग यांचा त्यांनीं अभिलाष केला असता, तर प्रजेंत असमाधान उत्पन्न होऊन ब्राह्मण व क्षत्रिय या उभयतांचेंही सर्वमान्य श्रेष्ठत्व जाऊन कनिष्ठ जातींनीं त्यांची बरोबरी करण्याचा प्रयत्न केला असता. जर ब्राह्मणांविषयींची इतर जातींमध्यें वसणारी गुरुभक्ति, व विशेषतः क्षत्रियांमध्यें वागणारी पूज्यबुद्धि व भीति, हीं कमी होण्यास ब्राह्मणांनीं यत्किंचित् कारण राहूं दिलें असतें, तर क्षत्रियांचा व इतर जातींचा कलह विकोपास जाऊन जातिभेदास धक्का बसला असता.

जातिभेदाच्या उत्पत्तीचा युक्तिवादाच्या दृष्टीनें येणेंप्रमाणें इतिहास आहे; व तो श्रुतिस्मृतिपुराणादि ग्रंथांशीं विसंगत नाहीं. धर्माचीं व नीतीचीं तत्त्वें कोणतीं व तीं अमलांत येण्यास योग्य उपाय कोणते हें ब्रह्मर्षींनीं फार पुरातनकाळीं शोधून काढिलें, व त्याप्रमाणें धर्मप्रवृत्ति केली, ह्मणूनच अनेक आर्यसंस्था आतांपर्यंत कायम राहिल्या व आर्यलोक आजपर्यंत जगांत टिकाव धरून राहिले. ऐहिक सुखांचा त्याग करणें व केवळ पारमार्थिक सुखाच्या आशेनें जन्मभर मनोनिग्रह करून राहणें हें किती अवघड आहे त्याचा विचार करा. धर्मप्रवर्तकाचें काम ज्यानें अंगीकारलें त्यास हा असा स्वार्थत्याग करणें अवश्यच आहे. इतर देशांत असे स्वार्थत्यागी धर्मप्रवर्तक एकेका काळीं कांहीं थोडे मात्र होऊन गेले; परंतु या देशांत फार काळपर्यंत एका मोठ्या सबंध जातीनें हें धर्मप्रवर्तकाचें काम निर्दोषपणें करून दाखविलें; परमार्थविषयक कल्पनांस पूर्णत्व आणून त्यांची देशभर पेरणी केली, व समाजांत शांतता आणि समाधान राखिलें. आपल्या ब्राह्मण पूर्वजांचे या देशावर याप्रमाणें अपरिमित उपकार आहेत. त्यांनींच आपणांस हा काळपर्यंत वांचविलें असें ह्मणण्यास हरकत नाहीं."

---

# भाग २२ वा.

## प्राचीन हिंदुधर्माचें रूपांतर.

११२. "जातिभेदाचें कालपरत्वें रूपांतर होत गेलें ही गोष्ट खरी, परंतु हें रूपांतर प्रथमतः पारमार्थिक दृष्टीनें झालें; लोकव्यवहाराच्या दृष्टीनें झालें नाहीं. धर्मदृष्ट्या कनिष्ठ जातींस अधिक हक्क मिळाले, व्यवहारांत अधिक हक्क मिळविण्याची त्यांस फारशी आवश्यकताच भासली नाहीं. ब्राह्मणांमध्यें ज्ञान आणि विचार यांची कालपरत्वें जी वृद्धि होत गेली तिचा हा परिणाम होय.

ब्राह्मणांस ज्ञानमूलक जी श्रेष्ठता येते व तीमुळें धर्मकर्मांत जें त्यां-

स महत्त्व येतें तें सर्व जातींस कां येऊं नये, हा प्रश्न फार प्राचीनकाळीं उत्पन्न झाला. इतर देशांत संपत्तिमूलक श्रेष्ठतेचा प्रश्न उत्पन्न होऊन राज्यक्रांत्या झाल्या; या देशांत संपत्तीस श्रेष्ठता नव्हतीच, परमार्थास ती होती, ह्मणून हळूहळू धर्मक्रांति होत गेली. ज्ञानवृद्धि आणि धर्मक्रांति यांची सुसंगति जातिभेदाचे इतिहासांत फार उत्तम प्रकारें दृष्टीस पडते.

११३. वैदिक काळांत परमार्थाचा मार्ग इंद्रादि देवांस यज्ञयागांनीं संतुष्ट करणें हा होता. यज्ञाची यथावत् सिद्धता होण्यास ब्राह्मण पाहिजेत; ह्मणजे ब्राह्मणद्वारा परमार्थाचें साधन करण्याखेरीज उपाय नव्हता. ही गोष्ट कलहास कारण झाली व ब्राह्मणांस तीविषयीं विचार करणें भाग झालें. विश्वामित्र हा क्षत्रिय असून त्यानें ब्राह्मण होण्याचा प्रयत्न केला; व तो त्याचा सिद्धीस गेला; पुढें त्यानें अनेक यज्ञ ब्राह्मणांप्रमाणें चालविले.

११४. वरिष्ठ जातींस तप करण्याची परवानगी होती, ती शूद्रांस नव्हती. हें तप शारीरिक व मानसिक होतें. ब्राह्मणांस त्यामुळेंच कांहीं विशिष्ट तपोबळ प्राप्त होतें आणि त्यानेंच ते वलिष्ठ होतात, असा शूद्रवर्गाचा समज होता; शूद्रांनीं या कारणानें तपश्चर्या आरंभावी, परंतु तीस ब्राह्मणांनीं विरोध करावा. शूद्रांस त्यांनीं वेदाध्ययन करूं देऊं नये व यज्ञ करण्याचाही अधिकार त्यांस ठेविला नव्हता. परमार्थसाधनाच्या संबंधानें शूद्रांस या प्रकारें फार पारतंत्र्य आलें होतें व तें ब्राह्मणशूद्रांमध्यें कलहाचें कारण झालें असावें. त्याचाही विचार करणें ब्राह्मणांस भाग पडलें.

११५. देवतांचे संबंधानें पुरातन ऋषि जेव्हां विचार करूं लागले तेव्हां एकेश्वर मताच्याही पलीकडे परब्रह्मापर्यंत त्यांची मजल जाऊन पोहोंचली. परंतु ज्ञानमार्गाच्या या अखेरच्या पायरीपर्यंत जाऊन पोहोंचण्याची सर्वच ब्राह्मणांची योग्यता नव्हती. ऋषिप्रणीत तत्त्वांचा सामान्य सांसारिक ब्राह्मणांमध्यें फार सावकाशपणें प्रसार होत गेला, व तदनुरूप धर्मकर्मांत फरक पडत चालला. वायूची देवता निराळी, पर्जन्याची निराळी, प्रकाशाची निराळी, हा पूर्वींचा

समज ज्ञानप्रसरानें सामान्य लोकांतूनही हळूहळू जात चालला. एकाच ईश्वराच्या किंवा आदिपुरुषाच्या वैदिक देवता या भिन्न विभूति होत, हें ज्ञान जसजसें लोकांत पसरत चाललें, तसतसें यज्ञयागांचें माहात्म्य नाहींसें होत गेलें. यज्ञ हा परमार्थसाधनाचा जो एकच मार्ग होता, तो आतां दुसरे जे ईश्वराराधनाचे नवीन मार्ग निघाले, त्यांहून कमी आवश्यकतेचा ठरला.

असें होण्यास दुसरें एक कारण झालें. ज्ञानमार्गास लागल्यावर लवकरच अनुकंपेचा प्रसर होऊं लागला; ही अनुकंपा वाढतां वाढतां सर्व भूतांपर्यंत जाऊन पोहोंचली. कोणा क्षुद्र प्राण्यासही दुःख देऊं नये, त्याविषयीं दया बाळगून त्याच्या सुखांत आपण सुख मानावें व सर्व भूतांचे ठायीं आत्मवत् दृष्टि असावी, हें धर्माचें एक परम तत्त्व ठरलें. या तत्त्वाचाही सामान्य ब्राह्मणांत हळूहळू प्रसार होत गेला, व त्यांच्या द्वारें तें इतर ज्ञातींत रूढ होत गेलें. ब्राह्मणांस पशुयज्ञ करणें अनुचित वाटूं लागलें, व या कारणानेंही यज्ञाची योग्यता नाहींशी होत चालली.

११६. अनेक देवता व त्यांच्या प्रीत्यर्थ यजनयाजन, हा परमार्थाचा मार्ग जेव्हां गौण झाला, तेव्हां प्रथम एकाच ईश्वराचीं ब्रह्मा, विष्णु व महेश अशीं तीन रूपें कल्पून त्यांच्या आराधनेनें सर्व परमार्थ साधतो असें प्रतिपादन करण्यांत येऊं लागलें. पूर्वीच्या देवता ईश्वराच्याच विभूति, परंतु त्या ब्रह्मविष्णुमहेशांहून कनिष्ठ प्रतीच्या असें ठरविण्यांत आलें. कारण, पर्जन्यादि पृथक् पृथक् सृष्टिव्यापारांत ईश्वरी विभूतींच्या कार्यांची प्रतीति मानणें हें फारसें महत्त्वाचें नाहीं; त्यापेक्षां उत्पत्ति, स्थिति आणि लय हीं जीं कार्यें सृष्टींत अनादिकालापासून चालत आलीं आहेत, व पुढें अनंत काळपर्यंत चालत राहणार, त्या कार्यांत ईश्वरी विभूतींच्या कर्तृत्वाचा प्रत्यय घेणें हें अधिक महत्त्वाचें व बुद्धीस अधिक समाधानकारक आहे. ह्मणून ब्रह्मविष्णुमहेशांचें आराधन अधिक श्रेयस्कर ठरलें. व पुढें धर्माचें पूर्व व पर स्वरूप सांधून घेण्याकरितां पुराणग्रंथ लिहिण्यास ब्राह्मणांनीं आरंभ केला. या पुराणांमध्यें पूर्वींचा इतिहास, आख्यायिका, धर्माचीं जुनीं व नवीं तत्त्वें, ऋषींचे विचारांची भिन्न काळची

स्थिति, वगैरे अनेक गोष्टींचा संग्रह केलेला आहे. वेद, ब्राह्मण, उपनिषदें, सूत्रें, वगैरेमध्यें जें ज्ञान पूर्वी संचित झालें होतें, त्यापैकीं सर्व उपयुक्त भाग पुराणांत आणिला आहे. हीं पुराणें उत्पन्न झाल्यापासून सामान्य ब्राह्मणांस वेदांचा अर्थ समजून घेण्याचें कारण उरलें नाहीं; वेदांचें अंशतः पठन मात्र आवश्यक राहिलें; व धर्मकर्मांच्या नियमनास मूळ श्रुतींची आवश्यकता फार थोडी राहिली.

पुराणांची उत्पत्ति झाल्यावर धर्मज्ञानासंबंधानें शूद्रांस जें पारतंत्र्य होतें तें नाहींसें झालें. पुराणांचें अध्ययन किंवा श्रवण करण्याचा सर्वांस अधिकार प्राप्त झाला. श्रुतिग्रंथांचें व्यावहारिक माहात्म्य गेलें, त्यामुळें त्यांच्या अध्ययनाविषयींचा शूद्रांस जो प्रतिबंध पूर्वरूढीस अनुसरून राहिला होता त्याचें महत्त्वही कमी झालें. याप्रमाणें परमार्थसाधनासंबंधानें शूद्रांचे हक्क वाढविण्याची ब्राह्मणांनींच तजवीज केली.

११७. वैदिक काळांत परमार्थाचें फळ ह्मणजे स्वर्गवास हें होतें. स्वर्गांतील सुखें इहलोकांतील सुखासारखींच, परंतु अधिक मनोहर व अधिक पूर्णत्वानें उपभोगितां येण्याजोगीं, एवढाच भेद लोक समजत असत. ज्ञानमार्गांत प्रगति होऊन वैदिक देवतांस व यज्ञांस जसें गौणत्व आलें तसेंच तें स्वर्गांतील विषयसुखांसही आलें. परमार्थसाधनाचें हें उत्कृष्ट फळ नव्हे अशी समजूत होत चालली; व परमेश्वराच्या आराधनाचें श्रेष्ठतर फळ असावें ह्मणून कैलास, वैकुंठ, वगैरे उच्चतर लोकांच्या कल्पना निघाल्या. या अशा लोकीं गेल्यावर विषयोपभोग नाहींत, तर क्रमानें ईश्वरांशभूत जो मनुष्याचा आत्मा त्याची पूर्णावस्था होणें हें फळ सांगितलें आहे. पुराणांनीं ब्रह्मविष्णुमहेशांच्या आराधनाचा जो मार्ग सर्व वर्णांस सारखाच सांगितला, त्याचें हें फळही सर्वसाधारण ठरविलें. परलोकप्राप्तीस किंवा परलोकांत जातिभेद राहिला नाहीं; राजापासून रंकापर्यंत सर्वांसच कैलासाचीं किंवा वैकुंठाचीं द्वारें खुलीं झालीं.

११८. जातिभेदाची उत्पत्ति गुणकर्मांमुळें होते हें खरें, परंतु हीं गुणकर्में बहुतांशीं जन्मानेंच निश्चित होतात, ह्मणून जातिभेद

जन्मतः उत्पन्न होतो असें मानणें भाग झालें. तेंही ऋषींच्या सुविचारास अप्रशस्त वाटूं लागलें; परंतु तें अनिवार्य आहे असेंही त्यांस कळून आलें. ईश्वराची सर्वांवर समदृष्टि असतां सृष्टींत जातिभेद कां ठेविला ? जातिभेदानें श्रेष्ठकनिष्ठ हा भाव उत्पन्न झालाच पाहिजे. त्यामुळें सदाचार सर्वांस सारखा सुलभ होत नाहीं. परमार्थाकडे सर्वांचें सारखें लक्ष लागत नाहीं. या अशा अनेक शंका ऋषींच्या चित्तांत असमाधान उत्पन्न करूं लागल्या. इकडे त्यांचीं अंतःकरणें इतक्या उदात्तावस्थेस चढलीं कीं 'आत्मवत् सर्वभूतानि' हें तत्त्व त्यांच्या आचरणांत रूढ झालें. एकाचा जन्म उच्च जातींत, दुसऱ्याचा नीच जातींत—एकाचा उत्कृष्ट भूमींत, दुसऱ्याचा निकृष्ट भूमींत—एकाचा राजवंशांत, दुसऱ्याचा चंडालकुलांत—एकास नैसर्गिक बुद्धिमत्ता, दुसऱ्यास स्वाभाविक पशुतुल्यता—कांहींस मनुष्यता, कांहींस पशुता, कांहींस क्रमिकीटकावस्था—इत्यादि अनंत प्रकार जे सृष्टींत स्थूलदृष्टीनें पाहणाऱ्यास अन्यायाचे दिसतात व ज्यांमुळें प्राणिमात्रांतील समानता नाहींशी झाली आहे, त्यांचें कांहीं गूढ कारण असलें पाहिजे व तें शोधिलें पाहिजे असें पुरातन ऋषींस वाटूं लागलें. या विचारास ते लागले तेव्हां वेदकाळीं जें एक तत्त्व रूढ नव्हतें त्याचा शोध लागून तें सर्वत्र मान्य होत चाललें. हें तत्त्व **कर्मविपाकाचें** होय.

या जन्मांत केलेल्या हरतऱ्हेच्या दुर्वर्तनांस याच जन्मीं योग्य शिक्षा होत नाहीं; ती शिक्षा देणें राजांस किंवा धर्माधिकाऱ्यांस शक्य नाहीं; ही गोष्ट सर्वांस मान्य आहेच. ही शिक्षा पुढें नरकवासांत होते अशी जी कल्पना होती ती पुष्कळांस समाधानकारक वाटेना. या अडचणी कर्मविपाकाच्या तत्त्वानें दूर झाल्या. त्यावरून असें सिद्ध झालें कीं पूर्वकर्मानुसारानें या कर्मभूमींत जन्मप्राप्ति होते. स्वर्ग आणि नरक इहलोकींच अनुभवावे अशी योजना आहे. 'पुनरपि जननं पुनरपि मरणं' हा परिणाम प्राक्तन कर्माचा होय. पूर्वसंचित पुण्यांशानें चांगल्या कुळांत जन्म होतो; पूर्वसंचित पापानें निकृष्ट कुळांत किंवा जातींत जन्म होतो. पाप समूळ नाहींसें होऊन पुण्य जेव्हां फार प्रबळ होतें व जेव्हां ऐहिक विषयसुखांची योग्यता

कमी जाणून मनुष्य ईश्वरपरायण होतो, तेव्हां तो जन्ममरणाच्या बंधनांतून सुटून मुक्त होतो.

परमार्थबुद्धि जागृत करण्यास व सद्वर्तनाचें महत्त्व वाढविण्यास या तत्त्वासारखें उत्कृष्ट तत्त्व नाहीं. तें शास्त्रास मान्य व तसेंच बुद्धीस ग्राह्य आहे. आपण अमुक जातींत किंवा कुळांत जन्मलों याचें कारण प्राक्तन कर्म होय, त्याविषयीं दुसऱ्यांस दोष देण्याचें कारण नाहीं, व देऊन फायदा नाहीं, ही गोष्ट हळू हळू सर्व जातींस समजून आली व त्यांचें असमाधान नाहींसें झालें.

पुराणाध्ययनानें ज्ञान, सद्वर्तनानें लोकश्रेष्ठता आणि ईश्वरपरायणतेनें मुक्ति, हीं सर्व स्वतंत्रपणें प्रत्येक जातीस साध्य होण्यास आतां कोणतीच हरकत उरली नाहीं. ब्राह्मणांनीं 'आत्मवत् सर्व भूतानि' हें जें तत्त्व अंगीकारलें त्याचा बहुजनसमाजांत जो एक परिणाम झाला तो हा कीं सर्व जातींस **पारमार्थिक स्वातंत्र्य** आणि **समता** प्राप्त झाली. जन्मांतराच्या सुसंभाव्य भीतीनें पुण्यकर्मांकडे सर्वांची प्रवृत्ति वाढली.

११९. पुराणांत ईश्वराराधनेचा जो सर्वांस सुलभ असा मार्ग सांगितला आहे तो भक्तिमार्ग होय. भक्तिमार्गानें जाणारास जातिकुलमूलक स्वकर्माचा त्याग करण्याचें किंवा धर्मांतर करण्याचें कारणच राहिलें नाहीं. जें कांहीं करायाचें तें ईश्वराप्रीत्यर्थ करायाचें; आपल्या सर्व कर्मांच्या द्वारें आपला आत्माच ईश्वरास समर्पण करायाचा व इहलोकीं पूर्णपणें ईश्वराधीन व्हावयाचें—याप्रमाणें हा भक्तिमार्ग आहे. परधर्मीयांस हिंदुत्व प्राप्त करून देण्याचा आणि पतितांस उद्धरून वर आणण्याचा भक्तिमार्गानें रस्ता करून दिला आहे.*भक्तिमार्गानें जी प्राप्ति चिंतायाची ती ईश्वराचें नित्यसांनि-

---

* पवित्र तें कुळ पावन तो देश । जेथें हरिचे दास जन्म घेती ॥ १ ॥
वर्णअभिमानें कोण झाले पावन । ऐसें द्या सांगून मजप्रती ॥ २ ॥
अंत्यजादि योनि तरले हरिभजनीं । तयांची पुराणीं भाट झाली ॥ ३ ॥
वेशा तुळाधार, गोरा तो कुंभार । धागा तो चांभार रोहिदास ॥ ४ ॥
कबीर मोमीन, लतिबा मुसलमान । सेना न्हावी जाण विष्णुभक्त ॥ ५ ॥
चोखामेळा वंका जातीचे महार । त्यांसीं सर्वेश्वर ऐक्य करी ॥ ८ ॥

ध्य किंवा त्याहून जी श्रेष्ठतरावस्था मनास कल्पितां येईल ती होय.

याप्रमाणें हा भक्तिमार्ग आहे. यापासून पुढें हजारों पंथ निघाले. ज्ञान व रुचि यांच्या वैचित्र्यामुळें भिन्न पंथीयांनीं भक्तिमार्गास निरनिराळें वळण दिलें आहे; फलप्राप्तिही भिन्न योजिली आहे. तथापि पुनः मनुष्यजन्म यावा व ईश्वरप्राप्तीचा संभव सर्वकाळ कायम रहावा इतकें सुकृत इहलोकीं निदान जोडलें पाहिजे, ही सदाचारबुद्धि सर्व हिंदुसमाजांत, सर्व पंथांत, सर्व साधुसंतांच्या उपदेशांत व सर्व व्यक्तींत भक्तिमार्गाच्या प्रसारानें पेरली गेली आहे.

भक्तिमार्गाचा पाया पुराणग्रंथकारांनीं प्रथम घालून दिला; परंतु त्या पायावर ब्राह्मणांनींच नव्हे तर, इतर सर्व जातींच्या साधुसंतांनीं कमी अधिक भव्य इमारती उभारल्या आहेत; आपआपल्या प्रकारें आपलें हृद्गत ईश्वरास कळविलें आहे, व या लोकीं धर्मप्रवर्तकाची श्रेष्ठता व परलोकीं ईश्वरसान्निध्य संपादिलें आहे. याप्रमाणें जातिभेदाचे परमार्थदृष्ट्या जेवढे दोष होते तेवढे नाहींसे झाले.

१२०. या सर्व गोष्टींचा परिणाम व्यवहारांतही झाला. शूद्रांस जी परमार्थदृष्ट्या श्रेष्ठता आली तीमुळें क्षत्रिय आणि वैश्य यांमध्यें व शूद्रांमध्यें फारसें अंतर उरलें नाहीं. क्षत्रिय, वैश्य व शूद्र यांचा एकाच शूद्रवर्गांत समावेश होऊं लागला. कांहीं शूद्रांनीं क्षत्रियांचें गुणकर्म अंगीकारलें, कांहीं वाण्याचा धंदा करूं लागले, शेती व गोरक्ष्य हें त्यांकडे होतेंच. सारांश पूर्वींच्या वर्णांपैकीं ब्राह्मणवर्ण मात्र शुद्ध राहिला, वैश्यवर्ण क्वचित् अल्पांशानें राहिला; बाकी एकच शूद्रवर्ण होऊन गेला. धंद्यांच्या मानानें सर्व जाति कायम राहिल्या, त्यांच्या रूढीही फारशा बदलल्या नाहींत; परंतु क्षत्रिय आणि वैश्य यांचे द्रव्यार्जनाचे मार्ग शूद्र जातींनीं स्वीकारल्यामुळें शूद्रांमध्यें संपत्तिमान् लोक पूर्वींपेक्षां अधिक होत चालले. संपत्तीच्या मानानें सेव्यसेवकभावांत अंतर पडत चाललें. आपणांस जीं कर्में उचित तीं करण्यास वेतनार्थी ब्राह्मण शूद्रांचे सेवक बनले. ब्राह्मणांस वारंवार

---

नामयाची जनी कोण तिचा भाव। जेवी पंढरीराव तिजसवें ॥ ९ ॥
यातायाती धर्म नाहीं विष्णुदासां। निर्णय तो ऐसा वेदशास्त्रीं ॥ ११ ॥
तुका ह्मणे पहा विचारूनि ग्रंथ। तारिले पतित नेणों किती ॥ १२ ॥

आपद्धर्मामुळें क्षत्रिय, वैश्य व शूद्र यांच्या ज्या विशिष्ट वृत्ति त्याही अंगीकाराव्या लागल्या. तात्पर्य हें कीं पूर्वीचें चातुर्वर्ण्य समूळ नाहींसें झालें. जातिभेद राहिला खरा, परंतु व्यवहाररीत्या फायदेशीर अशीं कोणतींच कृत्यें करण्यास कोणत्याही ब्राह्मणेतर जातीस प्रतिबंध ह्मणून उरला नाहीं. ब्राह्मण जातींत जे थोडे प्रतिबंध उरले आहेत ते त्यांच्या कुलपरंपरागत पूर्व संस्कारांमुळें व जातिकुलाभिमानामुळें उरले आहेत. जर पूर्वीपासून ब्राह्मणजात केवळ संपत्तीनें व बाहुपराक्रमानें श्रेष्ठता पावली असती, तर ती क्षत्रियवैश्यांप्रमाणें आतांपर्यंत लुप्त झाली असती, किंवा नांवाचीच शिल्लक राहिली असती; तिचें महत्त्व इतर जातींपेक्षां अधिक नसतें. परंतु ब्राह्मणांनीं होतां होईल तों ज्ञानमार्ग आणि परमार्थदृष्टि सोडली नाहीं, ह्मणूनच त्यांचें अस्तित्व सांप्रतकाळीं समाजांत जाणवतें.

१२१. फार प्राचीन काळापासून ब्राह्मणांच्या विचारांत उत्तरोत्तर जी उन्नति होत गेली तीमुळें क्रमानें वैदिक धर्माचें रूपांतर होत गेलें, असें येथवर दाखविलें. हें रूपांतर करण्यास ब्राह्मणच कारण झाले व ब्राह्मणच विरोधक होते. ज्ञानमार्गांत जे पुढें त्यांनीं या रूपांतरास साहाय्य करावें व जे मागें त्या सांसारिक ब्राह्मणांनीं विरोध करावा. अखेरीस व्यवहारांत जुन्या व नव्या धर्मांशांचें मिश्रण होऊन जावें. अशा प्रकारें जुन्या व नव्या धर्मांची कडीस कडी गुंतून राहिली, परंतु नवीन धर्मांशांच्या प्रेरणा अधिकाधिक बलवत्तर होत गेल्या. या रूपांतरानें ब्राह्मणेतर जातींस नवे नवे धार्मिक हक्क मिळत गेले व त्यांची उन्नति होत चालली, परंतु या कामीं त्यांनीं स्वतः प्रयत्न केल्याचें दृष्टीस पडत नाहीं. ह्मणूनच ब्राह्मणांचे त्यांवर परमार्थरीत्या निरपेक्ष उपकार झाले आहेत असें ह्मणावें लागतें. हल्लीं ब्राह्मणांचें कुलव्रत ह्मणजे ज्ञानमार्गाचें अनुसरण तें जेथें कायम राहिलें आहे तेथेंच कायती ब्राह्मणांची श्रेष्ठता राहिली आहे. जेथें ब्राह्मण आपल्या पूर्वजांची योग्यता जाणतात व ती पितृभक्तीनें कायम ठेवण्याचा प्रयत्न करितात तेथेंच त्यांचें महत्त्व उरलें आहे. ब्राह्मणांनीं ' आह्मी श्रेष्ठ, आह्मी श्रेष्ठ, ' असें ह्मणत राहिल्यामुळें त्यांस समाजांत श्रेष्ठता आलेली नाहीं. जे संस्कृत ग्रंथ

ब्राह्मणेतर जातींस समजतच नाहींत त्यांत ब्राह्मणांची श्रेष्ठता अनंत प्रकारें वर्णिली आहे, ह्मणून ब्राह्मणांस महत्त्व आलेलें नाहीं. ब्राह्मणांविषयीं इतर जतींत जो बहुमान आहे तो सर्व जातींचें त्यांनीं आजपर्यंत जें हित केलें व धर्माचें ज्ञान त्यांस दिलें, त्याचा कुलपरंपरागत परिणाम आहे. जर इतर जाति पूर्वपरंपरा विसरल्या तर हा बहुमानही राहणार नाहीं. परंतु ब्राह्मणास त्याची फिकीर नाहीं. ब्राह्मण कनिष्ठ वर्गांची सेवा करून पोट भरीत असतां, वारंवार त्यांकडून अपमान सोशीत असतां, व सर्व प्रकारें हाल काढीत असतां, त्याच्या अंतर्यामांत स्वजातीविषयीं एक प्रकारची श्रेष्ठता वाटते. हा परिणाम या जन्मींच्या व पूर्वजन्मींच्या संस्कारांचा, सद्वासनांचा व कदाचित् स्मृत्यवभासांचा होय. ब्राह्मणांची निकृष्टावस्था प्रत्यक्ष पाहत असतां या त्यांच्या अंतःस्थ श्रेष्ठंमन्यतेचा इतर जातींस राग येतो व मत्सर वाटतो. परंतु इतर जातींस स्वतःबद्दल अशीच श्रेष्ठता वाटत नाहीं हा ब्राह्मणांचा अपराध नव्हे. त्यांनींही पाहिजे तेवढी ऐहिक व पारमार्थिक श्रेष्ठता संपादन करावी, त्यांच्या आड ब्राह्मण येत नाहींत. ब्राह्मणांविषयीं जो मत्सर दृष्टीस पडतो तो परधर्मीयांच्या अनिष्ट व अज्ञानमूलक प्रेरणांचा दुष्परिणाम होय. जर कनिष्ठ जाति स्वधर्माच्या रूपांतराचा शुद्ध मनानें विचार करितील, तर त्यांस स्पष्ट दिसून येईल कीं ब्राह्मणांचें सर्व ज्ञान व त्यांचे सर्व धर्माधिकार इतरांच्या उन्नतीस कारण झाले; ब्राह्मणांस त्यांमुळें हजारों वर्षें दारिद्र्य सोसावें लागलें; व त्यांच्या द्रव्यार्जनाच्या पूर्व वृत्ति जेव्हां बुडत चालल्या तेव्हां कनिष्ठ जातींचें त्यांस सेवक बनावें लागलें. ब्राह्मणांचा इतिहास स्वार्थपरायणतेचा नाहीं, स्वार्थत्यागाचा आहे; व याबद्दल त्यांस थोडें गौरव वाटत असल्यास त्याचा मत्सर करणें योग्य नाहीं. धर्माच्या रूपांतराच्या कामीं ज्ञानमार्गी आणि सांसारिक ब्राह्मणांमध्यें विरोध उत्पन्न होऊं लागला. तेव्हां तो दूर करण्याकरितां सांत्वनाच्या व सामोपचाराच्या हेतूंनीं ब्राह्मणांचें पुराणग्रंथांत गौरव केलेलें आहे—त्यांचें माहात्म्य व तपोबळ वर्णन केलेलें आहे—व एकंदरीनें त्यांस संतुष्ट ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. त्या पौराणिक आधारांवरून कोणीही अर्वाचीन ब्राह्मण श्रेष्ठ होत

नाहीं व ह्मणून इतर जातींनीं त्यांविषयीं मत्सरयुक्त होऊं नये. नवीन मताच्या स्थापनेच्या वेळीं हा तडजोडीचा मार्ग आवश्यक होता, व त्यानेंच जुनें व नवें यांचा सांधा जुळवितां येतो. जीं नवीन मतें ब्राह्मणांनीं समाजांत क्रमानें रूढ केलीं त्यांचा जो प्रत्यक्ष परिणाम व्यवहारांत व्हावयाचा आणि झाला, तो आपण पाहिला पाहिजे. शूद्रांस ज्ञान सुलभ करून दिलें असतांही त्यांपैकीं फार थोड्यांनीं त्याची इच्छा केली, हा त्यांचा दोष होय; परंतु ज्या थोड्यांनीं ती इच्छा धरली त्यांस तें प्राप्त झालें व त्यांस श्रेष्ठता आली, हा ब्राह्मणांच्या निरपेक्ष उपकारित्वाचा परिणाम गणिला पाहिजे.

---

# भाग २३ वा.

## भक्तिमार्गांत सात्विक वृत्ति श्रेष्ठतम होय.

१२२. " ईश्वरप्राप्तीचा सर्वसाधारण सुलभ मार्ग ह्मटला ह्मणजे भक्तिमार्ग होय असें जेव्हां ठरलें व धर्माचें हें मुख्य तत्त्व झालें, तेव्हां परमार्थसाधनाकरितां इहलोकीं कांहीं विशिष्ट श्रेष्ठाचरण करण्याची जरूरी राहिली नाहीं. ज्ञानी आणि मूर्ख यांमध्यें, शुचिर्भूत आणि अमंगळ यांमध्यें, किंवा उदार आणि कृपण यांमध्यें परमार्थदृष्टीनें आवश्यक असा भेद उरला नाहीं; कारण भक्तिभावामध्यें या सर्वांची बरोबरी असण्याची शक्यता उत्पन्न झाली. ही स्थिति व्यवहारदृष्ट्या चांगली नाहीं; मानसिक उत्कर्षास व श्रेष्ठतर आचरणाची क्रमानें गोडी लागण्यास ती अनुकूल नाहीं; व समाजाच्या ऐहिक सुस्थितीस ती बाधक व्हावयाची; असे विचार मनांत येऊन पुनः ही स्थिति सुधारण्याचा ऋपिवर्य यत्न करूं लागले. त्यांस असें दिसून आलें कीं, व्यक्तिमात्रांत ज्या मनोवृत्ति स्वभावतः उत्पन्न होतात, त्यांचीं तीन रूपें असतात. सत्व, रज आणि तम हीं तीं रूपें होत, त्यांस गुण ही संज्ञा दिलेली आहे. मनोवृत्तींच्या गुणाप्रमाणें सर्व आचरणांत फरक पडतो व म्हणून सात्विक, राजस आणि तामस असे आचरणाचे

तीन प्रकार होतात. ईश्वराज्ञा म्हणून, कर्तव्य म्हणून, उत्तम ज्ञानपूर्वक, फलाकांक्षाविरहित जें आचरण तें **सात्विक** आचरण होय; तेंच आचरण विषयाभिलाषानें, स्वार्थबुद्धीनें किंवा पूर्ण ज्ञानावांचून केलें असतां त्याची योग्यता कमी होते व तें **राजस** होतें. इंद्रियें व मनोवृत्ति तीव्र आणि अनिवार होऊं देऊन कर्तव्याच्या अज्ञानामुळें किंवा शुद्ध प्रमादामुळें जें आचरण आपण करितों तें **तामस** होय. परमार्थानें जी मुक्ति साधायाची तीस राजस व तामस वृत्ति प्रतिकूळ आहेत. भक्तीच्या प्राबल्यानें जरी मुक्ति मिळाली तथापि ती कमी योग्यतेची होय. परम श्रेष्ठ मुक्ति प्राप्त होण्यास ऐहिक आचरण होईल तितक्या प्रकारें सात्विक असावें, राजस त्याहून कमी योग्यतेचें व तामस आचरण विघ्नकारक व त्याज्य होय, असा महर्षींनीं सिद्धांत ठरविला. हिंदुधर्माच्या रूपांतरांतील हा सिद्धांत अखेरचा आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. कर्तव्यबुद्धीस या सिद्धांतानें श्रेष्ठतमावस्था येऊन पोहोंचली; व कर्तव्यें ठरविण्याचा हा उत्कृष्ट मार्ग सांपडला.

१२३. कारण, ऐहिक सर्व कृत्यांच्या द्वारें ईश्वरास आपला आत्माच अर्पण करणें ही भक्तीची परम स्थिति होय. सर्व कृत्यें ईश्वरास ग्राह्य होतील व तीं त्याच्या प्रीतीस पात्र होतील, अशीं असल्याखेरीज तीं त्यास समर्पणीय होणार नाहींत. दिवसांतून घटकाभर, वर्षांतून महिनाभर, ईश्वरप्रीत्यर्थ काय करायाचें एवढाच प्रश्न नाहीं. आयुष्याच्या सर्व काळांत जेवढीं सर्व कृत्यें करायाचीं तीं सर्व ईश्वरप्रीतीस पात्र व्हावीं हा हेतु आहे. या हेतूनें सर्व अध्यात्मिक व व्यावहारिक कर्तव्यांचा विचार करूं लागलें असतां, जे गुण ईश्वराच्या अंगीं आपण श्रेष्ठतम समजतों व ज्यांमुळें ईश्वर आपणांस आराधनीय होतो, त्याच गुणांचें यथाशक्त्या आपण अवलंबन करावें व ते गुण आपल्या सर्व वर्तनांत प्रकट करूं लागावें, हा भक्तिसंमत उत्कृष्ट कर्तव्यमार्ग ठरतो. या दृष्टीनें पहातां, ईश्वरप्रीत्यर्थ जें सर्वकाळ सात्विक आचरण करायाचें त्यासच सदाचार ह्मणावें असा सिद्धांत निघतो.

१२४. या सिद्धान्ताअन्वयें ब्राह्मणांनीं स्वतः वर्तन करण्याचें

प्रथम आरंभिलें; व सर्वांस अनुकरणीय उदाहरण घालून दिलें. ब्राह्मणांनीं पिढ्यानुपिढ्या सात्त्विक वृत्तीनें आयुष्य घालविलें असल्यामुळें, रूढींनीं, आख्यायिकांनीं व कुलपरंपरेनें जे त्यांवर सुसंस्कार घडतात त्यांचें फळ त्यांस अंतर्यामीं जी श्रेष्ठता वाटते ती होय. त्याच संस्कारांमुळें ब्राह्मण कांहीं कर्मांपासून साहजिकपणें निवृत्त होतात व कांहींस हौसेनें प्रवृत्त होतात. हे सर्व सुसंस्कार नाहींसे झाले तर ब्राह्मणांची श्रेष्ठता स्वतःचे मनांतून जाईल इतकेंच नव्हे, तर त्यांचें ब्राह्मण्यही नष्ट होईल.

१२५. ब्राह्मणांच्या सात्त्विक वृत्तींचें उदाहरणांनीं स्पष्टीकरण केल्यावांचून वरील गोष्टी स्पष्ट होणार नाहींत. ह्मणून एक दोन उदाहरणें घेऊं. भगवद्गीतेंत ह्मटलें आहे.

**शमो दमस्तपः शौचं क्षांतिरार्जवमेव च।**
**ज्ञानं विज्ञानमास्तिक्यं ब्रह्मकर्म स्वभावजम् ॥**

शम, दम, तप, इत्यादि, हे सर्व सात्विक गुण आहेत; व ते ब्राह्मणांमध्यें स्वभावतः जेव्हां उत्पन्न होतात तेव्हां त्यांचें तें ब्राह्मण्य खरें. ब्राह्मण आयुष्यांत जें जें करील त्या त्या सर्व कृत्यांत हे सात्विक गुण जेव्हां दृष्टीस पडतील तेव्हां त्याचें आचरण पूर्णपणें ब्राह्मणास योग्य होतें. याप्रमाणें ब्राह्मणाच्या कर्तव्याची श्रेष्ठतमावस्था ठरवून दिली आहे व ही अवस्था डोळ्यांपुढें सतत ठेवून ब्राह्मणानें ती जितक्या अंशानें साध्य होईल तितकी करून घेतली पाहिजे; त्यामध्यें खऱ्या ब्राह्मण्याचा तितक्याच अंशानें अवतार झाला असें समजायाचें, बाकीचें ब्राह्मण्य केवळ जन्ममूलक राहिलें.

या प्रकारच्या कर्तव्याच्या श्रेष्ठतमावस्थेस आपलें वर्तन नेऊन पोंचविण्याचा ब्राह्मणांनीं जेव्हां यत्न आरंभिला तेव्हां त्यांच्या मनांत किती विचार आले ते शुचित्व हा एक गुण घेतल्यास स्पष्ट होतील. शुचित्व ह्मणजे शुद्धता, स्वच्छता, पवित्रता होय. शरीराचे सर्व व्यापार निर्दोष राखून शरीरांत शुद्धता ठेविली पाहिजे. स्नानानुलेपनांनीं शरीर बाह्यतः स्वच्छ केलें पाहिजे. वस्त्रें स्वच्छ धुतलेलीं असावीं, भांडीं स्वच्छ घासलेलीं असावीं, घर स्वच्छ झाडलें सारवलेलें असावें, पाणी निर्मळ असेल तेंच प्यावें, अन्न निर्दोष

असेल तेंच खावें. एवढेंच नव्हे तर खाणेंपिणें सात्विक असें असलें पाहिजे.

**आयुःसत्वबलारोग्यसुखप्रीतिविवर्धनाः ।**
**रस्याः स्निग्धाः स्थिरा हृद्या आहाराः सात्विकप्रियाः ॥** भ० गी०.

ज्या अन्नांत हे वरील गुण नाहींत, जें फार तिखट किंवा फार आंबट किंवा फार गोड तें खाणें सात्विक नव्हे. तसेंच ज्या पदार्थास दुर्गंध येत आहे ते पदार्थ ( कांदा लसूण, वगैरे ), ज्यांपासून उन्माद येतो ते पदार्थ ( अफू, गांज्या, दारू, वगैरे ), जे शिळे, उच्छिष्ट किंवा अस्थानीं ठेविलेले आहेत ते पदार्थ—हे सर्व त्याज्य होत. अहिंसा धर्माअन्वयें मांसादि हत्याजन्य पदार्थांचें सेवन अनुचित होय इतकेंच नव्हे, तर ज्या पदार्थांच्या रूपगंधस्पर्शानें मनांत मांसाची किंवा इतर अमंगळ पदार्थांची कल्पना येईल तेही वर्ज्य होत. ( कलिंगडें, वांगीं, वगैरे, हीं सर्व या कारणानें सोडून दिलीं पाहिजेत. ) याप्रमाणें अन्नपानाची व शरीराची स्वच्छता राखिल्यावर मनाची व इंद्रियव्यापारांची पवित्रता राखायाची. याकरितां जें बीभत्स, अमंगळ, दुर्विकार उत्पन्न करणारें तें डोळ्यांनीं पाहूं नये, कानांनीं ऐकूं नये, त्वचेनें स्पर्शूं नये, मनानें चिंतूं नये व सर्वथा त्यापासून अलिप्त रहावें. मन हें अत्यंत चंचल, तें अव्यापृत असेल तेव्हां अपवित्र विचारांनीं दूषित होऊं नये म्हणून ईश्वरचिंतनाचा किंवा ईश्वरनामोच्चाराचा परिपाठ असावा. जो उद्योग करायाचा किंवा जी वृत्ति स्वीकारायाची तीही शुद्ध व पवित्र असावी, व जें ज्ञान संपादायाचें तेंही याच गुणाचें असावें. शरीरसंबंध पवित्र कुळाशीं करावा; स्नेहसंबंध शुद्धाचरण करणाराशीं असावा; कीर्ति जोडायाची ती निष्कलंक असावी; संतति पत्नीपासून शुद्ध सात्विक प्रेमानें व्हावी. सारांश कोणत्याही कृत्यांत किंवा अवस्थेंत अस्वच्छता किंवा अपवित्रता प्रत्यक्ष किंवा परोक्षपणें राहूं देऊं नये, ही शुचित्वाची धर्मविहित श्रेष्ठतमावस्था होय, व ती साधायाचा ब्राह्मणाचा प्रयत्न असला पाहिजे.

१२६. ब्राह्मणस्त्रियांसही हें शुचित्व पाळलें पाहिजे. कामक्रोधलोभमोहमदमत्सर हे षड्रिपु स्त्रियांच्या कोमल अंतःकरणावर घाव घालून त्यांवर लवकर आपला अंमल बसवूं शकतात, याकरितां या शा-

त्रूंपासून स्त्रीहृदयाचें संरक्षण करणें फार अवश्य आहे. पातिव्रत्य या एका शब्दांत स्त्रियांच्या अनेक सद्गुणांचा समावेश केलेला आहे. जेवढें पुरुषाचें सात्विक आचरण तेवढें तरी स्त्रीचें असलें ह्मणजे पातिव्रत्य सिद्धीस जातें. मग स्त्री सहधर्मचारिणी होते व कुटुंबांत शाश्वत सुखसमाधानास आरंभ होतो. कामवासनेच्या प्राबल्यानें अपवित्र व्यभिचाराकडे प्रवृत्ति होते, तीपासून स्त्री व पुरुष या उभयतांनींही काया-वाचा-मनेंकरून अलिप्त राहिलें पाहिजे. क्रोध, क्रौर्य व विषयलंपटता यांपासून सात्विकपणें निवृत्त होण्याकरितां ब्राह्मणांनीं क्षात्रधर्म सोडला व नृपत्व सोडून विद्वत्त्व अंगीकारलें; त्याची महती स्त्रियांस कळली पाहिजे. लोभ व असत्य भाषण यांचा संसर्ग नसावा ह्मणून वैश्यवृत्ति सोडिली, तेव्हां ब्राह्मणकुटुंबानें हे दोष त्याज्य मानिले पाहिजेत. मोहमदमत्सर यांचा नाश ज्ञान आणि विवेक यांनीं केला पाहिजे, व आस्तिक्यानें आणि ईश्वरभक्तीनें उदात्त मनेंकरून ऐहिक आणि पारमार्थिक कर्तव्यें श्रेष्ठतमावस्थेस नेऊन पोहोंचविलीं पाहिजेत. सात्विक सुख आरंभीं जरी विषासारखें असलें तथापि परिणामीं अमृतासारखें असतें; विज्ञान ह्मणजे शास्त्रीय आणि व्यावहारिक ज्ञान, हें सावित्कगुणी कर्तव्याच्या निश्चयाकरितांच अवश्य गणिलें आहे.

१२७. ब्राह्मणाचें आयुष्य नित्य सात्विक तप आचरणांत गेलें पाहिजे. हें तप करण्यास शरीरक्लेश भोगण्याची आवश्यकता नाहीं. त्या तपापासून ऐहिक लाभ होईल ही मनीषा असतां कामां नये. ईश्वर, गुरु, ज्ञाते, मातापिता आणि साधुसंत यांपुढें आपणांस नम्र करून घेणें, ब्रह्मचर्य पाळणें, ज्ञानार्जनार्थ परिश्रम करणें, सत्य आणि पथ्य असें भाषण करणें, मन प्रसन्न ठेवणें, सर्व भूतांचे ठायीं दया बाळगणें व परोपकारास विमुख न होणें, इत्यादि गोष्टींसच तप ही संज्ञा दिलेली आहे.

१२८. ज्ञान आणि विज्ञान यांनीं ब्राह्मणामध्यें सदसद्विवेकशक्ति आणि सदभिरुचि उत्पन्न झाली पाहिजे. चांगलें व वाईट यांचा त्वरित निर्णय करण्यास ज्ञान, अनुभव व दूरदृष्टि अंगीं आली पाहिजे. सदभिरुचि उत्पन्न होण्यास सात्विक स्वभाव, सुसंगति

आणि मर्मज्ञान अवश्य आहे. केवळ अभिरुचि पाहूनही मनुष्याची परीक्षा होते. कोणी भुकेला भोजनास बसतांच मोठमोठाले घास अधाशीपणानें तोंडांत टाकून ते गटागटां गिळून तेव्हांच पोट भरून टाकितो. हें असें भोजन सात्विक नव्हे, कारण मोठा आ-करून घास घेणें, गाल फुगेपर्यंत तोंड भरणें, कडाकडा चावणें—हे प्रकार सदभिरुचीचे नाहींत, क्षुधेची तामसी तीव्रता त्यांयोगें स्पष्ट होते; परंतु, जिव्हेची रसज्ञता व तज्जन्य सात्विक प्रीति दृष्टीस पडत नाहीं. भिन्नभिन्न रसांची रुचि जाणणें, त्यांचें अनुक्रमानें सेवन करणें, प्रत्येक घास तोंड वेडेंवांकडें होऊं न देतां हळू हळू चावून गिळणें, एकाच रसाचा वीट येईपर्यंत तो न खाणें, अन्नानें उन्माद, आलस्य, जाड्य वगैरे दोष उत्पन्न न होतील अशा बेतानें आहार करणें—हें सर्व सदभिरुचीचें फळ होय. सुवासिक पदार्थांचे भिन्नभिन्न सुगंध ओळखण्याची, व त्यांपैकीं जे अतिसूक्ष्म परंतु अधिक मनोहर असतात त्यांचाही उपभोग घेण्याची अंगीं योग्यता आली पाहिजे. याप्रमाणेंच सौंदर्य, गायनवादन, कवित्व वगैरे सर्व गोष्टींमध्यें मार्मिकपणा प्रकट करणें व गुणदोषविवेकानें त्यांचें सेवन करून आनंद पावणें हें सात्त्विक सदभिरुचीचें दर्शक होय. ही सदभिरुचि ब्राह्मणानें प्राप्त करून घेतली पाहिजे.

१२९. याप्रमाणें कांहीं थोड्या उदाहरणांनीं सात्त्विक वृत्तीपासून जीं ऐहिक व पारमार्थिक कर्तव्यें उत्पन्न होतात त्यांची श्रेष्ठतमावस्था दाखविली. या अवस्थेस जाऊन पोंचणें कठीण आहे, तथापि ती साध्य करून घेण्याच्या दिशेस ब्राह्मणांस पूर्वजांनीं लावून दिलें आहे. त्यांनीं या दिशेंत जे प्रयत्न केले, त्यांपासून ब्राह्मणांच्या आचारविचारांत दिसणाऱ्या सर्व रूढि उत्पन्न झाल्या आहेत. ब्राह्मणांच्या आचारशास्त्रास फार दिवस चालन मिळालें नाहीं ही गोष्ट खरी, परंतु हा स्वराज्यनाशाचा परिणाम होय. तथापि धर्मतत्त्वें अद्यापि सजीव आहेत, व पूर्व संस्कार आमच्या मनांवर आपली क्रिया करीत आहेत. त्यामुळें ऋषिवर्यांनीं पूर्णावस्थेस आणिलेला हा धर्म शुद्ध बलात्कारावांचून किंवा पूर्ण अज्ञानावांचून नष्ट होणार नाहीं असें आह्मांस वाटतें. सात्विक वृत्तीच्या

पालनावर ब्राह्मणांचें श्रेष्ठत्व अवलंबून आहे. इतर सर्व जातींनीं हें श्रेष्ठत्व अंगीं आणण्याचा प्रयत्न केल्यास आर्यधर्मास बळकटी येईल. तामसी वृत्तीपासून सात्त्विकवृत्तीकडे जितकी ज्याची ओढ, तितकें त्यास स्वत:च्याच अंतर्यामीं श्रेष्ठत्व व समाधान वाटेल; व त्याची ब्राह्मणांशीं बरोबरी होईल. उलट सात्त्विक वृत्तीपासून ज्या प्रमाणानें ब्राह्मण ढळतील त्या प्रमाणानें त्यांचें श्रेष्ठत्व व ब्राह्मण्य हीं बरोबरच विलयास जातील. हल्लींचें ब्राह्मणांचें श्रेष्ठत्व त्यांच्या पूर्वजांकडून त्यांस आलेलें आहे; तें राखणें त्यांचें काम आहे; व सात्त्विक वृत्तीनें तें राहील तरच उपयोगाचें, नाहींतर पूर्वजांस कलंक लावून ब्राह्मणांनीं तें श्रेष्ठत्व कायम राखिलें तर तें व्यर्थ होय; त्यापेक्षां ब्राह्मणवर्ग मुळींच लुप्त झालेला बरा, असें विचाराअंतीं दिसून येईल.

१३०. इतर जातींत हल्लीं उच्चनीचपणा सात्त्विक स्थितीच्या प्रमाणानें ठरला जात आहे. सोनार, तांबट आणि लोहार हे धंदे शुचित्वाच्या प्रमाणानें एकाहून एक कनिष्ठ ठरले आहेत. शिंपी, सुतार, गवंडी व कुंभार यांमध्यें असाच अनुक्रम आहे. ज्या धंद्यांत ज्ञान व सदभिरुचि लागते त्यांचाही (चितारी, माळी, वगैरे जातींचा) अशाच प्रकारें उच्चनीच भाव ठरतो. स्त्रियांच्या शुद्धाचरणावर ज्या मानानें भिन्न जातींचा विशेष कटाक्ष, त्या मानानेंही त्या श्रेष्ठ कनिष्ठ ठरतात. सारांश, ब्राह्मणांचें जें अनुकरण कोणत्याही जातीस श्रेष्ठतेस आणितें तें त्यांच्या सात्त्विक वृत्तीचें होय. इतर जातींनीं हें श्रेष्ठत्व संपादीत असतां मत्सरबुद्धि प्रकट केल्यास तें त्यांस साध्य होणार नाहीं. तसेंच एकाच पुरुषानें ज्ञानार्जनानें श्रेष्ठता मिळविली, परंतु स्वकीय कुटुंबांत तामसी वृत्ति राहू दिली तर त्याच्या श्रेष्ठतेस बाध येईल. जेव्हां श्रेष्ठ पुरुषांची पिढीमागें पिढी लागेल, रूढींनीं व पूर्वसंस्कारांनीं कुलाचारांत सात्त्विक वृत्ति प्रकट होईल, तेव्हां इतर जातींसही ब्राह्मणांसारखीच श्रेष्ठता येईल. ह्मणून इकडे त्यांनीं लक्ष पुरवावें.

१३१. तात्पर्य हें कीं जोंवर सर्व समाज सारखा गुणवान् व बुद्धिमान् झाला नाहीं, जोंवर कोणी सात्त्विक वृत्तीस, कोणी राजस वृत्तीस व कोणी तामस वृत्तीस अनुसरून तींतच आनंद व कृत्यकृ-

त्यता मानतो, तोंवर जातिभेद राहणार; तोंवर एका जातीस दुसऱ्या कित्येक जातींहून आपण श्रेष्ठ असें वाटणार, व त्यांपासून ती अलग राहणार. पतिवृत्तीस अनुसरून स्त्रीवृत्ति असण्याचा ह्मणजे पातिव्रत्याचा संभव सजातीयांत अधिक असल्या कारणानें भिन्न जातीयांमध्यें विवाह होणें कठीण आहे; व यांतच जातिभेदाचें मूळ व बळ आहे. आतां आपद्धर्म हा सर्वांस आपली श्रेष्ठता सोडायास लावितो. आपद्धर्मानें जे अकार्यास प्रवृत्त होतील त्यांमध्यें पूर्वसंस्कारांची स्थितिस्थापकता कायम राहिली असल्यास ते किंवा त्यांची संतति पुनः पूर्व स्थितीस येण्याचा संभव आहे. ह्मणून ऐहिक विपत्तीमुळें, आकस्मिक संकटांमुळें, अज्ञान, प्रमाद अथवा मोह यांमुळें, किंवा अशाच अन्य कारणांमुळें, धर्मत्यागाप्रमाणें दिसणारा आपद्धर्म ब्राह्मणादि वरिष्ठ जातींनीं जरी कदाचित् स्वीकारिला, तथापि त्यांनीं आपल्या सात्त्विक मनोवृत्ति नष्ट होऊं देऊं नयेत, पूर्वसंस्कारांस विसरूं नये; विपत्तीचा किंवा मोहाचा जोर कमी होतांच स्थितिस्थापकतेनें पूर्व वृत्तीस येऊन पुनः श्रेष्ठता संपादावी. जन्मतःच ब्राह्मणास श्रेष्ठता येते असें जें मानिलें आहे, त्यांतील गूढ अर्थ असा कीं पूर्व सुकृतानें, पूर्वसंस्कारांनीं, धर्मबोधानें व कुलाचार पाळल्यानें ब्राह्मणास श्रेष्ठता संपादणें सुलभ आहे; व पतित होण्याच्या भयानें तरी त्यानें सन्मार्गास लागलें पाहिजे. "

---

## भाग २४ वा.

### सद्धर्म, धर्म आणि आपद्धर्म.

१३२. दिगंबरमहाराजांनीं जातिभेदासंबंधानें जें प्रतिपादन केलें त्याचा मागें सारांश दिला. त्यांनीं आपलें मत स्थापित करण्याकरितां पुष्कळ आधार दिले, परंतु ते माझे ध्यानांत राहिले नाहींत. त्यांचें तें प्रतिपादन ऐकून मला आश्चर्य वाटलें. जातिभेद हा हल्लीं केवळ सात्त्विक वर्तनाच्या प्रमाणावर स्थापित झालेला आहे असें

त्यांनीं दाखविलें. एका जातीस दुसरीहून आपण श्रेष्ठ असें जें वाटतें त्याचें कारण सात्विक आचरणाचें अधिक प्रमाण हें होय. जातिभेदाचा व सेव्यसेवकभावाचा कांहीं संबंध नाहीं. धंद्याचे संबंधानेंही जातिभेदानें विघ्न ठेविलें नाहीं. कोणींही धनधान्य सांठवून व्यापार, ह्मणजे वैश्यवृत्ति आरंभावी, किंवा धैर्यशौर्य प्रकट करून क्षात्रवृत्ति चालवावी व राज्यपदही मिळवावें. ब्राह्मणांसही सत्त्वशील राहून जेवढे धंदे, जेवढें ज्ञान व जेवढे सेवाप्रकार अंगीकारितां येतील तेवढे करण्यास हरकत नाहीं. शिवाय, आपद्धर्म ह्मणून, सत्त्वानुरूप नसतील असेही धंदे पत्करण्यास त्यांस परवानगी आहे; इतकेंच कीं, त्यांनीं आपल्या कुटुंबांतून व संततींतून पूर्वींचे सात्त्विक संस्कार लुप्त होऊं देऊं नयेत; आपल्या स्वभावाची व कर्तव्यांची श्रेष्ठतमावस्था नित्य डोळ्यांपुढें ठेवावी. याप्रमाणें हें जातिभेदाचें रूपांतर हल्लीं इंग्रजी राज्यांतच झालें आहे असें नाहीं, तर फार प्राचीनकाळींच तें झालें असें त्यांनीं सिद्ध करून दाखविलें.

१३३. परंतु मला जो अत्यंत चमत्कार वाटला तो त्यांनीं सांगितलेल्या धर्माच्या रूपांतराचा होय. पुरातन कालचे आर्यलोक यज्ञयाग करून, पशुहत्या करून, यथेष्ट सोम पिऊन, इंद्रादि देवतांस संतुष्ट करून, त्यांसमवेत वैदिक मंत्र गात गात व ओम्‌ओम् असा जयघोष करीत दस्युवधार्थ कशा स्वाऱ्या करीत होते त्याचें चित्र महाराजांनीं माझे मनावर चांगलें बिंबवून दिलें. इकडे वयोवृद्ध ब्राह्मण सर्वसंगपरित्याग करून, परमात्मचिंतनाच्या व्यासंगास लागून अरण्यांत पर्णकुटिकांचे आश्रम बांधून रहात; कंदमूलें, फलें व पशुश्रमावांचून उत्पन्न झालेलें धान्य गोळा करून आपली उपजीविका चालवीत; व अध्यात्मविचाराच्या मार्गें लागून धर्मकर्माच्या संबंधानें एकाहून एक श्रेष्ठ तत्त्वांचा विनिश्चय करीत. अध्ययनाकरितां त्यांकडे येणारे ब्राह्मणबटु ब्रह्मचर्याच्या समाप्तीपर्यंत त्यांपासून ज्ञानप्राप्ति व तत्त्वावबोध करून घेऊन, शरीरानें, तेजानें, बळानें, बुद्धीनें व आत्म्यानें मोठे होऊन, जेव्हां आर्यसमाजांत परत येत, तेव्हां त्यांनीं ऋषिप्रणीत नवीन तत्त्वांच्या प्रसारास आरंभ करावा, जुन्या पंथाच्या सांसारिक ब्राह्मणांशीं वाद करावा, त्यांच्या याज्ञिक कर्मांची

गौणता दाखवावी व धर्माच्या रूपांतराचें बीज पेरून द्यावें. ह्या अशा ब्रह्मचारी मंडळींच्या क्रमानें वर्षानुवर्ष ज्या टोळ्या येत चालल्या, त्यांनीं जुन्या ब्राह्मणांस मागें टाकलें, क्षत्रियांवर अंमल चालविला, वैश्यशूद्रांस अध्यात्मविद्येचा उपदेश केला, इतकेंच नव्हे, तर इंद्रादि देवांचें प्राबल्य कमी केलें, यज्ञयाग अगदीं गौण ठरविले, वेद व वैदिक कर्मकांड मागें पाडलें व ईश्वरासंबंधीं नवीन उत्कृष्ट कल्पनांची सर्वत्र प्रेरणा केली. या प्रकारें हळू हळू धर्माचें रूपांतर करीत जाऊन अखेरीस त्यांनीं सर्व जगांत सदाचारप्रवर्तकांनीं अतिश्रेष्ठ समजलेली अशी ऐहिक कर्तव्यतेची जी कल्पना ती रूढ करून दिली व सात्त्विक वृत्तीचें महत्त्व स्थापित केलें. भक्तिमार्गाचे जे दोन दोष—ह्मणजे, केवळ ईश्वरी चिन्हांसच, ह्मणजे मूर्तींसच, अज्ञानामुळें व्यासक्त होऊन परमेश्वराविषयींच्या कल्पना संकुचित होणें, व केवळ भक्ति प्रज्वलित करून ऐहिक श्रेष्ठ कर्तव्यांस पराङ्मुख होणें—ते दोषही त्यांनीं सत्त्वशीलतेचें महत्त्व वाढवून दूर केले. आह्मां हल्लींच्या लोकांस जें करायाचें ठेविलें तें एवढेंच कीं सर्व जातींमध्यें सात्त्विक वृत्तीचा उत्कर्ष करावा व त्या द्वारें हा आर्यसमाज उत्कर्षास आणावा.

१३४. या प्रकारचा हा धर्मक्रांतीचा इतिहास पाहिला ह्मणजे क्रमानें धर्मांत उत्क्रांति होत गेली आहे असें दिसतें. केवळ धर्मतत्त्वें पाहिलीं तर ही उत्क्रांति फार श्रेष्ठ दशेस येऊन पोहोंचली आहे असें लक्षांत येतें; परंतु व्यवहारांत तीमुळें जें उत्कृष्ट सामाजिक स्वरूप दिसावें तें दिसत नाहीं, हें पाहून चित्तास खेद होतो. याचें कारण हेंच दिसतें कीं हिंदुधर्मप्रवर्तकांस फार वर्षें राजाश्रय नाहीं. मुसलमान व ख्रिस्ती राज्यकर्त्यांकडून तो मिळण्याचा संभव नव्हता व नाहीं. देशी राजांस धर्माचीं तत्त्वें समजून घेण्याची इच्छा नाहीं; ते अश्रद्ध झाले आहेत किंवा मूर्ख आहे. आंग्लविद्येनें अनेकविध फायदे झाले असले तथापि ती एकच एक शिकल्यापासून एक तोटा झाला आहे, असें आतां मलाही वाटूं लागलें. तो तोटा हा कीं परधर्मीयांचे लेख वाचून वाचन अप्रबुद्धवयीं मनावर स्वधर्माबद्दल आधींच अनिष्ट संस्कार होत जातात व प्रबुद्धवयीं त्यांतून मुक्त होणें

अशक्य होतें. पूर्वीं ज्या मार्गानें धर्माची उत्क्रांति होत आली, तो मार्ग सुधारक लोक सोडून देतात. हिंदुधर्म ह्मणजे एक फाटकी गोधडी समजून तीस येथें एक ठिगळ लाव, तेथें एक ठिगळ लाव, असें करून तीस ऊत्र आणण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. हिंदूंच्या मनाची आह्मांस ओळख नाहीं हेंच खरें; त्या मनावर पूर्वीं उत्क्रांतिद्वारें कांहीं संस्कार झाले आहेत हें कोणास माहीतच नाहीं. ते बरे, वाईट कसे आहेत हें पाहिल्यावांचूनच जो तो नवीन सुधारणेच्या कल्पना काढतो. त्या आह्मांस आमच्याच कुटुंबांत चालू करितां येत नाहींत, मग दुसऱ्यांस कोठून ग्राह्य होणार ?

१३५. आह्मांस आपली परिस्थिति दिसत नाहीं. या देशाचे रहिवासी असून शुद्ध आंग्लविद्याभ्यासंगानें आह्मी परदेशीय झालों आहों असें आतां मला वाटूं लागलें. कां आह्मी स्वदेशास, स्वधर्मास, स्वकीयांस मुकावें ? कोणत्या पूर्व कर्माचें हें अनिष्ट फळ आहे ? मला पुनः कोणत्या द्वारें स्वधर्माचा सात्त्विकमार्ग सांपडेल ? कोण मला ज्ञानविज्ञान व आस्तिक्य देईल ? याप्रमाणें माझ्या मनांत चिंता येऊं लागल्या व मी अंतर्यामीं अगदीं व्याकुळ होऊन गेलों. ईश्वर, धर्म, कर्म, कर्तव्य, यांविषयीं उत्तम श्रद्धा पाहिजे, तरच मनुष्य खरा सुखी होईल, नाहींतर होणार नाहीं. समाजांतील एक उद्योगी किंवा संपत्तिमान् पशु होण्यांत सुख असेल, परंतु तें पशुतुल्य तामसी सुख होय—माझ्या पूर्वसंस्कारांमुळें त्यापासून मी परावृत्त होत आहें, यांत संशय नाहीं. याप्रमाणें एकीकडे विषादमूलक विचार मनांत येत, दुसरीकडे दिगंबरमहाराजांचे शब्द आठवून हर्ष व आश्चर्य वाटे. अशा स्थितींत माझे कांहीं दिवस गेले.

१३६. एके दिवशीं महाराजांच्या बोलण्यांत **आपद्धर्म** हा शब्द फार वेळां येऊं लागला; त्यामुळें या आपद्धर्माची चांगली परिस्फुटता करावी असें मीं त्यांस ह्मटलें. त्यावरून त्यांनीं जें विवेचन केलें तें येणेंप्रमाणें. "सर्वांनीं अतिश्रेष्ठ सात्त्विक वृत्ति अंगीकारावी ही कर्तव्याची परमावधि होय. परंतु ती अंगीकारणें सर्वांस शक्य नाहीं. सात्त्विक वृत्तीची परिपूर्णता होण्यास ज्ञानविज्ञान पाहिजे. हें ज्ञानविज्ञान सर्वांस पूर्णपणें तर नव्हेच, परंतु अंशतः देखील मिळण्याचा संभव

कमी. जर ज्ञानविज्ञान नाहीं तर सात्त्विक कोणतें, राजस कोणतें व तामस कोणतें, किंवा उचित कोणतें व अनुचित कोणतें, हें मातापितागुरु यांकडून किंवा लोकरूढीवरून समजून घेतलें पाहिजे. परंतु हल्लींसारख्या आपत्कालांत हेंही चांगलें साधण्याचा मार्ग नाहीं. मातापितरांकडून व लोकरूढीवरून जें थोडें धर्मज्ञान होईल तेवढेंच मिळण्याचें शक्य आहे असें समजूं.

यानंतर बुद्धीचा विचार करायाचा ती मूळचीच तीव्र असल्यास तिचा पुढें उत्कर्ष होण्याचा संभव आहे, परंतु जर ती मंद असेल तर तोही संभव नाहीं.

पुढें मनोवृत्ति पहायाच्या; त्यांस चांगलें वळण लावून सत्त्वशील करण्याचा मातापितागुरु वगैरेंचा प्रयत्न पाहिजे, तो त्यांनीं योग्यकाळीं न केल्यास, मन राजसी किंवा तामसी स्थितींत राहणार.

पुढें पुरुषार्थास लागणारें धन पाहिजे, उद्योगधंदा पाहिजे. त्याकरितां, किंवा निदान आपलें व कुटुंबाचें पालनपोषण करण्याकरितां, कांहीं वृत्ति स्वीकारिली पाहिजे.

याशिवाय आकस्मिक संकटें, दुःखें व पारतंत्र्य येतें, त्यांतून स्वतःचा किंवा बंधुवर्गाचा बचाव केला पाहिजे.

याप्रमाणें ऐहिक स्थिति आपत्तिमय आहे. या स्थितीमुळें नित्य किंवा प्रसंगविशेषीं जें आपणांस अंतर्यामीं श्रेष्ठ आचरण वाटतें तें अशक्य होतें; किंवा तें एक शक्य असलें तरी त्याच्या अवलंबनानें अनेक अनिष्ट परिणाम होण्याचा संभव असतो. अशा प्रसंगीं जें कनिष्ठांत वरिष्ठ आचरण आपणांस शक्य असतें व जें धर्मानेंही इष्ट गणिलें आहे, तें आपद्धर्माचें होय.

१३७. जोंवर समाजांत कर्तव्याची श्रेष्ठतमावस्था दाखविणारे सत्पुरुष आहेत, जोंवर कुटुंबांत श्रेष्ठ व उचित काय याचा कोणी बोध करणारा आहे, जोंवर शिक्षणानें अमुक दिशेनें जाणें चांगलें इतका तरी संस्कार मनावर होत आहे—तोंपर्यंत आपद्धर्म पाळला तरी सद्धर्माचा नाश होत नाहीं. जसजशी सुज्ञता अंगीं येते, तसतशी सद्धर्माकडे प्रवृत्ति होत जाते. आपद्धर्मांत सांपडल्यामुळें अ-

नेक गुणांची प्राप्ति आपणांस होईना, तर एकच गुण संपादावा. समाजांत मोठ्या थोरवीस येण्याचें आपणांस शक्य नसेल तर कुटुंबांत तरी 'हा धार्मिक आहे' असें ह्मणवून घ्यावें. सर्वप्रकारें शुद्धाचरण ठेवणें साधेना, तर प्रसंगीं काया मळीण ठेवावी, वाचेनें अप्रशस्त बोलावें, परंतु मनानें तरी सत्य व पवित्र रहावें. जर परोपकार करण्यास संपत्ति नसेल, उपदेश करण्यास ज्ञान नसेल, साहाय्य करण्यास बळ नसेल, तर इतरांस दुःख होईल असें तरी कोणतेंही कर्म कायावाचामनानें करूं नये, मनांत मत्सर बाळगूं नये, व दुसऱ्यांचें अभीष्ट चिंतावें. जर अज्ञानामुळें किंवा आपत्तीमुळें दुःसंगति लागून दुर्व्यसनें अंगीं जडलीं व तीं अनिवार्य झालीं, तर त्यांचा संसर्ग इतरांस न होईल अशाविषयीं जपावें, तीं याकरितां गुप्त ठेवावीं, व त्यांपासून जी मनाची हानि झाली ती भरून काढण्याकरितां एकादा उत्कृष्ट गुण अंगीं आणण्याचा, व स्वभावांतील जे निवारणीय दोष असतील ते दूर करण्याचा प्रयत्न करावा. खाणें पिणें, विषयवासना, कुटुंबपालन, व सर्व प्रकारची ऐहिक नीति यांस हा आपद्धर्म लागतो; त्याचा सभ्यपणें जेवढा विचार करितां आला तेवढा येथवर केला, परंतु त्याची व्याप्ति पाहणें प्रत्येकाचें काम आहे.

आपद्धर्म परमार्थास मात्र लागू नाहीं, कारण ईश्वराकडे भक्तिभावानें चित्त लावण्यास, त्याचे गुण व आज्ञा यांचा विचार करण्यास, किंवा आपले अपराध कबूल करून त्यांची क्षमा मागण्यास कोणतीही आपत्ति आड येत नाहीं. उलट, आपत्काळीं आपलीं गाऱ्हाणीं ऐकणारा एक परमेश्वर आहे, दीनांचा दयाळू, शरणागतांचा कनवाळू तोच एक आहे, तो आपलें तारण करील, तो आपद्धर्मांतून आपणांस काढून सद्धर्मास लावील, ही आशा आपत्काळींच प्रबळ होते, व तीमुळें चित्तास धैर्य व स्वास्थ्य येतें. सारांश हा कीं आपत्काळीं आलेली दुर्निवार्य नीच स्थिति दुःखदायक होय, श्रेष्ठ सात्त्विक स्थिति दुर्लभ परंतु सुखदायक होय--हें जाणत असतां जें दुःखांत सुख मानणें व उत्कृष्ट आशेनें मनाचें सांत्वन करणें, त्यास **आपद्धर्म** ही संज्ञा दिलेली आहे.

१३८. प्रत्येक सुज्ञ मनुष्य आपलें आचरण श्रेष्ठतर व्हावें ह्मणून प्रयत्न करीत असतां कर्तव्याची जी श्रेष्ठतमावस्था डोळ्यांपुढें ठेवितो तीस ' सद्धर्म ' ( ह्मणजे सात्विक धर्म ) अशी संज्ञा देतां येईल. तसेंच जाति, कुल, संपत्ति, स्वभाव आणि धंदा या सर्वांचे पूर्वापार संस्कार होऊन, सद्धर्माचा जो अंश कोणत्याही जातींत व्यवहाररीत्या सुसाध्य ठरून रूढ होतो त्यास त्या जातीचा व्यावहारिक किंवा रूढ धर्म अथवा नुसता ' धर्म ' असें ह्मणतां येईल. सद्धर्माच्या मार्गांत असतां कोणत्याही जातीनें किंवा व्यक्तीनें ज्या सीमेपर्यंत अवश्य जाऊन पोहोंचलें पाहिजे ती सीमा ' धर्म ' या शब्दानें अथवा संस्थेनें दाखविली जाते. ऐहिक कर्तव्यांचें कमींत कमी प्रमाण व परमार्थदृष्ट्या साधायाचें निदानचें फळ, हीं धर्मांत सांगितलेलीं असतात. धर्मावर पूर्वापार चालत आलेल्या रूढींचें कवच असतें व त्यामुळें त्यास बळकटी येते. सर्व धार्मिक पुरुषांची गति धर्माकडून सद्धर्माकडे असते. कोणी आपद्धर्मांत सांपडल्यास त्यास निदान धर्मास तरी येऊन पोहोंचावें अशी उत्कंठा असते.

**आपद्धर्म, धर्म** आणि **सद्धर्म** हे पारमार्थिक कर्तव्यतेचे तीन टप्पे होत. त्यांच्या दरम्यान अनेक चढत्या पायऱ्या आहेत. जातिजातींत व व्यक्तिव्यक्तींत जें आचरणाचें वैचित्र्य दिसतें, त्यावरून त्यांमध्यें धर्मकल्पना कोणत्या पायरीस येऊन पोहोंचल्या आहेत याचा अंदाज करितां येतो; व धर्मदृष्ट्या जातींची व व्यक्तींची योग्यता ठरवितां येते. या योग्यतेनुरूप जातींचा उच्चनीच क्रम लागतो.

१३९. पूर्ण सात्त्विक वृत्तीची अपरिमेय श्रेष्ठता अंतर्यामांत मात्र अनुभवितां येते. ती नुसती अनुभविण्याचेंही पुष्कळांस शक्य नसतें. अनेक **राजस वृत्ति** स्वभावतःच मनुष्यामध्यें बलिष्ठ असतात. त्यांपैकीं कांहीं ऐहिक सुखास कारण होतात, कांहींमध्यें आयुष्यांतील कर्तृत्व वाढविण्याचा गुण असतो, व त्यांचा उत्कर्ष सर्व समाजाच्या सुखास व हितास कारण होतो. आतां ऐहिक सुख व हित यांसंबंधानें समाजाची चांगली स्थिति असल्यास, ती स्थिति लोकांची प्रवृत्ति सद्धर्माकडे करून देण्यास कारण होते. यावरून असें दिसून येतें कीं कर्तृत्ववर्धक राजस वृत्तींपासून कोणा व्यक्तिमात्र पुरुषास जरी उत्कृष्ट

पारमार्थिक स्थिति आली नाहीं, तथापि समाजाची सरासरीची जी धार्मिक वृत्ति तिच्या उन्नतीस तो पुरुष कारण होतो; अनेकांस आपद्धर्मांतून सोडवून धर्मास किंवा सद्धर्मास लावण्याच्या कामीं त्याचे गुण व कर्तृत्व हीं उपयोगीं पडतात. याकरितां या आपत्तिमय संसारांत कर्तृत्ववर्धक राजस वृत्ति, ज्यांमुळें समाजाचें हित व सुख वाढतें, त्या फार महत्वाच्या आणि आवश्यक गणिल्या आहेत. त्यांवांचून हें जग चालायाचेंच नाहीं, असा पूर्व ऋषींनीं सिद्धांत केला आहे. व ज्यांचा स्वभाव सात्त्विक वृत्तीस योग्य नाहीं, त्यांनीं कर्तृत्वशील राजस वृत्ति अंगीकारून जगाचें उपकारक व्हावें, ह्मणजे प्रवृत्तिमार्ग स्वीकारावा, त्यांतच अत्यंत श्रेष्ठत्व मिळवावें, असा ऋषींचा उपदेश आहे. पारमार्थिक सिद्धीस त्यामुळें कमीपणा येणार नाहीं असेंही त्यांनीं उत्तेजनार्थ वारंवार आश्वासन दिलेलें आहे.

१४०. काम आणि अर्थ हे दोन पुरुषार्थ रूढ धर्मा अन्वयें राजस वृत्तींचें योग्य प्रकारें उत्तेजन केल्यानें प्राप्त होतात. ब्राह्मणवर्गाचें ज्ञान जेव्हां व्यवहारांत उपयोगास लागतें तेव्हां तो त्याचा राजस उपयोग होय. लोकहितार्थ तो करणें अवश्य आहे. अर्थप्राप्ति आणि ऐहिक सुख व स्वास्थ्य यांकरितां रूढ धर्मास अनुसरून पुरोहिताचें, ज्योतिष्याचें, वैद्याचें, न्यायाधीशाचें, धर्माधिकाऱ्याचें किंवा असेंच दुसरें बुद्धिव्यासंगाचें काम अंगीकारणें ब्राह्मणांस उचित आहे. असें काम न मिळेल तर आपद्धर्म ह्मणून कौशल्याचें किंवा शारीरिक श्रमाचें काम करून धर्मार्थकामप्राप्ति करून घेणें ब्राह्मणास अवश्य आहे.

ब्राह्मणवर्गाची बुद्धि ह्मणजे समाजाचे डोळे होत—

**ब्राह्मण्यनुपमा दृष्टिः क्षात्रमप्रतिमं बलम् ।**
**तौ यदा चरतः सार्धं तदा लोकः प्रसीदति ॥ भा० वन८ अ०२६**

या डोळ्यांचा उपयोग होण्यास क्षत्रियांचें बळ पाहिजे. क्षत्रियांचे जेवढे गुण आहेत तेवढे बहुतेक राजस आहेत. त्यांचा सदुपयोग होण्यास ब्रह्मणांची बुद्धि व विवेकशक्ति हीं पाहिजेत. बुद्धि व विवेक यांचें कोणाही व्यक्तींत फार प्राबल्य झाल्यास क्षात्रगुण पूर्ण श्रेष्ठतेस पोहोंचण्याचा संभव कमी असतो; ह्मणून समाजाची दृष्टि एका वर्गांत

आणि समाजाचें बळ दुसऱ्या वर्गांत रहावें, व त्यांचें योग्य साहचर्य असावें, असा सिद्धांत केलेला आहे.

शौर्यं तेजो धृतिर्दाक्ष्यं युद्धे चाप्यपलायनम्।
दानमीश्वरभावश्च क्षात्रं कर्म स्वभावजम्॥

शौर्यादि जे राजस गुण क्षत्रियांत स्वभावत: प्रकट होतात, त्यांपासून त्यांचीं कर्तव्यें उत्पन्न होतात. परचक्रापासून राज्याचें संरक्षण होण्यास, राज्यांतील तमोगुणी लोकांच्या दुष्कर्मांचें पारिपत्य करण्यास, प्रजेची सुखसंपत्ति वाढविण्यास, व धर्मांकडून सद्धर्माकडे प्रजेची प्रवृत्ति करून देण्यास, वरील सर्व गुणांचा उपयोग होतो. असा त्यांचा उपयोग झाला ह्मणजे क्षत्रियांच्या व्यावहारिक धर्माची परिपूर्णता होते; परंतु पुढें त्यांनींही कांहीं उचित गुण उत्कर्षास आणून सद्धर्माच्या मार्गास लागावें. संपूर्ण वैभव स्वाधीन असलें तथापि केवळ विषयलंपट होऊं नये, इंद्रियांचें दमन करावें. पुष्कळ शौर्य अंगीं असलें तथापि क्रोधवश होऊन स्त्री, पंगू, बालक, गुरु, शरणार्थी यांस क्रौर्यानें वागवूं नये, क्षमा अंगीं धरावी. सर्व सत्ता हातीं आली तथापि निरुपद्रवी व निरपराधी लोकांवर अधिकार चालवूं नये, जेथें विनय आणि नम्रता उचित तेथें ती दाखवावी. संपत्तीचा व्यय सुपात्रीं दान करण्यांत व प्रजेची संतुष्टता आणि श्रेष्ठता वाढविण्याकडे करावा. अखेरीस राजा, सरदार किंवा अधिकारी होण्यांत जी थोडी ईश्वरसमान श्रेष्ठता पुरुषांत येते, तिचा उपयोग ईश्वराप्रमाणें सत्य, न्याय, भूतानुकंपा, प्रजेचे ठायीं ममत्व व आपद्ग्रस्तांचें ठायीं कारुणिकत्व, हे गुण परमावधीस नेण्याकडे त्यानें करावा. क्षत्रियांस सद्धर्मास लागण्याचे हे मार्ग होत. बळ, सत्ता व शस्त्र हीं ज्यांचे स्वाधीन त्यांच्या सदाचारानें सर्व लोक सदाचारी होतात, त्यांच्या दुराचारानें अनेक लोक दुराचारी होतात; ह्मणून तीं ज्यांचे स्वाधीन त्यांवर फार मोठी जबाबदारी आहे.

१४१. सारांश हा कीं व्यक्तींस अंतर्यामीं जी स्वत:बद्दल श्रेष्ठता वाटते ती सात्त्विक आचरणाचें फळ होय. समाजांत जी व्यक्तींची किंवा जातींची योग्यता ठरते ती राजस गुणांचा जो सदुपयोग केला जातो त्याचें फळ होय. सर्व जगानें सात्त्विक वृत्तीस ला-

गावें ही धर्माची श्रेष्ठतमावस्था होय. ती अशक्य असल्यामुळें जेवढें शक्य तेवढेंच साध्य करून घेणें, हा जो व्यावहारिक धर्म, तो एका दृष्टीनें आपद्धर्मच गणिला पाहिजे. मनुष्यमात्रांच्या अनिवार्य प्रकृतिवैचित्र्याचा हा परिणाम होय."

---

## भाग २५ वा.

### या भरतभूमींत विषयोपभोगांच्या द्वारें फारशी सुखप्राप्ति होत नाहीं.

१४२. बापूसाहेबांच्या व दिगंबर महाराजांच्या सुसंगतीनें माझें हिंदुत्व परत येत आहे असें मला वाटूं लागलें. आपल्या आचरणांत त्यांचें जितकें अनुकरण करवेल, तितकें मी करूं लागलों. पूर्वींचा ज्ञानविषयक अभिमान नाहींसा झाला होताच, परंतु त्या ज्ञानाचे संस्कार दूर होईनात. सामान्यजनांचें गतानुगतिकतेचें आचरण पाहून मनांत शंका येई कीं हा आमच्या धर्माचाच परिणाम नसेलना? या लोकांस महत्त्वाकांक्षा ह्मणजे काय हें माहीत देखील नसेल, समाधान मात्र ओतप्रोत भरलेलें आहे. आपआपल्यापरी थोडेंसें परोपकारी होणें कोणाही व्यक्तीस सहज साधेल, परंतु अनेक व्यक्ति मिळून एकमतानें कोणतेंही परोपकाराचें कार्य आरंभण्याची आह्मांमध्यें कां इच्छा उत्पन्न होत नाहीं? व ती झाली तथापि कां तडीस जात नाहीं? सद्धर्माची दिशा दिसत असतां व ती सुगम असतां आह्मांत धर्मावेश कां उत्पन्न होऊं नये? बरें, स्वार्थबुद्धि देखील आह्मांत बलवत्तर नाहीं! सर्व पुरुषार्थांस आह्मी जे उदासीन आहों त्याचें कारण आमचा स्वभाव समजायाचा, किंवा धर्म समजायाचा, किंवा राजकीय स्थिति समजायाची? हिंदुस्थानच्या हवेंतच असा कांहीं गुण आहे काय कीं त्यानें येथील रहिवाशांच्या स्वभावांतील, धर्मांतील व राजकीय कर्तव्यांतील वीर्यावेश नाहींसा व्हावा? दिगंबर महाराजांसारखे सत्पुरुष जागोजाग कां दिसत नाहींत? अशा सत्पुरुषांची योग्य संख्या उत्पन्न करण्या इतकें वीर्य

समाजांत उरलें नाहीं काय? हें **धर्माचें मांद्य जाणें** यासच **सुधारणा** असें ह्मणतां येईल; व ती हिंदुसमाजांत होण्याचा संभव आहे काय? धर्मतत्त्वें सजीव आहेत; कर्तव्याची श्रेष्ठतमावस्था डोळ्यांपुढें दिसत आहे; सर्व गोष्टी खऱ्या, परंतु समाजांत जीव कोठें आहे? चळवळ ह्मणून कोठेंच नाहीं. तेव्हां हल्लींच्या निकृष्ट स्थितींतून वर डोकें कसें निघणार?

१४३. हे विचार एके दिवशीं मीं दिगंबरमहाराजांपुढें प्रकट केले. त्यावेळीं या बाबतींत आमच्या लोकांची समाधानकारक स्थिति नाहीं असें त्यांसही वाटत होतें, ही गोष्ट माझ्या लक्षांत आली. या विषयावर पूर्वीं बापूसाहेबांचें व माझें बोलणें झालें होतें, परंतु बापूसाहेबांच्या व महाराजांच्या प्रतिपादनांत मला फारच अंतर दिसून आलें. बापूसाहेबांचें म्हणणें कीं, "या देशांत राज्यक्रांत्या किंवा धर्मक्रांत्या ज्या झाल्या त्या कालपरत्वें एक एक अद्वितीय पुरुष समाजांत उत्पन्न होऊन त्याच्या प्रभावानें झाल्या. बौद्ध व जैन धर्मांचा पाडाव करून हिंदुधर्माचें पुनरुज्जीवन शंकराचार्यांनीं केलें. मुसलमानी राज्याचा मोड करण्यास शिवाजी कारण झाला. भक्तिपंथानें सामान्य लोकांस सदाचारास लावण्याचें काम तुकाराम, कबीर, नानक, वगैरे अनेक साधूंनीं केलें. आपल्या अलौकिक गुणांनीं व हृदयंगामी वक्तृत्वानें आह्मांस जागृत करणारा कोणी महापुरुष उत्पन्न झाला, ह्मणजे मग आह्मी त्याचे त्वरित अनुयात्रिक बनतों. त्याच्या आवेशाच्या धगीनें आमचें अंतःकरणही तापून जातें. मग आह्मी सुदिशेस लागतों. आह्मांस ईश्वरी तेजाचा कोणी नायक पाहिजे, सामान्य गुणांच्या माणसास आमचीं अंतःकरणें प्रज्वलित करितां येत नाहींत. जेव्हां कोणी असाधारण पुरुष आमचीं धर्मसूत्रें किंवा राज्यसूत्रें हातीं धरून आमच्या बुद्धींस व अवयवांस चलनवलन देईल तेव्हां अल्पकाळांत आह्मी अपूर्व पराक्रम करून दाखवूं. सारांश, आह्मी नायकाधीन आहों, व आमचा नायक असामान्य पुरुष पाहिजे. आमच्या दृष्टीनें तो ईश्वरी अवतारच होय; व आमची स्थिति जेव्हां दुःसह होईल तेव्हां असा अवतारी पुरुष अवश्य उत्पन्न होईल."

१४४. दिगंबरमहाराजांचें ह्मणणें याहून फार निराळें होतें. ते ह्मणाले—

" जेव्हां आपण दुसऱ्यांची स्थिति पाहून तिजविषयीं अभिप्राय देतों, तेव्हां आपला अभिप्राय खरा होण्यास दुसऱ्यांच्या हृदयांचें आपणांस उत्तम ज्ञान असावें लागतें, फार तर काय, आपणांस त्यांशीं तादात्म्य कारितां आलें पाहिजे. आपल्या मनास अमुक स्थिति सुखमय किंवा दुःखमय वाटली ह्मणून तींत खुद्द असणारास ती तशीच वाटली पाहिजे असें ह्मणणें, हा बुद्धीच्या अहंकाराचा परिणाम होय; तो बहुधा अयथार्थ ठरतो. आज तुह्मी आपल्या स्वतः-च्या बुद्धीनें कोणाकोणाची स्थिति असह्य आहे हें ठरवूं लागलां तर जगांतील निदान चतुर्थांश लोकांच्या स्थितींत सुख नाहीं, त्यांनीं कां जगावें ? त्यांस मरण आलें तर बरें ! असें तुह्मांस वाटेल. परंतु या चतुर्थांश लोकांपैकीं फारच थोड्यांचें मत तुमच्या मताशीं जुळेल. पुढें त्यांचा इतिहास तुह्मी पहात राहिलां, तर त्यांपैकीं कित्येक व्यक्ति चांगल्या उदयास आलेल्या दिसतील; या व्यक्ति सोडून देऊन बाकीच्यांच्या संततींत, एका नाहीं तर दुसऱ्या पिढींत, कित्येक पराक्रमी किंवा गुणी पुरुष उत्पत्तीस आलेले दिसतील. पुढें अनेक वर्षें गेल्यावर केवळ त्या चतुर्थांश लोकांच्या वंशजांनीं जगाचें स्वरूप कांहीं थोडें तरी बदलून टाकलेलें नजरेस येईल. या सर्व गोष्टी आकस्मिकपणें घडतात असें तुह्मी ह्मणाल. परंतु तसें मुळींच नाहीं. कार्यकारणांची परंपरा कधींही तुटत नाहीं. भावी वंशजांच्या सत्कृत्यांचीं व पराक्रमांचीं बीजें पूर्वजांकडून व मातापितरांकडून संतानद्वारा संक्रमित होत चाललीं असतात. हीं बीजें वृद्धिंगत होण्यास अनुकूळ स्थिति व काळ येतो तेव्हां तीं स्पष्ट होतात. ज्यांची दुःखस्थिति आपण असह्य कल्पिली त्यांचीं हृदयें आपणांस पारखतां आलीं नाहींत असें यावरून सिद्ध होतें. त्या हृदयांत जो धैर्याचा जोर असेल, श्रद्धेचा बळकट तंतु असेल, अविकसित बुद्धीचा ठेवा असेल व मनोवृत्तींची सत्वशीलता असेल, ती तुह्मांस दिसण्याचा संभव नव्हता-कदाचित् त्या व्यक्तींसही हे स्वतःचे गुण वदून दाखविण्याची किंवा ओळखण्याची योग्यता नसेल; परंतु त्यांचे संस्कार संततीमध्यें उत-

रत जाऊन अनुकूल कालस्थलीं ते उत्कर्ष पावतात. मग, हा काय चमत्कार, ह्मणून जग चकित होतें. सारांश, इतरांच्या सुखदु:खांचा निर्णय करणें फार कठीण आहे; व ज्या गूढ मनोवृत्तींनीं मनुष्याचें वर्तन सर्वकाळ नियमित होत असतें त्यांचें रहस्य समजणें तर त्याहून फार अवघड आहे.

१४५. बापूसाहेबांच्या येथें धर्माजी ह्मणून गडी आहे तो तुह्मीं पाहिलाच असेल. बापूसाहेबांच्या वडलांनीं त्यास लहानाचा मोठा केला, त्याचें लग्न करून दिलें, त्यास एक लहानसें घर घेऊन दिलें, व त्याचा सर्व संसार तेच चालवितात असें ह्मटलें तरी चालेल. त्याचें ज्ञान दुसऱ्या गड्यांहून अधिक नाहीं; तो कोणतेंही काम इतरांहून चांगलें करितो असें नाहीं. परंतु त्यानें बापूसाहेबांच्या वडलांची जी आतांपर्यंत सेवा केली आहे तीमुळें ते त्यास आपल्या जिवाचा नौकर समजतात. सर्व संपत्ति कोणाचे ताब्यांत देऊन दूर देशीं जाण्याचा आज त्यांस प्रसंग आल्यास, स्वत:चे मुलांवर किंवा कारकून, शास्त्री, पुराणिक वगैरे आश्रितांवर ते भरंवसा ठेवणार नाहींत, इतका धर्माजीवर ठेवितील. नौकरीमध्यें गुलामाहून गुलाम होऊन हा मनुष्य त्यांच्या हिताची रात्रंदिवस काळजी बाळगीत आहे. ही गुलामगिरी तुह्मांसारख्यानें पाहिल्यास मनुष्यस्वभावाची हानिमात्र झालेली त्यास दिसेल. परंतु तसें नाहीं.

या धर्माजीस तूं अमुक गोष्ट कां करितोस किंवा करीत नाहींस ह्मणून विचारल्यास ती बरी किंवा वाईट आहे इतकेंच तो उत्तर देईल; त्यास याहून अधिक ज्ञान नाहीं. चांगली गोष्ट केल्यानें आपणांस समाधान वाटतें, वाईट गोष्ट केल्यानें असमाधान वाटतें, हेंही त्याच्या स्वत:च्या प्रत्ययास आलेलें नसेल, असें मला वाटतें. परंतु बऱ्यावाईट कृत्यांसंबंधानें त्यास सुखदु:ख किंवा समाधानअसमाधान पराकाष्ठेचें तीव्र होतें, हें त्याच्या वर्तनावरून नि:संदेहपणें लक्षांत येतें. श्रीमंताच्या घरांत ज्याचा सर्वत्र वापर त्यास कधीं कांहीं, कधीं कांहीं, जें हातीं लागेल तें उचलून नेण्याची संधी वारंवार यावयाची; परंतु धर्माजीस सोन्याचे ढिगावर बसवून ठेविल्यास तो त्यास हात लावणार नाहीं, अशी त्याची ख्याति आहे. हा जो प्रामाणिक-

पणाचा गुण, त्यानें त्याच्या अंतःकरणांतून लोभास हद्दपार केलेलें आहे. आपल्या कुटुंवास श्रीमंती यावी हें त्याच्या ध्यानींमनींही नाहीं. आपल्या मुलावाळांस वापूसाहेवांच्या येथें पोटापुरतें मिळेलच, या समजुतीनें घरची काळजी त्यास विलकुल नाहीं. बंडाचे सालीं बापूसाहेबांचे वडलांवर एकाहून एक प्राणसंकटें येऊन गेलीं; त्यांच्या भरंवशाचा नौकर हा एक धर्माजी मात्र होता. त्यानें हत्यारबंद होऊन सर्वकाळ त्यांच्या जवळ रहावें. ते खोलींत निजले असतां त्यानें उशाशीं तरवार ठेवून बाहेर दारांत पडून रहावें. आपण जीवंत आहों तोंपर्यंत त्यांच्या केसास धक्का लागूं द्यावयाचा नाहीं ही धर्माजीची प्रतिज्ञा होती.

दुसऱ्यानें आपलें पालनपोषण केलें, तेव्हां आपला जीव तो त्याचा, त्याकरितां देह वळी देण्यास तयार होणें, ही कृतज्ञतेची परमावधि होय. सामान्य जन उदार झाले असतां आपल्या प्राप्तीचा लहान मोठा भाग दुसऱ्यास देतील. परंतु आपलें तनमनधन दुसऱ्यास देऊन आपण गरीव राहणें व दुसऱ्याचे श्रीमंतींत आनंद मानणें, आपण सेवक होणें व दुसऱ्यास आदरसत्कारांनीं सुसंतुष्ट राखणें, दुःख, कष्ट आणि चिंता यांचा वांटा आपण घेणें व सुख, शांति आणि समाधान यांचा वांटा दुसऱ्यास देणें,—या गोष्टी ज्याचे हातून नित्य नित्य घडतात त्याचें औदार्य केवढें अलौकिक होय ! त्याच्या परोपकारित्वाची सर साधुसंतांसही येणें नाहीं. अशा इमानी नौकरांच्या सेवेची किंमत त्यांच्या वेतनावरून मोजणें मूर्खपणा होय. त्यांची योग्यता त्यांच्या कपड्यालत्त्यांवरून किंवा गृहस्थितीवरून ठरविणें अज्ञतेचा प्रकार होय. त्यांस जें नित्य हलकें काम करावें लागतें त्यावरून त्यांच्या सुखदुःखाची कल्पना करणें पूर्णपणें अविचाराचें होय. गुलामगिरींत पुष्कळ प्रकार आहेत. कर्तव्यांची हीनता व अंतःकरणाची उदारता, यांचा सेवक वर्गांत अनेक वेळां विलक्षण मिलाफ झालेला आढळतो. जेथें तो होतो, तेथें इतरांनीं गुलाम समजलेल्या लोकांपासूनही पुढें स्थळ व काळ अनुकूळ होतांच पराक्रमी पुरुष निपजतात व ते देशास ऊर्जित दशेस आणण्यास कारण होतात. ह्मणून ज्यांस आपण हीन, पतित, नीच, दुःसह दुः-

खांत सांपडलेले असें समजतों, त्यांचीं अंतःकरणें तशींच निकृष्ट दशेस पोहोंचलीं आहेत काय हें पाहिल्यावांचून त्यांविषयीं आपण प्रतिकूळ अभिप्राय देतां कामां नये.

परंतु असे नौकर थोडे सांपडतील ही गोष्ट खरी. ज्यांच्या स्वभावांत मूळची सात्त्विक वृत्ति नाहीं, त्यांस प्रथम राजस गुणांच्या द्वारें उन्नतीस आणणें जरूर आहे. उद्योग व संपत्ति हीं त्यांच्या सुधारणेचीं साधनें होऊं शकतील. परंतु हीं साधनें हल्लीं किती कष्टसाध्य झालीं आहेत त्याचा विचार केला असतां मनास दुःख व ग्लानि येते. गरिबांच्या खऱ्या सुधारणेस जीं अनिवार्य विघ्नें उत्पन्न झालीं आहेत तीं पाहूनच मनुष्याचें धैर्य खचतें.

१४६. विषयसुखांपासून आर्यलोक जे त्वरित निवृत्त झाले, त्याचें कारण हा देश विषयसुखाची भूमिच नव्हे, हें होय. सर्व उपभोग जेवढे साधेसुधे व परिमित असतील तितके ते तेज, बळ, आयुष्य, आरोग्य आणि मनाची प्रसन्नता यांस कारण होतात, असा या भरतभूमीचा गुण आहे. निद्रा, आलस्य, स्थूलता, बुद्धिमांद्य व अनेकविध व्याधि, हे सुसंपन्न आणि अपरिमित उपभोगांचे दुष्परिणाम या भूमींत अवश्य घडून येतात. तेल, तूप, साखर, मसाले, वगैरे, यांचें अन्नांत जेवढें कमी प्रमाण असेल, तेवढे अन्नापासून अधिक इष्ट परिणाम होतात असें दृष्टीस पडतें. गरिबाचा सैंपाक पाहिला व त्याची शक्ति व चलाखी पाहिली ह्मणजे ही गोष्ट प्रत्ययास येईल. कपडेलत्ते फारसे लागत नाहींत, उघडें बसणें अधिक सुखकर आहे. घर लहान असलें तरी चालतें; तें केवळ मालमत्तेच्या संरक्षणासाठीं, बाकी उघड्यावर बसणें उठणें, हिंडणें फिरणें, अधिक हितावह आहे. सर्व उपभोज्य विषयांस ही गोष्ट लागू आहे. ज्यास पोटास भाजीभाकर मिळते व अंगाचें थोडें आच्छादन करितां येतें, तो मनुष्य या देशांत सुखानें सर्व जन्म काढील; बळ, आरोग्य आणि आयुष्य यांचें उत्तम प्रकारें जतन करील; व कोणत्याही शारीरिक किंवा मानसिक श्रमास अपात्र होणार नाहीं. ज्यांस अधिक अनुकूलता आहे, ते बळ, आरोग्य आणि आयुष्य यांसंबंधानें कमी योग्यतेचे असावयाचे, असें बहुधा दिसून येईल. बाल्यांत व तारुण्यांत अनेकविध

उपभोगांच्या मागें लागलेले लोक क्रमानें त्यांपासून निवृत्त होऊं पाहतात, कारण एक तर त्या उपभोगांचा वीट येतो व दुसरें ते मानवेनासे होतात. पूर्वींचे आर्य राजे पुत्रांस राज्याधिकार देऊन आपण अरण्यवास स्वीकारीत, ही गोष्ट अगदीं स्वाभाविक आहे. या देशांत अन्नवस्त्र, घरदार व चैन यांचें फारसें महत्त्व नाहीं. शहरांतील विषयोपभोगानें क्षीण किंवा व्याधिग्रस्त झालेले लोक अरण्यवासानें बहुधा पुनः चांगले सुधारतात. सारांश हा कीं जे अतिशय संपन्न, जे अतिशय बुद्धिमान् व जे दरिद्रावस्थेंत असलेले, त्या सर्वांचें खाणें पिणें, राहणें सवरणें, हीं सर्व सारखींच असलीं तर तोटा नाहींच, उलट निःसंशय फायदा आहे.

१४७. उपभोगांची सुसंपन्नता जेथें अवश्य बाधक होते व उपभोगांचा साधेपणा अवश्य हितकारक होतो, तेथें भौतिक संपत्तीचें महत्त्व अवश्य कमी होतें. 'तूं अधिक उद्योग कर व अधिक श्रीमंत हो,' हा उपदेश दरिद्याचे मनावर कसा बिंबवावा? त्यास कोणते फायदे दाखवावे? विश्रांतीच्या सुखांतून श्रमाच्या खटाटोपांत त्यास कसें ओढावें ?

**नीचपण बरवें देवा । न चले कोणाचाही हेवा ॥**
**महापुरें झाडें जाती । तेथें लव्हाळे वांचती ॥**

अशी येथें साधुवर्गांनीं लोभनिवारक पूर्व प्रेरणा करून ठेविली आहे; जेथें वरिष्ठ वर्गही

**त्रिविधं नरकस्येदं द्वारं नाशनमात्मनः ।**
**कामः क्रोधस्तथा लोभस्तस्मादेतत्त्रयं त्यजेत् ॥**

या धर्मतत्त्वाची सत्यता एका किंवा दुसऱ्या वयोवस्थेंत मान्य करितात, तेथें स्वार्थमूलक उत्कट महत्त्वाकांक्षा उत्पन्न होण्याचा संभव तरी आहे काय ? दरिद्री लोक, आहेत त्याच स्थितींत असतां, त्यांस अधिक द्रव्यप्राप्ति कांहीं आकस्मिक कारणानें होऊं लागली असें समजूं. या वाढलेल्या प्राप्तीचा बहुधा दुर्व्यसनांकडे उपयोग केला जाईल. कदाचित् कोणीं कृपणानें द्रव्य सांठविलें, तर त्याचे वंशज दुर्व्यसनी निघून एकदोन पिढ्यांत त्या द्रव्याचा फन्ना उडवून

देतील. मारवाडी व गुजराथी व्यापारी खेरीजकरून द्रव्याचा सांठा अथवा भांडवल जमविणारे लोक पाहूं गेल्यास फार थोडे मिळतील, त्यांच्या प्राप्तीचें प्रमाण काय पाहिजे तें असूं द्या.

१४८. तेव्हां अधिक श्रम करून व अधिक द्रव्य मिळवून काय करायाचें या प्रश्नाचें सयुक्तिक उत्तर दिलें पाहिजे. संपत्ति दुष्परिणामावह होणार नाहीं अशी खात्री असेल तेव्हांच या खटपटीस लागलें पाहिजे. या दृष्टीनें पाहतां एक गरीब शूद्राचें व एक गरीब ब्राह्मणाचें अशीं दोन सारखीं कुटुंबें घेतल्यास, त्यांस आपआपल्या स्थितींत राहण्यास कमीजास्ती खर्च लागतो असें दिसून येईल. जेथें शूद्राचें लंगोटी नेसून चालतें तेथें ब्राह्मणास पंचा तरी नेसावा लागतो. हेंच प्रमाण शूद्र व ब्राह्मण यांच्या कुटुंबांतील सर्व खर्चास व व्यवस्थेस लागतें. तथापि मी शूद्राहून अधिक श्रीमंत, असें ब्राह्मण समजणार नाहीं, किंवा मी ब्राह्मणाहून अधिक दरिद्री, असें शूद्र मानणार नाहीं. दोघेही आपण गरीब असेंच समजतील. परंतु ब्राह्मणाचा खर्च अधिक आहे, व तेवढी त्याची प्राप्तिहि असली पाहिजे; आणि तीकरितां त्यास श्रमही अधिक किंवा अधिकश्रेष्ठतेचे केले पाहिजेत. हा जो उभयतांमध्यें भेद उत्पन्न होतो, तो त्यांच्या सदभिरुचीचें व सभ्यतेचें प्रमाण दाखवितो. लंगोटीनें जेवढें शरीराच्छादन होणार तेवढें पुरें नाहीं, पंचानें होईल तितकें तरी निदान झालें पाहिजे, ही सभ्यतेची कल्पना ब्राह्मणाचा खर्च वाढविते. त्याहून जो अधिक प्राप्तीचा मनुष्य असेल त्यास मोठें धोतर नेसल्याखेरीज उचित सभ्यता वाटणार नाहीं. त्याहून अधिक प्राप्तीचा गृहस्थ असेल त्यास वर्तनांत केवळ सभ्यताच नव्हे तर सदभिरुचि दाखविणें इष्ट वाटेल, व तो स्त्रियांसमोर उघडें बसणें योग्य नाहीं म्हणून सोंवळा असतां शालजोडी पांघरायास घेईल. याप्रमाणें सभ्यता व सदभिरुचि यांची वृद्धि जेव्हां प्राप्तीच्या मानानें होत जाते, तेव्हां संपत्तीचा सदुपयोग होतो. मग संपत्तीचा अभिलाष व त्याकरितां विशेष श्रम करणें उचित होतें, व तो अभिलाष लोभाचे सदराखालीं येत नाहीं. 'खूप श्रम करा, खूप पैसा मिळवा आणि यथेच्छ खा, प्या आणि चैन करा' असा उपदेश करणारे पुरुष समंजस नाहींत असें माझें मत आहे; व त्यांचा उप-

देश ग्राह्य होणार नाहीं असें मला वाटतें. आळस दारिद्य, अज्ञान व गतानुगतिकता यांबद्दल गरिबांची यथेष्ट निंदा करणें, व क्रूर, लोभी, मत्सरी, मद्यपी लोक कसे संपत्तिमान् व चैनी आहेत ते पहा, ह्मणून त्यांस उत्तेजनार्थक उदाहरण दाखविणें हें सुविचाराचें कृत्य नव्हे. ही उपदेशाची तऱ्हा गरीब समाधानी हिंदु लोकांस उद्योगपंथास कदापि लावणार नाहीं. संपत्ति, सभ्यता व सदभिरुचि—ही त्रयी समप्रमाणानें वृद्धिंगत होण्यास कांहीं निराळींच साधनें योजिलीं पाहिजेत. त्यांचा आतां विचार करूं. ”

---

# भाग २६ वा.

## जुन्या चालीच्या माणसांचे अर्थशास्त्र-विषयक विचार.

१४९. “माझा असा सिद्धांत आहे कीं, संपत्ति, सभ्यता व सदभिरुचि ही त्रयी कनिष्ठ जातींकडून वरिष्ठ जातींकडे कधींच चढत जात नाहीं. ती कनिष्ठ जातींत आपोआप कधींच उत्पन्न होत नाहीं. ती वरिष्ठ जातींकडून क्रमानें कनिष्ठ जातींकड उतरत येते व ती उतरत येण्यास जातिजातींमध्यें केवळ राजकीय किंवा व्यापारी तऱ्हेचा संबंध असणें उपयोगीं पडत नाहीं, तर धर्म, प्रेम आणि उपकारबुद्धि यांच्या दृष्टीनें त्यांचा संबंध जडला पाहिजे. सभ्यता आणि सदभिरुचि हे गुण कनिष्ठ जातींत केवळ संपत्तीनें उत्पन्न होत नाहींत; परंतु उलट प्रकार दिसतो, ह्मणजे सभ्यता व सदभिरुचि यांच्या द्वारें उद्योगाचें माहात्म्य वाढतें व त्यामुळें संपत्तिही प्राप्त होते. कनिष्ठ जातींची केवळ संपत्ति वाढेल तर ती त्यांच्या हातीं राहणें कठीण, व राहिली तर दुर्व्यसनांत तिचा व्यय होण्याची सर्वदा भीति आहे. ’ या सिद्धांताअन्वयें सर्व राष्ट्रांच्या संपत्तीच्या उत्कर्षापकर्षाचें निदान करून दाखवितां येईल.

१५०. कोणत्याही राष्ट्रास सुसंपन्न होण्याचे दोन मार्ग आहेत;

एक तर बाहेरून संपत्ति आणिली पाहिजे, किंवा ती स्वतः उत्पन्न केली पाहिजे. धैर्यवीर्यपराक्रमादि क्षात्र गुणांनीं बाहेरून संपत्ति येण्याचे मार्ग या देशांत उरले नाहींत, तेव्हां त्यांचा विचार करायास नको. स्वतः संपत्ति उत्पन्न केली पाहिजे व ती स्वतःच वाढविली पाहिजे. यासंबंधानें सर्वत्र असा प्रकार दिसतो कीं जे संपत्तीचे मूळ उत्पादक त्यांच्या हातीं ती मुळींच ठरत नाहीं. त्यांस त्यांच्या श्रमाबद्दल फक्त खाण्यापिण्यापुरतें मिळाल्यास सुदैव समजायाचें. त्यांनीं उत्पन्न केलेली संपत्ति एक तर राजाकडे नाहींतर सावकार, व्यापारी वगैरेंकडे गोळा होऊन जाते. शेतकऱ्यावर राजाचा कर जबरदस्त असतो; त्यास तो देऊन जें द्रव्य शिल्लक उरतें त्यांतून सावकाराचें देणें दिलें पाहिजे; व त्यांतून जी शिल्लक उरेल तींतून लग्नेंकार्ये, चैन व दुर्व्यसनें करून शेतकरी तेव्हांच निष्किंचन होतो, एवढेंच नव्हे तर बहुधा आणखी कर्जांत बुडतो. शेतकऱ्याचें द्रव्य त्याच्या हातीं फार दिवस टिकत नाहीं; त्यामुळें प्रत्येक पिढीच्या माणसांस जमिनीवर श्रम करून, पुनः पुनः आलेल्या निकृष्ट स्थितींतून वर येण्याचे नवे नवे प्रयत्न करावे लागतात.

संपत्तीच्या मूळ उत्पादकांकडून त्यांचें धन हिरावून नेण्याचे कामीं राजा व सावकार हे नित्य अत्यंत दक्ष असतात. इंग्रजी राज्यांत व देशी संस्थानांत सर्वत्र शेतकरी प्रजा कर्जबाजारी आहे. सावकारावांचून शेतकऱ्याचें चालायाचेंच नाहीं; कारण त्यावर येणारीं संकटें आकस्मिक असतात व स्वतः त्यांचें तो निवारण करूं शकत नाहीं. सावकार हा शेतकऱ्यांचा जसा मित्र तसाच शत्रु आहे. शेतकऱ्यांस प्रसंगीं तारण करणारा तोच, व त्यांच्या संपन्न स्थितींत त्यांचें सर्व द्रव्य शोषून घेऊन त्यांस शुष्क व निःसत्त्व करणाराही तोच.

१५१. उद्योग-कला-कौशल्याच्या द्वारें जी संपत्ति उत्पन्न होते, तीसंबंधानें सावकार किंवा भांडवलवाले यांचें असेंच प्राबल्य दिसतें. कारागिरांशीं भांडवलवाल्यांचा असाच शत्रुमित्रभाव उत्पन्न होतो; मित्रही तेच व शत्रुहि तेच. त्यांच्या मदतीवांचून चालत नाहीं; परंतु कारागीर व मजूर यांच्या पोटास लागेल तेवढें ठेवून बाकी सर्व फायदा ते आपणच लुबाडून घेतात. जोंवर मनुष्य सर्वसामान्य झालेल्या

ज्ञानानें व कौशल्यानें उपजीविका मिळवीत असतो, तोंवर स्वतः पैदा केलेल्या मालाची त्यास पाहिजे ती किंमत सांगतां येत नाहीं; त्याबद्दल त्यास बहुधा कमींतकमी चरितार्थापुरती किंमत येते. ह्मणूनच त्याच्या श्रमाचा सर्व फायदा राजा किंवा सावकार, व्यापारी, अथवा भांडवलवाला यांस मिळतो. सारांश हा कीं राजाच्या बंदोबस्तामुळें ह्मणा किंवा जबरदस्तीमुळें ह्मणा, त्याकडे राष्ट्राचा पैसा गोळा होतो; तसाच तो सावकारांच्या लोभामुळें त्यांकडे गोळा होतो. मूळसंपादकांचे हातीं तो राहत नाहीं. पैशाकडे पैसा वळतो, ही जी ह्मण आहे तिचा हा असा व्यापक अर्थ आहे.

१५२. जर प्रजेच्या निरनिराळ्या वर्गांमध्यें केवळ राजकीय किंवा व्यापारी तऱ्हेचा संबंध राहील, तर सर्व वर्ग दरिद्री राहतील व द्रव्य तेवढें राजा व सावकार यांचें हातीं जाईल. प्रजेची सामान्यस्थिति सुधारण्याचा मार्गच राहणार नाहीं. आतां भिन्न वर्गांच्या चरितार्थाचा खर्च, ह्मणजे कुटुंबपोषण-शिक्षण-वृद्धि-व्यवहारांचा खर्च कमीजास्ती असतो. सभ्यता, सदभिरुचि व ज्ञान यांच्या प्रमाणानें वर्गांचा श्रेष्ठकनिष्ठभाव ठरून अनुक्रम लागतो, व त्या अनुक्रमांत ज्याची जेथें पायरी त्यामानानें त्याचा खर्च अधिक होतो. चरितार्थापुरता पैसा सर्वांस मिळविणें भाग आहे व त्याकरितां अधिक श्रम किंवा अधिक योग्यतेचे श्रम करणें जरूर होतें. याप्रमाणें चरितार्थ मोठ्या कष्टानें भागविणें ह्मणजे सुसंपन्न स्थिति नव्हे, ती दरिद्रावस्थाच होय. केवळ प्राप्ति पाहून संपन्नता किंवा दारिद्र्य ठरवितां येत नाहीं.

वर्गावर्गांमध्यें जोंवर केवळ राजकीय किंवा व्यापारी तऱ्हेचा संबंध आहे तोंवर त्यांचें दारिद्र्य दूर होत नाहीं. ज्या राष्ट्रांत अशी स्थिति असते तें अगदीं उत्तम रीतीनें चाललेलें बाहेरून दिसलें, तथापि आंतून ऱ्हास पावत असतें; ह्मणजे राज्यांतील एकएक वरिष्ठ वर्ग सभ्यता व सदभिरुचि यांच्या प्रमाणानें जी आपली मूळची श्रेष्ठता ती राखण्याचें कठीण पडत जाऊन खालीं कनिष्ठ वर्गांत घसरून येत असतो. राज्यांत कर गोळा करण्यास हरकत पडणार नाहीं; लोक निरुपायास्तव तो खुषीनें देतील. ते तंटे व मारामाऱ्या

करणार नाहींत, केल्यास निरुपाय होऊन शिक्षा भोगतील. प्रजेस अधिक द्रव्य संपादन करण्याच्या कांहीं सोई करून देण्यांत राजांस व व्यापाऱ्यांस फायदा वाटेल, व त्या करून अधिक द्रव्यापहाराची तजवीज लागत जाईल. या व अशा अनेक गोष्टी झाल्या, व असें राज्य सुयंत्र चाललेलें बाहेरून दिसलें, तथापि आंत ऱ्हासच होत आहे असें दिसेल,–कारण संपत्तीचे उत्पादक मनुष्यरूपी यंत्रेंच होऊन जातील. चरितार्थ चालवावा व तटस्थ रहावें, याशिवाय त्यांस काम उरणार नाहीं.

१५३. या अशा राज्यांत गोळा होणाऱ्या संपत्तींतून राज्याचा व व्यापाराचा खर्च जाऊन बाकी जी फाजील संपत्ति राहते तिचें काय होतें असा प्रश्न येतो. जर राजांमध्यें व सुसंपन्न लोकांमध्यें धर्म, प्रेम, परोपकारबुद्धि नसेल, जर ते अज्ञान व विषयलंपट असतील, तर ते व त्यांच्या पदरचीं माणसें आळशी बनतील, श्रम करणार नाहींत व यथेष्ट चैन करूं लागतील. श्रम करून दरिद्री रहावें हें एका प्रजाविभागाचें कर्तव्य होईल, श्रम न करितां चैन भोगावी हें दुसऱ्या प्रजाविभागाचें कर्तव्य होईल. अशा स्थितींत चैनीचे पदार्थ पुरविणारे लोक जर प्रजेपैकीं असले, तर वर गेलेली संपत्ति पुनः खालीं उतरते व ती वरिष्ठ वर्गांच्या द्वारें कनिष्ठ वर्गांपर्यंत येऊन पोहोंचण्यास मार्ग होतो. परंतु हे चैनीचे पदार्थही बाहेरून राष्ट्रांत येतात असें समजल्यास, राष्ट्राच्या संपत्तीचा ओघ बाहेर वाहूं लागतो; व जेवढी इकडे चैन वाढते, तेवढा त्या ओघास जोर येतो; त्यामुळें देशाचें दारिद्र्य वाढतच जातें.

१५४. कोणत्याही राज्यांत 'मीं कां श्रम करावे' असा जेव्हां मनुष्यास प्रश्न येतो, तेव्हां 'चरितार्थ चालविण्यासाठीं' हें त्याचें उत्तर स्पष्टच असतें. परंतु 'मीं अधिक श्रम कां करावे' असा जेव्हां तो स्वतःस प्रश्न विचारतो तेव्हां 'चैनीसाठीं' हें त्या प्रश्नाचें समाधानकारक उत्तर नाहीं. 'श्रेष्ठ होण्यासाठीं, बहुमान मिळविण्यासाठीं, विशेष गुण संपादन करण्यासाठीं, किंवा कुटुंब, ज्ञाति अथवा राष्ट्र यांवर उपकार करण्यासाठीं,' असें उत्तर दिल्यास तें समाधानकारक वाटतें. अधिक संपत्ति मिळविण्याचे हेच हेतु होत.

राजा सुज्ञ असेल तर त्यास व इतर सुसंपन्न लोकांस आपली प्राप्ति करानें किंवा श्रमानें वाढविण्याची या हेतूंनीं बुद्धि व्हावी हेंच उचित आहे. या हेतूंस जेव्हां राजापासून खालीं उतरत येणारे सर्व वरिष्ठ वर्ग मान देऊं लागतात तेव्हां त्यांची फाजील संपत्ति राष्ट्राचे हितास कारण होते. श्रेष्ठता व बहुमान हीं गुणप्रकर्षानें प्राप्त होतात; तशींच तीं धर्मप्रेमपरोपकारांच्या कृत्यांनीं प्राप्त होतात. वरिष्ठ वर्गांनीं या प्रकारें श्रेष्ठ व मान्य होण्याची आकांक्षा केली असतां कनिष्ठ वर्गांस ते तेव्हांच सन्मार्गास लावितात; व येणेंप्रमाणें प्रत्येक वर्ग दुसऱ्यांच्या उन्नतीस कारण होतो.

कारण, राजा किंवा त्याचें मंत्रिमंडळ गुणज्ञ असेल तर प्रजेंतील भिन्न व्यक्तींत कोणते गुण आहेत व कोणते अधिक गुण यावेत याचा ते विचार करितील. प्रत्येक गुणाचीं जीं श्रेष्ठ माणसें तीं राजाच्या पदरीं असावीं व त्यांस गुणप्रकर्षास योग्य असा राजाकडून आश्रय व बहुमान मिळावा हें उचित आहे. हेंच राजाकडे आलेल्या फाजील संपत्तीचें कार्य होय. ज्यांची प्रामाणिकपणाबद्दल ख्याति व ज्यांचें नीतीचें व मनुष्यस्वभावाचें ज्ञान उत्तम, अशीं माणसें शोधून काढून त्यांस न्यायाधीश करणें; उत्कृष्ट शूर व दक्ष पुरुषांस सेनापति करणें; उत्तम धार्मिक मनुष्यास धर्माधिकारी करणें; व याप्रमाणेंच राज्यास उपयोगी किंवा भूषणास्पद अशा गुणांच्या माणसांस योग्य ठिकाणीं नेमणें हें राजाचें कर्तव्य आहे. अशा माणसांस जें वेतन द्यावयाचें तें त्यांच्या केवळ श्रमांकरितांच नव्हे तर गुणबहुमानाकरितांही द्यावयाचें, असें जाणून तें मोठें असलें पाहिजे. जीं परोपकाराचीं कार्यें संपत्तीच्या अल्पांशानें होत नाहींत तीं संचित झालेल्या संपत्तीनें राजानें आरंभिलीं पाहिजेत. धर्म, प्रेम आणि परोपकार यांची महती राजानें आपल्या कृत्यांनीं प्रकट केली पाहिजे, व सर्व उपायांनीं तिची प्रेरणा सुसंपन्न वर्गांत करून दिली पाहिजे. वैद्य, कवि, ज्योतिषी, शास्त्रज्ञ, कलाभिज्ञ व शिल्पज्ञानी या सर्वांचा उत्कृष्ट संग्रह राजापाशीं असल्यास गुणोत्कर्षाचा ओघ हजारों वाटांनीं वर्गांवर्गांतून खालीं उतरत जातो; सर्व कनिष्ठ वर्ग चढत्या मार्गास लागतात.

१५१. आपण आपल्या पुत्रपौत्रांस विद्येची व गुणांची प्राप्ति करून देतों व श्रेष्ठ नीति शिकवितों हें प्रमाचें व कुलधर्माचें कार्य होय. आपली ज्ञाति वरिष्ठ स्थितीस यावी याकरितां जे प्रयत्न ते प्रेमाचे व ज्ञातिधर्माचे परिणाम होत. याहून पलीकडे जाऊन रमणीय स्थानें, देवालयें, बगीचे, घाट, वगैरे बांधणें, हें लोकप्रीति व परोपकाराचें कार्य होय. याप्रमाणें निव्वळ राजकीय व व्यापारी संबंध विसरून जाऊन, जेव्हां धर्म-प्रेम-परोपकारांस वरिष्ठ जाति प्रवृत्त होतात, तेव्हां लक्ष्मीचा संचार सर्व वर्गांत होतो. मनुष्यमात्रांत स्वभावतः भिन्न गुणांचें कमीजास्त प्रमाण उत्पन्न होत असतें; गुणांचे ज्ञाते व उत्तेजक ज्या देशांत आहेत त्याच देशांत **शाश्वत संपत्ति** उत्पन्न होते व तीकारितां पाहिजे तेवढे श्रम करण्यास गुणी पुरुष तयार होतो. अशाश्वत संपत्ति व्यापाराचे कामाची; शाश्वत संपत्ति त्या कामाची नाहीं, तिची किंमत गुणी पुरुष मागेल ती किंवा गुणज्ञ पुरुषास देतां येईल ती होय. ही शाश्वत संपत्ति जेवढी असेल तेवढें राष्ट्राचें वरिष्ठत्व सिद्ध होतें.

गुणांच्या आविष्करणार्थ जे बुद्धीचे परिश्रम त्यांनीं शाश्वत संपत्ति उत्पन्न होते. शिल्पकामांत ज्या अनेकविध यंत्ररचनेच्या कल्पना निघाल्या आहेत त्या शाश्वत संपत्तिरूप होत. जे शास्त्रीय शोध मोठ्या परिश्रमानें व विचारानें लागले आहेत तेही तसेच होत. उदात्त बुद्धीच्या पुरुषांनीं घालून दिलेलीं धर्मतत्त्वें; उदात्त कल्पनेच्या कवींनीं रचिलेलीं काव्यें; चतुर कारागिरांनीं केलेलीं, इमारती, देवालयें, वगैरे कामें; हीं सर्व शाश्वत संपत्तिरूप होत. ज्यांच्या पूर्वजांनीं या प्रकारची शाश्वत संपत्ति उत्पन्न करून आपला वर्ग किंवा देश ऊर्जित दशेस आणिला, त्यांनीं ती ऊर्जितावस्था, हा शाश्वत संपत्तीचाच आणखी एक प्रकार आपल्या वंशजांच्या स्वाधीन केला असें ह्मटलें पाहिजे. तसेंच, पूर्वजांकडून आलेले उत्कृष्ट पूर्व संस्कार त्या त्या वर्गास किंवा राष्ट्रास शाश्वत संपत्तिरूप होत. याप्रमाणें हे शाश्वत संपत्तीचे अनेक प्रकार आहेत.

कोणत्याही वर्गास ' अधिक श्रम करा ' म्हणून उपदेश करीत असतां श्रेष्ठता व बहुमान मिळण्याचा संभव दिसला कीं तो उपदेश

तेव्हांच ग्राह्य होतो. याचें अंतःस्थ कारण पाहूं जातां तें असें दिसतें कीं, शाश्वत संपत्ति उत्पन्न करण्याकडे गुण व बुद्धि यांचा उपयोग व्हावा ही साहजिक मनीषा सर्व अंतःकरणांत नांदत असते. तिचा विकास होण्यास बाहेरून उत्तेजन लागतें. तें मिळतांच कोणतेही श्रम जड वाटत नाहींत. भौतिक संपत्ति चरितार्थाकरितां पाहिजे व ती सर्व नश्वर आहे. शाश्वत संपत्ति श्रेष्ठता आणि बहुमान मिळविण्याचे कामीं येऊन शिवाय भौतिक संपत्ति मिळविण्यास साहाय्य करिते; तेव्हां ती सर्वांस कां स्पृहणीय वाटणार नाहीं ? शाश्वत-संपत्ति उत्पन्न करण्याकडे कोणाचा किती यत्न आहे हें पाहूनही समाजांतील वर्गांचा उच्चनीच भाव ठरवितां येईल; व तो सात्त्विक वृत्तीच्या दृष्टीनें केलेल्या जातींच्या श्रेष्ठकनिष्ठ भावांशीं जुळतो असें दाखवितां येईल. शाश्वत संपत्तीची प्राप्ति एकएका व्यक्तीचे हातून बहुधा फारच अल्प प्रमाणानें होते हें खरें, परंतु केव्हां केव्हां थोर महात्मे उदयास येतात व ते समाजास एकदम मोठा लाभ करून देतात.

१५६. याप्रमाणें हें संपत्तिशास्त्र आहे. त्याचीं तत्त्वें सांप्रतच्या राष्ट्रस्थितीस लागू करूं लागलें ह्मणजे फार शोचनीय अवस्था दृष्टीस पडते. आमचें हें एवढेंसें संस्थान घ्या. येथील राजाचे अंगीं गुणही नाहीं व गुणज्ञताही नाहीं. त्याच्या भोंवतींच्या सरदार मंडळीचीही तशीच स्थिति आहे. राज्यकारभार इंग्रजी तऱ्हेवर चाललेला दिसतो, परंतु आंत अंदाधुंदी किती आहे हें सांगणें कठिण आहे. देशी संस्थानांस शूर पुरुषांची गरज राहिली नाहीं. मोठीं गुणी माणसें पदरीं ठेवण्याची बुद्धि नाहीं; व ऐषआरामांत त्यांचा इतका पैसा खर्च होतो कीं गुणी जनांचा संग्रह करूं लागलें तर फार कनिष्ठ प्रतीचे लोक अशा राजांचा आश्रय पत्करितात. उत्तम वैद्य, ज्योतिषी, नीतिकार, धर्मज्ञ, कवि, कारागीर, कुशल माणसें सर्व या संस्थानांतून लुप्त होत चाललीं आहेत. कारण इंग्रजी डाक्तरांनीं इंग्रजी औषधें द्यावीं; इंग्रजी ज्योतिष ग्रंथांवरून ग्रहांच्या स्थितींचें ज्ञान करून घ्यावें; इंग्रजी कायदे, गुणदोष न पहातां, एकदम चालू करावे; धर्माचा व राजाचा संबंधच राहिला नाहीं; कविता, नाटकें, कादंबऱ्या, सर्व कांहीं परमुलखांतून आणून वाचावीं; राजांस लागणारें

सर्व सामान, गाड्याघोडीं, कपडेलत्ते, हत्यारेंपात्यारें, चैनीचे पदार्थ, व उत्कृष्ट ह्मणून गणिलेल्या वस्तु सर्व इंग्रजी कारागिरांकडून पुरविल्या जाव्या; इमारती, बंगले, ऐषआरामाच्या जागा इंग्रजी मसुद्यांप्रमाणें तयार व्हाव्या व इंग्रजी सामानानें भरून टाकाव्या; असा हा प्रकार सर्वत्र सुरू आहे. श्रीमंत मंडळी राजाचेंच अनुकरण करीत आहेत. कोणामध्यें जी थोडी गुणज्ञता असेल ती परकीयांच्या उत्तेजनाकडे जाते; व्यसनें व ऐषआराम हेही परदेशीयांचा फायदा करून देत आहेत. या अंदाधुंदीवर देखरेख करणाऱ्या राजकीय इंग्रज अंमलदारास संतुष्ट ठेवणें भाग आहे. वरिष्ठ वर्ग धर्म, प्रेम व परोपकार यांस अगदीं मुकत चालले आहेत, किंवा त्यांस अगदीं सूक्ष्मरूप देऊन आपल्या विलासांत गर्क आहेत. गुणिजनांच्या अभावानें शाश्वत संपत्ति नवी उत्पन्न होत नाहींच, परंतु आहे तीही लुप्त होत चालली आहे. भौतिक संपत्ति मोठ्या कष्टानें उत्पन्न होत आहे, परंतु तिचा ओघ वेगानें परद्वीपाकडे वहात आहे. राजे व सरदार यांस इंग्रजी चैनीचें जें वेड लागलें आहे त्यांत एकच गोष्ट कमी दिसते. ती ही कीं एतद्देशीय स्त्रिया सुंदर व गुणी नाहींत ह्मणून परद्वीपाहून स्त्रिया आणून त्यांशीं ते विवाह करूं लागले नाहींत ! ही एक उणीव त्यांनीं भरून काढिली ह्मणजे त्यांचे ऐषआराम पूर्णावस्थेस येतील ! मग प्रजेस निकृष्ट स्थितीस आणण्याचा आणखी कोणता मार्ग काढावा हा देशी राजांस नवा शोध लावावा लागेल !

१५७. इंग्रजी राज्यांत याहूनही भयंकर स्थिति आहे. सर्व हिंदुस्थान फिरून पाहिल्यास एका गोष्टीचा सर्वत्र अनुभव येतो. ती गोष्ट ही कीं समाजांतील कोणताही वर्ग घेतल्यास व त्या वर्गांतील कुटुंबांची सरासरी प्राप्ति पाहिल्यास त्यांस चरितार्थापुरता पैसा मोठ्या कष्टानें मिळत असतो. फाजील पैसा कोणत्याही वर्गाजवळ नाहीं. त्यामुळें धर्म, प्रेम व परोपकार हे गुण भिन्न वर्गांच्या परस्पर संबंधांत उत्पन्न होत नाहींत, एवढेंच नव्हें, तर एकाच वर्गाच्या भिन्न कुटुंबांत ते व्यक्त होत नाहींत. कुटुंबाकुटुंबांमध्यें व वर्गावर्गांमध्यें केवळ व्यापारी तऱ्हेचा संबंध उरला आहे. हा संबंध गुणोत्कर्षास व उदारवृत्तास पूर्णपणें घातक आहे. गुणांच्या आविष्करणार्थ बुद्धीचे परिश्रम क-

रणें व शाश्वत संपत्तीचा अल्पांश तरी साध्य करणें हें काम करण्याची गरज राहिली नाहीं व इच्छाही नाहीं. याचा पुढचा परिणाम हा कीं देशाची भौतिक संपत्ति वाढण्याचा रस्ता बंद झाला आहे. जितके हात वाढतात तितकीं पोटें वाढतात, एकंदर सर्व हातांची कमाई अधिक झालेली दिसते, परंतु तीपैकीं बाहेर जो भाग जातो तो वजा करितां दरएक पोटास अन्नाचा वांटा कमीच मिळतो. यामुळें प्रत्येक वर्ग आपली सभ्यता व सदभिरुचि कमी करून खालच्या वर्गाशीं तुल्य होत आहे. याचें नांव सुधारणापंथ असें ठेविलें आहे. या पंथामुळें जातीजातींमध्यें वैमनस्य व मत्सरबुद्धि वाढत आहे. व्यापारी दृष्टीच्या प्राबल्यानें सर्व सौजन्य नाहींसें होत आहे. त्याचा अभाव परस्पर संभाषणांत कोणी प्रकट करितात, कोणी करीत नाहींत; जे करीत नाहींत ते आचरणानें तो स्पष्ट करितात. श्रीमंत घराणीं हळू हळू वसत चाललीं आहेत. ज्यांजवळ थोडा फाजील पैसा आहे असें आपणांस वाटतें, त्यांचें हृदय उघडून पाहिल्यास, आपलें कुटुंब आहे त्या स्थितींत किती दिवस राहील ही चिंता त्यांस क्षणभर सोडीत नाहीं. जे त्यांहून कमी भाग्यवान्, ह्मणजे ज्यांजवळ फाजील पैसा मुळींच नाहीं, अशा सामान्य कुटुंबांची भावी दुर्दशा वर्णवत नाहीं. आपल्या मुलांची पुढें काय स्थिति होणार ? आपल्या कुळाची योग्यता किती पायऱ्या खालीं उतरणार ? ही घोर विंवचना घरोघरच्या कर्त्या पुरुषास जाचीत आहे; व जें होईल तें होवो, असें ह्मणून पुष्कळ लोक दैवावर हवाला देऊन स्वस्थ आहेत. गुणप्रकर्षाचा सर्व फायदा परकीयांस; एतद्देशीयांस अश्रांत श्रम करूनही चरितार्थ भागविण्याची मुष्कील ! अगदीं कनिष्ठ शेतकाम करणारापासून श्रेष्ठतम न्यायाधीशाचें काम करणारापर्यंत, ही अशी शोचनीय स्थिति आहे,—ह्मणजे कोणत्याही कुटुंबास पुढील चार पिढ्यांत कोणती स्थिति येईल तिचें भविष्य समाधानकारक नाहीं. वरिष्ठ वर्गांत फाजील संपत्ति असल्याखेरीज, राज्यतंत्रांत गुणप्रकर्षास उत्तेजन असल्याखेरीज, व श्रेष्ठता आणि बहुमान मिळविण्याची आकुंचित सीमा दूर केल्याखेरीज हा देश ऊर्जित दशेस येईल हें संभवतें काय ?

१५८. सर्व हिंदुस्थानभर सुज्ञ व अज्ञ लोकांस देशी संस्थानां-

बद्दल साहजिकपणें अभिमान वाटतो, एक प्रकारचें ममत्व वाटतें, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. देशी संस्थानांत अन्याय होवो, प्रजेस पीडा होवो, पाहिजे तितकी बेवंदशाई असो, तीं संस्थानें नाहींशीं व्हावीं असें कोणाच्या मनांत येत नाहीं. याचें कारण गूढ आहे. तें असें कीं धर्म, प्रेम, परोपकार यांचा, आज नाहीं तर उद्यां, उदय होण्याचा तेथें संभव वाटतो. ज्ञान व पराक्रम यांपासून देशी संस्थानांत द्रव्य-दृष्ट्या कमी फायदा झाला, तथापि ज्ञानी आणि पराक्रमी पुरुषांस प्रजेमध्यें जी श्रेष्ठता येते व जो बहुमान मिळतो, तोच फार स्पृह-णीय होतो. ही श्रेष्ठता व हा बहुमान इंग्रजी राज्यांत नाहीं. कारण इंग्रजी राज्यव्यवस्थेंत सर्व वरिष्ठ जागा इंग्रज लोकांकडे सोंपविल्या आहेत. देशी कामदार कोणत्याही हुद्यावर असले तरी राज्यतंत्रांत त्यांचें काम गौण अवयवांचें आहे. त्यामुळें मोठ्या बहुमानास ते कदा-पि पात्र होत नाहींत. प्रजाहिताशीं त्यांचा प्रत्यक्ष संबंध येत नाहीं.

देशी संस्थानांत अद्यापि अशी स्थिति नाहीं. गुणी पुरुषांस स्व-तंत्रपणें बहुमानास पात्र होण्याची शक्यता किंवा कांहीं थोडी आशा तरी वाटते. प्रजाहिताशीं कामदारांचा प्रत्यक्ष संबंध येतो. या गोष्टी देशी संस्थानांबद्दल ममत्व उत्पन्न करितात. परंतु जर देशी संस्था-नांत युरोपीय कामदार नेमण्यास कोणीं राजानें आरंभ केला, दि-वाण, कारभारी, सुभे, वगैरे मोठे हुद्देवाले लोक परदेशीय झाले, व प्रजेमध्यें असणारे गुणी लोक बहुमानास अपात्र झाले, तर हीं देशी संस्थानें लवकर विलयास जावोत असें हिंदुस्थानभर वाटूं ला-गेल. उत्तम बंदोबस्त व कडक न्याय, एवढें साध्य झालें ह्मणजे राज्य उत्तम स्थितीस आलें असें समजणारा राजा फारच कोत्या बुद्धीचा असला पाहिजे. प्रजेंत गुणांचा उत्कर्ष करणें, धर्म, प्रेम, परोपकार यांनीं सर्व वर्ग एकजीव बांधून टाकणें, स्वराज्यांत शाश्वत संपत्ति उत्पन्न व्हावी ह्मणून प्रयत्न करणें, इत्यादि, हीं राज्यव्यवस्थें-तील वरिष्ठ कर्तव्यें होत. गुणांचें झाड अल्पकाळांत वाढून अस्मा-नास जाऊन लागत नाहीं, त्याच्या पोषणास व वृद्धीस काळ ला-गतो, हें जाणून राजानें उतावीळ होऊं नये. क्रमाक्रमानें जी गुण-समृद्धि होईल तीच शाश्वत लाभास कारण होईल.

१५९. परंतु हा देशी संस्थानांचा विचार एकीकडे ठेवूं व इंग्रजी प्रजेची स्थिति पाहूं. खुद्द इंग्रजांच्या देशांत उच्चनीच वर्ग असलेच पाहिजेत. त्या वर्गांमध्यें शेतकरी, मजूर वगैरे ज्या कनिष्ठ जाती असतील त्यांचें वेतन चरितार्थापुरतेंच असायाचें; त्या देशांतील दारिद्र्यास त्या कनिष्ठ जातींमध्यें आरंभ होतो. इंग्रजांच्या देशांत फाजील संपत्ति फार आहे व गुणमाहात्म्याचीही तेथें पूर्ण स्थापना झालेली आहे. हें त्यांनीं संपादिलेल्या शाश्वत संपत्तीवरून सिद्ध होतें. त्यामुळें धर्म, प्रेम व परोपकार यांचीं कार्यें कनिष्ठ वर्गास नित्य वर ओढून आणीत असावीं. आतां इंग्रजी अमलाखालीं जी एतद्देशीय प्रजा आहे तिचेही उच्चनीच असे वर्ग आहेत. तुह्मी असें समजा कीं इकडील जो अगदीं वरिष्ठ वर्ग तो विलायतेंतील अगदीं शेवटच्या वर्गाचे खालीं जाऊन लागतो. ह्मणजे इंग्रजी बादशाही राज्यांतील सर्व वर्गांपैकीं अखेरच्या वर्गांत एतद्देशीयांचा समावेश होतो. राज्यकर्त्यांचा त्यांशीं जो संबंध आहे तो बहुतांशीं राजकीय व व्यापारी आहे. या संबंधापासून प्रजा अवश्य निःसत्त्व होत गेली पाहिजे, कारण धर्मरीत्या उभयतांमध्यें संबंध नाहीं, व प्रेम आणि परोपकार यांचा ओघ राज्यकर्त्यांच्या देशबांधवांच्या कनिष्ठतम वर्गांपर्यंत पोंचण्या इतकाही तो प्रबळ नाहीं. तेव्हां बादशाही प्रजेच्या यादींतील या अखेरच्या वर्गास त्यापासून फारच सूक्ष्म लाभ होणार.

या सर्व गोष्टी लक्षांत आणिल्या असतां आमचे लोकांनीं चरितार्थाचे अगदीं कमी खर्चाचे मार्ग अंगीकारावे हेंच उचित दिसतें. यासच लोक गतानुगतिकता ह्मणतात. कारण आमचे पूर्वजांनीं शाश्वत संपत्ति जोडण्याच्या कामीं भौतिक संपत्तीची उणीव आड येऊं नये ह्मणून शारीरिक सुखें अगदीं संपुष्टांत आणून ठेविलीं आहेत. या गतानुगतिकतेनें वागून जें अवशिष्ट द्रव्य राहील तेवढेंच गुणोत्कर्षाच्या व धर्म-प्रेम-परोपकाराच्या कामीं येणारें आहे. पूर्वजांस अनुसरण्याचा हाच गूढ हेतु आहे. जर हा हेतु सुटला, जर सात्त्विक वृत्तीस कमी महत्त्व देऊन आह्मी भौतिक संपत्तीच्या मागें लागलों, तर अवश्य पतित होऊं. ही पतितता पहिल्याच पिढीस कदाचित् दृष्टीस पडणार नाहीं; परंतु दोन चार पिढ्यांत चांगली स्पष्ट होईल.

या गोष्टीचा प्रत्यय पाहण्यास लांब जाण्याचें कारण नाहीं. स्वजातीचे निर्बंध सोडून ज्यांच्या दोन चार पिढ्या गेल्या आहेत असे बरेच लोक इंग्रजी मुलखांत सांपडतील. त्यांची सांप्रतची व भावी स्थिति मनांत आणा; व श्रेष्ठता आणि बहुमान यांच्या संबंधानें त्यांची समाजांतील जागा ठरवा, ह्मणजे झालें.

---

## भाग २७ वा.

## सर्व महापुरुषांचें एक विशिष्ट लक्षण.

१६०. दिगंवरमहाराजांच्या अर्थशास्त्रविषयक विचारांचें मागें थोडें तात्पर्य दिलें. हे त्यांचे विचार ऐकत असतां माझे मनांत अनेक कल्पना उठत होत्या. त्यांच्या विचारसरणीवरून असें दिसत होतें कीं समाजांत आरंभीं जेव्हां कलाकौशल्य नसतें व शेतकऱ्यांच्या श्रमानेंच बहुतेक संपत्ति उत्पन्न होते, त्यावेळीं परमुलखांवर स्वाऱ्या करून लुटालूट करावी व स्वदेशांत बाहेरून संपत्ति आणून श्रीमंत व्हावें, यांतच सर्व महत्त्वाकांक्षा खर्च होते, व शूर पुरुषांस देशांत विशेष महत्त्व येतें; शौर्यापुढें सर्व दुसरे गुण फिक्के पडतात. परंतु हा बाहेरून द्रव्य आणण्याचा मार्ग बंद होतांच राजे व त्यांच्या पदरची सरदारमंडळी स्वतःचेच प्रजेस करांच्या रूपानें निःसत्त्व करण्यास आरंभ करितात. राज्याची व्यवस्था व संरक्षण करणारा एक वर्ग होतो, दुसरा वर्ग श्रम करून संपत्ति उत्पन्न करूं लागतो. या स्थितींत व्यापारास उत्तेजन येतें; कारण, संपत्तीचे उत्पादक सर्वत्र पसरलेले असतात, त्यांची निरनिराळ्या जातीची संपत्ति गोळा करून तिची अदलाबदल करणारांचें काम राज्यव्यवस्थेंत फार महत्त्वाचें व आवश्यक होतें. राज्यव्यवस्थेंत व्यापाऱ्यांचा वर्ग राजांचा साहाय्यकारी आहे, व त्यांचें विशेष प्रकारें संरक्षण करणें हें राजांचें कर्तव्य होतें. शूरांचा एक वर्ग, श्रम करणारांचा दुसरा वर्ग, तसाच हा लोभ्यांचा तिसरा वर्ग बनतो. शूर आणि लोभी या दोघांचाही बाकीच्या प्रजेशीं जो धंद्याचे दृष्टीनें संबंध येतो, त्यानें प्रजा निःसत्त्व होत

जाते. अशा प्रसंगीं गोळा झालेला पैसा पुनः प्रजेंत वांटला जावा ह्मणून चवथा वर्ग उत्पन्न होतो. शूर व लोभी लोकांस खुष करून, किंवा त्यांमध्यें सद्वासना उत्पन्न करून, किंवा गुणप्रभावानें त्यांस चकित करून, किंवा अशाच दुसऱ्या अनेक उपायांनीं त्यांचीं अंतःकरणें वेधून, त्यांकडे फाजील झालेला पैसा पुनः परत ओढावा, हें या चवथ्या वर्गाचें काम होय. या चवथ्या वर्गांत धर्मवेत्ते, कवि, निरनिराळ्या प्रकारचे गुणिजन, वगैरे अनेकांचा संग्रह होतो. याप्रमाणें हा द्रव्याचा चक्राकार ओघ आहे. रयतेकडून राजा व व्यापारी यांकडे, त्यांकडून गुणी पुरुषांकडे, त्यांकडून पुनः रयतेकडे, असा द्रव्याचा प्रवाह वाहत असतो. या चार वर्गांपैकीं, किंवा चार वर्णांपैकीं, गुणिजनांचा वर्ग फार महत्त्वाचा आहे, कारण तो एक कमी झाला असतां दारिद्र्य व जुलूम यांची अवश्य उत्पत्ति होते. सांप्रतकाळीं आमच्या देशाची पारतंत्र्यामुळें ही अशी स्थिति झाली आहे. कारण गुणांचा उत्कर्ष होण्यास मार्गच उरला नाहीं. आमच्या पारतंत्र्यास आरंभ होऊन आतां हजार वर्षे होत आलीं. या काळांत गुणांस उत्तेजन मिळालें नाहीं किंवा बहुमान मिळाला नाहीं. त्यामुळें सर्व गुण मागें पडत गेले, व त्याचा परिणाम धर्म, प्रेम आणि परोपकार हे उदारवृत्ताचे प्रकार कमी कमी होत चालले. हल्लीं या सर्वांचें स्वरूप साहजिकपणेंच अगदीं सूक्ष्म होऊन गेलें आहे.

१६१. गुणांचें काम शाश्वत संपत्ति उत्पन्न करण्याचें, असें दिगंबर महाराजांचें मत होतें. सामान्य लोकांमध्यें कांहीं थोड्या व्यक्ति अशा असतात कीं एक किंवा अनेक गुण त्यांमध्यें थोड्या फार अंशानें अधिक उत्कर्ष पावतात किंवा पावण्यासारखे असतात. मनुष्यमात्र अवयवांनीं सारखे आहेत, परंतु गुणांनीं नाहींत. जितके जगांत व्यवहार चालत आहेत, तितक्यांस अनुसरून निरनिराळे गुण आहेत; ह्मणून गुणांची संख्या करितां येणार नाहीं. सामान्य लोक आपआपल्या चरितार्थासाठीं जीं जीं कर्में करितात तीं करण्याची अधिक चांगली तऱ्हा काढणें हें गुणांचें कार्य होय. ही नवी तऱ्हा निघाली कीं पूर्वींची मागें पडते; याप्रमाणें जी थोडीफार सुधारणा होते तिचें नांव शाश्वत संपत्ति; कारण ती अन्नव-

स्त्राप्रमाणें उपयोगानें नष्ट होत नाहीं. एवढ्याच अर्थानें तीस शाश्वत असें ह्मणायाचें. बुद्धि, कल्पना, चातुर्य, कौशल्य, दूरदृष्टि, वगैरे गुण इतरांपेक्षां श्रेष्ठ गणिले आहेत, कारण या गुणांच्या साहाय्यावांचून इतरांचा विकास होत नाहीं.

१६२. जेथें राज्यव्यवस्था चांगली असते, तेथें सामान्य मनुष्याची प्राप्ति चरितार्थापुरती असावी, अधिक गुणी माणसाची अधिक असावी, व गुणांच्या उत्तेजनार्थ कोणताही खर्च फार असें समजतां कामां नये. अर्थशास्त्राचे माथ्यावर धर्मशास्त्राची जागा आहे, असें महाराजांनीं ठरविलें. कारण शरीराहून जसें मन श्रेष्ठ आहे, हस्तकौशल्याहून जसें बुद्धिकौशल्य श्रेष्ठ आहे, तसेंच, संपत्तीचा व्यापारी दृष्टीनें विचार करणाऱ्या शास्त्राहून, मनुष्याच्या अंतरात्म्याच्या सर्व उदात्तवृत्ति समाधान पावाव्या या दृष्टीनें विचार करणारें शास्त्र अवश्य श्रेष्ठ असलें पाहिजे. लोकांकडून त्यांची संपत्ति कोणकोणत्या युक्तीनें काढून घ्यावी हा विचार मनास निसर्गत: हीन वाटतो; संचित संपत्ति कोणकोणत्या रीतीनें लोकांत पसरून त्यांचा संतोष करावा हा विचार निसर्गत: मनास श्रेष्ठ वाटतो. ही जर अंतरात्म्याची निर्विवाद साक्ष आहे, तर व्यापाराहून परोपकार, अर्थशास्त्राहून धर्मशास्त्र अवश्यमेव श्रेष्ठ ठरतें. परंतु पहिलें दुसऱ्याचें साधन आहे ह्मणून अर्थशास्त्राचे माथ्यावर धर्मशास्त्राची जी महाराजांनीं स्थापना केली ती मला योग्य दिसली. राजस गुणी शास्त्राचें पर्यवसान सात्त्विक गुणी शास्त्रानें व्हावें, हेंच उचित आहे.

१६३. परंतु त्यांच्या उपपत्तींचा विचार एकीकडे ठेवून मी जेव्हां त्यांच्या सिद्धांताचा विचार करूं लागलों, तेव्हां निराशेनें माझें मन अत्यंत व्यग्र झालें. इंग्रजी बादशाही प्रजेचें आह्मी केवळ शेंपूट आहों ही गोष्ट मान्य केली पाहिजे. या स्थितींत आमच्या गुणकर्मांनीं आह्मांस श्रेष्ठता किंवा बहुमान मिळणें नाहीं, हेंही सत्य आहे. आमच्या सर्व श्रमांनीं आह्मांस सरासरी चरितार्थ चालवितां आला ह्मणजे आह्मीं मिळविली, ही गोष्ट प्रत्यक्षच अनुभवास येत आहे. तेव्हां या स्थितींतून वर डोकें काढण्यास मार्गच नाहीं असें ह्मणावें लागतें. दिगंबरमहाराजांचें ह्मणणें कीं या स्थितीस उचित

वर्तन ह्मटलें ह्मणजे प्रपंचांत सभ्यता व सदभिरुचि कायम राहील इतक्या बेतानें कमींत कमी खर्चानें आह्मी वागलें पाहिजे. सर्व चैन, सर्व डौल, सर्व व्यसनें सोडून दिलीं पाहिजेत. शरीराचें उत्तम प्रकारें जतन करण्यास व मनाची प्रसन्नता राखण्यास या देशांत फार कमी खर्च लागतो; या कामीं पूर्वजांनीं घालून दिलेला कित्ता गिरविला पाहिजे. शारीरिक सुखांस वश होऊन जर अंतरात्म्याची हानि करून घ्यावयाची नसेल, तर आपल्या अल्प प्राप्तीचाही एक अल्पांश विशेष उपयोगाकरितां राखून ठेविला पाहिजे. तो विशेष उपयोग गुणांच्या उत्कर्षाचा होय. कुटुंबांत, ज्ञातींत, देशबंधूंत जे गुण उत्कर्षास आणायाचे त्यांच्या उत्तेजनार्थ सर्वांचीच यथाशक्ति मदत पाहिजे. आमच्या बुद्धींत अत्यंत व्यापारदृष्टि शिरली आहे, तिचा थोडा तरी विघात केला पाहिजे. धर्म, प्रेम आणि परोपकार यांची अंतर्यामीं पुनःपुनः स्फूर्ति होऊन उपयोग काय? तिचें प्रत्यक्ष कृत्यांनीं समाधान केलें पाहिजे. हें वरिष्ठ सुख संपादण्याकरितां कांहीं कनिष्ठ सुखें सोडून दिलीं पाहिजेत.

१६४. या गोष्टीचें स्पष्टीकरण करीत असतां महाराजांनीं जें विवेचन केलें तें येथें थोडक्यांत सांगण्यासारखें आहे. ते ह्मणाले:– "अलीकडे परधर्मीयांच्या सहवासामुळें धर्मास जी ग्लानि आली आहे, तीमुळें आपल्या लोकांच्या आत्म्यावर मोह-प्रमादांचा कलंक चढत आहे व तो दूर करण्याचें विद्वानांसही धैर्य होत नाहीं. कारण, तो कलंक दूर होतांच इतरांच्या दुःखानें स्वतःच्या सुखाचा तत्काळ विरस होतो. आमच्या लोकांनीं आपली कल्पनाशक्तिही तशीच मारून टाकण्याचा प्रयत्न चालविला आहे; कारण कल्पना ह्मणजे आत्म्याची अंतर्गत दृष्टि होय; व ती दूर फेंकल्यास परदुःख आत्म्यास तत्काळ जाणवतें.

"ज्याचा **आत्मा निर्मळ** आहे व **कल्पना तीव्र** आहे, त्यावरील धर्मप्रेरणांचा अंमल कधींच कमी व्हावयाचा नाहीं. आपण सुग्रास भोजन जेवीत असतां दाराशीं भुकेल्या भिकाऱ्याची घासभर अन्नाकरितां दीनवाणी किंचाळी ऐकिली तर आपलें मन विव्हळून जातें. भिकारी डोळ्यांसमोर नसला तथापि कल्पनेनें त्याची प्रतिमा मनांत

उभी राहते. आपला आत्मा त्या प्रतिमेंत शिरून स्वतः भुकेच्या तीव्र वेदना अनुभवूं लागतो. मग तोंडांतील घास गोड लागत नाहीं. ' या भुकेल्याचें दुःख यथाशक्ति अवश्य निवारण करीन ' अशी आत्म्याची जेव्हां स्वतःशीं प्रतिज्ञा होते तेव्हां त्यास समाधान वाटतें, व तो पूर्व स्थितीवर येतो. जेव्हां जेव्हां परदुःखाची कल्पना मनांत येते, तेव्हां तेव्हां दुसऱ्यांशीं आपलें कांहींसें **तादात्म्य** होतें; व स्वतः तें दुःख अनुभवून त्याच्या निवारणाची आपण प्रतिज्ञा करितों. या आत्मकृत प्रतिज्ञांमध्यें सर्व परोपकाराचें मूळ आहे. या प्रतिज्ञांचें पालन केल्यावांचून चालत नाहीं. त्यांचा भंग केल्यास सत्याचा अपमान केला, अंतर्यामास कलंक लाविला, आपण आपली थोरवी घालविली, पतित झालों, असें मनांत येऊन मोठें दुःख होतें. उलट, प्रतिज्ञांचें यथावत् पालन केल्यास चिरकाल सुख होतें.

दुसऱ्यांचें सुख व संतोष पाहून तादात्म्यामुळें स्वतःस तसाच आनंद होतो. अशा या मानसिक सुखाकरितां व मानसिक दुःखाच्या निवारणाकरितां प्रसंगीं शारीरिक सुखांची पर्वा सोडावी लागते. आत्म्यावरचें मोहपटल जितकें दूर होतें व कल्पना जितकी तीव्र होते, तितकी इतरांशीं तादात्म्य करण्याची शक्ति वाढते. अत्यंत निर्मळ आत्म्याचे पुरुष या रीतीनें सर्वभूतांशीं तादात्म्य करूं शकतात. त्यांस दुसऱ्यांचीं सुखदुःखें स्वतः अनुभवितां येतात, एवढेंच नव्हे, तर तीं सुखदुःखें इतक्या स्पष्टपणें व मार्मिकपणें वर्णन करितां येतात कीं सर्व श्रोत्यांस त्यांचा अनुभव येऊं लागतो. श्रोत्यांच्या आत्म्यांवरील मोहपटल दूर होतें, ते आत्मे पवित्र आणि प्रकाशित होतात, त्यांस ज्ञानदृष्टि येते; ते ते सुविचार अंतःकरणांत भरतात व त्या महापुरुषांस अनुसरावें अशी प्रबळ इच्छा उत्पन्न होते. असे महापुरुष धर्मसंस्थापक होतात. धर्माची हानि झाली असतां असे महापुरुष त्याची पुनः उन्नति करितात. तुकाराम, आदिकरून साधूंनीं जें संतांचें माहात्म्य वर्णन केलें आहे तें अशा महापुरुषांचें होय—

**नलगे मुक्ति-धन-संपदा । संतसंग देई सदा ॥**
**अंतरीं निर्मळ, वाचेचा रसाळ । त्याचे गळां माळ असो नसो ॥**

आत्म्यामध्यें जी ही तादात्म्यशक्ति आहे, तीमुळेंच ऋषिवर्यांनीं आत्मा हा ईश्वरी अंश मानिला आहे. हा आत्मा जितका निष्कलंक करावा तितकी त्यामध्यें कालस्थलमानानें उचित धर्मप्रेरणा अवश्य होत जाते. अत्यंत निर्मळ आत्म्याच्या पुरुषांकडे लोकनायकत्व येतें. ‘ महाजनो येन गतः स पंथाः ’ या उक्तीचा तत्त्वदृष्टया हाच अर्थ आहे. ‘ आत्मवत्सर्वभूतानि यः पश्यति स पश्यति ’ हें महापुरुषाचें लक्षण जगांतील सर्व धर्मप्रवर्तकांस लागू पडण्यासारखें आहे.

मनुष्यप्राण्यांत आणि इतर प्राण्यांत जो भेद आहे तो या तादात्म्यशक्तीचा होय. पशूंमध्यें सौंदर्य जाणण्याची शक्ति आहे, सुगंध ओळखण्याची शक्ति आहे, त्यांस सुरुचि कळते, सुखस्पर्श अनुभवितां येतो. ज्ञानेंद्रियांनीं किंवा कर्मेंद्रियांनीं मनुष्यापेक्षां पशु फारसे कमी नाहींत. कांहीं प्रकारची राज्यव्यवस्थाही त्यांमध्यें आहे व व्यापाराची त्यांस आवश्यकता उत्पन्न झाल्यास ते अल्पांशानें तरी तो करूं शकतील. परंतु त्यांवर मनुष्याचें जें निर्विवाद वर्चस्व आहे, तें तादात्म्यशक्तीमुळें आहे. इंद्रियांनीं यथेष्ट विषयोपभोग घेणें, राज्यव्यवस्था सुरेख मांडणें, व्यापार चढाओढीनें करणें, एवढ्यानें मनुष्याच्या सर्व गुणांचें सार्थक्य होत नाहीं. त्यानें आत्मा निर्मळ करून व कल्पना तीव्र करून, सत्यप्रतिज्ञ राहण्याच्या निश्चयानें परोपकारास प्रवृत्त होणें, यांतच त्याची थोरवी आहे. तो पशूंहून निःसंशयपणें श्रेष्ठ आहे असें सिद्ध होण्यास हे गुण त्यानें अवश्य प्रकट केले पाहिजेत. ”

१६५. आपल्या कुटुंबाची, ज्ञातीची व राष्ट्राची आपत्ति जाणून सर्वांनीं या देशाच्या हवेस योग्य असें साधें आयुष्य घालवावें व चरितार्थ थोडक्यांत भागवून जो थोडा फार संचय होईल त्यानें गुणांच्या उत्कर्षास मदत करावी, शाश्वत संपत्तीचे उत्पादनास साहाय्य करावें, असा महाराजांचा उपदेश आहे. चैन करणें हा कनिष्ठ धर्म किंवा पशुधर्म होय. आत्मा मोहपटलानें व्याप्त झाल्याचें हें लक्षण होय. नाहींतर, देशास सर्वत्र दैन्य आलें असतां कोणास आप-

ली चैन असमाधानकारक होणार नाहीं ? ' यथाशक्ति बांधवांच्या विपत्तींचें निवारण करीन ' अशी प्रतिज्ञा केल्यावांचून कोण राहील ? देशांत गुणांचा उत्कर्ष व्हावा ह्मणून, बंधुप्रेमानें किंवा निवळ परोपकारबुद्धीनें देशी कपडे वापरायाचे, देशी माल खरेदी करायाचा, देशी कौशल्यास उत्तेजन द्यावयाचें, देशबांधवांनीं बुद्धिपरिश्रमानें निर्मिलेल्या काव्यादि ग्रंथांचा आदर करायाचा, राष्ट्रीय धर्मास सद्धर्माचें स्वरूप द्यावयाचें, इत्यादि प्रकारचे निश्चय किंवा प्रतिज्ञा करणें हें सर्व निर्मळ अंतःकरणाचे पुरुषांस अवश्य वाटलें पाहिजे.

आपलें अंतःकरण निर्मळ असतें तेव्हां आपल्या वासनांचें आपण संशोधन करावें असा महाराजांचा मला शेवटचा उपदेश होता. कांहीं गोष्टी मनास स्वभावतः रुचतात, कांहीं विचार आपोआप ग्राह्य होतात, किंवा कांहीं कर्मांकडे साहजिक प्रवृत्ति असते. याप्रमाणें ज्या गोष्टींकडे आपले मनाचा निसर्गतः कल असतो, त्या गोष्टी स्वहिताच्या आहेत असें समजावें. पूर्वसंस्कारांनीं त्यांची प्रेरणा होत असते. त्यांचा त्याग करण्याचें आपणांस अवश्य वाटूं लागल्यास, तसें एकाएकी करूं नये; आपल्या एकट्याच्या विचारावर अवलंबून राहूं नये; फार दूरवर विचार करावा; फार दूरचेही परिणाम ध्यानांत आणावे. असें केल्यास त्या गोष्टींचा त्याग करण्याचा प्रसंग बहुधा यावयाचा नाहीं. त्यांपासून एका नाहींतर दुसऱ्या दिशेनें महत्त्वाचे फायदे आहेत असें दिसून येईल.

---

## भाग २८ वा.

### जातिभेदाच्या शाश्वतीचीं चिन्हें.

१६६. दिगंबर महाराजांनीं धर्म-प्रेम-परोपकार यांविषयीं जें विवेचन केलें त्याचा मी एकांतांत विचार करीत असतां सदानंदस्वामींच्या मतांची मला आठवण झाली व ख्रिस्ती लोकांविषयीं त्यावेळीं जें फार वाईट मत झालें होतें तें आतां बरेंच बदलून गेलें. ख्रिस्ता-

मध्यें तादात्म्यशक्ति फार मोठी होती व तो महापुरुष होता असें मला दिसून आलें. 'अंतरीं निर्मळ, वाचेचा रसाळ' असा तो धर्मश्रेष्ठ संत होऊन गेला हें, त्यानें जीं धर्मतत्त्वें घालून दिलीं व लोकांकडून त्यांचें जें ग्रहण करविलें, त्यावरूनच स्पष्ट होतें. परंतु ख्रिस्तप्रणीत धर्म अस्थानीं पेरला गेला हें मान्य केलेंच पाहिजे. ज्या लोकांत त्याचा प्रसार झाला ते पुढें कित्येक शतकेंपर्यंत लुटालुटीच्या स्थितींत होते. ख्रिस्ती लोकांचें अमेरिकेंतील आरंभींचें वर्तन या गोष्टीची साक्ष देतें. ख्रिस्ती लोकांची ही लुटालुटीची स्थिति अद्यापिहि पुरतीशी गेली नाहीं, तथापि गेल्या शतकांत त्यांस व्यापाऱ्यांची स्थिति हळूहळू येत चालली. लुटालुटींत जसा त्यांनीं कहर करून दिला, तसा व्यापारांतही कहर मांडिला, व मनुष्यप्राण्यांचा व्यापारही पूर्णत्वास नेला.

ख्रिस्तीधर्माचें बीज पेरल्यापासून सबंध अठरा शतकें गेल्यावर पुढें त्यास पहिला परोपकाराचा अंकुर फुटला, व ख्रिस्तीलोकांस परकीयांशीं तादात्म्य करण्याची शक्ति येत चालली. तीमुळें साम्य व बंधुता यांची त्यांमध्यें प्रथम स्फूर्ति झाली. पुढें ती अल्पांशानें तरी परराष्ट्रीयांस लागू करावी असें त्यांस वाटूं लागलें व शुद्ध व्यापारदृष्टि कमी पडली. त्यामुळें त्यांनीं सिध्धी लोकांस अत्यंत क्रूर अशा दास्यांतून सोडविण्याचा प्रयत्न केला. तसेंच पशुहत्येंत फाजील क्रौर्य नसावें, असें त्यांस वाटूं लागलें. व कोणी कोणी खाण्याकरितां पशूंचा वध करणें हें नापसंत करून धान्याहारी बनत चालले. हें तादात्म्याचें तत्त्व दिवसानुदिवस युरोपांत अधिकाधिक जोरावत आहे, व त्यावरून ख्रिस्ताचे धर्मास एक एक नवा अंकुर फुटत आहे असें सिद्ध होतें. ख्रिस्ती समाजाची हल्लींची स्थिति पाहिल्यास कांहीं मोठ्या घडामोडींचीं चिन्हें दिसत आहेत. इकडे ख्रिस्ती मजूर, कारागीर, वगैरेंस आपण व्यापाऱ्यांचे दास बनलों आहों,—आपण मनुष्यरूपी यंत्रें बनलों आहों,—असें वाटून असमाधान वाटूं लागलें आहे. तिकडे सरदार, व्यापारी, वगैरे वरिष्ठ वर्गास तादात्म्यशक्तीनें गरीबांची अनुकंपा येऊं लागली आहे. गरीबांस फुकट विद्या द्यावी, त्यांस चांगलीं घरें बांधून द्यावीं, त्यांचें रोजचें कारखान्यांतील काम

कमी करावें, त्यांमधील पशुता कमी करण्याकरितां धार्मिकतेचें माहात्म्य नित्य नित्य त्यांस सांगत रहावें, त्यांच्या गुणांचा उत्कर्ष होईल असें जें शक्य असेल तें करावें, इत्यादि परोपकाराच्या वासना उत्पन्न होऊन वरिष्ठ वर्ग हल्लीं त्या खटपटींत आहत. सरकार व सुसंपन्न लोक आपआपल्या अनुकूलतेप्रमाणें कनिष्ट वर्गांस वर ओढण्याकरितां पुष्कळ खर्च करीत आहेत. परंतु त्यांची दृष्टि स्वजातीयांच्या पलीकडे अद्यापि जात नाहीं, हीच मोठ्या दुःखाची गोष्ट आहे. तथापि धर्मप्रेम-परोपकार यांच्या उदयास जो आतां आरंभ झाला आहे, तो कदापि थांबणार नाहीं व कालांतरानें त्याचा ओघ एतद्देशीय प्रजेपर्यंत येऊन पोहोंचेल असा संभव आहे. या संभवावरच तूर्त आह्मीं आपल्या सर्व राजकीय उन्नतीच्या आशा ठेवून, तो शुभकाळ येईपर्यंत स्वतःचें संरक्षण करून घेतलें पाहिजे. स्वतःच राष्ट्रीय गुणोत्कर्षास झटलें पाहिजे, व आमचें दारिद्र्य आह्मांस आड आलें, तथापि त्यांतूनच काटकसरीनें उन्नतीचा रस्ता काढिला पाहिजे.

१६७. वर सांगितल्या प्रकारचे विचार जेव्हां माझे मनांत येऊं लागले त्यावेळीं पूर्वींच्या कित्येक कल्पना बदलून गेल्या. तादात्म्य-शक्तीचा आमचे लोकांवर फार दिवस अंमल बसल्यानें आमच्यांतील कांहीं गुणांचा लोप झाला आहे व तो दुर्निवार आहे असें मला वाटूं लागलें. आमचीं अंतःकरणें कोमल झालेलीं आहेत. त्यामुळें जेथें कडकपणा व निर्धार आवश्यक असतो, तेथें आमचे लोक कमी पडतात. न्याय देतांना अंतःकरणांत दयेचा अवतार होतो. कोणी अपकृत्य करूं लागल्यास तो कोणत्या आपत्तीमुळें कुमार्गास लागला असावा हें जाणून आह्मी क्षमाशील होतों. व्यापार आरंभिला तरी आह्मी पूर्णपणें लोभाचे स्वाधीन होत नाहीं. द्रव्यप्राप्तीची उत्कट इच्छा आमचे मनांत सर्वकाळ नांदत नाहीं. व्यवहारांत जेथें क्रोधावेशानें कोणतीही गोष्ट साध्य करून घ्यावयाची तेथें आह्मांस आमची शांतवृत्ति आवरून धरिते. याप्रमाणें अनेक उदाहरणें देतां येतील. सत्याचाही अर्थ याच कारणानें आमच्या मनांतून बदलून गेला आहे. 'यल्लोकहितमत्यंतं तत्सत्यमिति धारणा।' ही सत्याची व्याख्या, न कळत, आह्मीं स्वीकारिली आहे.

सत्यपालन लोकहितार्थ आहे; जर सत्यानेंच लोकहिताचा नाश होतोसा दिसला तर सत्याचाही त्याग करण्याची आह्मांस बुद्धि होते. आपल्या सत्यवचनामुळें ज्याची हानि होणार त्याशीं आह्मी तन्मय होऊन जातों; मग सत्याचा पाडाव होतो. याप्रमाणें हें जें अंत:करणाचें कोमलत्व तो तादात्म्यशक्तीचा परिणाम आहे. राजकीय कामांत ही कोमलता घातक आहे असें इंग्रजांचें मत आहे; तें खरें मानावें कीं नाहीं हा निराळा विचार आहे; परंतु तें खरें असल्यास आह्मांत हा मोठा दोष आहे असें कबूल केलें पाहिजे. या ठिकाणीं अंत:करणाची प्रेरणा व व्यावहारिक कर्तव्यता यांत विरोध आहे, तेव्हां कोणास अनुसरावें हा प्रश्न आलाच.

१६८. परंतु ख्रिस्ती लोकांत देखील अशीच अंत:करणाची कोमलता उत्पन्न होऊं लागली आहे. ख्रिस्ती धर्माचीं मूलतत्त्वें त्यांमध्यें जसजशीं पसरतील, तसतसा हा परिणाम घडलाच पाहिजे. ख्रिस्तानें व्यापारबुद्धि व धनसंचय यांचा अगदीं निषेध केला. त्यानें दया, क्षमा, शांति, ह्याच गुणांची अत्यंत प्रशंसा केली. व्यापाराचे माथ्यावर ख्रिस्ताच्या तात्त्विक धर्माची हल्लीं स्थापना होत आहे. तीवरून असें दिसतें कीं अंत:करणाची कोमलता हा गुण मानवी उत्क्रांतींत मागाहून येणारा आहे. या गुणाच्या प्रादुर्भावानें आवेश, निर्धार, कडकपणा वगैरे लुटालुटीच्या व व्यापाराच्या स्थितींतील गुणांचें अवश्य रूपांतर होणार. सारांश आह्मी ज्या स्थितींत आहों त्याच स्थितींत ख्रिस्ती लोकही येत आहेत अशीं स्पष्ट चिन्हें दिसूं लागलीं आहेत, व किती काळानें त्यांस ही स्थिति पूर्णत्वानें येईल एवढाच प्रश्न उरला आहे.

१६९. जेव्हां मनुष्यास तादात्म्यशक्ति येते तेव्हां दुसऱ्याचीं जशीं सुखें दिसतात तशीं त्याचीं दु:खेंही दिसतात. जोंवर रंक राजाचें वैभव पाहतो, तोंवर त्यास राजासारखा कोणी सुखी नसेल असें वाटतें, कारण त्यास राजाचें अंतर्याम दिसत नाहीं. जोंवर राजा रंकाची गाढ निद्रा पाहून चकित होतो, तोंपर्यंत त्यास हें रंकाचें सुख आपणांस नाहीं असें वाटतें, कारण रंकाचें अंत:करण त्यास दिसत नाहीं. परंतु जेव्हां भिन्नवर्गांस परस्परांशीं तादात्म्य

करितां येतें, तेव्हां, मी अमक्या वर्गांत जन्मलों ह्मणून अधिक सुखी किंवा दुःखी आहे, असें वाटेनासें होतें. याचें कारण उघडच आहे. पोषाख, घरदार व बाह्यस्थिति हीं चांगलींवाईट असतील त्याप्रमाणें तीं सुखदुःखांस कारण होतात हें खरें, परंतु त्यांशिवाय मनुष्यास आत्मा, अंतःकरण आणि कल्पना हीं आहेत; व त्यांची स्थिति जशी चांगलीवाईट असेल तशीं तींही सुखदुःखांस कारण होतात. सुख दुःखांवर अंतःस्थितीचा जेवढा मोठा परिणाम आहे तेवढा बाह्यस्थितीचा नाहीं. **बाह्यसुखें अनुभविण्यास अंतःस्थिति संतोषमय पाहिजे,** ती तशी नसेल तर बाह्यस्थितीचा विरस होतो. बाहेरील डामडौलांत वर्गांवर्गांमध्यें कितीही अंतर असलें तथापि अंतःस्थितींत सर्वांची बरावरी आहे; व सुख दुःखांचा अनुभव घेण्याची पात्रता सर्वांचे अंगीं सारखी आहे. तेव्हा समाजांत वर्ग किंवा जाति असल्या तथापि वर्गांची अंतःस्थिति कलुषित होण्यास कारण नसल्यास सर्वांस सारखा सुखानुभव घेतां येतो.

१७०. आपण मनुष्यस्थितींत आहों ह्मणून आपणांवर अनेक दुःखप्रसंग येतात; केवळ आपल्या पोषाखामुळें किंवा बाह्यस्थितीमुळें येणारे दुःखप्रसंग फार थोडे आहेत. रोगराई, शारीरिक व्यंगें व दुःस्थिति, हीं कोणास वांटलेलीं नाहींत. मद, मोह, दुराशा व मानसिक दुःस्थिति, हींही कोणास वांटलेलीं नाहींत. सर्व वर्गांत तीं आहेत व केवळ वर्गांतर केल्यानें तीं नाहींशीं होणारीं नाहींत. समाज व्यवस्थित राहण्यास सर्वच वर्गांची त्यास जरूर आहे व कोणताही वर्ग नाहींसा होऊं शकत नाहीं. श्रीमंतांवांचून जग चालायाचें नाहीं, गरीबांवांचून तें चालायाचें नाहीं. शारीरिक श्रम करणारे पाहिजेत, मानसिक श्रम करणारेही पाहिजेत. शूर व धीर लोकांची जशी जरूरी आहे, तशी शांत व ज्ञानी लोकांचीही आहे. समाजांत ज्या ज्या गुणांविषयीं साहजिक गौरव वाटतें ते सर्व गुण समाजाचे उत्कर्षकारक आहेत. त्या गुणांच्या भिन्नत्वामुळें व तन्मूलक भिन्न कर्मांमुळें समाजाचें अवश्य वर्गीकरण झालें पाहिजे. जोंवर कोणत्याही वर्गांत आनुवंशिक पूर्वसंस्कारांमुळें तेच तेच विशिष्ट गुण प्रकृष्टपणें उत्पन्न होतात, तोंवर वर्गांतर करणें फायद्याचें नाहीं; तें व-

B
514
PERSONAL LIBRARY Pune


हुधा हानिकारक व्हावयाचें. ख्रिस्ती लोकांमध्यें ज्या काळीं तादात्म्यशक्ति सर्वत्र उत्पन्न होईल व तिजमुळें व्यापारी प्रेरणा गौण होऊन धर्मप्रेमपरोपकाराचें नातें सर्व वर्गांत उत्पन्न होईल, त्याकाळीं वर्गांतर करण्याची महत्त्वाकांक्षा जाऊन त्यांमध्येंही वर्गभेदास कायमचें स्वरूप येण्याचा संभव आहे. सारांश ज्या राष्ट्रामध्यें परमार्थबुद्धि व सात्विक वृत्ति वाढली तें राष्ट्र वर्गभेदास योग्य झालें असें समजावें. कारण त्या स्थितींत वर्गभेदाचे सर्व दोष नाहींसे होतात; व गुणोत्कर्षाच्या द्वारें समाजाचें हित साधण्यास वर्गभेदही उपयोगीं पडतो.

जातिभेदाचा व धंद्यांचा संबंध वास्तविक पहातां कायमचा नाहीं. जातिभेदानें व्यवहारांत जे निर्बंध उत्पन्न होतात ते सभ्यता व सदभिरुचि यांच्या प्रेरणेनें पुष्कळ अंशीं उत्पन्न होतात. स्पर्श, सहभोजन व शरीरसंबंध या तिहींविषयीं कायते जातिभेदाचे निर्बंध आहेत असें ह्मटल्यास चालेल; व सर्वांची समान सात्त्विकवृत्ति झाल्याखेरीज ते दूर होणार नाहींत.

अगदीं वरिष्ठ जाति आपल्या श्रेष्ठ सात्त्विक वृत्तीमुळें कनिष्ठ जातींपासून दूर राहतात यांत नवल नाहीं. सर्व धर्मांतील उच्च जातींत हीन जातींचा स्पर्श टाळण्याची इच्छा उत्पन्न होते व आचरणांतही ती स्पष्ट होते, इतकेंच कीं, ती धर्ममूलक नाहीं, केवळ व्यावहारिक आहे. ही साहजिक इच्छा परोपकाराच्या आड न यावी, एवढा निश्चय असल्यास तीपासून दुष्परिणाम होत नाहींत.

सहभोजन हें निकट सहवासाचें फळ आहे. त्यांत परोपकाराचा भाग नाहीं व तें समान सात्त्विक वृत्तीच्या माणसांमध्यें झालें तरच आनंददायक होण्याचा संभव आहे.

परंतु शरीरसंबंधाचे नियम, स्पर्श व सहभोजनाच्या नियमांहून, फार कडक आहेत. कारण, पूर्वसंस्कारांची संततींत उत्पत्ति व्हावी हा उत्तम विवाहसंबंधाचा मूळ उद्देश आहे. वधू आणि वर केवळ सजातीय असून भागत नाहीं; सारख्या सात्त्विकतेचे असणें इष्ट आहे. परंतु विवाहसंबंधीं विचारांत याही पलीकडे जाऊन, दोन्ही

कुटुंबांची समान उत्क्रांति पाहिल्यास तें अत्यंत श्रेयस्कर होणार आहे. साहजिक सद्वासना उत्क्रांतिमूलक असतात, तेव्हां विवाहसंबंधांत वधूवरांची प्रत्यक्ष योग्यता पाहिल्यानंतर त्यांची समान उत्क्रांति, म्हणजे जातकुळी, पाहणें अवश्य होतें.

सर्व जातींत व सर्व कुटुंबांत, एका नाहीं तर दुसऱ्या पिढींत, विशेष गुणांचे किंवा बुद्धीचे पुरुष उत्पन्न होतात. ते स्वतःच्या श्रेष्ठतेनें इतर सर्व व्यक्तींस मागें टाकू शकतील. परंतु हा प्रभाव त्या व्यक्तींपुरताच दृष्टोत्पत्तीस येतो; तो कायमचा नव्हे. ज्या कुटुंबांत दरपिढीस सरासरी सारख्या प्रभावाचे पुरुष उत्पन्न होतात तीं कुटुंबें सारख्या उत्क्रांतीचीं होत. त्यांमध्यें शरीरसंबंध व्हावा हेंच उचित आहे.

याप्रमाणें जातिभेदासंबंधानें माझ्या मनांत आतां कांहीं नव्याच कल्पना भरल्या. जातिभेदास या देशांत हल्लीं जें स्वरूप आलेलें आहे, तें शास्त्रकारांनीं आणिलेलें नाहीं, राज्यव्यवस्थेनें आलेलें नाहीं; तें अपकारक नाहीं व तें नष्ट होण्यांत कांहीं फायदा नाहीं. परधर्मीयांसही तें क्रमानें येण्याचा संभव आहे. आमची सामाजिक उत्क्रांति होऊं लागल्यास आतां पांचसात हजार वर्षें होऊन गेलीं आहेत. हल्लींच्या युरोपीय राष्ट्रांमध्यें ती होऊं लागून कायतीं एक दोन हजार वर्षें झालीं आहेत. यामुळें ते आमच्या मागें आहेत. परंतु तेही उत्क्रांतीच्या प्रवाहांत सांपडले असून आमच्याच दिशेस वेगानें येत आहेत.

हे असे सिद्धांत आतां माझ्या मनांत भरत चालले व त्यांचें मलाच आश्चर्य वाटूं लागलें. ते इतके चमत्कारिक आहेत कीं मीही त्यांविषयीं अश्रद्ध व्हावें व पुनः त्यांचें परीक्षण करूं लागावें. परंतु त्या परीक्षणानंतर ते अधिकच सबळ दिसूं लागावे. जातिभेदाचें महत्त्व केवढें मोठें आहे हें दिवसेंदिवस माझ्या मनास अधिक स्पष्ट होऊं लागलें. जगांतील इतर सर्व प्रबळ धर्मांहून हिंदुधर्म ज्या एका लक्षणानें ओळखला जातो, तें लक्षण हें कीं हिंदुधर्मांत जातिभेद ही एक विशेष संस्था आहे; ती दुसऱ्या धर्मांत नाहीं. जातिभेदांतच

हिंदुधर्माचें बळ आणि रहस्य आहे. जातिभेद मोडल्यास अवशिष्ट राहिलेल्या हिंदुधर्माचें बौद्ध किंवा ख्रिस्तीधर्मांत तेव्हांच रूपांतर होऊन जाईल, व तत्त्वतः हिंदुधर्म नष्ट होईल. यावरून असें सिद्ध होतें कीं जातिभेदाची शाश्वती ह्मणजेच हिंदुधर्माची शाश्वती होय. कितीही राज्यक्रांत्या आणि धर्मक्रांत्या झाल्या तरी जातिभेदाच्या किंवा हिंदुधर्माच्या शाश्वतीस धक्का लागणार नाहीं असें सदानंदस्वामी, दिगंबरमहाराज व इतर अनेक धर्माभिमानी हिंदूंचें ठाम मत होतें. ह्मणूनच ते त्यास **सनातन आर्यधर्म** अशी संज्ञा देतात.

वास्तविक पहातां, भिन्न भिन्न कारणांनीं समाजांत **वर्ग** उत्पन्न होणें हें तर अनिवार्य आहे. अशा वर्गोत्पत्तीस वर्णभेद, वर्गभेद किंवा जातिभेद कोणतीही संज्ञा दिली तरी चालेल. या वर्गोत्पत्तीबद्दल वाद नाहीं; **वर्गांतर** करण्याच्या प्रतिबंधांबद्दल कायतो वाद आहे. कनिष्ठ जातींस वरिष्ठ जातींत शिरण्याचे मार्ग उत्पन्न झाले ह्मणजे जातिभेद मोडलाच समजायाचा; निदान त्याचें उग्र स्वरूप गेलें. परधर्मीयांस व सुधारकांस ही सुधारणा पाहिजे आहे. इच्या उलट सुधारणा ह्मणजे वरिष्ठ वर्गांनीं कनिष्ठ वर्गांत शिरण्याची होय. ती करण्याचे मार्ग धर्मांत सांगितले आहेतच व त्यांपैकीं शूद्रांशीं विवाहसंबंध करणें हा एक अगदीं सोपासा आहे. आतां तूर्त जो प्रश्न आहे तो हा कीं, पहिली ती सुधारणा होऊन जातिभेद मोडण्याचा संभव आहे, कीं दुसरी ही उलट सुधारणा होऊन तो मोडण्याचा संभव आहे?

पुराणकाळापासून आतांपर्यंत एक वेदाध्ययन खेरीज करून बाकी सर्व संस्कृत ग्रंथांचें अध्ययन करण्याची मोकळीक शूद्रांस व ब्राह्मणांस सारखीच प्राप्त झालेली होती. परंतु थोडे वैदिक ब्राह्मण व शास्त्री खेरीज करून, बाकी राहिलेल्या मोठ्या ब्राह्मणसमाजाची जिज्ञासा पूर्वींपासूनच फार आकुंचित होऊन गेलेली दिसते, तेव्हां तशीच शूद्रांचीही जिज्ञासा आकुंचित झाल्याचें नवल नाहीं. बहुतेक गृहस्थ ब्राह्मणांस जसें कारकुनीपेक्षां फारसें अधिक ज्ञान पूर्वी नव्हतें, तसेंच तें शूद्रांसही नव्हतें. जे थोडे प्रबळ जिज्ञासेचे पुरुष ब्राह्मण गृहस्थांच्या किंवा अन्य जातीय गृहस्थांच्या कुळांत उत्पन्न झाले, ते

कवि, साधुसंत, वगैरे झाले; त्यांची संख्या ब्राह्मणांत अधिक व कुणब्यांत कमी असें दिसत नाहीं. परंतु विद्या आणि परमार्थ हे दोन धंदे वगळले असतां, बाकी सर्व कामांत **ब्राह्मण लोक आपल्या सात्त्विक वृत्तीमुळें शूद्रांच्या मागें राहिले; इतर जाति आपल्या राजस गुणांमुळें त्यांच्या पुढें गेल्या;** व्यवहारमार्गांत ब्राह्मणांनीं आपली उन्नति इतर जातींच्या प्रसिद्ध पुरुषांइतकी करून घेतली नाहीं. शूद्रांनीं राज्यपदें कमावलीं; ब्राह्मणांनीं डळमळीत व अशाश्वत अशा मंत्रिपदापलीकडे आपली महत्त्वाकांक्षा बहुधा जाऊं दिली नाहीं. अन्य व्यवसायांतही महत्त्वाकांक्षेचें प्रमाण हें असेंच दिसून येतें. आजमित्तीस निरनिराळ्या प्रांतांत जेवढे हिंदु राजे, संस्थानिक आणि सरदार आहेत, त्यांची जातवार याद केल्यास असें दिसून येईल कीं हे बहुतेक **बडे लोक** निरनिराळ्या शूद्र जातींचे आहेत. यावरून असें सिद्ध होतें कीं केवळ धर्मशास्त्रदृष्ट्या ज्या **कनिष्ठ** जाति, त्यांसच व्यवहारदृष्ट्या **बडेपणा** ह्मणजे **वरिष्ठता** येण्याची शक्यता होती व आहे; आणि त्या शक्यतेचा त्यांनीं इंग्रजी राज्यापूर्वीं पुष्कळ फायदा करून घेतला, व हल्लींही तो करून घेण्याच्या प्रयत्नांतच त्या आहेत. आपली सात्त्विकवृत्ति चालविण्याच्या निग्रहानें ब्राह्मण लोक अद्यापिही पाश्चात्य राजस सुधारणेंत फारसे पुढें जाऊं शकत नाहींत; पुनः पुनः त्यांची पिच्छेहाट होते, त्यामुळें एकीकडे दारिद्र्य आणि समाधानवृत्ति त्यांस राखावी लागते. दुसरीकडे लोककल्याणेच्छा हें जें त्यांचें हजारों वर्षांचें कुलव्रत तें त्यांस सोडीत नाहीं,—त्यापायीं ते आपली हानि द्विगुणित करून घेतात. इतर अनेक मागसलेल्या जातींत आपआपल्या उत्कर्षाकरितां पैसा गोळा करून स्वजातीयांच्या उत्तेजनाचे प्रयत्न चालू आहेत; विद्वान् ब्राह्मणजातींत मात्र ते नाहींत, या आश्चर्यकारक स्थितीचें कारण हेंच कीं **व्यावहारिक स्वपरभाव** ब्राह्मणांच्या मनोदेवतेस पसंत पडत नाहीं. दारिद्र्य, राजप्रकोप, मत्सर, वगैरे अनेक कारणें,—जीं या स्वपरभावाच्या कल्पना उत्पन्न करितात,—त्या सर्वांचा पगडा ब्राह्मणांच्या अंतःकरणावर कांहीं केल्या बसत नाहीं. उत्क्रांतिमूलक तादात्म्यशक्ति, सात्त्विकवृत्ति, सर्वत्र समानदृष्टि, इत्यादि गुणांमुळें ब्रा-

ह्मणांचा हा असा स्वभाव झाला आहे; या स्वभावावरून त्यांचा प्राचीन इतिहास लक्षांत येण्यासारखा आहे, असें निर्विवाद सिद्ध होतें.

इंग्रजी राज्यापूर्वीं शूद्रांस ज्ञान नव्हतें ह्मणून त्यांनीं ब्राह्मणांचें वर्चस्व कबूल केलें व ब्राह्मण होण्याचा निकरानें प्रयत्न केला नाहीं, असें जे लोक प्रतिपादन करितात, त्यांनीं पेशवाईच्या अखेरपर्यंत ब्राह्मणांचें वर्चस्व कोणत्या प्रकारचें होतें हें मुळींच ओळखलेलें नाहीं असें दिसतें. हल्लीं शूद्रांमध्यें पुष्कळ विद्वान् लोक उत्पन्न झालेले आहेत; त्यांस आपले गुण, योग्यता व फायदा कशांत आहे तें कळूं लागलें आहे. इंग्रजी राज्याच्या पूर्वींचे ते तसे दिवस पुनः आल्यास, कोणीही विद्वान् शूद्र ' ब्राह्मण व्हा ' असा उपदेश आपल्या प्रिय बांधवांस करील काय ? पाश्चात्य सुधारणेच्या दृष्टीनें किंवा ऐहिक उन्नतीच्या हेतूनें, ब्राह्मण होण्यांत कोणता फायदा तो आपल्या बांधवांस दाखवूं शकेल ? ब्राह्मणांच्या विशेष गुणांवांचून नुसतें ब्राह्मण ह्मणवून घेण्यांत अर्थ नाहीं, हें सर्वांस कबूल आहेच; व ब्राह्मणांचे सात्विक गुण शूद्रांस, पूर्वीं, हल्लीं किंवा पुढें, फायद्याचे होण्याचा संभव नाहीं हें आतां स्पष्ट होत चाललें आहे. फायदा ऐहिक चिंतायाचा व गुण पारमार्थिक संपादायाचे, हें जुळेल तरी कसें ? व हीच असंभवनीय गोष्ट पूर्वींच्या ब्राह्मणांनीं शूद्रांच्या संबंधानें साध्य केली नाहीं ह्मणून त्यांवर अन्यायाचा आरोप आहे ! तात्पर्य हें कीं शूद्र लोकांत पाश्चात्य विद्येचा जों जों अधिक प्रसार होईल तों तों ' आह्मांस ब्राह्मण्य नको ' असें ते स्वतःच ह्मणूं लागतील. तसेंच, महार वगैरे ज्या जातींचें हल्लीं ख्रिस्ती लोकांशीं विशेष दळणवळण आहे व त्यामुळें पाश्चात्य सुधारणेच्या दृष्टीनें ज्यांस कांहीं विशेष फायदे होत आहेत, व पुढें अधिक होण्याचा संभव आहे, त्या जाति विद्वान् झाल्यास ' आह्मांस ब्राह्मण्य तर नकोच, परंतु कुणबीपणाही नको ' असें स्पष्ट सांगतील. सारांश, वरच्या जातींत शिरण्याची बुद्धि इतःपर कनिष्ठ जातींस होणें नाहीं. पाश्चात्य सुधारणेच्या मोहक फायद्यांमुळें हिंदु विद्वानांपुढें हल्लीं जे प्रश्न आले आहेत ते हे कीं,—ते फायदे संपादण्याकरितां ब्राह्मणांनीं शूद्र

व्हावें काय ? कुणब्यांनीं महार व्हावें काय ? महारांनीं ख्रिस्ती व्हावें काय ? ह्या पायऱ्या चढत्या आहेत कीं नाहीं ? व सर्वांनीं एकजातीय होणें, ह्मणजे क्रमाक्रमानें ख्रिस्ती होणें, श्रेयस्कर आहे कीं नाहीं ? वरिष्ठ जातींच्या हल्लींच्या एकंदर आचरणावरून व मानसिक महत्त्वाकांक्षेवरून पाहतां ही **उलट सुधारणा** करण्याची त्यांची तयारी दिसत नाहीं; व पाश्चात्य सुधारणेचे सर्व फायदे अन्य मार्गांनीं मिळाले तर बरं, नाहींतर त्यांची गरज नाहीं, असा त्यांचा निग्रह दिसतो. या निग्रहांत जातिभेदाचें व हिंदुधर्माचें बळ आहे, असें ह्मणणें भाग पडतें.

सर्व देशांत असा एक प्रकार दिसतो कीं वरिष्ठ वर्गांत शिरण्याची इच्छा, व तद्विषयक प्रतिबंधास अन्याय असें ह्मणण्याचा कोटिक्रम जे लोक करितात, ते बहुधा वरिष्ठ वर्गांत घालण्यास नालायख असतात; व जे लायख असतात ते बहुधा वर्गांतराची इच्छा करीत नाहींत; व जर त्यांस वरिष्ठ वर्गांत घातलें तर ते तो एक सामाजिक जुलूम समजतात, निदान त्यास बिलकूल महत्त्व देत नाहींत. **ग्लाड्स्टन्** यास **लॉर्ड** होण्याची कधींही इच्छा झाली नाहीं; वास्तविक पहातां सर्व लॉर्डांच्या वरची पदवी त्यास मिळावी इतकी त्याची योग्यता आहे. तो ह्मणे कीं ' स्वतः लॉर्ड बनण्यापेक्षां दुसऱ्यांस लॉर्ड करण्याची अंगीं योग्यता असणें यांतच अधिक भूषण आहे. ' इंग्लंडांतील मध्यम वर्गांतील व सामान्य प्रतीचे लोक ग्लाड्स्टन् लॉर्ड झाला नाहीं यांतच त्याची थोरवी मानीत आहेत, तो आगगाडीच्या कनिष्ठ वर्गाच्या डब्यांत बसे, यांतच खुष होत आहेत; व ग्लाड्स्टननें आपल्या मूळच्या वर्गांत रहावें व दुसऱ्या क्षुद्र लोकांनीं लॉर्ड व्हावें, हेंच योग्य असें समजत आहेत. या सर्व गोष्टींतील भावार्थ काय ? तसेंच, तुकाराम आणि शिवाजी यांनीं ब्राह्मण होण्याची कधींही इच्छा केली नाहीं. ब्राह्मणांपुढें नम्र होण्यांत आपली थोरवी कमी होत नाहीं, उलट, ती वाढते अशी त्यांची अंतर्यामीं समजूत होती. असें समजूं कीं हल्लींच्या ब्राह्मणांनीं, पूर्वींच्या आपल्या अन्यायाविषयीं खात्री होऊन, तुकाराम व शिवाजी यांस पुढें ब्राह्मण समजायाचें असा ठराव केला. हा ठराव थोर मराठे जातीच्या लोकांस

पसंत पडेल काय? आपल्या जातींतील हीं उत्कृष्ट रत्नें ब्राह्मणलोक हिरावून नेत आहेत, हा अन्याय आहे, असें जाणून ते क्रुद्ध होणार नाहींत काय? अमुक कचेरींतील पट्टेवाल्यांस ब्राह्मण करा, व तुकाराम आणि शिवाजी यांस मराठेच राहूंद्या, असें ते ह्मणणार नाहींत काय? सारांश, जोंवर योग्य उत्क्रांति आणि सात्त्विकवृत्ति झाली नाहीं तोंवर तामस गुणांमुळें जात्यंतराचे प्रतिबंध अन्यायाप्रमाणें भासतात; परंतु ती योग्यता अंगीं आल्याबरोबर 'नको जात्यंतर' असें वाटूं लागतें. ह्मणून जातिभेद मोडण्यास जीं विघ्नें आहेत तीं उत्क्रांतिमूलक आहेत, पूर्वसंस्कारजन्य आहेत, अनिवार्य आहेत, असें सिद्ध होतें.

जातिभेद मोडल्यानें देशांत एकोपा होईल, मग राजकीय उन्नति होईल, नंतर पाश्चात्य सुधारणा पूर्वेकडे वृद्धि पावेल, इत्यादि अनेक कल्पनांमुळें कित्येक लोक जातिभेदाचा नाश करूं पहात आहेत. परंतु **चीन, हिंदुस्थान,** वगैरे जुनीं राष्ट्रें सुधारणेच्या काळाच्या पुढें गेलीं आहेत, व त्यांतही हिंदुस्थान फारच पुढें गेलें आहे, ही गोष्ट कोणाच्या लक्षांत येत नाहीं. चीन देशांतील लोक एकजातीय आहेत, एकधर्मी आहेत, सर्वाहारी आणि सर्वोद्योगी आहेत व अद्यापि स्वराज्य अनुभवीत आहेत. याच सर्व गोष्टींच्या उणीवीमुळें आह्मी हिंदुलोक वर डोकें काढूं शकत नाहीं असें सर्व सुधारक प्रतिपादीत आहेत. त्यांनीं चीनच्या आणि युरोपीयांच्या निकट संबंधामुळें इतःपर ज्या घडामोडी होणार आहेत त्यांकडे लक्ष द्यावें; व जुनीं राष्ट्रें सुधारणाकाळाच्या पुढें गेलीं कीं नाहीं हें ठरवावें.

उत्क्रांतीच्या प्रमाणानें राष्ट्रांची भिन्न स्थिति असते. ज्ञानप्रसाराचा स्थितिभिन्नत्वामुळें राष्ट्रांवर भिन्न परिणाम होतो. **लुटालुटीच्या स्थितींत** असलेल्या राष्ट्रांत ज्ञान आणि कला यांचा प्रसार होतो तेव्हां क्रौर्याचीं, वीर्याचीं, धाडसाचीं व अशींच दुसरीं घातक कृत्यें करून संपत्ति मिळविण्याचा प्रयत्न लोक आरंभितात. **व्यापाराच्या स्थितींत** असलेल्या राष्ट्रांत ज्ञानप्रसार होतो तेव्हां हरएक प्रकारच्या उद्योगानें संपत्ति मिळविण्याकडे राष्ट्रीय प्रयत्न सुरू होतात. त्या उद्योगांतच क्रौर्य, वीर्य, धाडस वगैरे पूर्वींचे गुण प्र-

कट होतात. प्रत्येक वरिष्ठ उद्योग करणारास कनिष्ठ उद्योग करणारास पिळून काढून आपण संपत्तिमान् होण्याची प्रबळ इच्छा उत्पन्न होते. मनुष्यें विकून व्यापारांत पैदावारी होतेसें दिसल्यास त्या उद्योगासही मान येतो. जंगलें तोडून, प्राणी मारून, पक्ष्यांचें शोभिवंत पिसारे उपटून, गरीबांस गांजून व बलाढ्यांस संकटांत पाडून, व्यापारानें खूप संपत्ति मिळवायाची, अशी लोकांची प्रवृत्ति असते. तींतच ज्ञानाचा उपयोग होतो. **धार्मिक स्थितीस** येऊन पोहोंचलेल्या राष्ट्रांत ज्ञानप्रसार होतो, तेव्हां क्रोध व आवेश मंद पडतात, लोभ दुर्बळ होतो, संपत्तीचें महत्त्व कमी होतें, भूतदया वाढते व परमार्थदृष्टि बळावत जाते. शारीरिक सुखांचा साधेपणा व नियमितपणा आणि मानसिक व अध्यात्मिक सुखांकडे अधिक ओढा, अशी विद्वान् राष्ट्रीयांची स्थिति होते; व त्यांचें अनुकरण अविद्वान् लोक क्रमानें करीत जातात. इंग्रजी विद्येनें व इंग्रजांच्या सहवासानें जे परिणाम विद्वानांवर व्हावे ह्मणून प्रथमदर्शनीं वाटतें, ते आह्मां हिंदुलोकांवर कां होत नाहींत, या गोष्टी चें सयुक्तिक उत्तर आमच्या राष्ट्रीय स्थितीस, इतक्या शतकांच्या उत्क्रांतीनें, जें स्वरूप आलें आहे तें लक्षांत आणिलें ह्मणजे मिळतें. मनास आवेश चढून जर कोणतेंही एखादें कार्य विद्वान् हिंदूंकडून होण्यासारखें असेल तर तें विलक्षण उद्योगाचें नव्हे, व्यापारी धाडसाचें नव्हे, खूप चैनबाजीचें नव्हे, तर कुटुंबांत, ज्ञातींत आणि समाजांत क्रमानें धर्मप्रेमपरोपकार वाढवीत जाण्याचें होय.

या देशांत कायमचा जातिभेद केव्हां उत्पन्न झाला असावा, ह्मणजे देश राजस सुधारणेंतून वर येऊन सात्त्विक धार्मिक स्थितीस केव्हां पोहोंचला असावा हें सांगणें कठीण आहे. परंतु ही स्थिति या देशास फार प्राचीन काळीं आली असावी. ती ज्यावेळीं प्रथम आली त्यावेळीं सामाजिक आवश्यकतांस अनुसरून भिन्नभिन्न धंद्यांत व वर्गांत जी लोकसंख्या होती ती त्याच वर्गांत व धंद्यांत कायम राहून तितक्या जाति उत्पन्न झाल्या असाव्या. व्यक्तींस जात्यंतर करण्याचें नकोसें झालें असावें, व ‘ स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः ’ हें तत्त्व सर्वत्र मान्य झालें असावें. सोनार, सुतार,

लोहार, चांभार, महार वगैरे जातींचे लोक त्यांच्या त्यांच्या विशिष्ट उद्योगास लागायाचे त्याचप्रमाणानें आहेत, फारसे कमी किंवा जास्ती नाहींत, ही स्थिति पाहिली ह्मणजे, वरील गोष्टींचा थोडासा प्रत्यय येतो. इंग्रजी राज्याच्या पूर्वी जेव्हां परदेशाशीं व्यापार नव्हता, तेव्हां आपआपला धंदा करून सर्वांचें पोट भरत होतें; व असमाधान होण्यास कारण नव्हतें. सर्व स्वच्छ धंदे करण्याची पूर्वीपासून ब्राह्मणांस व शूद्रांस मोकळीक होती, व ह्मणूनच सतारी करणारे, मातीचीं चित्रें घडणारे, गानवादनादि कलांचा व्यासंग करणारे पिढीजात ब्राह्मण व कुणबी हल्लीं सांपडतात. कोणावरही स्वकीय वृत्ति सोडण्याचा पूर्वी बहुधा प्रसंग येत नसे; व जर आला तर एक धंदा सर्वांसच करण्याची मोकळीक होती. तो धंदा शेतीचा होय. ज्या कोणास शहरांत राहून योग्य उद्योगानें अन्न मिळण्याची मुष्कील पडे, त्यानें खेड्यांत जाऊन कृषिकर्मानें पोट भरावें. कोंकण प्रांतांत व इतर पुष्कळ ठिकाणीं संभावित ब्राह्मणकुटुंबें स्वतः शेतीचे श्रम करून निर्वाह करीत आहेत. आपला धर्म किंवा योग्यता न गमावितां जो एक धंदा सर्व जातींस करितां येतो तो शेतकीचा होय.

जातिभेद मोडण्याचीं हल्लीं कांहीं वरकरणी चिन्हें दृष्टीस पडं लागलीं आहेत; परंतु तीं आपद्धर्माचीं निदर्शक होत. तीं हृदयापर्यंत खोल जाऊन परिणाम करणारीं नाहींत; सात्त्विक वृत्तीस झांकणारीं आहेत, मोडणारीं नाहींत. स्पर्शास्पर्शविचार कमी होणें; शूद्राच्या हातचें अन्नपान करणें, वगैरे गोष्टी आपद्धर्मामुळें उत्पन्न झाल्या आहेत. **जातीजातींमध्यें विवाह होणें, विशेषतः प्रतिलोम विवाह होणें, हें जातिभेद मोडल्याचें खरें निदर्शक होय.** अशा विवाहांस समाज तयार होत आहे, असें जो दाखवील, त्यानें जातिभेद मोडण्याचा संभव सिद्ध केला असें ह्मणतां येईल. असा संभव हल्लीं मुळींच दिसत नाहीं व ह्मणून जातिभेदाच्या किंवा हिंदुधर्माच्या शाश्वतीस धक्का बसण्यासारखें अद्यापि कांहींएक घडलेलें नाहीं.

हा आमचा सनातन हिंदुधर्म व तन्मूलक जातिभेद यांनीं अनेक

मोठ्या भयंकर वावटळांतून आपला बचाव करून आतांपर्यंत आपलें अस्तित्व राखिलें आहे. जातिभेद मोडण्याच्या प्रयत्नांत बौद्ध धर्मानें हिंदुस्थानांतून पळ काढिला; व आपलया पराजयाच्या निदर्शक अशा पांच चार नव्या जाति ( बौद्ध, श्रावक, जैन, वगैरे ) मागें ठेविल्या. मुसलमानी धर्म दिन् दिन् करीत हिंदुस्थानांत शिरला व तरवारीच्या जोरानें हिंदुधर्माचा पाडाव करण्याचा त्यानें आव आणिला. कालगतीनें त्यानेंही माघार घेतली व तटस्थवृत्ति अंगीकारिली, किंबहुना, भयचकित होऊन स्नेहभावास तो राजी झाला. हल्लीं ख्रिस्तीधर्माच्या परीक्षेची वेळ आलेली आहे. राज्यसत्ता, शिक्षणपद्धति, शास्त्रकला, तत्त्वज्ञान, संपत्ति व इतर सर्व साधनें ख्रिस्ती धर्मास अनुकूळ आहेत. या अशा साधनांनीं जर त्याकडून हिंदुधर्माचा पाडाव झाला नाहीं, जातिभेद मोडला नाहीं, तर त्यावरून काय समजावें ? हिंदुधर्म भ्रमाचा भोपळा आहे ह्मणून ? कीं हिंदुधर्मांत कांहीं त्राण उरलें नाहीं ह्मणून? कीं हिंदुधर्म हा शुद्ध फापटपसारा आहे ह्मणून ? छे: छे: ! असले सिद्धांत काढीत बसण्याचा अविचार आतां सोडून देण्याची वेळ आली आहे. जर ख्रिस्तीधर्मानें हिंदुसमाजांत आणखी दहा पांच नव्या जाति मात्र ( गांवठी व मिश्र ख्रिस्त्यांच्या ) उत्पन्न केल्या, जर सुधारकांच्या प्रयासांनीं तशाच दोन चार ( ब्राह्मो, पुनर्विवाहित, वगैरे ) नव्या जाति उत्पन्न झाल्या, व एकंदरीनें जातिभेद मोडण्याच्या प्रयत्नांत या उभयतांनीं जातींची संख्या मात्र वाढविली, तर तो हिंदुधर्माचा विजयच समजला पाहिजे. जाति उत्पन्न होण्याचीं व कायम राहण्याचीं कारणें वरकरणीं कितीही असमंजस व दुर्बळ दिसलीं, तरी तीं उत्क्रांतिमूलक आहेत, तीं हिंदूंच्या हृदयांत खोल रुजलेलीं आहेत, तीं सात्त्विक वृत्तीच्या दृढ प्रेरणेचें प्रमाण दाखविणारीं आहेत, इत्यादि गोष्टी मान्य केल्यावांचून विचारी पुरुषास तरणोपाय नाहीं.

हिंदुधर्म आणि ख्रिस्तीधर्म यांचा जो हल्लीं सामना सुरू आहे, त्यानें हिंदुधर्माची ग्लानि जाऊन त्याचें चांगलें संशोधन होईल; व ख्रिस्तीधर्माच्या लोकांस भूतदया, आदिकरून अनेक सात्त्विक वृत्तींचा उत्तम बोध होईल. त्यामुळें ख्रिस्तीधर्माचें स्वरूप पुष्कळअंशीं संशोधित हिंदु-

धर्मासारखें होत जाईल. अशा परस्परोपकारित्वामुळें, अखेरीस, हजारों वर्षांपूर्वी विभक्त झालेल्या आणि भिन्न दिशेस लागलेल्या आर्यलोकांच्या पौरस्त्य आणि पाश्चात्य या दोन्ही शाखा, समान सात्विक वृत्ति अंगीकारून, जगांत स्नेहसंतोषानें वास्तव्य करितील. हिंदु आणि ख्रिस्ती या दोन धर्मांच्या सांप्रतच्या संग्रामाचा हा भावी शुभ परिणाम डोळ्यांपुढें आणिल्यास, चित्तास साहजिकपणें मोठा आनंद होतो.

## पूर्वार्ध समाप्त.

# उत्तरार्ध.

## भाग २९ वा.

### मी आधुनिक सुधारणेच्या अग्रस्थानीं जाऊन पडलों.

१७२. याप्रमाणें या क्षेत्रस्थानीं असतां मला सुसंगतीपासून पुष्कळ लाभ झाला. माझ्या पूर्वीच्या विचारांत पुष्कळ अंतर पडलें व त्यामुळें माझें वर्तनही बदलत चाललें. आणखी कांहीं दिवस या ठिकाणीं माझा वास झाला असता तर मी त्याच वेळीं दिगंबर महाराजांचा पक्का चेला बनलों असतों. परंतु माझी तेथें राहण्याची मुदत संपली व सासुरवाडीं भोजनभाऊ बनून किती दिवस रहायाचें हा विचार वरचेवर मनांत येऊं लागला. माझे मुलांस या नवीन प्रदेशाची हवा चांगली मानवली व कुटुंबाची इच्छा आणखी कांहीं महिने माहेरीं रहावयाची होती, त्यामुळें मला एकट्यालाच स्वदेशीं परत जाण्याची पाळी आली. तेव्हां मीं असा विचार केला कीं इतक्या लांब आल्यासारखें आजूबाजूच्या प्रांतांतील नामांकित शहरें पाहून मग स्वदेशीं परत जावें. असा विचार करून सर्वांचे निरोप घेऊन मी निघालों. हा प्रसंग मला किती जड वाटला व त्यामुळें मनास किती दुःख झालें, तें येथें सांगतां येत नाहीं. आल्या मार्गानें बैलगाडींतून स्टेशनावर परत येऊन, मी आगगाडींत बसलों. मी आतां जिकडे निघालों होतों तिकडील कांहीं शहरांची सामाजिक सुधारणेविषयीं मीं फार आख्या ऐकिली होती. त्या मध्यापासून सर्व हिंदुस्थानचे परिघापर्यंत सुधारणेचा प्रसार होणार असें कित्येक मित्रांनीं आवेशपूर्वक मला सांगितलें होतें. तेव्हां जेथें सुधारणेचा ध्वजस्तंभ फारच उंच रचिला गेला आहे तेथेंच प्रथम जावें असा मीं निश्चय केला व थोड्या कलाकांत त्या प्रसिद्ध स्थळीं जाऊन पोहोंचलों.

१७३. माझे कांहीं कालेजमधील जुने स्नेही त्या शहरीं होते, त्यांपैकीं एका भरभराटींत असलेल्या मित्राचे येथें मीं आपलें बिऱ्हाड ठेविलें. प्रवाशांच्या परिपाठाप्रमाणें प्रथम शहरांतील प्रेक्षणीय स्थानें पाहिलीं. नंतर मोठमोठ्या लोकांचीं दर्शनें घेतलीं, व गांवांतील राजकीय, सामाजिक व विद्याविषयक संस्था पाहिल्या. माझा मित्र तेथें वकील होता, त्यामुळें त्याच्या सर्वत्र ओळखी होत्या; सर्व संस्थांत त्याचें अंग होतें, सर्व गांवची उठाठेव त्याचे येथें चाले; मजसारख्या प्रवाशांबरोबर हिंडण्याचें काम त्यास वारंवार पडे; त्यामुळें माझ्या जाण्यापासून त्यास फारसा उपद्रव वाटला नसावा. धंद्याचे संबंधानें स्वतःच्या कामांत त्याचा बराच वेळ जाई; निरनिराळ्या सामाजिक चळवळींच्या संबंधानें खटपटींतही पुष्कळ वेळ जाई; स्वस्थ बसून विचार करण्याची त्याची संवय त्यामुळें मोडत चालली होती. तो ह्मणे—'आह्मी व्यावहारिक लोक, प्रत्यक्ष काम करून दाखवायाचा आमचा बाणा, तेवढ्या पुरतीच आमची सुविचाराची घमेंड. वास्तविक पहातां, आमच्याकरितां इतरांनीं आपले मेंदू खर्चून आह्मांस सुविचारांचें भांडवल पुरविलें पाहिजे, मग त्याप्रमाणें सुधारणा घडवून आणण्याचें काम आमचें. दोन्ही गोष्टी एकास अशा साधतील ? वाचनाचें, विचाराचें, ऊहापोहाचें काम आपणच करायाचें ह्मटल्यास त्यांतच सर्व वेळ जावयाचा; मग हातून काय होणार ? तेव्हां हा श्रमविभाग आहे. आह्मांस तुमच्यासारख्या विचारशील माणसानें सर्व 'केस' तयार मात्र करून द्यावी; मग आमचें पांडित्य पहावें. हजारों लटपटी करून कार्यसिद्धि करण्यास आह्मी मागें पुढें पहायाचे नाहीं! आमच्या दक्षिणी लोकांचा येथें एक तट आहे असें समजा. स्वदेशांत जें स्वातंत्र्य मिळायाचें नाहीं तें येथें आह्मांस हवें तितकें मिळतें; कारण या आमच्या तटांत फारशी फाटाफूट नाहीं; जें जें बोलायाचें तें तें प्रत्यक्ष करून दाखविण्यास आह्मांस येथें फारशीं संकटें येत नाहींत. सामाजिक सुधारणेचा येथें जो भक्कम पाया पडला आहे त्याचें इंगित हेंच होय.'

१७४. या सुधारणा कोणकोणत्या हें मीं आपले मित्रास विचारलें नाहीं; त्याचे येथें गांवांतील इकडची तिकडची बातमी देणारा

एक तरुण सुधारकशास्त्री होता त्याकडून सर्व माहिती मला मिळूं लागली. मी सुधारकांचे क्लबांतही नित्य जात असें, त्यामुळें नवीन विषयांची जी चर्चा तेथें चाले ती माझे कानीं पडे. दंगूशास्त्री सुधारकही तेथें नित्य येणारांपैकीं होता त्यास व आह्मांस सर्व वेळ मोकळा; त्यामुळें या रंगेल शास्त्र्याचा व आमचा बराच स्नेह जुळला, व अनेक गूढ संवाद होऊं लागले.

एके दिवशीं क्लबाचे बागेंत आह्मी उभयतां बसलों असतां दंगूशास्त्र्यास मीं प्रश्न केला कीं, 'शास्त्रीबोवा, तुह्मी या सुधारकांच्या तावडींत कसे सांपडलां ?' तेव्हां त्यानें आपला इत्थंभूत इतिहास मला सांगितला. तो ह्मणाला—

१७५. "आमचे वडील येथें एक प्रसिद्ध हरदास होते, ते वारल्यास पांचसात वर्षं झालीं. गाण्याचे कामांत व हरदासी नकलांत त्यांची कोणासही बरोबरी करितां येण्यासारखी नव्हती. त्यांची ती हरदासी वृत्ति मींही पुढें चालवावी या हेतूनें त्यांनीं लहानपणापासून मला संस्कृत भाषा व गाणें बजावणें पढविण्याचा क्रम सुरू केला. मजकडून कांहीं आख्यानें पाठ करविलीं व अनेक सुभाषितें शिकविलीं. सुमारें बारा वर्षांपासून मी वडलांचे मागें उभा राहूं लागलों. कथेमध्यें ठुमऱ्या वगैरे गाण्याचा प्रसंग मजवरच यावयाचा. याप्रमाणें क्रम वडील स्वर्गवासी होईपर्यंत चालला. तेव्हां माझें वय कायतें अठरा वर्षांचें होतें. इतक्या काळांत त्यांच्या सर्व नकला मला पाठ झाल्या व मजपाशीं शृंगारिक सुभाषितांचा पुष्कळ संग्रह झाला. परंतु तीं हरदासी आख्यानें माझे ध्यानांत राहीनात; व वडलांची वृत्ति चालविणें मला अशक्य झालें. वडील जिवंत असतांच तबलजी व सारंगीवाले यांचा आमचा बराच स्नेह जुळत चालला; व थोडें गांज्याचें व्यसन लागलें; त्यामुळें वडलांचे मागें दोनदोन प्रहर उभें राहिलें तरी शिणल्यासारखें वाटत नव्हतें; परंतु गाण्याच्या ताना ओढण्यापलीकडे कथाभाग फारसा ध्यानांत राहीनासा झाला. तबलजींच्या स्नेहाचा दुसरा एक जो फायदा झाला तो हा कीं, गांवांतील सर्व गाणाऱ्या कलावंतिणींच्या येथें गाण्याचीं बोलावणीं येऊं लागलीं

व स्वत: गाण्याचाही प्रसंग पडूं लागला. माझी व कित्येक चैनी सुधारकांची अशा प्रसंगांमुळें ओळख होत चालली. आमचें गाणें, आमचीं सुभाषितें, आमच्या नकला, सर्व त्यांस पसंत पडून सुधारक मंडळींत आमच्या गुणांची प्रशंसा होऊं लागली. 'प्राकृत' गाण्यांतही आह्मीं पुष्कळ प्रवेश केला व कांहीं प्रसिद्ध नायकिणींच्या चिजा हुबेहूब उठवून देऊं लागलों. त्यामुळें सुधारकांच्या 'पार्ट्या' झाल्या असतां आमचेंच गाणें होऊं लागलें. तुमचे मित्र तात्यासाहेब यांनीं माझे गुण पाहून मला हातीं धरलें. गांज्याची संवय फार निंद्य व हलकट असें त्यांनीं माझे मनांत पक्कें बिंबवून दिलें, व त्या व्यसनांतून सोडविण्याकरितां मद्याचें जें वरिष्ठ प्रतीचें सेवन तें मीं करीत जावें ह्मणून आग्रह धरिला. त्याचा परिणाम उत्तम घडला असें आतां माझें मलाच वाटूं लागलें आहे. पूर्वीं माझे डोळ्यांवर अक्षयीं धुंदी असे ती नाहींशी झाली; स्मरणशक्ति जात चालली होती ती परत आली; भाषणांत रसिकता नव्हती ती उत्पन्न झाली; व माझ्यावांचून मंडळीस करमणूक नाहीं अशी हल्लीं स्थिति आहे. यानंतर तात्यासाहेब यांच्या मुलांबरोबर मीं थोडेंसें इंग्रजी शिकून घेतलें. थोडें श्राद्धपक्ष, मंत्रतंत्र वगैरे भिक्षुकी ज्ञान संपादन केलें. माझी बुद्धि दिवसेंदिवस प्रज्वलित होत चालली; तीमुळें धर्मशास्त्रही कामापुरतें मला कळूं लागलें. हा माझा प्रक्रम पाहून मला शास्त्री ही पदवी मंडळींनीं दिली. त्यांच्याच आश्रयानें माझा चरितार्थ चालला आहे. 'खाण्यापिण्याची' पूर्ण दीक्षा आह्मांस मिळाली आहे. पुनर्विवाहाचे प्रसंगीं वैदिक, ज्योतिषी व उपाध्याय सर्व आह्मीच, व मंगलाष्टकाचे नवीन समयोचित श्लोक बनविणारे कविही आह्मीच. येथें सुधारकांचेंच राज्य आहे असें समजा. सुधारणेचा नवीन कांहीं बूट निघाला ह्मणजे नुसता शास्त्राधारच काढून आह्मी स्वस्थ रहात नाहीं; प्रसंगविशेषीं थोडा दंगाधोपा करण्यास देखील आमचें पाऊल पुढेंच असतें. ह्मणून आमचें नांव थट्टेनें दंगूशास्त्री असें ठेविलें आहे. तरी आतां पहिल्यासारखें शरीर राहिलें नाहीं. नाहींतर मी एकटा चार जणांस भारी होतों. भिक्षुकीचा धंदा आरंभिल्यापासून सर्व सुधारकांचे घरांत चुलीपर्यंत आमचा प्रवेश झाला आहे; घरांतील सर्व तंटेबखेडे

घुसफुस, थट्टामस्करी, ढंगडोहाळे आमचे दृष्टीस पडतात; व मंडळींत घरोघरीं काय गंमत चालू आहे ती गुप्त बातमी आमच्यावांचून कोणासही कळण्याचा संभव नाहीं. तुह्मी या बाबतींत माझें पुराण ऐकूं लागल्यास वर्षभर पुरेल इतक्या गमतीदार गोष्टी मला ठाऊक झाल्या आहेत. ”

१७६. सुधारकांच्या कुटुंबांतील व्यंगें ऐकण्याची मला मुळींच इच्छा नव्हती; याकरितां शास्त्रीबुवांचा हा इतिहास ऐकून घेतल्यावर मीं त्यांस जे प्रश्न विचारले ते असे कीं, आमचे दक्षिणेंत सुधारणेस जीं विघ्नें येतात तीं इकडे कां येत नाहींत ? सुधारणेचे मार्ग तरी कोणते आहेत ? खटपट तरी कशी करितात ? या प्रश्नांस शास्त्रीबुवांनीं फारच थोडक्यांत उत्तर दिलें. ‘सुधारणेचा सौदा पैशानें होत असतो. पैशापुढें सर्व विघ्नें पळ काढतात.’ हें आपलें उत्तर माझ्या गळीं उतरत नाहींसें पाहून त्यांनीं त्याच्या समर्थनास आरंभ केला.

“ अहो, येथील सुधारक क्लबाचें असें मत आहे कीं, सर्व हिंदुस्थान दहा पांच वर्षांत सुधारून टाकितां येईल, पैसा मात्र पुरविणारा कोणी पाहिजे. हिंदुस्थानांतून विलायतेंत जाण्याचा खर्च हल्लीं अतोनात आहे, त्यामुळें सुधारणा लवकर होऊं शकत नाहीं. परंतु राष्ट्रीय खर्चानें कांहीं मोठमोठ्या आगबोटी चालू ठेविल्यास व ज्या कोणास विलायत पहायाची इच्छा असेल त्यास ती फुकट दाखवून आणायाची तजवीज केल्यास, दरमहा हजारों लोक विलायत पाहण्यास निघतील. मग खाणेंपिणें आगबोटीवर, तेथें कशाचा विटाळ व कशाचें सोंवळें ! विलायतेंत राहणें, तेथें मद्यमांसाची गोडी लागण्यास उशीर किती ? तेथील थंड हवेस योग्य असा पोषाख करूं लागल्यावर, शेंडी जाऊन लवकरच ख्रिस्त्यासारखें डोकें होईल व कदाचित् हनवटीवर दाढी वाढेल. तेथील लोकांचे आचारविचार पाहिल्यावर या वेडगळ स्वधर्माचा नाश होण्यास क्षणमात्र उशीर लागणार नाहीं. इंग्रजी सुधारणेचें ढळढळीत चित्र डोळ्यांपुढें उभें केल्यावर, पुनः रानटी स्थितींत कोण येऊं चाहील ? मुंबईस जी विलायती सुधारणेची अंधक छाया दिसते तिनेंही केवढा परिणाम होतो हें पाहिल्यास, प्रत्यक्ष विलायत पाहिल्याचें श्रेय अवर्णनीय हो-

ईल हे सांगायास नको. तेव्हां पैसा पाहिजे; ह्मणजे सर्व सुधारणा सुलभ आहेत. वरील उपायांनीं या देशाची सर्व प्रजा सुधारण्यास किती पैसा लागेल व किती वेळ लागेल हें ठरविणें कायतें गणिताचें काम आहे. शक्यतेचा संदेहच नाहीं.

१७७. " 'लोभमूलानि पापानि'—तुमच्या दक्षिणेंतील लोक लोभी फार, त्यामुळें त्यांच्या हातून सुधारणा होत नाहीं. परोपकाराच्या त्यांच्या वल्गनामात्र ऐकून घ्याव्या, हातून कवडी सुटायाची नाहीं! अशानें कोठें देशाचा उद्धार होतो काय? येथील वरीच मंडळी पैशानें गब्बर असून, पैशाची त्यांस गुमान नाहीं. 'सर्वे गुणाः कांचनमाश्रयंति।' तुह्मी घरीं गाडी ठेवा, ह्मणजे बायकांची तेव्हांच लाजलज्जा जाते, व तुह्मांबरावर उत्तम पोषाख करून त्या पाहिजे तेथें हवा खायास तयार होतात. अंगावर यथास्थित भपकेदार डागिने असूं द्या, मग त्या कलकत्त्यास जाऊन तेथील कांग्रेसच्या प्लाटफार्मवर बसून लोकांचे डोळे गार करितील. घरीं कांहीं काम नसूं द्या, मुलें असलींच तर दायांचे स्वाधीन करून द्या; मग दुपारभर नॉव्हेलें वाचून कंटाळल्यावर, चहा पिऊन, जांभया घालवून, बूटस्टाकिन् चढवून आपोआप तुह्मांबरावर त्या हिंडाफिरायास येतील, पाहिजे तर क्लबांत बाड्मिंटन् खेळतील; किंवा आपलाच निराळा क्लब स्थापून व्याख्यानें देत बसतील. पैशाचा खेळ अजब आहे! नाहींतर या आमच्या मठ्ठ बायका संगीताचीं पदें वगैरे गावयास शिकतील काय? किंवा थोडेंसें इंग्रजी शिकून कोकिळेच्या स्वरानें 'ओ माय् डीयर!' असें ह्मणून पुढें पुढें नाचतील काय? कुटुंबाकुटुंबांतील स्त्रीपुरुषें एकत्र जमून रात्रीं ब्रिझिकचे डावांवर जुगार चालेल काय? पण तुह्मी इंग्रजींत ह्मणतांना कीं पैशानें घोड्या देखील चालतात? तें अगदीं सत्य आहे. या घोड्यांस.......... "

स्त्रियांच्या सुधारणेविषयीं बोलत असतां त्यांविषयीं या सुधारक शास्त्र्याचे हे जे अश्राव्य उद्गार निघत होते, त्यांवरून सुधारलेल्या स्त्रियांबद्दल पंचतंत्रांत वर्णिल्या प्रकारचीं त्याचीं मतें आहेत असें जाणून मला आश्चर्य वाटलें. या ठिकाणीं बापूसाहेब हजर असते तर 'शिव शिव!' ह्मणून कानावर हात ठेवून ते एकदम चालते झाले

असते. परंतु मला तसें करितां येईना. माझे मनांत त्यावेळीं जी कुत्सित जिज्ञासा उत्पन्न झाली तीमुळें मी स्तब्धपणें त्याचें बोलणें ऐकत राहिलों. याबद्दल मला मागून फार वाईट वाटलें. ज्यांच्या संगतींत हा गृहस्थ वाढला व ज्या लोकांशीं याचा परिचय, त्यांची सामाजिक स्थिति त्याच्या त्या टीकेवरून स्पष्ट होते असें ह्मणावें तरी कसें ? व्यवसायानुसार याची एकपक्षीय दृष्टि आहे, असें मनांत समजून मी गप्प राहिलों. त्याचें चऱ्हाट चाललेंच होतें.

१७८. " तुह्मी पुष्कळसे टके मोजण्यास तयार आहां असें एकदां बाहेर पडूं द्या, मग तुमची काळी सांवळी सोळा वर्षांची मुलगी पाहून चांगले सुशिक्षित ग्राजुएट अगदीं ' वेडावुनि हा गेला ! ' असें स्वरूप आणितील.

" मुली वाढवून, चांगल्या सुशिक्षित करून त्यांचीं पुढें लग्नें करायाचीं इतकी आमच्या मंडळीची तयारी झालेली आहे; परंतु खरें अन्वर्थक स्वयंवर कसें व्हावें, ह्मणजे अनेक तरुणांकडून प्रेमाकर्षणाचा ( किंवा कोर्ट्‌शिप्‌चा ) प्रयत्न झाल्यावर तरुणीनें आपला पति पसंत करून घ्यावा, ही पद्धत कशी सुरू करावी या विचारांत मंडळी पडली आहे. या प्रश्नाचें त्यांस कांहीं चांगलें उत्तर सुचत नाहीं. याचें कारण हेंच कीं तरुण मुलींस असल्या गोष्टी अनुकरणानें येतात; परंतु येथें ही तऱ्हा मुळींच पाहण्याची संधी येत नाहीं, तेव्हां प्रेमाकर्षणाच्या प्रसंगीं कसें वागावें, कोणते हावभाव करावे, वगैरे कांहींच मुलींस समजत नाहीं. त्यांस लग्न इतकें लांबलें हाच मोठा जुलूम वाटत असतो. तरुणांचीही तीच स्थिति. उभयतांनीं एकमेकांस पाहिलें कीं एकदम खडीसाखरेसारखीं तीं विरघळतात, व प्रेमाकर्षण कशाचें, प्रेमपाझर सुटून ' तूं माझा नवरा, मी तुझी बायको ! ' अशी एकदम प्रतिज्ञा होऊन जाते. एका ठिकाणीं ही गोष्ट प्रत्यक्ष पाहिली त्यावरून मी तुह्मांस सांगत आहें; माझ्याच मनची ही कल्पित कादंबरी आहे असें समजूं नका. आमच्या मुली मुग्ध, मुग्ध, मुग्ध ! दुसरें काय ह्मणायाचें ?

१७९. " आमचे परम सन्माननीय मित्र विद्वन्मणि हे विलायते-

हून मोठ्या हुद्याची जागा मिळवून शहराबाहेर बंगला घेऊन राहिले; व आपले कुटुंबाचीं कोण कोण माणसें आहेत त्यांचा तपास करितां एक म्हातारीशी आई व दहा बारा वर्षांची बहीण यांचा पत्ता लागला; तेव्हां त्यांचा त्यांनीं बंगल्यांत संग्रह केला. आपणास हवी तशी सुंदर, सुकुमार, सुशिक्षित, सुशील, वयांत आलेली प्रथम वधू हिंदुसमाजांत मिळायाची नाहीं असें जाणून त्यांनीं स्वतःचे लग्नाचा विचारच सोडून दिला व हिंदुसमाजाची ही न्यूनता दूर करण्यासाठीं बंधुप्रेमानें आपल्या भगिनीस सुशिक्षित करण्याचा निश्चय केला. तिचें नांव एंजालिका ( ह्मणजे देवसुंदरी ) असें ठेविलें. स्वतः त्यांचें इंग्रजीचें ज्ञान उत्तम, गणितांत हात खंडा, जातीनेंच शिकविण्याचें मनावर घेतलेलें, त्यामुळें एंजलिकेचा दोन तीन वर्षांत फारच विद्याभ्यास झाला. इंग्रजी फाकडें बोलायास लागली; गाणें व टापटीप मडमेपाशीं शिकली; चहा, काफी, उत्कृष्ट करूं लागली; मंडळींत धीटपणें, पण सभ्यपणें, येऊन बसणें, हावापाण्याबद्दल व वर्तमानपत्रांतील स्फुट विषयांवर संभाषण करणें, वगैरे इंग्रजी चाली बेमालुमपणें तिनें उचलल्या. वय सुमारें पंधरा वर्षांचें होत आलें, परंतु साहेबांस त्याची काळजीच नाहींसें पाहून म्हातारीच्यानें राहवेना, तिनें एके दिवशीं शिव्यागाळी करण्यास आरंभ केला. बहिणीचा विवाह स्वयंवर-पद्धतीनें प्रेमाकर्षणानंतर व्हावा ही त्यांची इच्छा; व स्वजातीयाशीं व्हावा हा विलक्षण आग्रह! नाहींतर इतर जातीचे हिंदु पाहिजे त्या शर्तीवर हें स्त्रीरत्न उडवून नेण्यास तयार होते. स्वजातींत श्रीमंतांचीं मुलें पाहूं लागले तों सर्व विवाहित. तेव्हां आपल्या एका मध्यम स्थितींतील मित्राचे पुत्राकडे त्यांची नजर गेली. तो मुलगा आपल्या बहिणीहून कायतो दीड दोन वर्षांनीं मोठा, परंतु उंच, देखणा, बुद्धिमान् व तडफदार असा पाहून, याची विद्या पूर्ण झाल्यास हा ठीक वर होईल असें त्यांस वाटूं लागलें. तो त्या वेळीं इंग्रजी सहावी यत्ता शिकत होता. त्यानें प्रेमाकर्षण केलें पाहिजे व आपणास वरवून घेतलें पाहिजे ही मात्र त्यांची आट होती.

" प्रेमाकर्षण हा शब्द त्यांनींच काढला, कारण ते ह्मणत, प्रे-

माचे नियम गुरुत्वाचे नियमांप्रमाणें किंवा चुंबकाचे नियमांप्रमाणें सर्वथैव आहेत. ह्मणून निर्जीव पदार्थांत जसें गुरुत्वाकर्षण किंवा चुंबकाकर्षण, तसेंच सजीव प्राण्यांत प्रेमाकर्षण होय. सांनिध्याच्या वर्गाप्रमाणें प्रेम वाढतें व दूरत्वाच्या वर्गाप्रमाणें तें कमी होतें. यास्तव हा आपण पसंत केलेला वर नजीक नजीक आणीत गेलें पाहिजे. एंजलिकेस तो पसंत पडल्यास त्यास घरजांवईच करूं, त्याची घरची श्रीमंती नाहीं तर आपण ती पुरवूं, विलायतेंत पाठवून त्याची विद्या पुरी करवूं, आपणांस बहिणीवांचून दुसरें कोण आहे ! या हेतूनें त्यांनीं एके दिवशीं पुरुषोत्तमास घरीं बोलाविलें. व बहिणीकडून चहा वगैरे करविला. नंतर अभ्यासाविषयीं थोड्या गोष्टी झाल्यावर, कांहीं चित्रांचीं पुस्तकें टेबलावर होतीं तीं दाखवून उद्दिष्ट वधूवरांत मार्मिकपणा किती आहे, अभिरुचि कितपत जुळतात, हें त्यांनीं पाहिलें. मग बुद्धिबळाचा डाव मांडला. पुरुषोत्तम एका बाजूस व बहीण आणि आपण दुसऱ्या बाजूस. असा थोडा वेळ डाव झाल्यावर आपण कामाचे निमित्तानें बाहेर निघून गेले. पुरुषोत्तमास बजाविलें कीं वेळ लागल्यास फिकीर नाहीं, निकरानें डाव चालू दे. मी घरीं आल्यावर काय झालें तें मला सांग.

"दोघेजण एकांतांत सांपडतांच त्यांचें हिंदुत्व त्यांत अवतरलें, सर्व धीटपणा व तडफ नाहींशीं झाली. क्षणभर दृष्टादृष्ट होतांच दोघांनीं खालीं बुदबळाकडे पाहूं लागावें. बोलणें बंद झालें. कोणीं कोणाचें प्यादें-मोहोरें घेतलें ह्मणजे दृष्टादृष्ट झालीच तर थोडें मंदस्मित करून पुनः त्यांनीं ओंठ दाबून धरावे. परंतु एंजलिकेनें डाव देण्याकरितां खालीं नजर लाविली कीं, पुरुषोत्तमानें तिच्या चेहऱ्याकडे टक लावावी व डावाचें भान त्यास राहूं नये. तिचें सर्व सौंदर्य तिला न कळत डोळ्यांनीं पिण्याचा त्याचा सपाटा सुरू व्हावा. तशीच त्याची नजर डावाकडे लागून तो विचार करीत असतां, एंजलिकेनें त्याचेकडे टक लावून बसावें व त्याचें तें कोंवळ्या तारुण्यांतील स्वरूप व ऐट पाहून गार व्हावें. याप्रमाणें दोघेही परस्परांकडे पहात होते, तथापि प्रत्येकास वाटे कीं हें आपलें कृत्य दुसऱ्याच्या कळण्यांत येत नाहीं. प्रत्येकानें मोठें दक्ष असावें, कारण न जाणो

कोणीं एकानें चटकन् मध्येंच वर पाहिलें तर! परंतु सर्व दक्षता व्यर्थ होती. एकाचे डोळे खालीं व दुसऱ्याचे वर होण्याचे संधीस अवश्य नजरानजर व्हावी. डावांत रहस्य राहिलें नाहीं. घटकाभरानें तो संपला. पुरुषोत्तमानें कुरजी केली. साहेब परत आले नव्हते, तेव्हां चोरट्या हातानें कसा तरी शेकह्यांड करून 'गुड् इव्हिनिंग्' ह्मणून तो निघून जाऊं लागला. तेव्हां मात्र एंजलिकेस अवघड वाटून तिनें मोठ्या जुलमानें दोन शब्द उच्चारिले–

'साहेब येईपर्यंत वाट नाहीं का पहात?'

'छेः, मला उशीर झाला, बाबा काय ह्मणतील!'

'मग चहा, फराळ कांहीं तरी करून जा.'

'छेः, मला आतां उद्यांच्या अभ्यासाची काळजी पडली आहे, मला जाण्याची परवानगी द्याल तर मजवर उपकार होतील.'

'बरें, पण उद्यां तरी याल ना?'

'उद्यां शाळा आहे, मधल्या सुटींत आलों तर येईन.'

'कसेंही करून या, साहेब तुमची वाट पहात राहतील.'

'बरें, बरें, गुड् इव्हिनिंग्.

असें ह्मणून पुरुषोत्तम निघून गेला. त्यासही तें अवघडच वाटलें, परंतु त्याच्या आग्रही स्वभावाचा त्यावर अंमल चालला. करीन ह्मटल्यावर तें केलेंच पाहिजे.

"परंतु घरीं आल्यावर स्काटचें नाव्हल तो शिकत होता तें त्याच्या डोळ्यांपुढें दिसूं लागलें. 'ही माझी लेडी, मी इचा नाइट,' हा त्याचा निश्चय झाला; ध्यानीं मनीं तिचा विचार, अभ्यास सुचेना, कांहींएक सुचेना. जेवायास बसला तरी शुद्धीवर कोठें आहे! अंथरुणावर पडला तरी झोंप कोठें आहे! त्या रात्रीं त्यानें किती निश्चय केले असतील तें सांगतां येत नाहीं! 'लग्न करीन तर एंजलिकेशीं करीन, इतर स्त्रिया मायबहिणी. इच्याकरितां प्राण देईन, इचा दास बनून राहीन. देवा माझ्या धैर्याची पारख होण्याचा कांहीं चमत्कारिक प्रसंग आण. माझें हें अंतःकरण तिला कसें उघडें करून दाखवूं! उद्यां गांठ पडणारच, तेव्हां आजच्यासारखें मौन धरायाचें नाहीं.' ही जी पुरुषोत्तमाची दशा झाली तशीच तिकडे

एंजलिकेची झाली. परंतु ती तिनें साहेबांचे नजरेस पडूं दिली नाहीं. ' हाच नवरा मला योग्य. श्रीमंत नसला तर काय झालें? पुढें होईल. साहेबांची संपत्ति कोणास द्यावयाची आहे? आह्मांस कांहीं कमी पडणार नाहीं. आमचा आहे असा थाट चालेल. ' याप्रमाणें ती विचार करीत राहिली.

" दुसरे दिवशीं सुट्टीच्या वेळीं पुरुषोत्तम येतो तों चहा, बिस्किटें, फळफळावळ टेबलावर तयार ठेवून एंजलिका वाटेकडे डोळे लावून बसली आहे असें त्याच्या दृष्टीस पडलें. साहेब घरीं नव्हतेच, त्यांची आफिसांत जाण्याची ती वेळ, ते तेव्हां घरीं कोठून असायाचे ! दोघेंही चहा पीत असतां साहेब काय ह्मणाले वगैरे गोष्टी सुरू झाल्या. पहिल्याइतकी भीड उरली नाहीं. सुट्टी संपण्याची वेळ झालीसें पाहून पुरुषोत्तम मोठ्या कष्टानें निघून गेला.

" पुढें दररोज सुट्टींत चहा पिण्याचें हें त्याचें ठिकाण झालें. साहेबांस ही सर्व हकीकत कळून, परीक्षा पास झाल्यावर लग्न करायाचें ह्मणून त्यांनीं ठरविलें. त्यांत एक विघ्न आलें. मुलास घरजांवई करणार ह्मणून साहेबांचा हट्ट. आपल्या कुळास ही गोष्ट कमीपणा आणणार, ह्मणून पुरुषोत्तमाचे आप्तांचा ग्रह; ते घरजांवई करूं देण्यास कबूल होईनात. अखेरीस साहेबांस हार खावी लागली; कारण दुसरा वर मिळण्याची मुष्कील, व एंजलिकेनें तर प्रतिज्ञाच केली कीं, आतां माझें प्रेम फिरायाचें नाहीं. अखेरीस कसें तरी लग्न उरकलें; परंतु साहेबांचे मनांत रोप उत्पन्न झाला व तो शेवटपर्यंत कायम राहिला. त्यांनीं पुरुषोत्तमास घरीं येण्याचें बंद केलें. कारण एंजलिकेस ऋतु प्राप्त झाला होताच, व पुरुषोत्तम तिच्याशीं संघट्टन करूं लागल्यास त्याचा अभ्यास बुडेल व बालविवाहाचे सर्व दुष्ट परिणाम उपस्थित होतील, अशी त्यांस भीति वाटूं लागली.

" साहेबांचें मत कीं स्त्रीच्या अवयवांची पूर्णावस्था एकोणिसावे वर्षीं होते, तोंपर्यंत एंजलिकेस पुरुषाचा स्पर्श होऊं द्यायाचा नाहीं; तीस त्या भिकारी सासरीं पाठवायाची नाहीं; पुरुषोत्तमानें विद्या पूर्ण करून संसारापुरते पैसे मिळवूं लागावें व मग बायकोस घेऊन जावें. बिचारा पुरुषोत्तम कालेजांत दूर देशीं जाऊन राहिला. एंजलिकेची

त्यास रोज पत्रें येऊं लागलीं. तिचें दु:ख त्यास पाहवेना. ती क्रूर भावाच्या ताब्यांत, त्याच्या अंत:करणास द्रव येईना. तव्हां करतो काय? इकडे एंजलिकेची प्रकृति हळूहळू विघडत चालली. तिची झोंप विलकुल गेली. क्रमानें तीस अपस्मार वायु झाला; डाक्तर लोकांनीं पाहिजे तेवढे उपाय करून पाहिले, परंतु कांहीं उपयोग झाला नाहीं. पतिसमागमाखेरीज हा रोग हटणार नाहीं असें देशी व इंजग्री डाक्तरांनीं सांगितलें; परंतु तें साहेबांस मान्य होईना. एंजलिकेची प्रकृति दिवसानुदिवस इतकी क्षीण होत चालली कीं ती जगते कीं मरते अशी शंका सर्वांस येऊं लागली. तव्हां शेवटीं एक दिवस पुरुषोत्तम आला व मोठा तंटा करून बायकोस गाडींत घालून घेऊन गेला. एंजलिकेस त्यानंतर हळूहळू गुण येत चालला; ती गरोदर झाली; परंतु पुत्रजन्माचे वेदनेंतच तिनें प्राण सोडिले. याप्रमाणें ही प्रेमाकर्षणाचे प्रत्यक्ष प्रयोगाची हकीकत आहे. पुरुषोत्तम अर्ध वेडा होऊन जगाचे पाठीवर फिरत आहे. त्याची सर्व सुधारणा नाहींशी होऊन, योग साधावा, तप करावें, अन्न सोडावें, अशा नानाप्रकारच्या विचारांत त्याचें आयुष्य व्यर्थ जात आहे.

१८०. " ही प्रेमाकर्षणाची सुधारणा फार अवघड आहे असें या इतिहासावरून तुमच्या ध्यानांत आलेंच असेल. ही सुधारणा सुसाध्य करून टाकण्याच्याच विचारांत हल्लीं आमची मंडळी आहे. प्रेमाकर्षणाचे प्रसंगीं स्त्रीपुरुषांनीं कसें वागावें याविषयीं कांहीं नियम असावे असें ठरून ते तयार करण्याचें काम एका मार्मिक गृहस्थानें आपणांकडे घेतलेलें आहे. हे नियम प्रथम विधवाविवाहांत अमलांत आणायाचे, असा उद्देश आहे. जीं द्वितीय वधूवरें नियमांअन्वयें परस्परांचें मनोवेधन करितील त्यांस मोठें बक्षीस द्यावें व त्यांचा मान इतर पुनर्विवाहितांपेक्षां अधिक राखावा अशी मंडळीची इच्छा आहे. परंतु आधीं विधवाविवाहाचे प्रसंग थोडे व तेही तिऱ्हाइतांकडनच घडवून आणावे लागतात; वधूवरांची आवडनिवड नांवाचीच; पैसेवाल्यांत ते होऊं शकत नाहींत, इत्यादि अनेक अडचणी तूर्त सुधारक मंडळींस जाचत आहेत. देशाचें दुर्भाग्यच जबर, नाहींतर खुद्द सुधारकांच्या घरांत तरुण विधवांचा कां दुष्काळ असावा ? इच्छा

आहे तेथें विधवा नाहींत, विधवा आहेत तेथें इच्छा नाहीं, अशी कांहीं विपरीत स्थिति दृष्टीस पडते, तीस काय करावें ? बरें, वयांत आलेल्या मोठाल्या अविवाहित मुली देखील कोणाचे घरांत दिसत नाहींत. कारण, सुधारकांची ही नवीताजी पिढी आहे. यांच्या घरांत मोठीं मुलें व मुली होण्यास हे म्हातारे तर झाले पाहिजेतना ? ”

---

# भाग ३० वा.

## केवळ पैशानेंच साध्य अशा सुधारणा इष्ट आहेत काय ?

१८१. हा आमचा संवाद संपला नव्हता, इतक्यांत कोणीं क्लबांतून ‘ मिस्टर् शास्त्रि ’ ह्मणून हाक मारिली, तेव्हां तो शब्द ओळखून शास्त्री पळतच क्लबांत गेला; व मी एकटाच क्लबाचे बागेंत विचार करीत हिंडू फिरूं लागलों. पैशाचा व सुधारणेचा किती निकट संबंध आहे हें या वेळपर्यंत माझे मनांत कोणीं चांगलें भरवून दिलेलें नव्हतें. तें आतां पक्कें बिंबलें. सुधारणेस विघ्न कायतें आमचें दारिद्र्य आहे, हा सिद्धांत इतका स्पष्ट असतां तो मला पूर्वीं कसा सुचला नाहीं याचें मलाच आश्चर्य वाटलें. पार्शी लोकांची सुधारणा इतक्या झपाट्यानें होण्याचें कारण त्यांची संपत्ति असें आतां माझे लक्षांत आलें. याशिवाय, पार्शी लोकांस आणखी कित्येक गोष्टी अनुकूल आहेत त्याही लगेच मला सुचत गेल्या. पार्शी लोक पहिल्यापासून व्यापारी, व व्यापाऱ्यांचे खरे गुण त्यांमध्यें पिढ्यानूपिढ्या बाणलेले होते. जेव्हां इंग्रज लोकांचा अंमल येथें सुरू झाला, तेव्हां ज्या लहानशा समाजास राज्यकर्त्यांचें अनुकरण करून त्यांसारखें तत्काळ होतां येण्यासारखें होतें, तो समाज एक पार्शांचा मात्र होता. क्रयविक्रयाच्या कामीं गुजराथी किंवा मारवाडी किंवा मुसलमान यांस जे धर्माचे प्रतिबंध आहेत ते

पार्शांस नव्हते. मद्य, मांस, पाव, बिस्किटें, सर्व कांहीं पदार्थांचा व्यापार त्यांस करितां येऊं लागला; हे पदार्थ स्वत: तयार करून विकण्यासही त्यांस हरकत नव्हती. ख्रिस्ती व्यापारी व पार्शी व्यापारी यांमध्यें व्यापाराचे कामीं भेद नव्हता. ही स्थिति दुसऱ्या कोणत्याही हिंदु जातीस नव्हती; मुसलमानांस ती पुष्कळअंशीं होती, परंतु तसे व्यापारी गुण त्यांत नव्हते. या कारणानें पार्शी लोक सर्वांचे पुढें गेले. त्यांचा समाज लहान व आटोपसर, तेव्हां तो सर्व एकदम नव्या मार्गानें सुसंपन्न होण्याची शक्यता होती. इतर नेटिव्हांमध्यें असा दैवशाली वर्ग दुसरा नव्हता व अद्यापिही नाहीं. मारवाडी, गुजराथी, भाटे, वगैरे लोकांनीं मद्यमांसादि विकण्याचा परिपाठ सुरू करून हाटेलें वगैरे स्थापित केल्यास पार्शी लोकांची संपत्ति बरीच डळमळीत होईल यांत संशय नाहीं. परतु जोंवर मारवाड्यांची व्यापारबुद्धि व ख्रिस्त्यांची स्वतंत्रता, हे दोन्ही गुण एका हिंदुजातींत उत्पन्न होणार नाहींत, तोंवर पार्शांची संपत्ति कायम राहणार यांत शंका नाहीं. तीस विघात आल्यास तो त्यांचीच प्रजा वाढून यावयाचा. परंतु पार्शीलोकांबद्दल विचार करण्यांत फायदा काय ? ते एतद्देशियांशीं धर्मानें बांधले गेलेले नाहींत. सामाजिक उत्क्रांतींत ते हिंदूपेक्षां मागें आहेत. द्रव्यलोभानें आमच्यापासून अलग राहण्याचा जा त्यांचा बाणा दिसतो, त्यावरून ते विदेशीयच समजले पाहिजेत.

आपल्या स्वदेशीयांचा विचार करितां, त्यांचें दारिद्र्य अनिवार्य आहे. त्यांस वेळेस धर्मप्रेमानें आवेश चढेल, परंतु धनलोभानें चढावयाचा नाहीं. मारवाड्यांसही मद्यमांसांचा विक्रय मनुष्यत्वाची हानि करणारा वाटतो; त्यांमध्यें केवढाही विलक्षण द्रव्यलोभ असला तथापि ते या नीच व्यापारास प्रवृत्त होत नाहींत. इतर वर्ग तर व्यापार करणें हेंच कानिष्ठ प्रतीचें समजतात. श्रमानें किंवा गुणानें त्यांस द्रव्य मिळविलें पाहिजे; व तें पुष्कळसें मिळण्याचा संभव नाहीं. मिळालें तरी त्याची शाश्वती नाहीं. तेव्हां बहुजनसमाजाची दरिद्रता अवश्य ध्यानांत ठेवून सामाजिक सुधारणा आरंभिली पाहिजे. यावेळीं मला एक शंका सुचली ती ही कीं, जे लोक हल्लीं या

ठिकाणीं एवढे सुधारणेचे कट्टे भक्त आहेत त्यांची सुसंपन्न स्थिति किती पिढ्या चालण्यासारखी आहे ? कारण द्रव्यमूलक सुधारणा द्रव्याबरावरच लुप्त होणार; तशी ती लुप्त झाली नाहीं, तर आपत्तींत पडलेल्या कुटुंबांस ती दुःखदायक मात्र होणार; व ती सुधारणा आणि तें कुटुंब दोन्ही त्या योगें नष्ट होणार. हा असा सामान्य नियम आहे. या शंकेमुळें शास्त्रीबुवांची पुनः गांठ पडल्यावर सुधारलेलीं कुटुंबें किती पिढ्या संपन्न स्थितींत राहण्याचा संभव आहे याविषयीं माहिती काढायाची असें मीं मनांत ठरविलें.

१८२. मोठ्या समाजांत कांहीं थोड्या व्यक्ति सुधारून फायदा आहे कीं तोटा आहे हा दुसरा विचार माझे मनांत येऊं लागला. व्यक्तींची सुधारणा, जी त्यांच्या कुटुंबांत देखील दोन तीन पिढ्या कायम राहण्याचा संभव नाहीं, ती हल्लींच्या स्थितींत केवळ अलंकारासारखी आहे. व्यक्तींस तिचें मोठेंच भूषण वाटेल, परंतु दरिद्री समाजास हा बहुमोल अलंकार संपादणें अनिष्ट होईल. आत्मोत्कर्षाकरितां मनुष्यास पाहिजे तें करण्याची परवानगी आहे खरी; परंतु समाजहिताकरितांच केवळ जी सुधारणा अमलांत आणायाची व परोपकाराचें श्रेय संपादायाचें—ती सुधारणा सामान्य लोकस्थितीस अनुरूप असली पाहिजे. अशा दृष्टीनें या शहरच्या लोकांनीं चालविलेल्या सुधारणा मी जेव्हां पाहूं लागलों, तेव्हां त्या मला अयोग्य दिसल्या. कांहीं एका परिस्थितींत हजारों वर्षें राहिल्यानें हिंदुसमाजाच्या मनाची, बुद्धीची, व वासनांची, वगैरे, जी स्थिति झालेली आहे, ती मनांत न आणतां, तिचे गुणदोष न पाहतां, तिचा जनसमूहावर जो अवश्य अंमल चालला आहे तो विचारांत न घेतां, पैशाच्या जोरावर कोणीं एका व्यक्तीनें समाजास धिक्कारून त्यापासून विभक्त व्हावें, वयपरत्वें उत्कट होणाऱ्या क्षुद्र मनोवृत्तींचा फायदा घेऊन इतर व्यक्तींस समाजांतून फोडून आपल्यासारखें करावें, व यांतच सामाजिक सुधारणा मानावी हें मला अप्रशस्त वाटलें. परंतु आपले विचार ज्याशीं निःस्पृहपणें बोलतां येतील असा मनुष्य अद्यापि या ठिकाणीं मला भेटला नाहीं, तेव्हां स्तब्ध राहून, ज्या गोष्टी अवलोकनांत येतील त्यांचा पुढें उपयोग होईल असें जाणून मी

संग्रह करूं लागलों. तथापि दिगंबर महाराजांचा उपदेश अद्यापि मनांत चांगला जागृत होता, त्यामुळें माझ्या या अशा वृत्तीनें अनेक गोष्टी पाहून व ऐकून मनास वारंवार धक्का बसे, परंतु तो टाळण्याचा उपायच नव्हता.

१८३. दुसरे दिवशीं सकाळींच दंगूशास्त्री आला. आमचे मित्र तात्यासाहेब यांस त्यावेळीं फारसें काम नव्हतें, तेव्हां आम्ही त्रिवर्ग एकत्र गोष्टी सांगत बसलों. दंगूशास्त्री येतांच तात्यासाहेबांचा त्यास पहिलाच प्रश्न कीं, 'कायरे शास्त्री, तुझें कांहीं जुळतें आहे कीं नाहीं?'–'छे हो, कांहींएक जुळत नाहीं. दिवसानुदिवस तिच्या कल्पना वाढतच चालल्या आहेत. आज आहे तें उद्यां नाहीं. मी आतां अगदीं कंटाळून गेलों आहें–हताश झालों आहें–दुसरा कोणी असता तर तिच्याही नादीं लागला नसता व तुमच्या मंडळींच्याही नादीं लागला नसता.' हे त्याचे शब्द ऐकून मी चकित झालों. सुधारकांचें हें काय कारस्थान सुरू आहे अशी शंका येऊन बऱ्यावाईट अनेक कल्पना माझे मनांत येऊं लागल्या. अखेरीस 'हें काय घोंगडें शास्त्रीबुवाचे मागें लावलें आहे?' असें मीं तात्यासाहेबांस विचारलें. तेव्हां त्यांनीं उत्तर दिलें, 'घोंगडें कां ह्मणतां, भारी शालजोडी आहे! हातीं लागूं द्या ह्मणजे शास्त्री थय् थय् नाचूं लागेल.' हें उत्तर शास्त्रीबुवास पसंत पडलें नाहीं. तो ह्मणाला, 'यांच्या बोलण्यांत कांहींएक जीव नाहीं. आमचें लग्न झालेलें नाहींसें पाहून, परस्पर, पिशाच्चाचे हातीं कोलीत या न्यायानें, पुनर्विवाहाचे भानगडींत आह्मांस पाडण्याची या मंडळींची खटपट आहे. एक सुंदर विधवा पाहून दिली आहे; परंतु तिजपुढें प्रेमाकर्षणाचें सर्व शास्त्र उलथें पालथें केलें, तरी तिच्या हृदयास द्रव येत नाहीं. आजपर्यंतची या खटपटीची तुह्मी हकीकत ऐकाल तर त्या बाईच्या मागण्यांची तुह्मांस शर्थ वाटेल, व त्या मागण्या पुरविण्याचे कामीं या मंडळींच्या औदार्याचीही कमाल वाटेल. परंतु ती बाई सर्वांचें सत्त्व पाहण्यासच बसली आहे. हा पुनर्विवाह जुळून येईल तेव्हां तो एक अलौकिक सामाजिक प्रयोग म्हणून समजला जाईल यांत संशय नाहीं. परंतु त्या

प्रयोगांत माझी एकट्याची मात्र फजिती होणार आहे. तुह्मांस सर्व हकीकत कळेल तेव्हां तुमची खात्री होईल.'

ही हकीकत तरी काय असें मी विचारणार तों तात्यासाहेब ह्मणाले, ' अरे शास्त्री, या पाव्हण्यांस तरी एकवेळ तिजकडे घेऊन जा. कदाचित् चार शहाणपणाच्या गोष्टी सांगून हे तिचें मन वळवितील.' ही सूचना शास्त्रीबुवास पसंत पडली व ' चलतां कांहो ' ह्मणून त्यानें मला विचारलें. तेव्हां मी परस्थ, या तुमच्या भानगडींत कशास पडूं, असें ह्मणून मीं पुष्कळ आढेवेढे घेतले, परंतु दोघेही ऐकेनात. तात्यासाहेबांनीं अखेरीस मला एकच गोष्ट सांगितली ती अशी कीं मी गेलों तर परत आल्यावर मला पश्चात्ताप वाटायाचा नाहीं. असें त्यांचें आश्वासन मिळाल्यावर मीं दंगूशास्त्र्याबरोबर जाण्याचें कबूल केलें. व कामापुरती माहिती दंगूस विचारूं लागलों. मी त्याच्या विवाहाच्या कामांत मध्यस्थी करणार असें वचन मिळाल्यावर त्यास उमेद आली. त्यानें त्या बाईचा सर्व पूर्वीचा इतिहास सांगितला. त्याचें तात्पर्य येणेंप्रमाणें.

१८४. सुधारक मंडळींचे हल्लींचे सेक्रेटरी पांच सहा वर्षांमागें मुंबईस अभ्यास करीत होते. त्यांच्या चाळींत एक उत्तम सुधारलेलें प्रभूंचें बिऱ्हाड होतें. शेजारधर्मामुळें सेक्रेटरींचा त्या कुटुंबाशीं पुष्कळ स्नेह जुळला. तेथें **लीलावती** ही बालविधवा होती. त्यावेळीं तिचें वय कायतें चौदा पंधरा वर्षांचें होतें. तिचें सुंदर स्वरूप पाहून ह्मणा किंवा प्रेमामुळें ह्मणा, घरांतील सर्व माणसें तीस **लिली** ( Lilly कमळ) ह्मणत. तिची बुद्धिही विलक्षण होती. मुलींच्या एका मिशनरी शाळेंत ती इंग्रजी शिकत होती; तिनें दुसरी भाषा फ्रेंच घेतली होती. दोन्ही भाषांचें तीस उत्तम ज्ञान होतें, असें संभाषणावरून दिसून येई. सेक्रेटरींचा व तिचा भाषणाचा प्रसंग वरचेवर यावा व तिच्या बुद्धीविषयीं व गुणांविषयीं त्यांचें इतकें उत्तम मत झालें कीं हिंदुस्थानांत अशी दुसरी स्त्री सांपडणार नाहीं, असें ते मित्रमंडळींत वारंवार सांगत. मंडळीस त्याचा चमत्कार वाटावा. सेक्रेटरींनीं डाक्तरीची परीक्षा पास झाल्यावर मुंबई सोडिली. पुढें थोड्या दिवसांनीं लीलावती बाईकडून त्यांस पत्र आलें–' माझी म्याट्रिकची परीक्षा

उतरली आहे. घरीं वडलांच्या मागें कुटुंबाचा एवढा खर्च आहे कीं त्यांची सर्व प्राप्ति त्यांस पुरेनाशी होऊन दरमहा नवीन कर्ज होऊं लागलें आहे. त्यांतच दुसरें एक दुर्भाग्य ओढवलें, तें असें कीं माझ्या वडील बहिणीवर वैधव्याचा दुर्धर प्रसंग येऊन ती आपल्या तीन लहान मुलांसकट आमचे घरीं येऊन राहिली आहे. तिचे घरचा पैशाचा जो सर्वांस भ्रम होता तो अगदीं पोकळ ठरला, उलट कर्ज आहे. घरांत खायला नाहीं अशी तिची स्थिति आहे. अशा प्रसंगीं वडलांवर अवलंबून राहणें मला पसंत नाहीं; त्यापासून मला निःसीम दुःख होत आहे. दुसऱ्या कोठें माझ्या ओळखी नाहींत, तुह्मी एक माझी खरी स्थिति जाणतां. पोटापुरतें मिळवून आपला व बहिणीचा निर्वाह चालवावा एवढीच माझी उमेद आहे. एवढेंही शक्य झालें नाहीं तर मी जिवाचें काय करीन याचा नेम नाहीं! जग सगळें शून्य दिसत आहे! हृदय जिकडून तिकडून दुःखानें पोळलेलें आहे. तुमच्या पूर्वीच्या स्नेहाचा एकच तंतु जिवांत थोडी आशा उत्पन्न करीत आहे. तो जर तुटला तर संपलें!" याप्रमाणें हें पत्र सेक्रेटरींचे हातीं पडलें तेव्हां ते उभे होते ते कंबर खचून मटकन् खालीं बसले. 'ओ लिली, लिली! तुला जगांत हा एक मित्र आहे, तोंवर जिवावर उदार होऊं नको. सर्व जग दुःखानें भरून गेलें तरी त्यांतच तुझ्या पुरता एक सुखाचा कोंपरा शोधून काढणें अशक्य नाहीं!" सेक्रेटरींनीं क्रमानें आपला उद्वेग आवरून धरला व पुढें काय करावें या विचारांत ते पडले. या एवढ्या मोठ्या शहरांत स्त्रीशिक्षणाची उत्तम सोय नाहीं हें त्यांच्या मनास जाचतच होतें. मुलींकरितां एक उत्तम शाळा स्थापन करण्याकरितां त्यांनीं जिवापाड मेहनत केली. अंमलदार वश करून घेतले. पुष्कळ वर्गणी जमविली. एका जहागिरदाराकडून मोठा वाडा मागून घेतला. नव्या शाळेंत आपल्या मुली पाठविण्याचीं आईबापांकडून वचनें घेतलीं; व शाळा स्थापून त्यांवर लीलावतीबाईस हेडमिस्ट्रेस नेमिलें. हल्लीं शाळा भरभराटीस आलेली होती. लीलावती व तिची बहिण चांगल्या थाटानें राहत होत्या. जग शून्य आहे असें लीलावतीस वाटेनासें झालें होतें. शिक्षकाच्या धंद्यामुळें एक तर तिचें वाचन वाढलें; व दुसरें स्पष्टवक्ते-

पणा अंगीं आला. हिंदुधर्माचें मार्मिक ज्ञान व्हावें ह्मणून तिनें संस्कृताचा बराच अभ्यास केला; व पुराणें, काव्यें, नाटकें यांत तिचें चांगलें गम्य झालें. तीस **विदुषी** ही पदवी लोक देऊं लागले ती योग्य होती. स्त्रियांस तिचीं वारंवार जीं व्याख्यानें होत, त्यांमुळें मराठी भाषा तीस उत्तम बोलतां येऊं लागली, व सौंदर्य आणि प्रेमळ स्वभाव ह्यांच्या साहाय्यानें वाणीसही रसाळता आली. स्त्रियांच्या सुधारणेविषयीं तिचे विचार बरेच प्रगल्भ दशेस आलेले होते.

अशा स्पष्टवक्त्या स्त्रीस आपण कशाचा उपदेश करणार ? असें आतां मला वाटूं लागलें. कठिणच प्रसंग आहे काय होईल तें पहावें, अशी मनाची स्थिति झाली. ही अशी विदुषी स्त्री पत्नी व हा दंगूशास्त्री पति हें जोडपें साजेल तरी कसें ? ही शंका मला आली, पण सुधारक मंडळीस ती कां येत नाहीं याचें मला आश्चर्य वाटूं लागलें. भिन्न जातींत पुनर्विवाह लावायाचा हा एक नवा प्रयोग आहे हें खरें, परंतु तेवढ्याकरितां वधूवरांची योग्यता न पाहणें हें मला चमत्कारिक वाटलें. यांत काय गूढ आहे, कोणता नवीन प्रयत्न सुधारकांनीं आरंभिला आहे, हें कांहींच मला समजेना. त्यामुळें या मध्यस्थींत आपण पडणें हें पूर्वीं जें एकपट अवघड वाटत होतें, तें आतां दुप्पट अवघड वाटूं लागलें, तथापि त्याविषयीं मी उतावीळ होऊन गेलों.

---

# भाग ३१ वा.

## स्त्रियांचीं अगणित दुःखें.

१८५. दंगूशास्त्री त्याच दिवशीं लीलावती बाईकडे जाऊन आला. ' तात्यासाहेबांचे एक परम मित्र दक्षिणेंतून आले आहेत, ते फार विद्वान् आणि थोर मनाचे आहेत, त्यांची तुह्मांशीं संभाषण करण्याची इच्छा आहे, ' वगैरे गोष्टी त्यानें सांगितल्यावरून बाईंस फार आनंद झाला. दंगूशास्त्र्याच्या अतिशयोक्तींमुळें मी कोणी अद्वितीय पुरुष असेन असें त्यांस वाटलें असावें, व ह्मणूनच त्यांनीं

विवाहाचे कामांत माझी मध्यस्थी कवूल केली असावी. कसेंही असो, 'येत्या शनवारीं दुपारीं वेळ मोकळाच आहे त्यावेळीं त्यांस अवश्य घेऊन यावें,' ह्मणून बाईंनीं आदरपूर्वक सुचविलें. त्याप्रमाणें आह्मी उभयतां नेमल्यावेळीं तेथें गेलों. खालच्या मजल्यावर लीलावती बाईची वडील बहिण तांदूळ निवडीत बसली होती. भोंवतालीं मुलें दंगा करीत होतीं व तिची मुद्रा समाधानी तर खरीच, परंतु निराशेची दिसली. दैवावर हवाला देऊन मुलाबाळांकरितां जीव जतन करून रहावें, असा निश्चय झालेला तिच्या चर्येवरून दिसत होता. परंतु हा निश्चय तिच्या कोंवळ्या बाळांस कोठें कळत होता? तीं अल्लडपणें यथेष्ट दांडगाई करून मजेमध्यें होतीं. तळमजल्यांत बहिणीचें राज्य होतेंसें दिसलें; वरच्या मजल्यांत लिलावतीबाईंचें होतें. माडीवर टेबलें, खुर्च्या, कपाटें, पुस्तकें, पडदे वगैरे पाहून एखादे मडमेचे बंगल्यांत आपण आहों असें वाटण्यासारखा सर्व थाट होता. आह्मी गेल्यावर बाईंनीं आमचें मोठ्या सभ्यतेनें व आदरानें स्वागत केलें. पुढें हवापाण्याच्या वगैरे कांहीं गप्पा झाल्या व बोलतां बोलतां सुधारणेचा विषय निघाला. तेव्हां बाईंची रसाळ वाणी अस्खलितपणें चालू लागली. मला मध्यें शब्दही बोलण्याची संधी मिळेना. बाईंच्या आवेशानें त्यांच्या तोंडावर लाली चढली, डोळ्यांत पाणी चमकूं लागलें; तेव्हां त्या तशा सौंदर्याच्या असामान्य आविर्भावापुढें विरोधक शब्द बोलण्याचें कोणासही शक्य नव्हतें. आह्मी दोघेही निमूटपणें सर्व व्याख्यान ऐकत बसलों. बाईंच्या चेहऱ्यांकडे आह्मीं जी टक लाविली ती अखेरपर्यंत चळली नाहीं. त्या ह्मणाल्या:—

१८६. "मुलींस शिकविण्याचें व प्रौढ स्त्रियांस व्याख्यानें देण्याचें काम मजकडे सोंपविल्यापासून, स्त्रियांच्या सुधारणेखेरीज, त्यांच्या उन्नतीखेरीज, दुसरा विचार या हृदयांत आलेला नाहीं. स्त्रियांचीं दुःखें किती व केवढालीं आहेत याविषयीं तुह्मां पुरुषांस कल्पना देखील नाहीं; पुरुषांस तीं जाणण्याची योग्यताच नाहीं अशी माझी खात्री झाली आहे. जे अगदीं स्त्रियांचे मोठे कैवारी ह्मणून मिरवितात, त्यांस स्त्रियांच्या दुःखांचा एक कानाकोंपरा मात्र दि-

सतो असें ह्मटलें पाहिजे. अक्षय्य नरकवास भोगण्याकरितांच ईश्वरानें स्त्रियांस निर्माण केलें आहे कीं काय न कळे! या कामीं चाललेला अन्याय, क्रूरता, दुष्टपणा, पक्षपात व जेवढे दुसरे नीच प्रकार आहेत, तेवढे सर्व पाहिले ह्मणजे जीव दडपून जातो, तो नकोसा होतो! ही स्त्रियांची दुःखकारक स्थिति पाहून, ती स्वतः अनुभवून, तिनें हृदय पोळून पोळून काळें ठिक्कर पडल्यावरून मी ह्मणतें कीं जगांत ईश्वर नाहीं. ह्मणजे जे गुण ईश्वरामध्यें भाविक लोक समजतात ते त्याचे अंगीं नाहींत. जर कोणी जगाचा कर्ता असला तर त्यास अन्यायांत, दुःख देण्यांत, हाल करण्यांत, क्रौर्य दाखविण्यांत फार गम्मत वाटत असावी! असला दुष्ट ईश्वर आहे असें मानण्यापेक्षां तो नाहींच असें मानणें बरें. सृष्टीचे नियम सर्वप्रकारें घातक आहेत. त्यांपासून सुटण्याकरितां होईल तितका प्रयत्न करावा व अखेरीस पंचत्वास जावें—आयुष्यभराच्या दुःखांचा निकाल या शेवटच्या एका घोर दुःखानें करावा—यापेक्षां स्त्रियांस दुसरें कर्तव्य तरी काय आहे? सृष्टीच्या स्वाभाविक अन्यायाचा मोड करून वरिष्ठ न्याय स्थापण्याचा उत्कृष्ट मनुष्यांचा प्रयत्न आहे.* जे मनुष्यरूपी पशु आहेत त्यांचा मात्र असा प्रयत्न नाहीं व त्यांमध्यें बहुतेक सर्व पुरुष येतात! खरी मनुष्यता स्त्रियांमध्यें मात्र आली आहे, असें यावरून सिद्ध होतें.

कारण, पशूंच्या परस्पर वर्तनास आपण न्याय किंवा अन्याय,

* The practice of that which is ethically best—what we call goodness or virtue—involves a course of conduct *which in all respects is opposed* to that which leads to success in the cosmic struggle for existence. In place of ruthless self-assertion it demands self-restraint; in place of thrusting aside or treading down all competitors, it requires that the individual shall not merely respect, but shall help his fellows; its influence is directed, not so much to the survival of the fittest, as to the fitting of as many as possible to survive. It repudiates the gladiatorial theory of existence.......Whatever difference of opinion may exist among experts, there is a general consensus that the ape and tiger methods of the struggle for existence are not reconcilable with sound ethical principles.......The ways of the cosmos afford no sanction for morality. HUXLEY: Evolution and Ethics.

योग्य किंवा अयोग्य, या संज्ञा लावीत नाहीं. सृष्टीनें त्यांस उपजतबुद्धि दिली आहे, दुसरें कांहीं दिलें नाहीं. त्या उपजतबुद्धीनें ते जें करितील तें करितील. तो सृष्टीचा न्याय, म्हणजे मनुष्याच्या भाषेंत अन्याय समजायाचा. वाघानें तावडींत सांपडेल त्या प्राण्याचा आहार करावा; मोठ्या माशानें लहान माशास गिळावें, बोक्यानें मांजरीचीं पिलें खावीं; कोळ्यानें लहान पांखरें जाळ्यांत गुरफाटून त्यांचें सत्त्व शोषून घ्यावें. हे सृष्टीच्या न्यायाचे मासले आहेत. असला न्याय अकुंठितपणें चालावा ह्मणून सृष्टीची रचनाच अशी आहे कीं, कांहीं प्राणी दुबळे व कांहीं बलाढ्य, कांहीं गरीब व कांहीं पक्के वस्ताद; कांहींस स्वसंरक्षणार्थ मुळींच साधन नाहीं, दुसऱ्यांस तीक्ष्ण नखें, दाढा, जबडे, बळ वगैरे सर्व अनुकूळ. दुबळ्या प्राण्यांवर बलाढ्य प्राण्यांनीं यथेच्छ चरावें, हीच उपजतबुद्धि ! या उपजतबुद्धीकरितांच पशूंस पशु ह्मणायाचें, व जोंवर दुबळ्यांच्या जिवावर मनुष्यप्राणी आपला चरितार्थ चालवितात, तोंवर तेही पशूच होत. दुबळ्यांनीं मरावें व बलढ्यांनीं जगावें, या पशुप्रणीत न्यायास ' जीवनार्थ कलह, ' वगैरे संभावित नांवें देऊन त्यांचें पुरुषांनीं एक शास्त्र बनविलें आहे ! व तें ग्राह्य करा, त्यांतच मनुष्यजातीचें तारण आहे, असें प्रतिपादून ते पशुधर्म जगास शिकवीत आहेत. मनुष्यांत थोडें मनुष्यत्व आलें आहे तेंही घालविण्याची व दुबळ्यांकडे सर्व दुःखभार लोटून देण्याची ही अद्वितीय कल्पना आहे खरी ! पशुधर्माची श्रेष्ठता गाणारे ते स्वतः उत्कृष्ट पशु असले पाहिजेत !

१८७. **सृष्टीचा न्याय** नाहींसा करून **मानवी न्याय** स्थापणें, पशुधर्म टाकून मनुष्यधर्म स्वीकारणें, यांत निर्मळ मनास श्रेष्ठता वाटते. मनुष्य मोठा शूर असला तरी स्त्रियांवर हात टाकूं नये, मुलांशीं, वृद्धांशीं, पंगूंशीं लढूं नये, ही बुद्धि त्यास कां श्रेष्ठ वाटते ? ही सृष्टीचे न्यायाविरुद्ध आहे ह्मणून. तसेंच कित्येक गृहस्थ स्वतः कितीही शहाणे असले तरी मातापितरांची कां आज्ञा मानतात, त्यांपुढें कां नम्र होतात ? सृष्टीचा न्याय याच्या उलटा ह्मणून. मातापितरांस उपाशीं मारून आपण चैन करणारे कित्येक पशु आहेतच !

हीन, अज्ञान, पशुतुल्य मनुष्यांसदेखील दास्यांत ठेवूं नये ही कल्पना कशी उत्पन्न झाली ? सृष्टिक्रमानें उत्पन्न झालेला हा बळजोरीचा प्रकार बलाढ्य माणसांच्या मनुष्यत्वास शोभत नाहीं ह्मणून. याप्रमाणें अनेक उदाहरणें देतां येतील. त्यांवरून सामान्य नियम जो निघतो तो हा कीं सृष्टिक्रमाप्रमाणें वागल्यास पशुत्व येतें; त्याविरुद्ध वागल्यास मनुष्यत्व येतें. मानवी समाजांत बळाचा उपयोग जेवढा होईल, तेवढें तेथें दास्य, क्रौर्य व पशुत्व असायाचें; बळी मनुष्य जेवढा दुबळ्याच्या वश होईल तेवढें त्यांत मनुष्यत्व आलें ह्मणून समजावें. अशा मनुष्यत्वानें मनास केवढी थोरवी वाटते ! परंतु हा मनुष्यत्वाचा गुण फार दुर्लभ आहे. जो बलवान् असतो तो दुबळ्यापुढें थोडा नमला कीं त्यास वाटतें केवढा आपण उपकार केला ! मग त्या उपकाराची फेड दुसऱ्या अनेक जुलमाचे कृत्यांनीं करून घ्यावयाची ! बलवानानें एका किंवा दुसऱ्या कामांत नम्रता धरल्यानें दुबळ्याचीं सर्व दुःखें दूर झालीं असें समजणें योग्य नाहीं. तो आपलें सर्व बळ जेव्हां दुबळ्याच्या सेवेस लावील तेव्हां त्यानें खरें मनुष्यत्व अंगीं धरलें असें ह्मणतां येईल.

१८८. या प्रस्तावनेवरून पुढील विषय तुमच्या लवकर ध्यानांत येईल. मुलगी अल्पवयी असो किंवा प्रौढवयी असो, तिचा विवाह झाला कीं ती पुरुषाची दासी बनली. मग पुरुष जाईल तिकडे तिची धिंडका निघायाची. पुरुषानें एक गोष्ट तिच्या आवडीची केली कीं तिनें दहा गोष्टी त्याच्या आवडीच्या केल्या पाहिजेत. **मुलींचा विवाह करिते वेळीं स्वाभाविक ( ह्मणजे सृष्टिजन्य अन्यायाची ) प्रवृत्ति काय कीं तिजहून श्रेष्ठ नवरा तीस पाहून द्यावयाचा; अर्थात् मग ती अवश्य त्याची दासी बनली.** हें दास्य जन्माचें झालें, त्यांतून मृत्यूनेंच सुटका व्हावी असें **स्वभावजन्य** मनोवृत्तींचें सांगणें ! पुरुषास वाटतें मी आपली प्राप्ति या घरधनिणीचे पदरांत ओतितों; इच्या द्वारें कुटुंब वाढतें त्याचें संगोपन करितों; वस्त्रालंकारांनीं इला सुशोभित करितों, याहून अधिक करावें तरी काय ? याहून अधिक जें करायाचें तें तीस जन्माच्या दास्यांतून सोडवायाचें. ही **कल्पना पुरुषास कोठें आहे ? घरधनीण या शब्दाचा अर्थ काय ?**

कुटुंबसंबंधीं क्षुल्लक कामें बायकोनें करीत बसावें व महत्त्वाचीं कामें पुरुषानें करावीं. सुधारलेल्या देशांतही हाच प्रकार. जे धंदे स्त्रियांकडे सोंपविले असतां पुरुषांचें स्वातंत्र्य किंवा योग्यता कमी होईल ते धंदे एकून एक पुरुषांच स्वाधीन; बाकीच धंदे स्त्रियांनीं खुशाल करावे. परंतु तिकडे कांहीं थोडा तरी न्याय आहे, इकडे वरिष्ठ जातींत मुळींच नाहीं. बायकोनें घर संभाळावें व कुटुंब वाढवावें. हें काम थोडक्यांत सांगतां येतें, परंतु करूं लागलें ह्मणजे त्याचें दुःख कळतें.

१८९. स्त्रियांचीं केव्हांतरी लग्नें करून टाकावीं असें सुधारकांस देखील वाटतें. हा **सृष्टीचा क्रम**, तेव्हां तो वाईट कसा असेल? स्त्रियांची विवाहित स्थिति मोठी सुखदायक आहे, असें तुह्मांस वाटतें आं! ही स्थिति अगदीं कनिष्ठ प्रतीच्या स्त्रियांस फायदेशीर असेल, परंतु ती वरिष्ठ प्रतीच्या पुरुषांच्या किंवा स्त्रियांच्या मनुष्यत्वास शोभणारी नाहीं. विवाहित स्त्रीनें घरकामांत नेहमीं व्यग्र असावें; तिची सैंपाकावर नेमणूक; तिनें झाडावें, सारवावें, भांडीं घासावीं, मोऱ्या धुवाव्या; तिनें दळावें, कांडावें, निसावें; मुलें संभाळावीं, त्यांची हाग-मूत-ओक काढावी; अजारीपणीं त्यांची काळजी घ्यावी; याशिवाय नवऱ्याची तबियत संभाळण्यासाठीं जें जें करावें लागेल तें तें करावें. सामान्य स्थितींत इतकें काम करणारा नौकर पुरुषानें आपली सर्व प्राप्ति खर्च केल्यानें त्यास मिळणार नाहीं. ह्मणून तुह्मांस लग्नें हवींत. नाहींतर घरांत निदान आई, बहीण, सून, काकी, मामी, कोणीतरी हवी. दुबळ्यांस दास्यांत घालण्याचा हा सृष्टिक्रम फार प्रशंसनीय आहे खरा! याकरितांच कमी योग्यतेच्या स्त्रीशीं विवाह करायाचा, व उपकाराचा डौल आणून स्त्रियांच्या उन्नतीकरितां व समान योग्यतेकरितां सुधारणा करायाच्या! पुरुष जसजसा श्रीमंत होत जातो तसतशीं आतां सांगितल्यांपैकीं स्त्रीचीं कांहीं कांहीं कामें सुटत जातात हें खरें; परंतु पुरुषाची तबियत राखण्याची व जन्मभर त्याच्या स्वाधीन राहण्याची आवश्यकता कोठें दूर होते? अगदीं श्रीमंताच्या येथें स्त्री ह्मणजे एक घराचा अलंकार होऊन बसतो. या अलंकारानें अलंकाराचेंच काम

केलें पाहिजे; अलंकाराच्या योग्यतेनें राहिलें पाहिजे—ह्मणजे काय ? तर आपलें व्यक्तिस्वातंत्र्य गमाविलें पाहिजे.

१९०. आपणांस एक उत्तम दासी हवी, ह्मणून मी विवाह करितों असें कोणीही पुरुष बोलून दाखवीत नाहीं. प्रेमाचा प्रसार होण्याकरितां, वंश वाढविण्याकरितां, पुत्रसुखाकरितां विवाह करायाचा! या गोष्टी कबूल केल्या तथापि विवाहित स्थितींत किती संतति उत्पन्न करायाची तीस कांहीं निर्बंध आहे काय ? आपली स्थिति पहायाची नाहीं, मुलांची भविष्यस्थिति पहायाची नाहीं, बायकोचे हाल पहायाचे नाहींत, बायको जिवंत आहे तोंपर्यंत स्वतःच्या कामवासना पुरवीत बसायाचें, यासारखें क्रौर्य कोणचें ? अल्पवयस्क मुलीखेरीजकरून बाकी वरिष्ठ जातींच्या सुवासिनी स्त्रियांमध्यें कोठें सौंदर्य ह्मणून दिसतें काय ? स्त्री वीस बावीस वर्षांची होते न होते, तों दोन तीन चार मुलांचें लेंढार तिच्या मागें. प्रत्येक बाळंतपणांत शक्ति कमी कमी होत गेलेली; तोंड फिकुटलेलें, अंग जड झालेलें; डोक्यास बहुधा टक्कल; गालफडें बसून ह्मातारपणची कळा दिसूं लागलेली; मुलांच्या त्रासानें मन सदोदित चिंताक्रांत व काऱ्हलेलें—हें सर्व तुह्मी जेव्हां पाहतां तेव्हां त्या क्षीण अबलेच्या स्वतःच्या अत्यर्थ रतिसुखाभिलाषाचें हें फळ असेल, अशी कोणाच्या मनांत कल्पना येण्याचें तरी संभवेल काय ? कोणीही निःपक्षपाती मनुष्य स्त्रीची ती दुर्दशा पाहून तत्काळ काय सांगेल ? हेंच कीं पुरुषांचा हट्ट, त्यांचा जुलूम, त्यांचा अविचारीपणा, त्यांची रतिसुखाकरितां पूर्ण निर्दयतेची दांडगाई—हीं स्त्रियांच्या तारुण्यांतील दुःस्थितीचीं कारणें होत. ह्मणूनच गर्भारपणीं हाल, बाळंतपणीं हाल, मूल झाल्यावर हाल, बिचारीस आरोग्य सावरण्यास फुरसत नाहीं. मुलामागें मूल व जितकीं अधिक मुलें तितके तिचे कष्ट अधिक, अशी जी दुर्दशा होते ती विचारूं नका. अठरापासून तीस वर्षांपर्यंत स्त्रियांची अतिशयित मृत्युसंख्या पाहिली ह्मणजे पुरुषांच्या माथीं किती स्त्रीहत्यांचें पातक येतें तें समजतें.

पुरुषांनीं हा जो घरोघर अविचार मांडला आहे तो वैद्यशास्त्रास तिळमात्र तरी संमत आहे काय ? मोठमोठ्या डाक्तरांचे अभिप्राय

घ्या. परंतु तिकडे तुह्मी कशास लक्ष द्याल ? सुधारक काय किंवा इतर काय–सर्व एकाच माळेचे मणी ! ज्या स्त्रिया सुवासिनी स्थितींत अशा अशक्त आणि निस्तेज दिसतात, त्यांस वेळवर वैधव्य आल्यास थोड्या दिवसांत त्यांच्या अंगीं शक्ति, आरोग्य, उमेद व कटंकपणा येतो. विधवांइतकें आयुष्य सुवासिनींस नाहीं, कारण उघडच आहे. परंतु त्यावरून काय निष्पन्न होतें ? कोणतें कर्तव्य स्पष्ट होतें ? हें कामांध क्रूर पुरुषांनीं कधीं समजावून घेतलें आहे काय? विधवांचें तें आरोग्य पाहून, अरे यांचीं पुनः लग्नें करून टाका, हा सिद्धांत काढायाचा काय ? पुरुषांच्या अविचाराचें याहून चांगलें उदाहरण सांपडायाचें नाहीं ! केशवपनानें तरुण निरोगी विधवा स्त्रीच्या तोंडाची थोडी शोभा कमी होते ह्मणून केवढा गवगवा करून द्यावयाचा ! व इकडे एकूण एक सुवासिनी स्त्रियांस अशक्त, निस्तेज, अल्पायुषी व टक्कलवंत करणाऱ्या विवाहपद्धतीचा उत्कर्ष चिंतायाचा–असा हा प्रकार पशुतुल्य पुरुषांसच शोभेल.

विवाहसंबंधास अवधि पाहिजे, तेवढ्या अवधींत स्त्रीच्या सौंदर्यास किंवा आरोग्यास धक्का न लागेल असें पुरुषांचें वर्तन पाहिजे; व नंतर तिच्या निर्वाहाची सोय करून देऊन तिची दास्यांतून सुटका करून दिली पाहिजे; तिजकडे पुढें जें एक कर्तव्य ठेवायाचें तें मातृत्वाचें होय. परंतु या गोष्टी स्त्रियांचें परम हित चिंतणाऱ्या पुरुषांच्या ध्यानीं-मनीं-स्वप्नीं तरी आहेत काय ? कोठून असणार ? परदुःख शीतल आहे !

१९०. सृष्टीनें केवढा भयंकर अन्याय चालविला आहे त्याची तुह्मांस थोडी तरी कल्पना आहे काय ? **पुरुषधर्म** ह्मणून आपल्या **स्वभावास** अनुसरून पुरुष जें जें करितो तें तें सर्व त्याच्या सुखास कारण होतें. **स्त्रीधर्म** ह्मणून आपल्या **स्वभावास** अनुसरून स्त्री जें जें करिते, तें तें सर्व तिच्या केवळ दुःखास, पारतंत्र्यास व हानीस कारण होतें.

आपल्या प्रेमळ **स्वभावामुळें** स्त्री पतिपुत्रांचा आश्रय करिते, त्यानेंच तीस जन्माचें दास्य भोगावें लागतें. स्त्रीप्रेमाची **नैसर्गिक** वृ-

द्धि इतकी अनिवार, कीं पतिपुत्रांच्या संबंधानें तें एकवार उद्भवलें कीं त्याच्यापुढें सुख, आरोग्य, संपत्ति, स्वातंत्र्य, जीवित–कश्शाची स्त्रीस पर्वा वाटत नाहीं. पुरुषास त्याचें कांहीं वाटतें काय ?

रतिसुखाच्या स्वाभाविक लालसेनें स्त्री-पुरुष परस्परांस मोहित होतात; त्याचे परिणाम गर्भधारण, बाळंतपण, बहुधा आरोग्यहानि व क्वचित् मृत्यु–हे सर्व स्त्रीस भोगावे लागतात. पुरुषास त्यापासून कांहीं त्रास आहे काय ?

मुलगा व्हावा ही स्वाभाविक इच्छा स्त्रीहृदयांत प्रकट होते. परंतु तो तान्हा असतो तोंवर आंतडीं तोडतो, मोठा झाला ह्मणजे शिरजोर होतो व पुढें पुरुष बनला ह्मणजे जन्मभर आई, बहीण, बायको, मुलगी व सर्व स्त्रीजाति यांस दास्य करायास लावून आपली सुखाभिवृद्धि करून घेतो. पुरुषांस हेंच हवें !

व्यभिचारापासून स्त्रीचें अंतःकरण स्वाभाविकपणें परावृत्त होतें. परंतु पुरुषांच्या दुष्ट प्रयत्नांमुळें तिचें पाऊल वांकडें पडलें कीं जिकडे तिकडे कल्हाळ उसळून जातो ! केवढी स्त्रीची बेअब्रू होते ? आतां एका हातानें टाळी वाजत नाहीं; परंतु व्यभिचारी पुरुषाचा अपराध स्त्रीच्या इतकाच, असें कोणी समजतें काय ? उलट विषयलंपट पुरुषांच्या सोईकरितां सर्व देशांत व सर्व धर्मांत वेश्यांचा वर्ग राखिला जातो, व वेश्यागमन हें कायदेशीर ठरविलेलें आहे. विवाहित आणि अविवाहित पुरुषांमध्यें व विवाहित आणि गतभर्तृका स्त्रियांमध्यें जो व्यभिचार होतो तो समान असला पाहिजे; परंतु वेश्यागमनानें पुरुष आपल्या व्यभिचारांत भर पाडतात, व एकंदरीनें स्त्रियांहून अधिक दुराचारी होतात. परंतु इकडे लक्ष देतो कोण ? स्त्रियांच्या व्यभिचाराचा मोड करण्याच्या मिषानें, त्यांच्या विवाहास व पुनःपुनः विवाहास उत्तेजन मागायाचें; परंतु पुरुषांनीं वेश्यागमन केलें तरी त्यांस रोगराई होऊं नये ह्मणून वेश्यांवर कायद्याचीं बंधनें ठेवायाचीं व पुरुषांच्या आरोग्याचा सांभाळ करायाचा. वळी तो कान पिळी; आपल्याच पोळीवर तूप ओढण्याचा सर्व प्रकार आहे !

पुरुषांस कांहीं अद्वितीय पराक्रम करायाचा असतो, देशपर्यटन

करायाचें असतें, धर्मसंचय करायाचा असतो, नवीन शोध लावायाचा असतो, तेव्हां महत्त्वाकांक्षी पुरुषांमागें प्रपंचाचें व मुलाबाळांचें लचांड नको, ह्मणून अविवाहित राहण्याची त्यांची सोय करून ठेवावी व त्यांचे कामांधतेचे दिवस सुखानें निघून जावे–याकरितां समाजांत वेश्यावर्ग पाहिजे! स्त्रियांनीं महत्त्वाकांक्षाच धरण्याचें कारण नाहीं, तेव्हां त्यांची सोय पाहण्याचें कारण काय? व्यभिचाराची नुसती कल्पना मनांत आली कीं स्त्री पतित होते, तेव्हां सर्व धार्मिक कावळ्यांचा उपदेश काय? 'बाई, लग्न कर, पुनः एकवार लग्न कर!' कांहीं सुधारकांस वाटतें कीं पुरुषांस जशी पुनः लग्न करण्याची मोकळीक आहे, तशी बायकांस मिळाली कीं स्त्रीपुरुषांचे वैवाहिक हक्क बरावर झाले, परंतु या मठ्ठ शिरोमणींस असें कळत नाहीं कीं ही बराबरी वरकरणी झाली. वेश्यावर्गाची जी एकपक्षीय संस्था आहे, ती जोंवर धर्मानें, रूढीनें व कायद्यानें राखिली जात आहे, तोंवर कुटुंबवत्सल स्त्रियांचे हक्क पुरुषांहून कमी राहणार–त्यांची पवित्रता व थोरवी अधिक राहणार ही गोष्ट निराळी.

१९१. हीं अशीं उदाहरणें दाखवूं लागल्यास त्यांस अंतच नाहीं. सारांश हा कीं, सृष्टिनिर्मित जातिस्वभावानें स्त्री जें जें म्हणून करायास जाते त्यानें पुरुषाचा फायदा होतो व स्त्रीस कमीपणा येतो. दुःख, दैन्य, चिंता, व्याधि, पारतंत्र्य वगैरे जगांतील सर्व अनिष्ट प्रकार अनुभविण्याकरितांच स्त्रीची सृष्टींत उत्पत्ति झाली आहे असें दिसतें. ही अनिष्ट परंपरा भोगण्यासाठींच जर आमचा जन्म होता, तर आह्मांस एवढें सौंदर्य, एवढा नाजुकपणा, इतकीं कोमळ अंतःकरणें देण्याचें काय प्रयोजन होतें. परंतु सृष्टीचा न्यायच उरफाटा; तिचें निःसीम क्रौर्य अशा विलक्षण रचनेवांचून कसें स्पष्ट होईल? सृष्टींतील अणूअणूंमध्यें दुष्टपणा भरलेला आहे. हा अन्याय स्त्री कोठवर सहन करील? कोठवर निवारील? जन्मभर मानहानि व तीव्र तापत्रय भोगीत बसण्यापेक्षां स्त्रीजाति भूतलावरून नष्ट होईल तर बरें. या नरकवासाचा एकदां शेवट तरी होईल. पूर्वींच्या काळीं जीवनार्थ कलहांत अनेक प्रचंड प्राणी विलयास गेले ह्मणून भूगर्भशास्त्र सांगतें; मग या आमच्या दुबळ्या जातीचा तसाच लय झाला तर वाईट वा-

टण्याचें कारण नाहीं. तो लवकर होवो असें माझें मागणें आहे; मग त्यामुळें पुढें सर्व मनुष्यजात विलयास गेली तरी फिकीर नाहीं. कारण, वाघावाचें पोट भरावें एवढाच जर शेळ्यांच्या उत्पत्तीचा सृष्टींत उपयोग असेल, तर सृष्टींतून शेळ्या नाहींशा झाल्या म्हणून कोणास वाईट वाटल ? व पुढें उपासमारानें वाघावांचा अंत झाला तर कोण हळहळेल? हाच न्याय मनुष्यजातीस लागतो. दुबळ्या स्त्रीजातीनें, म्हणजे निम्मे व्यक्तींनीं शाश्वत दुःखभार वहावा, मग पुरुषांनीं, म्हणजे बाकी निम्मे व्यक्तींनीं सुखानुमव घ्यावा—हाच जेथें सृष्टीचा न्याय, तेथें ही अशी पशुतुल्य जात हवी तरी कशाला? स्त्रिया दुबळ्या, त्यांचा कैवारी ईश्वर नाहीं, सृष्टि नाहीं, पोटचा पोरगा नाहीं—सर्व त्यांच जन्माचे वैरी—या स्थितींत त्यांनीं कां जगावें हें मला समजत नाहीं. ”

हें लीलावतीचें भाषण ऐकून मी घाबरून गेलों, व एकदम उठून कोपरापासून हात जोडले—“ बाईसाहेब, माफ करा. मला आपली विद्वत्ता व विचारसरणी माहीत नव्हती, ह्मणून मंडळींच्या आग्रहामुळें, मी परस्थ माणूस असतां, या दंगूशास्त्र्यांच्या मध्यस्थीकरितां येथें येण्याचें कबूल केलें. नाहींतर दुरूनच आपलें दर्शन घेऊन कृतार्थ झालों असतों. आपणांस उत्तर देण्याचें सामर्थ्य मज मंदामध्यें नाहीं. आपल्या व्याख्यानापासून मला जो लाभ झाला त्यास उपमा नाहीं, मी आपला फार आभारी आहें. मला परत जाण्याची मेहेरबानीनें परवानगी द्यावी. ”

हे माझे शब्द ऐकून लीलावतीची पहिली उग्र मुद्रा क्षणांत बदलून गेली. तिनें प्रसन्न सुहास्य वदन केलें व सौम्य प्रेमपूर्ण दृष्टीनें मजकडे पाहिलें. तेच क्षणीं ती स्वतः उठून उभी राहिली व मंजुळ शब्दांनीं ‘ विद्याधरपंत, असे क्षुब्ध कां होतां; बसा, बसा, क्षणभर बसा, ’ असें ह्मणून आपल्या कोंवळ्या हातानें माझा हात धरून तिनें मला पुनः खालीं बसविलें. एवढ्या अल्प काळांत तिच्या चर्येंत, दृष्टींत, शब्दांत व वर्तनांत जो मीं हा फेर पाहिला, त्यानें मी चकित झालों, अगदीं पराधीन झालों, व पुढें काय प्रकार घडणार आहे त्याचा तर्क मला करवेना.

## भाग ३२ वा.

### स्त्रीधर्म आणि त्याच्या भावी विजयाचीं सुचिन्हें.

१९२. एव्हांपर्यंत दंगूशास्त्र्याशीं प्रत्यक्षपणें लीलावती कांहींच बोलली नव्हती; तें बोलण्याचें कारण आतां पडलें. 'अरे दंगू, जा खालीं जाऊन ताईस ह्मणावें मंडळींस चहा करा, व कांहीं उपहारही घेऊन या.' ही आज्ञा मिळतांच शास्त्री खालीं गेला. मग लीलावतीनें मोठ्या मधुर वाक्यांनीं पुनः संभाषणास आरंभ केला.

"विद्याधरपंत, तुमच्यासारखा स्त्रियांची खरी अनुकंपा बाळगणारा श्रोता मला आज मिळाला हें माझें मोठें भाग्य मी समजतें. स्त्रियांचीं दुःखें मी वर्णीत असतां, तुमच्या मुद्रेवर जे जे फेरफार होत होते, ते मीं सर्व पाहिले. तुमचें अंतःकरण कोमळ आहे, तुह्मांस आमचा कळवळा येतो, तुह्मी आमचे कैवारी आहां, हें मीं त्यांवरून ओळखलें. ह्मणूनच तुह्मांबद्दल मजमध्यें एवढें प्रेम व बहुमान उद्भवत आहे. येथील सर्व सुधारक मंडळी शुद्ध छिछोर आहेत. तुमच्यासारखी सात्त्विक विचारशील मुद्रा त्यांच्या चेहऱ्यावर क्षणभरही असलेली मीं पाहिली नाहीं. तुमच्या संगतींत मी घटकाभर आहें, परंतु तेवढ्यानें मला केवढा आनंद झाला आहे. तुह्मांशीं कितीही संभाषण केलें तरी मला वाटतें कंटाळा ह्मणून येणार नाहीं. दक्षिणेंतील सर्व संभावित पुरुष असेच विचारी व सौम्य स्वभावाचे असावेसें मला वाटतें. खरेंच पुसाल तर तुमचा अनुभव तुह्मीं मला सांगावा अशी माझी फार फार इच्छा आहे. मी बापडी काय? मुंबईच्या कोंडवाड्यांतून निघून येथें दुसऱ्या कोंडवाड्यांत येऊन पडलें आहे. माझ्यासारख्या अबलेच्या हातून देशपर्यटन होणार आहे काय? मला देशांतील थोर विचारी पुरुष पायांजवळ तरी उभे करतील काय? छेः छेः, तुमच्यासारख्यांच्या स्नेहानें व संगतीनें जें वरिष्ठ प्रतीचें ज्ञान होईल तेवढेंच, नाहींतर इंग्रजी व फ्रेंच नाव्हलें वाचीत पडून रहावें. तुमचा येथें आणखी महिना दोन महिने तरी मुक्काम आहे ना? या इकडच्या प्रदेशाची हवा तुह्मांस कांहींशी रूक्ष वाटत असेल."

'काय असेल तें असो,' मी ह्मणालों, 'हवा रुक्ष तर आहेच, परंतु या दिवसांत ती चांगली मानवते. माझीं मुलें माणसेंही मीं नर्मदातीरच्या एका गांवांत आणून ठेविलीं आहेत. व हा इकडचा प्रांत पूर्वीं पाहिला नव्हता ह्मणून प्रवास आरंभिला आहे. तुह्मांसारख्यांच्या भेटी होतात हाच त्याचा फायदा.'

'तुह्मी खरें सांगा, माझें पहिलें बोलणें ऐकून तुह्मी सद्गदित झालांना? काय या स्त्रीनें दुःखें भोगिलीं असतील, इचें अंतःकरण किती करपून गेलें आहे, असें वाटून तुह्मांस माझी दया आलीना?

मी मनांत तिचें पूर्वींचें भाषण ऐकून अगदीं विटून गेलों होतों, तथापि मीं उत्तर दिलें 'तुमचा एक एक शब्द ऐकून माझे जिवास धक्का बसत होता. मला तुमचा पूर्वींचा वृत्तांत कळलाच होता, तेव्हां स्त्रीदुःखांचें खरें स्वरूप आह्मांस सांगण्याचा तुमचाच अधिकार आहे हें मीं गृहीत केलें. तो वृत्तांत व हें भाषण ऐकून कोणाचेही मनास चटका बसेल.'

'आपलीं दुःखाचीं गाऱ्हाणीं आपल्या प्रिय मित्रांस सांगूं नयेत तर कोणास सांगावीं? मित्र पहातांच जीव उचंबळून येतो. अंतःकरणाच्या अगदीं गूढ गूढ भागांत जेवढें दुःख सांचलेलें असतें तेवढें उमळून वर येतें. भीड मर्यादा रहात नाहीं. मित्र ह्मणजे जिवाचा आसरा, त्यास हृदयाचीं क्षतें उघडीं करून दाखविल्याखेरीज जिवास समाधान वाटत नाहीं.'

माझ्या संबंधानें लीलावतीची ही इतकी स्नेहवृत्ति पाहून माझें चित्त अस्थिर झालें.

'हें हतभागी हृदय एक वेळ करपून गेलें होतें खरें. परंतु ईश्वरास त्याची करुणा आली; त्यानें सर्व व्रण भरून काढले. मित्र मंडळींनीं मला हात देऊन तारलें. आतां हें हृदय पूर्ववत् कोमळ झालें आहे. विचार वाढला, परंतु त्यानें उत्तम मनोवृत्तींचा नाश केला नाहीं. आह्मी अबला तर आहोंच, परंतु आह्मांसही जीं थोडींबहुत आत्मसंरक्षणाचीं साधनें मिळालेलीं आहेत त्यांच्या साहाय्यानेंच आह्मांस जगांत जय मिळविला पाहिजे. बलोन्मत्त पुरुषास त्या योगें

आह्मीं जिंकिलें तरच आमचा मान राहील; नाहींतर दास्य हें आहेच.

१९३. ' माझी महत्त्वाकांक्षा ही कीं, स्त्रियांचें सामर्थ्य किती आहे हें प्रत्यक्ष उदाहरणानें स्पष्ट करावें. पुरुषविजयाचीं जेवढीं हत्यारें स्त्रियांपाशीं आहेत तेवढीं त्यांनीं पाजळून तीव्र ठेविलीं व त्यांचा चांगला उपयोग केला, तर पुरुषपशूस आपल्या वश ठेवण्याचें त्यांस अशक्य नाहीं. या ऐहिक स्थितीचा कळस केव्हां झाला ह्मणून समजायाचें ? जेव्हां राज्य, धर्म, व्यवहार वगैरे सर्व कामांत पुरुष स्त्रियांचे अंकित होतील, त्यांचे दास बनतील, स्त्रियांच्या आज्ञा, उपकार ह्मणून नव्हे, तर कर्तव्य ह्मणून पाळतील, व एकंदरीनें आपलें सर्व सृष्ट पशुत्व टाकून, अंतःकरणांतील कोमल मनोवृत्तींच्या पूर्णपणें वश होतील. तो सुदिन आला ह्मणजे मनुष्यत्वाची पूर्णावस्था झाली.

' रानटी लोक स्त्रियांस रात्रीं उचलून बळात्कारानें चोरून घेऊन जात होते, त्यापेक्षां हल्लींची स्थिति पुष्कळ सुधारलेली आहे; हें फळ स्त्रीप्रणीत धर्माचा कांहीं अंश पुरुषांनीं अंगीकारल्याचें होय. स्त्रियांनीं धर्मग्रंथ लिहिले नाहींत हें खरें; तथापि पुरुषांचें मन शांत व निर्मळ आहे असें पाहून व त्यांचें हृदय आपल्या मुठींत आहे असें जाणून, तशा त्या उचित एकांत प्रसंगीं पुरुषांस स्त्रिया जो बोध करीत गेल्या, त्यामुळें त्यांची पशुवृत्ति कमी कमी होत गेली. प्रेम, दया, अनुकंपा, अहिंसत्व, उद्योग, विनय, सदभिरुचि, इत्यादि, हे सर्व स्त्रियांचे विशिष्ट गुण होत; त्यांच्या संबंधाच्या प्रेरणा स्त्रियांकडून आलेल्या आहेत. ह्मणून जगांत जी आतांपर्यंत सुधारणा झालेली आहे तिचें मूळ स्त्रीप्रणीत धर्मांत आहे असें समजा. तुह्मी पुरुष आपणांस खुशाल धर्मसंस्थापक, नीतिकार, सदाचारप्रवर्तक, सुधारक वगैरे ह्मणवून घ्या; मोठमोठ्या पदव्या परस्परांस द्या, घ्या; सुधारणेचें बीज, तिचें मर्म, तिची प्रगति स्त्रीमूलक आहे. स्त्रीगुणांच्या व स्त्रीधर्माच्या पूर्ण अंगीकारानेंच मनुष्यत्वाची पूर्णावस्था होणार आहे हा सिद्धांत निर्विवाद आहे.

' इटालीचा थोर देशाभिमानी पुरुष **माझिनी** तुह्मांस माहीत आ-

हेच. त्यानें स्वदेशाकरितां कारागृहवास भोगिला, हरतऱ्हेचे हाल सोसले व देश स्वतंत्र होईपर्यंत शोकदु:खाचीं चिन्हें, ह्मणजे काळीं वस्त्रें, परिधान केलीं. त्याची थोरवी सर्व पुरुष गात आहेत. आह्मीं अबलाजनांनीं हेंच व्रत सृष्टीच्या आरंभापासून आतांपर्यंत चालविलें आहे, एवढेंच कीं आमच्या कृत्यांचा ज्ञाता, गुणज्ञ पुरुष, कोणी दृष्टीस पडत नाहीं ! आह्मी मनुष्यतेच्या अभिमानी आहों, आह्मी स्त्रीधर्माभिमानी आहों. स्त्रीधर्माच्या स्थापनेकरितां व उन्नतीकरितां आमचे सर्व प्रयास आहेत. त्याकरितांच हा यावज्जीव नरकवास आह्मीं पत्करला आहे. स्त्रीधर्माची हळू हळू वाढ होत आहे हें पाहून आह्मीही आत्महत्या करीत नाहीं—आह्मांस अखेरीस विजयाची आशा आहे. कुटुंबाच्या किल्ल्यांतील कारागृहवास व मुलांच्या पायीं जे हाल होतील ते, आह्मी निमूटपणें भोगितों. आमची प्रबळ आशा ही कीं कालांतरानें स्त्रीधर्माचा पुरुषवर्गावर पूर्ण अंमल बसेल व त्यांच्या अंगीं खरी मनुष्यता येईल.आमची पिढीमागें पिढी या थोर कार्याकरितां बळी पडत आली आहे, आणखीही हजार वर्षे पडेल; परंतु शेवटीं स्त्रीधर्म रूढ होणार व त्याचा विघात करणारे सर्व पुरुषपशु विलयास जाणार.

१९४. ' सुधारणा ह्मणजे काय याचा तुह्मी खोल विचार करा, ह्मणजे तुह्मांस असें दिसून येईल कीं, **स्त्रीधर्माच्या उत्कर्षाचें सुधारणा हें दुसरें नांव आहे.** असें समजा कीं पृथ्वीच्या पाठीवर थोड्या अंतरावर दोन बेटें आहेत. एकांत जगाच्या आरंभापासून पुरुष रहात आहेत व त्याचें नांव 'पुरुषद्वीप.' दुसऱ्यांत केवळ स्त्रिया रहात आहेत व त्याचें नांव 'स्त्रीद्वीप.' उभयतांमध्यें व्यापार, व्यवहार सर्व कांहीं आहे, परंतु स्त्रीपुरुषांची एकत्र वसती मात्र नाहीं. त्या दोन बेटांत आतांपर्यंतच्या सर्वकाळांत राज्य, धर्म, नीति, व्यापार, व्यवहार, कलाकौशल्य, वगैरे हीं सर्व उत्पन्न व्हावयाचींच. परंतु असें दिसून येईल कीं या सर्वांचा प्रकार जो पुरुषद्वीपांत रूढ होईल त्याहून स्त्रीद्वीपांतील फारच निराळा. तुह्मीच सांगा कीं त्या दोन प्रकारांपैकीं कोणत्या द्वीपांतील प्रकार हल्लींच्या सुधारलेल्या स्थितीशीं अधिक जुळेल ? कोणत्या द्वीपांत हल्लीं सर्वमान्य झालेलीं सुधारणेचीं

तत्त्वें अधिक उन्नतीस चढलेलीं दिसतील ? कोणत्या द्वीपांत सुधारणेचीं अंगें व उपांगें अधिक पूर्णतेस आलेलीं आढळतील ? अथवा असें सांगा कीं कोणतें बेट संपत्तिमान् होईल व कोणतें दरिद्री व अव्यवस्थित राहील? कोणतें शांत व सुंदर दिसेल व कोणतें तंटेबखेडे, मारामाऱ्या, अपशब्द व बीभत्सता, यांमुळें अप्रेक्षणीय होईल ? या रीतीनें तुह्मी विचार करा ह्मणजे हल्लींच्या सुधारलेल्या स्थितींत स्त्रियांकडून कोणत्या प्रेरणा आल्या व पुरुषांकडून कोणत्या आल्या त्यांचा तुह्मांस निश्चय करितां येईल. व हा प्रभाव कशाचा ? स्त्रियांच्या मृदुतीक्ष्णतर अस्त्रांचा. देश आहे त्या स्थितींत राखायाचा किंवा तो सुधारायाचा याविषयीं स्त्रियांचा जो निश्चय असतो तोच सिद्धीस जातो. तुमच्या पुरुषांच्या तडफडीनें कांहींएक फायदा होत नाहीं. तुह्मीं स्त्रीधर्माच्या धोरणानें सुधारणेच्या कल्पना काढल्या तर त्यांस लवकर यश येईल; उलट प्रकार आरंभिल्यास सर्व प्रयत्न व्यर्थ जातील.

'धर्म, नीति, सदाचार या सर्वांचें खरें ज्ञान पाहिजे असल्यास वेदांत्यांच्या वल्गना व शास्त्रकारांचे सिद्धांत वाचून कांहींएक बोध होणार नाहीं. मन मात्र संदेहांत पडेल, त्याची पशुवृत्ति जाणार नाहीं. धर्म आणि सुधारणा यांच्या चक्रांस गति कोण देतें व तीं कोणीकडे चाललीं आहेत, हें पाहणें असल्यास उत्कृष्ट काव्यें वाचा. मनुष्यजातीच्या सुधारणेचा खरा इतिहास काव्यांत मात्र आहे. इतिहासकारांस तो मुळींच माहीत नाहीं. तुह्मी **होमर** वाचा, **शेक्स्पीयर** वाचा, **टेनिसन्** वाचा, दुसऱ्या मार्मिक कवींचीं काव्यें वाचा. प्रत्येक ऐतिहासिक काळांत स्त्रिया काय बोलतात व पुरुष काय बोलतात हें पहा; व उत्तरोत्तर कोणाच्या उक्तींस जगानें मान दिला, कोणाच्या उक्तींकडे व्यवहाराचा ओघ वळला, स्त्रीपुरुषांपैकीं कोण कोणास अनुसरलें, कोण कोणासारखें होत गेलें—या सर्व गोष्टी ध्यानांत आणा, ह्मणजे मानवी समजाची पूर्णावस्था स्त्रीधर्माच्या सर्वत्र संस्थापनेंत आहे, असें निःसंदेहपणें तुमच्या ध्यानांत येईल.

'याकरितां मनुष्यजातीच्या उन्नतीचें काम आमचें स्त्रियांचें असें

जाणून, आह्मांस आपलीं शस्त्रास्त्रें पाजळून तीव्र केलीं पाहिजेत. त्यां द्वारें आपला प्रभाव वाढविला पाहिजे. कां, खरें आहे कीं नाहीं ? '

मीं उत्तर दिलें—' होय, खरें आहे. ही कल्पना मीं आजच प्रथम तुमच्या तोंडून ऐकिली; परंतु ऐकिल्याबरोबर ती माझ्या मनांत ठसली, हें मला प्रांजळपणें कबूल केलें पाहिजे. मला एकच सूचना करायाची आहे ती तुह्मांस मान्य झाली तर पहा. ती अशी कीं, वृद्ध पुरुषांची गणना तुह्मीं स्त्रियांतच केली पाहिजे. '

' होय, तुह्मी ह्मणतां त्यांत थोडें तथ्य आहे; स्त्रियांच्या पुष्कळ दिवसांच्या सहवासानें वृद्धांस थोडें स्त्रीत्व येतें. परंतु तें वरकरणी असतें. कशावरून ह्मणाल, तर त्याचें उत्तर असें कीं सद्-बुद्धि उत्पन्न करण्याचे उभयतांचे मार्ग अगदीं निराळे. वृद्ध मनुष्य अभिमानानें व अधिकारानें बोध करीत असतो; ह्मणून तो त्याचा मान्य होतो न होतो. स्त्रिया अंतरंगांत शिरून तेथेंच प्रबळ प्रेरणा करून देतात; आज नाहीं उद्यां, त्या प्रेरणांचा अंमल अवश्यमेव मनुष्याच्या वर्तनावर बसतो. हा जो मोठा भेद आहे, त्यामुळें तुमची सूचना मला मान्य करितां येत नाहीं. असो.

' येथपर्यंत स्त्रियांचें पहिलें हत्यार कोणतें तें तुह्मांस स्पष्ट केलें. तुह्मी स्त्रियांस अविचारी ह्मणून आपण सर्व सुविचारांचा मक्ता घेतां हें योग्य आहे काय? तुमच्या मूळच्या पशुस्वभावामुळें तुमच्या अंतःकरणांत चांगलें व वाईट यांची खळबळ उडून जाते, व एक निर्णय करण्यास तुह्मांस कठीण पडतें. या अंतःकरणाच्या खळबळीस तुह्मी विवेक, सदसद्विचार, वगैरे मोठालीं नांवें देऊन, आह्मां स्त्रियांस कमीपणा आणितां काय? सत्प्रेरणा सहजगत्या व्हावी ही आह्मांस ईश्वरी देणगी आहे; तुमच्या अंतरंगांत जो बोध पक्का ठसतो तो आह्मीं केलेला होय. आजपर्यंतची सुधारणा व तिचा इतिहास लिहिणारे सर्व कवि, या गोष्टीबद्दल साक्ष देतात. ह्मणून, महाराज, हें **प्रबोधास्त्र** आमचें आहे; त्यानें आह्मी तुमचा पराभव करितों व तुह्मांस कैदी करून सुदिशेस नेतों. काय ? ही गोष्ट मान्य होते कीं नाहीं ?

' झालीच पाहिजे, दुसरा उपायच नाहीं; तुह्मीं आज या श-

स्त्रानें माझ्या पूर्वींच्या सर्व विचारांचा मोड केला आहे, हें प्रत्यक्षच उदाहरण तुमच्यापुढें आहे.'

१९५. हें उत्तर ऐकून लीलावतीनें मनोहर हास्य करून आपला आनंद प्रदर्शित केला. इतक्यांत चहाची व उपहाराची सामुग्री घेऊन स्वत: दंगूशास्त्री आले. बश्शा, पेले व्यवस्थितपणें मांडणें, वगैरे काम त्यांकडेच होतें. मग बाईसाहेबांच्या मागें ते नम्रपणें उभे राहिले, व 'दंगू, तुला चहा घ्यावयाचा नाहीं काय?' असें त्यांनीं ह्मटल्यावर निराळ्या टेबलावर तेही एक पेला घेऊन बसले. या त्यांच्या नौकरींतील मर्म मला समजेना, मीं थोडा चकित झाल्यासारखें दाखविलें. ही गोष्ट लीलावतीचे ध्यानांत आली, परंतु तिकडे आपलें लक्ष नाहींसें तिनें दाखविलें. पुढें चहाची सामुग्री परत गेली तेव्हां 'चला, आतां खालीं बागेंत फिरतां फिरतां संभाषण करूं. हिंडून हिंडून कंटाळा आल्यास बागेंतच हवा खात बसण्याची उत्तम सोय आहे; तशांत आज उत्तम चांदण्याचा दिवस आहे.—सृष्टीचें वैभव या सूर्यास्ताचे वेळीं पाहण्यांत फार मौज वाटते नाहीं काय?'

'यांत काय संशय आहे? सूर्यास्ताचे वेळीं पातळ ढगांवर जे चित्रविचित्र रंग पसरतात, ज्या कांहीं विलक्षण आकृति ढगांस येतात, त्यांच्या त्या सौंदर्यास उपमाच नाहीं. त्यांचें वर्णन अशक्य आहे. त्यांचा उत्साहदायक परिणाम अनुभविलाच पाहिजे.'

१९६. 'विद्याधरपंत, तुह्मी फार मार्मिक आहां. एतद्देशीयांस पूर्वीं प्रेमास दुसरी उपमाच सांपडेना. तेव्हां त्यांनीं रक्तता, राग, अनुराग, वगैरे संज्ञांनीं त्याची परिस्फुटता केली. सृष्टीचें स्वरूप रात्रीं भयंकर, सकाळीं उज्ज्वळ, दुपारीं खरमरीत, परंतु संध्याकाळचे वेळीं प्रेमळ असतें. दिवसाच्या श्रमानें कंटाळलेल्या आपल्या बाळकांस यावेळीं सृष्टि प्रेमळरूप धारण करून शाबासकी, उत्साह, व आल्हाद देते. तिचा सर्व अनुराग यावेळीं प्रकट होतो. स्त्रियांचें प्राबल्य या वेळेपासून सुरू होतें.

'स्त्रियांचें पुरुषाच्या वशीकरणाचें दुसरें अस्त्र ह्मटलें ह्मणजे **प्रेमास्त्र** होय. प्रेमाचे तंतु किती सूक्ष्म परंतु किती बळकट असतात!

कोळ्याच्या जाळ्यांत सांपडलेल्या किड्याच्या अंगाभोंवतीं जितकीं वेष्टनें पडत नाहींत, तितकीं पुरुषाभोंवतीं प्रेमाचीं वेष्टनें पडतात. त्याच्या बुद्धीस भ्रम पडतो. एवढासा गुण त्यास अभाळा एवढा दिसतो. स्त्रियांचें अंग कोमळ तर खरेंच, परंतु त्यास कमळाच्या पाकळीची उपमा देऊं, कीं शिरीषपुष्पाच्या तंतूची देऊं असें त्यास होतें. स्त्रीकटाक्षानेंच त्याच्या हृदयास व्रण पडतात; तिच्या मधुर वचनांनींच त्यास अमृतानुभव होतो. हा पुरुषपशु तारुण्यमदानें बेफाम होऊन जगास उपद्रव देण्यास सुरवात करणार, इतक्यांत त्यास हस्तगत करून ताळ्यावर आणण्याचें काम स्त्रिया आपणांकडे घेतात—

नितंबिनी वागुरा पसरल्या कामिकुरंगाला ।

ही उक्ति निंदेच्या हेतूनें कवीनें लिहिली असली तथापि खरी आहे. ती स्तुतिपर आहे. या पुरुषपशूस उन्मत्तपणें भटकूं न देतां प्रेमपाशांत अडकावून सुशील करून प्रपंचांत गोंवून टाकणें अवश्य आहे; नाहींतर हा कहर करून देईल. घरचा प्रपंच एवढ्याकरितांच स्त्रियांनीं पत्करला आहे. जेवढें पुरुषाचें कर्तृत्व वाढेल, तेवढे त्याच्यामागें कुटुंबाचे पाश अधिकच अधिक. अशीं हीं प्रेमबंधनें अगणित उत्पन्न होतात, ह्मणून पुरुष शांतपणें उद्योग करीत राहतो. नाहींतर त्यानें कोणतीं धाडसें केलीं असतीं, कोणते घोर प्रकार आरंभिले असते, तो किती पतित झाला असता, किंवा किती पशुत्व त्यानें अंगीकारलें असतें, हें सांगतां येत नाहीं. आईच्या, बहिणीच्या, बायकोच्या, मुलीच्या, सारांश कुटुंबाच्या पाशांतून सुटून जे पुरुष भटकूं लागतात, त्यांचीं एकंदर दुष्कृत्यें पाहिलीं ह्मणजे या नितंबिनी-वागुरांचें महत्त्व लक्षांत येतें. प्रेमास्त्रामध्यें एक विलक्षण गुण आहे, तो हा कीं मनुष्य जितका क्रूर, साहसी, दांडगा, बेफाम, तितका तो प्रेमास्त्रानें वश करण्यास अधिक सुलभ. त्यास हस्तगत करून घेण्यास किंवा त्याची दांडगाई मोडण्यास तुमचें पोलिस, तुरुंग, शस्त्रें, वगैरे, हीं कांहींएक उपयोगीं पडणार नाहींत. प्रेमाची बेडीच त्याच्या पायांत घातली पाहिजे.

याप्रमाणें हें प्रेमास्त्र आहे. त्याची अधिदेवता स्त्री होय; आप्तइष्ट-मित्र वगैरे सर्व त्याचें तंतुजाळ होय.

१९७. 'बळाचा उपयोग परहिंसेकडे न करितां उद्योगाकडे करावा ही प्रेरणा स्त्रीमूलक आहे. घरांत बसून हें आणा, तें आणा ह्मणून तिनें सांगतच असावें, तिचें घर कधीं भरायाचेंच नाहीं, तिची संपत्तीची हाव कधीं पूर्ण व्हावयाची नाहीं. या रीतीनें पुरुषास आपली पशुता प्रकट करण्यास स्त्रिया वेळच मिळूं देत नाहींत. मागें पुरुषद्वीपाची कल्पना तुह्मांस सांगितली. त्या द्वीपांतील घरेंदारें व स्त्रीद्वीपांतील घरेंदारें यांमध्यें तुह्मांस केवढा फरक दिसून येईल! पुरुष आपलें घर झाडणार नाहींत, तें शृंगारणार नाहींत, त्यांत सुंदर वस्तूंचा संग्रह करणार नाहींत. ते आपलें शरीर नीटसें झांकणार नाहींत, केंसाच्या झिंझ्या राहूं देतील व पोट भरलें ह्मणजे काय करितील, कोठें पडतील व कोणत्या एका नादांत दिवस घालवितील हें सांगतां येणार नाहीं. परंतु त्यांची शेंडी स्त्रीचे हातीं येतांच त्यांस व्यवस्था कळूं लागते; सुंदर दिसण्याची इच्छा उत्पन्न होते; घरास ते शोभा आणूं लागतात; स्त्रीस वस्त्रभूषणांनीं सजवून, आपले डोळे गार करूं पाहतात. मग त्यांस असें होतें कीं 'इयं गेहे लक्ष्मीरियममृतवर्तिर्नयनयोः ।' या अशा बुद्धीनें पुरुष स्त्रीवश होतात; तीस 'गृहिणी सचिवः सखी मिथः ।' असें समजूं लागतात. मग तिच्या प्रेरणेनें ते उद्योगी होतात. सर्व उद्योगांस मूळचें प्रोत्साहन स्त्रीकडून मिळालेलें आहे. सर्व वैचित्र्याची इच्छा स्त्रियांच्या वस्त्रालंकारांस व मंदिरांस शोभविण्याकरितां आहे. कोणत्या नव्या वस्तूनें स्त्रीस संतुष्ट करूं, ही मनीषा उत्पन्न होऊनच कोणी समुद्रांत बुडी मारून मोतीं व पोंवळीं वर आणूं लागले; कोणी हिरे माणकें शोधण्याकरितां जमिनींत खणूं लागले; कोणी सोनें, रुपें वगैरे मौल्यवान् धातु खाणींतून काढूं लागले. जेवढे नवे उद्योग पुरुषांनीं आरंभावे, तेवढा घरधनिणीचा लोभ अधिकच. उद्योगास खळ पडेना, त्यामुळें भटकण्यास वेळ मिळेना. याप्रमाणें सर्व सदभिरुचीचें व उद्योगांचें बीज शोधूं जातां तें स्त्रियांनीं घरांत आणिलें आहे. त्याची वृद्धि करून सुधारणेचा मोठा वृक्ष त्यांनींच

बनविला आहे. आपली स्त्री लपवून ठेवावी ह्मणूनच बहुधा पुरुष घरें बांधूं लागले; स्त्रीच्या संरक्षणाची काळजी नसती तर या उष्ण देशांत ते झाडाखालीं राहूनच निर्वाह करिते. यासंबंधानें स्त्रिया जो पुरुषांवर अंमल चालवितात तो आपल्या **प्रवृत्त्यस्त्रा**मुळें. परंतु या तिसऱ्या अस्त्रास **मायास्त्र** असें ह्मणणें अधिक योग्य होईल. कारण अनादि पुरुषास देखील मायेच्या स्वाधीन झाल्यावांचून प्रवृत्तिमार्ग दिसत नाहीं असें वेदांत्यांचें मत आहे. त्याचा लौकिक अर्थ निराळा आहे. तो असा कीं पुरुष हा प्राणी एकतर अगदीं पशुवत् आचरण करील, नाहींतर नुसत्या ज्ञानाचे मागें लागून कांहींच आचरण करणार नाहीं. अरण्यांत राहून 'स योगी अथवा पशुः' याप्रमाणें त्याची स्थिति होणार. त्यास प्रवृत्तिमार्गास लावणाऱ्या स्त्रिया होत, व हें त्या आपल्या मायास्त्राचें जाळें पुरुषाभोंवतीं पसरून करितात. पशुवृत्तींतून ज्या पुरुषांची कोणत्याही कारणानें सुटका झाली, त्यांनीं निवळ ज्ञानमार्गास लागून ऐहिक कर्तव्यांस विसरून जाऊं नये, या गोष्टीची सिद्धता आह्मी स्त्रिया मायास्त्रानें करितों. 'माया' या शब्दाचे जे भिन्न अर्थ रूढ आहेत त्यांची उत्पत्ति कशी झाली हें पाहूं गेल्यास असें दिसतें कीं, स्त्री व पुरुष यांमध्यें पतिपुत्रादिक जे भिन्न संबंध आहेत त्यांस हा एकच शब्द लाविला गेल्यानें ते अर्थ उत्पन्न झाले. जर तुह्मां पुरुषांमध्यें आदिपुरुषाचा एक एक अंश असेल, तर आह्मां स्त्रियांमध्यें आदिमायेचा एक एक अंश आहे. आह्मांमुळें तुमची कार्यप्रवृत्ति आहे. या देशांत जेवढे ज्ञानी ह्मणून तोरा मिरविणारे होऊन गेले त्यांचा काय विलक्षण प्रयत्न आहे पहा, कीं पुरुषास संसारांतून काढून, ह्मणजे स्त्रीच्या अमलांतून सोडवून, एकलकोंड्या स्वार्थसाधु वैराग्यास लावायाचें! याकरितांच स्त्रियांची यथेष्ट निंदा! याकरितांच एकपक्षीय विचारानें प्रापंचिक दुःखांची अमर्याद अतिशयोक्ति! केवढी ही तुमची कृतघ्नता! वाहवारे तुमचें ज्ञान? वाहवारे परमार्थबुद्धि! जगाच्या सुधारणेस तुह्मी पुरुष बिलकुल लायख नाहीं हें खरें. तुमच्या ज्ञानवृद्धांचा याकरितांच आह्मी स्त्रियांमध्यें समावेश करीत नाहीं.

१९८. 'स्त्रियांचें चवथें अस्त्र ह्मटलें ह्मणजे **क्षमा** हें होय. या

अस्त्राची महती वर्णावी तितकी थोडीच. 'क्षमयेदं धृतं जगत्' हा सिद्धांत अक्षरशः खरा आहे. भारतांत ह्मटलें आहे–

> यदि न स्युर्मनुष्येषु क्षमिणः पृथिवीसमाः ।
> न स्यात् संधिर्मनुष्याणां, क्रोधमूलो हि विग्रहः ॥
> मृदुना दारुणं हंति, मृदुना हंत्यदारुणम् ।
> नासाध्यं मृदुना किंचित् तस्मात्तीव्रतरं मृदु ॥ वनपर्व

'ही पृथ्वीसारखी क्षमा शोधूं लागल्यास ती स्त्रियांमध्यें मात्र दिसून येईल. पृथ्वीस आपण पायांनीं तुडवितों, शस्त्रांनीं भेदितों, तथापि ती कधीं क्षुब्ध झाली आहे काय? भूतमात्रास प्राण व अन्नोदक देणारी ही धात्री आहे; व तिचे सर्व गुण स्त्रीमध्यें आहेत. पिता, पुत्र, पति, आप्त हे सर्व एका नाहींतर दुसऱ्या प्रसंगीं स्त्रीचे हाल, हानि, अपमान करीत असतात. परंतु ती आपला राग नित्य गिळीत असते. जीस पुरुषरूपी क्रूर पशूंमध्यें सर्व आयुष्य घालवायाचें, तिचें क्षमेवांचून क्षणभर तरी चालेल काय ? सर्व व्यवहारज्ञांचा असा अनुभव आहे कीं मानी, हट्टी व अविचारी पुरुषांस सन्मार्गास लावण्याच्या कामीं दंड जितका उपयोगीं पडतो त्यापेक्षां क्षमा व सदुपदेश अधिक परिणाम करितात. ह्मणूनच आपल्या मृदु स्वभावानें पुरुषांचा दारुण स्वभाव जिंकण्याचें काम आह्मीं चालविलें आहे. पुरुषास कांहीं दिवस स्त्रीत्व येऊन एखाद्या नवऱ्याचा संसार गळ्यांत पडण्याची शक्यता असती, तर पुरुषापराधामुळें स्त्रियांस किती दुःख भोगावें लागतें व त्यांस क्षणोक्षणीं किती क्षमाशील व्हावें लागतें, हें त्यांस कळून आलें असतें. 'जावें त्यांच्या वंशां तेव्हां कळे,' असें तें स्त्रियांचें दुःख आहे. अफू, दारू, गांज्या वगैरे सर्व मादक दुर्व्यसनें पुरुषांमध्यें जितकीं सांपडतात, त्याच्या सहस्रांशही तीं स्त्रियांत सांपडत नाहींत, हें प्रसिद्धच आहे. दुर्व्यसनांच्या नादानें जे अनेक पुरुष बायकामुलांचे हाल करितात, कुळास बट्टा लावितात, व द्रव्याची आणि आयुष्याची हानि करून घेतात, त्या सर्वांच्या कुटुंबांत काय चमत्कार दिसतो तो ध्यानांत आणा. दुराचारी पुरुषांच्या बायका कधींही दुराचारी नसतात, त्या थोर साध्वी स्त्रिया अ-

सतात; जितका कुटुंबाचा नाश करण्यास नवऱ्याचें दुर्वर्तन कारण होतें, तितकें बायकोचें सद्वर्तन मुलांबाळांचें संरक्षण करण्यास, कुटुंबाची अब्रू राखण्यास व आप्तवर्गांचा स्नेह कायम ठेवण्यास कारण होतें. दुराचारी माणसाच्या संगतींत जन्मभर सदाचारी राहण्याचा, अविचारी माणसाच्या संगतींत जन्मभर सुविचारी राहण्याचा जो विलक्षण चमत्कार तो स्त्रिया नित्य करून दाखवित आहेत. असे पुरुष शोधूं जातां विरळाच सांपडतील. स्त्रियांच्या थोरवीचें व क्षमाशीलतेचें दुसरें प्रमाणच पहायास नको.

१९९. आमच्या कवींनीं स्त्रियांची निंदा व निर्भर्त्सना करण्यांत आपलें पुष्कळ पांडित्य खर्च केलें आहे. परंतु क्रोधाचा, अविचाराचा किंवा विरक्ततेचा तो दुष्परिणाम होय. कारण, स्त्रीपुरुषांच्या संबंधाच्या त्यांनीं वर्णिलेल्या कल्पित किंवा ऐतिहासिक गोष्टी तुह्मी वाचूं लागा, ह्मणजे तेव्हांच पारडें फिरलेलें दिसतें. निंद्य कर्मांस पुरुषांचें पाऊल पुढें. पुरुष उत्कृष्ट गुणी असें दाखविण्याचा जेथें कवीचा हेतु असतो, तेथें देखील त्याची पत्नी त्याहून श्रेष्ठ असें कवींच्या वर्णनावरून सिद्ध होतें. युलिसीसूहून पेनिलोप् किती श्रेष्ठ आहे ? आठव्या हेन्री राजाहून काथराईनराणी किती सुज्ञ आहे ? नळराजाहून दमयंती, पांडवांहून द्रौपदी, दुष्यंताहून शकुंतला किंवा सत्यवानाहून सावित्री किती अधिक थोर आहे ? रामाहून सीता किती तरी श्रेष्ठ आहे ?

**स्नेहं दयां च सौख्यं च यदिवा जानकीमपि ।**
**आराधनाय लोकानां मुंचतो नास्ति मे व्यथा ॥**

याप्रमाणें राज्य प्राप्त होतांच कुटुंबविघातक प्रतिज्ञा करणें कोणासही योग्य वाटेल काय ? धिक्कार असो त्या राज्यास व त्या मूर्खजनांच्या आराधनास ! परंतु ही अशी घोर प्रतिज्ञा करून, सीतेचेच मनोरथ पुरविण्याची निव्वळ थाप मारून—

**शैशवात्प्रभृति पोषितां प्रियां सौहृदादपृथगाश्रयामिमाम् ।**
**छद्मना परिददामि मृत्यवे शौनिको गृहशकुंतिकामिव ॥**

याप्रमाणें कृति करणारा व

तस्याः परिस्फुरितगर्भभरालसायाः
क्रव्याद्भिरंगलतिका नियतं विलुप्ता ॥

असें समजून रडत फिरणारा रामचंद्र तुह्मांस श्रेष्ठ वाटतो? कीं त्याचा तो भयंकर अपराध मनांत न आणितां पूर्ववत् प्रेमपरायण राहून, रघुकुलाच्या वृद्धीचें बीज आपल्या पोटीं आहे हें जाणून, दुःखाची परमावधि झाली तथापि कोणत्याही आत्मघातक साहसास प्रवृत्त न होणारी सीता तुह्मांस श्रेष्ठ वाटते? क्षमेची येथें परकाष्ठा झाली. 'भर्तुर्विप्रकृतापि रोषणतया मास्म प्रतीपं गमः। हा उपदेश या क्षमेपुढें अगदीं फिका पडतो. अशा सीतेच्या योग्यतेच्या स्त्रिया पुराणांतच आहेत असें समजूं नका; त्या घरोघर आहेत,–अविचारी, दुर्व्यसनी, क्रूर पुरुषांच्या येथें तर अशा थोर माउल्या अवश्य असायाच्या!

'पुराणांतील अनेक कथानकें वाचून पहातां अशी खात्री होते कीं आमच्या कवींनीं स्त्रियांची श्रेष्ठता अधिक, असें वास्तविकपणें दाखविलें आहे. स्फुट श्लोकांत मात्र यथेच्छ निंदा केली आहे. परंतु त्या निंदक कवींनीं अंतर्यामीं आमचीच स्तुति केली, आमच्याच तर्फें साक्ष दिली, ह्मणून आह्मांस त्यांचें भूषण वाटतें. याकरितांच पुराणश्रवण आह्मांस आवडतें. कुटुंबत्यागास प्रवृत्त करणारा वेदांत आह्मी तुच्छ गणितों.

'क्षमेसंबंधाचे उत्कृष्ट उद्गार स्त्रीहृदयावांचून अन्यत्र उत्पन्न व्हावयाचे नाहींत असें महाकवि शेक्सपीयर यानें स्पष्ट सुचविलें आहे. तुह्मी पुरुष न्याय करण्यास, लढाई मारण्यास, व्यापार चालविण्यास योग्य आहां खरे! तुह्मी जेव्हां न्याय करण्याचा आव आणतां, तेव्हां एकमेकांच्या मांसाचे लचके तोडण्यास किंवा गळे कापण्यास कमी करणार नाहीं! परंतु आह्मी स्त्रिया तुम्हां पुरुषपशूंस नित्य शिकवीत असतों कीं, बाबांनों—

PORTIA : The quality of mercy is not strained;
It droppeth as the gentle rain from heaven
Upon the place beneath: it is twice blessed;
It blesseth him that gives and him that takes.

* * * * *

And earthly power doth then show likest God's
When mercy seasons justice.

'राज्यप्राप्तीनें, ऐश्वर्यमदानें किंवा बलावेशानें अत्यंत निष्ठुर होणाऱ्या पुरुषांनीं हा आह्मां स्त्रियांचा उपदेश मान्य केला पाहिजे. हा उपदेश जेव्हां तुह्मी विसरतां तेव्हां तुह्मी किती घातक कृत्यांस तयार होतां, हें तुमची युद्धप्रीति पाहिली म्हणजेच स्पष्ट होतें. लुटालुटीच्या हेतूनें, सूड उगवण्याच्या हेतूनें, वृथाभिमानानें, शुद्ध पशुवृत्ति अंगीकारून पुरुष आपली रक्तस्राव करण्याची उत्कट इच्छा पुरविण्याची संधीच पहात असतात. फ्रान्स आणि जर्मनी यांमध्यें थोड्या वर्षांपूर्वीं जी लढाई झाली तीस कांहींतरी योग्य कारण होतें काय? परंतु त्या लढाईंत तीन लक्ष पन्नास हजार फ्रेंच लोक मृत्युमुखीं पडले! व या एवढ्या मनुष्यहत्येच्या दुष्कृत्याबद्दल सेनापति मॉल्ट्क याची युद्धकौशल्याकरितां तुह्मी पुरुष केवढी वाखाणणी करीत आहां? कोणी एका गणितवेत्त्यानें असें अनुमान केलें आहे कीं, हल्लीं जगांत जेवढी मनुष्यांची संख्या आहे, तिच्या दहापट केली असतां तितकी संख्या आतांपर्यंत लढाईंत मेली असावी! म्हणजे शेंकडों कोटि पुरुषांनीं एकमेकांस आतांपर्यंत जिवें मारलें आहे. त्यांशिवाय जे लढाईंत गुलाम केले गेले ते निराळेच, व व्यापारानें ज्या स्त्रीपुरुषांस तुह्मीं गुलामगिरी आणिली ते त्यांच्या भरतीस घातले तर, गुलामांची संख्याही कोटीपर्यंत जाईल! व्यापाराच्या कामांत पुरुष किती नीच व निंद्य आचरण करितील, याची कल्पना येण्यास **काथराईन बूथ** या बाईचें चरित्र तुह्मी वाचा; विशेषतः १८८५ सालीं **अर्वाचीन ब्याबिलान**मध्यें ज्या कित्येक गोष्टी उघडकीस आल्या त्यांचें मनन करा. त्या गोष्टी वाचून आह्मां स्त्रियांचें काळीज फाटतें! या तुमच्या लढायांत व व्यापारांत आह्मीं स्त्रियांनीं कधींही अंग घातलें नाहीं, हेंच योग्य होय. असलीं दुष्कृत्यें करण्यापेक्षां मुलें संभाळीत बसणें हेंच बरें! तुमची युद्धप्रीति आणि व्यापारी वृत्ति कमी करण्याच्या कामीं आमचा आज हजारों वर्षें तुह्मांस सारखा उपदेश चालला आहे, व आतां त्याचा थोडासा परिणाम दिसत आहे.

'**काथराईन बूथ** ही बाई सर्व देशांतील सर्व राण्यांहून अधिक शूर असें मी समजतें; व **जनरल बूथ** हा जनरल **व्हॉन मोल्ट्क** व दुसरे इतिहासांतील सर्व जनरल ( सेनापति ), यांहून अधिक पराक्रमी

असें मी मानितें. त्यांनीं काढलेली **मुक्तिसेना** म्हणजे एक अपूर्व शोध होय, अपूर्व कल्पना, योजना, युक्ति होय, असें माझें मत आहे. कारण युद्ध, पराक्रम, शौर्य, धाडस, सेना, सेनापति वगैरे सांग्रामिक परिभाषेचे शब्द कानीं पडले कीं, मनुष्य-हत्या, रक्तस्राव, क्रौर्य, लुटालूट, गुलामगिरी वगैरे दुःखप्रसंग डोळ्यांपुढें उभे राहून, कोमळ अंतःकरणांस धक्का बसत असे; परंतु इतःपर मुक्तिसेनेचा उत्कर्ष होत गेल्यास तशी स्थिति उरणार नाहीं. सेनापति विद्याधर पंडित (चकित होऊं नका, तुमचें नांव तोंडाशींच होतें तेंच उदाहरणार्थ घेतलें, असो )—**सेनापति विद्याधर पंडित** आणि **कप्तान** विदुषी क्ष असें ऐकतांच, ईश्वराची आठवण होईल, श्रद्धामय अंतःकरणांतून ईश्वरप्रार्थनेचा जयघोष स्वर्गलोकापर्यंत जाऊन पोहोंचत आहे असा साक्षात्कार होईल, व ऐकणाराचें हृदय सद्गदित होऊन जाईल. मानवी संग्रामांचें भावी स्वरूप मुक्तिसेनेच्या नायकांनीं आपणांस दाखवून दिलें आहे; ह्मणूनच त्यांचा हा शोध अपूर्व आहे असें मी ह्मणतें.

'पुरुषांच्या बीभत्स न्यायसभांत, उरस्फोडीच्या व्यापारांत, हिंसाकारक लढायांत व अशाच दुसऱ्या अधम कृत्यांत आह्मां स्त्रियांस आपलें अंग ठेवितां येत नाहीं. परंतु मुक्तिसेनेसारख्या धार्मिक संस्थांमध्यें आह्मां स्त्रियांचा फारच उपयोग होणार आहे; कारण अचळ श्रद्धा, कोमळ हृदयें व भूतानुकंपा हे गुण मनुष्यजातीच्या उद्धारास जितके साह्यकारी होतील तितके तुमचे पुरुषांचे विशिष्ट गुण व्हावयाचे नाहींत. हें जाणूनच मेजर, सार्जंट, क्याप्टन, वगैरे पदव्या स्त्रियांस देण्याची अपूर्व कल्पना मुक्तिसेनेच्या नायकांनीं प्रचारांत आणिली आहे. स्त्रीधर्माच्या उत्कर्षाचीं हीं सर्व चिन्हें आहेत असें मी समजतें.

'आजपर्यंत जगांत पुष्कळ पुरुष नास्तिक बनून त्याच स्थितींत परलोकवासी झाले, परंतु कोणीही स्त्री जन्मभर नास्तिक राहिली, असें माझ्या वाचण्यांत किंवा ऐकण्यांत आलेलें नाहीं. अविचारामुळें किंवा दुःसह दुःखामुळें अल्पकाळपर्यंत नास्तिक्याचा पगडा स्त्रीहृदयावर बसेल, परंतु साहजिक प्रतिभेमुळें हें नास्तिक्य तेव्हांच विरघळून जातें व पुनः शुद्ध श्रद्धा स्त्रीहृदयांत संचरूं लागते. स्त्रियांची ही जी अचळ **श्रद्धा** ती त्यांचें पांचवें अस्त्र होय. ती-

मुळें आह्मी पुरुषांच्या मनोवृत्ति उदात्त करण्यास कारण होतों. नास्तिकांची पिढीमागें पिढी लागून नास्तिक्याचा जो जगांत प्रसार व्हावयाचा, तो दुष्परिणाम मुलांच्या बाळपणच्या संगोपनांत प्रत्येक आई दूर करिते. ह्मणूनच जगास अद्यापि ईश्वराचा विसर पडून गेला नाहीं. तुमच्या बालिश पुरुष कवींनीं मदनाचीं पांच आयुधें वर्णन केलीं आहेतच, परंतु रतीचीं जीं पांच आयुधें, ह्मणजे बोध, प्रेम, माया ( प्रवृत्ति ), क्षमा आणि श्रद्धा, त्यांचें मीं हें आतांपर्यंत वर्णन केलें.

'अखेरीस एक गोष्ट सांगून हें स्त्रीधर्माचें माहात्म्य समाप्त करितें. भविष्यत्काळीं स्त्रीधर्माचा अवश्य विजय होणार असें एक सुचिन्ह हल्लीं दिसूं लागलें आहे. मनुष्यांत श्रद्धा, प्रेम, क्षमा, वगैरे स्त्रीगुण जसजसे उत्कर्षास येतात, तसतशी त्यांच्या संततींत कन्यांची संख्या अधिक होत जाते. कनिष्ठ जातींपेक्षां वरिष्ठ जातींत कन्यांचें प्रमाण मोठें असतें. आज जीं राष्ट्रें सुधारणेंत अग्रगण्य ठरलीं आहेत, त्यांमध्यें कन्यांचें, ह्मणजे स्त्रियांचें प्रमाण वाढत आहे; व स्त्रीसंख्या पुरुषसंख्येहून बरीच मोठी आहे. ही अधिक संख्या जों जों ज्ञानादि गुणांनीं श्रेष्ठतेस चढेल, तों तों पुरुषांच्या पशुगुणांचा संहार करण्याकडे व त्यांमध्यें विशिष्ट स्त्रीगुण उत्पन्न करण्याकडे तिचा सर्व प्रयत्न, सर्व सामर्थ्य योजिलें जाईल; व त्यामुळें स्त्रीधर्माचा विजयकाळ जवळ येत जाईल. ज्या पाश्चात्य राष्ट्रांत पशुवृत्ति फार प्रबळ, स्वार्थबुद्धि फार उत्कट व जीवनार्थ कलह फार निकराचा, त्यांमध्येंच स्त्रियांची संख्या फार अधिक, ही स्थिति पाहून स्त्रीधर्माचा उत्कर्ष त्वरित व्हावा हा ईश्वरी संकेतच असावा, असें जाणून आह्मां स्त्रियांचीं हृदयें आशेनें उच्छ्वसित होतात.

'पाश्चात्यांनीं उद्योगांत किंवा नवीन शोध लावण्यांत कोणतीही कसर ठेवलेली नाहीं. त्यांस जो इतका उद्योग करावा लागतो त्याचें कारण अन्नाची कमतरता होय. आपल्या उद्योगाचीं फळें देऊन उष्ण कटिबंधांतून त्यांस अन्न व कच्चा माल न्यावा लागतो. त्यांस दुसऱ्या कोणत्याही मार्गानें जर विपुल अन्नप्राप्ति होईल, तर जिवापाड श्रम करण्याची, धाडसानें व्यापार करण्याची किंवा इतर राष्ट्रां-

शीं निकरानें जीवनार्थ कलह करण्याची त्यास आवश्यकता उरणार नाहीं. ईश्वराकडे लक्ष देण्यास व पशुगुण सोडून मनुष्यता अंगीं धरण्यास त्यांस उत्तेजन मिळेल; व ते सन्मार्गास लागतील. यावरून असें दिसतें कीं जगांत अद्यापि एक मुख्य शोध लागायाचा राहिला आहे, त्यामुळें जग हल्लीं निकृष्टावस्थेंत आहे. जगांतील सर्व रसायनवेत्त्यांनीं मिळून या एका शोधाकडे लक्ष पुरविल्यास त्यांचे जगावर केवढे उपकार होतील! हा असा शोध कोणता ह्मणाल तर कृत्रिमरीत्या उत्तम पौष्टिक अन्न तयार करण्याचा. विजेचे दिवे घरोघर होतील, पाण्याचे नळ घरोघर जातील, परंतु उत्कृष्ट अन्नरसाचे नळ जेव्हां घरोघर येतील, तेव्हां मानवी जातीच्या पर्णावस्थेचा काळ समीप येऊं लागेल. या एका शोधाची सर्व जग वाट पहात आहे. स्त्रीधर्माचा सर्वत्र विजय होण्यास हा एक शोध लागला पाहिजे. व तो जर कोणा विदुषी स्त्रीनें लाविला तर सर्व जगाची माउली, जगदंबा ही श्रेष्ठांत श्रेष्ठ पदवी तीस प्राप्त होईल. असें ईश्वर घडवून आणो, अशी आह्मां सर्व अबलाजनांची त्यास विनवणी आहे.'

---

## भाग ३३ वा.

## विवाहपद्धतीसंबंधानें एका नवीन प्रयोगाची कल्पना.

२००. याप्रमाणें येथवर उभ्याउभ्यानेंच भाषण झालें; अंधार पडत चालला व चंद्र नुकता उगवूं लागला होता. थंड वारें सुटलें होतें, तें लीलावतीस सहन होईना, तेव्हां निवाऱ्याच्या जागीं दोन मोठ्या शिळा मांडलेल्या होत्या त्यांवर आह्मी जाऊन बसलों. चहाचीं भांडीं खालीं घेऊन गेल्यापासून दंगूशास्त्र्याचा ठिकाण नव्हता, तेव्हां तो कुवांत निघून गेलासें मला वाटलें. परस्त्रीसमवेत अशा एकांताचे जागीं भाषण करीत बसण्याचा हा माझा पहिलाच प्रसंग होता; त्यांतून त्या एकांतावर रात्रीचा पडदा पडत होता त्यामुळें तो द्विगुणित भासूं लागला. अशा स्थितींत मला आपली स्थि-

ति फारच अवघड वाटूं लागली. परंतु करायाचें काय? ' आतां उद्यां बाकी विषयावर बोलूं, ' असें मीं सुचविलें मात्र, तों मी उठत आहेसें पाहून लीलावतीनें मला हात धरून खालीं बसविलें, ' येथून उठून तुह्मी क्लबांतच जाणारना, तेथें तरी गप्पाच मारायाच्या, त्या येथेंच मारूं. तुमच्या मित्रांची अद्याप घरीं जावयाची वेळ झाली नाहीं. तुह्मी ज्या कार्यभागास आलां त्याचें तर अक्षरसुद्धां बोललां नाहीं. बसा, बसा, आणखी क्षणभरानें वेळ झाली ह्मणजे जाल. तुह्मांस घरीं रागें भरणारी येथें कोणी नाहीं. '

हे शब्द ऐकून मी अगदीं पराधीन होऊन गेलों. निमूटपणें खालीं बसलों. आपल्या कार्यभागासंबंधानें मीं आशाच सोडली होती. कारण कोणीकडे लीलावती, आणि कोणीकडे दंगूभट! इच्या पायाशीं बसण्याचीही त्याची योग्यता नाहीं, असें मला वाटूं लागलें. त्याच्या सेवेचा मीं जो प्रकार पाहिला त्यावरून त्यास आत्मज्ञानानें स्वतःची योग्यता चांगली कळली आहे असें आतां मला वाटूं लागलें. तेव्हां मीं ह्मटलें. ' माझ्या त्या मध्यस्थीच्या कार्यभागास तुह्मीं जो उल्लेख केला, त्याबद्दल माझी मलाच आतां शरम वाटूं लागली आहे. माझी फजिती व्हावी ह्मणून थट्टेनें मित्रांनीं या कामांत मला घातलें असें आतां मला कळून आलें. हें त्यांनीं योग्य केलें नाहीं. त्यांत तुमचा अपमान झाला याचें मला अत्यंत दुःख वाटतें. माफ करा, या पुढें मी काळजी घेईन. '

' विद्याधरपंत, माझा अपमान होईल अशी परस्थाची थट्टामस्करी तुमचे मित्र करितील असें तुह्मांस वाटतें काय? छेः छेः, तसा त्यांचा मुळींच उद्देश नाहीं. त्यांस माझीं मतें माहीत आहेत व ते माझ्या हिताकरितां झटत आहेत, ह्मणून हें काम तुमच्यासारख्या सज्जन माणसांकडे त्यांनीं सोंपविलें. '

' भलतेंच कांहीं. तुह्मी देखील माझा उपहासच करीत आहां. तुमचें व दंगूशास्त्र्याचें लग्न? ही कल्पना देखील किळस आणिते. '

' हां, समजलें. तुह्मी अद्यापि लोकरूढीच्या अमलाखालीं आहां. माझ्या सर्व भाषणाचें रहस्य अद्यापि तुमच्या ध्यानांत आलें ना-

ह्मीसें दिसतें. स्त्रियांचा नरकवास वर्णन करून मीं एकदम त्यांच्या स्वर्गवासाकडे भरारी मारिली, त्यामुळें तुमच्या मनांत ही भ्रांति उरली.'

'तुह्मी जर पुन: विनोदच करीत असाल तर ठीक आहे. नाहींतर तुमचा भावार्थ अद्यापि माझ्या मठ्ठ डोक्यांत शिरला नाहीं असेंच ह्मटलें पाहिजे.'

'तुह्मी मठ्ठ! या ठिकाणचे दुसरे सर्व सुधारक मठ्ठ असतील, तुह्मांइतका चतुर, मर्मज्ञ, सात्त्विक माणूस येथें मला एकही दिसत नाहीं.'

'आतां मात्र कमाल झाली. तुमचें काय गूढ आहे, काय रहस्य आहे, तें तुह्मीं स्पष्ट सांगितल्याखेरीज मला कळायाचें नाहीं, इतका मी मंद आहें हें शपथपुरस्कर तुह्मांस सांगतों.'

२०१. 'भलत्याच कामांत शपथ कशास पाहिजे? तुह्मी ह्मणतां तर आतां हें रहस्य स्पष्टच सांगणें जरूर आहे. विचाराच्य उंच मनोऱ्यावर उभें राहून व स्वातंत्र्याची मनोवृत्ति अंगीकारून हें जग पाहिलें असतां नरकाप्रमाणें दिसतें, परंतु परोपकार व आशा या मनोवृत्ति प्रबळ होऊं दिल्यास हेंच जग स्वर्गाप्रमाणें दिसतें. आतां या उंच मनोऱ्यावर नित्य राहून आयुष्य काढणें इष्ट नाहीं. खालीं उतरून आपणांस जें उत्कृष्ट कर्तव्य दिसेल तें करूं लागलें पाहिजे. तुह्मां पुरुषांस स्त्रियांचीं सुखें किंवा दु:खें दिसत नाहींत हें मीं दाखविलेंच. ज्या स्त्रियांस संसारचिंतेमुळें विचार करण्यास फुरसत मिळत नाहीं, त्या आपलें वर्तन साहजिक उत्कृष्ट मनोवृत्तींनीं नियमन करून तटस्थ आहेत; परंतु मजसारख्या ज्या थोड्या अद्यापि संसारांत गोंवल्या गेल्या नाहींत, ज्यांच्या मनोवृत्तींस ज्ञान साहाय्यकारक झालें आहे, त्यांनीं स्त्रीधर्माच्या उन्नतीचा विचार केला पाहिजे. विद्या संपादून विचारमार्गास लागलेल्या अनेक विधवांस ज्या संसाराच्या अडचणी दिसतात, त्या कोठें तुह्मांस माहीत आहेत? माझेंच उदाहरण घ्या; व तुह्मी मजशीं पुनर्विवाहास तयार आहां असें समजा. तुह्मांआह्मांसारखीं दोन विचारी माणसें एकत्र झालीं कीं तीं, आज नाहीं उद्यां, एखादे क्षु-

ळक मताकरितां परस्परांशीं भांडूं लागतील. स्त्री व पुरुष एकाच गुणाचे असल्यानें त्यांच्या वैवाहिक सुखांत स्वारस्य किंवा वैचित्र्य येत नाहीं. तीं परस्परांस लवकर विटून जातात; व उभयतांही आपणांहून निराळ्या गुणांच्या माणसांशीं स्नेह करून पुष्कळ वेळ त्यांच्या सहवासांत काढतात; किंवा तितकी अभिरुचि नसेल तर दिवसेंदिवस आयुष्य विरस होत गेलें तथापि त्यांतच समाधान मानून राहतात. ही दुसरी स्थिति चांगली नाहीं. व पहिलीनें कुटुंबसुखाचा विघात होतो; कारण स्त्रीस वाटतें पुरुषाचें सर्व प्रेम आपणाकडे असावें; पुरुषासही तसेंच वाटतें; व अन्यमैत्री शंका, मत्सर आणि द्वेष यांस कारण होते. या करितां कुटुंबसुखाची वृद्धि करणारे जेवढे गुण आहेत, त्यांची स्त्रीपुरुषांत वांटणी झालेली असली पाहिजे, एकाची न्यूनता दुसऱ्यानें भरून काढिली पाहिजे. स्त्रीपुरुषांच्या विवाहांत या गोष्टीकडे लक्ष देणें अवश्य आहे.

२०२. ' तसेंच कुटुंबांत स्त्री किंवा पुरुष यांपैकीं एक सेव्य व एक सेवक झाला पाहिजे. ज्याचे गुण व कर्तृत्व कमी त्यानें सेवक व्हावें हें रास्त आहे. परंतु हल्लीं जेवढे विवाह होतात तेवढ्यांमध्यें स्त्रीस अनुरूप पति तुह्मी पुरुष पाहूं लागलां ह्मणजे जो तीहून अधिक श्रेष्ठ असेल तो पहातां, ह्मणजे नवरा अवश्य सेव्य व बायको सेवक होते. हा शुद्ध अन्याय आहे. अनुरूप शब्दाचा हा अर्थच नव्हे. जेव्हां असें दिसून येईल कीं स्त्रीच्या गुणांस अधिक उत्तेजन मिळाल्यास ती जगांत एखादें मोठें कृत्य करील व कांहीं थोडा नांवलौकिक मिळवील, तेव्हां तिचा विवाह कमी योग्यतेच्या पुरुषाशीं केला पाहिजे. तीस घरकामाची काळजी राहणार नाहीं, सर्व घरकाम पुरुष संभाळील, अशी तजवीज केली पाहिजे. मग तिचे गुणांचा विकास होईल, तिच्या कर्तृत्वाचें तेज पडेल.

' परंतु तुह्मी स्वार्थपरायण पुरुष स्वतःच्या बायकोची सेवा हीन मानितां. त्यामुळें लोकरूढीस अनुसरून सेवा व दास्य पत्करावें किंवा अविवाहित राहून आपली महत्त्वाकांक्षा साधावी, यांशिवाय गुणवती स्त्रीस तिसरा मार्गच उरत नाहीं. अनुरूपत्वाच्या या दुष्ट रूढकल्पनेमुळें अगणित स्त्रियांचे अप्रतिम गुण आतांपर्यंत शुद्ध

चुलींत गेले आहेत; व पुढेंही जाणार! ही रूढि नसती तर जगाची सुधारणा इतकीं शतकें मागें पडली नसती. सर्व देशांत व सर्व काळांत ही रूढि चालत आली आहे. तीमुळें जुन्या ग्रीसमध्यें मोठ्या गुणी स्त्रिया विवाहच करितनाशा झाल्या; त्यापेक्षां अविवाहित वेश्या राहणें त्यांनीं पत्करलें. जुन्या रोममध्येंही एका काळीं गुणी स्त्रियांस विवाह नकोसा वाटूं लागल्यामुळें, कायद्यानें त्यास उत्तेजन द्यावें लागलें. फ्रान्स, इंग्लंड, वगैरे सुधारल्या राष्ट्रांमध्यें हल्लीं हीच स्थिति दिसते. याप्रमाणें स्त्रियांच्या गुणोत्कर्षास ही रूढि बाधक आहे. बरें, स्त्रिया अविवाहित राहणें, हें सामान्य समाजास बाधक होतें. फ्रान्सची लोकसंख्या कमी होत आहे व त्यामुळें त्या राष्ट्राचें युरोपच्या कारस्थानांत जें महत्त्व आहे तें कमी होण्याचीं लक्षणें दिसूं लागलीं आहेत. हा विचार त्या राष्ट्रास शल्याप्रमाणें झोंबत आहे, परंतु उपाय काय? पुरुष आपला हट्ट सोडीत नाहींत; ते पगाराकरितां पाहिजे त्याची पाहिजे ती सेवा करितील; परंतु बायकोचें वरिष्ठत्व कबूल करून तिची मात्र तशीच सेवा करणार नाहींत. बायकोवर तोरा मिरविण्याची कोण विलक्षण हौस ही! पुरुषांच्या या हट्टामुळें, स्त्रियाही विवाह करायाचा नाहीं ह्मणून हट्ट धरितात. त्याचीं अशुभ फळें इकडच्यापेक्षां सुधारलेल्या राष्ट्रांत शतपट अधिक आहेत. तिकडील धर्माच्या मंद दृष्टीमुळें, अविवाहितांच्या नीतीचा ऱ्हास होत आहे. गर्भहत्या न व्हावी, मुलें जन्मून आर्फनेजमध्यें सुरक्षित जाऊन पोहोंचावीं, अशी तजवीज केल्यास अविवाहितांच्या व्यभिचारांत फारसें पातक नाहीं, असें मत सुधारल्या देशांत अनिवार्यपणें पसरत आहे. ही अशी स्थिति राष्ट्रीय उत्तेजनानें चालू राखिल्यास लोकसंख्या कमी होत आहे ती वाढेल असें कित्येक फ्रेंच सुधारकांचें ह्मणणें आहे.* परंतु त्याचा विचार करणें देखील नीतिदृष्ट्या अत्यंत अमंगळ आहे.

*"We are by no means disposed to recommend the re-establishment of so-called *tours*, that is official foundling receptacles, as we regard these as both immoral and inefficacious, but we are at the same time quite prepared to admit that charitable societies might establish them under certain circumstances, if they were disposed to devote their time and their money to this object." See KIDD's *Social Evolution*, App. III. p. 346.

'याकरितां पुरुषांनीं आपला हट्ट सोडला पाहिजे. नेहमींच श्रेष्ठ वर पहायाचा ही रूढि मोडली पाहिजे. स्त्रींत किंवा पुरुषांत, ज्यामध्यें विशेष गुणसंग्रह दिसेल, त्याच्या त्या गुणांच्या उत्कर्षाकरितां कनिष्ठ प्रतीचा वर किंवा वधू पाहिली पाहिजे. या सुधारणेनें हल्लींच्या अनेक अडचणी दूर होतील. विधवाविवाहास जें उत्तेजन पाहिजे आहे तें या प्रकारचें पाहिजे आहे. त्यावांचून या सुधारणेस कदापि जोर येणार नाहीं. सर्व प्रयत्न फुकट जातील. गुणी विधवा अविवाहित राहूं चहातील. ही माझी खात्री आहे ह्मणून मीं एक नवीन प्रयोग करून दाखविण्याचें मनांत आणिलें; आपल्या देशभगिनींस उत्तम उदाहरण घालून देण्याचा उद्देश धरिला. ज्या विधवांत सरस गुण असतील व त्यांस उत्कर्षास आणायाची उत्कट इच्छा असेल, त्यांनीं माझें अनुकरण करावें अशी माझी आशा होती. बाकी, ज्यांस विद्या नाहीं, बुद्धि नाहीं, दुराचारांत पडण्याची भीति वाटते किंवा आधींच वांकडें पाऊल पडलें आहे, त्या कनिष्ठ प्रतीच्या विधवांनीं वरिष्ठ प्रतीच्या पुरुषांचें दास्य पत्करावें व आपली गुणशून्यता किंवा स्वैरवृत्ति श्रेष्ठतर पुरुषाच्या पांघरुणाखालीं झांकून टाकावी हेंच उचित आहे.

२०२. 'येथील श्रीमंत सुधारलेल्या मंडळींपैकीं एकजण जेव्हां विधुर झाले तेव्हां त्यांचा व माझा विवाह व्हावा असा एकदम बूट निघाला; जणूंकाय ते विधुर होण्याचीच मंडळी वाट पहात होती! त्यावेळीं दोन चार मित्र बरोबर घेऊन ते मजकडे बोलणें करण्यास आले; मला अतोनात आग्रह केला. माझी मास्तरकी सुटेल, कांहीं विलक्षण फायदा होईल, वगैरे गोष्टी सांगूं लागले. परंतु मीं त्यांस आपले विचार कळविले; व जग आतां फार पुढें गेलें, आतां श्रेष्ठतर पुरुषाशीं विवाह करण्याचे दिवस उरले नाहींत, इत्यादि विषयांची समजूत पाडून देण्याचा प्रयत्न केला. परंतु तो सर्व फुकट गेला. त्यांची जी निराशा झाली तीमुळें ते अगदीं संतापून गेले. व ह्मणाले—' हल्लीं तुह्मी विधवा फार फाजील झालां आहां, लवकरच डोळे उघडतील, मग ताळ्यावर याल! ' यानंतर थोड्या दिवसांनीं, मजवर सूड उगविण्याकरितांच कीं काय, एका अल्पवयस्क क-

न्यकेशीं त्यांनीं विवाह केला. करोत बापडे. मीं त्यांची पैशाची घमंड आधींच ओळखिली होती; बाकी ज्ञानाची जी त्यांची घमंड, ती पोकळच होती.

२०३. 'परंतु त्याच मंडळींत जे दुसरे समंजस गृहस्थ होते त्यांस माझें ह्मणणें सयुक्तिक दिसलें. ज्या स्त्रियांच्या अंगीं विशेष ज्ञान व कर्तृत्व आहे त्यांनीं आपणांहून कनिष्ठ प्रतीच्या पुरुषाशींच विवाह करावा, हें तत्त्व त्यांस पसंत पडलें. हल्लींच्या सुधारणेच्या स्थितींत स्त्रियांस विवाहसंस्था पसंत होण्यास हा एकच तरणोपाय आहे असें त्यांस वाटूं लागलें. हें शहर सुधारणेकरितां प्रसिद्ध, तेव्हां या नवीन प्रयोगाचा त्यांस अभिमान चढला. त्यांनीं प्रयत्न आरंभिले. या शहरांत व प्रांतांत जेवढे विधुर होते त्यांची याद केली; कित्येक गरीब प्रथम वरही पाहिले. परंतु त्यांस माझे उद्देश सांगतांच पुरुषजातीचा आवेश एकदम अंगीं भरे व 'स्त्रीचे अंकित आह्मीं पुरुषांनीं व्हावें ? छे:, ही गोष्ट होणें नाहीं!' असें त्यांनीं उत्तर द्यावें. आठआठ दहादहा रुपयांचे नौकर, ज्यांस प्रसंगीं तहसिलदाराचे येथें पाणी भरावें लागतें, उष्टीं काढावीं लागतात, ते देखील आपल्या स्वत:च्या कुटुंबांत तेंच काम करण्यास नाराजी ! 'त्यापेक्षां सडे राहूं' हें त्यांचें उत्तर ! असा हा पुरुषांचा अविचाराचा हट्ट आहे.

'सर्व उपाय थकले, तेव्हां दंगूशास्त्री माझ्या पसंत पडेल काय, ही कल्पना त्यांचे मनांत आली; व त्यास ते मजकडे घेऊन आले. त्याचें ज्ञान, प्राप्ति, वगैरेबद्दल त्यांनीं मला सर्व माहिती दिली. तेव्हां मीं एवढेंच उत्तर केलें कीं दंगूशास्त्र्यानें माझी प्रीति सेवेनें संपादावी, मग मी त्यास वरीन. दंगूशास्त्र्यानें हे शब्द ऐकिले तेव्हां त्याचा आनंद त्रिभुवनांत मावेना. मला पाहूनच तो अगदीं भाळून गेला होता; त्यावेळीं त्यास देहभान राहिलें नव्हतें; तारुण्याच्या भरांत मनुष्यास असाच मोह पडतो. मींही संभाषणानें, दृष्टिविक्षेपानें व गुणांची प्रशंसा करून, त्यास उत्तेजन दिलें. दुसरे दिवशीं सकाळींच त्याची स्वारी माझे येथें हजर. 'बाईसाहेब, आपली कोणती सेवा करूं ती सांगा, मी तुमचा दासानुदास आहें, मला दुसरी दे-

वता नाहीं, या चरणीं मीं हा देह वाहिला आहे.' या अशा शब्दांनीं तो आपलें हृदय मजपुढें प्रकट करूं लागला. 'शाबास, दंगू, शाबास,' असें ह्मणून मीं त्याची पाठ थोपटली. 'बाबारे, सेवा पुष्कळ प्रकारची आहे, एक वर्षभर अभ्यास करशील तेव्हां तुझी परीक्षा उतरेल. तूर्त दोन पहाटच्या रागाचीं पदें ह्मणून घरीं जा, दुपारीं आल्यावर आणखी कामाची माहिती करून देईन.' दंगूस जें हवें होतें तेंच मीं सांगितलें. मग आपल्या गाण्यानें मला खुष करून देऊन त्यानें पुनः शाबासकी मिळविली, व शेकह्यांड करून गेला.

'दुपारीं तो पुनः आला तेव्हां त्यास मीं ह्मणालें:—'दंगू, माझा हा व्यवसाय पहा. मुलींस शिकवायाचें, मोठ्या बायकांस व्याख्यानें द्यावयाचीं, नवीं नवीं पुस्तकें वाचायाचीं, नांवलौकिक मिळेल अशा उत्कृष्ट कल्पना काढून जगाचे सुधारणेस मदत करायाची व एकंदरींत स्त्रियांची प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणें उन्नति करायाची. या कामास माझें सर्व आयुष्य पुरायाचें नाहीं. माझा वेळ महत्त्वाचा आहे. तो मला व्यर्थ घालवितां कामां नये. याकरितां आपण उभयतां विवाहित झालों ह्मणजे द्रव्यार्जनाची काळजी तुझे मागें मी ठेवणार नाहीं; परंतु तूं घरीं राहून कुटुंबाची सर्व व्यवस्था पाहिली पाहिजेस. कुटुंबांत मोठें काम मुलें सांभाळायाचें. पुरुषास आईची तोड यावयाची नाहीं, तरी देखील मुलांतच अक्षयीं खेळत बसलें तर त्यांबद्दल प्रेम वाढेल. याकरितां तूं हा अभ्यास आरंभिला पाहिजेस. माझ्या बहिणीचीं मुलें आहेतच. त्यांस रोज खेळवीत जा, त्यांच्या पोषाखाची काळजी घे, त्यांस हिंडण्यास घेऊन जा, तीं आजारीं पडलीं तर आईप्रमाणें त्यांची सुश्रूषा कर. हें एवढें साधलें ह्मणजे बरेंच काम झालें.' हा उपदेश त्याच्या मनावर तेव्हांच बिंबला, व त्या दिवसापासून सकाळीं किंवा रात्रीं गाणें बजावणें, नकला, हशा वगैरे करून त्यानें मला खुष करावें, दुपारीं चहापाणी आणून ती कामगिरी उत्तमप्रकारें उरकावी, व नंतर मुलांस खेळवीत बसावें; याप्रमाणें कांहीं दिवस क्रम चालला. माझ्या संगतीच्या हौसेनें त्यास हें काम अवघड वाटेनासें झालें.

'एके दिवशीं ताई अस्पर्श झाली, त्यामुळें सैंपाकाची पाळी म-

जवर आली; तेव्हां मीं दंगूस ह्मटलें, 'गड्या, आज तुझें गाणें बजावणें राहूं दे. आज सैंपाक करून आह्मां दोघींस तूं जेऊं घाल. सैंपाकाचा गुण फार मौल्यवान् आहे, तो त्वां शिकला पाहिजे.' घरीं तरी तो हातानेंच करीत होता. त्यास हें काम साधारण येत होतें, तसेंच त्यानें तें करून त्या दिवशीं माझी शाळेंत रवानगी करून दिली. त्या दिवसापासून ताईजवळून तो सर्व सैंपाक शिकून घेऊं लागला. एके दिवशीं दुपारीं चहा झाल्यावर आह्मी बोलत बसलों असतां मीं त्यास ह्मटलें, 'दंगू, अरे आपल्या पुढच्या गृहस्थितीचा कांहीं विचार करितोस कीं नाहीं?

'बाईसाहेब, विचार करण्याचें तुह्मीं आपल्याकडे घेतलें आहे. माझें काम तुह्मी सांगाल तसें चालायाचें.'

'ती गोष्ट खरी, परंतु अगदीं सांगकाम्या मनुष्य घर संभाळण्यास देखील लायख नाहीं. माझ्या व तुझ्या पुढच्या अडचणी तूं ओळखून त्यांची आतांपासून तर्तूद लाविली पाहिजे. मी रात्रीं विचार करीत होतें तेव्हां मला कांहीं गोष्टी सुचल्या त्या तुला सांगितल्या पाहिजेत. माझा हा व्यवसाय तूं जाणतोसच. मला मूल होऊन मी जर त्यास पाजीत बसूं लागलें, तर माझी शक्ति कमी होईल, सौंदर्य जाईल, मागें एक लचांड लागेल, व मनास व्यग्रता आणणारीं अनेक कारणें उत्पन्न होतील. माझें आयुष्य कमी होईल असें समज. तेव्हां मुलास पाजणारी दाई ठेवण्याइतका मजजवळ संचय होण्यास कित्येक वर्षें लागतील. या अडचणीचा कांहीं विचार कर.

'त्या दिवशीं तो क्लबांत गेला तेव्हां ही अडचण त्यानें मंडळीस सांगितली; व वर्षेंचीं वर्षें नुसत्या आशेवर मी कसा लोंबत राहूं असा त्यांस प्रश्न केला. त्याचा ऊहापोह होतां होतां एक दाई ठेवण्याचा खर्च भागेल इतकी वर्गणी गोळा करून देण्याचें मंडळींनीं ठरविलें. त्याप्रमाणें तीन हजारांचे आंकडे तावडतोब पडले; व त्यांच्या व्याजांतून आह्मीं नौकर ठेवावा किंवा दाई ठेवावी व संतति बंद झाल्यावर त्या रकमेचा हवा तो उपयोग करावा अशा शर्ती ठरल्या.

' पुढें कांहीं दिवसांनीं आह्मी एकत्र बसलों असतां माझी चर्या व्यग्र पाहून दंगूनें मला विचारलें ' बाईसाहेब, आज तुमच्या जिवास समाधान दिसत नाहीं याचें कारण काय ? ' तेव्हां मीं त्यास उत्तर केलें, ' काय, गड्या, या आपल्या विवाहाचा विचार करावा तितका तो कठीणच दिसतो. आज मी एक नाव्हल वाचीत असतां असाच विवाहाचा विषय निघून माझे मनास मोठा धक्का बसला. अरे, तूं पाहतोसच कीं हल्लींची माझी प्राप्ति या एवढ्याशा कुटुंबासही चांगल्या सभ्यतेनें राहण्यास पुरत नाहीं. आपणांस मुलें होऊं लागलीं ह्मणजे त्यांचे संबंधानें नित्य नवा खर्च उत्पन्न होणार; त्यांचे कपडेलत्ते आहेत; औषधपाणी आहे; विद्याभ्यास आहे. हे सर्व खर्च भागवायाचे कसे ? आपण आपले हाल करून घेतल्यावांचून हें शक्य नाहीं. आतां ताईचीं मुलें मोठीं होत चाललीं, त्यांचीच मला काळजी पडली आहे. मी शाळामास्तरीण, मला हल्लींच पगार देत आहेत तो कमिटीस भारी वाटतो, तेव्हां पुढें बढतीची आशाच नको. प्राप्ति वाढल्यावांचून कुटुंब तरी वाढवायाचें कसें ? ही केवढी मोठी अडचण आहे ?

' बरें, ती एकीकडे ठेविली तरी देखील भविष्य फारसें मनोहर दिसत नाहीं. बाळंतपणांत कितीक स्त्रिया जन्माच्या रोगी होतात, किंवा मरण पावतात हें तुला ठाऊक आहेच. मी जर जन्माची रोगी झालें, तर मला कामावर कोण ठेवील ? तुझी भिक्षुकी तरी कोठें कायमची आहे ? जर अशी कांहीं अडचण आली तर तूं भिक्षा मागून कां माझें व मुलांचें पोट भरणार ? जी गोष्ट होऊं नये ती झाली व मी एखाद्या बाळंतपणांत गचावलें, प्राणांस मुकलें, तर तूं मुलांबाळांस घेऊन कोठें जाशील, त्यांची काय वाट होईल ? कदाचित् तुला कांहीं वेडेंवांकडें झालें तर मी आपला व्यासंग सोडून मुलें खेळवीत बसूं कीं काय ? या अडचणी मला अनिवार्य दिसून माझें मन खिन्न होत आहे. तूं इतकी जिवापाड सेवा करीत असून तुझी निराशा तरी कोणत्या तोंडानें करूं असेंही मनांत येतें. या अडचणींस तोड तरी काय काढावी ? "

' हे शब्द ऐकून दंगूचें हृदय कासावीस झालें. तो मला मिठी

मारून रडण्याचे बेतांत आला, परंतु त्याचें निवारण करून त्यास मीं थोडा धीर दिला. त्या दिवशीं क्लबांत हाच विषय त्यानें काढला. मंडळीस ही अडचण खरी आहेसें वाटलें. तेव्हां बराच विचार झाल्यावर असें ठरलें कीं माझ्या व दंगूच्या आयुष्यांचा विमा उतरायाचा. त्याची रक्कम पांच पांच हजार ठरली. विम्याचे वार्षिक हप्ते मंडळीच्या सामान्य खर्चांतून द्यावयाचे असें ठरविण्यांत आलें. शिवाय, प्रत्येक मूल एक वर्षाचें झालें ह्मणजे मंडळींनीं एक हजार रुपये वर्गणी करून आह्मांस नजर करावे, असाही ठराव झाला. यावरून तुह्मांस दिसून येईल कीं या आमच्या विवाहाच्या कामीं मंडळी हट्टास पेटल्यासारखी झाली. या नवीन वैवाहिक प्रयोगाचें महत्त्व त्यांच्या पुरें पुरें मनांत बिंबलें, व माझ्या भावी कर्तृत्वावर त्यांनीं पक्का भरंवसा ठेविला.

'दुसरे दिवशीं पहाटेस दंगू गायन करून मला उठविण्यास आला, तेव्हां त्याची आनंदी मुद्रा पाहून मीं मनांतील भाव ओळखला. गायन संपल्यावर त्यानें सर्व हकीकत मला सांगितली. तेव्हां मीं त्यास ह्मटलें 'आपणां उभयतांचा विवाह व्हावा ही मंडळीचीच नव्हे, ईश्वराची इच्छा दिसते.' तो ह्मणाला, 'परंतु, बाईसाहेब, आतां कांहीं नव्या अडचणी मात्र काढूं नका.' 'अरे वेड्या, मी बुद्ध्या कां त्या काढतें; त्या सहज लक्षांत येतात, त्यास काय उपाय आहे! मीं आतांपर्यंत ज्या अडचणी काढल्या त्यांपासून तुझें कांहीं नुकसान झालें कीं फायदा झाला, हें मला सांग.' 'बाईसाहेब, फायदा झाला खरा, परंतु प्रत्येक प्रसंगीं एकेक अडचण ऐकून जीव कसा थरारत होता. काळीज फाटत होतें. ही अडचण कशी दूर होणार असें वाटून जीव निराशेनें गलबलून जाई.' 'बरें, असो, आतां तर मोठ्याशा अडचणी दिसत नाहींत; याकरितां येत्या आदितवारीं चार मित्र मंडळी घेऊन ये, ह्मणजे विवाहाचा पक्का निश्चय करूं.' हा आदितवार येण्यास दोन दिवस मध्यें होते, परंतु ते दंगूस दोन वर्षांप्रमाणें वाटले असतील. आदितवारीं मंडळी जमून या विषयाचा विचार करूं लागली, तेव्हां मीं त्यांचे आभार मानून बोलण्यास सुरवात केली.

२०४. " मंडळींनो, या विवाहसमारंभाचा मी आतांपर्यंत विचार करीत आहें. त्यावरून माझें एक मत झालें आहे, तें असें कीं हा विवाह जुन्या पद्धतीनें होऊं नये. माझें अष्टपुत्री नसण्याचें किंवा अंतर्पाटाच्या आड उभें राहण्याचें आतां वय नाहीं. शिवाय, वराती, वेणवाजे, वगैरे ढोंगें कशास पाहिजेत? आपणांपैकीं कोणाचीही चालू हिंदुधर्मावर श्रद्धा नाहीं. तेव्हां मंत्रतंत्र, सुपाऱ्यांची पूजा, वगैरे सर्व करीत बसण्यांत शुद्ध दंभ दिसेल. याकरितां माझी अशी इच्छा आहे कीं आह्मां उभयतांमध्यें करारपत्र व्हावें, व तुह्मां सर्व मंडळींचे देखत म्याजिस्ट्रेटपुढें त्यावर आह्मी शपथ घेऊन सह्या करूं. स्वयंवराच्या प्राचीन पद्धतीचें हेंच योग्य आधुनिक स्वरूप आहे. हा करार वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाल्यानें बाकी सर्व काम होईल.

" याप्रमाणें विवाह लावण्यांत अनेक फायदे आहेत. जर पूर्वींच्या पद्धतीनें संस्कारपूर्वक विवाह केला तर आजच उभयतांसही लोक वाळींत टाकतील. परंतु वर सांगितल्या प्रकारचा स्वयंवरविधि केल्यास जुने लोक त्यास विवाह असें समजणार नाहींत. दुसरें कांहीं वेडेंवाकडें नांव देतील, देईनात बापडे ! आह्मां पतिपत्नींचीं आचरणें जोंवर शुद्ध आहेत, तोंवर आह्मीं त्यांच्या वल्गनांस कां भ्यावें ? परंतु त्या जुन्या लोकांनीं हा विवाहच नव्हे असें ठरविल्यास, आह्मांपैकीं कोणासही वाळींत टाकण्याचें त्यांस कारण उरणार नाहीं; आह्मांस ते कदाचित् दुराचारी ह्मणतील, परंतु असल्या दुराचाराकरितां, अथवा धडधाकट व्यभिचाराकरितां, कोणासही वाळींत टाकण्याचा परिपाठ नाहीं. जेव्हां आह्मांस संतति होईल तेव्हां हा वाळीचा प्रश्न निघणार. तेव्हां तरी दंगूस वाळींत टाकण्याचें कारण नाहीं; मला टाकतील तर त्याचें मी पाहून घेईन. आमच्या प्रभूजातीची मंडळी अधिक समंजस आहे; अधिक सुधारलेली आहे; त्यांस पुनर्विवाहाचें तत्त्व मान्य होत चाललें आहे; तेव्हां त्यांचें समाधान करण्याचें काम माझें. दंगूस वाळींत टाकण्यास आपण होऊन ब्राह्मणजातीस कां कारण करून द्यावें व विनाकारण गवगवा माजवावा ? त्यांनीं हा विवाहच नव्हे, असें ह्मणणें आज श्रेयस्कर

आहे. आमच्या मुलांस कांहीं वंशपरंपरेनें जहागिरी मिळायाच्या असत्या तर गोष्ट निराळी होती.

" आतां पुढें संततीचा विचार करायाचा. ही संतति धड ब्राह्मण ना प्रभू अशी होणार. ती एका मधल्या जातीची समजल्यास कांहीं हरकतच नाहीं. हल्लींच्या काळीं जातिभेदाचें महत्त्व व्यवहारांत मुळींच बाधक होत नाहीं असें दिसतें. बरें, या संततीस शूद्र असें जुने लोक समजूं लागले तरी काय मोठीशी हरकत आहे ? जर पुनर्विवाहानें वरिष्ठ जात सुटते, वधूवर शूद्र होतात, असें जुने लोक समजत असले, तर खुशाल समजोत. ज्या दिवशीं ते आह्मांस जातिबाह्य करितील, त्या दिवशीं त्यांकडून जे सामाजिक फायदे आह्मांस मिळायाचे तेही बंद होतील; मग पुढें त्यांच्या मतांची पर्वा करण्यांत फायदा तो काय ? शूद्रांत गणना होऊं लागली तर त्यांतही एक प्रकारें फायदाच आहे. आपणां सुधारकांचें या विवाहानंतर कर्तव्य काय तें मात्र समजावून घेऊन त्याची बजावणी तुह्मीं केली पाहिजे. निवडक वरिष्ठ जातींत—ह्मणजे ब्राह्मण, शेणवी, प्रभू वगैरेमध्यें—जेवढे विवाह होतील तेवढ्या सर्वांनीं जातीसंबंधानें भिन्नभाव मनांत ठेवूं नये. सर्वांची एकच जात समजावी. जुने लोक सर्वांपासूनच अलग होतात, परंतु पुनर्विवाहितांनीं तरी एकमेकांत आणखी जातिभेद उपस्थित करून अलग राहूं नये. जात मोठी व व्यापक करण्याचा सांप्रतच्या स्थितींत हा एकच उपाय आहे. आणखी पन्नास वर्षें तरी जातिभेदाच्या जुन्या कल्पना नष्ट होणार नाहींत. एवढ्या काळपर्यंत सर्वांनीं एकजीव करून राहिलें पाहिजे व आपआपसांत विवाह आरंभिले पाहिजेत. सारांश, (१) पुनर्विवाहास ब्राह्मणपद्धति जोडण्यांत फायदा तर नाहींच, उलट नुकसान आहे. (२) स्वयंवरपद्धति अंगीकारावी हेंच मला अत्यंत योग्य दिसतें, परंतु स्वयंवराचें हल्लींच्या काळास उचित असें रूपांतर मात्र करून घ्यावें; शिवाय (३) पुनर्विवाहितांनीं आपसांत तरी जातींचें शल्य राहूं देऊं नये, याप्रमाणें माझ्या सूचना आहेत."

२०१. ' माझ्या सर्व सूचना मंडळींस मान्य झाल्या व विवाहाचा दिवस ठरायाचें मात्र राहिलें. दंगूची सेवा दिवसानुदिवस

अधिक मन:पूर्वक होऊं लागली. माझ्या प्रकृतीस तो फारच जपूं लागला. एके दिवशीं मी आपली विवाहित स्थिति डोळ्यांपुढें आणून विचार करीत असतां 'नकोगे नको' असे शब्द कानीं पडल्यासारखें होऊन जीव थर्र झाला. ही अकस्मात् प्रेरणा कशामुळें झाली? या विवाहाच्या व्यवस्थेंत कोठें गौण राहिलें? अंतर्यामास कां समाधान नाहीं? असा मी विचार करीत असतां एक अडचण मला सुचली. 'हा दंगूशास्त्री शुद्ध फटिंग, यास आगा ना पिच्छा; सुधारकांच्या खुष्मस्करीनें राहण्याची यास संवय लागलेली. यास वेश्यांचे वरीं जाण्याची फार दिवस चटक आहे; त्यांतही कांहीं सुधारक याचे गुरु. गांज्याचें व्यसन यानें सोडलेलें दिसतें, परंतु येथें घरांत स्वस्थ बसून पोरें खेळविण्याची पाळी आली ह्मणजे, न जाणों, तें पुन: उत्पन्न होईल. हे त्याचे सर्व दुर्गुण विसरून गेलें, तथापि एक प्रश्न राहतो. तो हा कीं पतीच्या नात्यानें पांच चार वर्षें माझी संगति करून, माझे स्वरूपास विटल्यावर व दोन चार मुलांची काळजी मागें लागल्यावर, नित्यच्या सेवेस कंटाळून हा पळून गेल्यास काय करावें? किंवा इतर लोकांप्रमाणें नवऱ्याचा अधिकार गाजवून माझा अपमान करूं लागला, किंवा कदाचित् मारहाणही केली, तर त्याचें गाऱ्हाणें न्यावें कोणाकडे? कोण तें ऐकून येईल? पुनर्विवाह जुना झाला ह्मणजे त्याचें महत्त्व संपलें, मग त्यास कोणी विचारीत नाहीं! अशा प्रसंगीं मला त्यापासून विभक्त व्हावें लागेल. तो मुलें माझ्या गळ्यांत बांधून आपली फटिंगवृत्ति अनुसरणार. हा अशिक्षित मनुष्य पडला. कोणींही त्यास आपल्या नादीं लावावें; एखादे वेळीं कुचाळीखोर मंडळींनीं स्त्रीदास्याबद्दल त्याचा उपहास केला व तो सहन न होऊन त्यानें डोक्यांत राख घातली व पळून गेला तर काय करावें? जगांत विघ्नसंतोषी माणसें काय कमी आहेत? दुनिया शुद्ध तमासगिरांनीं भरलेली आहे, त्यांस नित्य नवा तमाशा व फटफजिती पहायास हवी. त्यांतून माझा व्यवसाय श्रेष्ठ; शिक्षकाचें काम; नुसती फजितीच नव्हे, काय आणखी भयंकर परिणाम होतील हें सांगणें कठीण! छे: छे:! 'नको, लीले, या संकटांत पडूं नको!' ह्मणून पुन: अंतर्यामांतून प्रेरणा आली. परंतु आतां हा नाद सो-

डला तर मंडळींस तोंडघशी पाडल्यासारखें होईल. तेव्हां करावें तरी काय ? या संकटांतून सुटकेचा मार्ग कोणता ?' याप्रमाणें पुष्कळ विचार केला; अखेरीस अशी एक युक्ति सुचली कीं दंगूजवळ दहा हजारांचा जामीन मागावा. ज्या दिवशीं विवाहाच्या करारनाम्यांतील एकही शर्त तो मोडील, त्या दिवशीं त्याचा माझा संबंध तुटला व माझ्या नुकसानीबद्दल जामिनानें दहा हजार रुपये मोजिले पाहिजेत. याप्रमाणें हा माझा निश्चय झाल्यावर, मीं एकएका मित्रास एकेके वेळीं गुप्तपणें बोलावून ही नवी अडचण त्यास समजावून दिली. ती खरी आहे अशी सर्वांची खात्री झाल्यावर त्यांकडून ती दंगूसही कळविली. त्याची योग्यता सर्वजण जाणतच होते, तेव्हां कोणीही त्यास जामीन उभा राहीना. असला मनुष्य पांच वर्षांनीं कसा वागेल याची खात्री आज कोणीं द्यावी ? ही अडचण दंगूस ज्या दिवशीं कळली त्यादिवशीं त्यानें येथें केवढा आकांत केला ! किती शपथा वाहिल्या; पायां काय पडला; हरतऱ्हा केली. परंतु मीं आपला निश्चय सोडला नाहीं.

येथपर्यंत हा सर्व वृत्तांत तुम्हांस सांगितला. मी आपला हेका सोडीन म्हणून कांहीं सुधारकांस व खुद्द दंगूस अद्यापि वाटत आहे; म्हणून त्यांचा नाद अजून चालू आहे. परंतु इकडे माझी वृत्ति बदलत चालली आहे. मला दंगूच्या सेवेचा वीट येत चालला आहे. त्यास हा विवाह जितका हवा, तितका तो मला नको, अशी खरी स्थिति आहे. माझें त्यावर प्रेम नाहीं. तो मला प्रेमानें बांधूं पहात आहे, मी त्यास तिरस्कारानें झिटकारीत आहें. विवाहाचे कामांत हें मोठें व्यंग नाहीं काय ? हें माझ्या आधीं कां ध्यानांत आलें नाहीं ? आतां काय करूं ? दंगूस केवळ निराशेचें दुःख आहे. मला निराशेचें दुःख तर आहेच, पण त्याशिवाय आपली विचारसरणी कोठें तरी चुकली, नाहींतर पश्चात्ताप होण्यासारखें वर्तन कदापि हातून घडलें नसतें, असें वाटून अत्यंत खेद होतो. कोठें चूक आहे तें कळत नाहीं. कोणास ती विचारूं ? कोण ती दाखवून देईल ? '

याप्रमाणें बोलत असतां तिला गहिंवर आल्यासारखें झालें; कंठ दाटून येऊन शब्द हळू हळू तोंडांतून निघूं लागले; व ते मला ऐकूं

येणार नाहींत असें वाटूनच कीं काय, ती माझे अगदीं शेजारीं येऊन बसली. तेव्हां मीं चकित होऊन तिच्या तोंडाकडे पाहिलें, तों डोळे अश्रूंनीं भरून आलेले दिसले. मला तिची दया आली; माझ्याही हृदयास उमाळा येऊन ऊर धडधड करूं लागलें. तिच्या त्या दु:खित चेहऱ्यावरून दृष्टि हलेना. इचें कसें सांत्वन करूं, काय इला सांगूं, कोणती इची चूक ह्मणून दाखवूं, याच विचारांत मन इतकें गर्क होऊन गेलें, कीं मी आपलें भान विसरलों. पुढें तिनें माझा हात धरून जेव्हां भाषणास अगदीं हलक्या आवाजानें सुरवात केली तेव्हां मी पुन: शुद्धीवर आलों.

२०६ 'विद्याधरपंत, हा आयुष्याचा प्रश्न फार गहन आहे! मीं तो सोडविला असें समजत होतें, पण तें सर्व खोटें. मला वाटतें तो विचारानें सुटण्याचा संभवच नाहीं. वाघ पाहिला नाहीं तोंवर अमुक युक्ति करायाची, इतकें धैर्य अंगीं आणायाचें, असें शस्त्र धरायाचें, वगैरे सर्व विचार ठरून जातात; सामान्य लोकांप्रमाणें पळायाचें नाहीं असा दृढ निश्चय होतो; परंतु प्रत्यक्ष वाघ पाहतांच सर्वांगाची गाळण होते, पाय आपण होऊन पळूं लागतात, सर्व निर्धाराचे विचार बाजूस राहतात! विचारानें कर्तव्यें ठरवूं लागलें ह्मणजे असें होतें; सामान्य लोकांवर कडी करून दाखविण्याचा निश्चय होतो. परंतु प्रत्यक्ष क्रिया करण्याचा प्रसंग आला, ह्मणजे पाऊल मागें पडतें, धैर्य पळतें, विचारांचा गोंधळ होतो, दृष्टि मंद होते, कर्तव्य अस्पष्ट होतें, व सामान्य माणसांत आणि विचारी माणसांत भेद उरत नाहीं. विचारी माणसावर भरंवसा ठेवून अविचारी माणूस जें बेधडक काम करील तें खुद्द विचारी माणसाच्यानें होणें नाहीं. हत्यारें पाजळणारा मनुष्य जसा शूर असण्याचें कारण नाहीं, तसेंच कर्तव्यांचा विचार करणारा त्या कर्तव्यांस अनुसरेल असा नियम नाहीं. विचार आणि क्रिया यांचें पूर्ण साहचर्य अशक्य आहे. या विचारानें मन उदास होतें. या अशा संवयीनें विचार शिखरास जाऊन पोहोंचतात व क्रिया वेळेस निकृष्टतर होत जातात. अशी माझी स्थिति झाली आहे. माझीं कर्तव्यें मला अस्पष्ट झालीं आहेत; दुसऱ्या स्त्रियांचीं मात्र स्पष्ट दिसूं लागलीं आहेत. मी कोणता परा-

क्रम करणार हें कळत नाहीं, दुसऱ्या संसारांतील स्त्रिया नित्य कसा पराक्रम दाखवीत आहेत हें मात्र मी जाणतें. मला रस्त्याचा शेवट दिसतो, परंतु पुढच्या पावलीं काय आहे तें दिसत नाहीं. ह्मणून एकवेळ वाटतें **भरंवसा** आणि **धैर्य** हे गुण श्रेष्ठ, पुनः वाटतें, छेः ते पशूंचे गुण, विचारच श्रेष्ठ. या शंकेच्या पेंचांतून तुह्मीं तरी मला सोडवा. या अनाथ अबलेस अशा दुर्घट प्रसंगीं हात द्या '–असें ह्मणून तिनें माझा हात घट्ट धरिला.

२०७ ' तिसरे प्रहरीं दंग माझ्या मागें उभा होता व तुह्मी समोर बसलां होतां, तेव्हां तुह्मी चकित झाल्यासारखें दाखविलें. त्याक्षणीं माझें मनही चरारलें. एक माझा पति होणारा दास, दुसरा केवळ प्रवासी मित्र,–दोहोंमध्यें केवढें अंतर ! तुह्मीं संभावित व कुलीन, तो केवळ खुष्मस्कऱ्या; तुमची शांत प्रसन्न मुद्रा, त्याची संकटांत पडल्यासारखी अस्थिर वृत्ति; तुमच्या अंतःकरणांत परोपकाराचे उदात्त विचार, त्याच्या हृदयांत विषयवासनांचा कल्होळ; तुमच्या थोरवीमुळें मीं तुमच्याशीं नम्रपणें बोलावें, व त्याच्या कमी योग्यतेमुळें त्यास तिरस्कारानें हलक्या कामांस लावावें–अशा या प्रकारचें अंतर इतक्या स्पष्टपणें पूर्वीं कधींही माझ्या डोक्यांत शिरलें नव्हतें. तत्काळ, या अशा दोन व्यक्तींपैकीं कोणाचा स्नेह इष्ट गणावा? कोणाचें प्रेम संपादावें? कोणाच्या संगतींत आयुष्य घालवावें?–हे प्रश्न डोळ्यांपुढें उभे राहिले–तात्पर्य, स्वातंत्र्य कीं दास्य,नम्रता कीं तिरस्कार, काय पाहिजे? असा मनोदेवतेनें प्रश्न विचारला.मीं मोठ्या कष्टानें त्या वेळीं आपलें धैर्य राखिलें. उचंबळलेल्या मनोवासना दाबून धरल्या. आपलें सत्त्व संभाळलें. परंतु आपला सर्व वृत्तांत तुह्मांस सांगितल्यावर आतां त्याच मनोवासना अधिकच तीव्रतेनें उसळल्या आहेत; मन भ्रांत झालें आहे; काय करूं हें समजत नाहीं. मी पराधीन झालें आहे. मला तारा. " असें ह्मणून आतां पडते कीं काय असें होऊन घाबरून तिनें माझे अंगाचा आसरा घेतला; व तशा स्थितींतच थोड्या वेळानें पुनः हळू हळू बोलूं लागली.

" तुह्मी पुरुष स्त्रियांपुढें नम्र होणार नाहीं, आमचे दास होण्याचें पत्करणार नाहीं ! हा तुमचा अभिमानाचा डोंगर महंमदाकडे

चालून येत नाहीं; तेव्हां उपाय काय ? महंमदानें त्याकडे गेलें पाहिजे. आह्मीं स्त्रियांनीं तुह्मांपुढें नम्र झालेंच पाहिजे आं ? तुमच्या स्वभावास अभिमान खिळून गेला आहे. आह्मांस सुसंगति हवी असल्यास आह्मीं आपला अभिमान सोडावा व योग्य पुरुष पाहून त्यास नम्रतेनें कवटाळावें, हेंच स्त्रियांच्या नशीबीं आहे काय ? तूर्तच्या काळीं तरी 'आहे' असें ह्मणणें भाग पडतें. परंतु आमचाही काळ येईल. हा तुमचा अभिमानाचा डोंगर झरून जाईल. मग तरी तुह्मी स्त्रियांच्या आधीन व्हाल. या दूरच्या आशेवर आह्मीं आज प्रसंगोचित वागलें पाहिजे. आलीया भोगासी असावें सादर !'

२०८. असें बोलून ती हताशपणें बराच वेळ गप्प राहिलीसें पाहून मीं ह्मटलें: 'लीलावती, मला वाटतें सर्व गुणांत नम्रतेसारखा अवश्य आणि हितकारक दुसरा गुण नाहीं. या गुणानेंच जग चाललेलें आहे. राजापासून रंकापर्यंत प्रत्येक व्यक्तीस एक एक तरी नम्र होण्याचें ठिकाण पाहिजे असतें. सर्व काळ अभिमान बाळगून कोणाचेंही चालायाचें नाहीं. खऱ्या कर्तव्यतेचे ज्ञान नसलें तरीदेखील कोठेंना कोठें नम्रता दाखविल्याखेरीज मनुष्याचें समाधानच व्हावयाचें नाहीं. कर्तव्यतेचें ज्ञान झाल्यावर मग तर नम्रता वाढतच गेली पाहिजे. म्हणून कोणीही पुरा अभिमानी नाहीं, कोणीही पुरा नम्र नाहीं. जसा अभिमान तशीच नम्रता, मनुष्यमात्राच्या स्वभावास खिळून गेलेली आहे. एवढेंच कीं प्रत्येकाचे नम्रता प्रकट करण्याचे प्रसंग निराळे, स्थळें निराळीं. अगदीं रानटी लोक मातापितरांचे हाल करितील, परंतु एकाद झाडापुढें किंवा दगडापुढें अगदीं नम्र होतील. याहून थोडें अधिक शहाणपण आलें ह्मणजे मातापितरांपुढेंही ते नम्र होतील. पुढें आपल्या टोळीच्या नायकापुढें नम्र होतील. जसजसा मनाचा विकास होईल तसतशी नम्रता वाढतच गेली पाहिजे. युरोपांत कांहीं शतकांपूर्वीं केवढाले शूर व क्रूर अभिमानी सरदार होऊन गेले ! परंतु तेच आपल्या राजाराणींपुढें केवढें नम्रत्व दाखवीत होते ! व राजेराण्या तरी धर्मप्रवर्तकांपुढें किती नम्रता दाखवीत होत्या ! अलीकडे विचार वाढल्यानें व्यक्तींव्यक्तींमध्यें साम्याची कल्पना वाढली आहे, त्यामुळें पूर्वीं जी नम्रता व्यक्तींपुढें प्रकट होत असे, ती आतां

कांहीं उत्कृष्ट कल्पनांबद्दल प्रकट करायाची तऱ्हा सुरू झाली आहे. कोणी देशाभिमानाच्या कल्पनेस वश होऊन तनमनधन देशास अर्पण करून नम्रता प्रकट करितो. कोणी तसाच परोपकाराच्या कल्पनेस वश होतो व आपलें सर्वस्व त्या कामीं लावतो. कोणी ईश्वराच्या कल्पनेस प्रबळ करून आपलें हृदय ईश्वरास नम्रपणें अर्पण करितो. घरांत देखील पुरुषानें स्त्रीपुढें व स्त्रीनें पुरुषापुढें नम्र होण्याचे प्रसंग आहेत. मनुष्यांमनुष्यांत जेवढे संबंध आहेत तेवढ्या सर्वांत अभिमानाचे पाठीस नम्रता लागली आहे. मजहून कोणी श्रेष्ठ नाहीं, असा पूर्ण अभिमान कोणांत भरला, तर तो फार दिवस टिकायाचा नाहीं. जगाचे अनुभवच अशा प्रकारचे आहेत कीं, एका नाहींतर दुसऱ्या मार्गानें अभिमानाचा नित्य पाडाव होत असतो व नम्रतेची साहजिक वृद्धि होत असते. जगांत अनेक गुण आहेत; व ते सर्व एका ठिकाणीं कधींही वास करीत नाहींत. एकेक गुण भिन्न व्यक्तींत बऱ्याच अंशीं पूर्णावस्थेस येऊन आपलें तेज पाडतो; त्या व्यक्तींस अभिमानास जागा होते, परंतु दुसऱ्यांचे तसेच दुसरे गुण पाहून व त्यांची आपणांत न्यूनता जाणून, त्या अभिमानाचा लवकरच परिहार होतो. नम्रतेवांचून कोणताही मानवी संबंध सुखावह होत नाहीं. प्रत्येक संबंधांत भिन्न प्रसंग आहेत. त्या प्रसंगीं एकास दुसऱ्यापुढें नम्रता दाखवावी लागते; म्हणजे, **प्रत्येकास दुसऱ्याचे संतोषाकरितां व हिताकरितां आपला अभिमान एकीकडे ठेवून कष्ट करावे लागतात.** जेव्हां स्त्रीच्या समाधानाकरितां पुरुष नित्य श्रम व उद्योग करूं लागतो, तेव्हां तो स्त्रीपुढें वांकला नाहीं काय ? त्यानें आपलें स्वातंत्र्य गमाविलें नाहीं काय ? तो आपल्या अभिमानास विसरला नाहीं काय ? 'कांहो, कां इतकी जिवापाड महिनत करितां ?' असें विचारल्यास तो काय उत्तर देईल ? जें कांहीं उत्तर देईल त्याचा भावार्थ हाच कीं नाहीं ? कीं 'मी स्त्रीवश आहें, कुटुंबाचा दास आहें.' राजासही मी प्रजेचा नौकार आहे असें वाटतें. उभें रहावें, हात जोडावे, पायां पडावें, म्हणजे मात्र नम्रता प्रकट होते असें समजणें, म्हणजे मनाचा कोतेपणा होय. दुसऱ्याच्या संतोषाकरितां व हिताकरितां मनुष्य झटूं लागला ह्मणजे अर्थात्

तो परवश झाला, दास झाला, नम्र झाला. ज्यास जगांत सुखी व्हावयाचें असेल त्यास कोणत्या तरी प्रकारची नम्रता अंगीं धरिल्याखेरीज गत्यंतरच नाहीं असें मी समजतों. तेव्हां तुह्मी नम्रतेचे काळ, स्थळ, प्रसंग मनांत आणा, सेवेचे अनेक प्रकार लक्षांत घ्या, ह्मणजे नम्रतेनें कोणासही सोडलें नाहीं असें दिसून येईल. जेवढी उत्कृष्ट संगति, तेवढी स्वतः कष्ट सोसून दुसऱ्यास सुखी करण्याची बुद्धि अधिक, ह्मणजे नम्रता अधिक. **सुसंगति** आणि **नम्रता** यांची कधींही ताटातूट होत नाहीं. ”

२०९. हे माझे शब्द ऐकून लीलावती बराच वेळ स्तब्ध राहिली; परंतु ती कांहीं गूढ विचारांत गढून गेली आहे, असें मला वाटलें. अखेरीस तिनें मला एकदम गळांमिठी मारली व ह्मणाली,—‘ आजपर्यंत असे सुविचाराचे शब्द मीं कोणाचेही तोंडून ऐकले नव्हते. माझी कोणीं कानउघाडणी केली नव्हती. माझ्या बुद्धीचा गर्व वाढावा हीच सर्वांची इच्छा ! मला नम्रतेचा अर्थच कळत नव्हता. होय ! सुसंगति आणि नम्रता यांची कधींही ताटातूट होत नाहीं; हें खरें, परंतु कुसंगति आणि नम्रता यांची मात्र निरंतरची ताटातूट आहे व ती मीं गेल्या चार वर्षं पुरी पुरी अनुभवली आणि उन्मत्त होऊन गेलें. विद्याधरपंत, तुह्मीं या लीलीवर आज केवढे उपकार केले आहेत ! केवढ्या भावी दुःखांतून तुह्मीं मला सोडविलें आहे ? इतःपर कुसंगति करणार नाहीं, नम्र राहीन असें अभिवचन देतें, परंतु तेवढ्यानें तुमचे उपकार फिटायाचे नाहींत. हें त्या उपकारांचें फळ होय, फेड नव्हे. मला तुह्मीच अनृणी होण्याचा उपाय सांगा. मी तुमच्या पायांशीं नम्र आहें. सर्वस्वीं तुह्मांस गुरु केलें आहे. एवढा वेळ हाच विचार माझे मनांत सारखा घोळत होता. गुरु किंवा बंधु यांहून निकट संबंध तुह्मांआह्मांमध्यें शक्य दिसत नाहीं. हेंच खरेंना ? अथवा तुह्मीं कशास सांगायास हवें ? हेंच खरें. माझें दुर्भाग्यच सांगत आहे. मी तुमच्या गळां पडलें हा तुह्मी अतिप्रसंग मानूं नका; मी देहभानावर नाहीं. प्रेमानें परवश झालें आहे. जन्मापासून आज मीं माझा जिवाचा बंधु पाहिला, त्यास कां कडकडून भेटूं नये ? बुडतें माणूस तरत्यास जशी मिठी मारतें, तशी ही माझी मिठी आहे.

मी फार कोठें मागतें आहे ? पूर्ण बंधुप्रेम मला द्या. मला सन्मार्गास लावा. मला सुसंगति घडूं द्या. तुमच्या पायीं नम्र होऊं द्या.' असें ह्मणून पायीं पडणार तों तीस मीं सावरलें. क्षणभरानें ती देहभानावर आली. जन्मभर बहिणभावांचें नातें राखायाचें अशा आमच्या प्रतिज्ञा झाल्या व नंतर चित्तास स्वस्थता आल्यावर आह्मी बागेंतून परत वळलों. पुढें मीही लागलींच बिऱ्हाडीं गेलों. बराच उशीर झाला होता.

---

## भाग ३४ वा.

## मातापितरांशीं विद्वानांचें वर्तन कसें असावें ?

२१०. बिऱ्हाडीं तात्यासाहेब माझी वाटच पहात होते. जेवण्याची सर्व तयारी झाली होती. तेव्हां त्या रात्रीं आमचें फारसें बोलणें झालें नाहीं. मी अंथरुणावर पडल्यावर नाना प्रकारचे विचार माझे मनांत आले. आज मोठ्या संकटांतून सुरक्षितपणें मी बाहेर पडलों, असें मला वाटूं लागलें. कारण, मला प्रथम पाहिल्यापासूनच लीलावतीचे वृत्तींत फरक पडत चालला. आपलीं मतें मला ग्राह्य करायास लावावें व आपलें बुद्धिवर्चस्व स्थापावें याकरितां, मध्यें मध्यें माझी थोडी स्तुति व थोडा आदर करून, ती मला खुलविण्याचे स्त्रीचातुर्याचे प्रकार योजीत असेल असें प्रथम मला वाटलें. परंतु पुढें पुढें तसें वाटेनासें झालें. आपल्या मनांत कांहीं कुशंका आल्या असें आपणच प्रकट करणें, ह्मणजे, न जाणों, तीस विनाकारण दुःख दिल्यासारखें होईल ह्मणून तसें करण्याचें माझें धैर्य झालें नाहीं. अखेरीस सभ्यतेचा अतिक्रम झालाच. मी विवाहित परस्थ माणूस होतों, ह्मणूनच तिच्या पाशांतून सुटलों, नाहींतर तिनें मला खास मोहांत पाडलें असतें. असा कांहीं चमत्कारिक प्रसंग येऊन गुदरला होता. परंतु त्याचा शेवट गोड झाला. विशेष संतोषाची गोष्ट ही कीं अशा विदुषीशीं कायमचा बंधुभाव झाला. तिचें वाचन व बहु-

श्रुतपणा पाहून मी आश्चर्य करूं लागलों. संस्कृत, इंग्रजी व फ्रेंच ग्रंथ तिनें वाचलेले हाते. विचाराची शैलीही अप्रतिम होती. बंधु ह्मणून अशा स्त्रीचा सहवास असल्यास मनाची उन्नति अवश्य व्हावयाची.

बरें, त्यावेळीं नम्रतेचें महत्त्व एकदम लक्षांत येऊन मी जें, पूर्वीं कांहीं विचार न करितां, अस्खलित बोलूं लागलों, ती प्रेरणा कोठून आली! दिगंबर महाराजांशीं जीं संभाषणें झालीं त्यांचा तो परिणाम होय असें मीं ठरविलें. अगदीं पूर्वींच्या व आतांच्या माझ्या विचारांच्या स्थितींत केवढें अंतर पडलें हें! सुसंगतीचें हें फळ होय. परंतु आपण कोणत्या कामास गेलों होतों व काय करून आलों? आतां पुढें लीलावती दंगूची संगति कायम ठेवील काय? त्याशीं विवाह करायाचा नाहीं हा तिचा पहिलाच निर्धार होता तो आतां पक्का झाला; व तोही माझ्या तेथें जाण्यामुळें. वाहवा! करायास गेलों एक व घडून आलें भलतेंच. लीलावतीची योग्यता माहीत नव्हती तोंवर दंगूच्या विवाहाचें यश आपणांस आलें तर आलें, असा माझा पहिला बेत; तिची थोर योग्यता पाहिल्यावर या विवाहाचे बाबतींत बरें किंवा वाईट कांहींच बोलूं नये, हा दुसरा बेत; व अखेरीस माझ्या उपदेशानें या विवाहाची मुळींच शक्यता नाहींशी झाली, हा परिणाम. चिंतावें एक व घडतें दुसरेंच ह्या तत्त्वाचा मला खासा अनुभव आला. मीं जर झालेला वृत्तांत कोणास सांगितला तर लोकांची काय समजूत होईल? कोणीही मजवर विश्वास ठेवणार नाहीं. तेव्हां दंगूच्या संबंधांत असें असें थोडेंसें बोलणें झालें, बाकी वायफळ गप्पा झाल्या असें सर्वांस सांगितलें पाहिजे. दंगूची पुढें काय स्थिति होणार? आपला हा चमत्कारिक नाद तो सोडून देईल कीं त्या पायीं वेडा होईल? कोणीं काय सांगावें?

२११. या व अशाच दुसऱ्या कल्पनांनीं फार वेळ माझें मन व्यग्र राहिलें. अखेरीस झोंप लागली, तीमध्येंही लीलावतीच्या संबंधाचींच स्वप्नें पडलीं. दुसरे दिवशीं तात्यासाहेब व दंगू हे जेव्हां हकिकत विचारूं लागले तेव्हां इकडचे तिकडचे शब्द जुळवून ती मीं कशी तरी त्यांस दिली. दंगूनें हा नाद सोडून द्यावा हें बरें, असा

त्यास नानाप्रकारें मीं उपदेश केला. निराशेचें बीज त्या दिवशीं मीं त्याचे मनांत पक्कें पेरलें. नंतर मी तेथें होतों तोंपर्यंत लीलावतीचे येथें संध्याकाळच्या चहाचें बस्तान ठेविलें. मजबरोबर एकही दिवस दंगू आला नाहीं. रोजचे रोज जें संभाषण होत असे त्यांत मीं आपल्या आयुष्याचा तीस बराच वृत्तांत सांगितला, व तिचाही ऐकून घेतला. निरनिराळ्या मतांसंबंधानें आमचा वादविवाद व्हावा व दिगंबर महाराजांचीं कित्येक मतें मीं तीस ग्राह्य करावयास लाविलीं. त्यामुळें महाराजांचें दर्शन घेण्याची तीस उत्कट इच्छा झाली. पूर्वींची पुनर्विवाहाची कल्पना तीस आतां अगदीं त्याज्य वाटूं लागली. आपलें आचरण पूर्णपणें सात्त्विक करायाचें हा तिचा निश्चय ठरला. स्त्रीधर्मासच पुरुषांनीं सात्त्विकवृत्ति हें नांव दिलें आहे, असें ती आतां ह्मणूं लागली, कारण तिचें ह्मणणें कीं प्राचीन व अर्वाचीन इतिहासांतील कोणाही पुरुषांत सात्विकवृत्ति सांपडणार नाहीं, परंतु अनेक स्त्रियांत ती सांपडेल.

"सीता, सावित्री, अनुसूया, या प्राचीन स्त्रियांचीं चरित्रें वाचलीं असतां, असें दिसतें कीं सात्त्विक कर्तव्यतेची जी खरी व्याख्या ती त्यांनीं, संसाराचीं दुःखें सोशीत असतां, आपल्या आचरणांत व्यक्त केली; संसारांत राहून सात्त्विक गुणांस—ह्मणजे, 'शमो दमस्तपः शौचं क्षांतिरार्जवमेव च' या गुणांस,—अत्युदात्त स्वरूप आणून दाखविणें हें स्त्रियांवांचून इतरांस शक्यच नाहीं. ज्ञान, विज्ञान व आस्तिक्य हे गुण पुरुषांत भरपूर येतील, परंतु बाकीचे गुण अंगीं आणण्याकरितां पुरुषांस संसार सोडून वैराग्य धारण केलें पाहिजे, रानांत जाऊन राहिलें पाहिजे, सारांश शमदमादि गुण बळेंच अंगीं आणण्याकरितां विकारहेतु ज्या योगें उत्पन्नच होणार नाहींत किंवा टाळतां येतील, अशा प्रकारचें आयुष्य आरंभणें भाग आहे. परंतु 'विकारहेतौ सति विक्रियंते येषां न चेतांसि त एव धीराः ।' ही सात्विक धैर्याची श्रेष्ठावस्था आहे. सर्व विकारांचे आगर ह्मणजे जो संसार, त्यांत राहून स्त्रिया सर्व सात्विक गुण प्रकट करितात, हें केवढें आश्चर्य आहे ! ह्मणून सात्त्विकता हा वास्तविक स्त्रीप्रणीत धर्म आहे. व इतःपर तोच मी अंगीकारणार. पूर्वीं बाणाची कादंबरी

वाचीत असतां महाश्वेतेचें ज्ञान, तिचे उत्कृष्ट विचार, सदोदित शुद्ध आचरण, चंद्रापीडाशीं खरा सात्त्विक स्नेह व कादंबरीवर पूर्ण प्रेमभाव, हे व दुसरे तिचे अनेक गुण पाहून अशी स्त्री जगांत असूं शकेल काय, ह्मणून शंका मनांत येऊन मीं वारंवार विचार करीत बसावें. सात्त्विक वृत्तीचा तेव्हां मजमध्यें आतांप्रमाणें उदय झाला नव्हता, मला तिचें ज्ञानच नव्हतें, त्यामुळें महाश्वेतेसारखी स्त्री होणें नाहीं असें मला वाटत असे. परंतु आतां तुह्मी चंद्रापीड भेटलां, तेव्हां मलाही महाश्वेतेचें व्रत स्वीकारून सर्व तामसी विकारांचा बींमोड केला पाहिजे. निदान इत:पर या प्रयत्नास मी लागणार, नाहींतर माझी मनुष्यता पूर्णावस्थेस येणार नाहीं. ”

२१२. त्या दिवसापासून तिनें कादंबरी वाचून तीवरून कोणतीं धर्मतत्त्वें सुचतात याविषयीं विचार आरंभिला. तिचें मला वारंवार सांगणें असे कीं ज्यास खऱ्या मानवी धर्माचें ज्ञान पाहिजे असेल, त्यास तत्त्वग्रंथ, वेदांत, इतिहास, इत्यादिक वाचून कांहींएक फायदा होणार नाहीं. उत्कृष्ट कवींचीं काव्यें त्यानें वाचावीं. मनुष्यजातीच्या उत्कृष्ट विचारांचें, आचरणांचें, मनोवासनांचे, सर्व मौल्यवान् भांडार काव्यांत आहे. इतिहासादिकांत मनुष्यप्रेरित कृत्यें मनुष्यबुद्धीनें चांगलींवाईट ठरविलेलीं असतात. परंतु काव्यांत उत्तम मनुष्यास जी अंत:स्थ ईश्वरी प्रेरणा होत असते, तिनें तो सर्व कार्यें करीत आहे असें दाखविलें असतें. ही अंत:स्थ ईश्वरी प्रेरणा सर्व धर्मांचें व नीतीचें मूळ आहे. ती काव्यांतच शोधिली पाहिजे. या विषयासंबंधानें आमचा पुष्कळ वादविवाद झाला. अखेरीस हें तिचें मत मला ग्राह्य झालें. भारत, रामायण, बायबल, बुद्धचरित्रें, हीं सर्व काव्यांमध्यें गणायाचीं असें आह्मीं ठरविलें.

२१३. एके दिवशीं लीलावतीकडून शहरांतील सर्व प्रसिद्ध गृहस्थांची मीं माहिती करून घेतली व त्यांपैकीं उत्तम सुविचारी गृहस्थ कोण तें तीस विचारिलें. सुधारक मंडळीपैकीं कोणीही सुविचारी नाहीं असें तिनें मला सांगितलें. कोणी द्रव्यानें उन्मत्त झाले आहेत; कोणी नवें तें चांगलें ह्मणून इंग्रजांचें अनुकरण करीत आहेत; कोणी राज्यकारणीं महत्त्वाकांक्षेत आपला जीव व्यर्थ शिणवीत

आहेत; सर्व कामांत अविचार सुरू आहे. जुन्यांत जुना व नव्यांत नवा, सर्वांस पूज्य असा एकच गृहस्थ येथें दिसतो असें ती ह्मणाली. तो गृहस्थ कोण ह्मणून विचारतां एक श्रीमंत घरंदाज पेन्शनर सदाशिवराव भाऊ ह्मणून तेथें होता त्याचें नांव तिनें मला सांगितलें. तेव्हां त्याकडे जाऊन त्याशीं संभाषण करण्याचा मीं निश्चय केला. तो तात्यासाहेबांचा आप्तच होता व त्यांनीं मजबद्दल भाऊसाहेबांस आगाऊ माहिती देऊन ठेविली. त्यांकडे जाण्यास अमुक वेळ सोईची व अमुक गैरसोईची असें मुळींच नव्हतें. तेव्हां एके दिवशीं दुपारचे वेळीं मी त्यांचे येथें गेलों. ते नुकतेच निजून उठले होते. त्यांची मुद्रा कांहींशी रामचंद्रपंतांप्रमाणें होती; परंतु रामचंद्रपंतांप्रमाणें व्रत-नियम वगैरेकडे त्यांचें लक्ष असेल असें मला वाटलें नाहीं. त्यांनीं मला स्वागतपूर्वक मोठ्या आग्रहानें लोढाशीं बसविलें व आपणही जवळ बसून प्रकृति, मुलेंबाळें वगैरे संबंधाचे खुशालीचे प्रश्न विचारले.

इतक्यांत घरांत एक तान्हें मूल किंकाळ्या फोडीत आहे आहे असें त्यांनीं ऐकिलें तेव्हां ते उठून गडबडीनें घरांत गेले; व ‘ काय या बायकांस करावें !’ असें संतापून बोलतच त्या मुलास घेऊन बाहेर आले. मूल गोरेंगोमटें दीड दोन वर्षांचें होतें व आजोबांनीं पोटाशीं धरल्यापासून त्याचें रडणें बंद झालें. भाऊसाहेबांनीं आपल्या उपरण्यानें त्याचे डोळे, नाक वगैरे स्वच्छ पुसून त्यास खेळवून आनंदांत आणण्याचा प्रयत्न आरंभला. त्यास त्यांनीं हातांत धरून उंच करावें, खालीं ठेवावें, खांद्यावर घ्यावें, डोक्यावर बसवावें, त्याशीं त्याच्या बालभाषेंत बोलावें; व तें खदखदां हासूं लागलें ह्मणजे त्याचे मुके घेऊन त्यास खालीं ठेवावें. याप्रमाणें त्यांचा खेळ पहात मी बराच वेळ बसलों. मला फारच कौतुक वाटलें व आपणांकडे त्या मुलानें यावें ह्मणून मींही हात पुढें केले. परंतु माझ्याकडे तें येईना, ह्मणून तो नाद सोडून दिला. मुलास खेळवीत असतां मी त्यांकडे आलेला ते विसरले कीं काय असें मला वाटलें; इतकें त्यांचें चित्त दंग होऊन गेलें. कांहीं वेळानें मूल थकलेंसें पाहून त्यास त्यांनीं मांडीवर घेऊन थोपटण्यास आरंभ केला. क्षणभरांत

तें झोंपीं गेलें व मग भाऊसाहेब जणूं काय देहभानावर येऊन माझी माफी मागूं लागले. तेव्हां ' त्यांत काय आहे ? मुलें अशींच संभाळलीं पाहिजेत ' वगैरे सामान्य उत्तरें मीं दिलीं. तीं ऐकून मला पुत्रप्रेम माहीत नाहीं असें त्यांस वाटलें. ते ह्मणाले.—

२१४. " तुह्मी अद्यापि तरुण आहां, स्त्रीवश आहां, तुह्मांस दूरदृष्टि आली नाहीं. सुधारणेविषयींचे तुमचे विचार परिपक्क झाले नाहींत. मी ह्मणतों याचा राग मात्र येऊं देऊं नका. **सर्व सुधारणेचें बीज संततींत पेरून द्यावें व तें वाढूं लागलें ह्मणजे त्याची योग्य तेवढी छाटाछाट करण्याचें काम आपण करावें.** अशा योगानें सुधारणा होते. ज्यानें उठावें त्यानें कांहीं तरी लोकविरुद्ध कृत्य आरंभून लोकांपासून विभक्त होण्यांत कशाची सुधारणा आली आहे ? अशा योगें जी प्रत्यक्ष ह्मणून सुधारणा दिसते ती पोकळ असते, व त्या पोकळ सुधारणेचा समाजावर फारच थोडा चांगला परिणाम होतो. हें तत्व स्पष्ट करण्यास बराच वेळ लागेल. तुह्मांसारख्या तरुणांस तें मान्य होईल कीं नाहीं ही शंकाच आहे. आह्मी आतां वृद्ध झालों. आमचे कर्तृत्वाचे दिवस गेले. आह्मीं मुलें खेळविण्याचें काम करावें असें तरुण पिढीस वाटतें; व तेंच योग्य आहे. "

२१५. मग मुलाचे अंगावर परम प्रेमानें हात फिरवून, त्याच्या सुखस्पर्शानेंच प्रेरित होऊन ते ह्मणाले—" हा एवढासा हाडामांसाचा गोळा आहे, परंतु केवढें याचें प्राबल्य आहे! याचा जो कुटुंबावर जुलूम आहे, तेवढा अगदीं क्रूर राजाचाही आपल्या प्रजेवर नसतो. याचें अंग इतकें कोमळ, यास वाचा नाहीं, हें सर्वस्वी पराधीन, रडण्याखेरीज याजवळ दुसरें शस्त्र नाहीं, तरी याचा केवढा जुलूम आहे ! **मार्दव** आणि **पराधीनता** हे स्त्रियांचे विशिष्ट गुण होत, त्यांनींच त्या बलिष्ठांस जिंकतात. परंतु त्या दोन गुणांचा अगदीं अर्क ह्मटला ह्मणजे तान्हें मूल होय, तें बलिष्ठांस व दुर्बलिष्ठांस, पुरुषांस व स्त्रियांस, दोघांसही जिंकतें, व दोघांसही आपलें दास्य करायास लावितें. प्रथमच मूल झालें ह्मणजे तुह्मां तरुणांस त्याचा तिटकारा येतो, राग येतो तुह्मांस कोणीं न सांगतां कळतें कीं

'अरे, आपणांवर जुलूम करणारा प्राणी जन्मास आला रे आला. आतां हा आपली तारुण्याची स्वैरवृत्ति चालूं देणार नाहीं!' बाह्यात्कारीं तुह्मी असें दाखवितां कीं मूल बायकोचे गळ्यांत, आपणांस त्याची बिलकुल फिकीर नाहीं; परंतु त्यानें किंचाळी फोडली कीं तुमचें अंत:करण कळवळतें, काय पोराचे हाल चालविले आहेत ह्मणून संतापून तुह्मी त्याचें सांत्वन करायास जातां, व बायकोवरचें प्रेम विसरून तीस रागावून क्रूर शब्द बोलतां! तिनें कां मुलाची उपेक्षा केली याचा विचार करण्यास तुह्मांस फुरसत कोठें आहे? कुटुंबांत जेवढीं माणसें आहेत तेवढ्यांनीं या तान्ह्या बाळाचें दास बनलेंच पाहिजे. त्यास संभाळतां संभाळतां मुलें कंटाळून पळून जातात. स्त्रिया त्याच्या सुखाकरितां आपलें सर्व काम एकीकडे ठेवितात; त्याच्या हागमुताची किळस मानिनातशा होतात, त्यानें त्यांचीं आंतडीं तोडावीं, रात्रभर झोंप येऊं देऊं नये, कांहीं काम सुचूं देऊं नये, जिवास कोणतेंही सुख लागूं देऊं नये, त्याचा सर्व जुलूम सोसलाच पाहिजे—त्या मुलास आईची दया न माया! पुरुषांवर त्याचा कमी अंमल आहे असें समजूं नका. त्यास समजाविण्याकरितां तुह्मी आपलेपाशीं घ्या मात्र, ह्मणजे मग तुमचा सर्व संभावितपणा एकीकडे राहतो. तें तुह्मांस लववील तसें लवलेंच पाहिजे. तुमचें बाळपण तुह्मी विसरलां असतां, तें मुलाच्या नादानें तुह्मांस क्षणभर पुन: परत मिळतें. मूल तुमची शेंडी ओढील, मिशा उपटील, कान धरील, त्यास कोण प्रतिबंध करणार! तें आपलें अंग मळवून तुह्मांस मलिन करील; तुह्मी ह्मणाल 'धन्यास्तदंगरजसा मलिनीभवंति।' तें मूल बोट दाखवील तिकडे तुह्मांस गेलें पाहिजे. तें मागेल तें त्यास दिलें पाहिजे. त्यानें आपलें रडण्याचें शस्त्र काढूं नये ह्मणून, तुह्मी त्यास कडेवर घ्याल, खांद्यावर ठेवाल, डोक्यावर बसवाल; त्यास घेऊन गरगर फिराल; आपण घोडा बनून त्यास चाबूकस्वार कराल; त्यास मांडीवर घेऊन थोपटून 'अंगाई' ह्मणून बायकांसारखे स्वर काढाल! त्याच्यासारखें बोबडें बोलाल, वेडावणें दाखवाल, नाचाल, उड्या माराल, काय करणार नाहीं कोण जाणे! याप्रमाणें ही मुलाची सेवा आहे. ती मुलाची

किंचाळी जे जे खेळ तुह्मांकडून करविते, ते दुसरा कोणी तुह्मांकडून जबरदस्तीनें करून घेईन ह्मणेल, तर तुह्मी प्राण गेला तर करणार नाहीं! मुलाची ही सेवा जुलमानेंच आपण पत्करतों असें नाहीं; त्यांत फार आनंद आहे. संभावितपणाचे सामाजिक निर्बंध आपणांस क्षणमात्रही स्वातंत्र्य देत नाहींत; तें स्वातंत्र्य मुलाच्या संगतीनें आपणांस प्राप्त होतें. आपलें बाल्य आपण पाहिलें नसतें तें मुलाशीं एकजीव होऊन आपणांस अनुभवितां येतें. मुलाचें हास्य, त्याचा स्पर्श, त्याचे बोबडे बोल, त्याची सर्व कृति आनंददायक आहे. खऱ्या सात्त्विक प्रेमाचा अनुभव मुलास उराशीं धरून त्यास हसवून त्याची आनंदित मुखचर्या पाहण्यांत आहे. त्या प्रेमानें मात्र खरोखर हृदय द्रवतें व देहभान हरपतें.

२१६. आपल्या मातापितरांनीं, बहीणभावंडांनीं व आप्तांनीं आपणांकरितां किती कष्ट भोगिले असतील, आपलें किती दास्य केलें असेल, आपल्या संगतींत किती आनंद मानला असेल व त्यांच्या निरपेक्ष प्रेमास नित्य केवढा पूर येत असेल, या गोष्टींची कल्पना प्रत्येक तरुणास अवश्य आली पाहिजे; व ती यावी ह्मणून त्यानें तान्ह्या मुलाचे जे सोहाळे कुटुंबांत चालतात त्यांचें उत्तम अवलोकन केलें पाहिजे. हें ज्ञान त्यास आल्यास तो स्वैर होणार नाहीं. मातापितरांचा व आप्तांचा मान ठेवील व त्यांस अविचारानें किंवा उन्मत्तपणें दुःख देण्यास तयार होणार नाहीं. ज्यांनीं आपणांकरितां सुखदुःख समान करून अगणित श्रम केले, त्यांसच दुःख देण्यास कोणीही सुज्ञ मनुष्य कारण होईल काय? विशेषतः, मुलगा कृतज्ञ होईल या आशेनें ज्यांनीं आपली सर्व प्राप्ति त्यास सुशिक्षित करण्यांत खर्च केली व द्रव्याचे संबंधानें, किंबहुना उपजीविकेसंबंधानें, स्वतःस ज्यांनीं पराधीन करून घेतलें, त्यांशींच कृतघ्नता कोण करील? कोणी शुद्ध पशु असेल तर तो करील! मुलांस विद्वान् केल्यावर ते आपला अपमान करितील, असें पुष्कळ जुन्या लोकांस अनुभवानें कळून आलें आहे; परंतु त्यांची कृतघ्नता त्यांकडे, असें मनांत आणून ते मुलांच्या विद्याभ्यासाकरितां लागेल तो खर्च करितात; विधवा स्त्री आपली पदरमोड

करिते; कित्येक भिक्षा मागून मुलांचें पोट भरतात. तेव्हां विद्वानास त्याची विद्या आप्तांनीं निस्पृहपणें दिलेली असते, असें सिद्ध होतें. आपल्या मानापमानाची फिकीर न करितां आपला मुलगा ज्ञानानें आपणांहून सवाई व्हावा ह्मणूनच त्यांचा प्रयत्न असतो. या प्रयत्नास सिद्धि येऊन मुलास सवाई ज्ञान आलें कीं त्यानें मातापितरांस 'तुह्मी कसे इतके अडाणी हो!' असें तिरस्कारानें व आश्चर्यानें ह्मणावें काय? मातापितरांत सौजन्य फार मोठें असतें, आपण मुलांवर केलेल्या उपकारांबद्दल ते त्यापाशीं शेखी मिरवीत नाहींत. नाहींतर, ज्यास वडील माणसांच्या अज्ञानाबद्दल आश्चर्य वाटतें, त्यास वडील माणसें असें उत्तर देणार नाहींत काय? 'बाबारे, तूं ज्ञाता झालास याचें भूषण तुला नाहीं. जें द्रव्य व जे श्रम आह्मीं तुला ज्ञाता करण्यांत खर्च केले, तेच स्वत: ज्ञान संपादन करण्याकरितां आह्मीं खर्च केले असते, तर तूं महामूर्ख व आह्मी मोठे ज्ञानी झालों असतों. परंतु तुझें हित स्वहितापेक्षां आह्मांस अधिक श्रेयस्कर वाटलें; आमच्या भांडवलावर तूं विद्याप्राप्ति केली आहेस. तुजवर आह्मीं जे उपकार केले आहेत त्यांची गणती नाहीं. तूं पशु असशील तरच उपकाराची फेड अपकारानें करशील. आह्मीं तुझें हातीं शस्त्र दिलें म्हणून तूं आमचेच गळे कापणार काय? धिक्कार असो तुझ्या ज्ञानोन्मादास!' या प्रकारचें त्यांनीं भाषण केल्यास त्यास विद्वान् गृहस्थ काय उत्तर देईल? परंतु मातापितर जेवढें सौजन्य व मौन धरतात, तेवढा विद्वानास अधिकच आवेश चढतो. तो त्यांच्या दु:खास कारण होतो. पदोपदीं त्यांच्या आज्ञा मोडतो. त्रयस्थांचे किंवा अल्पवयीं मुलांचे समोर त्यांचा अपशब्दपूर्वक उपमर्द करितो. हें इष्ट नाहीं, अशानें कोणताही समाज सुधारत नाहीं. नीति व सदाचार यांची उन्नति न होतां हानि मात्र होत जाते.

२१७. याप्रमाणें मुलें खेळविण्याच्या प्रेमकृत्यापासूनही एका मोठ्या नीतितत्त्वाचा बोध विचारी मनुष्यास होण्यासारखा आहे, तें तत्त्व **कृतज्ञतेचें** होय. परंतु विचारास अवलोकनाचा पाया पाहिजे. विद्वानांमध्यें अवलोकनशक्ति नाहीं; ह्मणून त्यांचे विचार अंतराळांत मोठे सुभग दिसतात, भूपृष्ठावर, ह्मणजे समाजांत, ते आणिले कीं

फिक्के पडतात. बहुधा त्यांमुळें दुराचारांस आरंभ होतो. याकरितां अवलोकन करण्याची शक्ति मुलांच्या शिक्षणाचाच एक भाग गणिला पाहिजे. ज्यांस ती असेल त्यांनीं आपण अवलोकिलेल्या गोष्टी दुसऱ्यांचे मनावर बिंबवून दिल्या पाहिजेत. राज्यसंबंधीं, इतिहाससंबंधीं, शास्त्रसंबंधीं, शृंगारसंबंधीं, व असल्याच सर्व विषयांसंबंधीं ज्ञान होण्यास पुष्कळ स्वतंत्र ग्रंथ आहेत; परंतु कृतज्ञता उत्पन्न करण्यासारखा ग्रंथ कोणींही विद्वानानें लिहिलेला नाहीं. कारण इकडे त्यांचें अवलोकनच नाहीं. कृतज्ञता हा गुण फार व्यापक आहे. याच्या समाधानाचें आद्यस्थान मातापितर होत. बंधुभगिनी, कुटुंबांतील, कुलांतील, ज्ञातींतील माणसें, सर्व सत्पुरुष, देशाचे राज्यकर्ते व सर्व देश किंवा सर्व मनुष्यजात, हीं क्रमानें मातापितरांच्या नंतर कृतज्ञतेस पात्र होतात. कृतज्ञतेच्या दृष्टीनें सर्वांशीं योग्य वर्तन ठेविलें तर सदाचाराचा बहुतेक भाग त्यांत येईल. याकरितां मुलांचें कोंवळें मन आहे तेव्हांपासून तीं कर्तीसवर्ती माणसें होईपर्यंत त्यांवर कोणकोण, किती व कसा उपकार करीत आहे, हें त्यांस शिकविलें पाहिजे. कृतज्ञतेनें वागण्याची त्यांस नित्य संवय लाविली पाहिजे. कृतज्ञता जागृत असेल, तर कुटुंबांत, समाजांत किंवा देशांत गैरशिस्त वर्तन होण्याचा थोडा संभव उरतो. या कृतज्ञतेच्या तत्त्वास **सत्य, प्रेम** आणि **दया**, हीं जोडल्यास नीतीचीं सर्व तत्त्वें त्यांत आलीं. कृतज्ञता, सत्य, प्रेम आणि दया यांचें क्रमानें महत्त्व दाखवीत गेलें पहिजे. त्या योगें ईश्वरापासून अगदीं रंकापर्यंत कोणाचाही आपाले हातून अपमान होणार नाहीं, कोणासही पीडा होणार नाहीं, यथाशक्ति यथामति योग्य कर्तव्यांस आपण दक्ष राहूं. या रीतीनें आपण व आपल्या भोंवतालचें जग सुखी व समाधानी राखण्याचें श्रेय आपणांस येईल. याप्रमाणें मुलांच्या व मोठ्यांच्या शिक्षणांत या चार तत्त्वांची मातबरी दाखविण्याचा सर्वत्र प्रयत्न सुरू झाल्याखेरीज, मुलें सुशील व विनयी होणार नाहींत; त्यामुळें समाजांत व कुटुंबांत कलह, दुःख व असमाधान हीं उत्पन्न होत राहतील, खरी सुधारणा ह्मणून होणार नाहीं. परंतु उन्मत्त विद्वानांस ही गोष्ट कोणीं समजावून द्यावी ? हल्लींच्या शिक्षणपद्धतींत हीच मोठी न्यूनता किंवा

मोठा दोष आहे. त्यामुळें समाजाची तूर्त तरी हानि होत आहे."

---

## भाग ३५ वा.

### समाजाचें साहजिक स्थित्यंतर. बालविवाहाचें उदाहरण.

२१८. "कृतज्ञता, सत्य, प्रेम आणि दया, हीं चार तत्त्वें सर्व नीतीच्या मूळाशीं आहेत. मनुष्यस्वभावांत तीं पूर्णपणें रुजलेलीं आहेत. त्यांचा पूर्ण उत्कर्ष करणें हेंच व्यक्तिमात्रांचें कर्तव्य आहे. जर सर्व सुधारणा या मूळतत्त्वांस पूर्णता आणण्याकरितां योजिल्या, व त्यांचे परिणाम समाजास हितकारक आहेत असें दाखविलें, तर त्या आपोआप घडून येतात. त्यांस विरोधच होत नाहीं.

कृतज्ञतादि चार मनोवृत्तींस मनुष्यानें कां वश व्हावें, दुसऱ्यांस कां होऊं नये, याविषयीं वाद करण्याचे दिवस गेले. व्यवहारांत त्यांची सर्वश्रेष्ठता मान्य न करणें, ह्मणजे आपली मानासिक हानि प्रकट करण्यासारखें आहे. या चार मनोवृत्ति स्वतःच्या बुद्धीस थोर वाटतात, व समाजांत त्यांची थोरवी फारच मोठी गणिली जाते. यावरून या मनोवृत्तींच्या श्रेष्ठतेबद्दल एकमत आहेसें दिसतें व त्यांची स्वाभाविक प्रेरणा मनुष्यसमाजाच्या सुखाकरितां आहे असें सिद्ध होतें. आतां या मनोवृत्तींच्या मूळ उत्पत्तीबद्दल थोडा मतभेद आहे; त्या मनांत अशा बळकटपणें रुजण्याचें कारण कोणी उत्क्रांति समजतात व कोणी ईश्वरी प्रेरणा समजतात; यांपैकीं कोणचेंही मत ग्रहण केलें तरी या मनोवृत्तींच्या अंतिम परिणामांसंबंधानें एकमत होतें. हे परिणाम दोन आहेत. एक असा कीं समाज सुखी, समाधानी व सुव्यवस्थित राहतो; दुसरा असा कीं समाजाचें अस्तित्व उत्तरोत्तर अधिक शाश्वत होत जातें; अथवा, समाजाचें स्थैर्य व शाश्वती हा एकच मुख्यत्वें परिणाम होतो असें ह्मटल्यास हरकत नाहीं.

कारण, समाज सुखी व समाधानी नसेल तर तो विस्खळित

होऊन निकृष्टावस्थेस जाण्याचा व कालांतरानें नष्ट होण्याचा संभव आहे. समाजांतील व्यक्तींचें बालपणापासून पालन, पोषण, वर्धन व शिक्षण सर्वकाळ अशा तऱ्हेनें झालें पाहिजे कीं जी जी पुढील पिढी यावयाची ती ती कर्तृत्वानें मागच्या पिढीहून अधिक शक्तिमान् होत गेली पाहिजे. असा पिढ्यांचा क्रम चालत राहील तरच प्रत्येक पिढी जीवनार्थ कलहांत आपला बचाव करून जातीची शाश्वती राखील. समाजाच्या स्वाधीन जी भौतिक संपत्ति असते ती नियमित असते; प्रत्येक पुढच्या पिढींत मनुष्यसंख्या अधिक होते, व तिच्या मानानें आवश्यकता वाढतात. जी भौतिक संपत्ति स्वाधीन आहे तीवरच सर्वांचा निर्वाह होण्यास प्रत्येक व्यक्तींत अधिक कर्तृत्व आलें पाहिजे. जेव्हां ज्ञानसंग्रह अधिक करावा व श्रमही अधिक करावे, तेव्हां कर्तृत्व वाढतें. मागच्या पिढीनें पुढच्या पिढीस अधिक ज्ञानी व कर्तृत्वशील होण्यास मदत केलीच पाहिजे, नाहींतर जातीची शाश्वती रहायाची नाहीं. **पुढच्या पिढीस मदत करण्यांत मागच्या पिढीस सुखही वाटलें पाहिजे; ह्मणूनच पुढील पिढींत कृतज्ञतादि गुण वागले पाहिजेत.** या गुणांचें महत्त्व कमी झाल्यास, समाजाचें सुख कमी कमी होत जाईल व त्याच्या शाश्वतीस धक्का बसेल. याकरितां हे गुण उत्तरोत्तर पूर्णावस्थेस नेण्यांतच समाजाचें हित आहे.

आतां तुह्मी असें विचाराल कीं या चार गुणांस पूर्णावस्थेस न्यावयाचें ह्मणजे काय? त्याचें उत्तर असें कीं या गुणांशीं विरोध करणारे गुण योग्य प्रमाणानें कमजोर झाले पाहिजेत व या गुणचतुष्टयाचें बळ त्याच प्रमाणानें वाढलें पाहिजे. व्यक्तींनीं व विशेषतः समाजांनीं या कामीं अत्यंत दक्ष राहिलें पाहिजे. व्यक्तींचें पुष्कळ सुख समाजस्थितीमुळें त्यांस मिळतें. व जो मनुष्य या गुणचतुष्टयास अनुसरणार नाहीं, त्यास सामाजिक सुख मिळतां कामां नये. जीवनार्थ कलहांत अशा व्यक्तीचा नाश झाला पाहिजे, किंवा त्याचा स्वभाव सुधारला पाहिजे. याप्रमाणें सर्व व्यक्तींच्या बुद्धींत कृतज्ञतादि गुण स्वभावसिद्ध व विरोधहीन झाले, ह्मणजे त्यांस पूर्णता आली व त्यांच्या द्वारें समाजास कर्तृत्ववृद्धीच्या योगें शाश्वती आली,

असें समजावें. या दिशेकडे सर्व सुधारणेचा ओघ असला पाहिजे.

२१९. कृतज्ञतेपासून कोणकोणतीं कर्तव्यें उत्पन्न होतात हें तुह्मांस सांगण्याची गरज नाहीं; त्यांबद्दल पूर्वीं एकदा थोडा उल्लेख केलाच. सत्य शब्दानें सत्यप्रतिज्ञता समजायाची. आपल्या मनांत उत्पन्न होणाऱ्या हजारों इच्छांपैकीं ज्या निवडक इच्छांस आपण निश्चयाचें रूप देतों, त्या इच्छा आपले स्वतःशीं करार होत. तसेंच इतरांशीं व्यवहारांत आपण जे करार करितों तेही निश्चयात्मकच होत. सर्व करार किंवा निश्चय पाळण्याची जी प्रतिज्ञा किंवा प्रबळ स्फूर्ति तें सत्य होय. सत्य शब्दाचे जे दुसरे अर्थ आहेत त्यांचा धर्माशीं किंवा नीतीशीं इतका निकट संबंध नाहीं. सृष्टज्ञानासंबंधाचें जें यथावत् विधान तें एक सत्य होय. आपल्या देखत घडलेल्या गोष्टींचें आपल्या समजुतीप्रमाणें यथावत् कथन, हें दुसरें सत्य होय. परंतु धर्मांत व नीतींत जो सत्याचा अर्थ तो **सत्यप्रतिज्ञता** हा होय. 'सत्यमेव जयते' या वचनांत सत्यप्रतिज्ञ करारी मनुष्यांचा अखेरीस जय होतो असें सांगितलें आहे. कृतज्ञतेचा सत्यांतच अंतर्भाव करून 'यल्लोकहितमत्यंतं तत्सत्यमिति धारणा' हें वचन शिष्टाचारांत परम श्रेष्ठ गणिलेलें आहे. कृतज्ञतेचा सत्यांत कसा अंतर्भाव करितां येतो हें थोड्या विचारानें ध्यानांत येण्यासारखें आहे. परंतु व्यवहारांत कृतज्ञता व सत्य यांमध्यें भेद राखल्यास, कर्तव्यांचा अनुक्रम लावितां येतो, ह्मणून तो भेद कायम ठेवणें इष्ट आहे.

२२०. राज्य, व्यापार, कुटुंब, वगैरे संबंधाचीं अगदीं आवश्यक कर्तव्यें कृतज्ञता व सत्य यांखालीं येतात. परंतु ज्ञान आणि संपत्ति हीं प्राप्त झाल्यावर त्यांचा योग्य उपयोग होण्यास सर्वांशीं प्रेमपूर्वक व्यवहार सुरू झाला पाहिजे. समाजांतील व्यक्तींच्या कर्तृत्वास उत्तेजन देणें व समाजांतील आनंदावस्था वाढविणें, हें ज्ञान आणि संपत्ति यांचे योग्य उपयोग होत, कारण त्या योगें समाजास शाश्वती येते. याकरितां ज्ञानी व संपन्न लोकांनीं यथाशक्ति प्रेमकार्यास प्रवृत्त झालें पाहिजे. दुसऱ्यांच्या सुखांत भर पाडावी, जे श्रम करीत आहेत त्यांस मदत करावी, आपल्या साहाय्यानें ज्यांची उन्नति होण्यासारखी आहे त्यांस तें साहाय्य द्यावें, इत्यादि हीं प्रेम-

कार्यें होत. ज्ञान व संपत्ति यांचा ज्याप्रमाणें ज्यापाशीं अधिक सांठा, त्याप्रमाणें त्याकडे प्रेममूलक कर्तव्यें करण्याची अधिक जबाबदारी येते. उदार मनुष्य ती जबाबदारी ओळखतो ह्मणून त्यास समाज मान देतो, कृपण मनुष्य ती ओळखत नाहीं ह्मणून समाज त्यास निंद्य समजतो. प्रेम आणि दया यांमध्यें थोडा भेद आहे. ज्याप्रमाणें समाजाचें सुख व कर्तृत्व वाढविण्याचें आपलें कर्तव्य आहे. त्याप्रमाणेंच समाजांतील दु:खांचें निवारण करणें, हेंही आपलें कर्तव्य आहे; त्याकरितां दया पाहिजे. ज्ञान आणि संपत्ति हींच दु:खनिवारणाचीं साधनें होत. यावरून असें ध्यानांत येईल कीं प्रेम हें धनात्मक आणि दया ही ऋणात्मक आहे. पहिल्याचें काम सामान्य सुखांत भर पाडायाचें, दुसरीचें काम दु:खरूप हानि भरून काढायाचें.

प्रेम आणि दया या दोन्ही गुणांचें शिष्टाचारांत कृतज्ञता आणि सत्य यांहून कमी महत्त्व गणिलें आहे; व तें योग्य आहे. व्यक्तीची व समाजाची या बाबतींत सारखीच समजूत आहे. कर्ज काढून किंवा द्रव्य चोरून कां परोपकार, दानधर्म वगैरे करूं नये? स्वत:च्या कुटुंबाचे हाल करून परकीयांस संतुष्ट करण्याच्या कां नादीं लागूं नये? कारण हेंच कीं कृतज्ञता आणि सत्य यांच्यामागून प्रेम आणि दया यांसंबंधाचीं कर्तव्यें केलीं तरच समाजाचें हित होतें.

२२१. या समाजहिताचा विचार करितांना फार खोल व दूरवर दृष्टि पोंचविली पाहिजे. वरकरणीं विचार बिलकुल कामाचा नाहीं. दुष्टांच्या पारिपत्याचें काम कायदा करितो; शिष्टांस नायकत्व व थोरवी देण्याचें काम नीति किंवा शिष्टाचार करितो; सर्व गुणचतुष्टयाचें स्वतंत्रपणें संरक्षण करून त्यांस मनुष्य स्वभावांत उपजतबुद्धीचें स्वरूप देण्याचें काम धर्म आणि रूढि हीं करितात. कायद्याचा अंमल चुकवितां येतो; शिष्टसमागम सर्वकाळ सुलभ नसतो; ज्ञानसंपादनास व स्वतंत्र सदसद्विवेकास योग्य साधनें मिळत नाहींत—अशा स्थितींत बहुसमाज आहे. त्या बहुसमाजास बऱ्यावाइटाचा बोध व उत्कृष्ट प्रेरणा करण्याकरितां धर्म आणि रूढि हीं आहेत. सर्वसामान्य वर्तनाच्या मुळाशीं धर्म आणि रूढि ठेवण्याचें कारण हेंच कीं, कृतज्ञतादि तत्त्वांनीं योग्य झालेल्या कर्तव्यांची सहजगत्या

स्फूर्ति व्हावी; हरएक प्रसंगीं जें योग्य तें त्वरित लक्षांत येऊन लागलींच तें करण्याचा निश्चय व्हावा, विलंब लागूं नये; भिन्न मनोवृत्तींची मनांत झटापट सुरू होऊन मनुष्याचें धैर्य व कर्तृत्व कमी होऊं नये; व एकंदरीनें उचित तें करण्यांत मनुष्यानें आनंदच मानावा, दुःख मानूं नये. या सर्व गोष्टी धर्मानें आणि रूढीनें मात्र साध्य आणि शक्य आहेत, ह्मणून समाजांत धर्माचें व रूढींचें अत्यंत माहात्म्य आहे. धर्मपरायण मनुष्याच्या हातून एखाद्या विलक्षण घडामोडीच्या प्रसंगीं मात्र चूक व्हावयाची, म्हणजे समाजास अनिष्ट असें वर्तन कदाचित् त्याकडून घडायाचें; परंतु असे प्रसंग फार थोडे; बाकीच्या सामान्य प्रसंगीं त्याचें वर्तन समाजास हितकारक असेंच असायाचें.

२२२. कायदा, शिष्टाचार आणि धर्म, या सर्वांचें दर पिढीस थोडथोडें रूपांतर होत जातें. तें ग्रंथांत दिसायाचें नाहीं, परंतु लोकांच्या समजुतींत स्पष्टपणें दिसून येतें. हें रूपांतर ह्मणजेच सुधारणा; ती अल्प आहे तोंपर्यंत रूढीच्या पोटांत येते. शास्त्राशीं त्यायोगें रूढि विसंगत होत जाते. परंतु रूढीच्या पोटांत सुधारणा असल्या कारणानें तिचा अंमल अधिक असतो. ह्मणूनच ‘ शास्त्राद्रूढिर्बलीयसी ’ हा सिद्धांत ठरतो. पुढें जेव्हां कायदा आणि धर्म हे रूढीहून फारच भिन्न होतात, तेव्हां त्यांस चालन देणें जरूर होतें. कायदा बदलण्याचें काम राज्यकर्ते करितात. धर्म बदलण्याचें काम परमश्रेष्ठ सत्पुरुषाच्या हातून मात्र होतें. त्यास आपण धर्मसंस्थापना करणारा असें ह्मणतों. तो ईश्वरी अंश असें समजून, किंवा फार असाधारण पुरुष असें जाणून, बहुजनसमाज त्याचा अधिकार मान्य करितो. ‘ धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ’ रूढींत सुधारणा पुष्कळशी सांचली ह्मणजे मात्र धर्मसंस्थापनेचा प्रसंग येतो; व तो समाजांत कांहीं पिढ्या गेल्या ह्मणजे पुनः पुनः यावयाचाच. एका धर्मसंस्थापनेचें स्वरूप दुसरीशीं जुळत नाहीं. धर्मांत क्रांति किंवा उत्क्रांति अवश्य होते. समाजांत कोणत्या रूढि मागें पडत आहेत, कोणत्या नव्या उत्पन्न होत आहेत, हें पाहून त्यांत किती सुधारणा होत आहे हें ध्यानांत आणावें; केवळ धर्मग्रंथांतील वचनें पाहून कोणत्याही स-

माजाची सुस्थिति किंवा सुधारणा मोजणें फारच चुकीचें होईल. धर्मक्रांति होत असतां जीं तत्त्वें कायम राहतात व सर्व धर्मांच्या मुळाशीं असतात तीं कृतज्ञता, सत्य, प्रेम आणि दया हीं होत.

२२३. कायदा, शिष्टाचार आणि धर्म यांचें जें अवश्य रूपांतर होत जातें ह्मणून आतां सांगितलें, त्याचें कारण पहातां समाजाच्या परिस्थितीचा फरक हें होय; प्रत्येक पिढीच्या आवश्यकता वाढत असतात. त्या पुरविल्याखेरीज चालत नाहीं. त्या पुरविण्याचे जुने कर्तृत्वाचे मार्ग अवलंबून भागत नाहीं. कर्तृत्वास नवी दिशा देणें भाग होतें; या रीतीनें कर्तृत्वाचा ओघ थोडासा बदलतो. त्याप्रमाणेंच समाजाची सांपत्तिक स्थिति थोडीबहुत बदलते. परोपकाराचे किंवा ऐषआरामाचे कांहीं प्रकार टाकावे लागतात; कांहीं नवे अंगीकारावे लागतात. शिक्षण, ज्ञान आणि यांत्रिक योजना यांनींही परिस्थिति थोडीशी बदलते, कारण जें पूर्वीं आवडत असतें तें अभिरुचि बदलल्यानें आवडेनासें होतें. न्याय, अन्याय, यांविषयीं ज्या पूर्वींच्या कल्पना असतात, त्यांमध्येंही फरक पडतो; तात्पर्य हें कीं, मनोवृत्तींच्या संबंधानें पूर्वींची जी अंतःकरणाची रचना असते ती बदलून जाते. समाजाच्या शाश्वतीस जीं कर्तव्यें मागील पिढींत आवश्यक असतात, त्यांहून कांहीं निराळीं कर्तव्यें आतां आवश्यक होतात; व पूर्वींच्या कर्तव्यांतील कांहींस अधिक उत्तेजन व कांहींचा त्याग आवश्यक होतो. **एकाच पिढींत ज्ञान, कर्तृत्व आणि संपत्ति यांमध्यें फार थोडा फरक पडतो; ह्मणून रूढीचें फार थोडें रूपांतर होतें; म्हणजे फार थोडी सुधारणा आवश्यक असते व होऊं शकते. ज्या ज्या बाबतींत व ज्या ज्या दिशांनीं परिस्थितींत अंतर पडतें त्या त्या बाबतींत व दिशांत मात्र योग्य सुधारणा व्हावयाची; इतर बाबतींत होण्याचें कारण नाहीं.**

याप्रमाणें सुधारणेचा वेग नियमित करणारीं कारणें कोणतीं त्यांचा विचार करूं लागलें ह्मणजे, समाजाची परिस्थिति किती व कोणत्या दिशेनें बदलत आहे हें प्रथम पहावें लागतें. एका अर्ध्या पिढींत तींत कितीसा बदल होणार ? जेवढा होणार व ज्या दिशेनें होणार तेवढीच सुधारणा त्या दिशेनें होणार. ही गोष्ट ध्यानांत आ-

णिली ह्मणजे सुधारणा खूप जोरानें आणि वेगानें व्हावी ह्मणून तळमळणारांचा अविचार उत्कृष्टपणें नजरेस येतो. समाजाचें स्थित्यंतर हें कारण, सुधारणा हें कार्य; कारणाशीं सप्रमाण कार्य घडायाचेंच. त्याकरितां फारसा प्रयत्न नको आहे. जो प्रयत्न हवा आहे तो कृतज्ञतादि गुणांस पूर्णत्व आणण्याचा. या मूळाशींच गेलें ह्मणजे स्थित्यंतरानुरूप उचित सुधारणा अवश्य घडणार. समाज प्रत्यक्ष अनुभवानें चालतो, शुद्ध काल्पनिक ज्ञानानें तो हलत नाहीं. उपदेश करणारे पुष्कळ, परंतु त्याप्रमाणें स्वतः आचरण केल्यामुळें **अधिक सुखी व कर्तृत्वशील झालेले** फार थोडे दिसतात, याचें कारण हेंच होय. ह्मणून माझें सांगणें असें कीं उपदेशाचें जें काम फाजील चालविलें आहे तें सुधारकांनीं कमी करावें. काल्पनिक कर्तव्यांस काल्पनिक पुरावा देण्याचें तें काम आहे. प्रत्यक्षास पुरावाच नको असतो. माझें तुह्मांस असें सांगणें आहे कीं अज्ञानी व आपन्न लोकांच्या धर्मश्रद्धेस किंवा शिष्टाचारास धक्का बसेल, असें वर्तन तुह्मीं करूं नये किंवा असा उपदेशही करूं नये. त्यामुळें समाजांत अविचार माजतो; मनोवृत्ति हीन होतात; कोणी कोणास बहुमान देईनासा होतो; सामाजिक बंधनें तुटतात व सर्व प्रकारें हानि होते. इमारत पाडण्यास वेळ लागत नाहीं; बांधण्यास वेळ लागतो. तसेंच समाजाची हानि करण्यास थोडे श्रम लागतात, त्यांचें श्रेय कशास घेतां? समाजाच्या उत्तम मनोवृत्ति कायम ठेवण्यास व त्यांस पूर्णावस्था आणण्यास जे मोठे श्रम लागतात, ते केल्याचें श्रेय कां घेत नाहीं! लोकसंग्रह करणारानें या दुसऱ्या मार्गानें जावें, असा आपल्या पूर्वजांचा उपदेश आहे.

**न बुद्धिभेदं जनयेदज्ञानां कर्मसंगिनाम् ।**
**जोषयेत् सर्वकर्माणि विद्वान् युक्तः समाचरन् ॥**

या उक्तींतला भावार्थ आतां मीं ह्मटलें त्या प्रकारचा आहे.

२२४. कृतज्ञतादि गुणांचें महत्त्व व रूढींत होणाऱ्या सुधारणा यांसंबंधानें येथवर केलेलीं विधानें सयुक्तिक आहेत असें दाखविण्याकरितां अनेक उदाहरणें घेतां येतील. परंतु हल्लीं बालविवाह

आणि विधवाविवाह यांविषयीं विशेष वाटाघाट सुरू आहे, तेव्हां हींच उदाहरणें घेणें इष्ट आहे.

समाजाच्या शाश्वतीच्या दृष्टीनें स्त्रियांच्या कर्तव्यांचा विचार करितां असें दिसतें कीं प्रत्येक पुढील पिढी निरोगी, संतति चालविणारी व कर्तव्यशील होण्यास, पातिव्रत्यास अत्यंत महत्त्व दिलें पाहिजे. ही गोष्ट सर्वांसच कबूल आहे. पातिव्रत्याचा भंग न होईल अशाकरितां जेवढ्या उत्तम सामाजिक योजना असतील तेवढ्या समाजस्थैर्यास अनुकूळ होत. त्या योजनांचें बळ कमी न करितां, जेवढें स्वातंत्र्य स्त्रियांस देतां येईल तेवढें अवश्य द्यावें.

व्यभिचार वाईट, ही प्रेरणा स्त्रियांत व पुरुषांत स्वाभाविक झालेली आहे. धर्म, शिष्टाचार आणि कायदा या सर्वांनीं तीस आपलें बळ दिलेलें आहे. व्यक्तिसुखापेक्षां समाजहित बलवत्तर मानिलें पाहिजे, असें ही पातिव्रत्याची सर्वसंमत प्रेरणा पाहून स्पष्ट होतें. सामाजिक सुस्थितीच्या अगदीं मुळाशीं ही प्रेरणा आहे. तेव्हां तिचें बळ कमी करण्याचा कोणताही प्रयत्न अवश्य घातक होणार. स्त्रीनें ईश्वराची व वडलांची आज्ञा ह्मणून पातिव्रत्य पाळलें पाहिजे. धर्म, शिष्टाचार आणि कायदा ह्मणून तें पाळिलें पाहिजे. नवऱ्याशीं व स्वतःशीं करार ह्मणून तें पाळलें पाहिजे; याशिवाय प्रेमानें व कुटुंबदयेनेंही तें पाळावें, हें उचित आहे. कामरूपी मनोवृत्ति किंवा शरीरवृत्ति इतकी प्रबळ आहे कीं हीं इतकीं बंधनेंही स्त्रीस निर्बंधांत ठेवूं शकणार नाहींत. तेव्हां स्त्रीचे जेवढे हितचिंतक तेवढ्यांची तिजवर नजर असणें जरूर आहे. त्याशिवाय स्त्रीस मोह पाडणाऱ्या पुरुषांची समाजांत दुष्टांमध्यें गणना झाली पाहिजे व लोकमताच्या द्वारें त्यांस योग्य शासन मिळालें पाहिजे.

२२५. आतां स्त्री कुमार्गास लागण्याची किती भीति आहे, तिचें प्रत्यक्ष अनुभवानें प्रमाण ठरवून मग स्त्रियांवरचे निर्बंध शिथिल करायाचे कीं दृढ करायाचे यांविषयीं निश्चय होतो. या कामीं आपणांवरून जग ओळखावें. जातिकुलाचारांच्या संबंधानें, किंवा श्रीमंती व गरीबी यांसंबंधानें, किंवा ज्ञानमनोनिग्रह यांसंबंधानें आपआपली निरनिराळी स्थिति असते. या रीतीनें एका स्थितींचीं कुटुंबें कोणतीं, हें सरा-

सरीनें ठरवितां येईल. त्या कुटुंबांतील पुरुषांनीं निरभिमानपण आपलें हृदय शोधावें व आपल्यासारख्या इतरांचें कसें असेल याविषयीं अनुमान करावें. व्यभिचार एकपक्षीय नाहीं, तेव्हां आपणांसच तुह्मी असे प्रश्न करा कीं,—आपल्या स्थितींतील पुरुष स्त्रियांस मोह पाडण्यास किती अंशानें तयार होतील, किंवा स्वतः मोहांत पडण्यास किती कचरतील ? व्यभिचारी मनुष्याची संगति सोडण्याविषयीं आपल्या स्थितींतील लोकांचा किती निर्धार आहे ? आपल्या बायकोचें पाऊल वांकडें पडूं नये ह्मणून तिच्या तारुण्यांत किती प्रकारानें काळजी घेण्याचें आपणांस इष्ट वाटत होतें ? किती स्वातंत्र्य तिनें घेतलें तरी चालेल अशी आपली समजूत होती ? तीस माहेरीं ठेवण्याविषयीं आपली केव्हां व किती अनुमति होती ? अशा अनेक प्रश्नांचीं उत्तरें तुह्मी आपल्याशींच निःपक्षपातानें ठरवा. दुसऱ्यांचे अनुभव विचारा. आपल्या स्थितींतील लोकांचें वर्तन, भाषण व स्त्रीसंबंधी उद्गार ऐकून घेऊन विचार करा. याप्रमाणें केल्यावर अमुक इयत्तेपर्यंत स्त्रीस स्वातंत्र्य असावें, अमुक इयत्तेपर्यंत तिजवर अवश्य नजर ठेविली पाहिजे, ह्मणजे व्यभिचाराचें भय नाहीं अशाविषयीं तुमचा निश्चय ठरेल. विचाराच्या नंदनवनांतून प्रत्यक्ष कर्तव्यांच्या मृत्युलोकीं उतरणें फार विषाद आणणारें आहे खरें, परंतु उपाय काय ? ज्या मार्गानें आपणांस चालायाचें त्यांतील खाचखळगे, कांटेकुटे पाहून पाऊल टाकायास नको काय ?

२२६. ही स्त्रीस्वातंत्र्याची गोष्ट झाली. स्त्रियांस विद्या देण्यासंबंधानें त्यांस आपण काय वाचायास देणार किंवा त्या काय वाचायास घेणार याविषयीं विचार केला पाहिजे. मग स्त्रियांच्या ज्ञानाचा ओघ तिकडे तसा वळविला पाहिजे. पुढें, अविवाहित स्त्री माहेरीं रहायाची ती किती वर्षेपर्यंत ? जोंवर मातापितरांस तिच्या ब्रह्मचर्याबद्दल पूर्णपणें दक्ष राहतां येईल तोंपर्यंत, असें विचारानें दिसतें. आतां नहाण आलेल्या मुलीस घरांत जपण्याचें काम कठीण आहे, असें जर मातापितरांस त्यांचें अंतर्याम सांगत असेल, जर त्यांचें अधिक धैर्य होत नसेल, तर बारातेरा वर्षांपलीकडे विवाहाच्या वयाची इयत्ता जाईल कशी ? याचा बालविवाहनिषेधकांनीं विचार करायास

नको काय? मुलीस जपण्याची जे जबाबदारी घेणार त्यांस ती जर जड वाटत असेल, त्यांस त्या जबाबदारीस आपण नालायख आहों असें जर वाटत असेल, तर कोणत्या विचारमूलक जुलमानें तुह्मी त्यांस लायखी आणणार व त्यांच्या गळ्यांत ती जबाबदारी बांधणार? मुलीच्या आप्तांचा व्यभिचारदोषापासून अलिप्त राहण्याचा, व्यभिचारी पुरुषांस घरीं न येऊं देण्याचा, बीभत्स शब्द स्त्रियांपुढें न बोलण्याचा व ते त्यांचे कानीं न पडूं देण्याचा, जेवढा निग्रह असेल, तेवढें त्यांस स्त्रीब्रह्मचर्यासंबंधानें दक्ष राहणें शक्य आहे. या कामीं आईची योग्यता विशेषतः लक्षांत आणिली पाहिजे. ती मुलीच्या स्वभावांतील दोष घालवून शुद्धाचरणाची तीस संवय लावण्याच्या योग्यतेची आहे काय? मुलगी मोठी झाली तरी तिच्यावर दाब ठेवण्यास लायख आहे काय? मुलीकडून गैरवर्तन झाल्यास ती मुलीस ताळ्यावर आणील, कीं मायामोहानें त्या दुर्वर्तनावर पांघरूण घालील? हे प्रश्न मातेच्या योग्यतेसंबंधानें ठरविले पाहिजेत. आपणांमध्यें कुटुंबें बरींच मोठीं झालीं तरी तीं अविभक्त राहतात. कुटुंबांत मुलीचे सर्व बापभाऊच नसतात. या व अशा अनेक गोष्टी लक्षांत आणून मुलीस माहेरीं अविवाहित किती दिवस ठेवायाचें याचा निश्चय होतो. मुलींचें लग्न केलें ह्मणजे तिच्या प्रेमौघास दिशा लागते, संसाराचा विचार क्रमाक्रमानें तिच्या मागें लागतो, वगैरे गोष्टी एकीकडे ठेविल्या, तथापि समाजस्थैर्याच्या दृष्टीनें ही एक महत्त्वाची गोष्ट घडून येते कीं, मुलीच्या पातिव्रत्याची ज्यांस अधिक जबाबदारी वाटते व जीं मायामोहानें क्षमाशील होणार नाहींत, अशांच्या सहवासांत ती राहूं लागते; व तिच्या पातिव्रत्यभंगास कमी कारणें उरतात. जेव्हां माहेरच्या लोकांच्या अंगीं सासरच्या माणसांचा कडवेपणा येईल व त्यांस त्यामुळें अधिक जबाबदारी घेण्याचें धैर्य व पात्रता येईल, तेव्हां मुलींच्या विवाहवयाची आपोआप इयत्ता वाढेल. जेव्हां मुलीचा किंवा बहिणीचा अपमान केल्याबद्दल तिचे बापभाऊ तीस मोह पाडूं पाहणाऱ्या पुरुषाचें डोकें फोडतील, बिलकुल क्षमा करणार नाहींत—अशी समाजांत समजूत होऊन कामांध लोक अधि-

क सावध होतील, तेव्हां मुलीच्या विवाहाचें वय वाढूं शकेल. तोंपर्यंत सुधारकांच्या वल्गना निष्फळ होणार. ह्मणून कुटुंबांतील माणसें सदाचाराबद्दल अधिक दक्ष करण्याचा प्रयत्न आधीं आरंभिला पाहिजे हें उघड आहे. परंतु हल्लींच्या इंग्रजी शिक्षणानें कायद्याशिवाय इतर बंधनें तुटत चाललीं आहेत; त्यामुळें हा प्रयत्न मागें पडत आहे. व या अनिष्ट स्थितीबद्दल सुधारक लोक बऱ्याच अंशीं जबाबदार आहेत.

२२७. निव्वळ इंग्रजी विद्येच्या मागें लागून धर्म, नीति आणि विनय यांसंबंधानें आह्मीं किती हयगय चालविली आहे ती लक्षांत आणा, ह्मणजे मुलींची प्रौढ वयीं काळजी घेण्यास आह्मी कितीसे पात्र आहों, त्याची थोडी कल्पना येईल. मातापितर, अवश्य असेल तेव्हां, मुलाच्या विद्याभ्यासाकरितां आपलें सर्वस्व कां खर्च करितात ? कारण त्यांस आशा असते कीं मुलगा कृतज्ञ निघेल व तो मिळवता झाला ह्मणजे आपले हाल होणार नाहींत; आपणांस द्रव्याचें कामच लागणार नाहीं, मुलगा तें पुरवील. ही त्यांची आशा विद्वान् लोकांनीं कृतघ्नपणें न जुमानली, व लोकांत सर्वत्र असा समज होऊं दिला कीं विद्वानांच्या मातापितरांचे हाल व्हावयाचेच, तर मातापितर आपली पुढची तर्तूद राखूनच, मुलाच्या विद्याभ्यासाकडे खर्च करितील. त्या योगें पुढील पिढी जितकी श्रेष्ठ निघावी तितकी निघणार नाहीं, ह्मणजे समाजाच्या प्रगतीस विद्वानांचा ज्ञानोन्माद व कृतघ्नपणा घातक होणार. हा असा अनिष्ट परिणाम, हल्लीं प्रत्यक्षपणें होत आहे; इंग्रजी विद्या वरिष्ठ वर्गांत फाजील झाली व तीस व्यवहारांत किंमत नाहीं या गोष्टी त्या अनिष्ट परिणामास साहाय्यकारक होत आहेत. कांहीं दिवसांनीं श्रीमंतांखेरीज इतर लोक वरिष्ठ इंग्रजी शिक्षणाचे मागें लागणार नाहींत, असें आतां वाटूं लागलें आहे. हें ठीक नाहीं. जी निरपेक्षबुद्धि वृद्ध मातापितरांनीं हल्लींच्या विद्वानांस विद्या देण्यांत दाखविली, तीकरितां त्यांनीं कृतज्ञ असणें अवश्य आहे. व तीच निरपेक्षबुद्धि आपल्या संततीस विद्या देण्याचे कामीं त्यांनीं अंगीं धरली पाहिजे. असें करण्यास इंग्रजी छानछुकी व व्यसनें यांपासून दूर राहिलें पाहिजे; ख-

ऱ्या हिंदूचा साधेपणा अंगीकारला पाहिजे. धर्म व शिष्टाचार यांचें महत्त्व आपल्या आचरणानें व उपदेशानें संततीस शिकविलें पाहिजे. परंतु समाजस्थैर्यास या ज्या आवश्यक गोष्टी त्याच सुधारक विसरत आहेत.

२२८. बालविवाहाचा विचार करितांना मुलीच्या बापाची कशी स्थिति असते हें पाहिलें पाहिजे. मुलीचें शाश्वत हित चिंतणारास चांगल्या सुस्थळीं मुलगी पडावी असें साहजिक वाटतें. या स्थळांकरितां मोठी चढाओढ असते. त्यामुळें जो वेळेवर प्रयत्न करील त्यासच या कामीं सिद्धि येते. या कारणानें मुलीचें हित चिंतणारास अल्पवयींही तिचें लग्न करणें भाग पडतें. कारण त्याची शाश्वत परिणामांवर दृष्टि असते. अमुक घराण्यांत मुलगी पडल्यास तिची व तिच्या संततीची सुस्थिति चिरकाळ राहील अशी आशा बाळगण्यास हरकत नाहीं,—असें जेव्हां तो प्रथम अनुमान करितो तेव्हां मात्र विवाहास तयार होतो. सासू, सासरा, दीर, नणंदा, जावा यांनीं जें घर भरलेलें असतें, तें मुलीस मिळावें ही त्याची इच्छा असते. तेव्हां सासरीं मुलीचे जे हाल होण्याचा संभव आहे त्यांपेक्षां तिचा जन्मभर सांभाळ चांगला होईल ही शक्यता अधिक असते. हा असा सामाजिक अनुभव आहे हें सिद्ध होत नाहीं काय? बालपणीं विवाह झालेल्या जोडप्यांत प्रेम नसतें, अशीं शंभरांत पन्नास उदाहरणें असतीं, तर बालविवाह केव्हांच बंद झाला असता. वास्तविक स्थिति अशी दिसते कीं सुखी समाधानी कुटुंबें पुष्कळ, दुःखी व असमाधानी थोडीं, अपवादासारखीं. यावरून एक गोष्ट सिद्ध होते ती ही कीं, बालपणचा परिचय कायमच्या प्रेमास कारण होतो. काम अंगांत संचरल्यावर स्त्रीपुरुषांच्या प्रथम गांठी पडल्या तरच प्रेम उत्पन्न होतें असें समजण्यास कारण नाहीं; उलट शाश्वत प्रेमास कामसंचाराची स्थिति बाधक आहे. कुटुंबजन्य सुख, संततीचें संगोपन, कर्तृत्वास उत्तेजन, सदाचारास साहाय्य, वगैरे व्यावहारिक फायदे स्वतः जाणून किंवा आप्तांकडून समजावून घेऊन त्यांच्या द्वारें जे प्रेमपाश उत्पन्न होतात, तेच शेवटपर्यंत टिकतात.

२२९. या सर्व विवेचनावरून पुढील गोष्टी ध्यानांत येतील. मु-

लगे अविवाहित स्थितींत अठरावीस वर्षांचे पलीकडे वाढले तर त्यांवर आपला पुढें अंमल चालणार नाहीं अशी सर्वांची आंतले आंत खात्री होत चालली आहे. या वयापलीकडे त्यांची प्रवृत्ति नीतीकडेच राहील असें मानण्यास हल्लींच्या समाजस्थितींत अनुकूल अनुभव नाहीं. याकरितां जोंवर मुलगे आपले ताब्यांत आहेत तोंवर त्यांचा विवाह करून टाकावा ही वडलांची इच्छा असते.

मुलींच्या वडील माणसांस ऋतुप्राप्तीनंतर तिच्या सद्वर्तनाची जबाबदारी घेण्याचें धैर्य किंवा पात्रता नाहीं. याकरितां या वयापूर्वींच ते मुलींचा विवाह करितात. परंतु मुलगे विद्येच्या मागें लागून फार मोठे होत चालले आहेत; व सामान्य स्थितींतील माणसांस मुलांचे लग्न केव्हां तरी करूं असें वाटून ते त्याबद्दल उदासीन होत आहेत. या दोन कारणांनीं मुलींच्या वडलांस चांगल्या कुटुंबांतील मुलगा मिळण्यास मुलींचें स्वरूप व पैशाची लालूच दाखवावी लागते. योग्य वर दुर्मिळ आहेत तोंवर चढाओढीमुळें मुलीच्या कुलशीलस्वरूपास हुंड्याची मदत अवश्य आहे. या कारणानें मुलींचीं लग्नें वर्षभर पुढें मागें होतात.

शाश्वत प्रेमास कामवासनेपासून आरंभ झाला पाहिजे असें नाहीं. बाळपणचा परिचय व व्यावहारिक फायदे हेच अशा प्रेमास कारण होतात, असें निर्विवादपणें दिसतें. स्त्रीशिक्षणाची इयत्ता कुटुंबाचे श्रीमंतीवर बहुधा अवलंबून राहील; शिक्षण कशाचें व कसें द्यावें या विचारांतच पुष्कळ व्यवहारज्ञ पुरुष आजमित्तीस स्तब्ध राहिलेले आहेत.

२३०. या सर्व प्रकारांत एक अनिष्ट गोष्ट समाजाच्या नजरेस येत चालली आहे. ती ही कीं वरांचें वय विद्येच्या नादानें व दारिद्र्यानें वाढतच चाललें आहे. वधूंचें वय वाढविण्याची इयत्ता ऋतुप्राप्ति ही आहे. वधूवरांमध्यें त्यायोगें प्रथम विवाहांतच फार मोठें वयाचें अंतर पडतें. यामुळें, वयाचें अंतर कमी असल्यानें मुलीची वाढ पुरी होण्यास जी अवधि पूर्वीं सांपडत असे, ती आतां सांपडत नाहीं. मुलाच्या प्रथम विवाहांतही द्वितीय विवाहाचे कांहीं फार अनिष्ट परिणाम दिसूं लागले आहेत. अल्पवयीं स्त्रीस मृत्यु येणें, किंवा ती लंगडीफेंगडी होणें, किंवा मुलें न वांचणें, वगैरे ते अ-

निष्ट परिणाम होत. त्यांमुळें भावी संतति अशक्त व रोगी होण्याचा प्रसंग अनेक कुटुंबांवर येत आहे. व जो समाजाचा भाग विद्येच्या मार्गे लागला आहे, त्याच्या पुढील पिढीची स्थिति निःसंदेहपणें असमाधानकारक होत आहे. ही गोष्ट समाजाच्या अनुभवास आल्यानें मुलींचें वय वाढवीत जावें व साधेल तर ऋतुकालापर्यंत तें न्यावें असा लोकांचा कल होत आहे. परंतु या एका उपायानें उद्दिष्ट हेतु अंशतः मात्र सिद्धीस जातो; कारण वधूवरांच्या वयांतील अंतर जितकें कमी व्हावें तितकें होत नाहींच; व मातृत्वास स्त्री योग्य होण्यापूर्वींच तीस मातृत्व प्राप्त होतें.

ऋतुप्राप्तीनंतर दोनतीन वर्षेपर्यंत मुलींस घरीं अविवाहित ठेवल्याखेरीज चालू विवाहांतील हा दोष जावयाचा नाहीं. इतकी जबाबदारी मुलींचे मातापितर घेण्यास लायख होण्यास निदान पन्नास पाउणशें वर्षें पाहिजेत; इतकीं तरी पुरतील कीं नाहीं याविषयीं शंकाच आहे. परंतु इतक्या अवधींत जे विवाह होतील ते संततीस अगदीं खराब करून टाकितील व ती कदाचित् विनाशपंथास त्यामुळें लागण्याचा संभव आहे. तेव्हां ही सुधारणा तूर्त अशक्य आहे. संभावित घराण्यांत ती होणें नाहीं.

वरील विवाहदोषांचें निवारण, मुलांस व मुलींस ऋतुप्राप्तीनंतर एक दोन किंवा अधिक वर्षें विवाहित स्थितींतच ब्रह्मचर्य पालन करावयास लावल्यानें, होणार आहे; किंवा मुलाच्या विवाहाचें वय उतरविल्यासही होणार आहे. समंजस घराण्यांत या दोहोंपैकीं एक मार्ग क्रमानें अंगीकारला जाईल, असें दिसतें. सुधारकांनीं आरंभिलेल्या सुधारणांपैकीं या सुधारणा नाहींत. घरोघर जे अनुभव येत आहेत त्यांचा परिणाम मुलांमुलींच्या वडील माणसांवर गुप्तपणें व शांतपणें होत आहे. ब्रह्मचर्याची योग्यता खुद्द मुलांसच समजण्यास आरंभ झाला आहे. हें ब्रह्मचर्याचें महत्त्व समाजांत रूढ होत गेल्यानें हल्लींच्या विवाहपद्धतीचे दोष हळू हळू नाहींसे होतील असा अंदाज आहे. समाजाच्या हितचिंतकांनीं ब्रह्मचर्य वाढविण्याचा ( ह्मणजे गर्भाधान लांबणीवर टाकण्याचा ) हळू हळू प्रघात पाडावा हेंच तूर्त त्यांचें सुसाध्य कर्तव्य आहे. घरोघरच्या स्त्रियांस

ब्रह्मचर्याचें महत्त्व समजावून दिलें पाहिजे ह्मणजे पुष्कळ अडचणी दूर होतील. प्रत्यक्ष अनुभवानेंच स्त्रियांची समजूत पडते, वादविवादानें पडत नाहीं. कडक ब्रह्मचर्य साध्य होत नसेल तर जितक्या अंशानें तें साध्य असेल तितक्या अंशानें तरी साध्य करून घेतलें पाहिजे ”

RANADE, Pune B 35144 PERSONAL LIBRARY

---

## भाग ३६ वा.

### विधवाविवाह.

२३१. “ बालविवाहासंबंधानें समाजांत या प्रकारची सहजगत्या वडामोड किंवा सुधारणा चालू आहे. आजचा समाज पंचवीस वर्षांपूर्वींचे समाजाहून बराच बदललेला आहे; व क्रमानें तो अधिकाधिक बदलत जाणार. समाजास स्थैर्य आणणारी संतति ज्या सुधारणांनीं होईल त्या सुधारणा समाजांत आपोआप रूढ होतात; प्रत्यक्ष सार्वलौकिक अनुभवानें सारें जग हलतें; केवळ कल्पनांनीं तें हलत नाहीं. किंवा या पिढीच्या सुखाकरितां पुढील पिढीच्या सुखास जेथें धक्का बसतो, तेथेंही स्वाभाविक सौजन्याच्या प्रेरणेनें जग पुढें पाऊल टाकीत नाहीं. हें स्वाभाविक सौजन्य घालविण्याचा प्रयत्न धर्मघातक लोक करितात. विचारशक्तीस स्वैरपणें भटकायास लावून, कल्पनेस निरंकुश करून, पूर्वसंस्कारांनीं स्थैर्यसंपादक असे जे गुण समाजांत रूढ झाले आहेत ते व त्यांचें महत्त्व विसरून, विना अवलोकनानें, विना दूरदृष्टीनें स्वार्थसाधक सुधारणा आरंभणाऱ्या लोकांसारखे समाजाचे दुसरे शत्रु नाहींत असें मला वाटतें. जेथें अशा लोकांचें प्राबल्य झालें तीं राष्ट्रें भूपृष्ठावरून अजीबात नाहींशीं झालीं आहेत. ग्रीस, रोम, वगैरे देशांच्या प्राचीन इतिहासांत हा प्रकार स्पष्ट दिसतो. जर वरिष्ठ जातीचे लोक विद्याव्यासंगानें पाखंडी बनून, बुद्धीच्या स्वैरवृत्तीनें स्वाभाविक श्रद्धा व सौजन्य यांचा नाश करितील, तर ते हल्लींच्या समाजास उन्नति आणीत आहेत असें जरी बाह्यात्कारीं दिसलें, तथापि थोड्या काळांत

आपल्या जातींचा ते पूर्णपणें ऱ्हास करून टाकितील. धर्म बळावणार कीं सुधारणा बळावणार, हें हल्लीं सांगणें कठीण आहे; ह्मणून वरिष्ठ जाति राहणार कीं नष्ट होणार हेंही आज निश्चित करितां येत नाहीं. या विषयावर आमच्या एका मित्राचे विचार तुह्मांस ऐकायास लाविले पाहिजेत.

२३२. असो. तूर्त पुनर्विवाहाच्या संबंधानें, सुधारकांत नव्हे, तर हिंदु समाजांत कशी तडजोड सुरू आहे तिचा थोडा विचार करूं. या गांवांत राहून या विषयाकडे मनुष्याचे विचार वळूं नयेत हें शक्यच नाहीं. त्यांतून माझें लक्ष त्याकडे जाण्यास एक विशेष कारण झालें. हें मांडीवर मूल आहे हें माझ्या धाकट्या चिरंजिवाचें; याकडे माझा एवढा ओढा कां अशी शंका कदाचित् तुमच्या मनांत आली असेल. त्याचें कारण चिरंजिवास वर्षापूर्वीं नवज्वरानें एकाएकीं देवाज्ञा झाली. मूल व सून उघडीं पडलीं. त्यांचा सांभाळ करणें माझें विशेष कर्तव्य झालें. मला या मुलाचा ओढा लागला. पांच चार महिन्यांपूर्वीं मुलगी माहेरीं असतां या लबाड सुधारकांनीं काय केलें कीं तिच्या थोरल्या भावास फितविलें व त्याकडून तिजपाशीं पुनर्विवाहाची गोष्ट काढविली. 'दादा, हें काय बोलतोस!' असें ह्मणून तिनें एकदोनदां त्यास झिटकारून वाटेस लाविलें, परंतु त्याचा उपद्रव सहवेना, तेव्हां एके दिवशीं तिनें त्यास चांगलें खरमरीत उत्तर दिलें. 'अरे दादा, तूं हें मांडलें आहेस काय! तूं कोणाच्या नादीं लागला आहेस! तुझी सर्व लाजलज्जा कोठें गेली! तुह्मी पुरुष आह्मां बायकांस यंत्रें समजतां, कीं पशु समजतां, कीं समजतां तरी काय! आह्मांस कांहीं देवधर्म, आचारविचार आहे कीं नाहीं!' इतकें संतापाच्या आवेशांत बोलून गेल्यावर तिच्या मनांत कोणकोणत्या वृत्ति उद्भवल्या असतील तें सांगतां येत नाहीं, परंतु एकदम पोटांतून उमाळा आल्यासारखें होऊन तीस रडें कोसळलें. तो दुःखावेग कमी झाल्यावर ती हळूहळू बोलूं लागली. 'दादा, ते असतांना आह्मी उभयतां किती सुखी होतों त्याची तुला कल्पना नाहींरे. मला दुःख कसें तें माहीत देखील नव्हतें. आह्मीं काय काय बेत केले, किती प्रतिज्ञा केल्या, काय एकमेकांकरितां

जिवापाड झटलों, तें सारें तुला सांगून उपयोग काय ? तूं ह्मणशील आतां त्याचें काय ? पण माझे मनांत तसें येत नाहीं. मी जन्माची त्यांस वाहिलेली आहें. ते या लोकीं नाहींत ह्मणून परलोकीं देखील नाहींत काय. मी अभागी स्त्री येथें राहिलें ह्मणून ते तेथें माझी वाट पहात नसतील काय ? आत्मा तर अजरामर आहे ह्मणून सर्व सांगताताना ? जेवढा त्यांचा मजवर भरंवसा, तेवढा मीं त्यांवर ठेविला पाहिजे. त्यांस कोणती गति मिळाली आहे कोण जाणे ! देवा, मला लवकर सोडविलेंस तर मीही त्याच गतीस जाईन ! अजून स्वप्नांत त्यांची गांठ पडते. मला वाटतें त्यांचा जीव येथेंच राहिला आहे. ते मला सोडून दूर जाणार नाहींत. माझ्या भोंवतीं भोंवतीं फिरत असतील. या बाळावर त्यांचा कितीतरी जीव होता ! त्याचें मी संगोपन नीट करीत आहेंना, हें ते नित्य पहात असतील. ते माझ्याभोंवतीं आहेत कीं मनांत येऊन बसले आहेत, कांहीं सांगतां येत नाहीं. त्यांची आठवण झाली कीं, तूं अमुक कर, तमुक कर, ह्मणून आंतून आज्ञा होते. देवानें जीव अजरामर केला आहे तो याचसाठीं. जिवास सर्व कांहीं ज्ञान असतें. आह्मी प्रपंचांत जीं मूढ माणसें राहतों, त्यांनीं हवें तें करूं नये ह्मणून हे जीव आमचा सांभाळ करूं लागतात. आमच्या मनांत शिरून आह्मांस सुमार्गास लावितात, चांगली बुद्धि देतात. त्यांचें आपण ऐकलें पाहिजे. आपली आई गेली तेव्हां तिनें माझा हात धरून काय सांगितलें तें तुला ठाऊक आहेना. तिचे ते शब्द अजून एखादे वेळीं कानीं पडतात. ती देखील जवळच आहे असें मला वाटतें. छे छेः, मीं कांहीं भलतेंच केलें, तर हे दोन्ही जीव काय ह्मणतील ? मीं परपुरुषाचा नुसता हात धरला तर त्यांना व आईला तें पाहून केवढें दुःख होईल ? दादा, हे दोन साक्षीदार डोळ्यांपुढें दिसत आहेतरे. यांच्या देखत मी पातक करूं ? तूं सांगतोस तरी काय ? जें ध्यानीं, मनीं, स्वप्नीं, तेंच खरें. लहानपणींच माझ्या पुष्कळ शपताआणा झाल्या आहेत. मोठेपणीं पुनः झाल्या आहेत. आईचें तरी सांगणें तेंच होतें, देवधर्म तेंच सांगतात. मी तें सत्य सोडणार नाहीं. मला तुमचें कांहीं नको. माझा पतिव्रतेचा धर्म मला एक कळतो. ’

२३३. तिचा भाऊ तिला पोंचविण्यास येथें आला तेव्हां ही सर्व हकीकत त्यानें मला सांगितली. पुनः कोणाही स्त्रीजवळ पुनर्विवाहाची गोष्ट ह्मणून काढायाची नाहीं, अशी आपण शपथ घेतल्याचें त्यानें मला सांगितलें. मीं तिची धन्य मानिली. आत्म्याच्या अजरामरपणाचा तिनें जो उपयोग सांगितला तो तात्त्विक दृष्टीनेंही खरा आहे. आपल्या मनांत ज्या ज्या सदाचारसंबंधी साहजिक स्फूर्ति होतात, त्यांस आपण पूर्वसंस्कार ह्मणतों. हे पूर्व संस्कार ज्यांनीं केले ते शरीरानें नष्ट झाले ह्मणून काय झालें ? त्यांचें ज्ञानमय अस्तित्व जगांत आहेच; तेंच आपल्या मनांत अवतरतें, ह्मणजे जन्म घेतें. त्यापासूनच आपणांस सत्प्रेरणा होतात. पूर्वसंस्कारांचा अर्थच हा कीं पूर्वींच्या लोकांचीं ज्ञानमय अस्तित्वें संततींत शिरून तिचें वर्तन नियमित करितात. 'आत्मा वै पुत्र नामासि'* या वचनानें ही गोष्ट स्थापित केली आहे. आत्म्याचें अजरामरत्व या अशा तऱ्हेनें प्रत्यक्ष अनुभवास येतें. पूर्व संस्कारांचा व्यावहारिक परिणाम पाहिला असतां संतति श्रेष्ठतर व शाश्वत करण्याचा आहे. पूर्वींच्या सर्व ज्ञानमय अस्तित्वांस आपली शाश्वत समृद्धि व्हावी असें वाटणें साहजिकच आहे.

तसेंच मुलीची ती सत्यपालनाची प्रतिज्ञा ऐकून मीं तीस धर्मराजाचे तोंडीस नेऊन बसविलें. धर्मराजाची प्रतिज्ञा तुह्मांस माहीत आहेना ?

**मम प्रतिज्ञां च निबोध सत्यां वृणे धर्ममृताज्जीविताच्च ।**
**राज्यं च पुत्राश्च यशो धनं च सर्वं न सत्यस्य कलामुपैति ॥**

माझ्या घराण्यास ही मुलगी हें एकच भूषण आहे असें मी समजतों. यास किती जपूं असें मला झालें आहे.

---

* अंगादंगात्संभवसि हृदयादधिजायसे । आत्मा वै पुत्र नामासि स जीव शरदःशतम् ॥
जीवितं त्वदधीनं मे संतानमपि चाक्षयम् । तस्मात्त्वं जीव मे पुत्र सुसुखी शरदां शतम् ॥

**कौशी. उप. २, ११; म. भा. आ. ७४.**

या गाथांत संततीची शारीरिक व मानसिक उत्पत्ति सांगून तिची स्वतःशीं एकात्मता सांगितली आहे, व तीस पूर्ण आयुष्याचा आशीर्वाद दिला आहे. गाथांचा अर्थ, जितकें खोल जावें तितका अधिकच होतो हें मार्मिक वाचकांस सांगावयास नकोच. **वि०**

२३४. परंतु तें असो. या सुधारकांच्या खटपटी गांवांत समजल्या. लोक चर्चा करूं लागले, त्या मुलीचे कानावर जाऊन तीस अतोनात दुःख होऊं लागलें. बायकांत कुजबूज सुरू झाली. 'इतके दिवस ईस सोंवळी केली नाहीं, तेव्हां या झाताऱ्याचा पुनर्विवाहाचा बेत असेल हो! कोणाच्या बुद्धीस हल्लींच्या काळांत काय भ्रम पडेल तें सांगतां येत नाहीं!' असें लोक अपरोक्षपणें बोलूं लागले. ही स्थिति आमच्या सर्व कुटुंबास असह्य झाली. तेव्हां बायकांनीं मुलीचा विचार घेतला. ती ह्मणाली, 'चारचौघांत बरें दिसेल तेंच केलें पाहिजे; लोकांस कुकल्पना काढण्यास कां जागा ठेवावी? मी पतिव्रतेच्या सर्व विधीस तयार आहें. दुःखाचा डोंगर माथ्यावर धरल्यानंतर या एका खड्याचा भार का समजायाचा? लौकिकाचाराप्रमाणें सर्व कांहीं होऊं द्या. कांहीं केलें तरी दुःखांत सुख हें देवानें सर्वत्र ठेविलें आहे. मला तरी समजलें पाहिजेना? कीं आतां बायकोचें नातें थांबलें, आतां आईचें नातें सुरू झालें. आतां बुचड्यांत फुलें घालायाचे, वस्त्रालंकार वापरायाचे दिवस गेले. ते कोणाला दाखवायाचे? आतां एक मुलाचें मन वेधून त्याचें पालन करण्याचें कर्तव्य राहिलें आहे. तोच जिवास आसरा आहे. त्यास आईचा नट्टापट्टा काय करायाचा आहे? आईचें काम निर्वेधपणें करण्याची नवी दीक्षा घेऊन, साधेपणा अंगीं धरून, आपणाकडे आलेला नवा मातृधर्म लोकांच्या ध्यानांत आणून दिला, तर त्यांत फायदाच आहे. लोकांपासून उपद्रव तरी कमी होईल.' तो तिचा निग्रह पाहिल्यावर मीं तो विधि उरकून टाकला. मुलीचें शहाणपण पाहून मला पुनः पुनः आश्चर्य वाटतें. आह्मी पुरुषांनीं तिच्यापासून अक्कल शिकावी, अशी तिची योग्यता आहे.

स्त्रियांचे अगदीं अंतस्थ विचार कळल्यावांचून त्यांची उदात्तवृत्ति आपल्या ध्यानांत येत नाहीं. हीं रत्नें गूढ आहेत. बाहेरच्या हीन कवचामुळें त्यांचें तेज पडत नाहीं. अनादि संस्कारांनीं उदात्त झालेली त्यांची चित्तवृत्ति कां नीचतेस न्यावी? पातिव्रत्याचे जे असे बळकट पाश स्त्रियांमध्यें स्वभावतः अवतरतात ते थोड्याशा सुखदुःखाकरितां कां छिन्नभिन्न करावे! सद्गुणी संतति उत्पन्न करण्याची कुळांत व समाजांत

अनेक शतकांच्या अनुभवानें जी ही अशी योग्यता आली आहे तिची थोड्याशा सुखाकरितां पायमल्ली करायाची काय? छेः छेः, त्यांत समाजस्थैर्यास मोठा धक्का आहे. भावी संततीचें नैतिक दृष्ट्या फार नुकसान आहे. नैतिक तत्त्वें जेवढीं उच्चस्थितीस जातील तेवढीं समाजास अधिक शाश्वती येते व सर्व तत्त्वांत पातिव्रत्याचें तत्त्व त्या शाश्वतीच्या मूळाशीं आहे.

२३५. आतां तुह्मी ह्मणाल कीं अशी उदात्त चित्तवृत्ति सर्व मुलींत कोठें आढळते. कांहींमध्यें तिचा पूर्ण अभाव दिसतो. तेव्हां त्या तशा मुलींनीं दुराचारास प्रवृत्त होऊं नये ह्मणून, पातिव्रत्य संभाळणाऱ्या एका पुरुषाच्या ताब्यांतून त्या आकस्मिकपणें सुटल्या, तर त्या कामावर दुसऱ्याची कां नेमणूक करूं नये? ह्मणजे तिचा पुनर्विवाह कां करूं नये? हा प्रश्न मोठा विकट आहे. कुटुंबांतील हीन शिक्षणानें किंवा कुसंगतीनें मुलींच्या मनांतील उदात्त वृत्तींचा अनेक प्रसंगीं उदय होऊं शकत नाहीं. नाहींतर कोणीही चांगल्या घराण्यांतील स्त्री उदात्त मनोवृत्ति बाळगण्यास व सात्त्विक आचरण करण्यास अपात्र नाहीं. परंतु जी प्रत्यक्ष स्थिति आहे तिचा विचार केलाच पाहिजे. वैधव्यस्थितींतील कांहीं थोड्या स्त्रिया कुमार्गास लागण्याचा संभव आहे हें समाजास मान्य आहे. परंतु त्यांच्या सोईसाठीं पातिव्रत्याची जी श्रेष्ठतमावस्था सर्व सद्गुणी स्त्रियांच्या मनांत पूर्ण बिंबलेली आहे तीस कमीपणा आणायाचा काय? असें कृत्य समाजास घातक होईल. पिण्याचे पाण्यास स्वच्छ शुद्ध मंदिर पाहिजे, तसेंच कोणी मोरीचें पाणी सांठविण्याकरितां बांधीत नाहीं. त्यास रस्त्यावर नेऊन त्याचा योग्य निकाल लावण्याची कांहीं सोय असावी हें खरें. परंतु त्याचा पिण्याचे पाण्याशीं बिलकूलच संबंध राहतां कामां नये, याचीही काळजी घेतली पाहिजे. या दृष्टीनें प्राचीनकाळीं **रोम**मध्यें या प्रश्नाचा विचार होऊन तेथें पुनर्विवाह सुरू झाला. तसाच इकडेही सुरू होण्यास आमची हरकत नाहीं. परंतु सद्धर्म आणि आपद्धर्म यांमधील भेद कायम राहिला पाहिजे. ह्मणजे समाजाचें अहित होणार नाहीं.

२३६. या बाबतींत समाज एकएक पाऊल सावधगिरीनें पुढें

टाकीत आहे. सुधारकांच्या मात्र तें लक्षांत येत नाहीं. त्यांच्या कृत्यांचा समाजास जो राग येतो त्याचें कारण हें कीं, ज्या घराण्यांची नीति उत्तम, पुरुष व स्त्रिया संभावित, व स्त्रिया धार्मिक आणि दुराचारापासून दूर राहणाऱ्या, तेथें देखील हे लोक विधवा पाहिली कीं पुनर्विवाहाच्या खटपटीस जातात. आमच्या घरांतच जी यांनीं खटपट केली तिचे पुढील परिणाम लक्षांत आणा. चांगल्या संभावित लोकांच्या बेअब्रूस हे दुष्ट लोक कारण होतात.

ज्या विधवेस मातृत्व आलें तिला मातृत्वाची दीक्षा मिळतेच; तिचा विचारच सोडून दिला पाहिजे. जीस मुलें नाहींत तिजकडे कुटुंबांतील कांहीं मुलांची विशेष काळजी कोणत्याही कारणानें आली असल्यास तिलाही मोहांत पाडूं नये. विधवेस दत्तक देण्याची चाल आहे ती विशेष रूढ झाली पाहिजे; व क्रमानें होत जाणार असें मला वाटतें. ' हा माझा मुलगा ' अशी समजूत होऊन त्याची काळजी स्त्रीच्या मागें लागली ह्मणजे ती त्याकरितां हवा तेवढा स्वार्थत्याग करण्यास तयार होते. या स्त्रीस्वभावाचा फायदा समाज अवश्य करून घेईल. विधवांच्या हितचिंतकांनीं या सुलभ उपायांकडे अवश्य लक्ष पुरविलें पाहिजे. जेथें हें शक्य नसेल तेथें नेमधर्म वगैरेंस मदत करावी. स्त्रियांस कोणतें ज्ञान द्यावें हा विचार संभावित लोकांत चालू आहेच. स्वधर्माचें ज्ञान त्यांस द्यावें असें माझें ह्मणणें आहे; व या दृष्टीनें अनेक सुगम धर्मग्रंथ तयार होणें इष्ट आहे. आपणापाशीं धर्मभांडार पुष्कळ आहे; त्यांतील रहस्य दाखविणारा मात्र कोणी निघाला पाहिजे. हे सर्व उपाय जेथें थकतील तेथें पुनर्विवाहाचा प्रश्न अवश्य येतो; पण तो केव्हां व कोणास येतो ? अविवाहित मुलगा मोठा होत चालला असतां जेव्हां तो दुराचारास लागण्याचीं चिन्हें मातापितरांस स्पष्ट दिसूं लागतात, तेव्हां त्याचा विवाह करून टाकण्याची त्यांस कोण घाई होते, तें तुह्मीं पाहिलेंच असेल. हाच न्याय विधवा स्त्रीसही लागतो. जेव्हां मुलगी दुराचारास खास लागणार, असें मातापितरांच्या लक्षांत येईल तेव्हां त्यांनीं तिच्या पुनर्विवाहास तयार व्हावें हेंच उचित आहे. या प्रकारची समाजांत समजूत होत चालली आहे. ह्मणूनच

पुनर्विवाहाचे पूर्वी दुराचाराचा संभव असावा अशी कुशंका साधारण लोक घेतात. हा संभव कबूल केला ह्मणजे समाजाचा विरोध संपला असें तुह्मी समजा. समाजास अशा स्त्रीची दया येईल; क्रमानें, तीस मदत करावी असा प्रेमभावही उत्पन्न होईल. येथपर्यंत समाजाची मजल हल्लीं येऊन पोहोंचली आहे.

२३७. जोंवर मुलांचे विवाह पंधरा सोळा वर्षांपासून वीस वर्षापर्यंत होत आहेत तोंवर ते कन्यांशींच होणार, विधवांशीं होण्याचा संभव नाहीं. कारण, बापांस कन्यांबद्दल जितकी काळजी असते व ते जितका पैसा खर्च करण्यास तयार असतास, तितकी काळजी व तितकें पैशाचें आमिष विधवेबद्दल कोण दाखवील ? वराकडच्या बाजूलाही प्रथम विवाहांतच विधवा घरांत आणून सर्व सोहाळे टाकून देण्याचें कोठें कबूल होणार आहे ? तेव्हां मातापितरांच्या दारिद्र्यामुळें जे वीस वर्षांपुढें अविवाहित राहिले आहेत, ज्यांवर गरीब मातापितरांचा फारसा अंमल नाहीं, व ज्यांस वाटतें कीं 'समाजानें आह्मांवर कोणते असे उपकार केले आहेत कीं आह्मीं त्यास जुमानावें ! ' ते मात्र थोडे पैसे मिळूं लागल्यावर वयांत आलेली स्त्री एकदम घरांत सैंपाक करण्यास राजी होत असल्यास पुनर्विवाहास तयार होतील. परंतु हीही आशा धरण्याचें फार दिवस कारण उरणार नाहीं. हल्लीं विवाहाचा खर्च वाढत आहे. चांगले वर दुर्मिळ होत आहेत. त्यामुळें गरिबांच्या, सर्वच नव्हे, पण कांहीं मुली वयानें बऱ्याच वाढत आहेत; अविवाहितपणींच वयांत येत आहेत असें समजा. या मुली विधवांस वर मिळूं देणार नाहींत. जेथें पुरुषास द्रव्याचें आमिष नाहीं तेथें तो कन्या टाकून विधवेशीं लग्न करण्यास तयार होणार नाहीं हा सिद्धांतच समजा; यास अपवाद एकादाच मिळायाचा. याप्रमाणें कोणीही प्रथम वर पुनर्विवाहास तयार होणें कठीण, हें सिद्ध होतें. यांत समाजाचा अपराध नाहीं. विधवांचे अगोदर कन्यांचीं लग्नें व्हावीं हें सुधारकांसही मान्य असेल. प्रथम वर आणि विधवा यांचा विवाह रूढ होण्यास समाजांत जागा नाहीं अशी वास्तविक स्थिति आहे.

२३८. आपल्या धर्मानें पुरुषास एकाहून अधिक स्त्रिया कर-

ण्यास अधिकार दिला आहे; परंतु तो रूढीनें बंद केल्यासारखा आहे ' शास्त्राद्रूढिर्बलीयसी ' या न्यायाचें हें उत्तम उदाहरण आहे. हें तत्त्व जेथें जेथें येतें तेथें तेथें समाजानें धर्माची सुधारणा केली आहे असें समजावें; व या प्रकारच्या आजपर्यंत अनेक सुधारणा होत आल्या आहेत. ही रूढिमूलक सुधारणा होण्यास, वरिष्ठ जातींचें दारिद्र्य, पुष्कळ संतति होण्यांत नुकसान, वगैरे कांहीं गौण कारणें आहेत; परंतु मुख्य कारण असें कीं एका घरांत दोन पत्न्या सुखानें नांदत नाहींत व पुढील संततींचें नीट संगोपन होत नाहीं, हा निश्चयात्मक अनुभव समाजास येऊन चुकला आहे.

जो मनुष्य विधुर झाल्यावर द्वितीय विवाह करितो तो फार तरुण तरी असला पाहिजे, किंवा बराच प्रौढ झाला तरी निःसंतान असला पाहिजे. ज्यास मुलेंबाळें आहेत तो द्वितीय विवाहास कांहीं विलक्षण अडचणीशिवाय तयार होत नाहीं. निदान हल्लीं तरी मध्यम वयांतील पुरुष एकदोन मुलें असल्यास या कार्यास तयार होत नाहींत. लोकमताचा अंदाज घेतां ही एक प्रबळ रूढि होणार असें लक्षण दिसतें. नवी बायको पहिल्या मुलांस कशी वागवील, घरांत सापत्नपणा शिरल्यावर आपली स्वतःचीच वृत्ति कशी बदलेल, वगैरे अनेक प्रश्न सुविचारी मध्यम वयांतील पुरुषास येतात. असा पुरुष द्वितीय विवाह करणार नाहीं.

मध्यम वयांत ज्या गृहस्थांच्या बायका ( बाळंतपणीं, किंवा पुरुषकृत विकृतीनें, किंवा क्षयधुपणी वगैरे रोगांनीं ) मृत्यु पावल्या आहेत, त्यांस आपल्या मुली देण्यास आईबाप अवश्य कचरतात; जे आईबाप अशा कृत्यास तयार होतात ते बहुधा अत्यंत द्रव्यलुब्ध असतात. कारण, त्या गृहस्थांच्या द्वितीय विवाहाच्या बायका जगण्याचें मुष्कील असतें; ते श्रीमंत असतील तर त्यांचीं पुढें तिसरीं, चवथीं, पांचवीं लग्नें झालेलीं आपण पहातोंचना ! शिवाय, अशा गृहस्थांच्या प्रत्येक पुढच्या विवाहांत स्त्रीस संतति होण्याचा संभव कमी कमी होत जातो. या गोष्टी मनांत आणून असे गृहस्थ समंजस असतील तर ते आपण होऊनच हा पुनः पुनः लग्नें करण्याचा नाद इतःपर सोडून देतील. पहिल्या विवाहाची बायको कोणत्या

कारणानें मेली हें पाहणें द्वितीय वधूच्या मातापितरांस किती अवश्य आहे, हें सांगायास नकोच.

कोणी अविचारी व उत्तरवयांतही कामांधता शिल्लक उरलेले पुरुष कदाचित् द्वितीय विवाहास प्रवृत्त होतात. त्यांशीं विधवांचा विवाह व्हावा असें सुधारक ह्मणतात. आमचीही त्यास फारशी हरकत नाहीं. परंतु अशा कामांध पुरुषांची आवडनिवड सुधारकांनीं ओळखली नाहींसें दिसतें; ते मोठ्यांत मोठी जी कन्या मिळेल ती आधीं पाहतील. त्या कामीं द्रव्य खर्चतील, निरुपाय झाल्यावांचून विधवेकडे वळणार नाहींत. रतिसुखाचे जे मार्मिक शोकी त्यांचा हा स्वभावच आहे; त्यास तुह्मी आह्मी काय करणार ?

२३९. ज्यांच्या बायका तरुणपणींच मेल्या आहेत व ज्यांस एखाद दुसरें मूल आहे किंवा नाहीं त्या तरुणांस समाज सरासरीनें प्रथम वरांतच गणितो. ते सुस्थितींत असले तर संभावित कुटुंबांतील बारा तेरा वर्षांच्या मुली, क्वचित् प्रसंगीं हुंडा देऊनही, त्यांस सहज मिळूं शकतात; मग त्यांस ( इतक्यांत सांगितलेल्या मानवी स्वभावाविरुद्ध ) विधवांचा पक्षपात करण्याचें कारण काय? अशा तरुणांपैकीं जे गरीब आहेत, खेड्यापाड्यांत हाल सोशीत आहेत, ज्यांचे घरांत कोणी अन्नपाणी करण्यास बायको माणूस नाहीं, व मुलगी शोधण्यास कोठें जावें हें ज्यांस कळत नाहीं, ते मात्र ' पुनर्विवाहास तयार ' ह्मणून आपण होऊन वर्तमानपत्रांत जाहिराती देतात. परंतु त्यांची सेवा करण्यास कोण सुस्थितींतील विधवा तयार होईल? कोणी कंगाल स्थितींत असलेली तयार व्हावयाची. तिच्या पुनर्विवाहास समाज आड येणार नाहीं, इतका तो हल्लीं समंजस झाला आहे.

२४०. उतार वयांतील पुरुष मुलेंबाळें असल्यास विवाह करीत नाहीं, हा सामान्य नियम आहे. ज्यास संतान नाहीं तो पैसेवाला असल्यास करितो; तो धर्मवेडा असेल तर संततीकरितां करितो, परंतु तो विधवेशीं कधींच करायाचा नाहीं. धर्मवेडा नसूनही लग्न करूं लागला तर वृद्धपणीं सेवेस कोणी हवें ह्मणून करणार. असा माणूस पुनर्विवाहास तयार होण्याचा संभव आहे. परंतु जीमध्यें कामावेश शिल्लक आहे अशा कन्येशीं किंवा विधवेशीं लग्न करण्या-

स शिष्टाचार त्यास कधींच संमति देणार नाहीं. सुधारकांनीं देखील असल्या विवाहास उत्तेजन देऊं नये, हें मला उचित दिसतें. कारण फार झालें तर वृद्धा विधवेची सोय लावण्याचा हा एक मार्ग आहे; त्यानें तुह्मांस सुधारणा होतेसें वाटल्यास ती तुह्मी करा. आमचा शिष्टाचार त्यास अनुमत देणार नाहीं.

२४१. याप्रमाणें पाहूं जातां असें दिसतें कीं पुनर्विवाहास योग्य असे पुरुषच समाजांत अत्यल्प आहेत. जे आहेत त्यांची सोय मुलींचें वय बिनबोभाट वाढविणारे गरीब लोक करीत आहेत. तेव्हां विधवाविवाहास उत्तेजन यावें तरी कसें? विधवांच्या विवाहास जागाच नाहीं. ( कोणी अस्सल सुधारक सामान्य व्यावहारिक ज्ञान नसलेला मात्र या कृत्यास प्रवृत्त होईल. ) हा समाजाचा दोष नव्हे; समाज कबूल झाला तरी विधवाविवाहाचे आंकडे मोठाले दाखविण्याचें सुदैव सुधारकांस प्राप्त होणार नाहीं; व त्यांची हिंदुधर्माविरुद्ध ओरड कायम राहणार! मुसलमान, पार्शी व ज्या हिंदुजातींत पुनर्विवाह धर्मसंमत आहेत, त्यांमधील विधवांचें प्रमाण पाहून नंतर त्यांनीं स्वधर्मास दोष द्यावा हें बरें.

या सर्व विवेचनावरून असें लक्षांत येतें कीं मुलींचीं वयें जीं हळूहळू वाढत चाललीं आहेत, तीं पुनर्विवाहास आड येतील. ती सुधारणा हवी असेल तर पुनर्विवाह अवश्य मागें पडेल. ती बंद केली तर पुनर्विवाहास थोडा जोर येईल. ) आतां तुह्मी ह्मणाल कीं इतर देशांप्रमाणें कांहीं मुली अविवाहित रहाव्या व कांहीं विधवांचे विवाह होत असावे; तर ती स्थिति विधवांजवळ पुष्कळसे पैसे असल्यास येणारी आहे. परंतु त्या सासरीं अन्नवस्त्राच्या अधिकारी आहेत; माहेरीं बापाच्या औदार्यावर त्यांस अवलंबून राहिलें पाहिजे. समाजांत पैसा फाजील झाल्यावांचून किंवा दायभागाचा कायदा बदलल्यावांचून विधवांजवळ द्रव्य कोठून येणार? व तें स्वतः त्या मिळवूं लागल्या तर गरीबाची किंवा वृद्धाची सेवा पत्करण्यास कां राजी होतील? कांहीं मुलींनीं अविवाहित राहून कांहीं पुनर्विवाह होण्यांत तरी समाजास कोणत्या प्रकारची शोभा किंवा उन्नति आहे?

वरील सर्व गोष्टी ध्यानांत आणिल्यास मला असें वाटतें कीं मुलींचें वय रजोदर्शनापर्यंत बिनबोभाट वाढविणारे लोक जसजसे जास्त होतील, तसतशी पुनर्विवाहाची पिच्छेहाट होईल; मुली अविवाहित राहण्याची भीति इतकी प्रबळ होईल कीं समाज विधवाविवाहास उत्तेजन देण्यास निरंतर नाकबूल राहील. आपद्धर्म ह्मणून शिष्टाचाराची पुनर्विवाहाकडे करडी नजर मात्र राहणार नाहीं. त्यामुळें कांहीं श्रीमंतांच्या बालविधवांचे विवाह होतील. बाकी विधवांस वैधव्यच अनुभविलें पाहिजे; व त्यांस जर सुशिक्षित केलें तर त्या गरीबगुरिबांशीं लग्न करण्यास नेहमीं नाराजी राहतील.

२४२. ज्या विधवा आधींच दुराचारास लागल्या त्यांचे जे विवाह होतील त्यांविषयीं आतांपर्यंत मीं कांहींच ह्मटलें नाहीं. ते विवाह उत्तेजनार्ह आहेत असें आतां शेवटीं मी सांगतों. परंतु श्रीमंत दुराचारी विधवा विवाहास तयार होणार नाहींतसें वाटतें; हा समाजाचा दोष नाहीं. कायद्यानें श्रीमंत निःसंतान स्त्रियांस जें स्वातंत्र्य दिलें आहे त्याचा हा परिणाम होय. गरीब दुराचारी विधवांसंबंधानें पहातां त्यांस गरीब नवरे नको असतात; तेव्हां त्याही फारशा पुनर्विवाहाच्या नादीं लागणार नाहींत. परंतु या प्रकारच्या विधवांचे विवाह दरसाल कांहीं थोडे होतील तर बरें.

२४३. याप्रमाणें कांहीं सदाचारी व कांहीं दुराचारी विधवांचे जे विवाह होत आहेत, त्यांनीं स्थापिलेल्या कुटुंबांची एकच जात बनत आहे, हें मला इष्ट दिसत नाहीं. दोन भिन्न जाति असाव्या असें माझें मत आहे. कारण दुराचारी विधवांच्या विवाहाचा कलंक सदाचारी विधवांच्या विवाहांस बाधक होतो. सर्वांची एकाच माळकेंत गणना होते. ही स्थिति पुनर्विवाहाच्या खटपटीस बाधक होत आहे हें सुधारकांनीं लक्षांत आणावें. अशा मिश्र जातीच्या संततीची पुढें काय स्थिति होणार हें तूर्त सांगतां येत नाहीं. या मिश्र जातींत ब्राह्मण, शेणवी, परभू, अशा आणखी पोटजाती आहेत, व त्यांस तो जातिभेद मोडूं नयेसें वाटत आहे! अशी मिश्र जात फार लहान असेल तर तिच्या संततीच्या विवाहास मोठी अडचण येईल. ही अडचण आतांशीं थोडी दृष्टीस पडूं लागली आहे; व ती वाढून

संतती खराब होण्याचा व जात निकृष्ट स्थितीस जाण्याचा संभव आहे. या जातींत श्रीमंत गृहस्थ नाहींत हें एक मोठें व्यंग आहे; दुसरें व्यंग हें कीं आधींच एवढीशी जात व ती सर्व देशभर पसरलेली, तेव्हां परस्परांस मदत करण्याच्या कामीं व्यक्तींस फारशा सोई नाहींत. जुन्या चालीच्या कुटुंबांस विधवा मुलींचा विवाह आवश्यक वाटूं लागतांच तीं असा एक उपाय योजितात कीं आपण अलग रहायाचें, व मुलीस विवाहास स्वतंत्रपणें पाठवून द्यावयाचें. हाच क्रम पुढेंही सुरू राहणार व कदाचित् लोकमान्य होणार. त्याचा एक अनिष्ट परिणाम असा होण्याचा संभव आहे कीं पुनर्विवाहितांचीं प्रौढ झालेलीं मुलें गांठून, त्यांस हुंडाही देऊन, जुन्या चालीचे लोक त्यांस आपल्या अनावर झालेल्या विधवा मुली देऊं लागतील. त्यामुळें स्वत: पुनर्विवाहितांच्या मुली अविवाहित राहण्याचा प्रसंग येईल. मी तुह्मांस ज्या माझ्या स्नेह्याकडे घेऊन जाणार आहें, त्याचें असें मत आहे कीं या मिश्र जातीच्या संततींत फारसा जोम राहणार नाहीं. कारण या जातींतील बहुतेक लोक केवळ विद्याव्यासंगी गरीब माणसें आहेत; त्यांच्या मुलांच्या मागें विद्येचा कांच अवश्य अधिक असणार; व तीं त्यामुळें अशक्त होणार. या कारणानें संततीच्या उत्पादनास लागणारें पौरुष या जातींतील कुटुंबांत दर पिढीस कमी होत जाण्याचा व प्रत्येक कुटुंब दोनचार पिढ्यांत नष्ट होण्याचा बराच संभव आहे. या सिद्धांतावर माझा भरंवसा नाहीं. माझे मित्र तुमची कशी काय खात्री करून देतील तें सांगतां येत नाहीं.

" सारांश हा कीं पुनर्विवाहाची आवश्यकता राहूं नये इकडे समाजस्थितीचा ओघ आहे. दुराचाराचा संभव किंवा वृद्धि बंद व्हावी याकरितां पुनर्विवाहास शिष्टाचाराची संमति मिळेल, परंतु तिचा आपणांस वाटतो तेवढा फायदा करून घेण्यास बहुतेक विधवाच नाराजी राहतील. पुनर्विवाहितांची जात लहान, मिश्र, दरिद्री व पसरलेली असल्यानें तिजविषयीं सुधारकांचा बभ्रा फार असेल, परंतु तिचें अस्तित्व समाजांत कळून देखील येणार नाहीं. या जातीच्या कुटुंबांची संतति पौरुष गुणांनीं किती पिढ्या टिकाव धरून राहील तें संशयात्मकच आहे. पुनर्विवाहास हल्लीं जे प्रतिबंध आहेत

ते सद्धर्माच्या दृष्टीनें आहेत; आपद्धर्माच्या दृष्टीनें नाहींत, इतकी सुधारणा समाजांत होऊन गेली आहे."

---

## भाग ३७ वा.

### विधवांची थोरवी व त्यांचीं श्रेष्ठतम कर्तव्यें.

२४४. याप्रमाणें भाऊसाहेबांचें बोलणें संपलें तेव्हां मी त्यांस ह्मटलें.—"भाऊसाहेब तुह्मी ह्मणतां तें सर्व खरें व सयुक्तिक आहे असें मानिलें, तथापि एकंदर ब्राह्मण लोकसंख्येंत विधवांची संख्या केवढी मोठी आहे हें पाहिलें ह्मणजे विधवाविवाहाचा प्रतिबंध समाजाची हानि करीत आहे असें स्पष्ट दिसून येतें. विधवांच्या संबंधानें तरी आमच्या समाजांत मोठा अन्याय चालला आहे असें ह्मणावें लागतें. वरिष्ठ जातींतील ब्राह्मणांची लोकसंख्या सुमारें सव्वापांच लाख; त्यांत सुमारें पाउणेतीन लाख पुरुष व अडीच लाखांहून थोड्या अधिक बायका, यांपैकीं अर्धा लक्ष बायका विधवा आहेत. ह्मणजे एकपंचमांश बायकांस वैधव्य भोगावें लागतें; हा कोण भयंकर अन्याय आहे! बरें, याचा परिणाम असा होतो कीं सुमारें पाउण लाख पुरुषांचीं लग्नें होण्याचा संभव नाहींसा होतो. ह्मणजे समाजाचा एकंदर जवळजवळ एकचतुर्थांश भाग, (स्त्री व पुरुष मिळून) वैवाहिक कर्तव्यें करूं शकत नाहींं. ही एवढी संख्या आपलें सदाचरण राखून धर्मानें चालेल, असें संभवतें काय?* याकरितां विधवाविवाहास तुह्मी जेवढ्या सवलती देतां त्यांहून फार अधिक दि-

---

* "In all the 16 castes (including Brahmins of all kinds) the aggregate number of widows is 49,803 or nearly 50,000. Just imagine what this means, half a lac of women out of a total of $2\frac{1}{2}$ lacs, are condemned by society to relinquish all marital happiness and *many of them for the most part live without any object in life*......These are appalling figures......These figures ought to make you pause a while and reflect before you condemn widow remarriages. But this is not all; what will be your feelings when I tell you that as many as 528 out of our 50,000 widows are widows under 15 years of age and fully 33 p. c. of our child widows are widows under nine years of age! Oh horror

ल्या पाहिजेत. मला वाटतें विधवाविवाहांस खूप उत्तेजन दिलें पाहिजे, तरच समाजास सुस्थिति येईल.

---

upon horror !......What a heart-rending, what a soul-harrowing, what a blood-curdling tale of sorrow and shame is this !!! The bitterest opponents of widow-remarriages will stand aghast on contemplating this frightful state of affairs ! *They will find reason to stop singing the praises of the wisdom of our ancestors*......I say men ought to allow widows to remarry, if not for the sake of making widows happy, at least for the sake of becoming happy themselves.......For a reference to the figures will show that *men are making themselves unhappy solely for the purpose of enjoying the demoniacal pleasure of making women miserable*.......On comparing the figures for the 16 castes we find that the numbers of males are higher than those of females and that therefore pairing man and woman together, there must be many men who cannot find wives in the natural course of things. This is the lot of about 18,000 men. But when we consider that the number of females is further reduced by the circumstance that a large number of them is, by the artificial rules of society, rendered useless for conjugal purposes by being compelled to remain in the condition of perpetual and enforced widow-hood.......we have to deduct from the aggregate number of females ( viz. 2,56,695 ) the aggregate number of widows ( viz. 49,803 ) and take the remainder viz. 2,06,892, as being really the number of females available for married happiness. On comparing the number of males ( 2,74,786 ) with the number of available females ( 2,06,892 ) we find that the former exceeds the latter by 67,894 *which is therefore the number of males who can find no lawful means to gratify their congugal cravings.* The proportion of this excess to the entire male population is nearly 25 p. c. *If widow remarriages were permitted, the percentage of wife-less men would be brought down from 25 to 6*.........................................

" Gentlemen, I shall not trouble you any more with my statistics. Suffice it to say that I have *faithfully* placed the figures before you as I found them in the Census Report (of 1891) and I hope that I have made no mistakes in taking them. The conclusions that I have drawn from the figures are, to my mind, the most natural and logical, and I am not aware whether the same figures can, by more skilful hands, be made to yield conclusions other than those that I have derived from them or to yield conclusions antagonistic to mine." Mr. Vidyadhar V. Bhide, B A. *Sarvajanik Sabha—Quarterly Journal*, April, 1895.

२४९. "विद्याधरपंत, तुह्मां सुधारकांचें मला जें आश्चर्य वाटतें तें हेंच कीं तुमची बुद्धि वरवर तरंगत राहते, तीस थोडेंही खोल जातां येत नाहीं. तुह्मीं आपल्या स्वतःच्या घरची स्थिति पाहिली नसते, आपल्या ओळखीच्या दहा घरीं काय स्थिति आहे तें पाहिलें नसतें, वरकरणीं कांहीं तरी वाचून हवें तें तुह्मी बरळतां, या तुमच्या स्वभावास औषध नाहीं. बायकांकडे समाजांत कोणतीं कामें आहेत त्यांचें तर तुह्मांस काडीमात्र ज्ञान नाहीं. विधवांची संख्या पुष्कळ फुगवून दाखविली ह्मणजे काम झालें असें तुह्मांस वाटतें. 'इतके पुरुष अविवाहित, इतक्या स्त्रिया विधवा !' असें पाहून ' हां, द्या पुनर्विवाह लावून ! ' असें तुह्मांस वाटतें व तुह्मी त्याप्रमाणें ओरड करितां ! ' आह्मी विधवांचे कैवारी, ' असें तुह्मी आपणांस ह्मणवितां, परंतु या तुमच्या अविचाराच्या ओरडीमुळें विधवा स्त्रियाही तुमचा द्वेष करितात; कारण तुमच्या सर्व विचारांत विधवांस काय दिसून येतें? हेंच कीं, तुमचा त्यांस सुखी करण्याचा प्रयत्न तर खराच, परंतु एखादे **पशूस** सुखी करण्याचा जसा कोणाचा प्रयत्न असावा, त्या प्रकारचा तुमचा तो प्रयत्न असतो. अज्ञानी विधवांमध्येंही उत्कृष्ट मनोवृत्ति असतात; परंतु तुह्मी त्यांस न्याय देण्याकरितां वाद करूं लागलां ह्मणजे त्या त्यांच्या मनोवृत्तींचा मुळींच उल्लेख करीत नाहीं. त्यामुळें विधवांस वाटतें, आपले जुन्या चालीचे आप्त बरे, परंतु हे बेअब्रू करणारे सुधारक कैवारी नकोत. तुमचें आतांचेंच बोलणें उदाहरणार्थ घ्या. अर्धा लक्ष विधवा आणि पाउण लक्ष पुरुष अविवाहित स्थितींत दुराचारास लागल्यावांचून कसे राहतील ! हें असें विधान करितांना विधवांचीं वयें, त्यांची कुटुंबस्थिति, त्यांच्याकडे आलेलीं मातृत्वादि कर्तव्यें, त्यांच्या श्रेष्ठ मनोवृत्ति—इत्यादींचा तुह्मीं विचार केला होता काय ? मग तुमचा विधवांस कां राग येणार नाहीं! फाशांनीं सोंगट्या खेळत असतां, एकटी सोंगटी दिसली कीं दे जुगवून, असा खेळणारानें निश्चय करावा तसा तुमचा विचार दिसतो ! तुमच्या ह्मणण्यास यश येण्यास प्राचीन स्पार्टांतील कायदे करणारे पाहिजेत. तेथें स्त्रीस मुलें उत्पन्न करण्याची शक्यता असून तिचा नवरा जर त्या कामीं वृद्धत्वादि कारणांनीं नालायख ठरला, तर त्या-

स आपली बायको दुसऱ्या तरुणाच्या स्वाधीन करणें भाग पडे.* तुमचीं मनें त्या तशा रानटी स्थितींत अद्यापि असावीं ! वैवाहिक सुखांत तुह्मी रतिसुख हें सर्वश्रेष्ठ समजतां; व तें जीस नाहीं तीस कर्तव्यच जगांत उरलें नाहीं असें तुमच्या बोलण्यांत व्यक्त होतें ! संततीच्या दृष्टीनें किंवा कुटुंबसुखाच्या दृष्टीनें तुह्मांस वैवाहिक स्थितीचा विचारच करितां येत नाहीं. वैवाहिक स्थितीच्या जबाबदाऱ्या किंवा आवश्यकता तुह्मीं ओळखल्या नाहींत. तुमचे हेतु उत्तम आहेत; विधवांचा कैवार तुह्मी मनापासून घेतां हेंही खरें आहे. परंतु सुखसंतोषाच्या साधनांचा विचार करितांना तुह्मी मनुष्यस्वभावाचें व समाजरचनेचें पूर्ण अज्ञान प्रकट करितां, एवढाच तुमचा दोष आहे. परंतु हा फारच घोर दोष आहे. ”

२४६. याप्रमाणें बोलून भाऊसाहेब उठले व एक रुमाल सोडून त्यांत कांहीं कागद शोधूं लागले. हे कागद ब्राह्मणलोकसंख्येच्या संबंधाचे होते, असें माझ्या लक्षांत आलें. त्यांतून एक कोष्टक काढून त्यांनीं माझ्या हातांत दिलें, व पुनः बोलण्यास आरंभ केला. “आपण ब्राह्मण लोक बहुतेक गरीब आहों. आपणांत श्रीमंत ह्मणण्यासारखे लोक थोडे, हें तुह्मी कबूल कराल. तसेंच आपण कुणब्यांच्या हातचें अन्न खात नाहीं, पाणी पीत नाहीं, आपल्या स्त्रिया कुणब्यांस शिवत देखील नाहींत. असें आपलें सोंवळें आहे व तें आणखी पन्नास वर्षें तरी कमी होणार नाहीं. हेंही तुह्मी कबूल कराल. या दोन गोष्टी कबूल केल्या ह्मणजे तूर्त तरी ब्राह्मणांच्या घरांत काम करण्यास ब्राह्मणच हवेत असें सिद्ध होतें. व त्यांचें प्रमाण काय असावें असा प्रश्न येतो. १८९१ च्या खानेसुमारीचा रिपोर्ट बाहेर पडला, तेव्हां ब्राह्मणांची सामाजिक स्थिति कशी आहे, तें पाहण्याकरितां मीं मुंबई इलाख्याचा रिपोर्ट घेतला व त्यांतून

* “Marriage was regarded chiefly in a civic light as the means of producing citizens, and in Sparta it was ordered that old or infirm husbands should cede their young wives to stronger men who could produce vigorous soldiers for the state.”

Lecky's History of Eur. Morals, Vol. II, P. 290.

कोंकणस्थ, देशस्थ, कऱ्हाडे, देवरुखे, शेणवी व सारस्वत ब्राह्मण या सहा प्रमुख जातींची एकंदर संख्या किती, विवाहित, अविवाहित, आणि विधवा व विधुर किती, त्यांचीं वयें कोणतीं, कशीं असतात, इत्यादि माहिती मिळाली तेवढी काढून कोष्टकें तयार केलीं; त्यांपैकींच आतां एक तुमच्या हातांत दिलें आहे. ब्राह्मणसमाजाची अंत:स्थ रचना आपणांस प्रत्यक्ष अनुभवानें घरोघर दिसतेच; तीच सरसकटीनें कशी असते हें कायतें खानेसुमारीच्या आंकड्यांवरून कळून येतें. त्याशिवाय, मुनिसिपालिट्यांचे वार्षिक रिपोर्ट पहावे लागतात; त्यांवरून जनन-मरण व रोगराई यांचीं प्रमाणें मिळतात; व तीं लक्षांत घेतल्याखेरीज समाजाची अंत:स्थ रचना पूर्णपणें लक्षांत येत नाहीं. याप्रमाणें कोष्टकें तयार करून मी विचार करूं लागलों तेव्हां माझे जे सिद्धांत झाले ते मी तुह्मांस सांगतों. ( कोष्टक १ लें पहा. )

२४७. " ब्राह्मणज्ञातींची एकंदर लोकसंख्या सुमारें ५२६००० आहे; पैकीं २७२००० पुरुष व २५४००० बायका आहेत. या बायकांपैकीं ६९००० स्त्रिया सुवासिनी असून त्यांचें वय १५ पासून ४० वर्षांच्या दरम्यान आहे. त्यांशिवाय ३६००० सुवासिनी स्त्रिया ४० वर्षांच्या वरच्या वयाच्या आहेत. या ३६००० स्त्रियांपैकीं, ज्यांस मुलें होत आहेत अशा चतुर्थांश असाव्या. स्त्रीच्या चवदाव्या वर्षीं तीस मुलें होऊं लागलेलीं पुष्कळ कुटुंबांत दिसतात. अशा स्त्रिया २००० आहेत असें ग्रहण केल्यास, ज्यांस संतति होऊं लागली आहे अशीं ब्राह्मणसमाजांतील दंपत्यें एकंदर ( ६९०००+९०००+२०००=) ८०००० होतात. ज्या स्त्रिया संतानोत्पत्तीस लागल्या आहेत त्या दंपत्यस्थितींत आहेत असें ह्मणूं.

२४८. " एक हजार लोकवस्तींत सुमारें दोनशें कुटुंबें असावीं; हीं इतकींही फार झालींसें मला वाटतें. परंतु दोनशें कुटुंबें धरल्यास, प्रत्येक कुटुंबांत पांच माणसें असावीं असें होतें. स्त्री, पुरुष, मुलगा, मुलगी व एक आई किंवा आप्त स्त्री, इतकीं मिळून कुटुंब होतें. आतां अविभक्त कुटुंबांत अनेक दंपत्यें, अनेक मुलें व अनेक आप्त स्त्रिया व पुरुष असतात. तथापि तूर्तच्या विचारांत जितकीं दंपत्यें तितकींच कुटुंबें आहेत असें समजूं, मग तीं पृथक् किंवा एकत्र रहात असतील. या

हिशेबानें कुटुंबांत तीन स्त्रिया व दोन पुरुष होतात; परंतु या प्रमाणानें स्त्रियांची संख्या नाहीं, त्यामुळें निम्मेहून अधिक आप्त स्त्रियांचें काम पुरुषांस करावें लागतें; ह्मणजे घरकाम करणारे इतके पुरुष ( आचारी, पाणके, शागीर्द वगैरे ) असणें जरूर आहे. कोष्टकावरूनही असेंच दिसून येतें. एकंदर ब्राह्मणसंख्येपैकीं पंधरा वर्षांच्या वरच्या सुवासिनी स्त्रिया व त्यांचे नवरे मिळून २१४०००

### कोष्टक पहिलें.

| वय | अविवाहित | | विवाहित | | विधुर | विधवा |
|---|---|---|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्रिया | पुरुष (बायको जिवंत असलेले) | सुवासिनी | | |
| ०– ९ | ५६८२३ | ५५६४९ | ४०५२ | ६१४९ | ३१९ | ५०१ |
| १०–१४ | २८५३३ | ११९६६ | ८२०३ | २१०९२ | २९९ | १०९२ |
| १५–१९ | २१८३२ | ११६० | | | २७३ | ९३६ |
| २०–२४ | ९२७८ | ६५५ | | | ५०६ | १०७४ |
| २५–२९ | ४२३६ | ५८२ | ६८८१४ | ६८८३२ | १००६ | ३०६१ |
| ३०–३४ | १६७८ | ५२८ | | | १३२३ | ५१९९ |
| ३५–३९ | ९१७ | ३२६ | | | १३०७ | ५५६९ |
| ४०किंवा अधिक | २२५५ | १६५५ | ४०५८८ | ३६३८० | १९९३० | ३१७६४ |
| एकूण | १२५५५२ | ७२५२१ | १२१६५७ | १३२४५३ | २४९६३ | ४९१९६ |

प्रमुख जातींची एकंदर लोकसंख्या ५२६३४२

पुरुष { अविवा० १२५५५२, विवा० १२१६५७, विधुर २४९६३ — एकूण २७२१७२

स्त्रिया { अविवा० ७२५२१, विवा० १३२४५३, विधवा ४९१९६ — एकूण २५४१७०

| | |
|---|---|
| अल्पवयस्क जोडपीं सुमारें | २५००० |
| दंपत्यास्थितींतील जोडपीं | ८०००० |
| वृद्ध जोडपीं ( संतान बंद झालेलीं ) | २७००० |
| एकूण | १३२००० |

१५ वर्षांच्या आंतील मुलगे व मुली मिळून १९४७७८

आहेत, त्यांपैकीं ५४००० वृद्ध आहेत; १९४००० चौदा वर्षांच्या आंतील मुलगे व मुली आहेत; व बाकी ११८००० विधुर, विधवा आणि अविवाहित माणसें आहेत. या इतक्यांची मिळून १०७००० ( ह्मणजे २१४००० च्या निम्मे ) कुटुंवें होतात; त्यांपैकीं ८०००० दंपत्यास्थितींत असतात, हें मागें सांगितलेंच.

२४९. " एक हजार लोकवस्तींत दरसाल निदान ३२ मुलें निपजतात. इतक्या वस्तींत जीं २०० कुटुंवें असायाचीं त्यांतील १६० दंपत्यस्थितींत असतात. ह्मणजे १६० वयांत आलेल्या सुवासिनी स्त्रियांपैकीं ३२ बाळंतिणी होतात; व ८०००० स्त्रियांपैकीं १६००० स्त्रिया एका वर्षांत बाळंतिणी होतात. या इतक्यांच्या घरांत मुलांची व बाळंतिणींची काळजी घेण्यास व घरकाम संभाळण्यास आप्त स्त्री अवश्य पाहिजे, व ती नसेल तर एक नौकर तरी ठेविली पाहिजे. याच गोष्टीचें दुसऱ्या तऱ्हेनें प्रमाण पाहतां येतें. दंपत्यस्थितींतील स्त्री दोन अडीच वर्षांत एकदा बाळंतीण होते. गर्भारपण आणि बाळंतपण मिळून सुमारें पांचसहा महिने ती गृहकृत्यांकडे लक्ष देण्याच्या स्थितींत नसते. तीस कोणी तरी मदत करण्यास असलें पाहिजे. ह्मणजे दंपत्यस्थितीच्या पंचमांश काळांत दर कुटुंबांत एक स्वतंत्र स्त्री अधिक असावी लागते. ह्मणजे ८०००० कुटुंबांत १६००० स्त्रिया अधिक लागतात.

२५०. परंतु याशिवाय प्रपंचांत अनेक आपत्ति आहेत. एक हजार लोकसंख्येच्या २०० कुटुंबांत दरसाल निदान २६ माणसें मरण पावतात; त्यांपैकीं प्रौढ स्त्रिया निदान ८ असतात. स्त्रियांची मृत्युसंख्या पंधरापासून तीस-पस्तीस वर्षांच्या दरम्यानच फार असते; कारण या वयांत अतिरिक्त विषयोपभोग, गर्भधारण, बाळंतपण, व तज्जन्य रोग, या सर्वांपासून स्त्रियांस बाधा होते. ज्या स्त्रिया मृत्यु पावतात त्या चार सहा महिने तरी अजारी असायाच्या; त्यांशिवाय सुसाध्य रोगांनीं, (ह्मणजे ताप, खोकला, अमांश, वगैरे, रोगांनीं) अजारी असणाऱ्या निराळ्याच. या सर्वांच्या कुटुंबांत सैंपाक व इतर गृहकृत्यें करण्यास, औषध पाणी देण्यास, मुलांलेंकरांचा सांभाळ करण्यास आप्त स्त्रियांची मदत लागते; व ती न मि-

ळेल तर नौकर स्त्री पाहणें जरूर होतें. ८०००० कुटुंबांत निदान दोन हजार आप्त स्त्रियांस अजारी स्त्रीच्या शुश्रूषेचेंच काम करीत राहिलें पाहिजे व तें करण्यास त्या स्वतंत्र असल्या पाहिजेत.

ब्राह्मणज्ञातींत दरसाल कमींत कमी एक हजार स्त्रिया १५पासून ३५ वर्षांच्या दरम्यान मरण पावतात व त्यांचीं मुलें उघडीं पडत असावीं; त्यांचा सांभाळ करणें मोलानें होणें नाहीं. इतक्या आप्त स्त्रियांकडेच त्यांची काळजी दिली पाहिजे.

२५१. हजार लोकसंख्येच्या दोनशें कुटुंबांत दरसाल पांच वर्षांच्या आंतील तान्हीं मुलें निदान दहा तरी मरण पावतात. त्यांशिवाय जीं अजारीं पडून बरीं होतात तीं निराळीं. वर्षांत महिना दोन महिने अजारी पडणारीं व मरणारीं एकंदर तान्हीं मुलें किती तीं पाहिल्यास दोनशें कुटुंबांत निदान पंचवीस-तीस तरी सांपडतील. त्यांच्या शुश्रूषेस आई किंवा बाई लागणारच. एकीनें घरकाम संभाळलें तर दुसरी मुलांस संभाळील. या कारणानें दंपत्य स्थितींतील स्त्रीस दुसऱ्या स्वतंत्र बायको माणसाची गरज लागते. ८०००० कुटुंबांत या एकाच कामावर कांहीं स्त्रियांची नेमणूक करायाची असें ह्मटल्यास निदान दोन तीन हजार स्त्रिया पाहिजेत.

२५२. स्त्रियांस मुलें होऊं लागलीं म्हणजे मुलें संभाळून घरचें बाकीचें काम करणें फार अवघड होतें. दोन, तीन, चार, मुलें झालीं ह्मणजे, त्यांतील कोणी रडत असतें, कोणी अजारी असतें, कोणी दांडगाई करितें—त्या सर्वांची काळजी घ्यावी, कीं नवऱ्याची घ्यावी, कीं घरकाम करावें, हें न कळून स्त्रियांचें चित्त व्यग्र होतें, त्यांचे हाल होऊं लागतात, त्या अशक्त आणि अल्पायुषी होत जातात. ज्यांस ऐपत आहे ते आचारी ठेवितात, किंवा बाई ठेवितात. परंतु हा फार खर्चाचा व नासाडीचा मार्ग होय. गरीब स्थितीमुळें पुष्कळांस तो स्वीकारितां येत नाहीं. आपली किंवा बायकोची आई, बहीण, मावशी, काकी, मामी, कोणीही नातेवाईक स्त्री आपले कुटुंबांत राहण्यास तयार असेल, तर तें मोठें भाग्य म्हणून समजायाचें. ती दूरची आप्त असल तर तिच्या आर्जवानें रहावें, तीस लत्ताकपडा द्यावा, तिचीं मुलें पोसावीं, त्यांच्या विद्याभ्यासाचा व तिच्या यात्रा-

देवधर्माचा खर्च सोसावा–या व अशा कृत्यांस कुटुंबवत्सल पुरुष तयार होतो. नौकर ह्मणन ठेवलेल्या स्त्रीशींही असेंच आर्जवानें आणि प्रेमानें वागावें लागतें.

जे पुरुष नुकतेच वयांत येऊन दंपत्यस्थितीनें विभक्त राहूं लागतात, त्यांसही नव्या तरण्या बायकोच्या मदतीस कोणी तरी आप्त स्त्री पहावी लागेत. चार दिवस विटाळशीपणाची अडचण महिन्यांतून यावयाची, तेव्हां त्यांनीं काय करावें? ज्या कोणास पंचवीस तीस रुपये दरमहा मिळतो, तोही हातानें करून बायकोस जेवूं घालण्यापेक्षां, कोणी आप्त स्त्री आपल्या स्त्रीचा सांभाळ करावयास मिळेल तर प्रयत्न करितो. खाणावळींत सहकुटुंब जाणारे फार थोडे; कोणी स्नेह्यांच्या येथें जातात; कोणी याच कारणानें विभक्त होत नाहींत; निदान स्नेह्यांच्या, किंवा आप्तांच्या शेजारास राहतात. पहिल्या बाळंतपणीं स्त्री बहुधा माहेरीं जाते. सद्या दंपत्यांतील स्त्रीस माहेरच्यांचा वारंवार आश्रय करावा लागतो; कारण स्वतंत्र नौकर ठेवण्यास कितीकांस सामर्थ्य असणार?

२५३. या प्रपंचांतील सर्व अडचणी ध्यानांत आणिल्यास संतति उत्पन्न करणाऱ्या ८०००० दंपत्यांस सरासरीनें तितक्याच स्वतंत्र स्त्रियांची मदत लागते. त्या मदतीवांचून त्यांचें चालावयाचेंच नाहीं. खाण्यापिण्याचे हाल होतील; मुलांचें संगोपन चांगलें होणार नाहीं; स्त्रिया अशक्त व अल्पायुषी होऊन मरतील. परंतु आप्तवर्गांत इतक्या स्वतंत्र स्त्रिया आहेत कोठें? स्त्रीस मुलींची व सुनांची कां इतकी हौस असते? त्या तरी आपल्या घरकामास हात लावून आपणांस थोडी विश्रांति मिळूं देतील, ही तिची आशा असते. हा तिचा जीवितरक्षणार्थ प्रयत्न होय; परंतु स्त्रीचें वय तीस वर्षांच्या पुढें गेल्या खेरीज तीस सून मिळत नाहीं; तिच्या मुली मात्र सासरीं जातात. सारांश, ज्या वयांत सुवासिनी स्त्रीस माणसाची मदत अवश्य अवश्य पाहिजे असते त्याच वयांत जर कोणी आप्त स्त्री तिला साहाय्य करणारी मिळाली नाहीं, तर तिच्यासारखे हाल कोणाचेही नाहींत असें समजावें. श्रीमंतांच्या येथें आचारी पाणके असतील; परंतु ते ठेवण्याची ऐपत निदान ५०००० कुटुंबांस नाहीं. वृद्ध दंपत्यें जीं २७

हजार राहिलीं त्यांस फारशी अडचण नसते, त्यांच्या सुना व मुली मोठाल्या झाल्या असतात. ( या सासर माहेर करणाऱ्या १५ वर्षांच्या आंतील विवाहित मुलींची संख्या पाहिल्यास ती सुमारें २७ हजारच आहे. )

या अडचणी जाणूनच सुधारलेलीं व न सुधारलेलीं तरुण दंपत्यें आपल्या मातापितरांस चिकटून राहतात; सहसा विभक्त होत नाहींत. नौकरीच्या कारणानें दूर राहण्याचा प्रसंग आल्यास उपायच नाहीं; तेव्हां देखील दूरदेशीं जाणें झाल्यास बायकांस मातापितरांच्या किंवा माहेरच्यांच्या ताब्यांत ठेवून वर्षदोनवर्षे तरी तरुण मनुष्य निभावून नेतो. कोष्टकावरून असें दिसतें कीं सुमारें ९,००० ब्राह्मण पुरुषांस बायका घरीं ठेवून याप्रमाणें विदेशीं जाण्याचा प्रसंग आला असावा; विदेशीं ह्मणजे मुंबई इलाख्याच्या बाहेर एवढाच कोष्टकावरून बोध होतो.

२५४. कोष्टकांत सुमारें चार हजार स्त्रिया पंधरावे वर्षाचे पुढें अविवाहित राहिलेल्या दिसतात. या ब्राह्मण जातीच्या नसाव्या. त्या वेश्या किंवा वेश्यांच्या मुली, किंवा ब्राह्मणांनीं बायकांप्रमाणें घरांत बाळगलेल्या अविवाहित स्त्रिया असाव्या, असें वाटतें. ब्राह्मणांच्या घरीं राहणारी ह्मणून ब्राह्मण, असें खानेसुमारींत लाविलें गेलें असावें.

एकंदर ब्राह्मणसमाजांत सुमारें तीन हजार पुरुष अखेरपर्यंत अविवाहित रहात असावे; त्यांत सेवकवर्गांतील कांहीं लोक असावे; तसेच अंध, पंगू, वेडे, अत्यंत दरिद्री, निरुद्योगी, रोगी किंवा दुराचारी, असेही पुष्कळ असावे; व कांहीं थोडे ब्रह्मचारी, साधु आणि विरक्त पुरुष असावे. वैवाहिक सुख ज्यांस मुळींच मिळत नाहीं किंवा नको असतें, अशांची संख्या हिंदुसमाजांत साहाजिकच **फार थोडी** आहे, असें या आंकड्यांवरून दिसून येतें.

श्रीमंतांच्या मुलांचें पंधरासोळावे वर्षीं लग्न होतें, मध्यम स्थितींतील गृहस्थांच्या मुलांचें २० वर्षांचे आंत होतें. गरीबांचें लग्न ३० वर्षांचे आंत होऊन जातें. ३० वर्षांच्या पुढें कांहीं थोड्यांचें मात्र

होतें. अगदींच ज्यांचें होत नाहीं त्यांची संख्या सुमारें ३००० असें आतां सांगितलेंच. यावरून वैवाहिक स्थितीच्या निराशेनें दुराचारास लागण्याचें ज्यांच्या नशिबीं येतं असे लोक हिंदुसमाजांत मुळींच नाहींत असें ह्मटल्यास चालेल. जो कोठें व्यभिचार दिसत असेल तो वैवाहिक अडचणींमुळें नव्हे; इतर कारणांमुळें व मुख्यत्वेंकरून दारिद्र्यमूलक निर्विद्यता व संपत्तिमूलक दुर्व्यसनांमुळें झालेली मानसिक हानि, यांमुळें उत्पन्न होत असावा.

२५५. विधुर पुरुषांचा विचार करितां पंचवीस वर्षांच्या आंतील सर्वांचा पुनः विवाह होत असावा; निदान होण्यास सामाजिक विघ्न नाहीं; व तें चाळीस वर्षांपर्यंत केव्हांही नाहीं असें ह्मटल्यास चालेल. परंतु जों जों वय वाढत जातें व पदरीं मुलेंबाळें असतात, तों तों पुनः विवाह करणें गौण होत जातें व समंजस मनुष्य तो करण्यास धजावत नाहीं.

कोष्टकावरून जी एक गोष्ट लक्षांत येते ती ही कीं वीस वर्षांच्या वयापर्यंत सुमारें ३०,००० पुरुष विवाहित असतात, व सुमारें ९०० विधुर झालेले असतात. या विधुरांपैकीं बहुतेकांचीं पुढें लग्नें होत असलीं पाहिजेत. तसेंच वीस वर्षांपासून तीस वर्षांपर्यंत ३२,००० विवाहित पुरुष असतात; व १५०० विधुर असतात. या वयांतील विधुर पुरुषांपैकीं बऱ्याच लोकांचे पुढें विवाह होत असतील, तथापि त्यांमध्यें विवाहास नाराजी असे लोक अधिक, ह्मणूनच त्यांची संख्या वाढलेली दिसते. या दहा वर्षांच्या वयाच्या अवधींत जे पुरुष असतात, त्यांच्या स्त्रिया १५ पासून २५ वर्षांच्या दरम्यान वयाच्या असायाच्या, व त्यांमध्यें मृत्युसंख्या अधिक असेंही लक्षांत येतें. पुढें तीसपासून चाळीस वर्षांच्या दरम्यान २२,००० पुरुष विवाहित असतात, व सुमारें २६०० लोक विधुर झालेले आढळतात. या वयांत विवाह करणारे विधुर थोडे व न करणारे फार असें या मोठ्या संख्येवरून सिद्ध होतें. या दहा वर्षांच्या वयाच्या अवधींत पुरुषांचे मृत्यु फार होतात; परंतु त्यांच्या बायका ज्या २५ पासून ३५ वर्षांच्या असतात त्यांमध्येंही मृत्युसंख्या फार वाढलेली दिसते. त्यामुळें

दंपत्यांची संख्या फार कमी होते, व विधुर आणि विधवा यांची एकदम वाढते. ( कोष्टक २ रें पहा. )

चाळीस वर्षांचे पुढें विवाहित पुरुष सुमारें ४०५०० आहेत; परंतु पस्तीस वर्षांच्या पुढें विवाहित सुवासिनी स्त्रिया सुमारें ४४००० आहेत; त्यावरून असें लक्षांत येतें कीं या वयांत स्त्रीच्या स्वाधीन कुटुंब करून विदेशीं राहणारे, यात्रेस जाणारे वगैरे पुरुष बरेच असतात; शिवाय या वयांतील सुवासिनी स्त्रियांची संख्या पाहिल्यास ती इतकी मोठी आहे कीं अगदीं लहान मुलींशीं विवाह करणारे पुरुष विरळा असावे असें सिद्ध होतें.

२५६. यानंतर विधवांच्यासंबंधानें विचार करायाचा. एकंदर विधवा सुमारें ४९२००, त्यांपैकीं ४५६०० विधवा पंचवीस वर्षांहून अधिक वयाच्या आहेत; बाकी ३६०० उरल्या, त्यांमध्यें २० पासून २५ वर्षांच्या १०००; १५ पासून २० वर्षांच्या १०००; १० पासून १५ वर्षांच्या ११००; आणि दहा वर्षांच्या आंतील ५०० आहेत. यांपैकीं पंधरा वर्षांच्या वरच्या ज्या विधवा आहेत, त्यांपैकीं कित्येकांस एखादें दुसरें मूल असण्याचा बराच संभव आहे;

## कोष्टक दुसरें.

| वय वर्षें | एकंदर लोकसंख्या | पैकीं विवाहित जोडप्यां* | विधुर | विधवा |
|---|---|---|---|---|
| ०—२० | २४४००० | ३८००० | ९०० | २५०० |
| २०—३० | ८५००० | ३२००० | १५०० | ४००० |
| ३०—४० | ६१००० | २२००० | २६०० | १०७०० |
| ४० व अधिक वयाचे | १३६००० | ४०००० | २०००० | ३२००० |
| | ५२६००० | १३२००० | २५००० | ४९२०० |

* स्त्री व पुरुष यांच्या वयाचें मध्यम प्रमाण काढून विवाहित जोडप्यांचा सरासरीनें अंदाज केला आहे.

व मुलांचा सांभाळ करण्याची जबाबदारी त्यांकडे असायाची; त्यांनीं पुनर्विवाह केल्यानें फायदा होण्याचा फारच थोडा संभव आहे. ज्यांस स्वत:चीं मुलें नाहींत, त्यांकडेही अल्पायुषी मरण पावलेल्या जावेच्या, नणदेच्या, वहिणीच्या किंवा अशाच निकटच्या आप्तांच्या मुलांचा सांभाळ करण्याचे यावयाचें, व तें प्रेमाचें कृत्य सोडून विधवा स्त्री पुनर्विवाह करण्याचे क्वचितच मनांत आणील. तसेंच अशक्तपणामुळें, पहिल्या विवाहांत सुख न मिळाल्यामुळें, देवधर्माकडे विशेष चित्त लागल्यामुळें, किंवा लहान बहीणभावंडांचें संगोपन अथवा वृद्ध मातापितरांची सेवा करणें अधिक इष्ट वाटल्यामुळें, पुन: विवाह करण्याचें पुष्कळांस रुचणार नाहीं. याशिवाय स्वतंत्र आप्त स्त्रीची मदत हिंदु दंपत्यांस किती आवश्यक असते तें पाहिल्यास, कुटुंबांत नांदलेली विधवा स्त्री आप्तकृत्यें करण्याचें सोडून रतिसुखाकरितां पुनर्विवाहाची गोष्ट मनांत आणील हें संभवत देखील नाहीं. सुधारल्या देशांत देखील आपल्या विवाहानें आईचे हाल होतील, बहीणभावंडांची नीटशी काळजी घेतली जाणार नाहीं, वगैरे गोष्टी मनांत आणून मुळींच विवाह न करणाऱ्या स्त्रिया पुष्कळ आहेत. तसेंच, विवाहाची कल्पना सोडून देऊन धर्मसाधन किंवा परोपकार करण्याच्या बुद्धीनें स्वतंत्र राहणाऱ्या स्त्रिया तिकडे पुष्कळ आहेत. कुटुंबास मदत, धर्मसाधन किंवा परोपकार यांचे सुधारल्या देशांतील मार्ग निराळे व या देशांतील निराळे, तथापि स्त्रीहृदयांतील मनोवृत्ति एकच आहेत; व त्या मनोवृत्तींच्या समाधानाकरितां स्वार्थत्यागानें आप्तकृत्यें करण्यास स्त्रिया आपोआप तयार होतात; त्यांस उपदेश किंवा जुलूम करण्याचें कारण नसतें. अगदीं अल्पवयस्क मुलींस वैधव्य येऊं नये इकडे समाजाचा स्वाभाविक कल होत चालला आहे. बालविवाहाचा प्रघात हळू हळू कमजोर होत आहे; व त्यानें किती कार्य होतें इकडेच समाजाची हल्लीं दृष्टि लागलेली आहे. विवाहाचें वय वाढवून, मनोवृत्ति उत्कृष्ट करून, धर्मप्रेमास वृद्धिंगत करून, मुलांच्या संगोपनाचें काम विधवांकडे देऊन व कुटुंबांत त्यांचा मान व अधिकार वाढवून, जेवढें अकालिक वैधव्य व त्या वैधव्यांतील दु:ख दूर होईल तेवढें करण्याचा, व तसेंच आपलें आ-

युष्य कुटुंबसंरक्षणांत आणि ईश्वरभक्तींत जात आहे असें वाटून विधवेस जेवढें आयुष्यांत सुख व समाधान होईल तेवढें सुलभ करण्याचा —पूर्वीपासन समाजाचा प्रयत्न आहे, व तो हल्लीं बळावत आहे. विधवांची स्थिति सुधारण्याचे व त्यांस सुखी करण्याचे हे जे सात्त्विक उपाय, त्यांनीं बहुतेक कार्यभाग उरकतोच; व जो थोडा अवशेष राहील तो पुनर्विवाहानें साध्य झाल्यास पहावें, अशी समाज परवानगी देत आहे. त्या परवानगीची मर्यादा पूर्वी तुह्मांस सांगितलीच.

२५७. ब्राह्मणसमाजाची अंत:स्थ रचना कशी आहे व तींत प्रत्येक व्यक्तीकडे कुटुंबहिताचें कोणतें कसें काम येतें, त्याची तुह्मांस आतांपर्यंत समजूत पाडण्याचा मीं प्रयत्न केला. आतां शेवटीं **मातृत्व स्थितीचा** जो व्यापक अर्थ करणें जरूर आहे त्याविषयीं थोडें सांगायाचें राहिलें आहे. पुरुषास योग्य अशीं अनेक कार्यें पुरुष करीत असतो; तीं धंद्याचे संबंधाचीं असतात किंवा परोपकाराचीं असतात; परंतु त्यांतील अनेकांमुळें त्यास पितृतुल्यता येते. विवाह करून संतति उत्पन्न केल्यानेंच पितृत्व येतें असें समजणें ह्मणजे फार कोत्या बुद्धीचें काम होय. विवाहाहून इतर मार्गांनीं जें पुरुषास **पितृत्व** येतें तेंच पुरुषाच्या थोरवीस व शाश्वत कीर्तीस कारण होतें. विद्या देणाऱ्या गुरूचें काम पितृत्वाचें आहे; दारिद्र्यस्थितींत किंवा संकटसमयीं पालन किंवा तारण करणाराचें काम पितृत्वाचें आहे. सर्व समाजाचें जो धर्मरीत्या, व्यवहाररीत्या किंवा राजकीयरीत्या हित करितो, तोही समाजाचें पितृत्व संपादन करितो. देशाकरितां लढणारे व देशसेवेस बळी पडणारे सर्व शूर शिपाई देशाच्या पितृत्वास पात्र होतात. सामान्यत:, पुरुषांनीं जीं सामाजिक कर्तव्यें विशिष्टपणें आपलीं ह्मणन पत्करिलीं आहेत, त्यांच्या द्वारें जे पुरुष समाजाचें हित साधतात ते पितृत्वाच्या बहुमानास पात्र होतात—

> **प्रजानां विनयाधानाद्रक्षणाद्भरणादपि ।**
> **स पिता, पितरस्तासां केवलं जन्महेतवः ॥ रघु०**

हीच गोष्ट स्त्रियांच्या मातृत्वाच्या संबंधानें खरी आहे. जीं सामाजिक कर्तव्यें विशिष्टपणें आपलीं ह्मणून स्त्रियांनीं पत्करिलीं आहेत, त्यांपैकीं जीं जीं स्त्रिया उत्तम प्रकारें करून दाखवितात त्यां-

त्यांनीं त्यांस मातृत्वाचा मान मिळाला पाहिजे. मातृत्वाची थोर योग्यता अंगीं आणण्याचा विवाह हा अगदीं कनिष्ठ प्रतीचा मार्ग आहे. देशाच्या रक्षणाकरितां प्रतिक्षणीं हत्यार खांद्यावर ठेवून जन्मभर सरहद्दीवर उभा राहणाऱ्या शूर शिपायानें लग्न करून संतति उत्पन्न केली नाहीं, ह्मणून प्रजारक्षणासंबंधानें त्याचा पितृत्वाचा मान कमी होतो काय? त्याप्रमाणेंच घडोघडीं कुटुंबांत ज्या आपत्ति येतात, त्यांचें निवारण करण्यास, जीवाचीही पर्वा न करून, जी विधवा स्त्री नित्य व जन्मभर सज्ज उभी असते, तिचें पुनर्विवाह न केल्यानें मातृत्व गेलें काय? 'सा माता, मातरस्तासां केवलं जन्महेतव:।' असें तिजसंबंधानें आपण म्हटलें पाहिजे व कुटुंबांत तिची योग्यता फार मोठी गणिली पाहिजे.

सुधारल्या देशांत जन्मभर अविवाहित राहून मातृत्वाची श्रेष्ठतर दीक्षा घेणाऱ्या ज्या हजारों स्त्रिया आहेत त्या जीं कामें तिकडे करीत आहेत तींच कामें स्वतंत्र विधवांकडे देण्याचा कां आर्धी प्रयत्न करूं नये? आतां, कोठें इंद्राचा ऐरावत व कोठें शामभटाची तट्टाणी, असें या कल्पनेवरून तुह्मांस वाटेल. परंतु तें स्त्रियांस व पुरुषांस सारखेंच लागू आहे. आपण पुरुष जसे कांहीं कामें सुधारल्या राष्ट्रांतील पुरुषांप्रमाणें करूं पाहतों, त्याप्रमाणेंच इकडील विधवा स्त्रियांनीं तिकडील अविवाहित व विधवा स्त्रियांचे अनुकरणीय गुण अंगीं आणण्याचा प्रयत्न करावा. कुटुंबसंबंधीं आसक्तत्यांत पुष्कळ स्त्रिया, तिकडे तशाच इकडे, गुंतून राहणारच. परंतु ज्यांस तसें करण्याचें अवश्य नाहीं त्यांनीं बुद्धीच्या, धर्माच्या, व परोपकाराच्या श्रेष्ठतर कृत्यांकडे लक्ष द्यावें. ब्राह्मणसमाजांत स्त्रियांची एकंदर संख्याच फार कमी, हें दुर्दैव होय; त्यामुळें या मातृत्व दीक्षेच्या वरिष्ठ कृत्यांकडे लागण्यास फार थोड्या स्त्रिया शिल्लक उरतात. परंतु त्या थोड्यांनीं तरी ती दीक्षा घ्यावी. रोगी मनुष्याच्या, विशेषत:, स्त्रियांच्या शुश्रूषेचें एक मोठें काम आहे. डाक्तराचें, वैद्याचें व सुइणीचें काम करणाऱ्या जितक्या स्त्रिया असतील तितक्या आपल्या समाजांत पाहिजे आहेत. स्त्रिया व मुलें यांमध्यें रोग व मृत्युसंख्या यांचें प्रमाण फार आहे, तें कमी करण्याचें श्रेय विद्वान्

विधवांनीं घेतल्यास त्यांची किती प्रतिष्ठा वाढेल ? धर्मोपदेशकाचें काम, कांहीं ख्रिस्ती पंथांत स्त्रिया करीत आहेत; आपल्या देशाच्या चालीप्रमाणेंच कां होईना, पुराणादि ग्रंथांचें अध्ययन करून उत्तम नीतीचा व धर्माचा बोध करणाऱ्या कांहीं स्त्रिया निघाल्या तर ब्राह्मणसमाजास त्यांचें मोठें भूषण वाटेल. बालसंगोपन आणि स्त्री-बाल-शिक्षण हें तर विलायतेंत सर्वस्वी स्त्रियांकडे सोंपविलें गेलें आहे. त्याकडेही स्त्रियांनीं आपलें सामर्थ्य खर्च केलें तर फायद्याचें होणार आहे. सारांश, जेथें विधवा स्त्रीमध्यें थोडी तरी बुद्धि व कर्तृत्व आहे, तेथें तीस उचित व समाजास उपकारक असे धंदे किंवा अशीं पारमार्थिक कर्तव्यें पुष्कळच आहेत. तीं तिनें आप्तांच्या साहाय्यानें अवश्य अंगीकारावीं. ज्ञानसंपादनाचें काम सांसारिक स्त्रियांचें नव्हे, विधवांचें होय. बुद्धीच्या परिश्रमानें सुवासिनी स्त्री उत्तम संततीच्य उत्पादनास व पोषणास अयोग्य होते असें डाक्तरांचें व तत्त्वज्ञांचें मत आहे. पुष्कळ बुद्धिपरिश्रमानें स्त्रीस वैवाहिक स्थिति देखील आवडेनाशी होते; त्यामुळें विद्वान् स्त्रिया अविवाहित राहूं पाहतात. ज्ञानमार्गास लागून पुष्कळ बुद्धिपरिश्रम करण्यास बालविधवाच योग्य होत. त्यांकरितां मराठी व संस्कृत पाठशाळा पाहिजेत; त्या स्थापण्याचा प्रयत्न अवश्य करावा. सुवासिनी स्त्रियांच्या मागें अभ्यास व परीक्षा लाविल्यानें त्या रोगी व कुटुंबकार्यास अयोग्य अशा मात्र होतील. त्यांमध्यें **अपरोक्षपणें** ज्ञानप्रसार होणें इष्ट आहे.

सारांश, विधवांच्या कैवाऱ्यांनीं त्यांस ज्ञानमार्गास लावावें, धर्मकृत्यांकडे त्यांचीं मनें वळवावीं, परोपकाराची स्फूर्ति त्यांच्या हृदयांत करून द्यावी; प्रवास, यात्रा, देशावलोकन इत्यादींची त्यांची हौस पुरवावी. या कामीं पाहिजे तितका पैसा खर्च करावा. विधवांस आलेलें ज्ञान हजारों वाटांनीं सांसारिक स्त्रियांत उतरेल; व सर्व स्त्रीजातीची त्यामुळें उन्नति होईल. खरें थोर मातृत्व या तऱ्हेनें विधवांच्या कर्तृत्वानें त्यांस प्राप्त होईल. या अशा श्रेष्ठ कर्तव्यांस ज्या नालायख,—ज्यांस बुद्धि नाहीं, उत्तम मनोवृत्ति नाहींत, सात्त्विक महत्त्वाकांक्षा नाहीं—ज्यांस केवळ पशुधर्म

कळतो,* त्यांच्या पुनर्विवाहाकरितां पाहिजे तर खटपट करावी; ब्राह्मणसमाजांतील सुज्ञ लोकांची या कामीं संमति मागितली तर ती अवश्य मिळेल.

२९८. असो. आज हें संभाषण एकंदरीनें बरेंच लांबलें. या संभाषणाचें आतां तुह्मांस तात्पर्य मात्र सांगायाचें राहिलें आहे. तें असें कीं आपण कोणतेही कायदे केले किंवा कोणतेही नीतीचे, शिष्टाचाराचे किंवा धर्माचे नियम पाळले, तथापि त्यांपासून या आपल्या ऐहिक स्थितींत दुःखविरहित शुद्ध सुख उत्पन्न होणें अशक्य आहे. जर समाजांतील सर्व व्यक्तींचें ज्ञान, बुद्धि, मनोवृत्ति व कर्तृत्व हीं अगदीं सारखीं असतीं व शिवाय त्यांमध्यें वयपरत्वें भेद पडला नसता, तर एकाच प्रकारच्या नियमांपासून सर्वांस सारखें सुखदुःख उत्पन्न होण्याचा संभव होता. परंतु तशी स्थिति मुळींच नाहीं—सर्व व्यक्ति सारख्या नाहींत. व्यक्तींच्या स्वभावांत व प्रकृतींत पुष्कळ प्रकार व भेद आहेत. त्यामुळें एकच सुख सर्वांस सारखें महत्त्वाचें वाटत नाहीं; एकच दुःख सर्वांस सारखें तीव्र भासत नाहीं. तसेंच, एकच गुण सर्वांस सारख्या महत्त्वाचा किंवा हितावह वाटत नाहीं; एकच दोष सारखा त्याज्य किंवा दुष्परिणामावह भासत नाहीं. प्रकृतिभिन्नत्वामुळें मतवैचित्र्य व रुचिवैचित्र्य अवश्य उत्पन्न होतें. जेव्हां आपण एकंदर समाजाच्या सुखाकारितां, किंवा एकंदर व्यक्तींस न्याय मिळावा ह्मणून, किंवा सर्व लोकांची उन्नति व्हावी ह्मणून कोणतीही एखादी सुधारणा सुचवितों, तेव्हां मतवैचित्र्याचे व रुचिवैचित्र्याचे जे परिणाम अनिवार्यपणें घडायाचे ते अवश्य ध्यानांत ठेविले पाहिजेत. ते परिणाम अशा प्रकारचे असतात कीं कोणतेही चालू नियम किंवा नवीन योजिलेले नियम एकांतपणें सुखदायक होऊं शकत नाहींत. मोठ्या समाजांत सुखाचे पाठीस दुःख लागलेलें असतें, न्यायाच्या पाठीस अन्याय लागलेला असतो, गुणाचे बरोबर दोष उत्पन्न होतात, व सामान्यतः कांहीं धन (+) उत्पन्न करूं पहावें तों त्याबरोबर तितकेंच ऋण (−)

* त्यांच्या या अशा हीन स्थितीबद्दल त्यांचे मातापितर, सासूसासरे, आप्त व हितचिंतक हे सर्व जबाबदार आहेत.

उत्पन्न होतें. उदाहरणार्थ, स्वातंत्र्य वाढविण्याचा आपण विचार केल्यास, तें स्वातंत्र्य इतरांस बाधक होऊं नये ह्मणून त्याबरोबर तितकेच नवे प्रतिबंध योजणें जरूर होतें. प्रकृतिवैचित्र्यामुळें अनेकांस ते नवे प्रतिबंध पसंत पडत नाहींत, व ह्मणून त्यांस तें नवें स्वातंत्र्यही नकोसें होतें; तें स्वातंत्र्यच त्यांस जुलमाप्रमाणें वाटतें व ते त्यास विरोध करितात. धर्म आणि नीति यांच्या सुधारणेसंबंधानें, निरनिराळ्या प्रकारांनीं, हें असें नेहमीं घडून येतें. म्हणूनच धर्म आणि नीति यांचे नियम पक्के ठरवून, त्यांचा अंमल कायद्याप्रमाणें सक्तीनें चालविण्याचा प्रघात हल्लीं कोठेंही चालू राहिलेला नाहीं.

तथापि चालू धर्म व नीति यांस जी एक गोष्ट अनुकूल असते ती लक्षांत ठेविली पाहिजे. ती अशी कीं धर्माच्या व नीतीच्या रूढ नियमांपासून जें दुःख, जे दोष व जे अन्याय उत्पन्न होतात, त्यांची बहुतेक व्यक्तींस **संवय** होऊन गेल्यानें ते तीव्रपणें अनुभवास येत नाहींत, ते अंगवळणीं पडून गेल्यासारखे होतात. तसेंच, रूढ नियमांपासून जें सुख, जे गुण व जे न्यायाचे प्रकार अमलांत आलेले असतात, ते **संवयी**मुळें अगदीं आवश्यक भासत असतात, व त्यांची हानि झाल्यास तीव्र दुःख होतें. याप्रमाणें नित्यच्या संवयीमुळें धर्माच्या आणि नीतीच्या रूढ नियमांपासून बहुजनसमाजांत, सरासरीनें पाहतां, संतोष व समाधान उत्पन्न होत असतें.

परंतु दरएक पुढच्या पिढींत ज्ञान, अनुभव व कर्तृत्व यांमध्यें फेरबदल झाल्यानें, पूर्वींच्या कांहीं संवयी कमजोर होतात किंवा अगदींच मोडतात. ज्या व्यक्तींत असा प्रकार घडतो, त्यांस रूढ नियमांपासून उत्पन्न होणारीं दुःखें, दोष, अन्याय, वगैरे तीव्रपणें अनुभवास येऊं लागतात. त्या अनुभवापुढें, रूढ नियमांचे गुण फिक्के पडतात; मग आहे ती स्थिति असह्य होते, ती बदलावी अशी स्फूर्ति होते. त्यामुळें नवीन पिढींतील अनेक व्यक्ति सुधारणेचे उपाय योजण्यांत आपली बुद्धि खर्च करूं लागतात. परंतु दुःखहीन, दोषहीन, अन्यायरहित, असे नवीन वर्तनाचे नियम काढणें अशक्य असतें. नियम काढणारास वाटतें कीं आपल्या नियमांनीं पूर्वींचीं दुःखें, दोष वगैरे सर्व दूर होतील; परंतु त्या नियमांपासून नवीं दुः-

खें, दोष, वगैरे उत्पन्न होतील, हें त्याच्या लक्षांत येत नाहीं; व आलें तरी तो त्यांस महत्त्व देत नाहीं. जुन्या संवयींच्या लोकांस तीं नवीं दुःखें, तेव्हांच दिसून येतात, त्यांस तीं असह्य वाटतात, व त्यामुळें नवीन उत्पन्न होणारीं सुखें, त्यांस क्षुद्र दिसतात. नव्या संवयींच्या लोकांची याच्या उलट स्थिति असते, ह्मणजे, त्यांस जुनीं दुःखें असह्य झालेलीं असतात, जुनीं सुखें क्षुद्र भासत असतात; नवीं सुखें स्पृहणीय वाटतात व नवीं दुःखें क्षुल्लक भासतात. अशा स्थितींत नव्याजुन्यांची जी तडजोड होते तिचें प्रमाण ठरण्याचा एकच मार्ग असतो. सामाजिक परिस्थिति, **ज्या प्रमाणानें** खरोखर बदललेली असते व समाजाच्या स्थैर्यास व शाश्वतीस **जेवढ्या प्रमाणानें** जुन्या संवयी बाधक होत असतात, **तेवढ्या प्रमाणानें** नव्या संवयी वळावतात, व **त्याच प्रमाणानें** नवीन वर्तनाचे नियम किंवा नवीन सुधारणा अमलांत येतात. थोड्या काळांत परिस्थिति थोडीशी बदलते व ह्मणून सुधारणेचें प्रमाणही अल्पमात्र असतें. सुधारणेची प्रगति सावकाशपणें होण्याचें हें कारण होय.

आपल्या **सुधारणेच्या कल्पना** सर्वस्वी सुखदायक आहेत, सर्वस्वी न्यायाच्या आहेत, त्यांपासून दुःख, दोष, अन्याय, वगैरेंची मुळींच उत्पत्ति होणार नाहीं, अशी जर कोणाही मनुष्याची समजूत असली तर ती अनुचित अभिमानाचें, आकुंचित दृष्टीचें व इतिहासाच्या अज्ञानाचें फळ होय, असें मी समजतों. आजपर्यंतच्या कोणाही धर्मकारास, नीतिकारास किंवा साधुसंतांस **अशा कल्पना** काढणें साधलेलें नाहीं व पुढें साधणार नाहीं. **धनऋणाच्या समान उत्पत्तीचा व्यापक नियम** सृष्टींत अनिवार्यपणें अंमल करीत आहे. ह्मणूनच ह्मटलें आहे कीं—

**सर्वारंभा हि दोषेण धूमेनाग्निरिवावृताः । भ० गी०**

जर वास्तविक अशी स्थिति नसती, तर आजपर्यंत जगांत लक्षावधि परम बुद्धिमान् लोकांनीं धर्म आणि नीति यांचीं उत्कृष्ट तत्त्वें ठरविण्याचा प्रयत्न केला असतांही, मनुष्यसमाज अद्यापि कां उ-

त्तम सुस्थितीस येऊन पोहोंचूं नये ? कां अद्यापि धर्म व नीति हा विषय, हजारों वर्षांपूर्वीं होता तितकाच वादग्रस्त रहावा ? 'हे एवढे नियम पाळले म्हणजे सुधारणा संपली, पुढें समाजाचें रूपांतर होण्याचें कारण नाहीं,' असें कां एकही धर्मकार किंवा नीतिकार अद्यापि सांगूं शकत नाहीं ? कारण असें घडणें असंभाव्य आहे. ह्मणून माझें असें म्हणणें आहे कीं **सुधारणा करूं इच्छिणारांनीं उतावीळ होऊं नये.** आपण कांहीं अजब कल्पना काढल्या आहेत असें मानूं नये, लोखंडाचें एकदम सोनें करणारा परिस जितका दुर्लभ आहे, तितकाच समाजाची विपत्ति दूर करणारा विचाररूपी परिस दुर्लभ आहे हें जाणावें; व बहुजनसमाजास ज्या दुःखाचा परिचय नाहीं तें फार तीव्र वाटतें व ह्मणून त्यासमवेत होणाऱ्या फायद्याकडे तो लक्ष देत नाहीं, उलट अंगवळणीं पडलेलें दुःख त्यास सौम्य भासतें व त्यासमवेत होणारे लाभ आवश्यक वाटतात—ही अशी जी वास्तविक स्थिति आहे ती ओळखून त्यांनीं आपलें चित्त शांत ठेवावें, निराश होऊं नये, किंवा लोकत्यागास प्रवृत्त होऊं नये.

---

## भाग ३८ वा.

### स्त्रियांचें सौजन्य. ईश्वराच्या अस्तित्वाचें नवें प्रमाण.

२५९. याप्रमाणें बोलणें झाल्यावर कांहीं वेळ आह्मी दोघेही स्वस्थ राहिलों. अखेरीस मीं ह्मटलें कीं, 'भाऊसाहेब, आज तुमचें मीं जें भाषण ऐकिलें त्यापासून मला अपूर्व लाभ झाला असें मी प्रांजळपणें कबूल करितों. मी एका सुधारकाचे येथें उतरलों ह्मणून तुह्मी मलाही सुधारक समजतां हें स्वाभाविक आहे. मी एका वेळीं सुधारक होतों, अविचारी होतों, मूर्ख होतों, पण तसा आतां नाहीं. मी जसजसा सुसंगतीस लागलों, तसतशी माझी एकएक सुधारणा गळत चालली. शिष्टाचारानें जो दुराचार ठरला आहे त्यापासून मी

परावृत्त आहें. हिंदुधर्माचा पाया कांहीं विशेष तत्त्वांवर आहे; जातिभेदांतही कांहीं तत्त्व आहे; आपले मनांत कांहीं उत्तम मनोवृत्ति आहेत, त्यांमुळें मनोदेवता आपणांस सन्मार्ग दाखवीत असते; समाज झपाझप सुधारकांचीं मतें ग्राह्य करीत नाहीं याचें कारण आतांपर्यंतच्या उत्क्रांतीस तीं विरुद्ध आहेत; इत्यादि अनेक गोष्टी मला कळूं लागल्या आहेत. मी एकवेळ सुधारक होतों याची मला लाज वाटत आहे; परंतु जें झालें त्यास उपाय काय ? आतां मला धर्माची आवश्यकता वाटूं लागली आहे. धर्मावांचून उदात्त प्रकारचें वर्तन माझे हातून होणार नाहीं ही माझी खात्री आहे; परंतु करूं काय ? जी श्रद्धा एकदा गेली, काचेच्या भांड्याप्रमाणें फुटली तिचे विचारानें सर्व तुकडे गोळा करून जुळविले तरी ती पहिल्यासारखी जुळत नाहीं, पहिल्यासारखी बळकट होत नाहीं, थोड्याशा धक्क्यानें तिचीं पुनः छकलें होतात. इंग्रजी विद्येच्या या दुष्परिणामांपुढें नाइलाज झाला आहे. ही श्रद्धा पुनः यावी, नास्तिक्य जावें, ह्मणून मीं प्रवास अंगीकारला आहे; प्राज्ञ पुरुषांचा उपदेश नम्रपणें ऐकतों; विवेक करितों; परंतु श्रद्धाबळ येत नाहीं. माझ्याप्रमाणें हतभागी थोडेच लोक असतील ! '

हें माझें बोलणें ऐकून भाऊसाहेब चकित झाले. सुधारकांविरुद्ध व्याख्यान मजपुढें कशास लाविलें, असें त्यांस वाटूं लागलें, व ते माझी माफी मागूं लागले. परंतु मीं त्यांस सांगितलें कीं झाली हीच गोष्ट ठीक झाली. ' प्रतिपक्षी समोर आहे असें जाणून स्वमत प्रतिपादन जितकें आवेशानें व आस्थेनें होतें तितकें नुसत्या उपदेशाच्या प्रसंगीं होत नाहीं. माझे मनावर जो आजच्या संभाषणाचा उत्तम परिणाम झाला आहे तो दुसऱ्या कोणत्याही मार्गानें झाला नसता. याकरितां मी तुमचा खरोखर आभारी आहें. आतां तुमच्या त्या मित्राकडे मला कधीं नेणार तें सांगा. त्या मित्राच्या मतांचें तुह्मीं जें दिग्दर्शन केलें त्यामुळें माझी जिज्ञासा अनावर होत आहे. '

याप्रमाणें मीं आपलें हृद्गत सांगितल्यावर भाऊसाहेबांस समाधान वाटलें; मजबद्दल त्यांस थोडासा बहुमानही वाटूं लागला असावा; व त्यांचे मित्राकडे जाण्याचा दिवस ठरल्यावर ते मला

दारापर्यंत पोहोंचवायास आले. त्या दिवशीं रात्रीं भाऊसाहेबांचींच मतें माझे डोक्यांत घोळूं लागलीं. त्यांच्या सुनेस मीं पाहिली नव्हती, तथापि ती मुलास घेऊन डोळ्यांपुढें उभी आहेसें मला भासूं लागलें. मीं तीस महाश्वेतेचें काल्पनिक रूप दिलें किंवा कोणाचें दिलें हें सांगतां येत नाहीं. अशा स्वप्नप्राय स्थितींतच मला निद्रेनें वश केलें. दुसरे दिवशीं, लीलावतीस केव्हां भेटेन, तिला सर्व हकीकत केव्हां सांगेन, व ती काय म्हणते तें केव्हां ऐकेन, अशी मनाची उतावीळ स्थिति होऊन गेली. चार वाजेपर्यंत कसा तरी वेळ काढिला; व लगबगीनें लीलावतीचे घरीं गेलों. तीस पहातांच मनास समाधान वाटलें व मीं एकदम बोलण्यास सुरवात केली. तिनें मला 'दादा' म्हणावें व मीं तीस 'ताई' म्हणावें असा आमचा संकेत ठरला होता.

२६०. " ताई, भाऊसाहेब अद्वितीय माणूस आहेत; त्यांची विचारसरणी दुसऱ्या कोणास येणें नाहीं. जुन्यांत जुना व नव्यांत नवा असें तूं ह्मणालीस तें खरें. माझ्या मनांत त्यानें कितीक नव्या कल्पना भरवून दिल्या ! त्या तुला केव्हां सांगेन असें मला झालें. पण एक गोष्ट प्रथम तुला सांगितली पाहिजे. तुझ्या हृदयासारखें दुसरें एक कोमळ हृदय आहे. तुझ्या इतकी विद्वत्ता भाऊसाहेबांच्या सुनेंत कोठून असणार ! परंतु त्याच उदात्त मनोवृत्ति, तेंच धैर्य, तोच साहजिक तत्त्वाववोध, तुझे व तिचे अंतर्यामांत सारखा स्फुरण पावत आहे. तुझी व तिची कोठून ओळख असणार ? "

" दादा, माझी मुळींच ओळख नाहीं, कारण या सुधारक लोकांचा सहवास माझ्या संभावितपणास बराच बाधक होतो. परंतु माझी उपजीविका सुधारकांच्या मदतीवर, तेव्हां मला त्यांस दुखवितां येत नाहीं; त्यामुळें कुलीन जुन्या चालीच्या घरांत मला कोणी येऊं देत नाहीं. याबद्दल माझें अंतःकरण तळमळत नाहीं ह्मणून तुझी समजतां काय ? परंतु उपाय काय ? माझी हानि मी जाणून आहें. खऱ्या सात्त्विक स्त्रियांची मला संगति होणें नाहीं. पुराणांतील स्त्रियांची संगति मी करूं लागलें आहें. माझ्या महाश्वेतेच्या

संगतीस कोणी कादंबरी असल्याखेरीज जिवास चांगलें समाधान वाटणार नाहीं, हें खरें. असो. पण भाऊसाहेबांच्या कोणत्या सुनेबद्दल तुह्मी बोलत आहां ? त्यांस दोन तीन सुना आहेतसें वाटतें."

२६१. "त्यांची धाकटी सून नुकतीच विधवा झाली आहे. तिची मीं हकीकत ऐकिली, तीवरून तिचें एवढें गौरव करीत आहें. आपण केव्हां केव्हां मित्रप्रेमानें सर्व वैवाहिक सुखें सोडतों, केव्हां पितृस्नेहानें सोडतों, केव्हां देशसेवेकरितां सोडतों. **न्यूटननें** गणितविद्येच्या स्नेहानें लग्न केलें नाहीं. **चारलस् ल्यांबनें** बहिणीच्या प्रेमानें केलें नाहीं. **रामदासानें** धर्मप्रेमामुळें केलें नाहीं. मनुष्याच्या प्रेमौघास कोठें तरी प्रशस्त मार्ग मिळाला ह्मणजे तो त्यांतच रममाण होऊन पाहिजे तेवढ्या स्वार्थत्यागास तयार होतो; अथवा तो स्वार्थत्याग कशाचा ? तो प्रेमौघ सतत वाहणें हाच स्वार्थ भासूं लागतो. स्त्रियांस बाळपणीं मातृप्रेम वश करितें; तरुणपणीं पतिप्रेम वश करितें; नंतर पुत्रप्रेम वश करितें. यांपैकीं कोणत्याही एका दिशेनें प्रेमौघास वाट मिळेनाशी झाली ह्मणजे दुसऱ्या दिशेकडे त्यास पूर येतो. सर्व थोर मनांची प्रवृत्ति ही कीं कोणत्यातरी कर्तव्याचे मागें लागून गुणांचा व प्रेमाचा पूर्ण विकास करून दाखवायाचा. भाऊसाहेबांचे सुनेवर वैधव्यदुःख कोसळलें तेव्हां त्या दुःखांतही तिनें सुख शोधून काढलें. "पत्नीत्वाचे दिवस संपले, आतां मातृत्वाची दीक्षा घेणें अवश्य आहे. स्वरूप सौंदर्याचें काम संपलें, आतां गुरूचें, पालकाचें, मायाममतेचें काम पुढें आहे. या नव्या कर्तव्याची दीक्षा घेतलेली जगजाहीर होणें अवश्य आहे. ह्मणून केशवपनादि संस्कारांस स्त्रीनें राजी व्हावें," हें तत्त्व त्या सुमतीबाईनें काढलें. तिचें नांव माहीत नाहीं ह्मणून तीस मी सुमति म्हणतों. या संस्कारांचा मूळचा उद्देश हाच असेल, परंतु तो कोणाचे ध्यानांत येण्यासारखा नाहीं. त्याचा स्वाभाविक बोध तिचे अंतःकरणांत व्हावा हेंच मला आश्चर्य वाटतें. पतीचे मागें स्वार्थाकरितां पुत्रप्रेम व परमार्थाकरितां धर्मपालन, या दोन दिशांनीं स्त्रियांची उदात्त वृत्ति प्रचलित व्हावी यांतच समाजाचा फायदा आहे असें मला वाटतें."

२६२. "यांत काय संशय आहे ? संततीचें संगोपन स्त्रिया जिवाभावानें करितात, ह्मणूनच मनुष्यत्व आणि मनुष्यजाति पृथ्वीवर श्रेष्ठतेस आली आहे. माझ्या वहिणीचें प्रत्यक्ष उदाहरण आहेना. तिला मुलांखेरीज जगांत दुसरी कांहीं काळजी आहे काय ? अक्षयीं मुलांत चित्त; मी वहीण, परंतु मजपाशीं क्षणभर बोलत बसली तर मुलांस तेवढें विसंवल्यावद्दल तीस आपण पातक करीत आहोंसें वाटतें ! मुलें पुढें असलीं कीं ती त्यांशीं तन्मय होते. त्यांस काय हवें तें ती जाणते. त्यांचीं दुःखें तीसच माहीत. अपत्यस्नेहासारखी स्त्रीहृदयास सर्वस्वी ग्रासणारी दुसरी मनोवृत्ति नाहीं. आपलें शेमडेंलेमडें पोर पाहून आईस जो आनंद होतो, तो दुसऱ्यांचीं सुंदर सुशोभित मुलें पाहून होत नाहीं. कोणीही आई आपलें कुरूप मूल बदलून दुसरें सुंदर मूल घेऊं इच्छिते काय ? दुसऱ्याच्या मुलाबद्दल तीस कधीं पान्हा फुटेल काय ? या मातृवात्सल्यामुळें सुंदर व कुरूप, काळीं व गोरीं, सशक्त व अशक्त, मुकीं, आंधळीं, पांगळीं, लुलीं, ज्या प्रकारचीं मुलें ईश्वर जन्मास घालतो, त्या सर्वांचा सांभाळ करणारी एक आई तरी निदान असतेच. मातृवात्सल्यामुळेंच जगांत इतक्या अनंत प्रकारच्या व्यक्ति दिसतात. नाहींतर जगांत सुंदर व बलिष्ठ माणसें मात्र शिल्लक राहिलीं असतीं; कोणी कुरूप **साक्रेटीस** जगास बुद्धिमार्गास लावणारा प्रौढ वयास येऊन पोहोंचला नसता. कोणी दानशूर **अहिल्याबाई** विवाहाच्या वयास येऊन पोहोंचली नसती. मनुष्यजातींतील सर्व वैचित्र्य वात्सल्यमूलक आहे. स्त्रियांची जात धरणीमातेसारखी आहे; मनुष्यजात आदिकालीन अरण्यासारखी आहे,—इंग्रजी बागेंतील कुंड्यांतल्या झाडांसारखी नाहीं. 'ममत्व' हा तीन अक्षरी शब्द परंतु त्यानें जाणवलेली मनोवृत्ति स्त्रीस्वभावांत किती विलक्षणपणें बलिष्ठ आहे ! 'माझें' असें स्त्रीनें ह्मटलें ह्मणजे ती त्याचे दोष विसरते, गुण तेवढे पहाते. मुलांसंबंधीं जें वात्सल्य तेंच 'हा माझा पति' असें समजतांच त्याबद्दलही स्त्रीमध्यें उत्पन्न होतें. पुरुष कुरूप असो, अशक्त असो, रोगी असो, दुर्व्यसनी असो, त्यास संभाळणें आपलें कर्तव्य आहे हें स्त्रीस तिची ती बलिष्ठ ममता सांगते.

सखायः प्रविविक्तेषु भवंत्येताः प्रियंवदाः ।
पितरो धर्मकार्येषु भवन्त्यार्तस्य मातरः * ॥ भा०

स्त्रियांच्या या अशा अनुपमेय सौजन्यामुळेंच समाज जीव धरून आहे. नाहींतर कुटुंबें उत्पन्न होण्यास व मोडून जाण्यास वेळ लागला नसता; जग विस्खळित झालें असतें; त्यांत सुधारणा, आणि प्रगति, आणि उत्क्रांति, यांचें नांव देखील सांपडलें नसतें. "

२६३. " परंतु सुमतीबाईनें अध्यात्म विचाराचें जें तत्त्व सांगितलें तें मला याहूनही महत्त्वाचें वाटलें. जें ध्यानीं, मनीं, स्वप्नीं वसतें तें खरें नाहीं कशावरून ? सुमतीस वाटतें, तिची आई व नवरा यांनीं तिला अद्याप सोडलें नाहीं; ते तिच्या पुनः पुनः ध्यानीं मनीं स्वप्नीं येतात; तिच्या सद्वर्तनावर त्यांची नजर आहे; तेव्हां ती पापाचरणास लागेल तरी कशी ? असल्या साक्षीदारांसमोर स्वकर्तव्यांपासून ढळेल तरी कशी ? या तिच्या अंतस्थ प्रेरणेचा खरा अर्थ भाऊसाहेबांनीं मला समजावून दिला. तो ऐकल्यापासून माझे मनांत नवीन प्रकाश पडला. पूर्वीं जे कित्येक बिकट प्रश्न वाटत होते ते सुगम

---

Yet was there one[1] thro' whom I loved her,[2] one,
Not learned, save in gracious household ways,
Not perfect, nay, but full of tender wants,
No Angel, but a dearer being, all dipt
In Angel instincts, breathing Paradise,
Interpreter between the Gods and men,
Who looked all native to her place, and yet
On tiptoe seemed to touch upon a sphere
Too gross to tread, and all male minds perforce
Sway'd to her from their orbits as they moved
And girdled her with music. Happy he
With such a mother! faith in womankind
Beats with his blood, and trust in all things high
Comes easy to him, and tho' he trip and fall
He shall not blind his soul with clay.

[1]His Mother. [2]Woman, *i. e.* Womankind.

TENNYSON: *Princess, C. VII*.

होऊन गेले. दुसऱ्यांच्या आचरणांत मला जे चमत्कारिक प्रकार वाटत होते त्यांचें मूळ माझ्या ध्यानांत आलें. दिगंबर महाराजांचें मत कीं गुणांच्या आविष्करणार्थ आपण जे श्रम करितों त्यांपासून शाश्वत संपत्ति उत्पन्न होते. पूर्वजांकडून जे संस्कार आले आहेत, ते देखील हल्लींच्या पिढीची संचित संपत्ति होय. परंतु भाऊसाहेबांनीं सुमतीच्या अंत:स्थ प्रेरणेचा याहून खोल अर्थ काढिला.

"पूर्वजांनीं घरेंदारें, देवालयें, मनोरे वगैरे बांधिले; त्यांनीं जंगलें तोडून जमिनी सुपीक केल्या; नद्या आडवून पाट काढिले; खेडीं व शहरें वसविलीं; ग्रंथ लिहिले; त्यांयोगें बळ, चातुर्य, कल्पना, वगैरे अनेक गुण प्रकट करून सृष्टीवर त्यांनीं शाश्वत परिणाम केला. या बाह्य कृत्यांत त्यांचे गुण व कर्तृत्व हीं प्रत्यक्षपणें निवास करीत आहेत. परंतु त्यांचे आत्मे कोठें आहेत ? हे आत्मे ह्मणजे त्यांचीं ज्ञानमय अस्तित्वें होत. तीं त्यांच्या वंशजांत पूर्वसंस्काररूपानें प्रकट होत आहेत; त्या अस्तित्वांच्या एकत्र वासानें मनोदेवता तयार होते. संततीच्या द्वारें पूर्वजांचे आत्मे अजरामर होतात. माझा देह माझ्या पूर्वजांच्या देहांच्या बीजोत्क्रमणानें झाला आहे. माझ्या हृदयांतील मनोवृत्तींत त्यांच्या मनोवृत्तींचें संक्रमण झालें आहे; **माझा आत्मा त्यांचीं ज्ञानमय अस्तित्वें एकत्र होऊन बनलेला आहे.** जगांतील पहिल्या पुरुषाप्रमाणें अत्यंत एकांतांत देखील मी एकाकी नाहीं; जगांतील पहिल्या स्त्रीप्रमाणें, ताई, तूंही पूर्ण एकांतांत एकटी नाहींस. आपल्या पूर्वजांचे आत्मे आपल्या सोबतीस आहेत. आपल्या अंतर्यामांत ते वास करीत आहेत. त्यांचा अनुभव आपल्या कामीं येतो; त्यांची प्रेरणा संकटसमयीं आपणांस मार्ग दाखविते.

२६४. "आपले पूर्वज ज्या घरांत राहिले तें जरी मोडकळीस आलें असलें तरी तें सोडतांना आपणांस वाईट वाटतें, कारण पूर्वजांस घेऊनच आपण त्यांतून बाहेर पडतों; तें त्यांस व आपणांस दु:ख देतें. त्यांचीं महत्कृत्यें पाहून आपणांस आनंद व अभिमान कां वाटतो ? त्यांच्या इतिहासांत आपलें मन कां गर्क होतें? त्यांच्या चरित्रांतील सुखदु:खांचे प्रसंग वाचून हर्षविषादानें आपण तन्मय कां होतों? यास उत्तर एकच. तें हें कीं आपण व ते

निराळे नाहीं. एकाच इंद्रियग्रामानें ते व आपण सर्व गोष्टी अनुभवीत आहों. ह्मणूनच पूर्वजांनीं संपादिलेल्या जमिनीचा एक तुकडाही सोडतांना जिवास वाईट वाटतें. हें त्यांचें घर, हें त्यांचें गांव, हा त्यांचा देश, एवढें मनांत येतांच, वाह्यात्कारीं निष्कारण दिसणारा त्या त्या वस्तूंवद्दल अभिमान उत्पन्न होतो. याप्रमाणें कुलाभिमान, देशाभिमान, वगैरे उत्कृष्ट मनोवृत्तींनीं मन उच्छ्वसित होतें. पूर्वजांचा लौकिक तो आपला, त्यांची श्रेष्ठता ती आपली, त्यांचा बहुमान तो आपला, हें सर्व या दृष्टीनें सयुक्तिक दिसतें. नाहींतर ‘ पूर्वजांनीं पुष्कळ केलें त्याचें तुला काय ? ’ असा प्रश्न विचारला असतां मनुष्य निरुत्तर होतो; तथापि अंतर्यामांत त्याची पक्की खात्री असते कीं पूर्वजांच्या कृत्यांबद्दल आपला अभिमान वाजवी आहे; तो त्याचा सुटत नाहीं. पूर्वजांचीं अपकृत्यें कोणी दाखवूं लागला ह्मणजे तसेंच लज्जेनें आपण मान खालीं घालतों; ‘ त्यांचें आपणास काय ! ’ असें कदापि मनांत आणीत नाहीं. पूर्वजांची कीर्ति वाढविण्यांत आपणांसच तिचें श्रेय आहे. त्यांच्या कीर्तीस आपले हातून कलंक लागला तर ‘ हंत धिङ् मामधन्यम् ’ असा रामाप्रमाणें आपले मनांत उद्गार येतो.

२६९. “आपले पूर्वज अतिसूक्ष्म ज्ञानमय रूपानें अंतर्यामांत वास करून सदोदित आपलें संरक्षण करीत आहेत, आपणांस सुबुद्धि देत आहेत, श्रेष्ठतर पदवीस जाण्यास प्रोत्साहन करीत आहेत, हें मनांत आणिलें ह्मणजे त्यांविषयीं कृतज्ञता जागृत होते. मग त्यांचे हेतु पूर्ण करावे, त्यांचा मार्ग अनुसरावा, त्यांच्या दृष्टीनें पूज्य व्हावें, अशी उत्कट इच्छा होते. आपल्या ऐहिक वर्तनाबद्दलची जबाबदारी एकट्याची नाहीं, आपले बरोबर अनंत पूर्वज तरतील किंवा पतित होतील, असें मनांत आलें ह्मणजे जीव दडपून जातो; ती जबाबदारी अनंतपट मोठी वाटते. अशा स्थितींत कोण वांकडें पाऊल टाकील? पूर्वसंस्काराचें हें स्वरूप फार थोड्यांनीं ओळखलेलें असतें; परंतु कोणी ओळखो वा न ओळखो, कुलीनांच्या आचरणांत तें आपोआप प्रकट होतें,—हेंच त्याच्या खरेपणाचें प्रमाण होय. हें तत्त्व फार भयंकर आहे ! एखादी दुष्ट कल्पना किंवा दुराचाराची इच्छा मनांत

मात्र यावी व ‘ अरे, आपले पूर्वज ज्ञानदृष्टीनें आपणांकडे टक लावून बसले आहेतना ? ’ एवढी शंका हृदयांत शिरावी, ह्मणजे मग आपली केवढी तारांबळ उडून जाईल ? आपण किती चपापून जाऊं? किती लज्जित होऊं ? ती कल्पना मनांतून घालविण्याविषयीं किती उतावीळ होऊं ? हेंच पश्चात्तापाचें बीज आहे. दुष्ट कर्मास कोणी प्रवृत्त होतो तेव्हां याच कारणानें त्याचें हृदय माघार घेतें, धैर्य गळून जातें, व कोणी पहात आहे असें वाटून तो कावराबावरा होतो. ‘ वाजे पाऊल आपलें, ह्मणे मागें कोण आलें ! ’

२६६. “ आपल्या प्राचीन तत्त्वज्ञांनीं, धर्मकारांनीं व कवींनीं हें तत्त्व अंशत: ओळखलें होतें. प्रत्येक विचारी पुरुषास त्याची थोडी तरी स्वाभाविक स्फूर्ति होणारच. ‘ आत्मा वै पुत्र नामासि ’ वगैरे ज्या तत्त्वज्ञांच्या उक्ति आहेत, त्यांत हें तत्त्व अंशत: सांगितलें आहे. आपलें ऐहिक आचरण वाईट असेल तर आपल्याबरोबर आपल्या पूर्वींच्या सत्तावीस पिढ्या व पुढील सत्तावीस पिढ्या नरकवासांत जाऊन पडतात; उलट, तें आचरण उत्तम असेल तर तितक्यांचा आपल्या बरोबर उद्धार होतो,–हें जें धर्मशास्त्रकारांचें विधान तें **एकत्र आत्मसंक्रांतीच्या** तत्त्वाचा अंशत: बोध झाल्यानेंच त्यांनीं केलें असावें. कवींनीं आपआपल्या रीतीनें हें तत्त्व वर्णिलें आहे. त्यांसही त्याची साहजिक प्रतीति आली. कोणीं ह्मटलें आहे–

**आदित्यचंद्रावनिलोऽनलश्च द्यौर्भूमिरापो हृदयं यमश्च ।**
**अहश्च रात्रिश्च उभे च संध्ये धर्मोऽपि जानाति नरस्य वृत्तम् ॥**

आपणांस पापाचरणापासून कोण गूढपणें निवृत्त करीत आहे, कोण सन्मार्गास लागण्याची गूढ प्रेरणा करीत आहे, हें तत्त्वत: न जाणून, कावराबावरा होऊन, मनुष्य आपणांभोंवतींच्या सूर्यचंद्रादि सर्व विभूतींस आपल्या सदसत्कृत्यांचे साक्षीदार समजूं लागतो. यांत आश्चर्य तें काय ?

“ आपल्या हृदयांत स्वत: ईश्वराचें अधिष्ठान आहे असें कोणी समजतात. सर्वांहून जुना व अनादि कालापासून मौन धरून सृष्टि चालविणारा मुनि ईश्वरच होय—

एकोऽहमस्मीति च मन्यसे त्वं न हृच्छयं वेत्सि मुनिं पुराणम्।
यो वेदिता कर्मणः पापकस्य तस्यांतिके त्वं वृजिनं करोषि ॥

"याप्रमाणें या आत्मसंक्रांतीच्या तत्त्वाचा भास अंशतः सर्व प्राज्ञ पुरुषांस पूर्वीपासून होत आला आहे. त्याचें सांप्रतचें पूर्ण स्वरूप मात्र अलीकडील उत्क्रांतिशास्त्राच्या आधारें सिद्ध होत आहे. मनुष्यजातीच्या सांप्रतच्या शारीरिक व मानसिक स्थितीची व्युत्पत्ति, पूर्वसंस्कारांचें हें सयुक्तिक विवरण ध्यानांत आणिल्याखेरीज, होऊं शकत नाहीं."

"दादा, तुह्मांला मीं मागें एकदा सांगितलेंना कीं सर्व गूढ तत्त्वें स्त्रियांनीं किंवा कवींनीं प्रथम ओळखलीं ? त्यांनीं आपआपल्या मूळ प्रेरणेप्रमाणें तीं स्पष्ट केलीं, शास्त्रीय तऱ्हेनें त्यांचें प्रतिपादन केलें नाहीं, ह्मणून काय झालें ? त्या शोधांबद्दल त्यांचेंच गौरव केलें पाहिजे. सुमतीमध्यें कोणत्याही बाह्य सूचनेवांचून या तत्त्वाची प्रेरणा झाली हें पाहून तुह्मांस आश्चर्य कां वाटतें ? स्त्रिया व कवि आपलें अंतःकरण जसें खोल जाऊन शोधतात तसें तें इतरांस साधत नाहीं; इतरांस त्यांसारखी साहजिक स्फूर्तिही नसते. उत्क्रांतिशास्त्रवाल्यांचें नांव कशास काढतां ? कोणा स्त्रीकडून किंवा कवीकडून त्यांस ही कल्पना प्रथम मिळाली असावी; व नंतर त्यांनीं ती विचार करकरून पूर्णत्वास आणिली असावी. कवि हे सर्व शोधकांचे अग्रणी होत. तुह्मी काव्यें वाचा, ह्मणून मी तुह्मांस उगीच सांगत नाहीं. सुमतीनें आत्म्यांचें अजरामरत्व ओळखलें, त्यांचें कार्य जाणलें, एवढेंच नव्हे तर त्यांचें अधिष्ठानही ठरविलें. तिची थोरवी मी सर्व शास्त्रकारांहून अधिक समजतें."

२६७. "ताई, आतांपर्यंत मला जेवढे सुविचारी लोक भेटले तेवढ्या सर्वांची ईश्वरावर श्रद्धा असलेली मला दिसून आली. मी एकदा सुधारक होतों, तेव्हांपासून माझी श्रद्धा जी गेली आहे ती मात्र मला परत येत नाहीं. माझ्या स्वभावांत हा मोठा दोष आहे असें मी समजतों. मला आतां असें वाटूं लागलें आहे कीं ज्या अर्थीं सुमतीचा देवावर एवढा भरंवसा आहे, त्या अर्थीं देव असलाच पाहिजे. मी तीस गुरु करणार. तिच्या अंतःकरणांत अशी खोटीच

कल्पना येण्याचा आतां मला संभव वाटेनासा झाला आहे. देवास आपलें गाऱ्हाणें सांगून त्याची ती जी प्रार्थना करीत असेल तिनें तीस केवढें समाधान वाटत असेल ? दुःखभार उचलण्याचें केवढें धैर्यबळ येत असेल ? तें समाधान व धैर्यबळ मला जोंवर नाहीं तोंवर मी हतभागीच समजायाचा. या श्रद्धेकरितां माझें मन इतकें तळमळत आहे कीं जर मजवर एखादा भयंकर दुःखप्रसंग आला तर त्याक्षणीं गेलेली श्रद्धा परत येईल असें मला वाटतें. मनाचें मालिन्य घालविण्यास दुःखासारखें दुसरें साधन नाहीं."

२६८. "दादा, तुह्मांस काय ह्मणावें हें मला समजत नाहीं. श्रद्धा धारण करून तसें वर्तन केलें ह्मणजे झालें; त्याकरितां दुःखाची का प्रार्थना करायाची ? या बाबतींत तुमची व माझी स्थिति किती भिन्न आहे ! मी पूर्वीं आपल्या अगणित दुःखांचा विचार करीत असें, तेव्हां देव नाहीं, ईश्वर नाहीं, कोणी नाहीं,—ही अन्यायी घोर सृष्टि मात्र आहे,—असें मानण्याचा मीं प्रयत्न करावा. देव नाहींच नाहीं अशी मनाची समजूत घालूं पहावें. सृष्टींत जेवढे अन्याय, क्लेश, चिंता, व्याधि आहेत तेवढ्यांकडेच लक्ष द्यावें; हरतऱ्हा करावी; परंतु क्षणभर नास्तिक्य अनुभविल्यानंतर, 'पण ईश्वर आहेच,' अशी मनांतून प्रेरणा येऊन सर्व प्रयत्न व्यर्थ व्हावे. ईश्वरास अन्यायाकरितां दोष देऊन त्याशीं मीं भांडावें. 'देवा, मीं काय तुझा अपराध केला होता, ह्मणून तूं या वैधव्यस्थितींत मला टाकलेंस ? माझ्या बहिणीचे हाल होतील हें तुला दिसत नव्हतें काय ? मग त्या अनाथ निरपराधी स्त्रीस कां एवढ्या दुःखांत पाडिलेंस ? तिच्या पोरांची तरी तुला दया यावयाची होती ! तुझ्या राज्यांत न्याय नाहीं, दया नाहीं, सुख नाहीं ! कां तूं मनुष्यांस गांजीत आहेस ? त्यांच्या दुःखाच्या आरोळ्या कशा तुला ऐकूं येत नाहींत ? त्यांच्या प्रार्थनांची तूं कां अशी उपेक्षा करीत आहेस ? तुझी सर्वज्ञता आणि सर्वशक्तिमत्ता गेली तरी कोठें ?' अशा प्रकारें मीं दुःखानें परवश होऊन ईश्वराची निंदा करावी, त्याचा धिक्कार करावा, त्याची पुनः प्रार्थना करायाची नाहीं ह्मणून निश्चय करून बसावें. परंतु चित्त क्षणभर स्वस्थ होतें न होतें तों जिवाचा

थरकांप व्हावा. ' या नव्या अपराधाबद्दल आणखी कांहीं नवें दुःख तर देव मागें लावणार नाहींना ? त्याच्या मनांत करुणा आली असली तर ती माझ्या उद्दामपणानें नाहींशी तर होणार नाहींना ? मला जन्मभर दुःखांत ठेवण्याचा देवाचा खास इरादा नाहीं. मग मीं त्याची क्षमा मागून कां त्यास अळवूं नये ? ' अशा शंका मनांत येऊन सर्व पूर्वींचे निश्चय जागच्या जागीं विरघळून जावे. मी गहिंवरून प्रार्थना आरंभावी. याप्रमाणें मनांत असो वा नसो, हृदय ईश्वराकडे वळतें; तें भयानें नम्र होतें; आशेनें प्रार्थनेस लागतें. मी निरुपाय होऊन ईश्वरभजनीं लागलें आहे. ज्या दिवशीं कांहीं चांगलें घडतें त्या दिवशीं मनांत विचार तयारच असतो, ' लीले, पहा, ईश्वराची तुजवर मर्जी आहे ! ' ही आमच्या स्त्रियांच्या हृदयांतील अनिवार्य प्रेरणा पाहून तुम्ही श्रद्धा धारण करा. आमचीं अंतःकरणें खोटी साक्ष कधींही द्यावयाचीं नाहींत. शिवाय, आतांच आपण आत्म्याच्या एकत्र संक्रांतीच्या तत्त्वाविषयीं बोलत होतोंना ? तें तत्त्व काय सांगतें ? सर्व पूर्वजांचा पूर्वज, तो पुराण मुनि, ईश्वर आहे. जर सर्व पूर्वजांचीं ज्ञानमय अस्तित्वें आपणांत प्रकट झालेलीं आहेत, तर त्या परात्पर पूर्वजाचें अस्तित्वही हृदयांत अवतरलें पाहिजे. त्याची कांति बाहेर सृष्टींत दिसते, तशी त्याची चिन्मूर्ति हृदयांत वास करिते. त्यास सोडून आपण कोठें जाणार ? तो सर्वसाक्षी आहे. तोच जगांतील सर्व भूतांस बाहुल्यांप्रमाणें खेळवीत आहे. त्यास वश होण्याखेरीज उपायच नाहीं.

ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति ।
भ्रामयन् सर्वभूतानि यंत्रारूढानि मायया ॥

" दादा, तुमच्या डोक्यांत इतका मोह शिरला तरी कसा कीं, त्यानें ही ईश्ववरावरील साहजिक श्रद्धा तुमचे हृदयांतून पळवून लाविली ? "

" लीलावती, हा मोह कोठून डोक्यांत प्रथम शिरला तें सांगतां येत नाहीं, पण मला वाटतें तुझी ही हकीकत ऐकून तो आतां नाहींसा झाला. अर्जुनावर श्रीकृष्णाचे, तसे तुझे व सुमतीचे मज-

वर उपकार आहेत. मीही अर्जुनाप्रमाणें ह्मणतों कीं ' तुमच्या प्रसादानें माझा मोह गेला, मला स्मृति आली, माझे सर्व संदेह दूर झाले व तुमच्या उदात्त प्रेरणांप्रमाणें मी पुढें वागण्यास तयार आहें. ' मी आज पूर्ण भक्तिभावानें देवाची प्रार्थना करीन, व त्याजवळ पहिली देणगी हीच मागेन कीं ' देवा, लीलेचें व सुमतीचें कल्याण कर, त्यांस सुबुद्धि दे, त्यांच्या सद्गुणांचा व सुविचारांचा प्रकाश सर्वत्र देदीप्यमान होऊं दे. "

याप्रमाणें बोलणें झाल्यावर मग मी फार वेळ बसलों नाहीं. लवकरच घरीं आलों.

---

## भाग ३९ वा.

### अल्पकाळांत केलेल्या अतिरिक्त विद्याव्यासंगाचे दुष्परिणाम.

२६९. पुढें एके दिवशीं भाऊसाहेब मला आपले मित्राचे येथें घेऊन गेले. त्याचें नांव नारायणराव असें होतें; तो मध्यम वयांतला गृहस्थ होता, व तोंडावरून चांगला बुद्धिमान् असावा असें दिसत होतें. परंतु डोळ्यांत पाणी नव्हतें, व अकालीं वृद्धत्व आल्याचीं चिन्हें चेहऱ्यावर दिसत होतीं. बाह्य स्वरूपावरून त्याचे अंगीं विलक्षण विचारशक्ति असेल, किंवा त्याचें पुष्कळ वाचन असेल, असें कोणास वाटण्याचा संभव नव्हता. तो उदासीन स्वभावाचा असावा, जिवास कंटाळला असावा व आपण अल्पायुषी आहों अशी त्याची खात्री झालेली असावी असें त्याचे चर्येवरून मला वाटलें. त्याच्या अंतःस्थ विचारांचे हे बाह्य परिणाम होत असा तर्क माझे मनांत आला.

भाऊसाहेबांनीं मजबद्दल सर्व हकीकत नारायणरावांस सांगितली व त्यांचे सामाजिक विषयावरील कांहीं विचार ऐकावे अशी माझी मनीषा आहे असें सुचविलें. त्यावेळीं त्यांनीं उत्तर दिलें, " माझे विचार कोणास ग्राह्य होण्यासारखे नाहींत; ते ऐकल्यापासून चित्त

व्यग्र होतें, म्हणूनच बहुधा लोक त्यांकडे लक्ष देण्याचें सोडतात. या सुधारणेच्या काळांत कोणास वाटेल कीं आमच्या वरिष्ठ जातींची गतानुगतिकता गेली आहे. परंतु तसें मुळींच नाहीं. आह्मी गतानुगतिकच आहों, आमची दिशा मात्र बदलली आहे. अंधपरंपरेनें वर्तन करण्याची आमची फार दिवसांची संवय आहे; राज्यकर्त्यांनीं नवीन विद्या या देशांत आणिली व तीसच केवळ उत्तेजन ठेविलें, त्यामुळें तिकडेच अंधपरंपरेनें आह्मी लागलों. 'अंधपरंपरेनें' असें ह्मणण्याचें कारण हें कीं ही नवीन विद्या जरी मौल्यवान् आहे, तरी तिचें रहस्य समजण्याइतकी योग्यता आह्मी आपले अंगीं आणीत नाहीं. ज्ञानलवानें आह्मी दुर्विदग्ध होतों. आपली विद्वत्ता घरांतील ह्मातारीहून किती अधिक आहे हें पहातों; व मनांत खुष होऊन जातों. तात्त्विक ज्ञान विद्वान् ह्मणविणारांस नाहीं, शाब्दिक आहे. त्यामुळें इंग्रजी भाषेंतील ह्मणींचा त्यांच्या मनावर जेवढा परिणाम होतो, तेवढा इंग्रजी तत्त्ववेत्त्यांच्या अगदीं नव्या शोधांचाही होत नाहीं. सर्व इंग्रजी विद्येचें भांडार आह्मांस उपलब्ध असतांही, आह्मी विचारानें एक शतक इंग्रजांच्या मागें आहों. त्यांच्या बाह्य अनुकरणानेंच आमचें समाधान होत आहे, मग खोल सामाजिक विचारांत आह्मी कशास मन घालूं?

२७०. मिशनरींच्या मूळ प्रेरणा रूपांतरानें ग्रहण करून चाललें [illegible]जे सुधारणा झाली, असें आह्मांस वाटतें ही खरी स्थिति आहे. [illegible]रतु त्या मिशनरींचा ख्रिस्ती धर्मप्रसाराचा यत्न आहे व त्याकरितां विरुद्ध धर्मांची, येन केन प्रकारेण, हानि करण्याची त्यांची इच्छा आहे, हें आह्मी जाणत नाहीं. मन शुद्ध व न्यायी करण्याचा आंव घालतों; परंतु आमची बुद्धि महत्त्वाच्या विषयांत पाहिजे तितकी खोल जात नाहीं व आह्मी नाहीं नाहीं ह्मणतां मिशनरींच्या विचारांच्या ओघांस लागतों. हे मिशनरी किंवा इकडे आलेले दुसरे इंग्रज लोक विलायतेंतील पहिल्या प्रतीचे विचारी लोक असते व या देशाच्या परिस्थितीचा सर्व बाजूंनीं त्यांनीं विचार केलेला असता, व नंतर या देशाच्या खऱ्या हिताची काळजी बाळगून त्यांनीं सुधारणांची प्रेरणा केली असती, तर ही अंधपरंपराही फायदेशीर झाली अ-

सती. परंतु तसें नाहीं. इकडे येणारे इंग्रज लोक कमी योग्यतेचे, विचारांत निदान पंचवीस वर्षें मागें, व कित्येक बरेच दुरभिमानी, असे असतात. त्यांचा मुख्य गुण ह्मटला ह्मणजे कडकपणा होय; व तो राजकीय कामांत उपयोगाचा आहे; परंतु सामाजिक कामांत त्याचा काय उपयोग ? कडकपणानें लढाई जिंकतां येते; खरमरीत न्याय देतां येतो; परंतु समाजास सुदिशा दाखवितां येत नाहीं. असें असतां त्यांकडेच आमच्या बुद्धीस दिशा लावण्याचें आलें आहे, त्यामुळें वरिष्ठ जातींचा नाश होण्याचें दुश्चिन्ह स्पष्ट दिसत आहे. आपल्या समाजास कोणतीही एक दिशा लावण्यापूर्वीं सामाजिक शास्त्राचे सर्व नवे नवे सिद्धांत विचारांत घेतल्यावांचून कसें चालेल ? परंतु इतकी विद्वानांत योग्यता येईपर्यंत वरिष्ठ जाति कोणत्या अनिष्ट नाशकारक स्थितीस जाऊन पोंहोचतील कोण जाणे !

२७१. सुमारें चाळीस वर्षांपूर्वीं वरिष्ठ जातींची कशी स्थिति होती हें लक्षांत आणा. या जातींतील मनुष्यांस मातापितर किती विद्या देत असत ? लहानपणीं संध्या, पुरुषसूक्त वगैरे पाठ करून घेत असत. शाळेंत अक्षर, उजळणी व तोंडचे हिशेब वगैरे शिकवीत असत. कोणी थोडें संस्कृत, कोणी थोडें इंग्रजी शिकत असतील. व्यवहारज्ञान शिकवून येत नाहीं, तें अनुभवानेंच येतें. कांहीं थोडे वैदिक ब्राह्मण खेरीज करून व कांहीं थोडे शास्त्री खेरीज करून, बाकीचा मोठा पांढरपेशांचा समाज कारकुनीस लागणारे ज्ञानाहून अधिक ज्ञान अंगीं आणण्याचा प्रयत्न करीत नव्हता. या कारकुनांपैकीं कांहीं पुरुष प्रत्यक्ष अनुभवाच्या शिक्षणानें बुद्धि परिपक्क होऊन तीमुळें, मध्यम किंवा उतार वयांत मोठे विचारी, मार्मिक किंवा दूरदृष्टीचे लोक होऊन गेले. परंतु सरासरीनें पहातां, शिक्षण म्हणून ज्यास ह्मणायाचें व जें मुलांस कुटुंबांत पितृत्व येण्यापूर्वीं द्यावयाचें, त्याची इयत्ता कारकुनीचे ज्ञानापेक्षां अधिक नव्हती. जन्मापासून पुरुष वीस वर्षांचा होईपर्यंत त्यास जे बुद्धीचे श्रम करावे लागत ते हें इतकें ज्ञान संपादण्याचे होते.

बरें, एवढेच बुद्धिपरिश्रम करून संतुष्ट व्हावें, अशी वरिष्ठ जातींच्या पुरुषांची स्थिति गेल्या चाळीस वर्षांच्या पलीकडे, पूर्वीं किती

दिवस होती ? मला वाटतें निदान हजार वर्षें तरी होती. ज्या जातींच्या पुरुषांनीं मागील हजार वर्षांत, तारुण्यास येण्यापूर्वीं, यांहून अधिक बुद्धिपरिश्रम कधीं केले नाहींत, त्यांस एकदम त्यांहून हजारपट बुद्धिपरिश्रम करण्यास तुह्मीं लाविलें तर त्याचा परिणाम काय होईल ? हाच होणार कीं बुद्धिपरिश्रमांत शरीराची हानि होऊन पुढील संततीचा अवश्य ऱ्हास होणार. या ऱ्हासास हल्लीं वेगानें आरंभ झाला आहे. वरिष्ठ जातींच्या शेंकडा पंचाण्णव पुरुषांस अलीकडे विद्येकरितां वयाच्या पहिल्या वीस वर्षांत जे श्रम करावे लागत आहेत त्यांच्या शतांश नव्हे, तर सहस्रांश देखील श्रम त्यांच्या वडलांस किंवा आजांस करण्याचा प्रसंग नव्हता, हें निर्विवाद आहे. पूर्वींच्या चाळीस पिढ्यांत जे श्रम करण्याची पुरुषांस संवय नव्हती ते श्रम करण्याची आवश्यकता एक दीड पिढींतच त्यांवर येऊन पडली आहे; तिचे परिणाम चांगले होतील हें संभवेल तरी कसें ?

२७२. ब्राह्मण बुद्धिमान् ह्मणून जो पूर्वींचा लौकिक होता, तो कांहीं थोडे शास्त्री, पंडित, वैदिक वगैरे विलक्षण बुद्धिमान् लोक एकेका वेळीं समाजांत होते त्यामुळें होता; शिवाय, जे थोडे पुरुष मुळचे बुद्धिमान् असून व्यवहारांत पडल्यावर हळू हळू बुद्धि परिपक्व होत गेल्यानें उदयास आले, त्यांच्या कर्तृत्वामुळें तो लौकिक होता; परंतु सामान्य समाजाची योग्यता उत्तम कारकून होण्या पलीकडे कितीक काळपर्यंत कधींच गेलेली नव्हती. कोणत्याही एका वेळीं फार तर शेंकडा पांच चार लोक मोठे बुद्धिमान् निपजतात; त्यांस आकस्मिकपणें बुद्धीचा मोठा व्यय करण्याचा प्रसंग आल्यास ते तो निभावून नेतील; परंतु सरसकट सर्व पुरुषांवर हा असा प्रसंग आल्यास, त्यांपैकीं कितीकांना तो सहन करितां येईल ? फारच थोड्यांस, असें कोणीही उत्तर देईल. बाकीच्यांच्या शरीराची व मनाची दुर्दशा झाल्यावांचून राहणार नाहीं; व तिचा दुष्परिणाम त्यांच्या संततीमध्यें अवश्य दिसून येईल; व तो हल्लीं दिसत आहे. इतक्या थोड्या काळांत तो कसा दृष्टीस पडेल अशी शंका कोणी घेईल; परंतु बापाच्या विकृत शरीराचा व मेंदूचा दुष्परिणाम संततींत दिसण्यास एकच पिढी बस्स आहे. मग ही संतति तशाच मार्गास पुनः

लागल्यानें दुसरे पिढीस तो दुष्परिणाम अधिकच स्पष्ट होईल. हा ऱ्हासाचा क्रम हल्लीं अनिवार्यपणें चालू आहे, व त्याचा शेवट वरिष्ठ जातींचा निर्वंश, हा होणार आहे. आधुनिक तरुणांचे अल्पवयांत मृत्यु, त्यांची अशक्तता, रुंदीनें व उंचीनें खालावलेलीं त्यांचीं शरीरें, त्यांच्या मागें अल्पकारणानें लागणाऱ्या अनेक व्याधि, त्यांच्या संततींपैकीं फार थोडीं मुलें जगणें, व तींही औषधपाण्यानें जगवावीं लागणें, वगैरे सर्व गोष्टी ऱ्हासाच्या द्योतक आहेत.

२७३. बहुतेक सुशिक्षित लोकांचें बुद्धिवीर्य त्यांच्या शेवटच्या परीक्षेनंतर संपतें; ते पुढें विचारांत प्रगति करूं शकत नाहींत, जुन्या पुराण्या ज्ञानावर पुढील सर्व मानसिक चरितार्थ चालवितात व सरासरीनें वर्षानुवर्ष मंदावत जातात असा अनुभव येत आहे. पहिल्या ज्ञानार्जनाच्या घाईंत झालेला बुद्धीचा अतिरिक्त व्यय व त्यामुळें बुद्धीस आलेलें वैक्लव्य या अनुभवावरून सिद्ध होतें. आमच्या महाराष्ट्र विद्वानांची तूर्तची दु:स्थिति पाहून मनास अत्यंत खेद होतो. इतके मुनसफ, मामलेदार, वकील, डाक्तर व सरकारी हुद्देदार आहेत; परंतु अंगीकारलेल्या व्यवसायांत कोणाचेंही विशेष तेज पडत नाहीं. व्यवहारांतील प्रत्यक्ष शिक्षणानें त्यांचीं मनें परिपक्व होत आहेत असें दिसत नाहीं. सर्व वेगार पार पाडीत आहेत; आपण वरिष्ठ योग्यतेचे होत आहों असें कोणीही दाखवीत नाहीं. वरिष्ठ अधिकाराची हाव मात्र आहे, तीस योग्य अशी कृति मात्र नाहीं. हायकोर्टाचे वकील व मुनसफ, यांपैकीं हायकोर्टाच्या न्यायाधीशाच्या जागेस एखादा गृहस्थ निवडून जाण्यास, त्याचे ठरावांत कायद्याचें सूक्ष्मज्ञान, योग्य पांडित्य, पुराव्याचें मार्मिक परीक्षण व कांहीं नवीन कल्पना, वगैरे गोष्टी दृष्टीस पडल्या पाहिजेत; परंतु ती महत्त्वाकांक्षा बंद झाली आहे; व सर्व यंत्राप्रमाणें काम रेटीत आहेत. हीच जिकडे पहावें तिकडे स्थिति.

बुद्धीचें वैक्लव्य जाणण्यास याच स्थितीवरून पुढें दुसरें एक साधन मिळतें. अंगीकारलेल्या व्यवसायांत ज्याची प्रगति होत नसते, तो अन्य प्रकारांनीं लौकिकास येण्याचा प्रयत्न करूं लागतो. अमुक विद्वान् कामदार बुद्धिबळें चांगलीं खेळतो, अमुक लॉन टेनिसमध्यें

पटाईत आहे, अमुक बायसिकलवर उत्तम बसतो, अमुक म्याजिक लांटर्न फार चांगला दाखवितो, अमुक मोठा सुधारक आहे, अमुक कडक टाइमशीर काम करणारा आहे, अमुक बायकांस वाचण्यालायख मनोरंजक गोष्टी उत्तम लिहितो, इ० इ०,—अशा प्रकारें ख्याति मिळविलेले विद्वान् कांहीं आहेत; परंतु तेच आपलें काम कसें बजावतात, त्यांत कितीशी अक्कल दाखवितात, असा प्रश्न विचारतांच, 'सरासरीच' ह्मणून उत्तर येतें, किंवा याहून अधिक दोषाविष्करण होतें.

कांहीं दिवसांनीं दिवाण होण्यास, मुत्सद्दी होण्यास, हायकोर्टाचा जज्ज होण्यास, मोठा डाक्तर, एंजिनियर किंवा वकील होण्यास—लायख असा माणूस वरिष्ठ जातींत निपजणार नाहीं असें अनुमान होतें. वास्तविक पहातां आजच अशी स्थिति आहे. आजच उत्तम माणूस शोधायास गेलें ह्मणजे निराशेनें परत यावें लागतें. आशेची कास धरून पुढें मोठाले लोक निपजतील ह्मणून तटस्थ राहणें सोपें आहे; त्यास कांहीं प्रयत्नच लागत नाहीं. परंतु ती आशा सयुक्तिक आहे असें दाखविणें फार कठीण झालें आहे. याप्रमाणें ऱ्हासानें आपणांस चहूंकडून घेरलें आहे.

२७४. पूर्वींच्या काळीं याहून भिन्नस्थिति होती. पूर्व वयांतील बुद्धिपरिश्रम फारच माफक असल्यानें, जसजसा अनुभव वाढत जाई, तसतशी बुद्धि तीव्र व परिपक्क होत जाई. मध्यम वयांत मनुष्य आपलें तेज पाडीत असे, व वृद्धापकाळपर्यंत आरोग्य राखून अब्रूही राखीत असे. त्यामध्यें आवेश, निर्धार व इकडची तिकडची कांहीं तरी खटपट करीत बसण्याची हौस शेवटपर्यंत रहात असे, व त्याचे संततीपैकीं एखादा दुसरा मुलगा बुद्धिमान् निघत असे. मारवाडी व्यापाऱ्यांत अद्यापि अशीच स्थिति आहे; ते मुलांकडून कामापुरती विद्या करवितात; त्यांस व्यावहारिक ज्ञान आपोआप अनुभवानें येत जातें; जों जों वय वाढतें तों तों आपल्या कामांत ते अधिकाधिक वाकबगार होतात. त्यांमध्यें ऱ्हास दिसत नाहीं.

शरीराची पुरी वाढ होण्यास वीस वर्षांची अवधि आहे. तशी मनाचे वाढीस नाहीं. योग्य श्रमानें मनाचें आरोग्य राखणाराची बुद्धि

शेवटपर्यंत वाढत रहावी, असा सृष्टीचा हेतु आहे; निदान तीस अकाळीं क्षीणता येण्याचें साहजिक कारण नाहीं. जीं कारणें आहेत तीं सर्व कृत्रिम व परिहार्य आहेत. परंतु त्यांकडे अद्यापि कोणाचें लक्ष जात नाहीं, अंधपरंपरा चालली आहे, म्हणून आश्चर्य वाटतें.

२७५. ज्यांच्या मनावर उत्क्रांतितत्त्वांचा थोडा जुना पुराणा परिणाम झाला आहे त्यांस वाटतें कीं, बाप जितका अधिक विद्वान् होईल तितकी त्याची संततिही अधिक बुद्धिमान् निपजेल; शिवाय आईही विद्वान् असल्यास, मग तर असा उत्तम परिणाम झालाच पाहिजे ! ही त्यांची समजूत उत्क्रांतिशास्त्राच्या पूर्ण विरुद्ध आहे; व वरिष्ठ जातींवर जे घोर मानसिक श्रम करून उपजीविका मिळविण्याचा प्रसंग आला आहे त्यांमुळें त्यांस वरील तत्त्व खरें असलें तरी लागण्याचा संभवच नाहीं. कारण असें कीं पितृत्व येण्यापूर्वीं मानसिक श्रम किती करायाचे त्यांस कांहीं सीमा आहे काय ? स्वतःच्या बुद्धीचें प्रमाण मोजून तरी कोणी आपले श्रमांची इयत्ता ठरवितो काय ? मुळींच नाहीं. विसावे वर्षीं बी. ए. होतां आलें तर बरें, एम्. ए. होतां आलें तर त्याहून बरें, एम्. ए., एलेल्. बी. होतां आलें तर त्याहून चांगलें ! बुद्धीची कंबर मोडेपर्यंत ज्यानें त्यानें परिश्रम करीत बसावें व जेवढ्या उंच पाहिरीवर जावेल तेवढ्या जावें, हीच महत्त्वाकांक्षा, हीच सर्व आप्तइष्टमित्रांची व परोपकारी पुरुषांची इच्छा ! अशा तऱ्हेनें जे विद्या संपादन करणारे, त्यांच्या संततींत बुद्धि संक्रमित होईल ही आशा बाळगणें, ह्मणजे उत्क्रांतिशास्त्रच नव्हे तर जगाचा प्रत्यक्ष अनुभव विसरण्यासारखें आहे. अल्पवयांत केलेले हे अमर्याद श्रम संततीच्या व कर्तृत्वाच्या नाशास कारण होतात; एवढेंच नव्हे, तर व्यक्तीच्या आरोग्यास व जीवितास ते घातक होतात.

२७६. ज्यांची बुद्धि तीव्र, घरांत सुखसमाधान, सर्व साधनें अनुकूल, व ज्ञानार्जनाचे प्रयास घाईचे नाहींत, अशा मनुष्यांवरही सुविशेष ज्ञानाचा आणि विचारप्रकर्षाचा किती अनिष्ट परिणाम होतो हें पाहिलें ह्मणजे, जेथें अशी अनुकूलता नाहीं व घाई फार, तेथें

किती दुष्ट परिणाम होतील तें सांगायास नको. जगाच्या इतिहासांत असें दिसून येतें कीं जेवढे प्रसिद्ध पुरुष झाले तेवढे बहुतेक संततिहीन आहेत; कित्येकांस तर विवाहाची इच्छाच झाली नाहीं. **शंकराचार्य, रामदास, न्यूटन**, वगैरे हीं अविवाहित महापुरुषांचीं उदाहरणें होत. **सीझर, नेपोलियन**, अनेक राजे व सरदार, **शेक्स्पीयर**, वगैरे कवि, **नानाफडणीसासारखे** मुत्सद्दी, कितीक तत्त्ववेत्ते, धर्मसंस्थापक, इतिहासकार, वगैरे—यांस संतति नाहीं. ज्या कित्येकांस झाली त्यांस तिची लाज वाटावी अशी झाली. **शिवाजीचे** पोटीं **संभाजी** झाला! **ग्यालिलिओचे** पोटीं तसाच एक अजागळ प्राणी जन्मला! जितकी इकडे ज्ञानविवेकांची अतिवृद्धि, तितकी संतति अजागळ किंवा मुळींच नाहीं असें समजावें. बुद्धिप्रकर्ष संततीस बाधक होतो. तीन हजार वर्षांच्या इतिहासांत बापासारखाच मुलगाही गुणी असें दहा पांच ठिकाणीं मात्र सांपडतें. एक नांव किंवा आडनांव इतिहासांत बहुधा एकदाच येतें. गेल्या चाळीस वर्षांत महाराष्ट्रांत जे विद्वान् लोक लौकिकास येऊन गेले किंवा आलेले आहेत, त्यांपैकीं पुष्कळ निसंतान झाले आहेत व बाकी बहुतेक अजागळ घरबुडव्या मुलांचे बाप आहेत.

२७७. बापांच्या बुद्धीच्या व्यस्त प्रमाणांत मुलांची बुद्धि असते हा अनुभव घरोघर घ्यावा. पुष्कळ मुनसफ, मामलेदार, इंग्रजी शाळांचे हेडमास्तर वगैरे गृहस्थांस मीं हा प्रश्न केला. ‘ कांहो, तुह्मी आपल्या मुलांच्या वयाचे होतां तेव्हां तुह्मी जितके बुद्धिमान् होतां, तितकीं तुमचीं मुलें बुद्धिमान् आहेत काय ? किंवा, तुह्मीं जितक्या वयांत जितक्या श्रमानें जितकी विद्या व हुषारी संपादिली, तितक्याच वयांत, तितक्या श्रमानें तितकी विद्या व हुषारी तुमचे मुलांस येईल असें तुह्मांस वाटतें काय ? सरासरीनें मुलें तुह्मांहून बुद्धीनें कमी आहेत कीं बरोबरीचीं आहेत ? ’ या प्रश्नावर मुलें मंद आहेत असें बहुतेकांचें मत पडलें. शाळामास्तरही हा असाच अभिप्राय देतात—विद्वानांचीं मुलें मंद; बापांचें तेज मुलांत नाहीं. ही स्थिति पाहून कोणी घरच्या शिक्षणास दोष देतो, कोणी घरच्या लाडांस दोष देतो, कोणी मुलास आळशी समजतो, कोणी शाळामास्तरांस दोष

देतो, कोणी विद्यादानपद्धतीस देतो, कोणी युनिव्हर्सिटीस देतो. या इतक्या ठिकाणीं कांहीं क्षुल्लक न्यूनता दिसली कीं विद्वानांची खात्री होते, 'पहा, हीच न्यूनता मुलांच्या मठ्ठपणास कारण होते बरें! काय करावें? ही न्यूनता दूर करण्याचें परस्वाधीन पडलें; जें होईल तें होवो!' वाहवा! आपली दुष्कृति लोकांवर लोटून समाधान पावण्याचा हा खासा मार्ग आहे. उन्मत्त माणसाप्रमाणें एक खरा रस्ता मात्र विद्वानांस दिसत नाहीं, बाकी जिकडे पहावें तिकडे मोठमोठालीं खिंडारें दिसतात! हल्लीं जे आपणांस विद्वान् समजतात त्यांचे मातापितर विद्वान् नव्हते किंवा नाहींत. त्यांच्या वडलांनीं जो कांहीं पराक्रम केला असेल तो विद्येवांचूनच केला. हल्लीं शाळांत व कालेजांत वर नंबर कोण ठेवितात व युनिव्हर्सिटींत कोण लौकिक मिळवितात तें पाहिलें, तर विद्वान् वडलांचीं तीं मुलें नाहींत. ज्यांनीं विद्येच्या कामीं कमींत कमी श्रम केले, त्यांचीं तीं मुलें आहेत; त्यांपैकीं बरींच शहरांतील हुषार माणसांचीं मुलें नाहींत; खेड्यांत गांवढळांत राहून गांवढळ बनलेल्या लोकांचीं आहेत. या गोष्टींचा प्रत्यक्ष अनुभव घेणें सर्वांस शक्य आहे, तेव्हां अधिक पुरावा देण्याचें कारण नाहीं. या विषयावर **इमर्सन्** यानें आपला अभिप्राय थोडक्यांत दिला आहे. तो ह्मणतो—'देश विचारांच्या व महत्त्वाकांक्षेच्या अंत:स्थ अग्नीनें जळत असतात. तो अग्नि इकडे चांगलें कार्य करीत आहेसें दिसतें, तिकडे हानि करीत असतो. बुद्धि ह्मणजे आग आहे, तीस दयामाया किंवा दूरदृष्टि नाहीं, ही हाडांची विलक्षण इमारत जीस आपण माणूस ह्मणतों, तीस ही आग भस्म करिते. विलक्षण बुद्धि असणें हें अत्यंत हिताचें आहे, परंतु तें तसेंच अत्यंत अहिताचें आहे.*' **इमर्सन**चे ग्रंथ वाचले ह्मणजे तो

---

* "It is almost inevitable to push the generalization up into higher parts of nature rank over rank into sentient beings. Nations burn with internal fire of thought and affection which wastes while it works. We shall find finer combustion and finer fuel. Intellect is a fire : rash and pitiless, it melts this wonderful bone-house which is called man. Genius even, as it is the greatest good, is the greatest harm. Emerson—*Essay on Farming*

किती सूक्ष्म अवलोकन करणारा व नवीन नवीन विचार सुचविणारा माणूस होता हें लक्षांत येतें. त्याचा तुह्मी 'शेतकी' वरील निबंध वाचा ह्मणजे मी बोलत आहें या विषयावर कांहीं नवीनच प्रकाश पडेल.

ऋषिकालीं देखील ब्राह्मणांच्या बुद्धीवर एवढा ताण वसत नव्हता. ब्राह्मण कुटुंबांतील जो फार बुद्धिमान् पुत्र असे तो कायमचा अरण्यवास स्वीकारून बहुधा अविवाहित राहत असे. त्याची बुद्धि परिपक्व होई; तो ऋषिवर्गांत मोडे; अर्थात् त्याच्या संततीपासून समाजास फायदा होण्यासारखा नव्हता. बाकीचे पुत्र व्यावहारिक कामापुरतें अध्ययन झालें कीं विवाह करून संसारास लागत. भिक्षुकी वृत्ति, खुशाल यजन-याजन करावें, सोम प्यावा, वेदाचीं उंच स्वरानें पारायणें करावीं! बुद्धीस जी अशा कृत्यांनीं व सांसारिक अनुभवांनीं परिपक्वता येईल ती येईल. बुद्धिपरिश्रमानें सर्व कुटुंबाची हानि करून घेण्याचा त्यावेळीं परिपाठ नव्हता.

२७८. परंतु हल्लीं त्याचे विरुद्ध काम चाललें आहे. भिक्षुक, वैदिक, शास्त्री, पुराणिक व सर्व वरिष्ठ जातींचे लोक आपल्या मुलांस खुशाल विद्याव्यासंगांत ढकलून देत आहेत. बरें, हा व्यासंग एकाच पिढीपुरता असता तर इतकी काळजी नव्हती. पिढीमागें पिढी तोच व्यासंग करणार असें स्पष्ट दिसतें. जीवितधारणास विद्येशिवाय दुसरा मार्गच उरला नाहीं. आतां ज्या एका दिशेनें बापानें बुद्धीचा विशेष व्यय केला, त्या दिशेंत तरी मुलानें बुद्धि खर्चण्याचें सोडून द्यावें, दुसरी दिशा धरावी. एकच एक व्यासंगांत कुळांतील, पिढीमागें पिढी, आपली सर्व बुद्धि खर्च करूं लागल्यास, एकाहून एक मंद पुरुष निघत जातात; एवढेंच नव्हे, तर सर्व प्रकारचा ऱ्हास सुरू होऊन कूळ निसंतान होतें. याप्रकारचीं महाराष्ट्रांत शेकडों प्राचीन व अर्वाचीन उदाहरणें आहेत व युरोपीयांनीं हा सिद्धांत सार्वत्रिक अनुभवानें ठरविलेला आहे. **गायो** नांवाच्या विद्वान् अनुभविक गृहस्थानें '**शिक्षण आणि आनुवंशिक संस्कार**' या विषयावर ग्रंथ लिहिला आहे. त्यांत युरोपीय अनुभव असा दिला आहे

*कीं बापाचा धंदा मुलास लावण्याचा प्रयत्न सहसा करूं नये, विशेषतः

* Since it is impossible to meet with a social environment perfect in every detail from the hygienic point of view, the only hope for the vitality of a race lies in a change of environment which corrects the evil influence by influences in a contrary direction......The temptation most difficult to resist in our modern society is that of completely *exploiting* our talents, of extracting from them every particle of practical profit and of bartering them for the maximum money and honour they can give. It is this unlimited exploiting of superiorities which renders them perilous......(1) The best principle of all moral hygiene would therefore be to persuade the individual to spare himself, not to consider any talent in himself or his children as a goose laying golden eggs, and finally to look upon life as having to be, not *exploited*, but *preserved*, *increased* and *propagated*. The consequence of this principle of physiological economy in education is the art of measuring and directing culture, especially intellectual culture; of not making it too intense, too limited to a single point of the intellect, but of always proportioning its extension and intension. (2) The alternation of culture in the race should be a principle of no less importance. *Rotation of crops* ought to be as elementary a rule in education as in agriculture; for it is absolutely impossible to successfully cultivate for an unlimited period a given plant in the same soil or a given aptitude in the same race.......The most healthy occupation, beyond dispute, is clearly that of the labourer or country gentleman; and the way to preserve a succession of generations at once robust and brilliant would be to make them live alternately a town and country life; to make them recuperate in the vegetative life of the peasant, whenever they are exhausted by the nervous and intellectual life of the inhabitants of towns......I think that it is the educator's duty *never to press the son to follow his father's profession*, at least whenever that profession, as that of the artist, politician, savant, or simply man of business, or man of eminence, requires very considerable nervous expenditure. ......*The real qualities of a race are not lost because they are not immediately exposed to view*; on the contrary, they accumulate, and genius only proceeds from the boxes in which the poor have day by day hoarded up their talents instead of squandering them in follies. *Nature acquires her greatest riches when she is asleep....... We must resign ourselves to our sons being other than we are, or to their ceasing to exist.*

GUYAU : *Education and Heredity, Ch. VIII.*

जेव्हां त्या धंद्यांत बुद्धीचा फार मोठा व्यय करावा लागतो. असे धंदे ह्मटले ह्मणजे–विद्याव्यासंगाचा, शास्त्रज्ञाचा, मुत्सद्याचा–वगैरे होत. ज्याप्रमाणें जमिनींत निरंतर एकच एक पीक काढीत बसलें तर ती निःसत्त्व होते, त्याप्रमाणें बुद्धीचाही धर्म आहे. जमीन जशी कांहीं दिवस पडीत टाकावी लागते त्याप्रमाणें बुद्धिही कांहीं पिढ्या पडीत ठेवणें जरूर असतें. ह्मणजे ती ऱ्हास पावत असली तर पुनः जोर धरण्याचा संभव असतो. या दृष्टीनें बुद्धिव्यासंग करणारांनीं पिढीमागें पिढी एकच धंदा चालवूं नये; मध्यें मध्यें कांहीं पिढ्या बुद्धीस पूर्ण विश्रांति द्यावी व शारीरिक श्रमास लागावें. तें शक्य नसेल तर निदान बुद्धीचा दर पिढीस निराळाच भाग उपयोगांत येईल व तोही फारसा ताणला जाणार नाहीं, अशी योजना करून धंदा सारखा बदलीत जावा. परंतु एतद्देशीय शेतकऱ्यांची व वरिष्ठ जातींची एकच स्थिति आहे. जमीन पडीत टाकून शेतकऱ्यांचें चालायाचें नाहीं; बुद्धि पडीत टाकून वरिष्ठ जातींचें चालायाचें नाहीं. तिचा माफक उपयोग करायाचा ह्मटलें तरी देखील चालत नाहीं. बुद्धि नापीक झाली तरी तीच पुनःपुनः पेरून काय थोडें फळ येईल तें काढून घ्यावें, ही सर्वांची दशा होत आहे, यास काय करावें ? वरिष्ठ जातींस जगाची रजा घ्यावयाची नसेल तर त्यांनीं आपले बहुतेक तरुण विद्याव्यासंगांतून काढून घेतले पाहिजेत. दुसरा तरणोपाय नाहीं.

२७९. युरोपियन लोक जेथें जेथें वसाहतीस गेले आहेत, तेथें तेथें मूळचे लोक नष्ट होत आहेत असा अनुभव आहे. त्याचीं अनेक कारणें दाखविण्यांत येतात. मूळचे लोक रानटी असतात; त्यांजवळ सुधारलेलीं शस्त्रेंअस्त्रें नसतात. लढाईंत युरोपियनांपुढें त्यांचा टिकाव लागत नाहीं, हें एक कारण आहे. युरोपियनांबराबर त्यांचे कांहीं विशिष्ट रोग जातात; त्या रोगांची बाधा युरोपीयांस फारशी होत नाहीं, कारण रोगाच्या विषास जिंकणारें प्रतिविष उत्पन्न करण्याचें सामर्थ्य त्यांच्या शरीरांत आलेलें असतें. परंतु नवीन वसहातींतील मूळच्या लोकांत तें सामर्थ्य नसतें; त्यांस ते रोग किंवा त्यांचीं औषधें माहीत नसतात; युरोपीयांच्या सहवासानें ते रोग त्यां-

मध्यें पसरले कीं अनेकांस प्राणांस मुकावें लागतें. हें दुसरें कारण देण्यांत येतें. युरोपीयांबरोबर त्यांचीं मद्यें व दुसरे घातक पदार्थ जावयाचेच. त्यांची रुचि मूळच्या लोकांस लागली कीं ते दुर्व्यसनांस लागतात; त्यांमुळें त्यांचें वीर्य कमी होत जातें. हें तिसरें कारण सांगतात. हीं सर्व कारणें खरीं आहेत; परंतु त्यांतूनही पुष्कळांचा बचाव होतो व ते युरोपीयांच्या अमलाखालीं येतात. त्यांस सुधारण्याचा युरोपीय लोक प्रयत्न करूं लागतात; परंतु सर्वत्र परिणाम असा दिसत आहे कीं **मूळच्या लोकांस सुधारण्याचा जेवढा अधिक प्रयत्न करावा, तेवढी त्यांची संतानदृष्टीनें हानि होत जाते** व ते मूळचे लोक कालांतरानें नष्ट होणार असें स्पष्ट दिसूं लागतें. हा सुधारणेचा विपरीत परिणाम पाहून युरोपीयांस आश्चर्य वाटतें. परंतु तुह्मी आह्मी जे त्यांच्या **सुधारणेच्या** कचाट्यांत सांपडलों आहों त्यांस तरी आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. असा विपरीत परिणाम घडलाच पाहिजे असें स्वानुभवावरून आपणांस कळून आलें पाहिजे.

कारण, युरोपीय लोक सुधारणेची पेरणी करूं लागले ह्मणजे काय करितात? जें अगाध ज्ञान त्यांस स्वत: मिळविण्यास दोनचारशें वर्षें लागलीं तें ज्ञान नवीन रानटी समाजास ते एकदम देऊं लागतात. त्या समाजाच्या बुद्धीनें असले परिश्रम पूर्वीं कधींच केलेले नसतात; ते परिश्रम करून तिचा एकदम विकास होतो; परंतु या नवीन मार्गास एकाएकीं लागल्यानें संतति उत्पन्न करण्याचें सामर्थ्य लोकांत राहत नाहीं. **स्वाभाविक रीत्या ज्या उत्क्रांतीस हजार पांचशें वर्षें लागावीं ती जर एका किंवा दोन पिढ्यांत बलात्कारानें घडवून आणिली, तर ती समाजास संतति उत्पन्न करण्याचे कामीं निर्वीर्य करिते.** अशी आकस्मिक सुधारणा करूं लागणें म्हणजे लोकांस मृत्युपंथास लावण्यासारखेंच आहे. परंतु 'माझ्या सारखा केव्हां होशील' याबद्दल युरोपीयांस फार घाई असते; त्यामुळें त्यांचा परोपकार इतरांस घातक होतो. जेथें जेथें युरोपीयांचें राज्य झालें आहे, तेथें तेथें युरोपीय संस्था स्थापन झाल्या आहेत. त्या चालविण्याची योग्यता आणण्याकरितां विलक्ष-

ण बुद्धिपरिश्रम करावे लागतात; त्यांचें ओझें असह्य असतें; अल्पवयांत तें माथ्यावर घ्यावें लागतें; त्याखालीं मनुष्य चिरडून जातो. उदाहरणार्थ, या देशांत सरकारी नोकरीची परीक्षा प्रथम देशी भाषेंत होती, ती इंग्रजींत झाली; ती मागें पडून म्याट्रिक. किंवा यू. एम्. एफ्. तिचे जागीं आली; तीही कमी योग्यतेची होऊन बी. ए. वगैरे परीक्षांवांचून गत्यंतर नाहींसें झालें. स्वदेशांत अधिकार मिळवून उदयास यावें ही इच्छा स्वाभाविक आहे; बुद्धिमानांनीं ती बाळगली नाहीं तर कोण बाळगील असा विचार मनांत येतो. त्याचा परिणाम घातक होतो. ही युरोपीयांची चूक आहे, व ती सर्वत्र त्यांच्या परदेशीय प्रजेस विलयास नेत आहे. विचारी पुरुषांस आश्चर्य वाटतें कीं ज्या लोकांचे पराक्रम इतिहासांत प्रसिद्ध आहेत, ज्यांनीं अनेक महत्त्वाचीं राजकीय, सामाजिक व धार्मिक तत्त्वें निश्चित केलीं, त्यांच्या वंशजांत मानसिक गुण कां प्रकट होत नाहींत ? त्यांत धैर्य कां नाहीं, आवेश कां नाहीं, निर्धार कां नाहीं, सत्य कां नाहीं, महत्त्वाकांक्षा कां नाहीं ? या सर्व प्रश्नांचें उत्तर एकच आहे. **अपरिमित बुद्धिव्यासंगानें बुद्धीस वैक्लव्य व वार्धक्य येतें, ती कुचकामाची होते, व हें वैक्लव्य पुढें संततीची दुर्दशा करितें.** अल्पवयांत बुद्धीचा भपका दिसतो, मध्यम वयांत अवनति दिसते, उत्तर वयांत तिचा लोप होतो.

२८०. मुंबई इलाख्यांत या प्रकारें वरिष्ठ जाति विनाशमार्गास लागलेल्या आहेत; कारण त्यांवरच इंग्रजी विद्येचे परिणाम विशेष घडले आहेत. या जातींपैकीं ज्या फार मोठ्या असून पसरलेल्या आहेत, त्यांस स्वतःची दुर्दशा दिसत नाहीं, परंतु ज्या लहान व आटोपसर आहेत त्यांस ती दिसूं लागली आहे. हल्लीं गुजराथेंत नागर ब्राह्मणांची, महाराष्ट्रांत प्रभूंची, व मुंबईस भाटे व पार्शी यांची कशी स्थिति आहे तिचा शोध करून पाहिल्यास, इतर जातींस सावध होण्यास पुष्कळ साधनें मिळतील.

इंग्रजांच्या वसाहतींत काय प्रकार चालला आहे तो पहा. किड्चें ' सामाजिक उत्क्रांति ' या नांवाचें पुस्तक आहे, त्यांतील विचारसरणीचा येथें विचार करायाचा नाहीं, परंतु त्यानें दिलेली

माहिती खरी आहे, ती तेवढी घेऊं. न्यू झीलंडमध्यें मेवरी ह्मणून मूळचे लोक आहेत हे लोक अगदीं बुद्धिहीन आहेत, पूर्ण रानटी आहेत, अशी पूर्वीं समजत होती. त्यांस विद्या देण्याचा सरकारानें आरंभ केला. पन्नास वर्षांच्या अखेरीस आज युरोपीयांस असें दिसून येत आहे कीं या लोकांत उत्तम गुण आहेत. त्यांनीं इंग्रजांच्या रितीभाती उचलल्या आहेत; कायदे कौन्सिलांत त्यांचे लोक उत्तम हुषारी दाखवूं लागले आहेत; त्यांची सुधारणा उत्तम रीतीनें व झपाझप होत चालली आहे. व हें पाहून युरोपीयांस हर्ष व आश्चर्य वाटूं लागलें आहे. लोक उद्योगी झाले आहेत. परंतु पन्नास वर्षांपूर्वीं त्यांची संख्या ८०००० होती ती ४०००० स येऊन ठेपली आहे. ही जात नष्ट होणार अशीं आतां स्पष्ट चिन्हें दिसत आहेत. दुसरें उदाहरण आस्ट्रेलियांतील मूळच्या लोकांचें. हेही पूर्वीं पूर्णपणें रानटी होते. सुधारणेनें त्यांच्या बुद्धीचा एकदम उदय झाला. आस्ट्रेलियांतील विद्याखात्याच्या दृष्टीनें, मूळ लोकांच्या मुलांच्या शाळांचा फार वर, युरोपीय शाळांच्याही वर, नंबर लागूं लागला. इंग्रज लोकांस चमत्कार वाटत आहे! सुधारणा झाली, परंतु ती मृत्युपंथाची तयारी आहे असें लोकसंख्येच्या दशवार्षिक आंकड्यांवरून दिसतें. सिध्धी लोकांचीं मुलें अशींच विद्याग्रहणांत चलाखी दाखवितात; परंतु अमेरिकेंत त्यांस स्वातंत्र्य मिळालें असून ते, लोकसंख्येच्या दृष्टीनें, नाश पावत आहेत. या सर्व गोष्टींचें कारण युरोपीय लोक असें समजतात कीं युरोपीयांशीं उद्योगाचे कामीं या मूळच्या लोकांस टिकाव धरवत नाहीं, ह्मणन त्यांची हानि होते; परंतु तसें मानण्यास पुरावा नाहीं. विद्या देणें ती फार सावकाशपणें दिली पाहिजे, नाहींतर तिच्या ओझ्यानेंच पुरुषाचें वीर्य अस्तास जातें, व तो चांगली संतति उत्पन्न करण्यास नालायख होतो. युरोपीय सुधारणेच्या आकस्मिक भारानें त्यांच्या ताब्यांतील रानटी लोक, जे उत्क्रांतीनें मूळचे फार मागें, ते चिरडून नाहींसे होणार अशीं सर्वत्र चिन्हें दिसत आहेत."*

---

* The Maoris in New Zealand, though they are slowly disappearing before the race of higher social efficiency with which they

# भाग ४० वा.

## शहरवासी होण्याचे ऱ्हासकारक परिणाम.

२८१. " वरिष्ठ जातींनीं आपलीं मुलें विद्याभ्यासंगांतून काढा

---

have come into contact, do not appear to show any *intellectual* incapacity for assimilating European ideas or for acquiring proficiency and distinction in any branch of European learning. Although they have, within fifty years, dwindled from 80,000 to 40,000 and still continue to make rapid strides on the downward path, the Registrar-General of New Zealand, in a recent report on the condition of the colony, says of them that they possess fine characteristics, both mental and physical, and readily adopt the manners and customs of their civilized neighbours. He asserts that in mental qualifications they can hardly be deemed naturally an inferior race, and that the native members of both the Legislative Council and the House of Representatives take a dignified, active and intelligent part in the debates, especially in those having any reference to Maori interests.

Even the Australian aborigines seem to provide us with facts strangely at variance with the prevailing theories......His mental capacity is universally accepted as being of a very low order......Yet it is somewhat startling, for instance, to read that in the state schools in the Australian colonies, it has been observed that aboriginal children learn quite as easily and rapidly as children of European parents ; and, lately, that "for three consecutive years the aboriginal school at Remahyack, in Victoria, stood highest of all the state schools of the colony in examination results, obtaining 100 per cent of marks." The same facts present themselves in the United States. The children of the large Negro population in that country are on just the same footing as children of the white population in the public elementary schools......Ch. IX.

The Anglo-Saxon looks forward, not without reason, to the day when wars will cease ; but without war, he is involuntarily exterminating the Maori, the Australian, and the Red Indian, and he has within his borders the emancipated but ostracised Negro, the English Poor Law and the Social Question ; he may beat his swords into ploughshares, but in his hands the implements of industry prove even more effective and deadly weapons than the swords. ......Ch. II.

KIDD : *Social Evolution.*

याचीं असा विचार केला, तर त्यांनीं करावें काय असा प्रश्न येतो. व या प्रश्नाचा विचार करूं लागलें ह्मणजे वरिष्ठ जातींस विलयास नेणारें दुसरें कारण लक्षांत येतें. वरिष्ठ जातींस आपलें अस्तित्व राखण्याकरितां केवढे दुर्धर भगीरथ प्रयत्न केले पाहिजेत हें पुढील विवेचनावरून लक्षांत येईल. सर्व बाजूंनीं त्यांस मृत्यूनें घेरलें आहे; त्यांतून ते कसा आपला बचाव करून घेतील, ईश्वर जाणे !

युरोपीय राष्ट्रें विलक्षण विद्याभ्यासंग करीत आहेत, तेव्हां त्यांच्या समाजांत कशी घडामोड चालली आहे ती पहा. जे पुरुष ज्ञानानें व पराक्रमानें अत्यंत ऊर्जित दशेस येऊन राष्ट्रास अलंकारभूत होतात, त्यांच्या मागें त्यांचें नांव चालविण्यास मुळींच संतति राहत नाहीं किंवा जी राहते ती फार कमी योग्यतेची असते, व तिचाही नाश कांहीं थोड्या पिढ्यांनीं होतो. समाजांत जे अगदीं वरिष्ठ वर्ग त्यांचा निःसंतान होण्याकडे कल असतो. सरासरीनें सहा पिढ्यांचे आंत मोठ्या पुरुषाचें कूळ विलयास जातें; व बहुधा दत्तक घेऊन, किंवा अशाच दुसऱ्या तऱ्हेनें कुळांत नवीन जोरदार बीज आणून, कूळ राखावें लागतें. कोणत्याही वर्गांतील निवडक माणसें श्रेष्ठत्व मिळविण्याकरितां जसजशीं अधिक बुद्धिपरिश्रम करूं लागतात, तसतशीं तीं उदयास येतात, परंतु संततीचे कामीं तीं निरुपयोगी होतात. हे बुद्धिपरिश्रम जेथें फार थोडे तेथें कायमचा बुद्धीचा ठेवा असतो; तेथेंच संततिही विपुल असते. इकडे वरिष्ठतेस आलेल्या माणसांचीं कुळें नष्ट होत असतात, तिकडे कांहीं पुरुष खालच्या वर्गांतून बुद्धीचा ठेवा आणून उत्कर्षास येत असतात व नवीन वरिष्ठ कुळें स्थापित असतात. याप्रमाणें, बुद्धिपरिश्रम न करणारे व दारिद्र्यांत अंगमेहनतीनें दिवस कंठणारे जे खेड्यापाड्यांतील शेतकरी व मजूर लोक, ते समाजाचा अचळ पाया आहेत. त्यावर इतर वर्गांची इमारत आहे; तिचा कळस नित्य ढासळून पडत असतो परंतु खालच्या वर्गांतून पुनः तो नवा तयार होऊन उभारला जातो. समाजाची वृद्धि केळीच्या झाडाप्रमाणें आहे. खुंटास खालून नवे नवे

कोंब फुटून तें वाढत असतें; वर आलेले फळांचे घड परोपकारास लागतात, बीजाचे उपयोगीं पडत नाहींत.*

वरिष्ठ वर्ग आपलें सर्व सामर्थ्य खालच्या वर्गांतून घेऊन येतात, त्याच्या प्रकाशानें जगांत देदीप्यमान होतात व तें संपतांच विलुप्त होतात. युरोपीय प्रसिद्ध माणसांची स्थिति विजेच्या दिव्यांप्रमाणें आहे. त्यांस लागणारें सामर्थ्य कोठें तरी अप्रसिद्ध भिकार जागीं यंत्रद्वारा तयार होऊन येतें; ज्या तारांतून त्याचा ओघ वाहतो त्यांकडे कोणाचें लक्ष जात नाहीं. दिव्यांचा प्रकाश मात्र अशा ठिकाणीं पडतो कीं, सर्व टकमका पाहूं लागतात व आश्चर्यभरित होतात.

या रीतीनें प्रसिद्ध पुरुषांची एक लाट उंच चढून जों उतारास लागते, तों खालून दुसरी वर येऊन तिची जागा घेते. वरिष्ठ वर्गांत विवाह न करणाऱ्या स्त्रिया व पुरुष फार; व जे विवाह होतात तेही वयें फार वाढल्यावर. ज्ञानमार्गास लागलेल्यांमध्यें विवाहाची इच्छा कमी असावी हें साहाजिकच आहे; संततीचेंही प्रमाण त्या योगें त्यांमध्यें फार कमी असतें. परंतु खालीं दरिद्री लोकांत पाहूं गेलें तर विवाहाची इच्छा प्रबळ व त्यांचें विवाहही लवकर होतात; पुढें संतति पुष्कळ होते. धान्य स्वस्तें झालें कीं विवाहास ऊत येतो, हें पाहून बर्क ह्मणे कीं म-

---

* While we have, therefore, on the one hand, the constant tendency of aspiring ability to rise into the highest class, we have, on the other hand, within the class itself, the equally constant tendency towards restriction of numbers, towards celibacy, and towards *reversion to the classes below*. This is the largest operating cause constantly tending to the decay and extinction of aristocratic families...... *Not only do the aristocratic classes die out, but it would appear that the members of the classes into which it is always the tendency of a very prevalent type of intellectual ability to rise, are being continually weeded out by a process of natural selection, which it appears to have been the effect of our own civilization to foster to a peculiar degree.* ......It is evident that our society must be considered as an organism which is continually renewing itself from the base and dying away in those upper strata into which it is the tendency of a large class of intellectual ability to rise.

KIDD: *Social Evolution, P. 260.*

नुष्यांची उत्पत्ति तोंडावाटें होते ( Man breeds at the month ), ह्मणजे, खायला मिळालें कीं संततीस तोटा नाहीं. ब्रह्मदेवाचे भक्त समाजाच्या तळाशीं आहेत, विष्णूचे भक्त मध्यंतरीं आहेत, पृथ्वीवर अजिंक्य होऊन कैलासवासी होणारे शिवभक्त माथ्यावर आहेत. या अशा तऱ्हेनें युरोपीय समाज आपली शाश्वती राखून बलाढ्य होत आहे. जो पुरुष थोरवीस येऊन जगावर छाप ठेवितो, त्याच्या बापानें किंवा आजानें स्वत: हातानें कनिष्ठ प्रतीचें काम करून कुटुंबाचा गुजारा केलेला असतो. सारांश, कनिष्ठ वर्गांत व वरिष्ठ वर्गांत जें अंतर असतें तें फार थोड्या पिढ्यांचें. या वरिष्ठ पायरीवरच्या लोकांस मुलें असल्यास तीं उतारास लागून शहर सोडून क्रमानें खेड्यांत परत जातात. इमर्सन् ह्मणतो त्याप्रमाणें हें समाजचक्र चालण्यास जेवढी मध्यानुसारी गति असेल तितकी मध्यापसारी गति अवश्य आहे.* जो

---

* "Whilst all thus burns—the universe in a blaze kindled from the torch of the sun—it needs a perpetual tempering, a phlegm, a sleep, atmospheres of azote, deluges of water, to check the fury of the conflagration ; a hoarding to check the spending ; *a centripetence equal to the centrifugence* : and this is invariably supplied."..............

"The farmer is a hoarded capital of health as the farm is the capital of wealth ; and it is from him that the health and power, moral and intellectual, of the cities came. *The City is always recruited from the country.* The men in cities who are the centres of energy, the driving-wheels of trade, politics or practical arts, and the women of beauty and genius, are the children or grand-children of farmers, and are spending the energies which their fathers' hardy, silent life accumulated in frosty furrows, in poverty, necessity and darkness."

"All men keep the farm in reserve as an asylum, where, in case of mischance, to hide their poverty,—or a solitude, if they do not succeed in society. And who knows how many glances of remorse are turned this way from the bankrupts of trade, from mortified pleaders in courts and senates, or from the victims of idleness and pleasure ? Poisoned by town life and town vices, the sufferer resolves : " *Well, my children, whom I have injured, shall go back to the land*, to be recruited and cured *by that which should have been* my nursery, *and now shall be* their hospital."

Emerson : *Essay on Farming.*

खेड्यापाड्यांत सृष्टीच्या समोर कनिष्ठ प्रतीचीं कामें करितो, सृष्टीवर प्रत्यक्षपणें अन्नोदकाकरितां अवलंबून राहतो, सृष्टीची संगति सोडीत नाहीं, दुःख, दारिद्र्य आणि अज्ञान यांनीं व्याप्त असा दिसतो, त्याच्या मेंदूंत व शरीरांत सृष्टि सामर्थ्याचा ठेवा कणाकणांनीं क्षणोक्षणीं सांठवीत असते. तो ठेवा संततींत कमीजास्ती प्रमाणानें संक्रमित करण्याची त्यास शक्ति असते. त्या संततींत जो अधिक सामर्थ्यवान् होतो तो खेडें सोडतो, शहरांत जातो. प्रथम बहुधा शारीरिक श्रम विशेषसे करितो, त्याच्या पुढील पिढ्या मानसिक श्रम विशेषसे करितात, त्यांतील एक पिढी उदयास येते; त्या पिढींत मूळचा सामर्थ्याचा ठेवा संपतो, तेव्हां तें पुनः मिळविण्याकरितां, व पूर्वजांची वृत्ति अंगीकारण्याकरितां, तिच्या पुढील पिढ्या खेड्यांत परत येतात, नाहींतर मुळींच नष्ट होऊन जातात. हें असें चक्र आहे; यानें युरोपीय समाजास स्थैर्य आलेलें आहे. अतिरिक्त प्रजेची वाट लावण्याची सृष्टीची ही विलक्षण योजना आहे. कर्मभूमींत आधीं पुण्यसंचय करून देव किंवा देवांचा राजा इंद्र व्हावें; नंदनवनांत कल्पवृक्षाच्या छायेखालीं यथेष्ट सुख अनुभवावें; स्वर्गांगनांशीं विलास करावा; कर्मभूमींतील लोकांवर उपकार करावे, त्यांकडून हविर्भाग घेऊन पोट भरावें, त्यांस पूज्य व्हावें, त्यांचे स्तुतिमंत्र ऐकावे, स्वर्गीच्या सुखाची त्यांस गोडी लावावी; परंतु आपलें पुण्यसामर्थ्य संपतांच कर्मभूमींत येऊन पडावें. समाजाच्या चालू राहटीचें हें आलंकारिक वर्णन आहे. या राहटींत नरकाचीही योजना आहे. ज्यांस तामसी वृत्तीनें, दुर्व्यसनानें, मोहानें किंवा परापकाराच्या दुष्ट संवयीनें गांठलें, त्यांचे समाजांत हाल होत असतात; त्यांस कैदेंत टाकून, भ्रष्ट ठरवून, छळ करून, हरतऱ्हेनें निसंतान करून, त्यांनीं जगांतून आपलें अस्तित्व दूर करावें असें समाजाचें त्यांशीं आचरण असतें. खालीं समाजकंटक कापून काढण्याचें काम चालू आहे, वर समाजरचनेचीं उत्कृष्ट फळें व फुलें तोडून त्यांचा आस्वाद घेण्याचें कार्य सुरू आहे.

२८२. याप्रमाणें ही घडामोड युरोपीय समाजांत चालली आहे; तींतच त्यांचें स्थैर्य व प्रगति आहे. खेड्यांत बुद्धि पडित असते. सृष्टिसांनिध्यानें आरोग्य येतें. बुद्धि व आरोग्य यांचा खेड्यांत जो सं-

चय होत असतो तो शहरांत जातो, तेथें उद्योगाचे कामास लागतो, व क्रमानें सर्व खर्चून जातो. खऱ्या उपयुक्त सामर्थ्याचा ओघ जोंवर खेड्यांतून शहरांत वहात आहे तोंवर समाजास धक्का नाहीं. हीच गोष्ट हिंदुसमाजास लागू आहे. परंतु हिंदुसमाजांत व युरोपीय समाजांत एक मोठा भेद आहे तो असा कीं युरोपीय राष्ट्रांतील सर्व लोक **एकजातीय** आहेत; व जो उदयास येईल तोच वरिष्ठ जातीचा होतो. यामुळें थोर पुरुष उत्पन्न करण्यांत जें सामर्थ्य खर्च होतें तें कोणत्याही एकाच जातीचें होत नाहीं, सर्वांचें मिळून होतें. कोणत्याही एकाच वर्गाची हानि होत नाहीं, व म्हणून तिचा बोभाटाही नाहीं. या देशांत याहून फार भिन्न स्थिति आढळते.

२८३. एतद्देशीयांच्या बुद्धीचा विकास सृष्टिक्रमाप्रमाणें सावकाश होत गेला असता, तर फारसें नुकसान झालें नसतें. परंतु एकदम बुद्धिपरिश्रमांची आवश्यकता जेव्हां उत्पन्न झाली तेव्हां समाजांत बुद्धिपरिश्रमांवर उपजीविका करण्याचा ज्या वर्गांचा प्रघात होता, त्याच वर्गांवर विद्येचा सर्व भार पडला. ते वर्ग ह्मणजे वरिष्ठ जातीचे होत. या जाति पूर्वी खेड्यांत व शहरांत सारख्याच प्रमाणानें वांटलेल्या होत्या. ह्मणजे शहरांतील दशांश लोक वरिष्ठ जातीचे असले तर खेड्यांतील दशांश लोक वरिष्ठ जातीचे असत. त्यांचा धंदा लिहिण्यावाचण्याचा, कारकुनीचा, सावकारीचा, धर्मकर्म करण्याचा व करविण्याचा, निव्वळ भिक्षेचा किंवा कांहीं न करितां राहण्याचा होता. हीच स्थिति आजमित्तीपर्यंत कायम राहिली असती तर वरिष्ठ जातींचा ऱ्हास वेगानें झाला नसता. परंतु वास्तविकपणें असें घडत आहे कीं वरिष्ठ जाति खेडीं सोडून शहरांत येऊन राहूं लागल्या आहेत. त्यांचा खेड्यांत निर्वाह चालत नाहीं; त्यांस खेड्यांत चैन पडत नाहीं. कारण खेड्यांत दिवसानुदिवस दारिद्र्य वाढत आहे. शेतकऱ्यांचेंच पोट भरण्याचें मुष्कील झालें आहे, तेव्हां त्यांकडून व्यवहाराच्या किंवा धर्मकर्मांच्या द्वारें जी वरिष्ठ जातींस प्राप्ति व्हावयाची ती फार कमी झाली आहे. तसेंच खेड्यांत सावकारी करणें ह्मणजे अत्यंत त्रासाचें, व वारंवार निर्दयतेचें काम झालें आहे. इनामदार वगैरे जे लोक पूर्वी खेड्यांत स्थायिकपणें रहात होते, तेही

स्वस्थ वसूं नये, कांहीं धंदा करावा, म्हणून शहरांत येत आहेत. जुन्या तऱ्हेचे कांहीं लोक अद्यापि खेड्यांतून असतील, परंतु त्यांचीं मुलें विद्याग्रहणास योग्य होतांच त्यांची शहरांत रवानगी होत आहे. हीं मुलें पुनः खेड्यांत जाऊन स्थायिकपणें राहण्याचा संभव नाहीं. तात्पर्य हें कीं, सृष्टीच्या समोर राहून, सृष्टीचीं बाळकें बनून, बुद्धीस स्वस्थ ठेवून, आरोग्य संपादून, साधेपणानें व संतोषानें आयुष्य घालविणारे लोक वरिष्ठ जातींत आतां राहिले नाहींत. सृष्टसामर्थ्याचा खर्च व खराबा करणारे मात्र सर्व झाले आहेत, सृष्टीचे अंकावर स्वस्थ पडून सामर्थ्याचा संचय करणारे लोक नाहींसे होत आहेत. खेड्यांत राहण्याचा प्रसंग सरकारी नौकरीमुळें आला तर तें दुर्भाग्य वाटतें. खेड्यांत परत जाऊन तेथें स्थायिक होण्याचा कोणाचाही विचार दिसत नाहीं. खेड्यांत राहणें भाग झालें तर मुलें तरी शहरांत पाठवून दिलींच पाहिजेत. खेड्यांत राहून तीं गांवढळ होतील, शहरांत गेलीं तर विद्वान् होतील, असें वाटतें. तेथें गेल्यावर तीं कशीं चरकांत सांपडतात तें मागें सांगितलेंच.

२८४. गेल्या हजार दोन हजार वर्षांच्या अनुभवानें जो एक सिद्धांत समाजांत रूढ झाला होता तो गेल्या तीस चाळीस वर्षांच्या विद्याभ्यासंगानें अगदीं विसरून जात चालला आहे. उत्तम शेती, मध्यम व्यापार व कनिष्ठ नौकरी, असा तो पूर्वींचा सिद्धांत होता. कृषिगोरक्ष्य करणाऱ्या खेडवळांस वैश्य वर्गांत घालून त्यांस वेदविद्येचाही अधिकार दिला व त्यांची योग्यता शहरांतील हरहुन्नरी लोकांहून आमच्या शास्त्रकारांनीं अधिक ठरविली, हें प्रथमदर्शनीं चमत्कारिक दिसतें. परंतु हें त्यांनीं या सिद्धांतास अनुसरून फार दूरदृष्टीचें काम केलें. कृषिगोरक्ष्यास महत्त्व दिलें व या खेडवळ वैश्यांच्या धर्मकर्मांकरितां ब्राह्मणांनींही खेड्यांत जाऊन स्थायिक व्हावें ही योजना केली. शेतकऱ्यांच्या स्थितींतून नागरिक वाण्यांच्या स्थितींत क्रमानें उत्क्रांति होत जावी असाही त्यांचा उद्देश दिसतो. परंतु हल्लीं ती योजना व तो उद्देश व्यर्थ झाला आहे. या सिद्धांतांत ठरविल्याच्या उलट क्रमानें चालण्यांत फायदा आहे असें

हल्लीं वरिष्ठ जातींस वाटूं लागलें आहे, ह्मणूनच ते खेड्यांतून पळ काढीत आहेत.

पूर्वीं कोणी पुरुष उदयास आला तर तो इनाम, जहागीर वगैरे मागत असे. तितक्या योग्यतेचा नसला तर आपला संचितार्थ चार बिघे जमीन विकत घेण्यांत खर्च करीत असे. या रीतीनें आपली प्राप्ति खेड्यांत पाठवून तेथें मालमत्ता करायाची, वृद्धपणीं किंवा फावल्यावेळीं तेथें रहायास जायाचें, पूर्वींची खेड्यांत जी थोडीबहुत वडिलोपार्जित जमीन असेल ती राखण्याकरितां विलक्षण खटपट करायाची—ती हरळीची मुळी शाश्वतची—अशी उपजतबुद्धीप्रमाणें प्रबळ प्रेरणा गेल्या तीस चाळीस वर्षांपूर्वींपर्यंत लोकांत जागृत होती. त्या वेळचे पेन्शनर खेड्यांत परत जाऊन रहात होते. त्यांच्या बुद्धीची वाढ सावकाशपणें झालेली असल्यानें त्यांची धर्मश्रद्धा कायम असे. कोठें क्षेत्रीं जाऊन रहावें, कांहीं व्रत नियम आचरावे, यात्रा कराव्या, परमार्थ जोडावा, वेदांतविचार करावा—ही बुद्धि ह्मातारपणीं त्यांस सुचून त्या वयीं त्यांमध्यें विलक्षण कर्तृत्व दिसे. कारण, खेड्यांतून आले त्या वेळचा साधेपणा शहरांत राहिले तरी गेलेला नसे—बाराबंदीचें रूपांतर शर्टमध्यें त्यांच्या काळीं होत नसे—त्यामुळें शहरांत राहिलें काय किंवा खेड्यांत जाऊन आपल्या मालमत्तेची व्यवस्था पाहिली काय, त्यांस सारखेंच होतें. जो कोणी कुटुंबांत पराक्रमी होईल त्यानें खेड्यांत मालमत्ता करून आपल्या पुढील पिढीस साधें, मग तें आळसाचें कां होईना, आयुष्य घालविण्याची तर्तूद करून ठेवावी, हा पूर्वींचा परिपाठ होता. त्यांत वरिष्ठ जातींचें शाश्वत हित होतें.

गेल्या तीस चाळीस वर्षांत महाराष्ट्र देशांत बरेच पुरुष पुष्कळ योग्यतेस चढले आहेत; त्यांपैकीं कोंकणांतल्या किंवा देशावरच्या खेड्यांतून मूळ किती आले व पुणें, मुंबई, वगैरे मोठ्या शहरांतील स्थायिक कुटुंबांत किती निपजले, हें निश्चित करणें सोपें आहे. खेड्यांतून येणारांचें प्रमाण फार मोठें आहे असें दिसतें व त्यावरून खेड्यांतील आळशी व अविद्वान् वरिष्ठ जातींत बुद्धिसामर्थ्य सांचत असतें या सिद्धांताची सत्यता दृष्टीस पडते. हल्लीं शाळांमध्यें खेडीं

सोडून नवीनच आलेल्या मुलांत अधिक तेज दिसतें याचें कारणही तेंच होय. ज्या जातींस बुद्धिसामर्थ्यानें निर्वाह करायाचा आहे, त्यांचा खेड्यापाड्यांत पुष्कळसा भरणा असल्यावांचून निभाव लागायाचा नाहीं. परंतु तोच हल्लीं अगदीं संपुष्टांत येत चालला आहे.

२८५. **विनाशकाले विपरीतबुद्धिः !** अलीकडील तीस वर्षांत आतां सांगितल्याप्रमाणें जे लोक खेड्यांतून बुद्धीचा सांठा घेऊन शहरांत आले ते आपल्या सामर्थ्यानुरूप विद्या संपादून, अधिकार मिळवून, पैसा कमावूं लागले. युनिव्हर्सिटीच्या द्वारें अतिरिक्त विद्याव्यासंगाचीं त्यांस उत्कृष्ट साधनें मिळालीं. त्यांच्या बुद्धीचा आकस्मिकपणें अत्यंत विस्तार झाला. जेवढा अधिक विस्तार तेवढी तिची खोली मात्र कमी झाली, उथळपणा वाढला. शुद्ध बुद्धिवादाचा पंथ जो युरोपांत तीस वर्षांपूर्वीं ह्मातारा होत चालला होता तो या देशांत येऊन तरुणरूप घेऊन विद्वानांस मोह पाडूं लागला. उत्क्रांतितत्त्वांचा अद्यापिही कोणास फारसा बोध नाहीं, तेव्हां तो यापूर्वीं कोठून असणार ? तेव्हांच्या नवीन विद्वानांनीं वडलांची वृत्ति सोडली; त्यांस खेड्यांत परत जाणें रुचेनासें झालें. त्यांच्या खेड्यांतील इस्टेटी विक्रीनें किंवा इतर मार्गांनीं नाहींशा होत चालल्या. त्यांनीं शहरांत घरेंदारें खरेदी करण्याचा सपाटा सुरू केला. ते शहरचे स्थायिक रहिवासी बनूं लागले. ती हरळीची मुळी गेली; भ्रमाचा भोंपळा हातीं आला. नौकरी प्रथम, नंतर व्यापार, शेती असलीच तर तिचें अविच्छिन्न उत्पन्न शहरांत कुटुंब राहून मिळाल्यास बरें, नाहींतर फुंकून टाकली. याप्रमाणें वरिष्ठ जातीच्या विद्वान् लोकांस नवी बुद्धि होत चालली. संपत्ति खेड्यांत जाईनाशी झाली, तीं भिकार होत चाललीं, मग तेथून वरिष्ठ जातींचीं कुटुंबें उठून जाऊं लागलीं.

२८६. सुमारें तीस वर्षांपूर्वीं हें जें ग्रामीणांचें **पौरीभवन** होऊं लागलें, त्याचेंच नांव सामाजिक सुधारणा हें आहे. शुद्ध बुद्धिवादाच्या नादानें त्यावेळीं हल्लींच्या सर्व घातक सुधारणांस आरंभ झाला व वरिष्ठ जातीयांच्या ऱ्हासास आरंभ झाला. **पहिली सुधारणा** तीच सर्वांत घातक, व ती खेडीं सोडून शहरांत स्थायिक हो-

ण्याची. **दुसरी सुधारणा** द्रव्योपार्जनाकरितां पिढीमागें पिढी विद्येच्या चरकांत घालून तिची अमर्याद व अकालिक वाढ करूं पाहण्याची. **तिसरी सुधारणा** शहरांत राहून सर्व साधेपणा सोडून देण्याची, व पुष्कळ मालमत्ता जंगम स्थितींत राखण्याची. ( विद्वानांचीं मुलें मंद निघून, जंगम जिनगी डोळ्यांपुढें पाहून चैनीस व दुर्व्यसनास लागलेलीं, व त्या चैनीच्या पायीं प्रथम जंगम व नंतर स्थावर जिनगीचा फन्ना उडवून कंगाल झालेलीं जिकडे तिकडे दिसत आहेत. ज्यांनीं शहरांत कुटुंबें स्थायिक केलीं, त्यांपैकीं फारच थोड्यांचीं मुलें कुटुंबास ऊर्जितदशेस आणण्याच्या स्थितींत आहेत.) **चवथी सुधारणा** धर्मास मोठा धक्का देऊन दुर्बळ करून बुद्धिवादानें नास्तिकता उत्पन्न करण्याची. या सुधारणेंत अनेक दुसऱ्या सुधारणांचा संग्रह होतो. जातिभेद मोडण्याचा, मूर्तिपूजा बंद पाडण्याचा, धार्मिक कृत्यांचा उपहास करण्याचा, वगैरे अनेक प्रयत्न धर्मनाशाच्या थोरल्या सुधारणेचीं अंगें आहेत. या सर्व बुद्धिप्रयुक्त सुधारणांमध्यें दूरदृष्टि नाहीं; अहंकाराचें वारें भरून त्यांस फुगारा आला आहे. वरिष्ठ जातीयांची त्यामुळें आत्मघातक मार्गाकडे प्रवृत्ति झालेली आहे. सर्वांचा ऱ्हास संततींत उत्तमपणें प्रकट होत आहे.

२८७. शहरांतल्या स्थायिक वासानें जे मनुष्याच्या शरीरावर व मनावर परिणाम होतात, ते बहुतेक अनिष्ट* आहेत. शहरांत कों-

---

* "*It seems to be a law of existence that the most dominant and powerful races, if they desire to keep their virility, cannot remove themselves too far and too long from the primitive conditions of life.* As the great individual is seldom found more than three generations removed from ancestors who wrought with their hands and lived in the open air, so the most powerful races seldom survive more than a few centuries of the enervation of an artificial life. As the physical body becomes toneless and weakened, so also the intellectual life grows thin ; and it is as necessary for the nation as for the individual who would recuperate to return again and again, and lying flat on the bosom of our common mother, to suck direct from the breast of nature the milk of life, which, drawn through long artificial channels,

डल्या जागेंत रहावें लागतें, शुद्ध हवेंत जितका वेळ जावा तितका जात नाहीं. शहरांत सभ्यतेचे नियम अधिक कडक, त्यामुळें शरीर

---

tends to become thin and ceases to nourish. Most great conquering peoples have been within hail of the nomads' encampment ; and all great nations at the time when they have attained their greatness were largely agricultural or pastoral. *The city kills.*

It is of course hardly necessary to state that we have no intention of signifying that vast cities or the civilization which they represent have any instantaneous effect on national life, and still less that statistical tables would prove the death-rate higher in the town than country. These things have no bearing on the decline and fall of nations, which must slowly and gradually decay from within before the moment of their catastrophic fall can arrive. It is *this* decay which is promoted by the artificial condition of life in that high condition of material civilization, of which vast cities, with their abject squalor, their squandered wealth, and their wide departure from the natural conditions of life, are at once the symptom and the cause ; and it is a vulgar common-place that *were the city not recruited from the more primitive country, it would be depopulated in six generations.* Vast and gorgeous cities have always heralded and accompanied the falls of great peoples ; and the ruins of Neneveh, Babylon, Rome and the vast fallen cities of India and Greece, are the graves under which a brave, simple and mighty people were buried while the walls yet stood.

It would be almost as rational to inquire in the case of a man habitually over-eating and drinking himself, and who, taking no exercise, dies at fifty of gout and diseased liver, what hour of inaction, or which mouthful of meat or drink it was, which produced his death,— as to assert that because no detail of a given system of civilization is directly and instantly destructive to national or individual life, morally and physically, that therefore the whole system is not slowly but surely so. On the other hand, is there any reason to suppose that the emasculation and degradation of human creatures, which has always taken place whenever a high state of material civilization has been reached, is an absolutely inevitable concomitant of all high material civilization, for all time ? Must the story of history for ever repeat itself? Is it possible that the human intelligence with its marvellous powers of fore-thought and analysis, shall at some time be able, so

अधिक आच्छादित राहतें, तें नाजूक होतें व ऋतुमानाप्रमाणें त्याची काळजी घेण्यांत थोडी चूक झाली कीं आरोग्यास लहान मोठा धक्का बसतो. शहरांत खाण्यापिण्यांत वारंवार अपरिमितपणा होतो; अति गोड, अति मसालेदार व ( अपरिचितत्वामुळें ) अपाच्य, असें अन्न वारंवार खाण्यांत येऊन कोठा विघडतो; व अशी स्थिति अनेक व्याधींस कारण होते. विद्याभ्यासंगी लोकांस आहाराच्या मानानें शहरांत श्रम कमी पडतात; जेवण चमचमीत व काम पुळपुळीत ही स्थिति पुष्कळांची असते. जेथें लोकवस्ती दाट, तेथें सहजगत्या रोगांचें प्राबल्य असायाचें; इकडे प्रकृति क्षीण करीत रहावें, तिकडे औषधें घेत असावें; जीव शरीरांत कृत्रिमपणें राखण्याचा प्रयत्न नित्य करीत राहिलें पाहिजे. जसजसें शहर मोठें असेल तसतसे चैनीचे पदार्थ तेथें अधिक विपुळ असायाचे; दुर्व्ययांत व दुर्व्यसनांत पडण्याची इच्छा अधिक प्रबळ व्हावयाची. स्वतःच्या सुखसमृद्धीकरितां कुटुंबाची हेळसांड होण्याचे प्रसंग कर्त्या पुरुषावर शहरांत फार येतात. तसेंच जो कर्ता पुरुष त्यासच अतिशय विवंचनांचा ताप असतो; त्याचीं मुलें माणसें त्यास मदत करण्यास नालायख असतात; बुद्धीचें काम शेतीच्या कामासारखें नाहीं, त्यांत सर्वांचा उपयोग होऊं शकत नाहीं. याप्रमाणें हीं अनेक कारणें शहरवासी मनुष्याची प्रकृति आंतून क्षीण व पोकळ करण्यास नित्यनित्य कारण होतात. स्वतः मनुष्य औषधपाणी घेऊन आपला बचाव करून राहील; परंतु जें आरोग्याचें तत्त्व मनुष्याच्या शरीरांतून गेलें तें संततींत उतरण्याचा संभव कोठें राहिला ? ज्या बुद्धीस वडलांनीं वैक्लव्य आणिलें, ती चिरंजीवांत निर्दोषपणें कशी उतरेल ? या कारणानें पुरुषाच्या बुद्धींत व आरोग्यांत जीं व्यंगें उत्पन्न होतात तीं

---

to comprehend its own condition and to shape human life, that the benefits of a material civilization shall be grasped, while the emasculation and disintegration *which have always aacompanied it*, shall be escaped?

OLIVE SCHREINER: *Stray Thoughts on South Africa: Fortnightly Review, Aug.'96.*

संततींत अवतरतात, दर पिढीस त्यांचीच वृद्धि होत जाते व अखेरीस कुटुंबाचा निर्वंश होतो.*

२८८. बुद्धीचे अतिरिक्त परिश्रम व शहरची वस्ती, यांपैकीं एक एक कारणही कुळास निसंतान करण्यास समर्थ आहे; मग हीं दोन्ही जेव्हां कोणत्याही जातींत उत्पन्न होतात तेव्हां ती जात अवश्य विनाशपंथास लागेल यांत संशय नाहीं. सर्व वरिष्ठ जाति या पंथास लागल्या आहेत. परकीयांच्या दृष्टीनें आपण सुधारलेले दिसलों व आपलें वर्तन त्यांस आवडलें, ह्मणजे खरी सुधारणा झाली, खरें सद्वर्तन झालें, अशी इंग्रजी विद्येनें समजूत करून दिली आहे. या अनुकरणांत जें काय होईल तें होवो, असा सर्वांचा निग्रह होत आहे. त्या कारणानें संततीस बुद्धिश्रमांपासून विश्रांति मिळावी हा विचार प्रबळ होत नाहीं, जें द्रव्य मिळेल तें आपणां स्वतःस सजविण्यांत, बायका मुलें सजविण्यांत, घर सजविण्यांत किंवा विचारस्वातंत्र्य प्रकट करणाऱ्या दुर्व्यसनांत व दुरुपभोगांत खर्च होऊन जातें; व एकंदरीनें पुढील संततीच्या मागचा बुद्धिपरिश्रमाचा कांच कालगतीनें वाढत जातो. हा आधुनिक सर्व सुधारणांचा निश्चित परिणाम आहे. अशा वर्तनानें नौकरींतून व्यापारांत जाण्यास जें भांडवल पा-

---

"Spencer justly remarks that in all businesses and professions, intense competition taxes the energy and abilities of every adult ...... The damage is thus doubled. Fathers who find themselves run hard by their multiplying competitors, and, while labouring under this disadvantage, *have to maintain a more expensive style of living*, are all the year round obliged to work early and late, taking little exercise and getting but short holidays. The constitutions shaken by this continual over-application, they bequeath to their children. And then these comparatively feeble children, predisposed to break down even under ordinary strains on their energies, are required to go through a *curriculum* much more extended than that prescribed for the unenfeebled children of past generations. The disastrous consequences, which might be anticipated are everywhere visible, especially in the case of girls, and they are accumulated by heredity."

GUYAU, *Education and Heredity, p. p. 130, 131.*

हिजे व जी इच्छा पाहिजे ती देखील उत्पन्न व्हावयाचा संभव नाहीं, मग शहरवाशाचा खडवळ होण्याचें तर लांबच राहिलें!"

---

## भाग ४१ वा.

## सुधारणा सुचविण्यांत केवढी सावधगिरी राखणें जरूर असतें ?

२८९. "ज्या युरोपीयांस आपलें वर्तन व आपली सुधारणा पसंत पडावी ह्मणून आमचा प्रत्यक्षपणें किंवा अप्रत्यक्षपणें प्रयत्न आहे, ते आमचे हितचिंतक आहेत खरे, परंतु शास्त्रज्ञ नाहींत, किंवा दूरवर विचार पोंचविणारे नाहींत, किंवा आमचीं सुखदु:खें सानुकंपपणें पहाणारे नाहींत, हीच मोठी दुर्भाग्याची गोष्ट आहे. त्यांचे सर्व विचार कोते पडतात, त्यामुळें बाह्य वर्तनाबद्दल ते इकडे शाबासकी देत असतात, अंतर्गत बुद्धिवैक्लव्य पाहून तिकडे तिरस्कारयुक्त होतात. या अशा लोकांहून जे अधिक विचारी त्या लोकांस पसंत पडेल अशा तऱ्हेनें आपणांस वागलें पाहिजे. ज्यामध्यें बिलकुल दुराग्रह नाहीं असा **इमर्सन**सारखा मनुष्य आपणांसंबंधानें काय ह्मणेल तें पहावें. इमर्सननें नीतीच्या परम श्रेष्ठत्वाबद्दल लिहीत असतां असें ह्मटलें आहे—

' आपणांहून जें वरिष्ठ असेल त्याविषयीं जो बहुमान त्याचें नांव पूजा. मनुष्याच्या हृदयांत ज्याप्रमाणानें बहुमान उत्पन्न होतो, त्याप्रमाणानें तो स्वत: बहुमत होतो. मुलें पाहून आपणांस जो आनंद होतो तो त्यांमध्यें जी धार्मिक दृष्टि असते तीमुळें; कारण, तीं मुलें आपल्या वडलांस बहुमान देत असतात, ज्यावर त्यांचा भरंवसा असतो त्यास पूज्य गणितात. गरीब विचारा ऐरिश मजूर पाहून देखील आपणांस त्याविषयीं बहुमान वाटतो, कारण त्याची कांहीं गोष्टींवर श्रद्धा असते; आपला धर्म व आपले यजमान हे त्यास पूज्य दिसतात. जे लोक धर्मवेडे ( superstitious ) ह्मणून

आपण समजतों त्यांबद्दल आपणांत बहुमान उत्पन्न होतो, कारण जोडा आणि टोपी यांच्या दरम्यानच्या अंतरांतच त्यांचें सर्व अस्तित्व नसतें. त्यांच्या कल्पनेनें निर्माण केलेल्या श्रेष्ठ विभूति, स्वत:भोंवतालीं असलेल्या, त्यांस दिसतात; त्यांपुढें बहुमानपूर्वक ते नम्र होतात. अशा श्रेष्ठ विभूति त्यांच्यापासून दूर करण्यानें ते निस्तेज होतात, एवढेंच नव्हे तर त्यांचा सर्वस्वी नाश होतो. ज्या ऐतिहासिक काळांत लोकांमध्यें धर्मश्रद्धा प्रबळ होती ते सर्व काळ वर्णनीय होऊन गेले; उलट, ज्या ऐतिहासिक काळांत लोकांमध्यें धर्मश्रद्धा दुर्बळ किंवा लुप्त झालेली होती ते सर्व काळ नीच कृत्यांकरितां प्रसिद्ध आहेत. आपणां अमेरिकन लोकांत श्रद्धेचा जो ऱ्हास होत आहे तो आपणांस नीच स्थितीस नेत आहे. आपणांस बहुमान देण्यासारखें कांहींच दिसेनासें झालें आहे; त्यामुळें आपणही बहुमानास अपात्र होत चाललों आहों.' *

---

Worship is the regard for what is above us. Men are respectable only as they respect. We delight in children because of that religious eye which belongs to them; because of their reverence for their seniors and for their objects of belief. The poor Irish labourer one sees with respect, because he believes in something, in his Church and in his employers.

*Superstitious persons we see with respect, because their whole existence is not bounded by their hats and their shoes, but they walk attended by pictures of the imagination, to which they pay homage. You cannot impoverish a man by taking away these objects above him without ruin.* It is very sad to see men who think their goodness made of themselves; it is very grateful to see those who hold an opinion the reverse of this.

All ages of belief have been great; all of unbelief have been mean. The Orientals believe in Fate. That which shall befall them is written on the iron leaf; they will not turn on their heel to avoid famine, plague or the sword of the enemy. That is great and gives a great air to the people. We in America are charged with a great deficiency in worship; that reverence does not belong to our character; that our institutions, our politics, and our trade, have fostered a self reliance which is small, liliputian, full of fuss and bustle; we look at

२९०. या प्रकारचा दुराग्रह-हीन तत्त्ववेत्ता आपणांस सामाजिक कामांत उपदेश करणारा असता, तर त्यानें आपणांस खास सुदिशेस लाविलें असतें. कारण, सदसद्विवेकशक्तीनें जें योग्य दिसेल तें करावें यांत शंका नाहीं; परंतु या शक्तीचे निर्णय सामान्यत्वानें योग्य व व्यक्तिपरत्वें संदेहात्मक असे असतात. समाजांतील सर्व व्यक्ति भिन्नभिन्न स्थितींत असतात. सरासरी स्थितीच्या एका कल्पित व्यक्तीस सुविचारानें जें वर्तन उचित होईल, तें प्रत्यक्ष व्यक्तींपैकीं एकीसही उचित होणार नाहीं, असा संभव आहे. उदाहरणार्थ, पुनर्विवाहाची गोष्ट घ्या. कोणतीही एक व्यक्ति डोळ्यांपुढें न धरतां सामान्यत्वानें विचार केल्यास, विधवेस सामाजिक प्रतिबंधांमुळें होणारें दुःख, तिची दुराचाराकडे प्रवृत्ति होण्याचा संभव, पुरुषांस कांहीं एका वयांत प्रौढ स्त्री मिळाल्यानें होणारा फायदा, वगैरे दहावीस कारणें जीं लक्षांत येतील त्या तेवढ्यांचें बळाबळ पाहून विधवाविवाह योग्य असें ठरवितां येईल. परंतु हा ठराव कोणास लागू, असें पाहूं लागलें ह्मणजे शंका येऊं लागते. अमुक विधवा व अमुक पुरुष यांचा विवाह होणें इष्ट आहे कीं नाहीं असें पाहूं लागलें कीं सामान्य ठरावास लागू अशीं जीं पूर्वींचीं दहावीस कारणें त्यांपैकीं कांहीं या विशेष व्यक्तींस लागू नसतात; व या व्यक्तींस जीं लागू तीं नवीं पुनः विचारांत घेणें भाग होतें. सामान्य ठराव व्यर्थ होतो. कोणाच्या मातापितरांस पुनर्विवाह प्रशस्त दिसत नाहीं; त्यानें किंवा तिनें तो करून मातापितरांस दुःखवावें काय? कोणास कुलीन वि-

---

and will bear nothing above us in the state, and do exceedingly applaud and admire ourselves, and believe in our senses and understandings, *while our imagination and our moral sentiments are desolated.* In religion, too, we want objects above; we are fast losing or have already lost our old reverence; new views of inspiration, of miracles, of the saints, have supplanted the old opinions, and it is vain to bring them again. Revolutions never go backward, and in all churches a certain decay of ancient piety is lamented and all threatens to lapse into apathy and indifferentism.

EMERSON. *On the sovereignty of Ethics.*

धवा असली तर पाहिजे; त्याची कुलीनत्वाची समजूत पुरी पडली पाहिजेना? कोणाचा स्वभाव संशयी, त्यास अमुक विधवा इतके दिवस दुराचार केल्यावांचून राहिली कशी अशी शंका येते; त्याचें समाधान झालें पाहिजेना? हीच शंका पुरुषाबद्दल विधवेस आल्यास ती तरी कशी राजी होईल? कारण वेश्यागमनानें पुरुषांस भिन्न रोग जडतात; ते जडले ह्मणजे पुरुषापेक्षां त्याच्या स्त्रीची फजीति अधिक होते, इतकेंच नव्हे तर तिचीं मुलें जगत नाहींत व मातृत्वाची जी तिची तळमळ ती तृप्त होत नाहीं. कोणताही विवाह समाजहिताच्या दृष्टीनें सफळ होण्यास उत्तम संतति प्राप्त होणें हें अवश्य आहे. अशा विवाहास समाजाची संमति असायाचीच. उत्तम संतति होण्यास एक गोष्ट अवश्य असते. ज्या कोणत्याही विवाहांत ती प्रकट होणार नाहीं ते विवाह समाजदृष्टया निष्फळ होत. ती गोष्ट ही कीं स्त्रीमध्यें विषयाभिलाषापेक्षां मातृत्वाची इच्छा प्रबळ झाली पाहिजे. मी आई केव्हां होईन, मूल केव्हां पाहीन, त्यास कांटिखांदा वाहतां केव्हां कृतार्थ होईन, इत्यादि ममतेच्या मनोवृत्ति ज्या स्त्रीच्या अंत:करणांत प्रबळ होऊन केवळ रतिसुखाची हौस मागें पडते—तीच चांगल्या संततीस जन्म देते व तिचें उत्तम संगोपन करिते. वेश्यांस व व्यभिचारिणी स्त्रियांस संतति कमी असण्याचीं जीं कित्येक कारणें आहेत, त्यांपैकीं हें एक प्रमुख कारण आहे; दुसरीं कांहीं प्रमुख कारणें शारीरशास्त्रासंबंधाचीं आहेत, त्यांचा येथें विचार कर्तव्य नाहीं. समाजांत उत्तम संततीची शाश्वती ठेवण्याकरितां विवाह व पातिव्रत्य, या योजना आहेत. जेथें संततीचा उद्देश गौण होतो, ह्मणजे स्त्री किंवा पुरुष त्या उद्देशास महत्त्व देत नाहींत, संतति नसेल तर बरी असें मनांत आणितात, व विषयसुखास श्रेष्ठ मानितात, तेथें त्या स्त्रीपुरुषांच्या वैवाहिक किंवा व्यभिचरित संयोगानें समाजाचें नफा नुकसान सारखेंच असतें. याकरितां 'दारानपत्याय' हेंच विवाहसंस्थेचें मूळतत्त्व कायम राहिलें पाहिजे. वरिष्ठ जातींत दारिद्र्यामुळें संतति नकोशी होते; तशीच ती संपत्तीमुळेंही कित्येकांस नकोशी होते. कारण, संपत्तीच्या बरोबर विषयसुखाची आवड उत्पन्न होते. मिष्टान्नें, सुवासिक द्रव्यें, वस्त्रा-

भरणें, विलासमंदिरें, इत्यादींची हौस उत्पन्न झाल्यावर संतति शत्रुवत् वाटते, स्त्रीस वाटतें, आपला तारुण्याचा बहार अकालीं संपेल, प्रपंचदु:ख मागें लागेल, विषयसुखांचें स्वारस्य कमी होईल, मग पुरुषाच्या दृष्टीनें आपली योग्यता कमी होईल; याकरितां मूल नको. अशा या मनाच्या स्थितीमुळें व अतिरिक्त विषयोपभागामुळें संतति होईनाशी होते व झाली तर ती चांगली होत नाहीं. कुटुंबें नि:संतान होतात. हा अनुभव श्रीमंतांच्या येथें पुष्कळ ठिकाणीं येतो. कनिष्ठ जातींत हे असले विचार नाहींत; त्यांमध्यें मातृत्वाची इच्छा प्रबळ; ह्मणून संततिही पुष्कळ. विधवा वरावी कीं कन्या वरावी, याविषयीं विचार करितांना कुटुंबवत्सल मनुष्याच्या मनांत, हा संततिविषयक विचार येण्याचा संभव आहे; व त्यामुळें तो कदाचित् विधवाविवाह नापसंत करील.

याप्रमाणें विचारशक्तीनें ठरविलेले सामान्य सिद्धांत व्यक्तींस लावूं लागलें ह्मणजे ते संदेहात्मक होतात; इतर सामाजिक सिद्धांतांशीं त्यांचा विरोध येतो; कोणतें कर्तव्य बलवत्तर हें केवळ व्यक्तींच्या परिस्थितीवरून ठरवावें लागतें. याकरितां विशिष्ट व्यक्तींच्या हिताच्या सुधारणा गौण होतात. रूढींनीं रूपांतरित असा जो चालू धर्म त्याचा उद्देश सर्व तद्धर्मीय समाजास शाश्वती आणण्याचा असतो व त्याच दृष्टीनें त्यांत सुधारणा योजिल्या पाहिजेत. जो समाज आपल्या शाश्वतीस जपतो तो दरपिढीस थोड्या तरी उन्नतीस चढतो. व्यक्तींच्या सुखस्वातंत्र्याच्या सुधारणा आरंभून परम बुद्धिमान्, विचारी व शूर असे **ग्रीक** व **रोमन** लोक विलयास गेले. त्यांच्या विचारप्रागल्भ्यामुळें त्यांच्या नैतिक व धार्मिक मनोवृत्तींची अनिवार्यपणें हानि झाली. तोच प्रकार हल्लीं एतद्देशीय वरिष्ठ जातींत कांहीं अंशीं दृष्टीं पडत आहे, त्यामुळें आह्मीही विनाशमार्गास लागलों आहों असें स्पष्ट दिसतें.*

---

* It would be impossible to conceive any altruistic feeling of this kind which could exceed in strength the parental instinct. Yet one of the plainest facts of our time and of past history is the perversion of this instinct under the influence of *rationalism,* and the suspension

२९१. धर्मवेड अशी संज्ञा दिलेल्या हल्लीं जेवढ्या चाली आहेत त्या प्रत्येकीकडून कांहीं विशिष्ट कार्यें होत आहेत; त्या चालींमुळें सामाजिकांचें मन कांहीं आवश्यक मनोवृत्तींनीं प्रेरित होत

---

of its operation in furthering the evolution the race is undergoing. We have discussions in the literature of the time in which rationalism points out with re-iterated emphasis that 'there is something pathetically absurd in this sacrifice to their children of generation after generation of grown up people.' No observant person who has watched the signs of the times can have the least doubt that in a state of unrestricted rationalism the institution of marriage and the family would undergo modifications, incompatible with the continuance of that process of evolution with which the interests of the race are bound up. We have unmistakable evidence of the perversion of the parental feelings among the Greeks and Romans and other peoples under rationalistic influences. And we have at the present day that striking example of the perversion under similar circumstances of these feelings among the most brilliant and able race (viz. the French) among the European peoples, and the consequent failure of that race to maintain its place amongst others in the evolution which is proceeding under our eyes......It would appear that the teaching of evolutionary science as applied to society is that there is only one way in which the rationalistic factor in human evolution can be controlled; namely, through the instrumentality of religious systems......It is under the influence of these systems that the evolution of the race is proceeding; it is in connection with these systems that we must study the laws which regulate the character, growth and decay of societies and civilizations.

Speaking of the decay of the Athenian people Mr. Francis Galton says, "We know, and may guess something more, of the reason why this marvellously gifted race declined. Social morality grew exceedingly lax; marriage became unfashionable and was avoided; many of the more ambitious and accomplished women were avowed courtesans and consequently infertile and the mothers of the incoming population were of a heterogeneous class." The same state of popular feeling with respect to marriage prevailed during the decline of the Roman empire. "Aversion to marriage became very general" KIDD: Social Evolution P. 294.

See also Lecky's Hist. of Eur. Morals. Vol. II, P. 302.

आहे; व हर्ष-सुख-उत्सव-आनंदांचे भिन्न प्रसंग त्यांवर अवलंबून आहेत. उदाहरणार्थ, मूर्तिपूजेच्या द्वारें आस्तिक्यबुद्धि, भक्तिभाव, पापभय, व अनेक उत्सव यांस आधार मिळत आहे. जातिभेदानें सात्त्विक आचरणास श्रेष्ठता आणिली आहे. बालविवाहादि रूढींनीं सात्त्विक प्रेम, पातिव्रत्य व शुद्ध संतति, यांची शाश्वती राखिली आहे. हिंदुत्वाचा अभिमान कायम राहण्यास सर्वच धार्मिक संस्था, चांगल्या व वाईट, कारण होतात. शुद्धबुद्धिवादानें ज्यास धर्मवेड असें ठरवितां येणार नाहीं असें कांहींच नाहीं, कारण धर्माची प्रेरणाच बुद्धिमार्गाच्या पलीकडची आहे.

केवळ धर्मवेड नाहींसें केल्यानें समाज सुखी होत नाहीं; उलट त्याचीं सुखसाधनें कमी होतात व हीन मनोवृत्तींवरचा दाव नाहींसा होऊन मनाची हानि होते. धर्मवेड अजिबात घालवायाचें आणि तटस्थ रहायाचें ह्मटलें तर हा प्रयत्न व्यक्तींस कोणत्या थरास नेऊन पोहोंचवील त्याचा पत्ताच लागणार नाहीं. याकरितां जें एखादें धर्मवेड नाहींसें करायाचें ह्मणून बुद्धीस आवश्यक दिसेल त्या धर्मवेडानें कोणत्या हितकर मनोवृत्तींस आधार मिळाला आहे, कोणते आनंदोत्सावाचे प्रसंग येतात, कोणत्या आवेशाच्या कर्तव्यांत त्यांची मदत होणें शक्य आहे—इत्यादि गोष्टींचा प्रथम पूर्ण विचार करून, व नंतर त्या सर्व मनोवृत्तींस दुसरा अधिक योग्य आधार देऊन, आणि तदनुसार आनंदावेशाचे प्रसंग योजून—मग त्या धर्मवेडास धक्का लाविला पाहिजे. मनोवृत्तींस दिलेला हा दुसरा आधार ग्राह्य झाला पाहिजे व तो रूढ होण्यास अवकाश दिला पाहिजे. अशा रीतीनें एक एक धर्मवेड नाहींसें झालें तर समाजाचा फायदा होतो. या मार्गानें सुधारणा सावकाशच होणार.

परंतु जे सुधारक हा दूरदृष्टीचा मार्ग स्वीकारीत नाहींत व बुद्धिप्रेरित उदात्त विचारांमुळें कां होईना, उचंबळून जाऊन देहभान विसरतात, व अप्रासंगिक सुधारणेकरितां जळफळून समाजाच्या मर्मी घांव देतात, ते समाजाचे शत्रु होत. समाजास त्यांचा राग यावयाचाच व ते कंटक दूर करण्याचा समाजानें प्रयत्न करणें अवश्य आहे. त्यायोगें समाजाचें आयुष्य वाढतें. परंतु वरिष्ठ जातींत एक-

पक्षीय शिक्षणानें, विस्तृत परंतु उथळ विचारशैलीनें व समाजास नुसतें टोंचूनच कुत्सित सुख होतें त्याच्या लोभानें, अनेक अविचारी तरुण गृहस्थ धर्महीन सुधारक बनत आहेत. ह्मणजे वास्तविकपणें समाजकंटक होत आहेत. हा असा चालू शिक्षणाचा परिणाम सर्वच वरिष्ठ जातींच्या पुरुषांवर होण्याचा संभव पाहिला ह्मणजे वरिष्ठ जातींची भावी स्थिति भयंकर दिसते.

२९२. आजपर्यंत ज्या धर्मक्रांत्या किंवा धर्मसुधारणा झाल्या त्या करणारांची धर्मश्रद्धा प्रज्वलित होती, असें त्यांच्या शत्रूंसही कबूल करावें लागे. त्यांनीं जे प्रयत्न केले ते अश्रद्ध बुद्धीनें पाहिले, तर एवढेंच दिसतें कीं एक धर्मवेड काढून त्याचे जागीं दुसरें त्यांनीं स्थापिलें, किंवा मूळचें जेवढें धर्मवेड होतें तें कमी केलें. परंतु त्यांचे ते प्रयत्न सिद्धीस जाण्यास त्यांचा कोणता गुण कारण झाला याचा विचार अधिक महत्त्वाचा आहे. तो गुण श्रद्धा हा होय, लूथर, काल्व्हिन्, बुद्ध, शंकराचार्य, रामदास, तुकाराम, कबीर, वगैरे—या सर्वांमध्यें उत्तम धर्मश्रद्धा होती; व तीविषयीं अनुयायांस व प्रतिपक्ष्यांस शंका येण्यास अल्पमात्र कारण त्यांच्या सर्व आचरणांत सांपडण्यासारखें नव्हतें. त्यांनीं व्यभिचारी पुरुषास, असत्य बोलणारास, धर्मनिंदकास आपल्या शेजारीं उभें केलें नसतें; मग त्याचे अन्य गुण कोणतेही असोत. अशी बळकट श्रद्धा ज्यांच्या अंगीं नाहीं त्यांनीं सुधारणेचे दंभ माजविण्यांत व समाजास द्वेष्य होण्यांत काय फायदा आहे ? त्यांस जें स्वहित साधायाचें असेल तें अन्य मार्गांनीं साधावें; इतरांस कां उपद्रव द्यावा ?

ज्याची धर्मश्रद्धा संदेहात्मक त्यानें धर्मसुधारणेचा प्रवर्तक होणें ह्मणजे धर्मनिंदा आरंभण्यासारखें आहे. विद्याशिक्षण आणि धर्मनीति यांचें शिक्षण, या दोहींमध्यें जो मोठा भेद आहे तो हाच कीं या दुसऱ्या कार्यांत सर्व उत्कृष्ट मनोवृत्तींचें, व विशेषतः, श्रद्धेचें व सदाचरणाचें काम लागतें. अमुक नात्यानें मी उपदेश करीत आहें, तेवढ्या नात्यानें मजकडे पहा, असें कोणी ह्मणेल तर तें कोणासही पसंत पडेल काय ? एका धर्माचा उपदेशक दुसऱ्या धर्माच्या उपदेशास कां योग्य गणिला जात नाहीं ? ख्रिस्ती धर्मोपदेशाचें काम कोणी

स्वतः हिंदु राहून आरंभिल्यास तें ख्रिस्ती लोकांस मान्य किंवा गुणावह होईल काय ? तें तसें होतें, तर यंत्रानेंही धर्माचा व नीतीचा उपदेश करितां आला असता ! उपदेशास श्रद्धा पाहिजे. परंतु वरिष्ठ जातींत काय प्रकार दिसतो ? श्रद्धावान् पुरुष, ह्मणजे भटभिक्षुक, शास्त्रीपंडित, वृद्ध गृहस्थ, इत्यादींची धर्मवेड्यांमध्यें गणना करण्याचा उपदेश सुरू आहे; धर्मसंशोधनाच्या कामीं त्यांस द्रव्यानें किंवा बहुमानानें उत्तेजन मिळत नाहीं; व अश्रद्ध पुरुष धर्माच्या व नीतीच्या सुधारणांचे प्रवर्तक झाले आहेत ! विद्वान् असून श्रद्धावान् असे पुरुष उत्पन्न होण्यास शिक्षणाची तऱ्हा फार बदलली पाहिजे; तीवांचून ह्या उतारास लागलेल्या समाजास स्थैर्य किंवा शाश्वती येणें अशक्य आहे.

२९३. सर्वांनीं एवढें एक तत्त्व लक्षांत ठेवावें कीं बुद्धीस अप्रयोजक, परंतु मनोदेवतेस प्रशस्त दिसणारें कोणतेंही काम करण्याचें किंवा न करण्याचें समाजाच्या खुपीवर ठेविल्यास समाज निश्चयानें मनोदेवतेस अनुसरेल. दानधर्माच्या कामीं, पशुहत्येच्या कामीं व कित्येक आपत्प्रसंगीं या तत्त्वाचा अनुभव येतो. मनोदेवतेविरुद्ध आचरण करण्याची संवय फार घातक आहे. मनोदेवतेच्या समाधानासाठीं सुविचारांचा मोड झालेला दिसला किंवा व्यक्तिसुखाचा नाश झालेला दिसला, तथापि तो पत्करतो; त्याचे अखेरचे परिणाम समाजास इष्ट तेच होतात. हरतऱ्हेच्या पूर्वसंस्कारांनीं मनोदेवतेस बळ आलेलें असतें. दूरवर कार्य करणाऱ्या कारणांचा प्रत्यय भिन्नभिन्न स्थितींत येत गेल्यानें **मनोदेवता** तयार होते; ह्मणून ती समाजाची खरी **दूरदृष्टि** होय. तीस दुखविण्याचा प्रयत्न पाहून तिऱ्हाइतासही वाईट वाटतें; तीस समाधान देण्याचा प्रयत्न पाहून तिऱ्हाइतासही मनाची श्रेष्ठता ओळखतां येते.

रूढ मनोदेवतेविरुद्ध एकदम वर्तन करूं लागणारे लोक कितीही सुविचारी असले तरी ते सुखसंतोषापेक्षां अधिक प्रमाणानें सामाजिक दुःख उत्पन्न करितात. हें त्यांचें कृत्य उचित नव्हे. कारण, पुढच्या मोठ्या आशेनें आज कांहीं दुःख भोगणें, ही व्यक्तीच्या बुद्धीनें यो-

ग्य दूरदृष्टि होईल. अल्पकाळांत व्यक्तींचें मोठें स्थित्यंतर होऊं शकतें, व त्यामुळें पुढील सुख मागील दुःखाचा विसर पाडूं शकतें. परंतु एखाद्या व्यक्तीस दूरदृष्टीनें जें कोणतेंही नवीन आचरण सुखपर्यवसायी होतें असें दिसून आलें, तेंच आचरण सर्वांस, ह्मणजे, समाजास तसेंच सुखदायक होईल असें त्यानें सुचविणें व त्या सुधारणेबद्दल आग्रह धरणें हें योग्य नाहीं. कारण समाजाचें स्थित्यंतर व्यक्तीप्रमाणें अल्पकाळांत होण्याचा बिलकुलच संभव नसतो. त्यामुळें नवीन वर्तनाचे आधींचे दुःखदायक परिणाम कित्येक पिढ्यापर्यंत समाजास भोगावे लागणार; इतक्या अवकाशांत परिस्थिति किती बदलेल याचा अंदाज करितां येत नाहीं; त्यामुळें नवीन आचरण सामाजिक दुःखास मात्र कारण होतें; व त्यास तोलून धरणारें सुख केव्हां येणार व येईल किंवा नाहीं त्याचा संदेहच राहतो. ह्मणून व्यक्तीच्या आयुष्यमर्यादेंत जी दूरदृष्टि तीच समाजाच्या आयुष्यांतही दूरदृष्टि असें ह्मणतां येत नाहीं. अलीकडील तीस वर्षांचा सुधारणेचा इतिहासच या गोष्टीची साक्ष देतो. रूढ मनोदेवता ही समाजाची खरी दूरदृष्टि होय. व्यक्तींच्यासंबंधानें जी दूरदृष्टि ती समाजास लागू केली तर अल्पदृष्टि होय. मनोदेवतेचें सामाजिक अनुभवांनीं हळू हळू रूपांतर होत असतें; समाजाच्या शाश्वतीस तें मात्र कारण होतें. व्यक्तींचें उद्दाम स्वैर वर्तन व त्यांचें अनुकरण करणारांचा अविचार यांपासून समाजावर होणारा परिणाम कधींच इष्ट नसतो.

---

## भाग ४२ वा.

### कनिष्ठ हिंदुजातींचीं कर्तव्यें.

२९४. येथपर्यंत जो विचार केला त्यांत अतिरिक्त विद्याभ्यासंग, पौरीभवन, विषयासक्ति आणि धर्मनाश या चार प्रमुख कारणांनीं वरिष्ठ जाति कशा विनाशमार्गास लागल्या आहेत हें दाखविलें. फ्रा-

न्सँमध्यें याच कारणांनीं संतति कमी होत जाऊन लोकसंख्या वाढे- नाशी झाली आहे व ती पुढें कमी होत जाणार अशी धास्ती पडून त्या देशांतील लोक उद्विग्न झालेले आहेत. सर्वच सुधारल्या राष्ट्रांवर हा असा परिणाम कमी अधिक वेगानें होत आहे. लोकसंख्या कमी व दुर्बळ झाल्यानें राजकीय सुस्थितीस धक्का बसतो व उत्कृष्ट मा- णसें उत्पन्न होण्यास जागा कमी राहतो, याकरितां हें संकट टाळ- ण्याचा सर्व राष्ट्रांचा प्रयत्न आहे असें ह्मटल्यास चालेल. परंतु जीं राष्ट्रें स्वतंत्र आहेत तीं आपल्या संकटाचें निवारण योग्य उपाय यो- जून करूं शकतील; परंतु जे समाज राजकीय रीत्या परतंत्र झाले आहेत, त्यांस आपल्या संकटांतून मुक्त होण्याचा मार्ग न सांपड- ल्यास नष्ट होणेंच अवश्य आहे.

२९५. विद्येकरितां जे अतिरिक्त प्रयत्न पुरुष करितात तेच अ- द्यापि स्त्रियांच्या मागें लागले नाहींत ही एक समाधानकारक स्थिति आहे असें ह्मणतां येईल. परंतु बापाच्या क्षीणतेचा परिणाम त्याच्या केवळ मुलांवर होतो, मुलींवर होत नाहीं, असें थोडेंच आहे ? मुलगे व मुली दोहोंवरही सारखाच होतो.* ज्याप्रमाणें मुलाची वाढ अ- काळीं संपून तो उंचीनें व रुंदीनें व तसाच पौरुषचिन्हांनीं बापा- पेक्षां कमी पडतो, त्याप्रमाणें मुलींवरही हेच सर्व परिणाम घडतात. पूर्वींच्या पिढींतील स्त्रीपुरुषांस विचारलें असतां स्त्रीच्या ऋतुप्राप्तीचें त्यांच्या वेळचें वय चवदापासून सोळा वर्षांच्या दरम्यानचें असे, असें ते सांगतात. हल्लीं वरिष्ठ जातींत बारा तेरा वर्षांचे मुलींस ऋतु- प्राप्ति होते, हें प्रसिद्ध आहे. या वयांत त्यांचें शरीर भरलेलें नसतें व मातृत्वाचीं विशेष कार्यें करणारे अवयव फारच अपूर्ण असतात.

---

* Neither do we affirm that *education* is the sole factor which reduces the birth-rate, as this is only one of the factors, which combined with *material case, less fervid religious sentiments* and *an ardent desire to attain a higher and better material standard* form an aggregate of intellectual and moral qualities which are little favourable to a high birth-rate. M. LEROY-BEAULIEU : *Influence of Civilization on the movement of population.*

* पृष्ठ ३७१ मध्यें दिलेल्या इंग्रजी उताऱ्याचीं शेवटचीं वाक्यें पहा.

सारांश हा कीं ज्याप्रमाणें तिकडे मुलगे पौरुषचिन्हहीन राहून त्यांची वाढ खुंटते, त्याप्रमाणेंच इकडे मुलीही मातृत्वचिन्हहीन राहून त्यांचीही वाढ खुंटते. **पितृदोषानें उभयविध संततींत** हीं जीं **ऱ्हासाचीं चिन्हें उत्पन्न होतात** तीं सामान्य उपायांनीं दूर होण्यासारखीं नाहींत. ह्मणजे, मुलें विद्याभ्यासंगांत असतां त्यांकडून खूप अंगमहिनत करविली, त्यांस पुष्कळ दिवस ब्रह्मचर्य पाळायास लाविलें, किंवा त्यांस मांसाहारी केलें, तथापि त्यांमध्यें अवतरलेली ही न्यूनता जाणें नाहीं. या सर्व उपायांचा मुलांसच लवकर कंटाळा येईल. तसेंच मुलींसही पुष्कळ दिवस ब्रह्मचर्य पाळायास लावलें व त्या अंगानें भराव्या ह्मणून त्यांस पौष्टिक पदार्थ चारले, व त्यांचीं मनें विषयसुखाकडे वळूं नयेत ह्मणून त्यांच्यामागें शाळेचे अभ्यास लावले, तर या उपायांपासून अधिकच अनिष्ट परिणाम होतील. त्यांचा स्त्रियांसच वीट येईल; त्यांचीं मनें चंचल होतील; कदाचित् त्यांचें शरीर मेद चढून स्थूल झालें तर तेंही मातृत्व येण्यास बाधक होईल. या उपायांनीं स्त्रियांस अल्पवयीं मृत्यु येण्याचा किंवा त्या वंध्या होण्याचा संभव आहे. असले लटपटपंचीचे उपाय संतति सुधारण्याचे कामीं बिलकुल येणार नाहींत. ज्याप्रमाणें एक व्यक्तिविषयक आरोग्यशास्त्र आहे, त्याप्रमाणें समाजविषयक निराळें आरोग्यशास्त्र आहे. सामाजिक न्यूनता दूर करण्याकरितां त्या शास्त्राचे आधारें चाललें पाहिजे. त्या शास्त्राचे कांहीं सिद्धांत येणेंप्रमाणें आहेत*:—

---

* The whole question of the education of women seems to be governed by the following principles :—

1st. Woman is physiologically weaker than man ; she has but a small reserve of energy to make up for the considerable expenditure entailed by brain work carried beyond certain limits. 2nd. The generative function occupies a far more important place in the female than in the male organism. Now this function, according to all physiologists, is antagonistic to brain-expenditure ; the disequilibration produced in the woman by intellectual work will therefore be necessarily greater than in man. 3rd. The consequences to the race of this disequilibration are much more serious in the case of the woman than in the case of the man. The life of woman, generally sedentary and under more or less unhealthy conditions, gives no time for recupera-

२९६. स्त्रीचें सामर्थ्य पुरुषापेक्षां कमी आहे. विद्याभ्यासंगांत खर्च करण्यास पुरेल इतकी सामर्थ्याची उत्पत्ति होण्यास तिच्या श-

---

tion to a constitution exhausted by an irrational education, whereas in the case of man recuperation may take place ; on the other hand the mother's health is of much more importance to the child than the health of the father. The man's expenditure in paternity is insignificant compared to the woman's ; the latter needs a considerable reserve of physical and moral energy during gestation, maternity and afterwards during the early education of the child. The mothers of Bacon and Goethe, though both very remarkable women, could not have written either the *Novum Organum* or *Faust* ; but if they had ever so little weakened their generative powers by excessive intellectual expenditure, they would not have had a Bacon or a Goethe as a son. *If during life parents expend too much of the energy they have drawn from their environment, so much the less will be left for their children. ......High authorities are of opinion that the more refined a woman's education becomes, the weaker her children will be.* According to Spencer " The deficiency of reproductive power among them ( girls of the upper classes ) may be reasonably attributed to the over-taxing of their brains—an overtaxing which produces a serious reaction on the physique. This diminution of reproductive power is not only shown by the greater frequency of absolute sterility, nor is it only shown in the earlier cessation of child-bearing ; but it is also shown in the very frequent inability of such women to suckle their infants. In its full sense the reproductive power means the power to bear a well-developed infant, and to supply it with the natural food for the natural period. *Most of the* flat-chested *girls who* survive *their high pressure education are incompetent to do this.* ..................................

Mr. Clark, an American, concludes that if this goes on for half a century it needs no prophet to predict, from the laws of heredity " that the mothers of our future generations will have to be brought from beyond the Atlantic. " By heredity therefore a kind Of *retrograde selection* is produced, which is disastrous in its consequences ; for the young girls of the educated classes, who might fairly be expected to raise the level of future generations are, owing to their education, either quite incapable of becoming mothers or bring into the world puny beings and thus leave to less cultivated but more robust women the care of perpetuating the human race" ........................

रीररचनेंत योजना केलेली नाहीं. संतति उत्तम हवी असेल तर विद्येचें प्रमाण फारच कमी केलें पाहिजे. संततीच्या उत्पत्तीचे कामीं स्त्रियांच्या सामर्थ्याचा फार मोठा खर्च होतो. हा पुरुषाचे मागें मुळींच नाहीं ह्मटल्यास चालेल. मेंदूचें काम आणि संतति उत्पन्न करण्याचें काम, हीं सर्वथैव परस्पर विरुद्ध आहेत. स्त्रीस विद्यामार्गास लावण्याचे परिणाम समाजास अहितकारी आहेत. जर **बेकन** किंवा **न्यूटन** यांच्या आयांस विदुषी करण्याचा यत्किंचित् प्रयत्न झाला असता, तर **बेकन** व **न्यूटन** हे त्यांच्या पोटीं जन्मले नसते. उत्तम संततीच्या उत्पत्तीस ज्या गोष्टी आवश्यक आहेत त्या अशा कीं (१) पूर्णवाढीचा गर्भ धारण करण्याचें सामर्थ्य स्त्रीच्या अंगीं पाहिजे, (२) मूल जन्मल्यावर योग्य काळपर्यंत त्यास पाजण्याची शक्ति राहिली पाहिजे, (३) व या कर्तव्यांनीं स्त्रीस पुढें दुर्बळता येतां कामां नये. या कर्तव्यांस लागणारे सर्व अवयव थोडेबहुत विकृत व्हावे, हा मर्यादेचे बाहेर स्त्रीशिक्षण गेल्याचा परिणाम आहे. ही मर्यादा ठरवायाची कशी ? मुलीची काळजी ऋतुप्राप्तीचे आधीं फार घ्यावी लागते, ती घेतलेली असली तरच पुढें आणखी जी काळजी घ्यावी ती

---

"Out of the many elements uniting in varying proportions to produce in a man's breast the complex emotion we call love, the strongest are those produced by physical attractions; the next in order of strength are those produced by moral attractions; the weakest are those produced by intellectual attractions; and even these are dependent less on acquired knowledge than on natural faculty—quickness, wit, insight......One of Nature's ends, or rather her supreme end, is the welfare of posterity; further, that in so far as posterity are concerned, a cultivated intelligence based on a bad *physique* is of little worth, since its descendants will die out in a generation or two; and conversely, that a good *physique*, however poor the accompanying mental endowments, is worth preserving, because through future generations the mental endowments may be indefinitely developed ......It is folly to persist in a system which undermines a girl's constitution that it may load her memory" (Spencer.)

GUYAU: *Education and Heredity.*

See also Chs. VIII and IX. Kidd's *Social Evolutions.*

उपयोगीं पडते. मुलींची शारीरिक व वाढ अस्खलित होत आहे इकडे लक्ष प्रथम ठेवावें, त्यांचें अंग प्रमाणशीर भरून तोंडावर तजेला येत आहे व डोळ्यांवरून प्रसन्न वृत्ति दिसत आहे, हें नंतर पहावें; व अखेरीस धर्म व नीति याविषयींच्या त्यांच्या मनोवृत्ति बलवत्तर होत आहेत कीं नाहीं इकडे लक्ष द्यावें. हें सर्व साधून जी विद्या देतां येईल ती द्यावी; तिचा मुख्य उद्देश* आपल्या थोर मनोवृत्तींची प्रेरणा मुलांमध्यें करितां यावी, एवढाच असला तर पुरे आहे. बाकी व्यावहारिक शिक्षण कुटुंबांत आपोआप मिळतें, व पुरुषास स्त्रीनें संसारांत साहाय्यकारी व्हावें हा उद्देश ज्या नव्या कुटुंबांत स्त्री जाऊन पडते त्याच्या व नवऱ्याच्या सहवासानें सिद्ध होतो. मुलींच्या संगोपनांत स्त्रीशिक्षण हें अगदीं कनिष्ट प्रतीचें गणलें आहे; व ज्या समाजांत ऱ्हासाचीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत तेथें तर तें बिलकुल बंद केलें पाहिजे. स्त्रियांचेंच केवळ नव्हे, तर पुरुषांचेंही शिक्षण अशा समाजांत अत्यंत नियमित मर्यादेंत आणिलें पाहिजे. ऱ्हासास लागलेलीं कुटुंबें शहरांत व चैनींत ठेवणें हेंच अनिष्ट आहे; त्यांस खेड्यांत स्थायिक केलें पाहिजे. तेथें सृष्टीचे पाठीवर स्वस्थ पडून आरोग्य आणि बुद्धि यांची प्राप्ति त्यांनीं करून घ्यावी.

२९७. याप्रमाणें हे सामाजिक आरोग्यशास्त्राचे सिद्धांत असतां विद्वान् लोक संतति चांगली होण्यास स्त्रिया सुशिक्षित पाहिजेत असें जेव्हां ह्मणतात तेव्हां त्यांच्या भयंकर अज्ञानास काय ह्मणावें? त्यांस आपल्या व आपल्या मित्रांच्या व आपल्या देशाच्या कुटुंबांत प्रत्यक्ष काय चाललें आहे, जगभर काय चाललें आहे, तें पहाण्याची

---

* Woman represents in human psychology the being in whom reside all the most energetic and powerful sentiments—pity, affection, 'altruism", devotion ; she ought to be the embodiment of tenderness, the sister of mercy to mankind ..........................................
On the mother in particular rests the task of developing the heart. Maternal religion is the most inoffensive and most useful of religions. The tender reverence of the child is an act of piety......The mother's heart is the child's conscience ; *that heart should therefore be the human conscience in miniature.*

GUYAU : *Education and Heredity.*

इच्छा नाहीं किंवा इच्छा असतां विलक्षण अंधत्वानें तें दिसत नाहीं असें ह्मटलें पाहिजे. 'आपली संतति अशी मंद कां! संतति उत्कृष्ट होण्यास माता उत्कृष्ट शिकलेल्या पाहिजेत!' असें जे लोक मनांत समजत आहेत त्यांनीं डोळे उघडून भोंवतालीं पहावें. सर्व युरोपांत लोकसंख्या उत्कृष्ट स्थितींत राखण्याचें काम अडाणी शेतकऱ्यांचें आहे असें समजतात*. एका विद्वान् अमेरिकनचें मत असें आहे कीं अमेरिकेंत स्त्रीशिक्षणास ऊत आला आहे, त्यामुळें सुमारें पन्नास वर्षांत अमेरिकन स्त्रिया वंध्या होतील किंवा चांगली संतति उत्पन्न करण्यास नालायख होतील; व स्त्रीशिक्षणाचें बंड न मोडल्यास पुढील पिढ्यांच्या आया, अटलांटिक महासागराच्या पलीकडून, युरोपांतील मागसलेल्या प्रांतांतून आणाव्या लागतील. आतां शास्त्रज्ञांचें असें मत आहे कीं कोणत्याहि वर्गांतील पुरुषानें खालच्या वर्गांतील स्त्रीशीं विवाह केला तर त्यांत उत्क्रांतीची पिछेहाट होते. ती बहुधा मनोवृत्तींच्या सूक्ष्मतेंत व थोरवींत दृष्टीस पडते, तेव्हां मध्यें ऱ्हास न पावतां जे वर्ग क्रमानें अधिकाधिक सुसंस्कृत होत आले, त्यांनीं समान उत्क्रांतीच्या कुटुंबाशीं शरीरसंबंध करणें हें उचित आहे. लोकसंख्या वाढविण्याचें किंवा राखण्याचें कर्तव्य वरिष्ठ वर्गांत गौण होतें. समाज वृक्षाचीं उत्कृष्ट फळें ह्मणजे ते वर्ग होत.

२९८. वरिष्ठ जातींस आपलें संरक्षण करणें असेल तर त्यांनीं विद्याव्यासंगांतून मुलें काढलीं पाहिजेत, चैनबाजी सोडून साधेपणा धरला पाहिजे, खेड्यापाड्यांत राहून धर्मशील झालें पाहिजे; त्यांचा धर्म कोणताही असला तरी चालेल, त्यायोगें समाजकंटक उत्पन्न न व्हावे व सदाचार सुटूं नये एवढें कार्य झालें ह्मणजे पुरे आहे. वरिष्ठ जातींनीं आपला एक भाग देशसेवकरितां विद्याव्यासंगांत ठेवावा; देशसेवेकरितां हा त्यांचा स्वार्थत्यागाचा वांटा त्यांनीं देणें अवश्यच आहे. बाकी देशसेवेच्या कार्यास लागणारीं माणसें कोठून येणार हा प्रश्न येथें येतो. व ह्मणून वरिष्ठ आणि कनिष्ठ जातीं-

---

* पृष्ठें ३६१-२-९ मध्यें दिलेले इंग्रजी उतारे पहा.

चा संबंध सांप्रतकाळीं कसा असावा याविषयीं थोडा विचार करणें अवश्य होतें.

इंग्रजीविद्येची अधाशीपणानें प्राप्ति करून घेण्याच्या प्रयत्नानें वरिष्ठ जातीयांवर जो दुष्परिणाम घडतो तोच कुणब्यांवरही घडतो असें प्रत्यक्ष उदाहरणें पाहिलीं ह्मणजे दिसतें. तेही अशक्त होतात; त्यांची संतति कुचकामाची होते; व त्यांचीं कुळें ऱ्हासास लागतात. कुणब्यांस जलदीनें विद्यादान देण्याचा विशेष प्रयत्न एके ठिकाणीं हल्लीं करण्यांत येत आहे, त्यांचीं फळें पाहिलीं ह्मणजे ब्राह्मणांप्रमाणेंच कुणब्यांच्या बुद्धीस वैक्लव्य येतें व मध्यम वयांत बुद्धीचीं कार्यें करण्यास तेही नालायख होतात, असें दिसतें. ही अतिरिक्त विद्या त्यांस हिंदुस्थानांत द्या किंवा विलायतेंत नेऊन द्या, परिणाम सारखाच घडतो.

ही गोष्ट ध्यानांत आणिली ह्मणजे वरिष्ठ जातींच्या अतिरिक्त विद्यासेवनाचा परिणाम कनिष्ठ जातींचे संबंधानें कसा झाला आहे तो लक्षांत येतो. वरिष्ठ जातींनीं विद्येच्या कामीं आपण पुढें होऊन कनिष्ठ जातींचा ऱ्हासापासून बचाव केला आहे. ब्राह्मणांच्या छत्राखालीं कनिष्ठ जाति सुरक्षित राहिल्या आहेत. ब्राह्मणादि वरिष्ठ जाति नाहींशा होईपर्यंत कनिष्ठ जातींस विद्येचा जड धोंडा माथ्यावर घेऊन आयुष्यक्रमण करण्याचें कारण नाहीं. विद्येच्या या अकल्पित भारास हळूहळू तयार होण्यास कनिष्ठ जातींस अवधि मिळत आहे. वास्तविकपणें हा त्यांचा फायदा आहे. परंतु तो प्राप्त करून घेण्याकरितां कनिष्ठ जातींनीं ब्राह्मणादि वरिष्ठ वर्ग लुप्त होण्याची वाट पहात बसणें योग्य नाहीं. वरिष्ठ आणि कनिष्ठ जातींची सुसंगति आज दहा हजार वर्षांची आहे; ती उभयतांनीं कोणत्याही ऐहिक लाभाकरितां सोडूं नये हेंच, उभयतांच्या मनुष्यतेस शोभणारें आहे.

२९९. ब्राह्मणादि वरिष्ठ जातींच्या लोकांचें हें एक दुर्भाग्य समजायाचें कीं ते जीं जीं परोपकाराचीं कृत्यें निःस्पृहपणें करितात, तीं तीं अनुदार लोकांच्या विचारांत त्यांच्या स्वार्थबुद्धीशीं जोडलीं

जातात; व त्यामुळें ते द्वेषास पात्र होतात. समाजांतील घडामोडींचें विवेचन उत्क्रांतिशास्त्राअन्वयें करण्याची अद्यापि पद्धति सुरू झाली नाहीं. काल्पनिक व ऐतिहासिक रीत्या तें विवेचन करूं लागलें ह्मणजे सामाजिक घडामोडींपासून पाहिजे त्यास पाहिजे तें ठरवितां येतें. या प्रकारें, फारसा खोल विचार न करितां, परकीयांनीं ब्राह्मणांस सर्वस्वी स्वार्थी ठरविलें आहे; व कनिष्ठ जातींची आजपावेतों ब्राह्मणांनीं हानि केली असें ते प्रतिपादीत आहेत. कनिष्ठ जातींस हें त्यांचें प्रतिपादन साहजिकपणें खरें वाटतें व त्या जाति ब्राह्मणांचा द्वेष करूं लागतात. त्यांत त्यांचा दोष नाहीं.

परंतु एतद्देशीय मोठा थोरला शूद्र समाज ज्या सुधारल्या स्थितीस आज आलेला आहे, युरोपीयांच्या अमेरिकेंतील, आफ्रिकेंतील, आस्ट्रेलियांतील वसाहतींत जे मूळचे लोक होते किंवा आहेत त्यांहून एतद्देशीय शूद्र पुष्कळ श्रेष्ठ आहेत, असें जें निर्विवादपणें दिसतें, त्याचें कारण काय ? शूद्रांची ही सुधारलेली श्रेष्ठ स्थिति त्यांस ब्राह्मणांच्या प्रयत्नांनीं आली कीं दुसऱ्या कोणत्याही कारणानें आली, याचा कोणीं विचार केला आहे काय ? इंग्रजी राज्याचा इतिहास कांहीं वर्षांनीं कोणी लिहूं लागल्यास, व आजकालचें सर्व वाङ्मय वाचून त्यानें सिद्धांत ठरविल्यास, तो असें स्पष्ट दाखवूं शकेल कीं, ब्राह्मणांहूनही वरिष्ठ अशी जी इंग्रजांची जात हल्लीं या देशांत राज्य करीत आहे तिच्या स्वार्थीपणापुढें, जुलमापुढें व अन्यायापुढें वैदिक ब्राह्मणांचे सर्व अपराध फिक्के पडतात. परंतु याच गोष्टीचा उत्क्रांतिशास्त्राअन्वयें जो विचार करील तो असें दाखवील कीं ज्यांनीं रानटी प्रजेस उत्कर्षास आणण्याचें मोठ्या जबाबदारीचें काम हातीं घेतलें, त्यांस त्या कामीं आवेश व सिद्धि येण्यास वरच्यासारखीं साधनें अवश्य योजावीं लागतात. या दृष्टीनें विचार करणारानें ऐतिहासिक काळाचे योग्य विभाग केले पाहिजेत, व प्रत्येक काळविभागाच्या आरंभीं कनिष्ठ जातींची कशी स्थिति होती व अखेरीं कशी होती हें ठरवीत गेलें पाहिजे. जर प्रत्येक काळविभागांत कनिष्ठ जातींची स्थिति अधिकाधिक सुधारलेली दिसली, तर वरिष्ठ जातींनीं आपलें काम चांगलें बजावलें असें ठरतें. अशा दृष्टीनें पाहूं लागलें

ह्मणजे असें स्पष्ट दिसतें कीं भिक्षुकवृत्ति अंगीकारणाऱ्या प्राचीन व अर्वाचीन आर्यब्राह्मणांनीं कनिष्ठ जातींची स्थिति उत्तरोत्तर सुधारून त्यांवर इतके उपकार केले आहेत कीं तेवढे मुसलमान राजांनीं किंवा इंग्रजी अधिकाऱ्यांनीं केलेले नाहींत; परधर्मीयांस तेवढे कदापि करितां यावयाचे नाहींत. ख्रिस्तीधर्माच्या आरंभापासून फ्रान्समधील राज्य-क्रांतीपर्यंत ख्रिस्ती वरिष्ठ जातींनीं ख्रिस्ती कनिष्ठ जातींची जेवढी सु-धारणा केली, तीपेक्षां त्याच तेवढ्या शतकांत ब्राह्मणादि वरिष्ठ हिंदु जातींनीं कनिष्ठ हिंदु जातींची शतपट अधिक सुधारणा केली, शतपट अधिक मनुष्यतेचा गुण प्रकट केला—असें कोणीही निःपक्षपाती इति-हासकार कबूल करील. उपकार किंवा अनुपकार ज्यास ह्मणायाचें तो समाजशास्त्रांत जीवनार्थ कलहांत होणाऱ्या अखेरच्या चांगल्या किंवा वाईट परिणामांवरून ठरविला जातो. या प्रश्नांत जात्यभिमानाचें काय काम आहे ?

३००. मुसलमानी राज्याचा जेथें पक्का अंमल बसला होता तेथें स्वधर्मपालनामुळें ब्राह्मणांचें अपरिमित नुकसान झालेलें दिसतें. दैत्यकाळापासून मुसलमानी राज्याच्या अखेरीपर्यंत परधर्मीयांची अशी समजूत होती कीं, ब्राह्मणांचें श्रेष्ठत्व कमी केलें ह्मणजे हिंदु लोकांचा धर्म बुडविला. या समजुतीमुळें सर्व हिंदुप्रजेमध्यें परधर्मीय राज्यकर्त्यांस मुख्यत्वेंकरून ब्राह्मण पाहिला कीं तो शत्रुसमान वाटे. हिंदुधर्माचें संरक्षण ह्मणजे गोब्राह्मणांचा प्रतिपाळ, हिंदुधर्माचा वि-ध्वंस ह्मणजे गोब्राह्मणांचा नाश—अशीं पूर्वीं तत्त्वें ठरून गेलीं होतीं. परकीयांच्या दृष्टीनें ब्राह्मणांस पूर्वकाळीं जी अशी अनिष्ट स्थिति आली ती त्यांस प्रजेच्या कैवारानें आली कीं स्वतःच्या स्वार्थामुळें आली, याचा शांतपणें कोणी कनिष्ठ जातीय गृहस्थ विचार करीत नाहीं हेंच आश्चर्य आहे. राजाश्रयास पूर्णपणें मुकून, हाल व दा-रिद्र्य अनुभवीत राहिल्यानें कित्येक प्रांतांत ब्राह्मण हे वरिष्ठ वर्गाचे होते ते कनिष्ठ वर्गाचे होऊन बसले आहेत. हा परिणाम पाहून असें अनुमान होतें कीं वरिष्ठ जातीस योग्य अशीं कर्तव्यें जे ब्राह्मण निर्धारानें करीत राहिले ते निर्वंश झाले; किंवा देशांतरीं गेले. व जे स्ववृत्ति सोडून व्यापार, शेतकी, हलकी सेवा किंवा भिक्षेचा धंदा

करीत राहिले ते मात्र हल्लीं शिल्लक आहेत. महाराष्ट्राच्या लोकसंख्येंत ब्राह्मणांचें जें प्रमाण आहे, त्याहून गुजराथ, सिंध, वगैरे अनेक प्रांतांत तें फार कमी आहे हें पाहून, त्या प्रांतांतील वरिष्ठ प्रतीचे बहुतेक ब्राह्मण निर्वंश झाले व मठ्ठ ब्राह्मण मात्र अवशेष राहिले या तर्कास बळकटी येते.

३०१. हल्लीं तरी कशी चमत्कारिक स्थिति आहे पहा. वरिष्ठ जातींचे लोक कनिष्ठ जातींचे खरे कैवारी असतां कनिष्ठ जातींस त्यांच्या सेवेचें महत्त्व न समजून त्या त्यांचा मत्सर आणि द्वेष करीत आहेत. हा असा प्रकार एकीकडे, व दुसरीकडे त्याच त्यांच्या सेवेचें महत्त्व ओळखून शहाण्या राज्यकर्त्यांस ब्राह्मणादि वरिष्ठ वर्गांचा फार राग येत आहे. सारांश, ब्राह्मणांनीं देशसेवा आरंभून स्वार्थत्यागाचें जें कुलव्रत चालविलें आहे, व स्वजातीचा ऱ्हास झाला तरी बेहत्तर आहे, त्या देशसेवेंत हार खावयाची नाहीं असा जो त्यांचा निग्रह दिसतो, त्यामुळें ' इतो भ्रष्टस्ततो भ्रष्टः ' असा अकल्पित प्रसंग त्यांवर येऊन गुदरला आहे. राज्यकर्त्यांचा प्रकोप व कनिष्ठ जातींकडून द्वेष—या तीव्र धारेच्या कैचींत वरिष्ठ जाति सांपडून त्यांच्या चालू ऱ्हासाचा वेग दुणावतो कीं काय अशी हल्लीं मोठी भीति आहे. या कैचींत सर्व उत्कृष्ट कुटुंबांचे गळे सांपडून तीं नष्ट होईपर्यंत वाट पहात राहिलें, तर पुढें वरिष्ठ जातींतील निवडक मठ्ठ लोक ( आचारी, पाणके, वगैरे ) मात्र पुढील पिढ्यांत आमचे प्रतिनिधि होऊन राहतील! मग वरिष्ठ जातींची कनिष्ठ जात होऊन सर्वांच्या, व विशेषतः राज्यकर्त्यांच्या, अनुकंपेस व उत्तेजनास ती पात्र होईल! परंतु अशी वाट पहात राहणें यांत केवळ आत्मघात आहे. असो. या गोष्टींवरून असें लक्षांत येईल, कीं वरिष्ठ जातींच्या ऱ्हासास जशीं अंतःस्थ कारणें आहेत तशीं कांहीं बाह्य कारणेंही आहेत. ' क्षते प्रहारा निपतंत्यवश्यम् । ' हा न्याय वरिष्ठ जातींच्या तूर्तच्या स्थितीस लागू आहे. या स्थितींतून मुक्त होण्याची जर कांहीं शक्यता असली तर ती आतांच आहे. थोडी देखील वाट पहाण्याची सोय नाहीं. जे भगीरथ प्रयत्न आरंभायाचे ते त्व-

रित आरंभिले पाहिजेत. प्रत्येक कुटुंबांतील कर्त्या पुरुषानें इकडे लक्ष दिलें पाहिजे.

३०२. कनिष्ठ जातींकडून द्वेष आणि मत्सर! राज्यकर्त्यांचा प्रकोप! या चित्तवृत्तींचा निराळ्या तऱ्हेनें विचार केला तर एक समाधानकारक सिद्धांत ठरतो. या चित्तवृत्ति हिंदु समाजांत उत्पन्न होऊन वृद्धिंगत होत आहेत. त्यांस हृदयांत जागा द्यावयाची नाहीं असें सुज्ञ अधिकाऱ्यांनीं व कनिष्ठ जातीच्या विचारी पुरुषांनीं पुष्कळ मनांत आणिलें, तरी त्यांचें बळ कमी होत नाहीं; त्यांची साहजिक स्फूर्ति होते. यावरून या चित्तवृत्तींच्या द्वारें कांहीं विशेष कार्यें वडावयाचीं आहेत व तीं हिंदु समाजास हितावह आहेत, असा उत्क्रांति-नियमानुसार किंवा ईश्वरी संकेतानुसार तर्क होतो. सामाजिक अन्यायाचें निवारण करणारीं व सर्व प्रजाविभागास स्थैर्य व शाश्वती आणणारीं अशीं तीं कार्यें असलीं पाहिजेत. नाहींतर अशा हीन चित्तवृत्ति इतक्या बळकटपणें समाजांत हल्लीं रूढ होण्याचें संभवत नाहीं.

थोडा खोल विचार केला तर असें लक्षांत येतें कीं, देशसेवेच्या आवेशांत ब्राह्मणादि वरिष्ठ वर्गांनीं विनाशाच्या मार्गास लागावें, ही गोष्ट हिंदु समाजास अनिष्ट आहे. व तसेंच उत्कृष्ट सामाजिक कर्तव्यांचा वांटा साराच वरिष्ठ जातींनीं घ्यावा, हा तूर्तच्या परिस्थितींत अन्याय आहे. वरिष्ठ वर्गाचें ऱ्हासापासून संरक्षण व्हावें व देशसेवेच्या कामीं लागणाऱ्या स्वार्थत्यागाची न्यायानें, ह्मणजे जातिजातींच्या लोकसंख्येच्या प्रमाणानें, वांटणी व्हावी,—ज्यांनीं बुद्धीचे अश्रांत परिश्रम केले त्यांनीं सामर्थ्य संचयाकरितां खेड्यांत परत जाऊन तेथें स्थायिक व्हावें व ज्यांनीं तसे श्रम केले नाहींत त्यांनीं आपला सांचलेला सामर्थ्याचा ठेवा शहरांत आणून तो खर्च करण्यास आरंभ करून बुद्धीचे परिश्रम अंगीकारावे—हीं विशेष कार्यें त्या चित्तवृत्तींच्या द्वारें व्हावयाचीं आहेत. याकरितांच त्यांस दिवसें दिवस जोर चढत आहे. त्या नाहींशा होण्यास समाजाची कशी स्थिति पाहिजे हें लक्षांत आणिलें ह्मणजे हींच त्यांचीं कार्यें, असें स्पष्ट होतें. सर्व जातींनीं देशसेवा आरंभिल्यावर कोणी कोणाचा

हेवा करील काय ? सर्वांनीं बुद्धिपरिश्रम वांटून घेतल्यावर कोणत्याही एका जातीस ऱ्हास पावण्याचें कारण राहील काय ? सर्व जातींचे लोक राजकीय हक्कांकरितां राज्यकर्त्यांकडे अर्ज घेऊन जाऊं लागले, ह्मणजे ते कोणत्याही एका जातीवर क्रुद्ध होतील काय ? समाजाचीं पारडीं खालवर झालीं आहेत, त्यांचें समतोलन व्हावें हा त्या चित्तवृत्तींचा समाजदृष्ट्या हितकारक परिणाम व्हावयाचा आहे असें मानिल्याखेरीज गत्यंतर नाहीं. ब्राह्मणादि वरिष्ठ वर्गांनीं आत्मसंरक्षणाच्या हेतूनें विद्याव्यासंगांतून आपलें अंग काढून घेण्यास आरंभ करावा; नवीन जोमाच्या शुद्रादि वर्गांनीं देशसेवेच्या हौसेनें विद्याभाराखालीं मस्तकें नम्र करण्यास पुढें यावें—यांतच सर्व समाजाचें हित आहे. हा बोध ब्राह्मणादिकांस वस्तुस्थितीवरून न होईल तर त्यांचें अंधत्व विलक्षणच समजलें पाहिजे.

याकरितां मराठे व कुणबी बांधवांस माझी अशी विनंति आहे कीं त्यांनीं ब्राह्मणादिकांचा जो द्वेष आरंभिला आहे तो यथार्थ आहे; त्याचें त्यांनीं उपकारक स्वरूप ध्यानांत आणावें. सरकारनें ब्राह्मणादिकांवर क्रुद्धदृष्टि करून जें कनिष्ठ जातींचें उत्तेजन चालविलें आहे तेंही व्यर्थ नाहीं. हिंदुसमाजाच्या दृष्टीनें पाहिलें असतां या दोन्हीं गोष्टी फायद्याच्याच आहेत. विनतोल झालेला समाज त्यांयोगें समतोल होईल. सरकारची वक्रदृष्टि आणि कनिष्ठ जातींचा मत्सरयुक्त द्वेष—हीं दोन्ही आणखी वेगानें वृद्धि पावल्याखेरीज वरिष्ठ वर्गांचे डोळे उघडणार नाहींत; त्यांस आत्मसंरक्षणाचे मार्ग दिसायाचे नाहींत; त्यांचें उत्कृष्ट बीज देशसेवेच्या पायीं चिरडून जाईल; व निकृष्ट बीज हीन स्थितींतून वर येण्याचें मुष्कील होईल. ब्राह्मणादि वरिष्ठ वर्गांच्या हिताकरितांच कनिष्ठ जातींमध्यें त्यांविषयीं द्वेष व मत्सर उत्पन्न झालेले आहेत, त्यांचें त्यांनीं योग्य रीतीनें संगोपन करणें हेंच उचित आहे.

२०२. बुद्धीची देणगी ईश्वरानें सर्वांस सारखी दिली आहे. अगदीं रानटी लोकांत व अगदीं सुधारल्या लोकांत मूळची बुद्धि सारखीच आहे. मूळ बुद्धींत जो भेद उत्पन्न होतो तो अनुचित आचरणानें मनुष्याचा जो ऱ्हास होतो त्याचें फळ होय. जगाच्या

इतिहासांत हें तत्त्व फार चांगल्या प्रकारें उदाहृत झालेलें आहे. ज्या राष्ट्रांच्या प्रगतीस प्रथम अनुकूल स्थिति प्राप्त झाली तीं प्रगतीच्या मार्गांत इतरांच्या पुढें गेलीं, व त्यांनीं आपल्या मतें इतरांस बुद्धिहीन व रानटी ठरविलें. **ईजिप्ट, असीरिया, पर्शिया,** वगैरे फार पुरातन राष्ट्रांनीं बुद्धिसामर्थ्याच्या उपयोगास ज्या काळीं आरंभ केला, त्याकाळीं युरोपीय राष्ट्रें सृष्टीच्या अंकावर निद्रित होतीं, त्यामुळें त्यांची त्या काळीं रानटी लोकांत गणना होत असे. परंतु बुद्धिवैभव, व्यापार व विषयोपभोग, यांची त्या पुरातन राष्ट्रांस क्रमानें इतकी गोडी लागली कीं शेतकीच्या मंद व कनिष्ठ गणिलेल्या धंद्यांत मूळच्यापैकीं फार थोडीं कुटुंबें राहिलीं. शहरें तुफान वाढलीं, खेडीं रोडावत चाललीं; मूळची सर्व ताजी बुद्धि शहरांत गेली; शहरांतील मंद ऱ्हास पावलेलीं माणसें खेड्यांत येऊं लागलीं. बुद्धीचा व आरोग्याचा पुरवठा खालून यावयाचा बंद झाला, वरतीं बुद्धिवैक्लव्यास सुरवात झाली.* त्यामुळें समाजास आपला तोल सावरेनासा झाला. त्यानंतर पूर्वीं जे लोक मतिमंद ठरविलेले होते त्यांपैकीं कांहींच्या प्रगतीस अनुकूल स्थिति आली. त्यांनीं त्या पुरातन राष्ट्रांचा विध्वंस मांडिला. त्यांच्या पश्चात् **ग्रीक** लोकांचा उदय झाला; त्यांस वैभव येत चाललें. त्यांनीं आपल्या बुद्धीस पूर्णावस्था आणण्यास आरंभ केला; ते खेडवळाचे शहरवासी बनूं लागले. **ईजिप्ट,** वगैरे राष्ट्रांच्या जुन्या सुधारणेच्या माथ्यावर ते आपली सुधारणा बांधूं लागले, त्यामुळें ती अधिक उंच गेली. परंतु क्रमानें मूळच्या सृष्टबुद्धीचा ठेवा संपत चालला, पूर्वींच्या बहुतेक कुटुंबांचें पौरीभवन होऊन गेलें. त्यामुळें त्यांचा समाज डळमळीत झाला; त्यांचा विनाशकाळ जवळ आला. त्यांच्या मागून **रोमन** लोक उदयास आले; त्यांनीं आपली सुधारणा **ग्रीक** सुधारणेच्या माथ्यावर चढविली. त्यांच्या मागून युरोपच्या उत्तरेकडील कांहीं रानटी जाती आल्या; त्यांच्या मागून **आंग्लो-साक्सन** लोक आले. रानटी स्थितींतून उदयास येण्याचा शेवटचा प्रयत्न **रशियाचा** आहे. आपल्या इकडे तसाच ज-

---

* पृष्ठ ३६८ मध्यें दिलेला इंग्रजी उतारा पहा.

**पान**चा आहे. ज्या लोकांनीं पृथ्वीच्या पाठीवर सर्वांपेक्षां अधिक झोंप काढिली, रानटी स्थितीचा अनुभव कधिक शतकें घेतला, त्यांनीं बुद्धि आणि आरोग्य यांचा मूळचा सांठा सर्वांहून अधिक काळपर्यंत नुसता जतन करून ठेविला; तो आतां ते खर्चायास काढीत आहेत; ह्मणून शेवटची उदयाची पाळी त्यांची आहे. जें राष्ट्र मागून येतें, त्यास पूर्वींच्या राष्ट्रांच्या बुद्धिवैभवाचीं फळें फुकट मिळतात; त्याचा उदय वेगानें होतो; त्याची सुधारणा अधिकच उंच जाते. या उच्च पदवीस चढल्यानंतर समाजाचें स्थैर्य राखण्याचे जे उपाय आहेत ते पूर्वीं सांगितलेच.(पृ.२६०) ज्या रानटी लोकांस युरोपीय राष्ट्रें विलयास नेत आहेत, त्यांच्या स्वातंत्र्यास धक्का न लागतां सुधारल्या राष्ट्रांशीं त्यांचें केवळ दळणवळण सुरू झालें असतें, तर त्यांची अभ्युदयाची पाळी युरोपीयांच्याही मागून येण्याचा संभव होता. परंतु बिचारे सृष्टीच्या कान्याकोपऱ्यांत पडून राहिलेले, इतरांशीं दळणवळण ठेवण्यास सृष्ट मार्ग नाहीं, अशा स्थितींत युरोपीयांच्या अमलाखालीं येऊन, अभ्युदयाची एक तरी पाळी यावयाची तीसही ते मुकले आहेत. युरोपीय सुधारणेचाच कांहीं दिवस उपभोग घेणें त्यांस प्राप्त झालें आहे.

३०४. याप्रमाणें सर्व इतिहासाचा विचार करितां असें दिसतें कीं जें राष्ट्र आपला बुद्धीचा ठेवा मागाहून काढतें त्यास फायदा होतो. हीच गोष्ट एका राष्ट्राच्या भिन्न वर्गांस लागू आहे. **इंग्लंड, फान्स, जर्मनी** वगैरे देशांतील राजे, धर्माधिकारी, सरदार, वगैरे वरिष्ठ वर्ग जेव्हां बुद्धिवैभव व ऐहिक सुखसंपत्ति यथेष्ट अनुभवीत होते, तेव्हां तेथील कनिष्ठ वर्ग सृष्टीच्या पाठीवर दारिद्र्य आणि जुलूम पत्करून निद्रित होते. त्यांनीं ख्रिस्ती शकाच्या सतराव्या किंवा अठराव्या शतकापर्यंत अज्ञान राहून जें बुद्धिसामर्थ्य सांचविलें तें आतां या एकोणिसावे शतकांत त्यांस कामास येत आहे. व हल्लीं जे तसेच अडाणी स्थितींत खेड्यापाड्यांत पडून आहेत, ते विसाव्या शतकांतील थोर पराक्रमी पुरुषांचे पूर्वज होत. हा असा सृष्टीचा क्रम आहे. सांप्रतची नीच स्थिति, दारिद्र्य, अज्ञान, इत्यादि, हीं सर्व भावी संततीच्या उत्कर्षाची सामुग्रीच आहे असें समजावें.

या न्यायानें पहातां कुणबी बांधवांस एवढेंच सांगायाचें आहे कीं जर त्यांची अभ्युदयाची पाळी ऋषिकाळाच्याही आधीं येऊन गेली असली, व त्या अभ्युदयाच्या उन्मादांत त्यांनीं आपल्या बुद्धीस वैक्लव्य आणिलें असलें, तर त्याबद्दल किंवा त्यांच्या उदयास्ताबद्दल जबाबदारी ब्राह्मणादि वर्गांकडे नाहीं. परंतु एतद्देशीय कनिष्ठ जातींचा पूर्वींच एकदा अभ्युदय होऊन गेला असें मानण्यास पुरावा नाहीं. तेव्हां त्यांच्या बुद्धीचा मूळचा ठेवा अजून त्यांजवळ जशाचा तसा आहे हें त्यांचें मोठें सुदैव समजलें पाहिजे. ऋषिकाळांत, किंवा त्यानंतरच्या आतांपर्यंतच्या काळांत, कनिष्ठ जाति अज्ञान राहिल्या, दरिद्री राहिल्या, खेड्यापाड्यांत भरून राहिल्या, या सर्व गोष्टींविषयीं त्यांनीं वरिष्ठ हेतु मनांत धरून ब्राह्मणांचा द्वेष करावा हें वाजवी आहे, परंतु अंतर्यामांत विषाद किंवा असमाधान वाळगूं नये. कारण इतर राष्ट्रांच्या बुद्धिवैभवाचा मुफत फायदा घेऊन विसाव्या शतकांत अभ्युदय उपभोगण्याची व पराक्रम दाखविण्याची ज्यांस संधी आली आहे, त्यांनीं आपणांस खरोखर धन्य मानिलें पाहिजे. त्यांच्या पूर्वजांनीं व स्वतः त्यांनीं जीं जीं दुःखें भोगिलीं असतील तीं तीं शतपट सुखरूपानें त्यांच्या संततींत फलोदयास येण्याचीं आतां स्पष्ट चिन्हें दिसत आहेत. या देशास ऊर्जित दशेस आणण्याचें श्रेय त्यांस मिळणार आहे.

३०९. बळ आणि आरोग्य यांची कनिष्ठ वर्गांत वाण नाहीं हें सांगायास नकोच. तसेंच ज्या वर्गांत तुकाराम कुणबी, नामदेव शिंपी, सांवता माळी, सजन कसायी, चोखामेळा महार, वगैरे अनेक वंद्य संतरत्नें होऊन गेलीं, त्या वर्गांच्या मेंदूंत बुद्धीचा ठेवा व हृदयांत उत्कृष्ट मनोवृत्ति गुप्तपणें आहेत हें निःसंदेह सिद्ध होतें. त्यांतूनही शेतकरी कुणब्यांचा वर्ग इतर सर्व कनिष्ठ वर्गांहून अधिक सुस्थितींत आहे. हिंदुस्थानांत अखेरपर्यंत टिकाव धरणारा वर्ग कोणता तें पाहूं गेल्यास तो कुणबी शेतकऱ्यांचा होय. कारण खेड्यापाड्यांत त्यांच्या कुटुंबांचीं मुळें खोल रुजलेलीं आहेत. या किल्लयांत राहून देशसेवेस लागणारीं पाहिजे तितकीं माणसें लहान मोठ्या शहरांत पाठविण्याची त्यांच्या अंगीं योग्यता आहे. आपल्या

सामाजिक इमारतीच्या पायापासून कळसापर्यंत सर्व भाग पाहिले तर, जेथें कुणबी मुळींच दिसत नाहींत असा भागच नाहीं. राजापासून रंकापर्यंत सर्व वर्गांत त्यांचा भरणा आहे. विद्याव्यासंगास कितीही लोक लागले तरी पुरविण्यास तयार अशी ही एक जात महाराष्ट्रांत आहे. देशसेवेच्या कामीं, ज्ञानार्जनाच्या कामीं, कलाकौशल्याच्या कामीं उदयास येऊन, लौकिक मिळवून कितीही कुटुंबें नष्ट झालीं, तरी मागाहून आणखी श्रेष्ठ पुरुषांची नवी जोरदार लाट पुढें पाठविण्यास ही एक जात मात्र समर्थ आहे. या जातीकडे जेव्हां बहुतेक लोकसेवेचें काम जाईल, तेव्हां महाराष्ट्र मंडळीच्या समाजाची डळमळीत स्थिति जाऊन त्यास शाश्वती येईल. प्रत्येक जातीनें आपल्या संख्येप्रमाणें देशसेवेचा भार उचललाच पाहिजे. व ब्राह्मणादि जातींनीं आपण विश्रांति घेण्याकरितां मागें राहून सर्वांस पुढें जाण्यास रस्ता करून दिला पाहिजे. जेव्हां प्रत्येक जातीचे लोक खेड्यांत व शहरांत, अंगमहिनतीच्या कामीं आणि बुद्धिपरिश्रमाच्या कामीं, कुटुंबसेवेंत आणि देशसेवेंत, सारखे समप्रमाणानें वांटले जातील, तेव्हां मात्र सर्व जातींस सारखा उदयकाळ येईल व शाश्वतकाळपर्यंत स्नेहानें आणि समाधानानें सर्व जाति राहू शकतील.

३०६. ही स्थैर्याची स्थिति स्वतःच्या जातीस व इतर सर्व जातींस आणण्याचा प्रयत्न ब्राह्मणांनीं उदारपणें आरंभिला तर त्यांत स्वार्थ आणि परमार्थ या उभयतांची उत्कृष्ट प्राप्ति त्यांस होणार आहे. हरळीची मुळी ह्मणून बिघा दोन बिघे जमीन कुणबी गृहस्थ जिवाप्रमाणें संरक्षण करितो, तीच हरळीची मुळी ब्राह्मणांनीं पैदा केली पाहिजे व खेड्यांत सुखवस्तु स्थायिक कुटुंबें स्थापण्यास आरंभ केला पाहिजे. विद्याव्यासंग कुणब्यांचे स्वाधीन करण्यांत, सरकारी नौकरींत कुणब्यांचा पुष्कळसा शिरकाव करून देण्यांत, समाजाचे नायक त्यांस बनविण्यांत, ब्राह्मणादि वर्गांचें तिळमात्र नुकसान नाहीं, वरिष्ठ वर्गांचा आत्यंतिक विनाश होण्याचीं जीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत, त्यांतून आत्मसंरक्षण करून घेण्यास व उदय, श्रेष्ठता आणि कर्तृत्व यांची शाश्वती मिळविण्यास दुसरा उपायच नाहीं, हें त्यांनीं पक्कें ध्यानांत ठेवावें. जो भागीरथ प्रयत्न करायाचा

तो हा उपाय त्वरित सिद्धीस नेण्याकरितां करावा हें आजचें वरिष्ठ जातींचें पाहिलें कर्तव्य आहे. सर्व सुधारणा, सर्व चैनबाजी, सर्व अपव्यय, व सर्व दुर्व्यसनें सोडून देऊन, या एका कर्तव्याच्या मागें त्यांनीं लागावें, असा माझा त्यांस उपदेश आहे. कांहीं थोडीं निवडक उत्कृष्ट माणसें बुद्धिपरिश्रम करण्याकडे देऊन, बाकीच्यांनीं आतां बुद्धीस विश्रांति द्यावी व सृष्टिमातेच्या अंकावर पडून राहून त्या मार्गानें सुखानुभव घ्यावा हेंच त्यांस सर्वस्वी हितावह होणार आहे. ”

---

## भाग ४३ वा.

### उपसंहार.

२०७. याप्रमाणें हें नारायणरावांचें भाषण ऐकिल्यावर, मी विचारांत गर्क होऊन बराच वेळ स्तब्ध राहिलों. त्यांस उत्तर काय द्यावें हें मला समजेना. भाऊसाहेबांनीं माझी ती स्थिति पाहून नारायणरावांस ह्मटलें: ‘ शाबास, नारायणराव, आज तुह्मीं एकाच भाषणानें एक नवा शिष्य बनविलात. ’ हें त्यांचें बोलणें ऐकून मीं उत्तर केलें,

“ होय, असें झालें आहे खरें. मी नारायणरावांचा फार आभारी आहें. माझ्या मनांत सुधारणेसंबंधाच्या कांहीं थोड्या अविचाराच्या कल्पना शिल्लक होत्या त्या आज नाहींशा झाल्या. तथापि नारायणरावांच्याच ह्मणण्यावरून मीं जे कित्येक सिद्धांत बांधले आआहेत, ते आतां सांगतों. ते तुह्मां उभयतांस कसे काय पसंत पडतात, तें आपण मला सांगा. वरिष्ठ जातींनीं खेड्यांत आपलीं पुष्कळशीं कुटुंबें स्थायिक करावीं, व तेथें ताजें बुद्धिसामर्थ्य संपादण्याचें काम आरंभावें, हें मला मान्य आहे. माझा स्वतःचाच हें असें करण्याचा आतां कायमचा निश्चय ठरला आहे. या इकडील मुलखांतच, कोठें उत्तम क्षेत्राचें ठिकाण पाहून तेथें स्थायिकपणें राहण्याचा माझा बेत झाला आहे. हें माझें कृत्य देशत्यागाप्रमाणें आहे; व तें जि-

वास अत्यंत दुःख देतें. परंतु पुढील संततीच्या संरक्षणाचा मला दुसरा उपायच दिसत नाहीं. महाराष्ट्रांत राहून खेड्यापाड्यांत देखील साधें आयुष्य घालविण्याचें कठीण झालें आहे. चैनबाजी पुनः मागें लागेल, खेडें सोडून पुनः शहरांत जावें अशी बुद्धि होईल, व कुळाची शाश्वती पुनः संदेहात्मक होईल, असें मला भय वाटत आहे, व ह्मणूनच मी देशत्यागासारख्या अत्यंत दुःखदायक कृत्यासही तयार झालों आहे.

३०८. परंतु आजच्या विवेचनावरून मला जो बोध झाला आहे तो असा कीं, समाजांत जीं आवश्यक कर्तव्यें असतात त्यांचे दोन भाग होतात. कर्तृत्ववृद्धीच्या द्वारें आणि संतानाच्या द्वारें समाजास स्थैर्य आणि शाश्वती आणायाची, हा कर्तव्यांचा एक भाग होय; व तो बहुजनसमाजास लागू आहे. या भागांत येणारीं कर्तव्यें धर्मांत, नीतींत व शिष्टाचारांत चांगलीं गोंवून देऊन त्यांकडे प्रबळ प्रवृत्ति करणें हें अवश्य आहे. दुसरा जो कर्तव्यांचा भाग उरतो तो समाजास उत्कर्षास चढविण्याचा, वैचित्र्य आणण्याचा व सात्त्विक आणि राजस गुणांस पूर्णता आणण्याचा. हा भाग वरिष्ठ वर्गांत मोडणाऱ्या का[illegible] [illegible]क्तींकडे सोंपाविणें जरूर आहे; व अत्यंत बुद्धिपरिश्रमानें म[illegible] साध्य होणारा आहे. ज्या व्यक्तींकडे तो सोंपवायाचा, त्या[illegible] [illegible]गें समाजाचीं स्थैर्यजनक व संतानहेतुक निर्बंधनें फारशीं राहतां कामां नये. युरोपीय समाज एकजातीय आहे, व त्यांत बुद्धीचीं कार्यें करून नंदनवनांत राहणारा एक वरिष्ठ वर्ग आहे. तसाच या देशांतही एक असला पाहिजे. आतां त्या वर्गांत ज्या व्यक्तींचा समावेश करायाचा त्या मात्र सर्व जातींतून निवडून आल्या पाहिजेत. एवढीच; या देशाच्या स्थितीस अनुलक्षून एक विशेष तजवीज केली ह्मणजे झालें.

३०९. या वरिष्ठ किंवा उत्कृष्ट वर्गांत अत्युच्च उत्क्रांतीच्या स्त्रिया व पुरुष, अशा उभयतांचाही अंतर्भाव होईल. त्यांस यथेष्ट व्यक्तिस्वातंत्र्य देण्यांत समाजाचा फायदाच होण्याचा संभव आहे. त्यांनीं नाना तऱ्हेच्या कल्पनांच्या मागें लागावें; अनेक प्रकारच्या नवीन विचारांत गुंग व्हावें. मनांतल्या मनांत अनेक प्रकारच्या

SURESH V. ...DE, Pune B 3514 PERSONAL LIBRARY

समाजरचना बनवाव्या; व साधेल त्या प्रमाणानें त्या स्वकल्पित नूतन व्यवस्थेखालीं स्वतः राहून पहावें. विवाह करावे वा न करावे. संततीस स्वतः पाळावें किंवा तिचें पालन इतरांकडे सोंपवावें. सामाजिक दुर्व्यसनांसंबंधी रूढ कल्पनांची सत्यासत्यता (सांप्रतच्या परिस्थितींत) स्वानुभवानें ठरवावी, किंवा एकाच गुणाची पराकाष्ठा करण्याची ईर्षा धरून इतर सर्व गुणदोषांस उदासीन व्हावें. जगभर हिंडावें किंवा एकाच शहरांत ऐषआराम करीत पडावें. सर्व समाजास किंवा सर्व जगास नवीन वळण लावण्याचा वाक्चातुर्यानें प्रयत्न आरंभावा, किंवा जगांत कांहीं अर्थ नाहीं असें समजून तसेंच प्रतिपादन करीत खेड्यापाड्यांत, अरण्यांत, जगाच्या एखाद्या कान्याकोपऱ्यांत पडून रहावें. याप्रमाणें बुद्धीच्या स्वैर वर्तनापासून अनेक प्रकारचें वैचित्र्य उत्पन्न व्हावें, यांत समाजाचा फायदाच होण्याचा संभव आहे. हीं परम बुद्धिमान् माणसें म्हटलीं ह्मणजे समाजाचीं पुष्पें होत; लोकहित आणि लोकरंजन हीं त्या पुष्पांच्या मागून येणारीं फळें होत. हीं पुष्पें जितकीं चित्रविचित्र असतील तितका समाज निरंतर सुप्रसन्न दिसेल. कारण कोणी मोठा रसिक पुरुष कवित्वानें अ[illegible] देईल; कोणी तेजस्वी पुरुष अंगांत आवेश भरवून देशक[illegible] चित्त ओढील; कोणी सात्त्विक पुरुष परमार्थाची महती [illegible]गून सद्धर्माकडे मनें वळवील, कोणी काल्पनिक समाजरचनेचें चित्र डोळ्यांपुढें धरून मलीन झालेल्या मनोवृत्ति उज्ज्वल करील; कोणी उद्योगधंद्यांत नवीन कल्पना काढील; कोणी ललितकलांस पूर्णत्वास आणून सहृदयता जागृत करील; याप्रमाणें कोणकोण कायकाय करील तें सांगणें अशक्य आहे. अशा सर्व व्यक्तींच्या एकंदर कृत्यांचा परिणाम असा होईल कीं समाज एखाद्या शेवाळलेल्या जलाशयाप्रमाणें स्थिर राहणार नाहीं. प्रतिदिवशीं त्यावरून निरनिराळ्या दिशेनें जोराचें वारें वहात राहील. त्यामुळें समाजरूपी जलाशयाचें पृष्ठ स्वच्छ व लखलखीत होईल—ह्मणजे मनोवृत्ति सुसंस्कृत व बुद्धि तीव्र अशी वरच्या वरच्या वर्गांस स्थिति येईल. आज कोणा एका दिशेनें वारें वाहून मोठें तुफान होईल; व सर्व जलाशयाचें पाणी त्याच्या

वेगानें समोर ढकललें जाऊन तें तट फोडून बाहेर पडतें कीं काय असा भास होईल. परंतु उद्यां वारें दुसऱ्या दिशेनें वाहूं लागेल, व पाणी विरुद्ध दिशेस लोटलें जाऊन तसाच भास उत्पन्न करील. याप्रमाणें पाण्याच्या लाटा कांहीं एका दिशेस निरंतर जातात, व दुसऱ्या कांहीं दीशांस मुळींच जात नाहींत, असा प्रकार घडायाचा नाहीं—सर्व दिशांकडे प्रवृत्ति व सर्व दिशांकडून परावृत्ति, अशा स्थितीचा परिणाम जागच्या जागीं सुस्थिति हा एवढाच होणारा आहे. हें सामान्य तत्व होय, व तें आपल्या समाजास लागू होण्याची वेळ जवळ येत चालली आहे. कारण ज्या वेळीं या आपल्या समाजांत बुद्धिपरिश्रम करणारे लोक फार थोडे होते, त्या वेळीं त्यांनीं व्यक्तिस्वातंत्र्यानें उद्दाम होऊन जें वर्तन केलें त्यामुळें समाज एखाद्या दुसऱ्या दिशेकडे वाहवतो, अस्थिर होतो, अशाश्वत होतो, असें भय वाटण्यास कारण होतें. परंतु ती स्थिति आतां उरली नाहीं. भिन्न व्यक्तींमध्यें पूर्वसंस्कारजन्य साहजिक स्वभाववैचित्र्य असतेंच; व अलीकडे अनेक भिन्न व्यक्ति बुद्धिपरिश्रम करून सामाजिक सुस्थितीसंबंधानें विचार करूं लागल्या असल्यामुळें, त्यांच्या विचारसरणी जुळेनाशा झाल्या आहेत, त्या परस्परविरुद्ध दिशेकडे आपोआप ओढ घेत आहेत, व प्रत्येक व्यक्ति संधी साधून आपल्या मागें सर्व समाज खेचून नेण्याचा प्रयत्न करीत आहे. परंतु सर्व व्यक्तींच्या एकंदर प्रयत्नांचा एकवटलेला परिणाम पाहूं गेल्यास, समाजाची स्थितिस्थापकता कायम रहावी, हाच होत आहे. हल्लींच्या सर्व हालचाली लक्षांत आणिल्यास असा संभव दिसतो कीं, हीं सर्व वरिष्ठ माणसें आपआपल्या आघातांनीं समाजाचें पात्र सर्व बाजूंनीं वाढवून विशाल करितील; समाजपृष्ठावर आपल्या खळबळीनें फेंस उत्पन्न करितील; आपल्या वेगानें थोडे तुषारकण उडवून नेतील, कांहीं थोड्या मनांचें बाष्पीभवन करितील. या त्यांच्या प्रयत्नांनीं कितीशी लोकसंख्या उड्डानगतीस लागण्याचा संभव आहे ? फारच थोडी. बुद्धिपरिश्रम करून, समाजांतील उत्कृष्ट माणसें बनून, नंतर व्यक्तिस्वातंत्र्य अनुभविणाऱ्यांच्या हातून बहुजनसमाजाच्या सुस्थितीस धक्का लागणार नाहीं, असें मला वाटतें. स-

माजाचे खालचे झरे मात्र जोरदार ठेविले पाहिजेत; त्यांना खंड पडूं देतां कामां नये; व याकरितां जातीजातींचे लोक योग्य प्रमाणानें खेड्यांत व शहरांत, सामाजिक इमारतीच्या पायापासून तों कळसापर्यंत सारखे वांटले जावे हें इष्ट आहे. सर्व जातींची त्यांत शाश्वती आहे. व्यावहारिक, रूढिमूलक, धर्ममूलक व इतर सर्व निर्बंध समाजाच्या तळाशीं पक्के अमलांत यावे; व पुढें भिन्न वर्गांचा जो उत्क्रांतीच्या प्रमाणानें चढता अनुक्रम लागेल त्यांत कांहीं कांहीं निर्बंध सुटत जावे व व्यक्तिस्वातंत्र्य वाढत जावें—हेंच समाजाच्या हितास व रंजनास श्रेयस्कर आहे असें मला वाटतें.

२१० याप्रमाणें धर्म, रूढि व शिष्टाचार यांचे निर्बंध कमी कमी करीत असतां एक दोन गोष्टी मात्र ध्यानांत ठेविल्या पाहिजेत. प्रत्येक वरच्या वरच्या वर्गास आपल्या आचरणाची जबाबदारी ओळखतां आली पाहिजे. वरच्या वर्गांच्या मनोवृत्ति अधिक सात्त्विक ह्मणूनच त्यांस वरिष्ठ ह्मणायाचें. तेव्हां, धर्मादींच्या निर्बंधांमुळें कनिष्ठ जाति जें सदाचरण करितात, तेंच वरिष्ठ जातींनीं त्या निर्बंधांवांचून स्वभावतःच केलें पाहिजे. अशी स्थिति असल्याखेरीज अधिक व्यक्तिस्वातंत्र्यास ते पात्र होणार नाहींत. आतां जे अगदींच वरच्या पायरीस जाऊन पोहोंचले, ज्यांनीं असामान्य गुण प्रकट केले, पूर्ण व्यक्तिस्वातंत्र्य घेऊन सर्व निर्बंध झुगारून दिले, बुद्धीस निरंकुश करून समाजांत जे नवीन वैचित्र्य आणूं लागले, व एकंदरीनें बहुजनसमाजापासून फारच दूरच्या उच्च पदवीस गेले, त्यांची गोष्ट निराळी. सामान्य जनांस त्यांचें अनुकरणच करितां यावयाचें नाहीं; व ह्मणून त्यांची नीति सामान्य जनांहून निराळी असली तरी चालेल. त्यांचे गुण मात्र पहायाचे, त्यांचीं परोपकारक कृत्यें मात्र आदरपूर्वक स्वीकारायाचीं, परंतु त्यांचें वर्तन अनुकरणीय असें समजायाचें नाहीं. कारण तें आचरण, त्यांचे गुण अंगीं आल्यावांचून, कोणासही शोभायाचें नाहीं. आपल्या समाजांत पूर्वींपासून हा असा प्रघात आहे. जो योगी बनला, जो पूर्ण ब्रह्मज्ञानी झाला, ज्याची गणना प्रासादिक साधुसंतांमध्यें होऊं लागली, त्याचें महत्त्व व त्याची पूज्यता कितीही वाढली, तरी व्यवहारांत त्याचें अनुकरण करूं

लागणें, हें कोणाही समंजस माणसास पसंत पडत नसे. हीं देव झालेलीं माणसें; यांचा वास स्वर्गाच्या नंदनवनांत; त्यांस कर्मभूमींतील लोकांनीं बहुमान द्यावा, परंतु त्यांच्या इतकी योग्यता आल्यावांचून त्यांचें अनुकरण मात्र करूं नये. अत्यंत बुद्धिमान् व सामर्थ्यवान् असा जो सर्वांत श्रेष्ठ वर्ग तो पृथ्वीवर स्वर्गलोकाचें प्रतिबिंब पाडण्याकरितां मात्र उत्पन्न झालेला असतो, असेंच समजलें पाहिजे. धर्मनिर्बंधांत राहणारा बहुजन समाज धान्याकरितां पेरलेल्या शेताप्रमाणें आहे; त्यावर मनुष्यजातीचें अस्तित्व अवलंबून आहे; परंतु शेतीनें उपजीविका मिळविल्यावर, कांहीं थोडी उत्तम सुपीक जमीन पाहून तींत जशा सुगंधी पुष्पांच्या व मधुर फळांच्या वृक्षवेली लावाव्या, त्याप्रमाणें समाजांतील वरिष्ठ वर्गांतील अत्यंत गुणी स्त्रीपुरुषें होत. त्यांचे जतन करण्याचे मार्ग निराळे, गुणोत्कर्षाचे मार्ग निराळे. त्यांस सामान्य शेतीचे नियम लावितां कामां नये. याप्रमाणें वरच्या वरच्या वर्गांनीं आपल्या जबाबदाऱ्या ओळखल्या, व वरिष्ठतम वर्गांनीं पूर्ण स्वातंत्र्य अनुभवित असतां सर्वत्र गुणप्रकाश पाडून समाजाचें हित व रंजन केलें, ह्मणजे ते समाजाचे अनृणी झाले. मग त्यांच्या अधिक स्वातंत्र्याचें बीज झालें ह्मणून समजावें. असा माझा अभिप्राय आहे. ”

३११. हा अभिप्राय ऐकून नारायणराव व भाऊसाहेब या उभयतांसही संतोष झाला; त्यांस तो सर्वस्वी पसंत पडला नाहीं हें खरें, परंतु समाजाच्या उत्कृष्ट काल्पनिक स्थितींत तो मान्य करण्यास हरकत उरणार नाहीं, व तोंपर्यंत त्या उत्कृष्ट स्थितीच्या जवळ जवळ जाण्याचा सर्वांनीं प्रयत्न करावा, हें आजचें कर्तव्य आहे असें त्यांनीं मला सांगितलें. कर्मभूमींत उत्कृष्ट पुण्यसंचय केल्यावर, नंतर नंदनवनांत प्रवेश करितां यावा, अशी त्यांनीं आट टराविली, व ती मींही मान्य केली. याप्रमाणें सर्वांचें एकमत झाल्यावर, पुढें थोडावेळ इकडचें तिकडचें बोलणें झालें, व मी बिऱ्हाडीं परत आलों. दुसरे दिवशीं लीलावतीच्या भेटीस जाऊन ती सर्व हकीकत तीस सांगेपर्यंत चित्तास समाधान नव्हतें; नारायणरावांचीं मतें व त्यांवर मी बांधलेले सिद्धांत लिलावतीस पसंत पडले.

तिनें माझी बरीच तारीफ केली, तेव्हां ती मला निष्फळ वाटून मीं तीस उत्तर केलें,—

"ताई, माझ्या मनाची स्थिति तूं पुरतेपणीं ओळखली नाहींस ह्मणून एवढी माझी स्तुति चालविली आहेस. तूंही बंधुप्रेमानें पक्षपाती होत चालली आहेस. लीले, माझे मनास समाधान नाहीं; तें व्हावें ह्मणून मी तुजकडे येऊन आपलें अंतःकरण उघडें करितों. सुखदुःखांस समान योग्यतेचा वांटेकरी असला ह्मणजे सुख दुणावतें व दुःख अर्धं होतें. तुझ्या संगतीपासून हा परिणाम हटकून होतो. त्यामुळें मला हें शहर सोडण्याचें जिवावर आलें आहे. सुधारणेचें वारें डोक्यांत भणभणत असतां मी रामचंद्रपंताकडे गेलों त्यास आज सुमारें वर्ष होत आलें. या वर्षांत माझ्या मनांत किती तरी फरक पडला आहे! किती नवीन नवीन संस्कार त्या मनावर झाले आहेत! किती भिन्नभिन्न दिशांस तें धांव घेत आहे! ज्या दिशेस तें जातें त्याच दिशेस कर्तव्याची श्रेष्ठतमावस्था आहे असें त्यास भासतें. अमुकच एक कर्तव्याची दिशा असा निश्चय होत नाहीं. यास काय करावें? समाजरूपी जलाशयाच्या मध्यभागीं मी आहें, जिकडे सूक्ष्मपणें दृष्टि द्यावी तिकडचाच तट मनास मोहक दिसतो, तिकडेच तरून जावें अशी उत्कट इच्छा होते; इतक्यांत कांहीं क्षुल्लक कारणांनीं दुसरीकडे नजर जाते, व तिकडचाही देखावा अत्यंत रमणीय दिसतो; असें क्रमानें होत जाऊन मन चंचळ होतें; आपली वाट कोणती हें त्यास कळत नाहीं.

"पूर्वीं जेव्हां एका इंग्रजी सुधारणेचें वेड डोक्यांत होतें, तेव्हां मन ह्मणजे उन्हाळ्यांत वणवा लागलेल्या अरण्याप्रमाणें होतें. हा वणवा पालवी झडलेलीं रुक्ष दिसणारीं जुनींपुराणीं झाडें सर्व जाळून भस्म करील असा त्याचा जोर दिसत होता. पुढें कोणतीं झाडें त्या अफाट मनोरूपी अरण्यांत लावायाचीं याचा विचारच त्यावेळीं नव्हता. परंतु त्या वणव्यानें गवतकाडी मात्र जाळली, वृक्षांची बाह्यत्वचा काळसर केली व तो विझून गेला. तो निरंतर जळत राहिला असता तरी तीं जुनीपुराणीं खोडें त्यांतून जीव बचावून राहिलीं असतीं असें मला वाटतें. त्या तेव्हांच्या उन्हाळ्याचे

मागून या संतप्त मनावर एक एक सुविचाराची जोराची सर येऊन तें थंड होत चाललें. एक एका जुनाट वृक्षास पालवी फुटूं लागली; आज मनाकडे पाहतों तों तें सर्व हिरव्यागार बागेप्रमाणें झालें आहे. त्यांतील प्रत्येक वृक्ष पुष्पफलांनीं मोहक दिसत आहे. कोणाची उंची फार मोठी, परंतु विस्तार अगदीं कमी; कोणाचा विस्तार फार मोठा परंतु उंची फार थोडी; कोणाची पालवी सुंदर, कोमळ व डोळ्यांस आल्हाद देणारी, परंतु फळें फारशीं रुचकर नाहींत; कोणाचीं खोडें भलीं भक्कम, पानें राठ, परंतु शिखरावरचीं फळें अत्यंत मधुर. याप्रमाणें मनाचें जें वन बनलें आहे, त्यांत वृक्षांचें वैचित्र्य इतकें मोठें आहे कीं कोणाची प्रत वर लावूं, कोणाची खालीं लावूं, कोणतें गुणपुष्प आधीं वेंचूं, कोणतें झाडावरच सुकून देऊं, हें कांहींच विवेकशक्तीस निश्चित करितां येत नाहीं. पूर्वजांस कृतज्ञ होऊं कीं स्वकीय सद्भावास वश होऊं, न्यायानें वागूं कीं दया अंगीकारूं, ईश्वरी प्रेरणांस अनुसरूं कीं विवेकशक्तीस उत्तेजन देऊं, सात्त्विक प्रेमाचा प्रसार होऊं देऊं किंवा ज्ञानमार्गास लागूं, स्वार्थांत परमार्थ किती व परमार्थांत स्वार्थ किती, व्यक्तींस पूर्णत्व आणून समाजाचे शिखरावर नेऊन बसवावें किंवा समाजास जोरदार करून व्यक्तींस निर्बंधांत ठेवावें, बुद्धीनें वागावें कीं श्रद्धेनें वागावें, स्वसुखाचा मार्ग धरावा कीं समाजस्थैर्याचा धरावा; हे व अशाप्रकारचे अनंत विचार क्रमानें मनांत उचंबळतात; केव्हां एका विचाराचें स्वरूप उदात्त दिसतें, केव्हां दुसऱ्याचें दिसतें. असें विचारांचें वन सर्वत्र इतकें मोहक आहे कीं त्यांतील [illegible] वृक्षास उपेक्षितां कामां नये असें वाटतें. या अशा व[illegible] व्यवस्था लाविल्याखेरीज कर्तव्याची वाट स्पष्ट कशी [illegible] वाट ठरविणारा, तिच्या आड येणारीं झाडें तोडणा[illegible] स्था लावणारा कोण उपदेष्टा मिळेल, या चिंतेनें [illegible]

३१२. " दादा तुमच्या बुद्धींत हा असा [illegible] वा हें मला समजत नाहीं. मनाच्या वनांत [illegible] ण्यास कोणतेंही जुनें झाड आड येत न[illegible] कारण नाहीं. कांहीं झाडें समूळ त[illegible]

टावीं, कांहीं मात्र राखावीं, ही अविचारी सुधारकांची व्यवस्थापद्धति आहे. त्या सुधारकांची सुधारणा नको, नको, असें आतां नित्य घोकीत असतां पूर्व संस्कारांमुळें खोल रुजलेलें सुधारकीचें मूळ अद्यापि तुमच्या मनांतून नाहींसें झालें नाहीं, असें या तुमच्या अंतरंगांतील तरंगांवरून दिसतें. अहो, मन हें सामान्य वन नाहीं. कल्पवृक्षांनीं भरलेलें नंदनवन आहे. या सर्व वृक्षांमध्यें विलक्षण जादू भरलेली आहे. या वनांतील कर्तव्यांची वाट सरळ नाहीं. सृष्टिक्रमानेंच त्या वाटेंत अनिवार्य अडचणींचे स्थूल धोंडे पडलेले दिसतात. ते टाळावे कसे, कोणीकडे वाट फोडावी, कसें वळण धरावें, अशी शंका जेव्हां मनांत येते, तेव्हां सहजगत्या एक खुणेचा वृक्ष नजरेपुढें येतो, तो वाट दाखवितो; वाट काढण्याच्या प्रयासांत जे अंगास कांटे लागले असतील, जे व्रण झाले असतील, ते सर्व त्या वृक्षाच्या अमृतमय रसानें बरे होतात, डोळ्यांस अंजन मिळतें, शरीरास उत्साह येतो, पुढील वाट क्रमण्यास धैर्य येतें. असें त्या मार्गसूचक कल्पवृक्षांचें सामर्थ्य असतें. भिन्न प्रसंगीं भिन्न वृक्ष मार्गसूचक होतात. सर्वच महत्त्वाचे आहेत, सर्वांचें जतन केलें पाहिजे.

" सारांश असा कीं या कर्मभूमींत आयुष्याचें मार्गक्रमण करीत असतां, हरएक प्रकारचीं संकटें येतात; अकल्पित प्रसंग येऊन गुदरतात; कर्तव्यांस कोणतें वळण द्यावें हें समजेनासें होतें, स्तब्ध उभें राहण्याची पाळी येते, त्यामुळें आयुष्याचा काळ फुकट जाऊं ...तो. अशा वेळीं कर्तव्य मार्गावर प्रकाश पाडणाऱ्या प्रसंगोचित ...ने मनांत उद्भवतात; त्या बुद्धीस प्रेरणा देतात; त्या प्रेरणांस ...नें कर्तव्याची दिशा चुकत नाहीं, वाटेंतील सर्व दुःखें सु... कर्तृत्वाचा आनंद हृदयास उत्तेजन देतो. सर्व मनो...रीं मार्गसूचक झाल्यास मनुष्य यावज्जीव कर्तव्यांपा...याच्या आयुष्याचा ओघ गंगा नदीप्रमाणें स्व...नंत आनंदवृत्तींच्या मुखांनीं कालरूपी अगा...गे.

...दुसरीचे आड सहसा येत नाहीं. कु...मास भरती येते; श्रेष्ठजन पाहून व-

हुमान उत्पन्न होतो, हृदय नम्र होतें; दीनजन पाहून करुणेचा अवतार होतो; अनिवार्य दु:खप्रसंगांत सांपडल्यावर श्रद्धेचें बळ उपयोगीं पडतें. संपत्तीची जशी प्राप्ति होते, तशी परोपकाराकडे प्रवृत्ति होते. कर्तृत्व जसें अंगीं भरतें, तशी देशसेवेची हौस येते. मन जसें उदार होतें तशी भूतदया वाढते. याप्रमाणें सर्व मनोवृत्ति उचितसमयीं मात्र प्रबळपणें आविर्भूत होतात. त्यांच्या अनुसरणानेंच मनुष्यस्वभाव उदात्तस्थितीस जाऊन पोहोंचतो. या मानसिक नंदनवनाचा छेद करण्यांत मनुष्याचें हित नाहीं, मनुष्यजातीचें हित नाहीं, जीवितसाफल्य होणार नाहीं, कर्तृत्वास वैचित्र्य येणार नाहीं, कर्तव्यता संदेहात्मक होऊन उत्क्रांतीस अधोगति लागेल, सर्व परिणाम अनिष्ट व अनर्थावह होतील. हें जाणून सर्वांनीं उत्कृष्ट मनोवृत्तींचा उत्तम प्रतिपाळ करावा, जिवापलीकडे त्यांस जपावें, हेंच शिक्षण सर्वांस पाहिजे—हीच अध्यात्मविद्या होय. ”

“ सत्य, सत्य, सत्य ! लीलावती, सत्य बोललीस. हाच उपदेश जगास करायाचा असा आतां माझा निश्चय झाला. तुझी ही प्रेरणा अखेरची आहे. तूंच या माझ्या अंतर्यामाची ज्ञानदीपिका आहेस. तुझ्यापासून दूर गेल्यावर हृदयांत केवढी रिती जागा पडेल, केवढा अंधकार पसरेल, तें मनांत आणिलें ह्मणजे येथून परत फिरण्याचें प्राणसंकट वाटत आहे. परंतु त्यास काय उपाय ! ”

हे शब्द मी सद्गदित अंत:करणानें बोललों. लीलावतीनें माझें सांत्वन केलें. दुसरे दिवशीं मीं तें शहर सोडून नर्मदातीराचा पुन: रस्ता धरिला.

याप्रमाणें हा **चित्तशोधनाचा खरा वृत्तांत** आहे. तो वाचकांस प्रिय होवो; गुणकारी होवो, सन्मार्ग दावो, हे विनंति.

समाप्त.

SURESH V. RANADE, Pune
B
3514
PERSONAL LIBRARY